म. ग्रं. सं. ठाणें.
विषय भू-प्रवास
सं. क्र. ८९९

# त्या फुलांच्या सुंदर प्रदेशात

ले. मंदाकिनी गोगटे

REFBK-0029268
REFBK-0029268

# त्या फुलांच्या सुंदर प्रदेशात

मंदाकिनी गोगटे

REFBK-0029268

सुयोग प्रकाशन
पुणे

- TYA PHOOLANCHYA SUNDAR PRADESHAT
- त्या फुलांच्या सुंदर प्रदेशात
- प्रकाशन क्र. : १०२
- प्रकाशक
  सौ. सुचेता राळे
  सुयोग प्रकाशन
  प्लॉट नं. ५४, विश्वकर्मा सोसायटी,
  रामबाग कॉलनी, पौड रोड,
  पुणे ४११०३८


- © मंदाकिनी गोगटे
  बेला प्लॅट नं. ११४- ए ,शीव (प)
  मुंबई ४०००२२.


- मुखपृष्ठ
  अशोक बोकील
- प्रथमावृत्ती: १५ सप्टेंबर १९९७
- अक्षरजुळणी
  कॉमलिंक सर्व्हिसेस
  ८२९, सदाशिव पेठ
  पुणे ३०.
- मुद्रण स्थळ
  स्मिता प्रिंटर्स
  प्रमोद बापट
  नागनाथ पाराजवळ,
  सदाशिव पेठ, पुणे- ३० ·
- मूल्य : एकशे चाळीस रूपये मात्र

श्री. जगदीश पारेख यांस,

तुमच्यामुळे आमचा हा युरोप प्रवास होऊ शकला.

# त्या फुलांच्या सुंदर प्रदेशात

# आमच्या आम्ही युरोपला

युरोप व अमेरिका पाहण्याचं स्वप्न मनात होतं; पण नुसतेच प्रदेश पाहण्यासाठी जावं, हे मनाला रुचत नव्हतं. त्याबरोबर तेथील माणसं भेटावी, असं फार वाटत होतं.

माझा भाचा श्री. अनिल गोडबोले अमेरिकेत कॅलिफोर्नियात सॅन होजेला राहतो. त्याला त्यासंबंधांत विचारलं असता तो म्हणाला, गेली सहा वर्षं तो जिथं राहतो, तिथं त्याचे इंग्लिश शेजारी त्याच्याशी फक्त एकदाच बोलले आहेत. ते सुद्धा, त्यांचं मांजर ह्यांच्या घरी चुकून आलं, तेव्हा. आता मांजराच्या मध्यस्थीनं अमेरिकेत जाऊन अमेरिकन माणसाशी संबंध संपादन करणं ही फारच अवघड गोष्ट होती. पण तेवढ्यात 'सर्व्हास' ह्या इंटरनॅशनल संस्थेची ओळख झाली व परदेशात तिथल्या माणसांबरोबर राहायला मिळणार असल्यानं तिथल्या माणसांबरोबर खऱ्या अर्थानं भेट होणार होती.

'भेटीलागी जीवा आतुरले मन' प्रमाणे माझा उत्साह उदंडला. सर्व्हासची सभासद झाले नि पत्रलेखनं सुरू झाली. सर्व्हासच्या प्रमुखांचंच मन धडधडलं. ते म्हणाले,

'तुम्ही कुणाची तरी सोबत घ्या.'

माझी मोठी मुलगी स्वाति तयार झाली. आम्ही युरोपचे आठ, अमेरिकेचे बारा प्रदेश तीन महिन्यांत पाहणार होतो. पण, 'इतक्या दूरवर तुम्ही दोघीच जाणार ?' जो तो साशंक होऊन विचारत होता.

आम्ही दोघीच जाणार, यावर कुणाचाच विश्वास बसेना. (नि मी शहाणी एकटीच चालले होते !) नंतर इतरांचे साशंक चेहरे पाहून एकट्याच जात आहोत, हे सांगणंही अवघड वाटू लागलं. दोघीच युरोपला जाणं हा भीमपराक्रमच होता.

यात्रा कंपन्यांबरोबर प्रवास करणं अत्यंत सुखाचं असतं, ह्याचा अनुभव होता. पण राजस्थानची ट्रिप स्वतंत्रपणे केली, ती जास्त आनंददायी वाटली. स्वतंत्र गेलं, की अनुभवांचे चढ-उतार हाती लागतात. आवडत्या ठिकाणी जास्त वेळ रमता येतं. शिवाय स्वतः अनुभवांना सामोरं जाण्याचा वेगळाच आनंद मिळतो.

प्रत्यक्ष असे अनुभव घेताना मात्र अगदी त्रेधातिरपीट उडाली. हीथ्रो एअरपोर्टवर उतरलो आणि ट्यूब रेल्वे कुठं आहे, तेच समजेना. आमच्या होस्टला फोन केला, तर नुसतीच बेल वाजत होती. त्या वेळी कुंदा नावाची मैत्रीण उपयोगी पडली. तर एकदा गाड्यांच्या गोंधळात घरी जायला उशीर झाला आणि आमची होस्ट तर निघून गेली होती. रात्रीच्या वेळी बाहेर उभं राहताना ब्रह्मांड उभं राहिलं. तर पॅरिसला 'बर्न'ला जायचं सांगूनही उच्चाराच्या गोंधळामुळं तिथली इन्फर्मेशनवाली आम्हांला बॉनला पाठविणारी होती. तर मदतीचा हात पुढं करणाऱ्या रफीक नावाच्या भारतीय माणसाबरोबर तिकीट काढायला गेलेली स्वाति परत आली नाही. हृदयातला प्राण फटकन बाहेर निघून जातो आहेसं जाणवलं. तर इटलीत किर्र अंधाऱ्या रात्री. आम्ही दोघी रस्त्यावर. असे धक्के बसले; पण त्याचबरोबर साता जन्मांचं नातं असल्याप्रमाणे अपरंपार प्रेम करणारे होस्ट पण भेटले. त्यांच्याशी जन्मजन्मांतरीचे संबंध जुळलेच; पण काहींनी

तर कधी पाहायला मिळाला नसता, असा सौंदर्याचा खजिना दाखवला. स्वित्झर्लंडला ग्रिन्डलवाल इथं घनगर्द झाडीतून थोडं चाललो आणि चक्क बर्फाची निळी गुहा आणि त्यातून पाणी वाहताना पाहिलं, तर काहींनी तिथल्या खेड्यात हिंडवून आणलं आणि नदीचा उगम दाखवला. तिथल्या राहण्याची, समारंभांचीही ओळख करून दिली. माणसांच्या विविध तऱ्हा अनुभवायला मिळाल्या. ज्यांनी हे वर्णन वाचलं, ते म्हणाले,

'काही जरुरी होती इतके कष्ट घेण्याची ? पण आम्हांलाही तुमच्यासारखा प्रवास आवडला असता.'

एक दिवस धाकटी मुलगी भाग्यश्री म्हणाली,

'आई, चल. तुला बूट घ्यायचे आहेत.'

परदेशात जायचं, तर बूट घालणं अत्यावश्यक होतं. भाग्यश्रीनं नाईकचे बूट दाखवले आणि साईझ ठरवायला सांगितलं.

पायाची लांबी पाहून त्याप्रमाणे बुटाचा साईझ ठरवला. पण ह्या बुटांच्या राज्यात पायांची लांबी लक्षात घेतात, पण रुंदी अजिबात लक्षात घेत नाहीत. खरं तर, मला छान, फताडे बूट हवे होते. पण पायाच्या रुंदीप्रमाणे बूट मिळण्याची सोय नाही. त्यामुळं जसे बूट मिळाले, त्याप्रमाणेच घ्यावे लागले. भाग्यश्रीच्या मैत्रिणींनी बूट पाहून, 'हा ऽ नाईकचे बूट !' म्हणून कौतुक केलं; पण छान दिसणाऱ्या बुटांत माझे फताडे पाय घातले, की माझ्या पायांची अवस्था काय होणार ? ह्या शंकेनं मन कुरकुरत होतं. मुंबईत बूट घालायची लाज वाटत होती.

एक दिवस तिन्हीसांजेला, अंधार पडू लागल्यावर मी बूट घातले नि बाहेर पडले. अंधार पडू लागल्यामुळं, कुणी पाहणार नाही, हा हेतू मनात होताच. भाजीमार्केटमध्ये गेले नि जीव हैराण झाला. भाजी न घेताच घरी यायला निघाले. आपल्या शरीराला फक्त पायच आहेत नि ते कुणी कचाकचा चावत आहेत, एवढंच समजत होतं. पायाचं दुःख असह्य होत होतं, तसतसा मुलींवर राग येत होता.

मला मुळात बूट घेतलेच कशाला ?

परदेशांत काय चपला घालत नाहीत ?

हीच दोन वाक्यं मनात आलटून-पालटून म्हणत घरी आले नि मुली घरी आल्यावर, मनातली तोफ कुरकुरत बाहेर आली,

'मला हे बूट का घेतले आहेत ? चप्पल घेतली, तर काय हरकत आहे ?'

'चप्पल ? तुटली, तर काय करशील ?' स्वाति म्हणाली.

'नि आपापलं सामान उचलताना चप्पल नक्की तुटेल.' भाग्यश्री म्हणाली.

'बाप दाखव, नाही तर श्राद्ध कर.' तशी माझी अवस्था झाली. युरोपला जायचंच; पण बूट पायांत घालणार, की हातात ठेवणार, एवढाच प्रश्न होता. 'बूट कुठं चावतो, ते ज्याचं त्यालाच कळतं.' ही म्हण डोक्यात जाळं विणीत राहिली होती, एवढं मात्र खरं.

त्यानंतर 'पंजाबी ड्रेस'ची रंगीत तालीम झाली.

'अगदी टिपिकल मध्यमवर्गीय दिसते.' स्वाति.

'चांगली दिसते, की लहान वाटते ?' भाग्यश्री.

अशी टीकाटिप्पणी मी झेलत होते; पण फार उंची 'पंजाबी ड्रेस' विकत घ्यायला मन तयार नव्हतं. 'तीन महिन्यांनंतर त्याचा उपयोग काय ?' हा विचार मनातून दूर होत नव्हताच.

घरातल्या उंची उंची साड्या पाहून, त्याच न्याव्या, असं मनात एकसारखं येत होतं.

'मी साड्याच बरोबर घेतल्या, तर !'

'पण एस्कटेलरमध्ये साडी अडकली, तर ?' स्वातीचा बिनतोड प्रश्न.

हातात बॅग नि एस्कलेटरमध्ये माझी साडी अडकलेली हे व्यंग्यचित्र छानच विनोदी वाटलं. तरी ते भयानक होतं.

'युरोपला जाणार ? मग तुमच्या इंग्लिशचा काही उपयोग नाही. फ्रेंच, नाही तर जर्मन शिका.' हा उपदेश वारंवार कानांवर येत होता.

आता अकरा वर्षं इंग्लिश शिकूनही आमचे उच्चार त्यांना समजताना पंचाईत, तर चार-सहा महिन्यांतलं फ्रेंच वा जर्मन उच्चार त्यांना कसे काय समजणार ?

मी मात्र सगळ्यांना, 'मी फ्रेंच, नाही तर जर्मन शिकणार आहे,' असंच सांगत होते.

मी अमेरिकेत माझ्या भाचेसुनेला भेटले, तेव्हा ती म्हणाली, की तिनं शिकलेलं पुस्तकी फ्रेंच प्रत्यक्ष फ्रान्समध्ये बोलताना उपयोगी पडलं नाहीच.

आम्हांला परदेशांत तर जायचं होतं; पण परदेशांतली थंडी सोसण्यातली नव्हती. कारण मुंबईतही आम्हांला केव्हा केव्हा हुः हुः हुः होतं. त्यामुळं आम्ही जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर हे उन्हाळ्याचे (तिकडील) दिवस निवडले; पण त्यामुळं आमचे होस्टही हिंडत होते व आम्हांला होस्ट मिळणंही कठीण जात होतं. त्यातून स्वाति ही तरुण, लग्न न झालेली मुलगी नि त्यामुळं तिला व्हिसा मिळणार नाही, हे जो तो सांगत होता. त्यामुळं ती एक टांगती तलवार सदैव डोक्यावर होती. प्रत्यक्ष आम्ही अमेरिकन् व्हिसा घ्यायला गेलो, तेव्हा तो व्हिसा देणारा अमेरिकन गोड बोलत होता व स्वाति सी. ए. असून प्रॅक्टिस करते आहे, म्हटल्यावर आम्हांला पटकन व्हिसा मिळाला, पण व्हिसा मिळणारच नाही, असं सगळ्यांनी उदाहरणासहित पटवून दिल्यानं मन धागधुगलेलं होतं. त्यापायी मल्टिपल वा डबल एन्ट्री व्हिसा मागायचा आयत्या वेळी विसरूनच गेलो होतो. त्यानंच आपणहून डबल एन्ट्री व्हिसा दिला.

घरी आल्यावर स्वाति मोठ्या कौतुकानं म्हणाली.

'सहा महिन्यांचा डबल एन्ट्री व्हिसा मिळालाय्. आपण सहा महिन्यांत परत अमेरिकेला जाऊ शकतो.'

'हॅ ऽ ! परत परत काही आपण येणार नाही.'

'का ? जायचं.' स्वाति सांगत होती.

'हो. जायचं. पुण्याला सुद्धा सहा महिन्यांतून दोनदा जाणं होत नाही नि अमेरिकेला चाललो आहेत.'

'अमेरिकेला जाण्यातच मजा.' स्वाति अगदी मजेत म्हणत होती.

मी एकदम लक्षात येऊन म्हणाले,

'अग, आपल्याला नायगारा पाहायचाय्, टोरोंटोला माझं कथाकथन आहे, म्हणजे आपल्याला डबल एंट्री हवीच की.'

'अय्या, हो. लक्षातच नाही.'

'नशीब त्यानं दिला. नाही तर बोऱ्याच.'

'ही लोकं व्हिसाबाबत घाबरवतात ना ! त्यामुळं सगळा घोटाळा होणार होता.'

इतका आम्ही व्हिसाचा धसका घेतला होता नि प्रत्यक्षात मात्र, लंडनला व्हिसा पाहणाऱ्या इंग्लिशमननंच स्वातीला विचारलं,

'तू सी. ए. आहेस, तर लंडनलाच सेटल का होत नाहीस ?'

एकंदरीत स्वातीला व्हिसा मिळणार नाही म्हणणारी माणसं भलतीच अनुभवी!

सहा जुलैला रात्री १२ वाजून ३० मिनिटांनी म्हणजेच सात जुलैला पहाटे शून्य वाजून ३० मिनिटांनी आमचं विमान निघणार होतं. रात्री आम्ही विमानतळावर जायला निघायच्या आधी एक तास आमच्या एका शेजारणीनं विचारलं,

'मलेरियाचं इंजेक्शन घेतलं ?'

'नाही. आम्हांला, घ्यायला पाहिजे, असं कुणी सांगितलंच नाही.'

ही आमची शेजारीण अमेरिका, दुबई, सिंगापूर वगैरे ठिकाणी हिंडून आली होती. त्यामुळं मन धाकधुकत असलं, तरी शेवटच्या तासाभरात आम्ही काही करू शकत नव्हतो.

शेवटी फताडे नसलेले, देखणे, पण चावरे बूट मी पायांत चढवले. जाण्याचा उत्साह इतका उदंड होता, की ते पायांत आहेत, असं लक्षातही आलं नाही; पण विमानात बसले नि बूट अचानक चावू लागले.

मी बूट काढून ठेवले. थोड्याच वेळात विमान चालू लागलं व त्यानं एकदम वर झेप घेतली.

मनात कितीएक वर्षं जपून ठेवलेलं स्वप्न प्रत्यक्षात उतरू लागलं. मी एखाद्या उत्साही पाखराप्रमाणे बाहेर पाहत होते.

अंधारात काही दिसत नव्हतं, तरीही, किती मौज दिसे ही पहा तरी, हे विमान फिरते अधांतरी, असा माझा उत्साह लहान मुलाला लाजवेल, असा होता.

नंतर फक्त आकाशच दिसायला लागलं, तेव्हा माझं लक्ष स्वातीकडे गेलं. दयनीय पाखराप्रमाणे तिचा जीव फडफडत होता. कारण तिला विमानात बसण्याची भयंकर भीती वाटत होती.

***

११२३८
११।१२५८

# हीथ्रोवरच भंबेरी

अवाढव्य अशा हीथ्रो एअरपोर्टला आमचं ब्रिटिश एअरवेज्चं विमान लागलं नि जगप्रवासाच्या पहिल्या टप्प्याशी आलो, ह्याचा अमर्याद आनंद झाला. पण विमान वेळेवर-म्हणजे चारलाच हीथ्रोला पोचलं व इतक्या लवकर डॅनिलाच्या घरी कसं जायचं ? हा आमच्यापुढं प्रश्न होता. त्यामुळं मी व माझी मुलगी स्वाति आरामात बसलो होतो. मात्र इतर प्रवासी अगदी धावपळ करत जात होते.

डॅनिला मर्चंट, ही सर्व्हास इंटरनॅशनल ह्या जगभर पसरलेल्या संस्थेची आमची लंडनची यजमानीणबाई होती. आपला होस्ट निवडताना, त्याचं शिक्षण, त्याच्या आवडी-निवडीही त्याच्या माहितीच्या कॉलममध्ये दिलेल्या असतात. 'गप्पांची आवड' ही तिची आवड मला व स्वातीला खूपच भावली. शिवाय इंग्लिश माणूस नि गप्पांची आवड ह्या विरोधाभासाचीही गंमत वाटली. शिवाय आम्ही दोघीच जगप्रवासाला निघालो होतो. त्यांतला लंडन हा पहिला देश होता. आमचे कुणीच नातेवाईक तिथं राहत नसल्यानं तिथली काहीच माहिती नव्हती. डॅनिला 'रेनर्सलेन'वरून आम्हांला 'पिकप' (Pick-up) करणार होती. ही विशेष बाब लक्षात घेऊन, आम्ही तिची निवड केली होती.

शेवटी आम्ही उठलो. हँडबॅगा हातांत घेतल्या. त्या चांगल्याच जड होत्या. विमानात मोठ्या बॅगांचं वजन धरलं जातं व लंडनला प्रत्येकी फक्त २० किलो वजनच माफ असतं. जास्त वजन झाल्यास पैसे भरावे लागतात. ते अधिक पैसे भरावे लागतील, ह्या धास्तीनं आम्ही हँडबॅगेत बरंचसं सामान कोंबलं होतं नि प्रत्यक्षात आमच्या मोठ्या बॅगांचं वजन अनुक्रमे १८ व १३ किलो झालं होतं. ते वजन जेव्हा समजलं, तेव्हा डोळे मिटून तोंड वाकडं करणंच फक्त शक्य होतं; आमच्या जवळच्या त्या तीन हँडबॅगा फारच जड असल्यानं आम्ही त्या आमच्याजवळच्या छोट्या ट्रॉलीवर बसवण्याचा आटोकाट प्रयत्न करत होतो व त्या बॅगा ट्रॉलीवरून एकसारख्या खाली घसरत होत्या. तेवढ्यात एअर होस्टेसनं जरा बाजूला उभं राहून आम्हांला आमचा उद्योग करायला सांगितलं. तेव्हा आमच्यामागे खोळंबलेली ही ऽऽ गर्दी आम्ही पाहिली. पण कुणीही महाभाग आमच्या मदतीला आला नाही. सगळे सतत कसल्या तरी धावपळीत असलेले. आम्ही कसंबसं सामान बाहेर काढलं. मग ते एअरपोर्टवरल्या मोठ्या ट्रॉलीवर ठेवून आम्ही आमच्या दोन मोठ्या बॅगांची वाट पाहत होतो. त्या मिळाल्यानंतर थोरली मोठी रांग पार करतं दीड तासानं कस्टममधून आम्ही बाहेर पडलो.

तो भला मोठा विस्तीर्ण एअरपोर्ट पाहून आम्ही पार गडबडून गेलो होतो. स्वतःच्या हिमतीवर प्रवास करणं जमणार आहे का ? ह्याची धास्ती वाटत होती. डॅनिलानं आम्हांला ट्यूबनं रेनर्सलेनला यायला सांगितलं होतं; पण 'ट्यूब कुठं आहे', हे काही आम्हांला कुणी सांगत नव्हतं. ज्याची त्याची माणसं येत होती व आपापल्या पाहुण्याला प्रेमानं घेऊन जात होती. कुणी पाहुण्याच्या नावाचा बोर्ड वर करून स्वागताला उभी होती. आमच्या स्वागताला कुणीच नव्हतं. कॉम्प्यूटरवर प्रयत्न केला, तर रेल्वे म्हटल्यावर अनेक रेल्वेंची नावं सामोरी

आली; पण कोणती ट्यूब नेमकी घ्यायची, कोणती लाईन रेनर्सलेनला जाते, हे काहीच समजत नव्हतं.

डॅनिलाला फोन केला होता, तर फोन कुणी उचलत नव्हतं. घरी आहे, की नाहीच ? आम्ही तिच्यापर्यंत पोचणार कशा ? नि 'या' म्हणून सांगून घरी नसेलच, तर ! जगप्रवासाच्या पहिल्या स्थानालाच अशी थप्पड बसली होती.

कुंदा कारखानीस नावाच्या माझ्या मैत्रिणीचा फोन-नंबर सहजच घेतला होता. तिला फोन करायचं ठरवलं. लंडनला फोनची अशी पद्धत आहे, की जास्त सेंट्स टाकले, तरी फोन झाल्यानंतर उरलेले पैसे परत येतात, ही विशेष माहिती माहीत असल्यानं सरळ साठ सेंट टाकले (१८ रुपये) व कुंदाला, 'तू आम्हांला घ्यायला येशील का ?' असाच फोन केला. खर तर, आम्ही दोघी भयंकर गांगरून गेलो होतो. पण कुंदा लग्नाला जायच्या गडबडीत होती. नि, खरं तर, तिचं विमडली हे स्टेशन हीथ्रोपासून किती तरी लांब होतं. त्यामुळं तिला तिथपर्यत येणं अवघडच होतं. तिनं फोनवरून सांगितलं, की एअरपोर्टच्या बाहेरच १० नं. चा बस स्टॉप आहे. त्या बसनं 'हॅरो, ऑन दी हीलला ये. मग फोन कर, तुला न्यायला येते.' फोन खाली ठेवला व उरलेले पैसे येतील, असं वाटलं, पण ते फोननं गडप केले होते. सामानाजवळ स्वाति उभी राहिली नि मी बाहेर जवळ-जवळ अर्धा पाऊण तास बसस्टॉप शोधत होते. गाड्या फर्‌कन् यायच्या नि जायच्या. नजर नुसती इकडून तिकडे करायची नि गेलेली गाडी पाहून हताश होणं ह्यापलीकडे मी काही करू शकत नव्हते. आपल्या भारतात, असा एखादा युरोपियन माणूस, गांगरलेला दिसला असता, तर आपण त्याचे सेवकच आहोत, अशा थाटात, त्याला मदत करायला धावलो असतो. पण इथं आमच्याकडे कुणी ढुंकूनही पाहत नव्हतं. आम्हांला मात्र, त्यांच्या थॅंक्यू व सॉरीचं केवढं कौतुक !

एक माणूस पायी चालणारा भेटला, तर त्याला मी पटकन् जाऊन विचारलं,

'व्हेअर इज बस स्टॉप ?'

'व्हेअर इज ट्यूब स्टेशन ?'

पण त्याचा चेहरा प्रचंड गोंधळला. ते पाहून, मी अत्यंत निराश झाले. तेवढ्यात, आणखी एक पादचारी दिसला. तो त्याच्या, पार्क केलेल्या गाडीकडे चालला होता. मी धावत जाऊन त्याला वरील दोन प्रश्न विचारले. तेव्हा ट्यूब हीथ्रोच्या खालीच आहे, असं त्यानं सांगितलं. मघापासून एक मोठी लिफ्ट सामानासहित खाली-वर जात होती. तीतून खाली जाऊन बघून येते, असं मी स्वातीला सांगितलं. त्या लिफ्टनं खाली गेले, तर तिथं खरोखरीच ट्यूब दिसली. मला अगदी आनंदानं नाचावंसं वाटलं. शिवाय तिथल्या स्टेशनमास्तरनं रेनर्सलेनला कसं जायचं, तेही सांगितलं. मग आम्ही रेनर्सलेनवरून डॅनिलाकडे जायचं, असं ठरवलं. आमची ट्रॉली ट्यूबच्या डब्यापर्यंत जात असल्यानं, सामान उचलण्याचा त्रास झाला नाही. शिवाय प्रत्येक डब्यात रेल्वेचा नकाशा होता नि प्रत्येक स्टेशनावर आणि ट्यूबच्या बाजूच्या भिंतीवर त्या त्या स्टेशनाचं नाव सतत लिहिलेलं असल्यानं रेनर्सलेनला उतरायला अजिबात त्रास झाला नाही. वास्तविक आक्टन टाऊन ह्या स्टेशनवर उतरून गाडी बदलून जावं लागलं; पण प्लॅटफॉर्म बदलावा न लागल्यानं प्रवास सुरळीत झाला. आजूबाजूला फुलांची आरास नि हिरवी गर्द झाडं

पाहताना मौज वाटली.

रेनर्सलेनला आलो नि इथं एस्कलेटर वगैरे काही नव्हतं व चाकाची बॅग जिन्यावरून ढकलता येत नाही. उचलून घ्यावी लागते, हे लक्षात आलं नि फिरून सारं सामान उचलून जिन्यावर नेताना प्रचंड त्रास झाला. आपण लंडन पाहायला आलो, की हमाली करायला आलो, असा प्रश्न मनात आला. एका इंग्लिश माणसानं बॅगेला हात लावला नि आम्ही कश्याबश्या वर पोचलो नि स्टेशनबाहेर असलेल्या टेलिफोन बूथवरून डॅनिलाला फोन केला. तर फोन कुणी उचलतच नव्हतं !

कुंदा कारखानीसला फोन केला. तिनं प्रेस्टन रोड ह्या स्टेशनवर यायला सांगितलं. फिरून सामानाचा डोलारा खाली न्यावा लागला नि परत तिकीट काढावं लागलं. इथं भुयारी रेल्वे असल्यानं तिकीट न काढता तारेवरून उडी टाकून परस्पर पळून जाता येत नाही. मशीनमध्ये तिकीट काढलं, तरच दरवाजा उघडतो आणि जाता येतं. जुनं तिकीट टाकून जाता येतं का, ते पाहिलं. पण दरवाजा बंदच राहिला. प्रेस्टन रोडला फिरून जिन्यावरून ते सामान वर न्यावं लागलं. प्रवासाची सुरुवात काही ठीक नव्हती. पण प्रेस्टन रोडला सशांत हा कुंदाचा मुलगा आम्हांला न्यायला आला. साडी व पंजाबी ड्रेसमधल्या आम्ही दोघीच एकमेव तिथं असल्यानं आम्हांला ओळखणं अवघड नव्हतं.

'अर्धा पाऊण तास हिंडूनही मला बस कुठंच मिळाली नाही.' मी घरी गेल्याबरोबर कुंदाला सांगितलं.

'आश्चर्य आहे !' ती म्हणाली.

मला तर वाटलं होतं, तिनं थापच मारली...

'नुसत्या गाड्या इकडून तिकडे जात होत्या. कुठंही बस किंवा उभी असलेली माणसं दिसली नाहीत.'

'कमाल आहे ! एअरपोर्टच्या बाहेरच बस-स्टॉप आहे.' कुंदा खरोखरीच आश्चर्यचकित झाली होती.

'तुम्ही कोणत्या एअरवेज्नं आलात ?' सशांतनं विचारलं.

'ब्रिटिश एअरवेज्नं.' स्वातीनं सांगितलं.

'ब्रिटिश एअरवेज् ? सगळे एअर इंडियानं येतात, म्हणून मी बाहेरच बस-स्टॉप आहे, असं सांगितलं. ब्रिटिश एअरवेज्नं आलोय्, असं बोलली असतीस, तर सांगितलं असतं, की तिथून ट्रॅन्स्फर घेऊन एअर इंडियाच्या विमानतळाशी ये नि मग बसनं ये. म्हणून !' कुंदानं समजावत सांगितलं.

आम्हांला एक सहार एअरपोर्ट माहीत. इथं इतक्या छप्पन भानगडी असतील, ही, काय कल्पना. गप्पा मारायची आवड असणाऱ्या डॅनिलाच्या फोननं 'ना बोले, ना बोले, ना बोले, रे' केलं होतं. दुपारी फिरून डॅनिलाला फोन केला, तेव्हा ती घरातच होती ! एकदा ती पेपर आणायला बाहेर गेली होती नि एकदा अंघोळीला !

मधल्या साऱ्या अडचणी वगळून घरी पत्र पाठवलं,

'आमचा प्रवास खूप मजेत चालला आहे,' असं कळवलं.

## डॅनिलाच्या घरी

संध्याकाळी सशांतनं डॅनिलाच्या घरी आम्हांला पोचवलं. डॅनिलाचं घर म्हणजे कुंदाच्या घराची कार्बन कॉपी होती. एका बाजूला स्वंयपाकघर व वर जाणारा जिना नि व्हरांडा, दुसऱ्या बाजूला डायनिंग रूम व हॉल; खाली जिन्याजवळ लहान टॉयलेट, वर मोठी टॉयलेट रूम व दोन बेडरूम्स. घराच्या पुढं लहान लॉन न मागच्या बाजूला मोठं लॉन. मिडलसेक्समध्ये राहणारी माणसं साधारणत: स्वत:च्या घरात राहतात. त्यामुळं इथला भाग अतिशय शांत व सुंदर आहे. सेंट्रल लंडनमध्ये मात्र बहुतेक सर्वजण अपार्टमेंटमध्येच राहतात. इथल्या टुमदार अशा प्रत्येक घरातून मध्यवर्ती हवा गरम होण्याची व्यवस्था असते. सारी घरं साधारणत: अशाच तऱ्हेची आहेत. तरीही प्रत्येक हॉलमध्ये फायरिंग प्लेसची रचना असते. मात्र ही सारी घरं बाहेरून अगदी काळी असतात. एकालाही घराला दुसरा रंग द्यावा, असं कसं वाटत नाही. ह्या घराचं शूटिंग टी.व्ही. वर पाहू, तर प्रत्येकाला आपापले रंगीत टी.व्ही. बिघडले आहेत, असं वाटेल.

हॉल व हॉलच्या वरच्या खोलीच्या खिडक्या उभट काचेच्या असतात व ती बाजू गोलाकार असते. ह्या खिडक्या नेहमी बंद असतात. ह्या खिडक्यांना जाळीदार पांढरे व रंगीत असे दोन प्रकारचे पडदे असतात. इथली सारी घरं लाकडी व आपापली वाढवता येतात. कारण ह्या घरांना पाया व स्लॅब हा प्रकारच नसतो. लाकडी जमिनीखालून वायरिंग गेलेलं असतं. स्वयंपाकघर सोडून सर्वत्र लाकडी गालिचे पसरलेले असतात. ह्यातून जिन्याच्या पायऱ्या पण सुटत नाहीत. इथल्या सगळ्या घरांचा आतून हाच एकमेव थाट असतो. फक्त गालिच्यात फरक. अगदी एखाद्या आलिशान हॉटेलप्रमाणे घरं सुंदर सजवलेली असतात. उन्हाळा असूनही लंडनमध्ये आम्हांला थंडी वाजत होती. डॅनिला दरवेळी थट्टेनं म्हणायची, की तुमचा हिवाळा व माझा उन्हाळा, असं.

डॅनिलाच्या घराच्या पुढं केवढी तरी रंगीबेरंगी फुलं फुलली होती. प्रत्येकच घरातून अशी रंगीबेरंगी फुलं दिसतात. तिच्या घराच्या मागच्या बाजूला केवढं तरी मोठं लॉन होतं. तिथं मोठमोठी गुलाबाची फुलं फुलली होती. डॅनिला कौतुकानं सारं घर दाखवत होती. लंडनमध्ये सततच रिमझिमता पाऊस पडत असल्यानं गुलाब टवटवीत व खूप मोठ्या आकाराचे होते. शिवाय परसात एक सफरचंदाचं झाडही लावलेलं होतं. सगळ्या झाडभर सफरचंदं लगडली होती. पण त्या वेळी ती अगदीच लहान होती. थंडीत हीच सफरचंदं, म्हणे, केवढी तरी मोठी होतात. त्यापासून डॅनिला वर्षाभराचा जाम बनवते. हा जाम नंतर आम्ही खात होतो. इथली हवा सततच थंड असल्यानं जामकरता केमिकल्स वापरावी लागत नाहीत. त्यामुळं जामची चव कायमच छान राहते.

डॅनिलाकडचे मोठमोठे गुलाब पाहून मी तिला म्हटलं, की ह्याच गुलाबाला भारतात 'किंग रोज' वा 'क्वीन रोज' म्हणून सहज बक्षीस मिळेल. कुंदानं तर पुढच्या परसातले गुलाब काढून मागच्या परसात परत लावले, तरीही एकही गुलाबाचं रोपटं दगावलं नाही. इथली हवाच मुळी गुलाबांना अत्यंत पोषक आहे. शिवाय मेहनत नि योग्य खतपाणी - त्यामुळं इथं गुलाब फुलतात. ते आकारानं मोठे नि झुबक्या झुबक्यांनी. इतरही असंख्य फुलं उगवतात. त्यामुळं बाहेर फिरायला निघालं, की सगळीकडे फुलांची रंगीबेरंगी दुनिया दिसते. सगळीकडे अशी फुलंच

फुलं दिसत असली, तरी त्यासाठी खतांचा खर्च बराच असतो व माती खोदण्यापासून स्वतःच सारे कष्ट करावे लागतात. हे सारे कष्ट इंग्लिश माणूस घेतो.

डॅनिलाच्या बागा सजलेल्या होत्याच; पण कुंदाचं लॉन व स्वातीची मैत्रीण बीनाच्या घरचं पुढचं-मागचं आवारही गुलाब, ग्लॅडेला अशा फुलांनी बहरलेलं होतं. बाहेर फुलं मात्र खूप महाग असतात, तरीही ती विकत घेतली जातात. दुसऱ्यांच्या बागांतली फुलं तोडणं ही कल्पनाच इंग्लिश माणसाला भयंकर वाटते.

डॅनिलाला मी विचारलं,

'तुझ्या बागेतली फुलं कुणी चोरून नेत नाही का ?'

तेव्हा कमालीची आश्चर्यचकित होत ती म्हणाली,

'बाप, रे ! असं कशाला कोण करेल ?'

मी भारतातली पद्धत तिला सांगितली नाही; पण तिचं ते वाक्य ऐकताना आपल्याइथली तऱ्हा आठवली. त्यातून ती फुलं देवासाठी हवी असतील, तर ती तोडताना सारे स्वतःला 'हरिभक्तपरायण,' समजतात. पण हीही चोरीच आहे, हे त्यांच्या लक्षातच येत नाही. अगदी ऐंशी वर्षांचा पेन्शनरही स्वतःला 'माखनचोर' समजतो. तिथली लहान मुलं सुद्धा दुसऱ्याच्या बगीच्यातील वा सार्वजनिक बागेतील फुलं तोडणं हा सामाजिक गुन्हा समजतात. फूल हवं असेल, तर अठरा रुपयांना (६ सेंट) एक फूल, असंही विकत घेतात.

डॅनिलानं घराच्या मागील परसात बटाटे, बीन्स वगैरे भाज्या लावलेल्या होत्या. नंतर आम्ही डिनरसाठी खुर्च्यांवर बसलो व 'आम्ही शाकाहारी आहोत,' असं सांगितलं. तेव्हा तिला फार वाईट वाटलं. (खरं तर, आम्ही तसं पत्रातून कळवलं होतं.) तिनं आमच्यासाठी कोंबडी बनवली होती. म्हणजे नुसती उकडवली होती. इथं भाज्या बटाटे, बीन्स किंवा कोंबडी उकडवली, की पदार्थ तयार. त्यामुळं त्यांचा स्वयंपाक अर्ध्या तासात कुणालाही बनवता येतो. ड्रिंकही असतंच.

## मुलींचं स्वातंत्र्य

आमच्यासाठी ब्रेड, बटर, सफरचंद व संत्री ठेवलेली होती. इथल्या रिवाजाप्रमाणे टेबलावर डिशखाली टेबल-नॅपकिन्स होतेच. शिवाय पितळी रिंगमध्ये प्रत्येकासाठी प्रत्येकीसाठी एकेक सुंदर नॅपकिन होता. डॅनिलानं स्वतःच्या माहितीत एक मुलगा, एक मुलगी असं लिहिलं होतं. आता येतील, मग येतील, असं वाटत होतं; पण जेवतानाही ती दोघं नव्हती, तेव्हा मी तिला विचारलं,

'फ्रेडरिक व डायाना अजून आले नाहीत ?'

किंचित हसत ती म्हणाली,

'फ्रेडरिक वेगळी खोली घेऊन राहतो व डायाना युनायटेड स्टेट्स पाहायला गेलीय्.'

'कॉलेजच्या ट्रिपबरोबर का ?' मी विचारलं.

'नाही, बेट्टी नावाच्या तिच्या मैत्रिणीबरोबर.' डॅनिला अगदी सहजपणे सांगत होती.

'एकटीच ?' मी आश्चर्यानं विचारलं.

मला माझीच अठरा वर्षांची मुलगी आठवली.

मी स्वातीला पटकन म्हटलं,

'आपण आपल्या तन्वीला नम्रताबरोबर असं विदेशात फिरायला पाठवू ?'

त्या कल्पनेनं स्वातीही दचकली. माझं मराठीतलं वाक्य नि स्वातीचं दचकणं पाहून डॅनिला माझ्याकडे गोंधळून पाहत होती.

मराठीत बोललो, ही चूक लक्षात येऊन मी म्हटलं,

'सॉरी हं.'

नंतर मी तिला सांगितलं,

'आमच्या देशात तरुण मुलींना तिच्या मैत्रिणींबरोबर असं एकटंच पाठवायला आम्ही आया कधीच कबूल नसतो. नि तसं पाठवणं आम्हांला फार असुरक्षित वाटतं.'

मग मी काळजीच्या सुरात विचारलं,

'पण मग ती राहील कुठं ?'

'यूथ हॉस्टेलमध्ये.' डॅनिला शांतपणे म्हणाली नि मग तीच म्हणाली, 'यूथ हॉस्टेलमध्ये राहिलं नि देश पाहिले, तर तसं काही असुरक्षित नसतं, नि आमच्या इथं मुली आईची परवानगी वगैरे काही मागत नाहीत. समर-व्हेकेशनमध्ये त्या पैसे कमावतात नि मग दुसऱ्या व्हेकेशनमध्ये त्या, आम्ही असं-असं देशपर्यटनाला जाणार आहोत, असं नुसतं सांगतात.' असं म्हणत डॅनिलानं फ्रीजमधून द्राक्षांची टोपली काढून टेबलावर ठेवली.

'पण काही वेडंवाकडं घडलं, तर त्याचा दोष आईवडिलांवर येतो ना ?' मी अस्वस्थ होत म्हटलं.

'मग त्यांना तरुण नि ताज्या रक्ताच्या असं कशाला म्हणायचं ?' डॅनिला म्हणाली.

ताज्या रक्ताचे तरुण आमच्या इथं वासनाकांड घडवतात, हे मी तिला कसं सांगू ?

तिनं मला विचारलं,

'द्राक्षं आवडतात ना ?'

मी म्हटलं,

'खूप !'

'आत्ता तेवढी चांगली नसतात, कारण आत्ता सीझन नाही.'

'त्यामुळं ती महागही असतील.' मी म्हटलं.

मिनिट, दोन मिनिटं आम्ही द्राक्षं व सफरचंद खाण्यात दंग होतो.

डॅनिला एकदम अत्यंत शांत स्वरात म्हणाली,

'खरं सांगू, तुझ्याइतकी नाही, तरी आई ह्या नात्यानं थोडीशी मीही अस्वस्थ होते. पण शेवटी आपल्या हातांत काय आहे ? तुमचं तुमच्या मुली ऐकतात ?'

'कारण त्या आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र नसतात.' मी पटकन म्हणाले.

तेव्हा स्वाति म्हणाली.

'मी स्वतः आर्थिक दृष्ट्या स्वतंत्र आहे, तरीही मी कुठं एकटीच जाते ?'

'काय असेल, ते असो, पण भारतातील मुली एकट्या-दुकट्या जात नाहीत. नि

आम्हांलाही ते सुरक्षित वाटत नाही, हेही तितकंच खरं आहे.'

एकट्या-दुकट्या मुलींनी हिंडावं, अशी भारतात सुरक्षितता आहे का ? .. माझ्या मनात प्रश्न येत होता. पण अमेरिकेतही असुरक्षित असतं, असं ऐकलं होतं.....

## लंडनचा मॅप

रात्री डॅनिलानं आम्हांला लंडनचा नकाशा दिला व तो समजावूनही सांगितला. खरं तर, नकाशा पाहूनच, तो लगेच समजेल, इतका व्यवस्थित असतो. प्रथम प्रत्येक स्टेशनाला कोडवर्ड. दिलेला असतो व रेल्वेचा नकाशा उभ्या, आडव्या चौकटीवर काढलेला असतो. नकाशात A, B, C, D, E वगैरे अक्षरं आडवी असतील, तर उभ्या चौकटींना अनुक्रमे १, २, ३, ४, ५ असे ओळीनं आकडे किंवा a, b, c, d, e, f अशी दुसऱ्या लिपीतली अक्षरं दिलेली असतात. टॉवर हिलचा ५ हा कोडवर्ड आहे. म्हणजे ते स्टेशन आडव्या J चौकटीत व उभ्या ५ ह्या चौकटीत पाहायचं (इतर नकाशे पाहतो, त्याप्रमाणेच). हे टॉवर हिल स्टेशन हिरव्या लायनीवर असेल, तर ही हिरवी लाईन, 'डिस्ट्रिक्ट ट्यूबलाईनची आहे.' हेही खाली हिरवी ओळ व त्यापुढं डिस्ट्रिक्ट लाईन असं लिहून दाखवलेलं असतं. सर्व एअरपोर्टवर हे मॅप मिळतात, हे आम्हांला नंतर कळलं नि हीथ्रोवर आपण गोंधळून गेलो होतो, हे आठवून हसू आलं. 'वरातीमागनं घोडं, की मॅप ?' हा मॅप हाती आल्यावर आम्ही इंग्लंडमध्ये सराईतपणे हिंडत होतो. शिवाय प्रत्येक रेल्वेच्या डब्यात व स्टेशनवर हे नकाशे चितारलेले असतातच. ही स्टेशनं सुद्धा खूप जवळ-जवळ आहेत. २.६० पौंडांचं तिकीट काढलं, की सबंध दिवस कुठल्याही रेल्वे मार्गावरून दिवसभर कुठंही जाता येतं. त्यामुळं सारं लंडन आपापलं पाहणं अगदी सोपं आहे.

रात्री खूप उशिरा झोपलो.

## पहाटे दोनला स्वच्छ उजेड

सकाळी डोळ्यांवर उजेड आला, म्हणून जाग आली. सगळे डाराडूर झोपलेले होते. रिस्टवॉचमध्ये पाहिलं, तर फक्त दोन वाजलेले. 'घड्याळ बंद पडलं, वाटतं!' असं वाटून मोठ्या घड्याळात पाहिलं, तर दोनच वाजलेले. दोन वाजता हा इतका उजेड ! की सगळी घड्याळं बंद पडली आहेत ?

तासभर इकडून तिकडे करत परत झोपले.

डॅनिला सहा वाजता खाली उतरली, तेव्हा तिला विचारलं, तेव्हा ती हसली नि म्हणाली,

'तुला माहीत नाही ? लंडनमध्ये समरमध्ये दोन वाजताच उजाडतं.'

'बाप, रे ! म्हणजे उजाडतंही लवकर नि अंधार मात्र साडेदहा अकरानंतर होतो. कमालच आहे !'

'हो, पण हिवाळ्यात केव्हा केव्हा चार-सहा तासांचाच दिवस असतो.'

गंमतच आहे. मला पहाटे उठायची सवय आहे, असं विधान करायची सोयच नाही. झुंजूमुंजूची वेळ प्रत्येक ऋतुत वेगळी. तर तिन्हीसांजेला गाई घरी येतात, म्हणायची सोय नाही.

नंतर सात वाजता डॅनिलाबरोबर मी पेपर आणायला गेले, तर लगेच छत्री घ्यायला घरी यावं लागलं. त्यानंतर कधी टिपूसभर पाऊस पडला नाही. डॅनिलाबरोबर बाहेर पडल्यावर दरवेळी मी मध्येच थबकायची. गुलाबाचे घोसच्या घोस दिसायचे. एक तर गुलाबाचा वृक्षच दिसला नि सगळा वृक्ष गुलाबी रंगाच्या गुलाबांनी आच्छादलेला. सगळे रस्ते अत्यंत स्वच्छ. एक कागदाचा कपटा, की एक सिगारेटचं थोटूक कुठं नव्हतं. फूटपाथवर दर दोन मिनिटाला कचरापेटी ठेवलेली.

लंडनच्या घराघरांतून फुलांची आरास असतेच; पण चार रस्ते एकत्र मिळतात, तिथं फूटपाथच्या चारी कोपऱ्यांत डिझाईनमध्ये टवटवीत फुलं फुललेली होती. प्रत्येक बाग आपलं वैशिष्ट्य दाखवत होती. काही बागांतून राजस गुलाब, तर काही बागांतून ग्लॅडेला, तर काहींत विलायती फुलांची आरास केलेली. जणू काही सजलेल्या पुष्पवाटिकांना बक्षीस जाहीर केलं आहे, नि त्यासाठी निरनिराळ्या रंगांतली फुलांची रोपं लावलेली आहेत ! ह्या फुलांसाठी प्रत्येक माणूस मेहनत घेतोच; पण इथल्या निसर्गाचीही त्याला साथ आहे. सततच्या रिमझिमत्या पावसात फुलांना नैसर्गिक खतही सातत्यानं मिळत राहतं.

फुलांवर अपरंपार प्रेम करायला आम्ही कधी शिकणार !

## <u>मॅडम तुसा म्यूझिअम</u>

डॅनिलाच्या घरून आम्ही दुसऱ्या दिवशी सकाळी नऊ वाजताच लंडन शहर पाहायला निघालो. गोरापान व घाऱ्या डोळ्यांचा माणूस रस्ता झाडताना पाहणं जरा वेगळंच वाटलं. वेकर स्ट्रीट स्टेशनवरून मॅडम तुसाचा वॅक्स म्यूझियम पाहायला गेलो. प्रथम दोनच क्यू होते. मग भराभर मागची माणसं पुढं गेली नि चार क्यू झाले. मागची माणसं पुढं वा पुढची माणसं मागं होत होती. पण कुठंही भांडणं, तंटे नव्हते. उच्चभ्रू समाजाचं, क्यू मोडला, म्हणून नाक मुरडणं नव्हतं, की, 'क्यों, बे ! हम इधर क्या मख्खियाँ मारने आये हैं ?' म्हणत आवाजही चढत नव्हता. माणसं तक्रार म्हणून करणार नाहीत. सगळी मजेत गप्पा मारत उभी होती. कुणी जोड्या, मिठ्या मारण्यातही दंग होत्या. मिठ्या मारता मारता मित्रांशी गप्पाही चालू होत्या. प्रथम-प्रथम आपल्याला चांगलंच अवघडल्यासारखं होतं. पण मग लक्षात येतं, की दरक्षणीच हे पाहायचं आहे. क्यू भराभर सरकत होताच, पण वर वेगवेगळ्या पाट्या टांगलेल्या होत्या. त्यांमुळंही करमणूक होत होती. उदा., तुसामधील एक मेणाचा पुतळा बनवायला किती वेळ लागतो ? चार दिवस, आठ दिवस, एक महिना, सहा महिने, की एक वर्ष. थोडा क्यू पुढं गेला, की आपण पुढं जातो नि पाटीच्या मागे त्याचं उत्तर आपण वाचतो. मग नंतर दुसरी पाटी, म्यूझिअम किती साली सुरू झाला, त्याची चार उत्तरं नि त्याचं नेमकं उत्तर त्याच पाटीवर मागच्या बाजूला.

'महालक्ष्मीला नवरात्रात क्यू असतो. त्या वेळी अशा पाट्या असतील, तर ?' माझा स्वातीला प्रश्न.

'पाट्या रातोरात चोरीला जातील.' स्वातीनं तत्पर उत्तर दिलं.

ह्या पाट्या सरतात, तोवर आपण प्रवेशद्वाराशी येतो. तिकीट पाच पौंड-म्हणजे १५० रु. ह्या अशा प्रवेश-फीनं प्रथम हबकायला होतं; पण मग सवय होते. दाराशीच शिपाई उभा

असतो. प्रथम तो खराच वाटतो. मग तो मेणाचा आहे, हे लक्षात येतं. 'जिमी सॅव्हां ओबे' तर गप्पा मारायला बेंचवर बसले आहेत, असं वाटतं. तर जॉन मॅकॅन्टोच्या हातावरच्या टटतटलेल्या शिरा सुद्धा अगदी हुबेहूब दिसतात. लेनी हेनरी डोळा मारताहेत. सर मागरिट थॅचरचं अलगद स्मित हुबेहूब वाटतं. राजीव गांधी व इंदिरा गांधी यांचे पुतळे पाहिले. पुतळे पाहून ह्या दोन्ही व्यक्ती अगदी पेदरट असतील, असं वाटेल. तर महात्मा गांधी म्हणजे मद्रासी म्हातारा वाटतो. त्यांचं मनाचा वेध घेणारं लाघवी हास्य कुठंच दिसत नाही. गोर्बाचोव्ह मात्र अगदी हुबेहूब वाटतात. ब्रिटनमधले सारे प्रख्यात साहित्यिक इथं आहेत, तर राजकीय धुरंधर खरोखरीच आपल्याजवळ उभे आहेत, हे पाहताना फार गंमत वाटते. ब्रिटिश राजघराण्यातील पूर्वीची माणसं, आताची राणी एलिझाबेथ, प्रिन्स फिलिप, प्रिन्सेस मागरिट वगैरे दरबारी थाटमाट आहेच.

म्यूझिअमच्या तळघरामध्ये 'दि बॅटल ऑफ ट्रॅफलगार' प्रकाश व आवाजाच्या साहाय्यानं दाखवली आहे. 'दि चेंबर ऑफ हॉरर' मध्ये पण हा प्रकाशाचा खेळ आहेच. प्रथमच हिटलरचा पुतळा आहे. नंतर गिलोटिन, विद्युत् खुर्ची, विष घालणं, पोटात हवा भरणं, फाशी वगैरे जीव घेण्याच्या विविध तऱ्हा दाखवल्या आहेत, ते पाहताना अंगावर काटा येतो.

ह्याच इमारतीत म्यूझिअम-प्लॅनिटोरियम आहे. ह्या दोन्हींचं एकत्रित तिकीट कमी आहे. मात्र इथल्या प्लॅनिटोरियमपेक्षा वॉशिंग्टनचा प्लॅनिटोरियम जास्त छान आहे.

'रॉयल अलबर्ट हॉल' पाहण्यासाठी साऊथ केनिंग्टनला उतरलो. इथंच व्हिक्टोरिया अल्बर्ट म्यूझिअम, 'रॉयल अलबर्ट हॉल' व 'अलबर्ट मेमोरिअल' सारे जवळ-जवळ आहेत. 'अलबर्ट हॉल' पाहताना लता मंगेशकरची आठवण झाली. ह्या हॉलमध्ये तिनं गायलेली गाणी टेपवर ऐकली होती. ह्या हॉलमध्ये कुठंही बसलं, तरी गाणं छान ऐकू येतं. हा जगातला सर्वांत मोठा कॉन्सर्ट हॉल आहे. ह्याच्या घुमटाचा परीघ ७०० फूट असून ८००० लोक इथं बसून गाणं ऐकू शकतात. 'रॉयल अलबर्ट हॉल,' 'अलबर्ट मेमोरियल' व 'व्हिक्टोरिया अलबर्ट म्यूझिअम' अशी ही 'अल्बर्ट' ह्यांची स्मारकं आहेत. इथंच 'केनिंग्टन गार्डन' नावाचा मोठा बगीचा आहे.

संध्याकाळी साडेसात वाजता थकून भागून घरी आलो. लंडनमध्ये कधीही पाऊस पडतो, म्हणून छत्र्यांचं लोढणं हाती होतंच. आज डॅनिलाबरोबर पेपर आणायला भल्या सकाळी बाहेर पडलो, तर पाऊस पडत होता. नि नंतर पावसाचं टिपूस नाही. छत्र्यांचं लोढणं दोन दिवस उचललं नि मग म्हटलं, येऊ दे, किती पाऊस यायचा, तो.

डॅनिला डिनरसाठी आमची वाट पाहतच होती. आज तिनं आमच्यासाठी परसातले बटाटे व बीन्स उकडले होते. त्यांची नैसर्गिक चव खूपच छान होती. ब्रेड-बटरबरोबर भरपूरसं दूधही होतं. पण वेळोवेळी 'उदर भरण नोहे जाणिजे यज्ञकर्म' हे मनात येतंच. इथली सफरचंदं मात्र अत्यंत रसाळ असतात.

## मनातल्या दऱ्या

रात्री गप्पा मारता मारता डॅनिलाविषयीही माहिती मिळाली. ती अनुवादाचं काम घरबसल्या करत होती. नि तरी तिला महिना दोन ते तीन हजार पौंड सहज मिळत होते. एवढं मोठं घर

होतंच, शिवाय गाडीही. पण स्वयंपाकाबाबत ती थोडी आळशीच वाटली. अर्थात सर्व युरोपभरच स्वयंपाकात फारसं कुणी अडकलेलं नव्हतंच. मग तिनं एकदम विचारलं,

'ब्रिटिश लोकांनी इंडियावर राज्य केलं, तेव्हा ब्रिटिशांचा तुम्हांला राग येतो का ?'

प्रश्न ऐकून मीच आश्चर्यचकित झाले. मग स्वातीनं विचारलं,

'म्हणजे नेमकं तुला काय म्हणायचंय् ?'

'ब्रिटिश लोकांनी तुमच्यावर राज्य केलं. कदाचित अत्याचारही असतील. म्हणून मी विचारलं.'

'पण त्याअगोदर मुस्लिम लोकांनी त्याहून अधिक अत्याचार केले होते.' मी पटकन् म्हणाले.

'शिवाय ब्रिटिश लोकांनी एक देश, एक राष्ट्र, स्त्री-स्वातंत्र्य वगैरे काही चांगल्या कल्पनाही दिल्या.' स्वाति म्हणाली.

ते ऐकून डॅनिला खूश झाली.

मी तेवढ्यात म्हटलं,

'आता ब्रिटिश गेले नि ते पारतंत्र्य संपलं. पण हिंदू व मुस्लिम भांडणं अजून चालूच आहेत.'

'ती का व्हावी ?' हे विचारताना डॅनिलाच्या चेहऱ्यावर भलंमोठं आश्चर्य होतं. अगदी विस्फारलेल्या डोळ्यांसहित.

'नेत्यांमुळं. नेते मतांसाठी कुणाची तरी बाजू घेतात. नि भांडणं लावून देतात. अमेरिकेत; भारतीय, पाकिस्तानी, जर्मन, फ्रेंच, स्पॅनिश वगैरे वेगळे सवतेसुभे नाहीत. सारे अमेरिकन्स आहेत. तसं आमच्या इथं नाही. शिवाय कायदे सुद्धा मुसलमानांचे वेगळे आहेत.' मी म्हणाले.

'ब्रिटनमध्ये सुद्धा वेगळ्या कायद्यांची मागणी मुस्लिम करत आहेत; पण ते तसं चालणार नाही.' डॅनिला म्हणाली.

'पण हा वेगळ्या कायद्याचा पायंडा इंग्रजांनीच आमच्या इथं घालून दिला आहे.' मी तिला डिवचलं.

'आत्ताच तू म्हणालीस, की तुमच्या इथं पूर्वी, एक राष्ट्र असं नव्हतंच. मग त्या वेळी सगळ्यांचा एक कायदा कसा असेल ? नि तुमच्या इथल्या धार्मिक गोष्टींबाबत ढवळाढवळ करण्याचं ब्रिटिशांना कारणच काय ? स्वातंत्र्य मिळाल्यावर तुम्ही त्याचा विचार का केला नाही?'

तिचा प्रश्न बिनतोड होता. मी नुकतीच उशीशी चाळवाचाळव करत होते. स्वाति तर अगदी झोपेला आली होती. मी पटकन हसून म्हटलं,

'तुझ्या माझ्या मैत्रीत हे राजकीय प्रश्न कशासाठी ? आपलं 'सर्व्हास' हे एक कुटुंब आहे, हे महत्त्वाचं.'

ती एकदम मोकळं हसत आपलेपणानं म्हणाली,

'किती बरं वाटतंय् ! पण तुमच्या मनांत, आमच्याविषयी राग आहे का, हे मी चाचपून पाहिलं.'

'तसा राग आमच्या मनांत नाही, म्हणून तर मी विश्वासानं तुझ्या घरी आले.'

'तुझं पत्र आलं, तेव्हाच मला, मधल्या दऱ्या नाहीशा होताहेत, असं वाटून आनंद झाला.'

'मग एक सांगू, आम्हां भारतीयांच्या मनांत ब्रिटिशांविषयी कसलाही राग नाही. शिवाय

तुमचं भारतीयांना कमी लेखणंही आता कमी झालं आहे का ?' स्वातीनं पटकन विचारलं.

'हो ! कारण तुम्ही आमच्याच देशात येऊन तुमचं कर्तृत्व दाखवून दिलं आहे. काही भारतीय तर चांगलेच सधन आहेत.' असं सांगत डॅनिलानं स्पष्ट कबुली दिली.

मला भारताचा अभिमान वाटला; पण त्याचं सारं श्रेय गुजराती, पंजाबी, नाही तर दाक्षिणात्यांना जातं, ह्याचं भानही मला होतं. हिंदुजा, विजय मल्ल्या हे रथी-महारथी तिथं आहेत, ज्यांनी भारताची शान उंचावली आहे. शेवटी लोकांनी मान द्यायला स्वत:चं कर्तृत्व सिद्ध करावं लागतं, हेच खरं.

मग आम्हां सर्वांनाच झोप अनावर झाली होती.

## लंडनमधील सुबक फर्निचर

सकाळी निघता निघता डॅनिलाच्या फ्लॉवरपॉटमध्ये फुलं दिसली. ही तरी नक्की कागदी, असं वाटून हात लावला, तर ती चक्क खरी होती. आपल्या भारतीय डोळ्यांना त्या ताठ पाकळ्या खोट्याच वाटतात. मात्र इथल्या फुलांना आपल्या इथल्यासारखा सुगंध नाही. कुंदाकडची फुलं पण अशीच होती. त्या वेळी मी कुंदाला म्हटलं,

'इथल्या फुलांना भारताप्रमाणे सुगंध नसतो, नाही ?'

तेव्हा ती चटकन म्हणाली,

'आपल्या इथल्या अन्नाला सुद्धा नाही का किती चटकन वास येतो ?'

मी पटकन म्हटलं,

'पण अन्नाला वास यायच्या आधी आपण ते संपवू शकतो; पण फुलाला सुगंध आणू शकत नाही.'

असं जरी बोलले, तरी अन्न टिकवताना होणारी तिरपीट आठवल्याशिवाय कशी राहील ?

इथले गालिचे, विविध रंगांची टवटवीत फुलं ह्यांमुळं इथली घरंही टवटवीत वाटतात. शिवाय इथलं फर्निचरही सुख देणारं आहे. आपल्या इथं पावसाळ्यात ड्रॉवर्स न उघडणं; लाकडी ढकल-दरवाजे सरकायला नाखूश होणं वा दरवाज्यानं इथली बिजागिरीबरोबर घटस्फोट घेणं हे नेहमीचंच. ह्या तीनही गोष्टी इथं न घडलेल्या पाहून आश्चर्य वाटलं. डॅनिलाच्या स्वयंपाकघरातील ड्रॉवर्समधून चमचे, वाट्या, भांडी बाहेर काढताना मला मजा वाटत होती. ड्रॉवर सहज उघडत होता नि नुसतं बोटांनी ढकललं, की बंद होत होता.

'हे फर्निचर कधी बनवलं ?' मी विचारलं.

'पाच-सात वर्षं होऊन गेली.'

'बाप, रे !'

'का, ग ? काय झालं ?' आश्चर्यचकित होत डॅनिला विचारत होती.

तेव्हा मी डॅनिलाला आपल्या इथल्या फर्निचरची भुताटकी सांगितली.

'एक पाऊस पडून गेला, की आमच्या टेबलांच्या, ड्रॉवरचं व टेबलाचं नातं इतकं पक्कं होतं, की ड्रॉवरला बाहेर काढायला सर्व शक्ती खर्च करावी लागते.'

'हा हवेचा गुण, की फर्निचरचा ?' डॅनिलानं विचारलं.

होतंच, शिवाय गाडीही. पण स्वयंपाकाबाबत ती थोडी आळशीच वाटली. अर्थात सर्व युरोपभरच स्वयंपाकात फारसं कुणी अडकलेलं नव्हतंच. मग तिनं एकदम विचारलं,

'ब्रिटिश लोकांनी इंडियावर राज्य केलं, तेव्हा ब्रिटिशांचा तुम्हांला राग येतो का ?'

प्रश्न ऐकून मीच आश्चर्यचकित झाले. मग स्वातीनं विचारलं,

'म्हणजे नेमकं तुला काय म्हणायचंय् ?'

'ब्रिटिश लोकांनी तुमच्यावर राज्य केलं. कदाचित अत्याचारही असतील. म्हणून मी विचारलं.'

'पण त्याअगोदर मुस्लिम लोकांनी त्याहून अधिक अत्याचार केले होते.' मी पटकन् म्हणाले.

'शिवाय ब्रिटिश लोकांनी एक देश, एक राष्ट्र, स्त्री-स्वातंत्र्य वगैरे काही चांगल्या कल्पनाही दिल्या.' स्वाति म्हणाली.

ते ऐकून डॅनिला खूश झाली.

मी तेवढ्यात म्हटलं,

'आता ब्रिटिश गेले नि ते पारतंत्र्य संपलं. पण हिंदू व मुस्लिम भांडणं अजून चालूच आहेत.'

'ती का व्हावी ?' हे विचारताना डॅनिलाच्या चेहऱ्यावर भलंमोठं आश्चर्य होतं. अगदी विस्फारलेल्या डोळ्यांसहित.

'नेत्यांमुळं. नेते मतांसाठी कुणाची तरी बाजू घेतात. नि भांडणं लावून देतात. अमेरिकेत; भारतीय, पाकिस्तानी, जर्मन, फ्रेंच, स्पॅनिश वगैरे वेगळे सवतेसुभे नाहीत. सारे अमेरिकन्स आहेत. तसं आमच्या इथं नाही. शिवाय कायदे सुद्धा मुसलमांनाचे वेगळे आहेत.' मी म्हणाले.

'ब्रिटनमध्ये सुद्धा वेगळ्या कायद्यांची मागणी मुस्लिम करत आहेत; पण ते तसं चालणार नाही.' डॅनिला म्हणाली.

'पण हा वेगळ्या कायद्याचा पायंडा इंग्रजांनीच आमच्या इथं घालून दिला आहे.' मी तिला डिवचलं.

'आत्ताच तू म्हणालीस, की तुमच्या इथं पूर्वी, एक राष्ट्र असं नव्हतंच. मग त्या वेळी सगळ्यांचा एक कायदा कसा असेल ? नि तुमच्या इथल्या धार्मिक गोष्टींबाबत ढवळाढवळ करण्याचं ब्रिटिशांना कारणच काय ? स्वातंत्र्य मिळाल्यावर तुम्ही त्याचा विचार का केला नाही?'

तिचा प्रश्न बिनतोड होता. मी नुकतीच उशीशी चाळवाचाळव करत होते. स्वाति तर अगदी झोपेला आली होती. मी पटकन हसून म्हटलं,

'तुझ्या माझ्या मैत्रीत हे राजकीय प्रश्न कशासाठी ? आपलं 'सर्व्हास' हे एक कुटुंब आहे, हे महत्त्वाचं.'

ती एकदम मोकळं हसत आपलेपणानं म्हणाली,

'किती बरं वाटतंय् ! पण तुमच्या मनांत, आमच्याविषयी राग आहे का, हे मी चाचपून पाहिलं.'

'तसा राग आमच्या मनांत नाही, म्हणून तर मी विश्वासानं तुझ्या घरी आले.'

'तुझं पत्र आलं, तेव्हाच मला, मधल्या दऱ्या नाहीशा होताहेत, असं वाटून आनंद झाला.'

'मग एक सांगू, आम्हां भारतीयांच्या मनांत ब्रिटिशांविषयी कसलाही राग नाही. शिवाय

तुमचं भारतीयांना कमी लेखणंही आता कमी झालं आहे का ?' स्वातीनं पटकन विचारलं.

'हो ! कारण तुम्ही आमच्याच देशात येऊन तुमचं कर्तृत्व दाखवून दिलं आहे. काही भारतीय तर चांगलेच सधन आहेत.' असं सांगत डॅनिलानं स्पष्ट कबुली दिली.

मला भारताचा अभिमान वाटला; पण त्याचं सारं श्रेय गुजराती, पंजाबी, नाही तर दाक्षिणात्यांना जातं, ह्याचं भानही मला होतं. हिंदुजा, विजय मल्ल्या हे रथी-महारथी तिथं आहेत, ज्यांनी भारताची शान उंचावली आहे. शेवटी लोकांनी मान द्यायला स्वत:चं कर्तृत्व सिद्ध करावं लागतं, हेच खरं.

मग आम्हां सर्वांनाच झोप अनावर झाली होती.

## लंडनमधील सुबक फर्निचर

सकाळी निघता निघता डॅनिलाच्या फ्लॉवरपॉटमध्ये फुलं दिसली. ही तरी नक्की कागदी, असं वाटून हात लावला, तर ती चक्क खरी होती. आपल्या भारतीय डोळ्यांना त्या ताठ पाकळ्या खोट्याच वाटतात. मात्र इथल्या फुलांना आपल्या इथल्यासारखा सुगंध नाही. कुंदाकडची फुलं पण अशीच होती. त्या वेळी मी कुंदाला म्हटलं,

'इथल्या फुलांना भारताप्रमाणे सुगंध नसतो, नाही ?'

तेव्हा ती चटकन म्हणाली,

'आपल्या इथल्या अन्नाला सुद्धा नाही का किती चटकन वास येतो ?'

मी पटकन म्हटलं,

'पण अन्नाला वास यायच्या आधी आपण ते संपवू शकतो; पण फुलाला सुगंध आणू शकत नाही.'

असं जरी बोलले, तरी अन्न टिकवताना होणारी तिरपीट आठवल्याशिवाय कशी राहील ?

इथले गालिचे, विविध रंगांची टवटवीत फुलं ह्यांमुळं इथली घरंही टवटवीत वाटतात. शिवाय इथलं फर्निचरही सुख देणारं आहे. आपल्या इथं पावसाळ्यात ड्रॉवर्स न उघडणं; लाकडी ढकल-दरवाजे सरकायला नाखूश होणं वा दरवाज्यानं इथली बिजागिरीबरोबर घटस्फोट घेणं हे नेहमीचंच. ह्या तीनही गोष्टी इथं न घडलेल्या पाहून आश्चर्य वाटलं. डॅनिलाच्या स्वयंपाकघरातील ड्रॉवर्समधून चमचे, वाट्या, भांडी बाहेर काढताना मला मजा वाटत होती. ड्रॉवर सहज उघडत होता नि नुसतं बोटांनी ढकललं, की बंद होत होता.

'हे फर्निचर कधी बनवलं ?' मी विचारलं.

'पाच-सात वर्षं होऊन गेली.'

'बाप, रे !'

'का, ग ? काय झालं ?' आश्चर्यचकित होत डॅनिला विचारत होती.

तेव्हा मी डॅनिलाला आपल्या इथल्या फर्निचरची भुताटकी सांगितली.

'एक पाऊस पडून गेला, की आमच्या टेबलांच्या, ड्रॉवरचं व टेबलाचं नातं इतकं पक्कं होतं, की ड्रॉवरला बाहेर काढायला सर्व शक्ती खर्च करावी लागते.'

'हा हवेचा गुण, की फर्निचरचा ?' डॅनिलानं विचारलं.

तेव्हा मी म्हणाले,

'हा टेबल आणि ड्रॉवरच्या घट्ट नात्याचा गुण आहे.'

त्यावर आम्ही सारेच हसलो.

## चेंजिंग ऑफ द गार्डस्

सकाळी टबमध्ये अंघोळ वगैरे आटपून धावत-पळत व्हिक्टोरिया स्टेशन गाठलं. तेथून धावत-पळतच बकिंगहॅम पॅलेस गाठला. काल दुपारी बकिंगहॅम पॅलेसशी आलो, तर दोन गार्ड्स एकेकटेच लेफ्टराईट करीत होते. दहा-पंधरा पावलं चालत जाऊन 'अबाऊट टर्न' करीत होते.

'ही काय भंपकगिरी आहे?' मी म्हणालो.

'त्यांचे स्क्रू ढिले झाले आहेत.' स्वाति म्हणाली.

'चेंजिंग ऑफ दी गार्ड्स' पाहायला युरोपियन लोकांची ही ऽऽ झुम्मड जमली होती. उंचच उंच बायका उभ्या होत्या.

आम्ही दोघी अगदीच टिंगू. फक्त बायकांच्या पाठी दिसत होत्या.

पण एका युरोपियन बाईनं आम्हांला तिच्या पुढं उभं राहायला दिलं. तिच्या मागच्या कुणी तक्रार केली नाही. अशा उदार वृत्तीच्या बायका भारतात भेटल्या नाहीत. नि भारतातले पुरुष! बायकांना चिमटे काढण्यासाठी गर्दीत येतात. कारण भारत देश गरीब आहे !

लाल ड्रेस, पिसांची काळी उभट टोपी नि काळी पँट अशा ड्रेसमध्ये; पन्नास एक गार्ड पॅलेसमध्ये उभे होते. पंचवीस रात्रपाळीचे ह्या बाजूला, तर पंचवीस दिवसपाळीचे त्या बाजूला. बँडच्या तालावर रात्रपाळीचे दोन गार्ड्स ह्या बाजूला येतात व दिवसपाळीचे दोन पाळीचे गार्ड्स त्या बाजूला जातात. म्हणजे थोडक्यात गार्डांच्या पाळ्या बदलतात. तेही तालासुरात. कारण ते राजेशाही गार्ड्स आहेत. वास्तविक ह्यात खास असं काहीही नव्हतं. आपल्या इथली सैनिकी कवायत किती तरी छान असते. पण राजघराण्यातला सोहळा म्हणून त्याचा गाजावाजा. खरं तर, हा सोहळा फुकटात असल्यानं आपल्या इथल्या प्रवासी कंपन्या त्याची जाहिरात जास्त करतात. नंतर घरी रवाना होतात. घोडदळ, पायदळ अशा थाटात हे गार्ड्स जेम्सपार्कवरून पुढं जातात.

राजघराण्यातल्या गोष्टींना अवास्तव महत्त्व देणं ही लंडनमधली पद्धतच आहे. राजपुत्र चार्ल्स व राजकुमारी डायाना हिच्या लग्नासंबंधांतील चर्चा सुद्धा वर्षभर चालू होती. नि आपण त्यांचे जन्मजात मांडलीक. मग आपण त्यांच्या प्रत्येक गोष्टीचं कौतुक करायला हवंच.

लंडनमधील जेवणही असंच असतं. नेहमीचं. जेवण अगदी बेताच्या चवीचं असतं. पण काटे-चमचे ह्यांची विविधता व प्लेट ठेवायला नॅपकिन्स हवेच. आपण बायका बावळटच ! चटण्या, कोशिंबिरी करत बसण्यापेक्षा हे किती सोपं असतं !

## ग्रीन पार्क

बकिंगहॅम पॅलेसजवळच 'ग्रीन पार्क' हा लांबवर पसरलेला बगीचा आहे. किती तरी लांबवर

हिरवळ पसरलेली आहे. बाजूला उंच डेरेदार वृक्ष आहेत. किती तरी लोकं बसलेली असतात. कुणी व्यायाम पण करीत असतात. लांबवर पसरलेले हे पार्क्स म्हणजे लंडनचं भूषण आहे. नंतर ह्याच्या शेजारीच असलेल्या जेम्स पार्कवरून जात होतो. हा पार्क तेवढा विस्तीर्ण नाही. पण जेम्स पार्क फुलांनी गच्च झाला होता. तो पाहत पुढं आलो, तर जेम्स स्टेशन लागलं. तिथून गाडीनं वेस्ट मिनिस्टर ॲबेला जावं, असा विचार होता; पण मग वेस्ट मिनिस्टर ॲबे अगदी जवळच आहे, असं कळलं. हा सारा परिसर अतिशय सुंदर आहे. चालत चालतच पाहावा, असा सुंदर आहे. वेस्ट मिनिस्टर ॲबेला जायच्या वाटेवरूनच पुढं पार्लमेंट हाऊस लागतं. तिथं एक लांबच लांब रांग होती. ती पार्लमेंट पाहण्यासाठी उभी आहे, असं कळलं. मग आम्ही पण तिथं उभ्या राहिलो. दुसऱ्या बाजूनं एक लहान रांग उभी होती. टूरिस्ट बसमधून ती लोकं उतरली होती. ती वशिल्याच्या माणसांची रांग आहे, असं आम्हांला वाटलं. आमचा नंबर यायला वेळ लागेल, तोपर्यंत आलटून पालटून वेस्ट मिनिस्टर ॲबे पाहून यायचं, असं आम्ही ठरवलं.

## वेस्ट मिनिस्टर ॲबे

वेस्ट मिनिस्टर ॲबे ही वास्तू देखणी आहे. १०५० साली तिथल्या चर्चची स्थापना झाली. इंग्लंडच्या राजांचा व राण्यांचा राज्याभिषेक ह्या 'वेस्ट मिनिस्टर ॲबेत' होतो. एका ओक लाकडाच्या खुर्चीवर हा राज्याभिषेक होतो. ह्याच वेस्ट मिनिस्टर ॲबेमध्ये राजांचं व राण्यांचं दफनही होतं. त्याशिवाय ग्लॅडस्टोन, रॉबर्ट पील ह्या राजकीय पुढाऱ्यांचं, तसंच न्यूटन, डार्विन ह्या शास्त्रज्ञांचं दफनही इथंच झालं आहे.

महात्मा गांधीजींच्या समाधीशेजारी कुणा शास्त्रज्ञाची समाधी आपल्या इथं होऊ शकेल?

तिसऱ्या हेन्रीनं बरेचसे चॅपेल बांधले आहेत. त्यांतलं 'एडवर्ड द कन्फेसर'चं चॅपेल हे 'वेस्ट मिनिस्टर ॲबे' म्हणून ओळखलं जातं. ह्या चॅपेलमधलं सातव्या हेन्रीचं चॅपेल सर्वोत्कृष्ट आहे. टयूडर आर्किटेक्चरचा हा सर्वोत्कृष्ट नमुना आहे.

## पार्लमेंट–चर्चिल बिनचिरुटाचा

वेस्ट मिनिस्टर ॲबे पाहून होतो, तोच आमचा नंबर आला. समजलं, की ती दुसरी रांग 'हाऊस ऑफ लॉर्डस्' साठी आहे. आमची रांग 'हाऊस ऑफ कॉमन्स'साठी होती. अर्थात आमची काही चूक नव्हती. भारतातील लोकांना जळी स्थळी वशिलाच दिसणार !

वेटिंगरूममध्ये १५३७ ते १८३४ पर्यंत ब्रिटिश सत्ता जिथं होती, तिथले फोटो आहेत. आपल्या गुलामीची निशाणी.

लोकसभागृहात-हाऊस ऑफ कॉमन्समध्ये जाताना चर्चिलचा उभा राहिलेला पुतळा आहे. त्याच्या तोंडात चिरूट नाही. कुणी गंभीर चेहऱ्यानं सांगत होतं. 'लोकसभागृहात चिरुटाला बंदी आहे.' मला हसूच आलं. आपल्या इथं, थंड हवेच्या ठिकाणी गांधीजींच्या पुतळ्याला धोतर नेसवायचं, शर्ट घालायचा आणि म्हणायचं, कारण इथं थंडी आहे.

इथल्या सभागृहापेक्षा दिल्लीचं सभागृह बरंच मोठं आहे. पण लंडनचं सभागृह आम जनतेला खुलं असतं. (आपल्या इथं सभागृहात बसलेली, विशेष शहाणपण नसलेली काही आम जनता

असते, ते वेगळं.)

आम्ही गेलो, त्या दिवशी स्त्रियांचं शिक्षण व 'ब्रिटिश एअरवेज् सर्व्हिस' ह्यांवर प्रश्नोत्तरं झाली. प्रथम छापील स्वरूपात प्रश्न सगळ्यांच्या हाती येतात. दिल्लीच्या सभागृहात अशी पद्धत नाही.

'पार्लमेंट' आणि बकिंगहॅम पॅलेसमध्ये एक फरक प्रकर्षानं जाणवला. पार्लमेंटमध्ये कुणालाही जाऊ देतात; पण 'बकिंगहॅम पॅलेस'मध्ये मात्र गार्डांचा कडेकोट बंदोबस्त असतो. सुरक्षिततेची जरुरी पंतप्रधानांना, की राजाला ?

लंडनमध्ये कुणीही माणूस पंतप्रधान वा मंत्र्याला भेटू शकतो. पण बकिंगहॅम पॅलेसच्या गेटच्या आत सामान्य मनुष्य जाऊ शकत नाही. पार्लमेंट हाऊसच्या छोट्या गल्लीत दहा डाऊनिंग स्ट्रीटमध्ये पंतप्रधान साधेपणानं राहतात. कामाच्या वेळीच फक्त सरकारी गाडी वापरली जाते व सुरक्षा-व्यवस्थेसाठी मोठा लवाजमा नाही. (हे काही तरीच ! आमच्या इथं ही सारी चैन मिळावी, म्हणून पंतप्रधान व्हायची खटपट होते. भरपूर चैन करून, गांधीजींच्या साधेपणावर व्याख्यान द्यावं, ही होशियारी इंग्लिश लोकांना कळत नाही.)

पार्लमेंट हाऊसला लागूनच वेस्ट मिनिस्टर पॅलेस ह्या ३२०० फूट उंच टॉवरवर 'बिग बेन' हे घड्याळ आहे. 'बेंजामिन हॉल' ह्यांच्या नावावरून ह्या घड्याळाचं हे नाव पडलं.

## आमची भंबेरी उडाली

सकाळी मधू अभ्यंकरांना पावणे सहापर्यंत सेंट पॉल चर्चपाशी येतो, असं सांगितलं होतं. आम्ही दहा मिनिटं अगोदर सेंट पॉल स्टेशनशी पोचलो. मधू अभ्यंकर आमची वाट पाहत होतेच. दोघांनीही एकमेकांना पाहिलं नव्हतं. तरी कोकणस्थ ब्राह्मणी चेहरा चटकन लक्षात आलाच. खूप वर्षांची ओळख असल्यासारखे आम्ही एकमेकांना भेटलो. 'सत्यकथे'पासून अनेक लेखक-मित्रांची उजळणी झाली. 'माहेर' मधली माझी दिवाळी अंकातली कथा त्यांच्या लक्षात होती. तर 'जागतिक मराठी परिषदे'मुळं मधू अभ्यंकर हे नाव लक्षात होतं. जवळ असलेला सेंट पॉल चर्च त्यांनी दाखवला. तो स्टेशनच्या अगदी जवळ आहे. साधारणत: चर्च भव्य, उंच नि देखणे असतातच; पण 'सेंट पॉल चर्च' भलताच भव्य होता. ख्रिस्तोफर रीन आर्किटेक्टच्या देखरेखीखाली १७१० साली हा बांधला गेला. ३६५ फूट उंच, ५१५ फूट लांब नि १२५ फूट रुंद अशी ही प्रचंड वास्तू आहे.

'इथंच राजपुत्र चार्ल्स व डायानाचा लग्नसोहळा पार पडला.' मधू अभ्यंकर म्हणाले.

तेव्हा परत एकदा कौतुकभरल्या नजरेनं तो चर्च पाहिला.

मधू अभ्यंकरांनी तिथल्याच एका कॅफेमध्ये भरपूर खायला-प्यायला मागवलं. दोन दिवस उकडलेलं खाल्लेलं होतं. समोरचं अन्न हवं वाटत होतं. पण आज रात्री बीनाकडे जेवायला जायचं असल्यानं काही गोष्टी आम्ही वगळल्या. त्या वेळी पोटॅटो चिप्स आवडीनं खाल्ल्या, पण नंतर युरोपभर पोटॅटो चिप्सच खात होतो. मधू अभ्यंकरांना, आम्हांला सातपर्यंत रेनर्सलेनला पोचायचंय्, हे सांगितलं. तेव्हा ते म्हणाले,

'तुम्हांला बारबिकल व्हिलेज दाखवणार होतो. आता कसं जायचं, ते नुसतं दाखवतो.'

त्यांच्याबरोबर थोडं चालून गेल्यावर बारबिकल व्हिलेजला कसं जायचं, ते त्यांनी सांगितलं. 'बारबिकल व्हिलेज' ऊर्फ 'लंडन टाऊन' हे सर्वसुखसोयींनी समृद्ध असं लहानसं खेडं, लंडनच्या भरवस्तीत मुद्दाम निर्माण केलं आहे. ब्रिटिश लोकांच्या कल्पक डोक्यातून ह्या गावाची निर्मिती झाली आहे. उद्या ते पाहायचं, असं ठरवून आम्ही तातडीनं 'सेंट पॉल' स्टेशनपाशी आलो, पण स्टेशनमध्ये कुणी तरी बॉम्ब ठेवला आहे, अशी शंका आल्यानं स्टेशन बंद होतं. बॉंब ठेवला आहे, अशी शंका वाटून स्टेशन बंद ठेवण्याचे प्रकार लंडनमध्ये वारंवारच घडतात. पण अवघ्या अर्ध्या तासात एकदम स्टेशन बंद झालं, ह्याचं आश्चर्य वाटलं. सेंट पॉल स्टेशन बंद होतं, म्हणून मधू अभ्यंकरांनी आम्हांला दुसऱ्या स्टेशनवर सोडलं. इथं गाडी दोनदा बदलावी लागणार असल्यानं आपण घरी वेळेवर पोचणं कठीणच, असं वाटत होतं. धावत-पळत घरी जाऊनही चांगले साडेसात झाले होते नि डॅनिला निघून गेली होती. डॅनिला चांगली बारा-साडेबारापर्यंत बाहेरच राहणार होती. मनावर चरकन् भीतीचा ओरखडा उमटला. रात्रीची वेळ नि उशिरा येण्याचा गाढवपणा केलेला ! सामान घेऊन सरळ बीनाकडे गेलो असतो; पण ते आता शक्य नव्हतं. आमच्या दोघींचे चेहरे केविलवाणे झालेले. बीनाचा फोन शोधत होतो. आठवणीनं जवळ ठेवला होता, पण तो सापडेना. तो हरवला, की काय ?.... की तो डॅनिलाच्या घरीच राहिला ? तेवढ्या क्षणांत मनाला भीतीनं घेरलं. तेवढ्यात बीनाचा फोन मिळाला. नि मनातं कोजागिरीचं चांदणं पसरलं. डॅनिलाच्या घरापासून चार पावलं चालल्यावरच फोन बूथ होता. मी तिथं फोन करायला गेले. पण अरे, देवा ! तो फोन बूथ कार्डाचा होता. लंडनमध्ये दोन प्रकारचे बूथ असतात. एक म्हणजे, आपल्या इथल्यासारखा नाणी टाकून फोन होतो. मात्र इथल्या फोनमध्ये जास्त नाणी टाकली, तरी उरलेली नाणी परत येतात व दुसरा फोन म्हणजे पाच पौंड की असेच काही पौंड देऊन कार्ड मिळतं. ते फोनच्या फटीत टाकलं असता फोन होतो. नाणी टाकून होणाऱ्या फोनमध्ये केव्हा केव्हा तो बिघडला असल्यास उरलेली नाणी परत येत नाहीत. पण कार्डाच्या बाबतीत असं होत नाही. म्हणून मधू अभ्यंकरांनी कार्ड घ्यायला सुचवलं होतं. पण आम्ही काही कार्ड घेतलं नव्हतं. त्यामुळं आता रेनर्सलेन स्टेशनवर जाऊन फोन करून येते, असं मी स्वातीला सांगण्यासाठी परत येत होते. तो 'ए स्वाति' अशी हाक ऐकू आली. समोर पाहते, तो गाडीत बीनाच होती. 'मला हे दत्तगुरू दिसले' सारखी बीना भेटली होती.

त्याचं असं झालं, की आदल्या दिवशी आम्ही बीनाला फोन केला होता व उद्या रात्री तुझ्याकडे राहायला येऊ. मात्र निघताना डॅनिलाकडून फोन करू', असं सांगितलं होतं. 'संध्याकाळीच येत असाल; तर या' असं सांगायला बीनानं डॅनिलाकडे सहा वाजता फोन केला होता. त्या वेळी डॅनिला बीनाला फोनवर म्हणाली,

'मी पण काळजीतच आहे. आता सहा वाजताच माझं बाहेर जायचं ठरलं आहे. मी आता बाहेर जाईन, ती रात्री परत येईनच, असं नाही. ह्या अजून कशा आल्या नाहीत ? मला तर पोलिसांत कळवावंसं वाटतंय्.'

हे डॅनिलाचे शब्द ऐकून बीना काळजीत पडली. आम्ही दोघीच बाहेर रात्रीचं बाहेर कशा राहणार ? सातला तिनं नवऱ्याला सांगितलं,

'आपण त्यांच्या होस्टच्या घरासमोर जाऊ नि त्यांची वाट पाहू.'

लंडनमध्ये उन्हाळ्यात अगदी रात्री दहा साडेदहापर्यंत सूर्यप्रकाश असतो, तरी सात साडेसातनंतर रस्त्यावर रहदारी तुरळक होते व दारू पिणं वगैरे रात्रीचे उद्योग करणाऱ्यांची रस्त्यावर रहदारी सुरू होते. त्यामुळं आम्ही दोघी घाबरलो होतो नि बीना पण काळजीत पडली होती. आम्हांला तिनं असं संभाळून घेतलं होतं. बीना होती, म्हणून निभावून गेलं, बाकी ठिकाणी हे असं चालायचं नाही. आम्ही आम्हांला बजावलं.

## लंडनमध्ये भारतीय पदार्थ

दोन दिवसांतच पाव नि घरचा लाडू चिवडा खाऊन कंटाळलो होतो. बीनानं आमटी-भात घातला असता, तरी मजा वाटली असती. पानावर बसलो, तो पुऱ्या, भाजी, बासमती भात वगैरे पदार्थ येता येता श्रीखंडही होतं. लहान मूल, आवडते पदार्थ समोर आले, की जसं आतून आतून हसत राहतं, तसं आम्हांला खुदू खुदू हसू येत होतं. बीनाचा फोन सापडला नाही, तर रात्री अपरात्री रस्त्यावर राहावं लागणार, म्हणून तासापूर्वी आमच्या काळजाचा ठोका चुकला होता, तेच आम्ही, 'सुख आले माझ्या दारी' म्हणत आनंदलो होतो. काळोखाच्या गुहेत रडत बसणाऱ्या अल्लाउद्दीनला जादूचा दिवा मिळावा, तसा आम्हांला नशिबानं हात दिला होता. नशीब सुद्धा 'छू मंतर' असतं, ते असं!

दुसऱ्या दिवशी बीनाकडे, नास्त्यासाठी शेव, चिवडा व बुंदी होती. पावाला चीज लावून मायक्रो-ओव्हनमध्ये ठेवलेला पाव दिला. पाव छान लागला. मायक्रो-ओव्हन लंडनला येईपर्यंत मला माहीतच नव्हता. त्यादिवशी मायक्रो-ओव्हनमध्ये भात ठेवून कुंदा लग्नाला गेली नि दहा मिनिटांत भात होईल, म्हणाली. काटा पाहिला, तर तो दहा मिनिटांवर होता. पण नंतर पाहिलं, तर ती दहा मिनिटं कमी झालीच नव्हती. मग आम्ही भात कसा खाणार ?

पण मिनिटं कमी व्हायच्या ऐवजी वाढायलाच लागली. तेव्हा स्वातीला म्हटलं,

'ह्या मायक्रो-ओव्हनची आपल्याला काहीच माहिती नाही. त्यापेक्षा आपण पाव नि पोळी आहे, तीच खाऊ.'

कुंदा घरी आली नि मग, आपण घड्याळ बघत बसलो होतो, हे समजलंच नि हसूच आलं. कारण घड्याळात बारा वाजून दहा मिनिटं झाल्यानं नुसती दहा मिनिटं दिसली होती.

बीनाकडचा नास्ता पाहून मी विचारलं,

'बाप, रे! एवढे पदार्थ घरी केले ?'

'नाही.. विकत आणले.' बीना म्हणाली.

'अय्या, बुंदी, फरसाण वगैरेही विकत मिळतात ?' मी आश्चर्यानं विचारलं.

'तर! सगळे गुजराती पदार्थ दुकानात मिळतात. मी सगळं विकतच आणते.' बीना म्हणाली.

इथं खूप गुजरात्यांची विविध प्रकारची दुकानं आहेत. एक गुजराती, दहा गुजरात्यांना इथं स्थायिक होण्यासाठी मदत करतो नि हे दहा गुजराती आपल्या अन्नदात्याला अतिशय मान देऊन असतात. बीनाच्या मावशीनं बीनाचं व तिच्या बहिणीचं लग्न जमवलं, ते लक्षात ठेवून बीना व तिची बहीण मावशीला अतिशय मान देऊन असतात. बीना राहत होती, तिथं

आजूबाजूला सगळे गुजरातीच राहतात. बीनाच्या मुलाच्या शाळेत मी व स्वाति बीनाबरोबर गेलो होतो. तरी ती शाळा लंडनमधली आहे, की गुजरातमधली, असा आम्हांला संभ्रम पडला, इतकी गुजराती मुलंच सगळ्या शाळाभर होती.

## बारबिकल सिटी

आज आम्ही प्रथम बारबिकल सिटी पाहायचं ठरवलं. आज आम्ही कालच्याप्रमाणे पूर्ण दिवसाचं तिकीट काढलं होतं. पूर्वी सात दिवसांचं वा चार दिवसांचं तिकीट मिळे व ते स्वस्त पडे. पण आता एक दिवसाचं तिकीट मिळतं. ते बसलाही चालतं. टचूबमध्ये बसल्यावर बाहेर पडताना मोठ्या स्टेशनवर ॲटोमॅटिक चेकिंग सिस्टिम असते. म्हणजे आपण स्टेशनमधून बाहेर पडतो, तो मार्ग बंद असतो. त्याच्या शेजारी कॉम्प्यूटर असलेली ही सिस्टिम असते. पहिल्या भेटीत तिकीट टाकायचं, की दरवाजा उघडतो. तुमचं सबंध दिवसाचं तिकीट असेल, तर ते दुसऱ्या चिरेतून बाहेर येतं. ते उचलून मग उघडलेल्या दरवाज्यातून (फाटकातून) बाहेर पडायचं.

आम्ही एकदा आदल्या दिवसाचंच तिकीट आत टाकून पाहिलं; पण फाटक उघडलं गेलं नाही. तुमचं सामान मात्र दुसऱ्या बाजूनं बाहेर ढकलता येतं. कारण मोठं लगेज घेऊन ह्या फाटकातून बाहेर पडता येत नाही. मात्र लहान स्टेशनांवर तिकीट-चेकर असतात. लहान स्टेशनांवर डब्ल्यू. सी. त फुकट जाता येतं व ते स्वच्छ असतात.

बीनाकडे सकाळी नास्ता करून मग आम्ही बारबिकल सिटी पाहायला गेलो. बारबिकल ह्या स्टेशनावरच सरळ उतरल्यानं स्टेशनमधून बाहेर पडल्यावर लगेचच 'लंडन टाऊन' ही अक्षरं दिसतात. 'बारबिकल व्हिलेज' हे बारबिकल स्टेशनला लागूनच असलेलं व्हिलेज आहे. म्हणजे लहानसं, टुमदार गाव आहे. विविध रंगांची फुलं नि झाडं ह्यांनी नटलेलं असं देखणं गाव. मध्येच असलेला एक तलाव ह्या गावाचं सौंदर्य आणखीनच वाढवतो. ह्या एवढ्याशा गावात शाळा, कॉलेजेस्, डिपार्टमेंटल स्टोअर्स अशा विविध गोष्टी आहेत. आर्ट गॅलरी आहे. नाटचगृह व सिनेमागृह पण ह्या एवढ्याशा गावात आहेत. हे 'बारबिकल व्हिलेज' म्हणजे लंडनमधल्या भरवस्तीत वसलेलं निवांत, देखणं शहर. गर्दी हवी असल्यास बारबिकल स्टेशनवर येऊन गाडीनं गर्दीत मिसळायचं. गर्दी ज्यांना अजिबात आवडत नाही, त्यांना ह्या बारबिकल व्हिलेजच्या बाहेर जाण्याची मुळीच जरुरी नाही. कारण जीवनाला लागणाऱ्या सर्व वस्तू व सुखसोयी इथं उपलब्ध आहेत. 'बारबिकल व्हिलेज' मध्ये राहणारी एक स्त्री गेली आठ वर्षं ह्या बारबिकल व्हिलेजच्या बाहेर गेली नाही. इतकं हे स्वयंसिद्ध गाव, देखणं, सुंदर नि रसिक आहे. इथल्या घरांना 'थॉमस मूर' अशी कीर्तिमान नावं आहेत. इथं शेक्सपिअरिअन नाटकं सुद्धा होतात. शेक्सपिअरिअन नाटकांच्या जाहिराती टचूबमधून जाताना दिसतात. स्थळ असतं बारबिकल व्हिलेज. म्हणजेच शेक्सपिअरिअन नाटकं पाहायला बाहेरच्या लोकांनी बारबिकल व्हिलेजमध्ये यावं, बारबिकल व्हिलेजमधल्या लोकांना बाहेर जाण्याची जरुरी नाही. इथं राहणारी माणसं खरोखर भाग्यवान ! कलात्मक जगण्याला जे जे आवश्यक, ते ते ह्या टुमदार नयनरम्य गावी हजर.

हे गाव पाहायला, आपल्या इथले थोर लेखक पु. ल. देशपांडे गेले होते. हे रम्य नि देखणं गाव पु.लं.ना एवढं आवडलं, की ते म्हणाले,

'मी आता ह्या बारबिकल सिटीतच राहतो.'

कुणालाही आकर्षित करेल, असंच हे गाव आहे. पण माझ्या मनात एक प्रश्नचिन्ह आलंच, इथं राहायला पौंडाचं चलन लागतं. त्याची सोय पु. ल. कशी करणार होते ? ह्याचा शोध घेणं राहूनच गेलं. पण जे दोन-तीन तास हाती होते, तेवढ्या वेळात तिथं मनमुराद भटकलो.

## टॉवर ब्रिज

'टॉवर ऑफ लंडन' अजून पाहायचा होता. त्यासाठी बारबिकल सिटीतून बाहेर पडावंच लागलं. 'टॉवर ऑफ लंडन' पाहायचा, तर त्याआधी देखणा असा 'टॉवर ब्रिज'ही दिसतो नि त्या खाली वाहणारी विस्तीर्ण अशी टेम्स नदी ! हा साराच परिसर नीटनेटका, देखणा नि मन मंत्रित करणारा आहे. तिथूनच 'टॉवर ऑफ लंडन'चे मनोरे खुणावत असतात.

टॉवर ब्रिज चढून आम्ही वर गेलो नि पाहतच राहिलो. आपल्या इथले ब्रिज (पूल) अगदी साधे असतात; पण हा ब्रिज अगदी राजेशाही दिसत होता ! ब्रिजवरच्या बाजूच्या उंच खांबांवरून कठड्यापर्यंत आलेल्या नक्षीदार कमानी राजेशाही थाटात उभ्या आहेत. आपल्या इथलं ब्रिटिश बांधकाम साधेपणाकडं झुकलेलं आहे. लंडनमधलं सारं राजेशाही. खाली गेल्यावर टेम्सच्या पात्रातून बोट जात होती. ती टॉवर ब्रिजशी आली, तेव्हा ब्रिजच्या झडपा हलकेच उघडल्या गेल्या व तिथून मोठी बोट निघून गेली. भारतात दक्षिणेकडेही एक असाच पूल आहे. त्याच्यावरून आगगाडी जात नाही, त्या वेळी बोटींना जाता यावं, म्हणून तो पूल गाडी निघून गेल्यावर दुभंगतो. त्या गोष्टीची मला प्रकर्षानं आठवण झाली.

आजूबाजूला गर्द झाडी, मध्ये खंदकाचं पाणी, नंतर किल्ल्याची मजबूत तटबंदी नि आत सर्वांत उंच अशी ही 'व्हाईट टॉवर'ची बिल्डिंग ! तिचा उंच उभटपणा, बांधकामाची अंगभूत नजाकत नि त्यावरचे देखणे चार मनोरे आपल्याला आमंत्रित करतात. आजूबाजूच्या टॉवर्स घंटांनी एक वेगळीच शोभा आणली आहे. हा राजवाडा ऊर्फ किल्ला ऊर्फ तुरुंग कधी पाहू, असं झालं होतं. ही ह्या टॉवरची विविधताच मनावर जादू करते. राजवाडा म्हटलं, की सुखभोग, ऐशाराम नि वैभव मनात येतं, तर तुरुंग म्हटलं, की दीनता, दु:ख, अपमान नि तरीही अंगभूत सळसळतेपण आलं. ह्या दोन्हींचा मिलाफ म्हणजे हा 'टॉवर ऑफ लंडन.'

'बाहेरून हा पाहताना इतका सुंदर दिसतो, आत तर किती छान असेल !' स्वाति म्हणाली.

'आतून पाहताना आपण मंत्रित होऊ.' मी त्या राजवाड्याचं देखणेपण पाहत म्हटलं.

आजही ट्रिनिटी स्क्वेअर क्रॉस करून, फिरून, खंदकापलिकडचा 'टॉवर ऑफ लंडन' पाहत चाललो होतो. परत थबकून उभ्या राहिलो नि म्हटलं,

'कित्ती सुंदर !'

प्रवेशद्वाराशी आम्ही गेलो, तो पाच पाऊंड म्हणजे दीडशे रुपये तिकीट होतं. (९१ सालचं. आता आणखीनच महाग.)

'लंडनपर्यंत येण्याचा इतका खर्च होतो... तर आणखी थोडा.' आम्ही एकाच वेळी दोघी म्हणालो.

दोघींनाही 'टॉवर ऑफ लंडन' बघण्याचे वेध लागले होते.

## टॉवर ऑफ लंडन

प्रत्येक राज्यकर्ता राज्यारोहणाच्या आधी ह्या टॉवरमध्ये राहायला यायचा. ह्या टॉवरमधून, राजाची वा राणीची मिरवणूक शाही इतमामात थाटामाटानं लंडन शहरातून जात, वेस्ट मिनिस्टर ॲबेशी पोचायची. त्या रस्त्यावरून आम्ही आलो होतो. आमच्याही अंगी उत्साह संचारला होता.

तिकिटाचं हे प्रवेशद्वार म्हणजे 'लायन टॉवर' ह्या अर्धवर्तुळाकृती वास्तूचं प्रवेशद्वार. खंदकावर बांधलेल्या पक्क्या, उंच, दगडी रस्त्यावरून ह्या प्रवेशद्वाराशी आपण येऊन पोचतो.

आत जाऊन आपण पायऱ्यांवर उभे राहतो, तो आपल्याला रॅव्हन्स दिसतात. हे मोठ्या कावळ्यांसारखे दिसणारे पक्षी आहेत. लंडनमध्ये कावळे मात्र कुठं दिसत नाहीत. नंतर आख्ख्या युरोपमध्येच कुठं कावळे दिसले नाहीत. थंड हवा कावळ्यांना आवडत नसावी. गाईड सांगत होता, की शेवटचा रॅव्हन्स नाहीसा होईल, तेव्हा 'टॉवर ऑफ लंडन' कोसळेल, असा समज असल्यानं ह्या रॅव्हन्सूची बादशाही बडदास्त ठेवली जाते. प्रत्येक रॅव्हन्सला पिंजऱ्यात स्वतंत्र सोय आहे. त्यांच्यावर देखरेख ठेवली जाते. पण ह्या पक्ष्यांचे पंख कापलेले असतात. त्यामुळं ते चालतात. उडून जाऊ शकत नाहीत. आपणही पिंडदानाच्या वेळी कावळ्याचं कौतुक करतोच की!

लंडन शहराचं रक्षण करण्यासाठी व शहरावर देखरेख करण्यासाठी, वुल्यम दी कॉंकररनं १०७८ साली 'टॉवर ऑफ लंडन' बांधला. शेजारील खंदक धरून त्याचा एकत्रित विस्तार अठरा एकर आहे. ह्यांतील 'ग्रेट टॉवर' ऊर्फ 'व्हाईट' ही बिल्डिंग सर्वांत जुनी नि महत्त्वाची बिल्डिंग आहे. आत अन्य तेरा टॉवर्स असलेल्या भिंतीनं आतील भागाचं रक्षण केलं जायचं. टेम्स नदीच्या बाजूला सहा टॉवर्स असलेल्या दुसऱ्या भिंतीनं बाह्य भागाचं रक्षण केलं जायचं. प्रथम हा राजवाडा म्हणून वापरला जाई. नंतर भक्कम तटबंदी असलेल्या ह्या किल्ल्याचा तुरुंग म्हणून उपयोग होई.

बायवर्ड टॉवरशी आम्ही गेलो. रिचर्ड सेकंडनं हा टॉवर बांधला. इथं पहिल्या मजल्यावरून द्वाररक्षणार्थ खाली-वर होणारी लोखंडी सुळक्यांची अवाढव्य चौकट दिसते. ह्या दोन्ही बाजूंच्या कमानीसारख्या मार्गावर रक्षकांच्या खोल्या असत. इथंच चौदाव्या शतकातील भित्तिचित्रं दिसतात. सेंट जॉन बाप्टिस्ट, सेंट जॉन मायकेल वगैरेंची चित्रं ह्यात आहेत.

नंतर 'बेल टॉवर' दिसतो. इथंच राणी एलिझाबेथ, थॉमस मूर, ड्यूक ऑफ मामंथ, बिशप ऑफ रॉचेस्टर यांना कैदेत ठेवलं होतं.

ट्रेटर गेटपाशी आम्ही आलो. वेस्ट मिनिस्टर ॲबेमध्ये ज्यांना शिक्षा फर्मावली गेली, असे कैदी इथं ठेवले जायचे. ड्यूक ऑफ बकिंगहॅम, थॉमस मूर, सातव्या हेन्रीच्या दोन बायका, ड्यूक ऑफ सॉमरसेट, एलिझाबेथ, ड्यूक ऑफ मामंथ हे ह्याच कमानीतून आत गेले. ट्रेटर गेटच्या वर पहिल्या एडवर्डनं थॉमस टॉवर बांधला. ह्यालाच लागून असलेल्या ब्रिजवरून गेलं, की 'वेकफिल्ड' ऊर्फ 'रेकार्ड टॉवर' लागतो. हा तिसऱ्या हेन्रीनं बांधला. इथं राज्याचं

कामकाजाचं दप्तर ठेवलं जायचं. म्हणून त्याला रेकॉर्ड रूम म्हणतात. प्रथम व्हाईट हाऊसमध्ये हे दप्तर ठेवलं जायचं. नंतर इथं रेकॉर्ड ठेवलं जात असल्यानं रेकॉर्ड टॉवर म्हणू लागले. राजाच्या वेकफिल्ड ह्या क्लार्कच्या नावे ह्या टॉवरला पुढं वेकफिल्ड टॉवर म्हणू लागले. ह्या दोनमजली टॉवरच्या खालच्या मजल्यावर गार्डरूम आहे.

व्हाईट टॉवरच्या प्रवेशद्वाराच्या डाव्या बाजूला सेंट जॉन चॅपेल आहे. आम्ही आत गेलो. तिथं आम्ही खुर्च्यांवर बसलो. तिथं गाईड सर्व इतिहास सांगत होता. प्रथम व्हाईट टॉवरमध्ये राजघराण्यातील लोक राहत. ट्रेटर गेट हा पूर्वी प्रवेशमार्ग होता. पण तिथं कैदी ठेवणं सोयीचं जाऊ लागल्यानं एलिझाबेथ, थॉमस मूर, ड्यूक ऑफ मामंथ वगैरे कैदी ठेवले जाऊ लागले.

सेंट पीटर्स चॅपेल - जो आम्ही बाहेरून पाहिला, तिथं एलिझाबेथ, ड्यूक ऑफ सॉमरसेट, सातव्या हेन्रीच्या दोन बायका, ड्यूक ऑफ मामंथ वगैरेंना पुरलं आहे.

ग्रीन टॉवर - लॉर्ड हेस्टिंग, सातव्या हेन्रीची दुसरी बायको ॲने, काऊंटेस् मागरिट, हॉवर्डची क्वीन कॅथरीन वगैरे सात जणांचा कुऱ्हाडीनं (ॲक्स) शिरच्छेद केला, क्वीन ॲने बुलीनचा मात्र इथं तलवारीनं शिरच्छेद केला, तो इथंच. नंतर ह्या साऱ्यांना तिथंच पुरलं.

गाईड माहिती सांगत होता नि तो रक्तरंजित इतिहास ऐकताना प्रश्न पडला, की ही मुस्लिम कारकीर्द होती, की इंग्लिश ? हे स्वतःला सुसंस्कृत समजतात ?

सारे टॉवर्स म्हणजे वेगवेगळे तुरुंग आहेत. 'ब्लडी टॉवर' तिसऱ्या हेन्रीनं बांधला. त्याला प्रथम 'गार्डन टॉवर' म्हणत. पण पाचवा एडवर्ड व त्याचा भाऊ ड्यूक ऑफ यॉर्क ह्यांचा इथं खून झाल्यानं ह्याला 'ब्लडी टॉवर' म्हणतात. सर वॉल्टर रॅले हा ह्या तुरुंगात होता.

## कोहिनूर हिरा धड दिसत नाही

वेगवेगळी शस्त्रं वगैरे पाहायच्या आधी 'क्राऊन ज्युएल्स' पाहायचं आम्ही ठरवलं. तिथं भलीमोठी रांग होती, पण ती भराभर पुढं जात होती.

'क्राऊन जुएल्स' इथं, हिरे, माणकं, पाचू वगैरे रत्नांनी जडित असे वेगवेगळे राजमुगुट आहेत. नक्षीदार केलेले मोठमोठे चांदीचे बाऊल्स, डिशेस् व चमचे पण आहेत. एक भांडं तर गरुडाच्या आकाराचं आहे.

हिरे, माणकं चांगली टपोरी आहेत. 'स्टार ऑफ आफ्रिका' हा जगातला मोठा हिरा राजदंडात जडित केला आहे. १९३७ सालच्या क्वीन एलिझाबेथच्या राज्यारोहण समारंभाच्या वेळी तिनं घातलेल्या मुगुटात भारतातील कोहिनूर हिरा आहे; पण हे सारं फटाफट पाहावं लागतं. कारण गार्ड सारखा पुढं हाकलत असतो. त्यामुळं सारे हिरे पाहण्यात 'कोहिनूर हिरा' जरा वेळ दिसतो. तेव्हा 'हा आमचा कोहिनूर हिरा, बरं का' हे सांगण्याइतका वेळ मुळीच नसतो. 'लंडन टॉवर' न बघताच आपल्या इथले लेखक हे वाक्य ठोकून देतात, लक्षात आलं. वास्तविक कोहिनूर हिऱ्याप्रमाणे आणखीही मोठे हिरे तिथं आहेत. त्यामुळं तेवढ्या एक-दोन मिनिटांत 'कोहिनूर कोणता ?' हे समजणं अवघड जातं.

## शस्त्रागार

आम्ही शस्त्रागार पाहायला गेलो. जीन व बिअर ह्या कोरीव काम केलेल्या दोन मूर्ती सुरेख

वाटतात. बाकीचा शस्त्रागार आपल्या इथल्या जयपूर, उदयपूर यांसारखाच, परंतु लंडनचा असल्यानं कौतुकानं पण ओझरता पाहिला.

आर्मरूम : इथं सगळे लोखंडी पेहराव दिसतात. हे लोखंडी पेहराव एखाद्या यंत्रमानवासारखे वाटतात. सातव्या हेन्रीपासून अनेक राजांनी व सरदारांनी वापरलेले हे लोखंडी पेहराव आहेत. पायदळातले व घोडदळातले योद्धे युद्धावर चालले आहेत, असं वाटतं. प्रत्यक्षच युद्ध चाललं आहे, असं वाटतं. कॅननरूममध्ये फार पूर्वीपासूनच्या तोफा ठेवलेल्या आहेत. मात्र हा शस्त्रागार पाहताना कंटाळा येतो.

'बस्स ! झालं सगळं पाहून !' स्वाति म्हणाली.

'ह्या इमारती, नि ही शस्त्रास्त्रं पाहायला दीडशे रुपये कसे घेतील ? आणखी काही तरी असेल.' मी म्हटलं.

## टॉर्चर रूम

'टॉर्चर रूम'च्या तिथं मोठी लाईन होती.

'तिथं काही तरी खास असेल..' स्वाति म्हणाली.

'टॉर्चर रूम' ह्या लायनीत जवळ जवळ तासभर उभे राहिलो, तेव्हा आमचा नंबर लागला. दगडी कमानीसारख्या प्रवेशद्वारातून आम्ही आत गेलो. वेस्ट मिनिस्टरमध्ये ज्यांना शिक्षा फर्मावली, ते कैदी इथं ठेवले जायचे. तुरुंगात पूर्वी लोकांना कसं ठेवत. ते दाखवलंय्. लोखंडी सळ्या असलेला साधा तुरुंग आहे. नंतर कट्यार, कुऱ्हाड, तलवार वगैरेंसारखी आयुधं व जीव घेण्याच्या जुन्या आलतूफालतू गोष्टी नि भर चौकात फाशी कसं देत, ह्याचं नुसतं चित्र, खरं तर, प्रेक्षकांनाच टॉर्चर केलं जातं ! एक तास उगाच घालवला, असं वाटतं.

'टॉवर ऑफ लंडन' बाहेरून जसा आकर्षक व देखणा वाटतो, तसा आतून काही खास नाही. मुगुट वगैरे खजिना पाहण्यासारखा आहे, तर तिथं दहा मिनिटांत बाहेर काढतात. कोहिनूर हिरा पाहण्याचा उदंड उत्साह असतो. पण नेमका कोहिनूर हिरा कोणता, ह्याचा अंदाज करण्यात वेळ जातो. 'दगडी बांधकाम व शस्त्रागार' आपण जयपूर व उदयपूरला सुद्धा पाहू शकतो. 'पाच पाऊंड' तिकीट ही निव्वळ लूट आहे. शिवाय 'हळदीघाटी' म्हटलं, की जे स्फुरणं चढतं, तेही इथं होत नाही. इथं दहा-पंधरा राजघराण्यांतल्या लोकांना तुरुंगात टाकलं व मारलं, हा ह्याचा इतिहास !

## हाईड पार्क

'टॉवर ऑफ लंडन' पाहिल्यावर आम्ही 'हाईड पार्क' पाहायला गेलो. वास्तविक ग्रीन पार्क ओलांडला, की हाईड पार्क लगेचच लागतो. पण काल वेळ नव्हता. 'हाईड पार्क कार्नर' ह्या स्टेशनातून बाहेर पडलं, की 'हाईड पार्क' लगेचच लागतो. इथले पार्क ज़वळजवळ मैलभर पसरलेले असतात. हाईड पार्क हाही असाच लांबवर पसरलेला आहे. इथलं एक वैशिष्ट्य म्हणजे, इथं एक व्यासपीठ आहे. त्यावर कुणीही, कोणत्याही विषयावर व्याख्यान देतो. ते व्याख्यान ऐकायला लगेच गर्दी होते. पण माणसांची गर्दी होण्याबाबत मात्र बर्नार्ड शॉचा एक

गमतीदार किस्सा आठवला. 'व्याख्यान देणं' ह्याची कशी सवय लावून घ्यावी, ह्या संबंधात तो लेख होता. 'बर्नार्ड शॉ' सरकारविरुद्ध व्याख्यान देणार होते. त्यांनी तसं सरकारला कळवलंही होतं. बर्नार्ड शॉ व्याख्यान देणार होते. त्या दिवशी पाऊस पडत होता. त्यामुळं कुणीही व्याख्यान ऐकायला जमलं नव्हतं. अगदी एकही श्रोता नव्हता. सरकारनं पाठवलेला पोलिस मात्र तिथं उभा होता. कारण बर्नार्ड शॉ काही आक्षेपार्ह बोलत नाहीत ना, ह्यावर लक्ष ठेवायला त्याला पाठवलं होतं. त्या वेळी तशा पावसात बर्नार्ड शॉंनी त्या पोलिसालाच श्रोता बनवलं व त्याला एक तास व्याख्यान दिलं. असं हे व्यासपीठ नि त्यावर व्याख्यान देणारे धुरंधर नेते ! हाईड पार्क हा प्रचंड, सर्वांत विस्तीर्ण असा पार्क आहे. त्याच्या एका बाजूला ग्रीन पार्क व दुसऱ्या बाजूला केंनिंग्टन पार्क आहे व त्याच्याच जवळ रॉयल अलबर्ट हॉल.

'नॅशनल गॅलरी' व 'ट्रॅफलगार स्क्वेअर' इत्यादी, दुसऱ्या दिवशी पाहू, असं ठरवून आम्ही घरी आलो.

बीना वाट पाहतच होती. गेल्याबरोबर चहा, शेव, चिवडा, गोडी बुंदी, खारी बुंदी वगैरे सरंजाम पुढ्यात आला.

'अशा खात राहिलो, तर छान जाड्या होऊ !' स्वाति म्हणाली.

'पण युरोपभर तुम्हांला काही नाही आवडणार. मग तुम्ही बारीकच होणार !' बीना म्हणाली.

पुढं असे अनुभव आले, की बीना जणू भविष्यच बोलली !

## गोरा माणूस रस्ता झाडताना

त्या दिवशी स्वातीची मैत्रीण तिला भेटायला आली होती. आम्ही 'चेंजिंग ऑफ द गार्ड्स' विषयी बोलत होतो. त्या दोघी म्हणाल्या,

'आम्ही अजून 'चेंजिंग ऑफ द गार्डस्' पाहिलेलंच नाही !'

'खास पाहण्यासारखं नाहीये ते !' मी म्हणाले.

'पण लंडनमध्ये इतकी वर्षं राहतो, तर पाहायला हवंच ना ?'

'म्हणजे त्याला नाव ठेवत ते सगळ्यांनी पाहायचं.'

'पण फुकट तर आहे !' बीना म्हणाली.

ते अगदी खरं होतं.

मी एकदम म्हणाले,

'आम्ही प्रथम लंडनला आलो नि आपल्यावर राज्य करणाऱ्या गोऱ्या माणसाचा जातभाई रस्ता झाडताना पाहताना आश्चर्य वाटलं.'

तेव्हा बीना म्हणाली,

'आता भारतीय लोक गाडीतून हिंडतात नि ते लोक झाडू मारतात, त्याचं आता त्यांना वैषम्य वाटतं.'

ज्या इंग्लिश लोकांनी; 'यू ब्लडी इंडियन्स' म्हणत गांधीजींना फर्स्ट क्लासमधून ढकलून दिलं होतं, त्याच लोकांना आता रस्ते झाडताना वैषम्य वाटत होतं. काळाचा महिमा ! पण थोड्या वेळानं मी बीनाला म्हणाले,

'उद्या हरिजन गाड्यांतून हिंडतील व ब्राह्मण रस्ते झाडतील, तेव्हा हे असंच बोललं जाईल ना ?'

तेव्हा बीना म्हणाली,

'पण आम्ही आमच्या पायांवर उभे राहिलो... राखीव जागेच्या आधारानं नाही.'

'पण सुजाण इंग्लिश लोकांनी भारतीयांना मुळात इथं आश्रय दिला ना ?' मी म्हणाले.

आम्हांला सगळ्यांनाच, सगळ्यांनी समंजसपणानं वागणं हे महत्त्वाचं, असं कुठं तरी जाणवलंच.

रात्री जेवताना बासमती भातापासून सगळा थाटमाट होताच. शिवाय खमण वगैरे पदार्थ होतेच. बीनाचा नवरा अतुल, हवं नको विचारीत होताच.

सकाळी सिरिअल्स व दूध वगैरे इंग्लिश पद्धतीचा नास्ता नि शिवाय शेव बुंदी वगैरे पदार्थ.

## ट्रॅफलगार चौक

सकाळी नास्ता करून आम्ही एम्बँकमेंट स्टेशनवरून 'ट्रॅफलगार चौक' पाहायला गेलो.

'ह्यात काय पाहायचंय् ?' स्वातीनं विचारलं.

पाहण्यासारखं काहीच नव्हतं. नेल्सनला आदरांजली, म्हणून ह्या चौकाची उभारणी. १८०५ साली ट्रॅफलगार लढाईत नेपोलियनच्या बलाढ्य अशा फ्रेंच आरमाराचा नेल्सननं पराभव केला, त्याची विजयगाथा म्हणजे हा ट्रॅफलगार चौक. १८५ फूट उंचीच्या चौथऱ्यावर माणसाच्या तिप्पट मोठा नेल्सनचा पुतळा उभारला गेला आहे. पण त्यामुळं नेल्सनचा चेहरा इतका वर गेला आहे, की तो नीट दिसत नाही. हा चौथरा शक्तिशाली अशा सिंहांनी उचलला आहे.

इथंच काही युवक आले होते. त्यांनी बाकी डोकं भादरलं होतं, फक्त उभ्या ओळीत होडीसारखे केस ठेवले होते व ते हिरव्या, लाल व निळ्या रंगांत रंगवले होते. त्या मुलांचेच लोक फोटो काढत होते. हल्ली पाश्चात्त्य देशांत केसाच्या काहीही तऱ्हा चाललेल्या असतात. ट्रॅफलगारच्या कबुतरांचं कौतुक ऐकलं होतं; पण आपल्या इथं कबुतरखान्यातही एवढी कबुतरं असतातच. साऱ्यांची कबुतरं म्हणून वेगळी दिसावी, तर तेही नाही. इथली कबुतरं मात्र छान माणसाळलेली आहेत. हातावर बसून तळहातावर चालत जातात. त्यामुळं मुलांची छान करमणूक होते.

ट्रॅफलगार स्क्वेअरवरून चालत-चालत 'नॅशनल गॅलरी' पाहायला गेलो. इथं इटालियन, डच, स्पॅनिश, जर्मन, फ्लेमिश वगैरे अनेकानेक पेंटिंग्ज ठेवलेली आहेत. मायकेल अँजेलो, टिटन, लिआनार्दो दी व्हिन्सी, रुबेन्स-विविध चित्रकारांच्या कलाकृती इथं ठेवलेल्या आहेत. मुंबईत एका आर्ट गॅलरीतली चित्रं पाहायला तीन-चार तास वेळ मोडतो. इथं तर एवढा प्रचंड संग्रह ! हे सारं नुसतंच वर वर पाहणं होतं. मनात मुरणं हा प्रकार इथं घडतच नाही.

ऑक्सफर्ड स्ट्रीटवर 'सेल्फ्रीज' हे डिपार्टमेंटल स्टोअर पाहिलं. इथं नाना तऱ्हेचे कपडे, छत्र्या, लहान मुलांचे कपडे, पुरुषांचे कपडे, हॅटस् नि किती तरी विविध वस्तू होत्या.

एका ठिकाणी कपडे, एका ठिकाणी खाण्याच्या वस्तू अशा अनेकानेक जीवनावश्यक सर्व वस्तू इथं होत्या. किमती मात्र अवाढव्य असतात. ही डिपार्टमेंटल स्टोअर्स नुसती पाहून यावी. वस्तू इतक्या सुबक तऱ्हेनं ठेवलेल्या असतात की, पाहत राहावं. तुम्ही कोणतीही वस्तू घेतलीत, तरी काऊंटरमधूनच बाहेर पडता. हे डिपार्टमेंटल स्टोअर इतकं महाग असूनही लोकांची खरेदी जोरात चालू होती. इथं निवडक नि उच्च दर्जाचा माल मिळत असल्यानं उच्चभ्रू लोक इथं येतात. ह्या डिपार्टमेंटलप्रमाणेच नाईटब्रिजजवळच 'हॅरॉल्डस्' हे डिपार्टमेंटल स्टोअर पण असंच भव्य नि अवाढव्य आहे. इथं बाहेरील देशातून येणाऱ्या उच्चभ्रू लोकांना विशेष वस्तू कोणत्या, त्याची माहिती देणारं एक वेगळं डिपार्टमेंट पण आहे. इथं पैसा भरपूर हवा. मग सर्व सुखसोयी आहेत. अर्थात ज्याच्याकडं मुबलक पैसा आहे, त्यांना इथं नवीन नवीन फॅशनचे कपडे मिळतात. त्याच फॅशन्स जुन्या झाल्या, की नंतर इतरत्र तेच कपडे बऱ्याच कमी किमतीत मिळतात. मुंबईतही हेच घडतं. पण रुपयाची किंमत एकदम घसरलेली असल्यानं आपल्याला इथल्या वस्तू जास्त महाग वाटतात.

## लंडनमधील भारतीय

एकदा बीनाबरोबर 'नर्सरी प्लँटस्' घ्यायला आम्ही एका इंग्लिश माणसाकडं गेलो होतो. त्या वेळी तो पटकन् म्हणाला,

'इंडियन्स आर् व्हेरी रिच.'

हीच समजूत आता हळूहळू सगळीकडे पसरू लागली आहे. पौंडाची किंमत वाढली आहे. आम्ही युरोपमध्ये हिंडत होतो, तेव्हा पौंडाची किंमत वाढत गेलेली आम्ही अनुभवली. वास्तविक इंग्लंडमध्ये नैसर्गिक उत्पादन काही नाही. त्यांच्या हातांखालचे सारे देश स्वतंत्र झाल्यानं अत्यंत हलाखीची परिस्थिती त्यांच्यावर आली होती. पण आता पौंडाचा भाव चांगलाच सुधारला आहे. आम्ही युरोपमध्ये होतो; तेव्हा डॉलरचाच भाव थोडा खाली-वर होत होता; पण पौंडाचा भाव वाढत चालला होता. इंग्लंडला कैक वर्षांचा लोकशाहीचा इतिहास आहे. त्यामुळं माणसं शिस्तप्रिय आहेत. नि ज्या देशात लाचलुचपत नसते, तिथं साधारणत: किमती स्थिर असतात व चलनाचा भावही सुधारतो. शिवाय टेक्नॉलॉजी व तयार माल एक्सपोर्ट होणं हेही त्याला जोडून व्हावं लागतं. काय कारण, हे निश्चित माहीत नाही; पण पौंडाचा भाव दरदिवशी वाढत होता, हे मात्र खरं.

त्या दिवशी बीनाकडे तिच्या लग्नाची कॅसेट पाहिली. लग्न लंडनमध्ये आहे, असं न वाटता, ते भारतातच आहे, असं वाटत होतं. इतकी गुजराती लोकांची तिथं लग्नाला गर्दी झाली होती नि लग्नही खूप थाटामाटात झालं होतं. इथं गुजराती लोकं दोन प्रकारे लग्नसमारंभ करतात. एक रजिस्टर पद्धतीनं. त्या वेळी जेवणावळ होतेच. शिवाय भारतीय पद्धतीनंही लग्न लागतं. त्या वेळी फिरून जेवणावळ व देणी-घेणी होतात.

बीना लंडनला आली नि तिला नोकरी करायची होती. वर्षभर तरी नोकरी मिळणार नाही, असं सारी म्हणायची. एके ठिकाणी अर्ज केला नि इंटरव्ह्यूचा कॉल आला. बीना 'पोदार' कॉलेजची स्टूडंट आणि इंटरव्ह्यू घेणाराही 'पोदार' कॉलेजचाच स्टूडंट ! त्यानं बीनाला लगेचच नोकरी दिली.

लंडनमध्ये भारतीय हॉटेल्स खूप जोरात चालतात. ही सारी गर्दी इंग्लिश लोकांचीच असते. जरा कमी तिखट केलेले भारतीय पदार्थ इंग्लिश लोकांना खूपच आवडतात. इंग्लिश लोकांकडे मात्र पाव, नाही तर उकडलेल्या भाज्याच बनतात. त्यामुळं आपले पदार्थ त्यांना फार चविष्ट वाटतात.

कुंदा कारखानीस सांगत होती, की तिची इंग्लिश शेजारीण तिनं दिलेला पदार्थ मिटक्या मारत खाईल, कुंपणाशी तासन् तास बोलत राहील; पण घरी कधी बोलवणार नाही. चविष्ट पदार्थ बनवणाऱ्या बाईला घरी बोलावून खायला द्यायचं, म्हणजे हात दाखवून अवलक्षण, असं तर त्या बाईला वाटत नसेल ना ? झाकली मूठ सव्वालाखाची ठेवणंच त्या इंग्लिश बाईला योग्य वाटत असेल.

हॉलंडहून परत लंडनला आलो, तेव्हा आम्ही बीनाकडे उतरलो होतो. अख्ख्या युरोपमध्ये आम्हांला (स्वित्झर्लंड सोडून) माणसं जरा शिष्टच वाटली. पण हॉलंडहून परत लंडनच्या भूमीवर पाय ठेवला नि इंग्लिश माणसं आमच्याकडं बघून हसायला लागली, तेव्हा मनस्वी आनंद वाटला. श्रीमंत माणसं गरिबांशी संबंध ठेवायला तयार नसतात, तसंच राष्ट्रांचंही असावं. लंडनमध्ये आपली बरीच लोकं मोठ्या हुद्द्यावर आहेत. व्यापारातही अग्रेसर आहेत. त्यामुळं ह्या लोकांकडे बघून हसायला हरकत नाही, अशी लंडनमधल्या लोकांची समजूत झाली आहे. त्यामानानं इतर युरोपमध्ये भारत म्हणजे दरिद्री देश असंच समजतात.

## लंडनमधील लहान मुलं

आम्ही कुंदाकडे गेलो. त्या दिवशी तिचा वर्षाचा नातू ठब्बू एकसारखा पिर-पिर करीत होता. त्याच्या आईनं ठब्बूसाठी भाज्या उकडवलेला एक पदार्थ बनवला होता. त्यात मीठ नव्हतं नि साखरही नव्हती. तो त्या उकडलेल्या भाज्यांना तोंड लावी नि मान फिरवे. लंडनमध्ये मुलं पुढं आईस्क्रीम नि गोळ्या चॉकलेट खातात, म्हणून लहानपणापासूनच त्यांना गोड न देण्याची पद्धत सुरू झाली आहे. खरं तर, लंडन किंवा बाकी युरोप व अमेरिकेत चॉकलेट व आईस्क्रीम हेच पदार्थ सर्वांत स्वस्त मिळतात. चहा, कॉफी सुद्धा खूप महाग. यांत्रिक पदार्थ तेवढे स्वस्त. मग मुलं आईस्क्रीम व चॉकलेटस् खाणार नाहीत, तर दुसरं काय खाणार ? शिवाय बाहेरचं पाणी प्यायचं नाही, म्हणून एकसारखी कोक, नाही तर अशीच पेयं मुलं पिणार. कुंदाचा नातू अथवा त्याचे समवयस्क मोठेपणी आईस्क्रीम खातील; पण आता मात्र त्या इथल्या जीवांना बेचव खात बालपण घालवायचंय्.

ऑक्सफर्ड स्ट्रीटवर 'सेल्फ्रीज' हे डिपार्टमेंटल स्टोअर पाहिलं. इथं नाना तऱ्हेचे कपडे, छत्र्या, लहान मुलांचे कपडे, पुरुषांचे कपडे, हॅटस् नि किती तरी विविध वस्तू होत्या.

एका ठिकाणी कपडे, एका ठिकाणी खाण्याच्या वस्तू अशा अनेकानेक जीवनावश्यक सर्व वस्तू इथं होत्या. किमती मात्र अवाढव्य असतात. ही डिपार्टमेंटल स्टोअर्स नुसती पाहून यावी. वस्तू इतक्या सुबक तऱ्हेनं ठेवलेल्या असतात की, पाहत राहावं. तुम्ही कोणतीही वस्तू घेतलीत, तरी काऊंटरमधूनच बाहेर पडता. हे डिपार्टमेंटल स्टोअर इतकं महाग असूनही लोकांची खरेदी जोरात चालू होती. इथं निवडक नि उच्च दर्जाचा माल मिळत असल्यानं उच्चभ्रू लोक इथं येतात. ह्या डिपार्टमेंटलप्रमाणेच नाईटब्रिजजवळच 'हॅरॉल्डस्' हे डिपार्टमेंटल स्टोअर पण असंच भव्य नि अवाढव्य आहे. इथं बाहेरील देशातून येणाऱ्या उच्चभ्रू लोकांना विशेष वस्तू कोणत्या, त्याची माहिती देणारं एक वेगळं डिपार्टमेंट पण आहे. इथं पैसा भरपूर हवा. मग सर्व सुखसोयी आहेत. अर्थात ज्याच्याकडं मुबलक पैसा आहे, त्यांना इथं नवीन नवीन फॅशनचे कपडे मिळतात. त्याच फॅशन्स जुन्या झाल्या, की नंतर इतरत्र तेच कपडे बऱ्याच कमी किमतीत मिळतात. मुंबईतही हेच घडतं. पण रुपयाची किंमत एकदम घसरलेली असल्यानं आपल्याला इथल्या वस्तू जास्त महाग वाटतात.

## लंडनमधील भारतीय

एकदा बीनाबरोबर 'नर्सरी प्लँटस्' घ्यायला आम्ही एका इंग्लिश माणसाकडं गेलो होतो. त्या वेळी तो पटकन् म्हणाला,

'इंडियन्स आर् व्हेरी रिच.'

हीच समजूत आता हळूहळू सगळीकडे पसरू लागली आहे. पौंडाची किंमत वाढली आहे. आम्ही युरोपमध्ये हिंडत होतो, तेव्हा पौंडाची किंमत वाढत गेलेली आम्ही अनुभवली. वास्तविक इंग्लंडमध्ये नैसर्गिक उत्पादन काही नाही. त्यांच्या हातांखालचे सारे देश स्वतंत्र झाल्यानं अत्यंत हलाखीची परिस्थिती त्यांच्यावर आली होती. पण आता पौंडाचा भाव चांगलाच सुधारला आहे. आम्ही युरोपमध्ये होतो; तेव्हा डॉलरचाच भाव थोडा खाली-वर होत होता; पण पौंडाचा भाव वाढत चालला होता. इंग्लंडला कैक वर्षांचा लोकशाहीचा इतिहास आहे. त्यामुळं माणसं शिस्तप्रिय आहेत. नि ज्या देशात लाचलुचपत नसते, तिथं साधारणत: किमती स्थिर असतात व चलनाचा भावही सुधारतो. शिवाय टेक्नॉलॉजी व तयार माल एक्सपोर्ट होणं हेही त्याला जोडून व्हावं लागतं. काय कारण, हे निश्चित माहीत नाही; पण पौंडाचा भाव दरदिवशी वाढत होता, हे मात्र खरं.

त्या दिवशी बीनाकडे तिच्या लग्नाची कॅसेट पाहिली. लग्न लंडनमध्ये आहे, असं न वाटता, ते भारतातच आहे, असं वाटत होतं. इतकी गुजराती लोकांची तिथं लग्नाला गर्दी झाली होती नि लग्नही खूप थाटामाटात झालं होतं. इथं गुजराती लोकं दोन प्रकारे लग्नसमारंभ करतात. एक रजिस्टर पद्धतीनं. त्या वेळी जेवणावळ होतेच. शिवाय भारतीय पद्धतीनंही लग्न लागतं. त्या वेळी फिरून जेवणावळ व देणी-घेणी होतात.

बीना लंडनला आली नि तिला नोकरी करायची होती. वर्षभर तरी नोकरी मिळणार नाही, असं सारी म्हणायची. एके ठिकाणी अर्ज केला नि इंटरव्ह्यूचा कॉल आला. बीना 'पोदार' कॉलेजची स्टूडंट आणि इंटरव्ह्यू घेणाराही 'पोदार' कॉलेजचाच स्टूडंट ! त्यानं बीनाला लगेचच नोकरी दिली.

लंडनमध्ये भारतीय हॉटेल्स खूप जोरात चालतात. ही सारी गर्दी इंग्लिश लोकांचीच असते. जरा कमी तिखट केलेले भारतीय पदार्थ इंग्लिश लोकांना खूपच आवडतात. इंग्लिश लोकांकडे मात्र पाव, नाही तर उकडलेल्या भाज्याच बनतात. त्यामुळं आपले पदार्थ त्यांना फार चविष्ट वाटतात.

कुंदा कारखानीस सांगत होती, की तिची इंग्लिश शेजारीण तिनं दिलेला पदार्थ मिटक्या मारत खाईल, कुंपणाशी तासन् तास बोलत राहील; पण घरी कधी बोलवणार नाही. चविष्ट पदार्थ बनवणाऱ्या बाईला घरी बोलावून खायला द्यायचं, म्हणजे हात दाखवून अवलक्षण, असं तर त्या बाईला वाटत नसेल ना ? झाकली मूठ सव्वालाखाची ठेवणंच त्या इंग्लिश बाईला योग्य वाटत असेल.

हॉलंडहून परत लंडनला आलो, तेव्हा आम्ही बीनाकडे उतरलो होतो. अख्ख्या युरोपमध्ये आम्हांला (स्वित्झर्लंड सोडून) माणसं जरा शिष्टच वाटली. पण हॉलंडहून परत लंडनच्या भूमीवर पाय ठेवला नि इंग्लिश माणसं आमच्याकडं बघून हसायला लागली, तेव्हा मनस्वी आनंद वाटला. श्रीमंत माणसं गरिबांशी संबंध ठेवायला तयार नसतात, तसंच राष्ट्रांचंही असावं. लंडनमध्ये आपली बरीच लोकं मोठ्या हुद्द्यावर आहेत. व्यापारातही अग्रेसर आहेत. त्यामुळं ह्या लोकांकडे बघून हसायला हरकत नाही, अशी लंडनमधल्या लोकांची समजूत झाली आहे. त्यामानानं इतर युरोपमध्ये भारत म्हणजे दरिद्री देश असंच समजतात.

## लंडनमधील लहान मुलं

आम्ही कुंदाकडे गेलो. त्या दिवशी तिचा वर्षाचा नातू ठब्बू एकसारखा पिर-पिर करीत होता. त्याच्या आईनं ठब्बूसाठी भाज्या उकडवलेला एक पदार्थ बनवला होता. त्यात मीठ नव्हतं नि साखरही नव्हती. तो त्या उकडलेल्या भाज्यांना तोंड लावी नि मान फिरवे. लंडनमध्ये मुलं पुढं आईस्क्रीम नि गोळ्या चॉकलेट खातात, म्हणून लहानपणापासूनच त्यांना गोड न देण्याची पद्धत सुरू झाली आहे. खरं तर, लंडन किंवा बाकी युरोप व अमेरिकेत चॉकलेट व आईस्क्रीम हेच पदार्थ सर्वात स्वस्त मिळतात. चहा, कॉफी सुद्धा खूप महाग. यांत्रिक पदार्थ तेवढे स्वस्त. मग मुलं आईस्क्रीम व चॉकलेटस् खाणार नाहीत, तर दुसरं काय खाणार ? शिवाय बाहेरचं पाणी प्यायचं नाही, म्हणून एकसारखी कोक, नाही तर अशीच पेयं मुलं पिणार. कुंदाचा नातू अथवा त्याचे समवयस्क मोठेपणी आईस्क्रीम खातील; पण आता मात्र त्या इथल्या जीवांना बेचव खात बालपण घालवायचंय्.

'उद्या वृद्धांना असलं खाणं देण्याची पद्धत निघेल...' कुंदाचा नवरा चेष्टेनं म्हणत होता.

बीनाचा सूरज न खाणाऱ्या पठडीतला असल्यानं बीनाकडे तो प्रयोग नव्हता.

## मुंबईची अप्रतिम हवा

बीनाचा सूरज जेवायला व काही खायला तयार नसायचा. तो अशक्त असल्यानं त्याला मुंबईला आणायला बीना घाबरत होती. मुंबईला फार प्रदूषण आहे. त्यामुळं लंडनमधली काही मुलं मुंबईला आजारी पडलेली तिनं ऐकलं होतं. त्यामुळं मुंबईला यावं, असं वाटत असूनही ती येऊ शकत नव्हती. मागच्या उन्हाळ्यात ते कुटुंब पोर्तुगालला गेलं होतं. आमची वेगळी भाषा (मराठी) ऐकून तिच्या मुलांना आम्ही पोर्तुगालहून आलो आहोत, असं वाटलं.

बीना नवऱ्याला म्हणत होती,

'काय त्या पोर्तुगालमध्ये आहे ? त्यापेक्षा मुंबईला जायला हवं होतं.'

तिला मुंबईला येण्याची तीव्र इच्छा होती.

मुलं जरा मोठी झाली, असं पाहून दोन वर्षांनी ती मुंबईला आली. तर मुंबईची हवा सूरजला मानवली. त्याला भूक लागू लागली व लंडनच्या थंड हवेत त्याची स्किन खराब होत चालली होती. त्याला सारखी खाज सुटायची. तेही सारं मुंबईच्या हवेमुळं बंद झालं. तेव्हा बीनानं आपला मुंबईचा मुक्काम वाढवला. ते ऐकून मला खूप गंमत वाटली व मुंबईच्या हवेचा अभिमानही वाटला.

बीनाचा सूरज किंवा कुंदाचा नातू ठब्बू हे दोघे वेगळ्या खोलीत झोपतात. पुढं मुलं आईवडिलांना त्रास देतात, म्हणून मुलांना पहिल्यापासूनच वेगळ्या खोलीत झोपविण्याची इथं पद्धत आहे. मूल झोपेत उठलं, की आईवडिलांच्या खोलीत हलकेच बेलचा आवाज येतो व आई मुलाची नॅपी बदलणं वगैरे करते.

त्या दिवशी बीनाची बहीण आपल्या तीन महिन्यांच्या मुलीला घेऊन गाडीतून आली होती.

'एकटीच आलीस ?' मी विचारलं.

'हिला घेऊन...' आपल्या मुलीकडे बोट दाखवत ती म्हणाली.

'ते दिसतंय्. पण हिला कुणी धरलं ?' मी विचारलं.

'गाडीत बास्केटमध्ये लहान मुलांना ठेवायची सोय असते.' ती म्हणाली.

इथल्या गाड्यांना सीटवर पट्टे असतात. आपण बसलं, की ते आपल्याभोवती लावून घ्यावे लागतात. नाही लावले, तर दंड असतो. ड्रायव्हर आणि ड्रायव्हरच्या सीटजवळ बसणाऱ्यानं पट्टे लावले नाहीत, तर जास्त दंड असतो. लहान मूल असेल, तर मागच्या बाजूचे दरवाजे कायम बंदच राहतील, अशी सोय करावी लागते.

कुंदाकडे, बीनाकडे व डॅनिलाकडे काही स्थानिक वर्तमानपत्रं फुकट यायची. ट्यूब स्टेशनवर अनेक मासिकं फुकट ठेवलेली असतात. मधू अभ्यंकरांनी ही विशेष माहिती आम्हांला

दिली. 'लंडन लाईफ', 'सदर्न क्रॉससारखी असली, तरी आतील मजकूर आवडीनं वाचावा, असा असतो. फुकट दिली गेल्यानं ही मासिकं प्रचंड प्रमाणात खपतात व त्यामुळं जाहिरातींचा आकडा चढा असतो. ह्या मिळालेल्या जाहिरातींच्या मिळकतीतून मासिक काढताना झालेला खर्च वजा जाऊन शिवाय त्यांचा फायदा उरतो, असं ऐकलं. काही काही वेळा पेपरमधून व मासिकांतून सेलच्या जाहिरातीही असतात. ती कात्रणं घेऊन नको असलेल्या गोष्टी सुद्धा लोकं दुकानात जाऊन येतात. मिळून काय, पैसा खर्च होतोच. मासिकं फुकट, पण नको असलेल्या वस्तूंकरता पैसा खर्च होतोच. ह्याला म्हणतात व्यापारी!

आपल्या इथं बायको गरोदर राहिली, की बाळंतपणाच्या वेळी तिला माहेरी नेऊन टाकली जाते नि मग नवरा नामक 'राजा' हुंदडायला मोकळा असतो. पण तिथं तसं नाही. ज्यांच्या बायका गरोदर आहेत, अशा पुरुषांना एक कोर्स पुरा करावा लागतो. त्या वेळी गरोदरपणात तिची घ्यायची काळजी शिकवली जातेच. शिवाय बाळंतपणाच्या वेळी बायकोला कशी मदत कराल, तिला कोणते व्यायाम द्याल, वगैरेही शिकवलं जातं. त्यामुळं बाळंतपणाच्या वेळी नवऱ्याची खूप मदत होते. 'माझा वंशज' म्हणत तुरे मिरवणाऱ्या आपल्या इथल्या नवऱ्यांना असं काही आपल्या वंशजाकरता करावं लागतं, ह्याची जाग येईल काय ?

बीनाबरोबर फिरायला जाताना बीनाबरोबर तिचा लहान मुलगा सूरज बाबागाडीत असायचा. रस्ता ओलांडायच्या वेळी समोरच्या गाड्या थांबायच्या नि आम्हांला आधी जाऊ द्यायच्या. बरोबर लहान मूल असलेल्या बाईचा मान, सदैव धावपळीत असलेला इंग्रज असा राखतो. शिवाय मुख्य रस्त्यावरून गाड्या जात असता गल्लीतल्या गाड्या किती तरी वेळ थांबतात. हा नियम आपल्या इथंही आहे. पण तो पाळला जात नाही. इथं ट्यूबमधून, बसमधूनही मुलाला बाबागाडीत ठेवून बायका प्रवास करतात.

## डिपार्टमेंटल स्टोअर्स

इथं एका डिपार्टमेंटल स्टोअरमध्ये जन्मदिवस, वाढदिवस, मृत्युदिन, लग्नदिवस, आजाऱ्यांसाठी वगैरे प्रसंगांसाठी भेटकार्ड पाहिली. त्यांत लिहिलेली काव्यात्मक वाक्यं वाचून मी म्हटलं,

'ही वाक्यं तर आपल्या इथल्याही भेटकार्डांतून असतात.'

ती वाचत स्वाति म्हणाली,

'हीच वाक्यं आपल्या इथं चोरतात.'

'हे बरं आहे ! इथं तर ही भेटकार्ड दीड-दोन पौंडांना आहेत. आपल्या इथं खूपच स्वस्त आहेत.' मी म्हटलं.

'मी मुंबईला आले, की ही भेटकार्ड बरीच विकत घेईन.' बीना म्हणाली.

धन्य आपल्या भारतीय व्यापाऱ्यांची !

डिपार्टमेंटलमध्ये मुलांच्या खेळण्यांसाठीच चार-पाच मोठे हॉल आहेत. तिथं विविध प्रकारची खेळणी पाहिली. डिपार्टमेंटलमध्येच भाजी मिळते व तिथं डस्टरपासून पळी, चमच्यापासून अनेक स्वयंपाकातल्या वस्तू काही भागांत असतात. तर काही भागांत मटन वगैरे वस्तू, तर काही भागांत फळं, तर दुसऱ्या भागात भाज्या, तिसऱ्या भागात शीतपेयं अशी गटवारी असते. 'कुत्र्याचं अन्न' म्हणूनही एक भाग असतो. बाबागाड्यांसारख्या छोट्या गाड्यांतून व बास्केट्समधून आपल्याला हव्या त्या वस्तू घ्यायच्या व मग आपण काऊंटरमधून बाहेर पडू शकतो. शिवाय चोरट्यांवर लक्ष ठेवण्यासाठी एक-दोन माणसं तिथं हिंडत असतात. आपलाही त्यांनी पाठलाग करावा, म्हणून आम्ही मुद्दामच इकडे तिकडे हिंडत होतो. वस्तू हातात घेऊन, वस्तू बरोबर घेऊन जात होतो व हळूच ठेवून देत होतो. पण ती लोकं आमच्याकडे ढुंकूनही पाहत नव्हती. तेव्हा बीना हसली आणि म्हणाली,

'चेहरे पाहून त्यांना बरोबर समजतं.'

तेव्हा आम्ही आमचे चेहरे आरशात पाहिले. पण आमचा चेहरा चिमणरावासारखा बावळट अजिबात वाटत नव्हता.

हॅराड, मार्क ॲंड स्पेन्सर, लिटल वुड्स वगैरे मोठ्या डिपार्टमेंटल स्टोअर्समध्ये ज्या वस्तू असतात, त्याच वस्तू त्यांच्या लहान शाखांमधूनही मिळतात. ह्या डिपार्टमेंटल स्टोअर्समधून मोठमोठे सेल लागतात, तेव्हा सेलमध्ये वस्तू खूपच स्वस्त मिळतात. समर व्हेकेशमध्ये हे सेल लागतात. आख्ख्या वर्षाचा माल लोकं आणतात.

## हुशार चोर

गुजराती लोकं श्रीमंत असतात, हे इथल्या चोरांनाही माहीत झालं आहे. आम्ही बीनाकडं होतो, तेव्हा बीनाच्या एका नातलगाकडं चोरी झाली. तीन-चार लोकं घरात शिरली व घरातल्या माणसांना त्यांनी बांधून ठेवलं व त्यांच्या घरातील दागदागिने चोरले. नव्या नवरीचे दागिने लॉकरमध्ये ठेवले होते, म्हणून ते वाचले.

## कृष्णाष्टमी

लंडनमध्ये मोगा नावाचा रताळ्यासारखा, पण रताळ्यासारखा गोड नसलेला पदार्थ मिळतो. कृष्णजन्माष्टमीच्या दिवशी बीनाचे सासू-सासरे येणार होते व त्या दिवशी साऱ्यांचा उपास होता. म्हणून बीनाचा नवरा अतुल म्हणाला,

'हां, आज मोगाचे वडे कर.'

आम्हांला वाटलं, मुगाचे वडे. म्हणून स्वातीनं बीनाला विचारलं,

'मुगाचे वडे उपासाला चालतात ?'

तेव्हा ह्या वस्तूचा उलगडा झाला.

कृष्णाष्टमीला रात्री आम्ही 'हरे राम हरे कृष्ण' मंदिरात रात्री गेलो. पण देवळापर्यंत जाऊ शकलो नाही. कारण देवळात प्रवेश करण्यासाठी गाड्यांची प्रचंड लांबलचक लाईन तिथं उभी

होती. दर्शन घेऊन घरी पोचायला रात्रीचे एक-दोन वाजले असते. त्यानंतर आम्ही दुपारी एकदा त्या मंदिरात गेलो होतो. पण देव झोपले होते. त्या वेळी जेवणावळी चालल्या होत्या. गोरे पुरुष धोतर नेसले होते, तर गोऱ्या बायकांनीही साड्या नेसल्या होत्या. आम्ही इंडियातून आलो आहोत, हे त्यांनी आम्हांला लगेचच ओळखलं व आम्हांला धावत येऊन प्रसाद दिला. मधे थोडा वेळ होता, म्हणून तिथंच लहान मुलांकरता असलेल्या छोट्या 'झू'ला आम्ही जाऊन आलो. मुलांना 'झू' मधल्या डुकरांचं फार कौतुक वाटत होतं. भारतात डुकरांना तोटा नसल्यानं आम्हांला हसू आलं. बीना म्हणाली, माझे सासू-सासरे बरोबर असतील, तेव्हा आम्हांला पार्किंग फुकट असतं. कारण ते थोडे डिसेबल आहेत. वृद्धांना बस व रेल्वेत कन्सेशन असतं व वृद्धांना सरकारचा भत्ता मिळतो. लहान मुलांना सुद्धा भत्ता मिळतो व मूल असलेल्या बाईचा घरावर हक्क राहतो. बीना चेष्टेनं म्हणाली,

'मी अतुलला घरातून बाहेर काढू शकते. अतुल मला बाहेर काढू शकत नाही.'

नंतर आम्ही परत 'हरे राम हरे कृष्ण'च्या देवळात गेलो. राम, कृष्ण फुलांच्या हारांनी व बाजूबंद वगैरेंनी नटलेले होतेच, शिवाय पाठीमागे फुलांचे पडदे अत्यंत सुरेख बनवले होते. अत्यंत टपोरी छान नि त्यांतले मोर खुलत्या रंगांचे. लुब्ध होऊन आम्ही किती वेळ तरी त्या विलोभनीय दृश्याला मनात साठवत होतो. राम, सीता, कृष्ण वगैरेंच्या मूर्ती स्वच्छ संगमरवरी दगडाच्या नि देखण्या होत्या. आम्ही परत निघालो, तो परत एक धोतर नेसलेला गोरा शिष्य धावत पळत आमच्याशी आला व प्रसाद आणतो, म्हणाला. तीन ताटल्या भरून सफरचंद, संत्री, केळी वगैरेंचे तुकडे त्यानं दिले.

## स्कॉटर्स

लंडनमध्ये चोरांचं एवढं प्राबल्य नाही. पण इथला माणूस खरा घाबरतो, ते त्या 'स्कॉटर्स'ना. घराचा दरवाजा उघडा आहे, असं बघून हे स्कॉटर्स पती-पत्नी घरात शिरतात व घरातच राहतात व कायदाही त्यांच्याच बाजूचाच आहे. कायदा म्हणतो, की त्यांना घर नाही, म्हणून ते तुमच्या घरात राहत आहेत. त्यांना घर नाही, तर त्यांनी राहावं कुठं ? ही स्कॉटर्स पती-पत्नी फार हुशार असतात. नवरा कामावर गेला असेल, तर बाई घरातच राहील व बाई घराच्या बाहेर जाईल, तेव्हा नवरा घरात राहील. अशा तऱ्हेनं आपल्या घरात राहण्याचा हक्क ते बजावत असतात. त्यामुळे इंग्लंडमध्ये कुणीही घर उघडं ठेवत नाही.

असं हे लंडन. विविध लोकांना समावून घेणारं नि विविध वस्तूंची आवड असणारं. कला व साहित्याचं तर भांडार इथं आहे. शेक्सपिअर, मिल्टन, स्कॉट, वर्ड्सवर्थ, कोलरिज, बायरन, कीट्स, शेले, टेनिसन, ब्राऊनिंग, डिकन्स असे गाजलेले साहित्यिक ह्या भूमीनं दिले नि त्यांची वागण्याची शिस्त, नियमितपणा वगैरे गुणांना तोड नाही. स्वच्छ, सुंदर नि नीटनेटकं इंग्लंड मनाला भावून जातं.

***

# व्हिक्टोरिया ते डोव्हर रम्य प्रवास

लंडनहून फ्रान्सला जाण्यासाठी आम्ही निघालो. प्रथम व्हिक्टोरिया स्टेशनवरून आगगाडीनं डोव्हरपर्यंत जाऊन मग डोव्हरला बोटीनं कॅले बंदरापर्यंत जाऊन, मग फिरून गाडी, असा आमचा प्रवास होता. युरेल पास भारतातच काढलेला होता.

लंडनला, व्हिक्टोरिया स्टेशनवर गाडीत बसलो. जरा वेळानं उंचनिंच झाडांची गर्द दाटी दिसू लागली. माथेरान वा महाबळेश्वरला दिवाळीच्या दिवसांत गाडीनं जी मजा वाटते, त्याहून अधिक अशी मजा वाटत होती. काही काही वेळा ही झाडं गाडीहून किती तरी उंच असत, केव्हा केव्हा एवढी दाट, उंच नि झाकून टाकणारी झाडं असत, की आपण झाडांच्याच बोगद्यातून जातो आहोत, तसा भास होई. ह्या झाडांमुळं केव्हा केव्हा एवढा अंधार होई, की मग बंद काचेतून आतलीच माणसं बाहेर दिसत. अशा वेळी काचांना डोळे अगदी चिकटवून टाकायचे, की दूर गेलेल्या झाडांशी फिरून गट्टी होते. काही झाडं शिडशिडीत नि वरच्या बाजूला पानांचा डोलारा, तर काही थोडासा बुंधा सोडून सगळीच्या सगळी पानांनी आच्छादित. मध्येच केवढं तरी पसरलेलं लॉन दिसतं. कदाचित शेतमळेही असतील; पण गाडीतून लॉन्स वाटत होती. फिरून मग झाडं आपल्याला भेटायला येतात. काही उंच टेकाडावर आणखीनच उंच होत आकाशाशी गट्टी करणारी. उद्या कोकण रेल्वे होईल, तेव्हा कदाचित असं दृश्य दिसेल, माझ्या मनात आलं.

## अवाढव्य बोट

झाडं अशी लपाछपी करत असतात, तोच डोव्हर स्टेशन येतं. स्टेशनला लागूनच असलेल्या डोव्हर बंदराशी आपण जातो नि अवाढव्य अशा बोटीचा प्लॅटफार्म कधी चालायला लागतो, तेच समजत नाही. मी दोन हॅण्डबॅगा घेऊन पुढं झाले होते. मध्यम बॅग घेऊन स्वाति मागून येत होती. भली थोरली मोठी बॅग बीनाकडेच ठेवली होती. बोटीवरच्या मार्गदर्शकानं माझ्यासहित अगोदर आलेल्या प्रवाशांना उजव्या बाजूनं आत जायला सांगितलं, तर नंतरच्या प्रवाशांना डाव्या बाजूनं आत जायला सांगितलं. स्वाति नंतरच्या समूहात होती. थोडा वेळ मी थांबले, तरी स्वाति खालून येताना दिसेना. एवढी चुकामूक कशी झाली, मला कळेना. जागा अडवायची, की एकमेकांना शोधायचं, मला कळेना. मी मनात चांगलीच गोंधळले. काही कारणानं स्वाति खालीच राहिली तर नाही ? नि मी स्वाति खाली राहिली, म्हणत होते; पण खालीही बोटीचा प्लॅटफॉर्मच होता, हे मला नंतर कळलं. स्वाति प्लॅटफॉर्मच्या दुसऱ्या बाजूनं आत शिरली होती. मी पहिल्या मजल्यावर जागा अडवली नि एका वयस्कर बाईला जागा अडव, म्हणून सांगून स्वातीला शोधायला दुसऱ्या मजल्यावर गेले. 'ए आई' हाक आली नि जीव भांड्यात पडला.

स्वाति म्हणाली,

'दुसऱ्या मजल्यावरून जास्त छान दिसतं. दुसऱ्या मजल्यावर मी जागा अडवतेय्.'

मग आम्ही दुसऱ्या मजल्यावरच थांबलो. नंतर लक्षात आलं, की बसायला जागा चिक्कार

रिकाम्या आहेत. कुणी अंथरूण टाकून चक्क झोपी गेलं होतं, तर कुणी कॉम्प्यूटर खेळत होतं. तर बरेच जण ड्रिंक घेत खाद्यपदार्थांचा समाचार घेत होते. आम्हीही भटकून आलो. टेरेसवरून नयनरम्य समुद्र नि किनाऱ्यावरची दिव्यांची दिवाळी पाहत किती वेळ उभ्या होतो. तर दुसऱ्या बाजूला बोटीच्या मधल्या प्लॅटफॉर्मच्या गाड्या आत येत होत्या.

**कुंकू : लग्नाची खूण ?**

नंतर फिरून आम्ही आमच्या जागांवर बसलो. आमच्या जवळचा स्पॅनिश माणूस खूप बोलका होता. त्याला स्पॅनिश, जर्मन, फ्रेंच, इंग्लिश अशा भाषा येत होत्या. पोर्तुगालची एक बाई शेजारी बसली होती. तिला मात्र इंग्लिश अजिबात येत नव्हतं.

तो स्पॅनिश माणूस दोनदा सिंगापूरला गेला होता; पण भारतात आला नव्हता.

'इतके सिंगापूरपर्यंत आलात, मग भारतात का आला नाहीत ?' मी विचारलं.

'भारतात फार महागाई आहे.. ' तो म्हणाला.

'छे, छे ! युरोपियन लोकांना भारत खूपच स्वस्त आहे.' मी सांगितलं.

एअरपोर्टवरच्या हॉटेलचे दर व एअरपोर्टवरच्या वस्तू पाहूनच तो हबकला होता व भारतात राहणं फार खर्चीक आहे, अशी त्याची कल्पना होती ! हे म्हणजे मद्रासला इडली खूप महाग मिळते, म्हणण्यासारखं होतं. खरं तर, भारतात वस्तू किती स्वस्त मिळते, ह्याची पण जाहिरात व्हायला हवी.

त्या स्पॅनिश माणसानं मला विचारलं,

'हे कुंकू तुम्ही लग्न झाल्यावर लावता ना ?'

मी म्हटलं,

'नाही. माझ्या ह्या मुलीनं कुंकू लावलंय्; पण तिचं लग्न झालेलं नाही. मंगळसूत्र ही आमची लग्नाची खूण आहे...' म्हणत मी माझ्या गळ्यातलं मंगळसूत्र दाखवलं.

त्यावर तो चांगलाच गोंधळला नि म्हणाला,

'मी तर ऐकलं होतं, की इंडियन बाई लग्न झाल्यावर कुंकू लावते व एकदा कुंकू लावल्यावर ती परपुरुषाकडे ढुंकून पाहत नाही.'

मग मी भारतातील विविध प्रांत नि त्यांच्या लग्नातल्या विविध खुणा त्याला सांगितल्या. तेव्हा तो आणखीनच गोंधळला.

कॅलेला बोट थांबेली कनेक्टिंग ट्रेन तिथं उभीच असते.

कॅलेला आम्ही गाडीत बसलो ते लझारे ह्या स्टेशनवर उतरलो.

**भाषेची गट्टी फू**

स्टेशनवर सर्वदूर फ्रेंच पाट्या होत्या. इंग्लिशची नामोनिशाणी नाही. इंग्लिशमध्ये कुणी बोलायला तयार नव्हता. एक तर आम्हांला होस्ट मिळाला नव्हता, त्यात त्या लोकांचं इंग्लिश भाषांशी वैर ! आम्ही चांगल्याच गोंधळून गेलो होतो. लंडनमध्ये ट्रॉली तरी फुकट. इथं तीही विकत. इन्फॉर्मेशन कुठं करायची, ह्याचं उत्तरही कुणी देत नव्हतं. चौकशी कुठं करायची, ते कळलं; पण तिथं भला मोठा क्यू होता. त्या क्यूत उभं राहून माहिती घेण्यात बराच वेळ जाणार

होता. तेवढ्यात ती पोर्तुगालची बाई एका क्यूत उभी होती नि तो क्यू एक्स्चेंजकरता आहे, हे माझ्या लक्षात आलं. तिथं पैसे एक्स्चेंज करून घेतले नि मग आम्ही नो प्रायॉर नोटिस रिक्वायर्डवाल्या होस्टना फोन करायचा प्रयत्न केला. ह्यात फोनमध्ये पाच फ्रँक टाकून फोन केला नि पाच फ्रँक टळले होते. तो होस्ट बाहेर गेला आहे, हे कळलं. पण पैसे परत आलेच नाहीत. तेव्हा खुणा करून एका बाईला किती पैसे लागतात, ते विचारलं. एका फ्रँकमध्येही फोन होऊ शकत होता, म्हणून एक फ्रँक टाकून फोन केला. तिथं मी बराच वेळ बोलले. तरी एक फ्रँकमध्ये काम झालं. लंडनच्या हीथ्रोवर साठ सेंट टाकले होते. तेव्हा कुंदा कारखानीस म्हणाली होती, की आमच्या इथं वेळेवर फोनचे पैसे ठरलेले असतात. साठ सेंटएवढं तू बोलली असशील; म्हणून तुझे पैसे परत आले नाहीत. पण इथं पाच फ्रँक टाकले होते व एकच वाक्य बोलले, तरीही पैसे परत आले नाहीत. मग माहिती मिळाली, की इथल्या सगळ्याच फोनमधून पैसे परत येत नाहीत. पाच फ्रँक टाकले असतील, तर तेवढा वेळ होईपर्यंत, तुम्ही तीन-चार फोन त्या पाच फ्रँकमध्ये करू शकता. तेव्हा 'युरोपमध्ये फोनमध्ये पैसे टाकले, की उरलेले पैसे नेहमी परत येतात', असं सांगणाऱ्या फॉरेन रिटर्न्ड बाईला मी मनातल्या मनात थोबाडीत दिली. म्हणजे, फॉरेन रिटर्न्ड लोक व तिथं वास्तव्य करणारी माणसं; तिथल्या प्रत्येक गोष्टीत तज्ज्ञ असतात, असं समजण्याची जरुरी नाही. अर्ध्या हळकुंडानं पिवळी होणारी ही जमात असते. मग आम्ही ठरवलं, की यापुढं कुठल्याही देशात गेलं, तरी जेवढी जरुरी आहेत, तेवढीच नाणी फोनमध्ये टाकायची नि फोन करायचा. खूप प्रयत्न करूनही आम्हांला एकाचाही फोन लागला नाही. अगोदर होस्टना पाठवलेल्या पत्रांची पण उत्तरं आली नव्हती. मग आम्ही हॉटेलात उतरायचं ठरवलं.

हॉटेलात खाणं-पिणं झाल्यावर तिथल्या हॉटेल रिसेप्शनिस्टला फ्रान्सविषयी माहिती विचारली. तिनं फ्रान्सचा मॅप दिला व कसं जायचं, ते नीट समजावून सांगितलं. हॉटेलची लोकं छान इंग्लिश बोलतात. पण स्टेशनवर तोच गोंधळ. कोणीही 'तिकीट खिडकी' सांगायला तयार नाही. साऱ्यांचे चेहरे निर्विकार. ही सारी मंडळी मुकी-बहिरी असावी, अशी शंका आली. मात्र हॉटेलवाल्यानं टूरचे पत्ते, महत्त्वाच्या गोष्टी कुठं आहेत, हे सांगून पॅरिस शहराचा नकाशा दिला होता. फ्रान्समध्ये सर्व हॉटेलमधल्या रिसेप्शनिस्टना उत्तम इंग्लिश बोलता येतं कारण त्यांना गिऱ्हाइकांची जरुरी असते.

पुढं आम्ही स्वित्झर्लंडला गेलो, तेव्हा तिथले आमचे हॅन्स पीटर नावाचे होस्ट सांगत होते, की गाडी स्वित्झर्लंडमधून जाते, तेव्हा गाडीतल्या गार्डला, स्विस-जर्मन वा इंग्लिश उत्तम बोलता येतं; पण फ्रान्स सरहद्द सुरू होते, तेव्हा त्याला फ्रेंच भाषेशिवाय कोणतीही भाषा येत नाही. (ही म्हणजे आपल्या दाक्षिणात्य बांधवांची कार्बन कॉपीच दिसते. माझ्या मनात आलं.)

## डु यू नो इंग्लिश ?

शेवटी 'चौकशी'च्या रांगेत उभं राहून तिकीट कुठं काढायचं, हे आम्ही विचारून आलो. निघायच्या आधी जरूर तेवढी फ्रेंच वाक्यं पाठ करायचं ठरवलं होतं; पण आमचे फ्रेंच उच्चार

त्यांना समजले असते का ? अकरा वर्षं इंग्लिश शिकूनही आपले उच्चार समजतील का ? ही धास्ती असतेच. मग फ्रेंचच्या उच्चारांचं काय ? (आशा भोसले, म्हणे, मराठी बोलली नि फ्रेंच माणसांना ते कळलं. तोही प्रयोग केला, पण चेहरे पुतळ्यांसारखे निर्विकार!) लंडनमध्ये 'गॉड' म्हणायचं, तर अमेरिकेत 'गाद' म्हणावं लागतं. लंडनमध्ये सायकीॲट्रिस म्हणायचं, तर अमेरिकेत 'सकांयट्रीस' म्हणतात. फ्रेंचमध्येही उच्चारांची अशी विविधता असेल, तर ? शेवटी तिकीट एकदाचं मिळालं. पण आयफेल पाहण्यासाठी कोणत्या ट्रेननं कसं जायचं, ते समजेना. एका म्हाताऱ्या बाईला इंग्लिश येत होतं, तर ट्रेनची तिला माहिती नव्हती. आम्हांला गोऱ्या रंगाची माणसं असलेल्या तामीळनाडूत गेल्यासारखं वाटलं. यात्रा कंपनीतून दक्षिण यात्रा सहलीला गेले होते, तरीही हॉटेलात गरम पाणी मिळताना त्रास झाला होता. हॉटेलच्या पोरांना नीटसं इंग्लिश कळत नव्हतं आणि हिंदी बोलायची इच्छा नव्हती. (मात्र त्यामुळं तामीळ टिकून आहे. मराठी भाषेचा लोप होत आहे.) फ्रान्स हाही गोरा तामीळनाडू आहे. आम्ही मग, रिसेप्शनिस्टनं दिलेल्या मॅपवरचा आयफेल टॉवर दाखवायचो व तिथं कोणती गाडी जाते, हे ख़ाणाखुणा करून विचारीत होतो. बऱ्याच जणांना आम्ही काय विचारतोय् ते, समजत नव्हतं. मग कॉलेजमध्ये जाणाऱ्या मुलीनं हाती मॅप घेतला व विचारलं,

'डु यू नो इंग्लिश ?'

'ओ, येस्!' अगदी आनंदात आम्ही म्हणालो.

एखाद्या फ्रेंच माणसाला इंग्लिश येणं हे लॉटरी लागण्यासारखं आनंददायी होतं. त्यामुळं आमचे चेहरे खुलले. त्या मुलीनं इंग्लिशमध्ये, मॅप आम्हांला नीट समजावून सांगितला. त्यानंतर फ्रेंचमध्ये आम्हांला कोणतीच अडचण आली नाही.

मॅप पाहून सारा फ्रान्स फिरणं मुळीच अवघड नाही. ही गोष्ट पुढं मी जाऊबाईंना सांगितली, तेव्हा त्या म्हणाल्या,

'बघ, घरून निघताना गणपतीला नमस्कार केलास. त्यानंच त्या मुलीला तुमच्याकडे धाडली.'

• समोर उकडीचे मोदक होते. ते पाहून, आदल्या दिवशी मी सेंट पॉल चर्च, लंडन इथंही भेट दिली होती, हे त्यांना सांगितलं नाही.

## आयफेल टॉवर

पॅरिस ही फ्रान्सची राजधानी आहे. तिथंच हा आयफेल टॉवर आहे. स्टेशनवर 'आयफेल टॉवर' हा बोर्ड दिसतो. त्या बोर्डावर खूण केलेल्या बाणाच्या दिशेनं आम्ही बाहेर पडलो. खाणाखुणांच्या जागतिक भाषेत एकाला 'आयफेल टॉवर' कुठंय्, असं विचारलं. तर तो पटकन् म्हणाला,

'आय् नो ओन्ली इंग्लिश.'

आमचे कान फिरून तृप्त झाले.

स्वाति पटकन म्हणाली,.

'असं बोलणारा एक तरी मनुष्य भेटला, ह्याचा खूप आनंद झाला.'

यावर आम्ही तिघंही हसलो. तो माणूस मेक्सिकन होता.

स्टेशनबाहेर डाव्या बाजूला गेलं, की लगेचच 'आयफेल टॉवर' दिसतो. लांबून आयफेल टॉवर अगदीच फालतू दिसत होता. ह्या लोखंडी सांगाड्यात पाहण्यासारखं तरी काय आहे ? असं वाटून मनाचा विरस झाला. टॉवरकडे जाताना लागणारे डाव्या व उजव्या बाजूच्या बागा, एका ओळीत असलेली झाडं, पाच-सात कारंज्यांतून उडणारं इंद्रधनुषी पाणी, ह्याचचं वैभव किती तरी छान दिसत होतं.

सातव्या एडवर्डनं १० जून, १८८९ मधे ह्या आयफेलचं उद्घाटन केलं. त्या वेळी पॅरिसमध्ये जागतिक प्रदर्शन भरलं होतं; म्हणून हा उभारला गेला होता. दहा वर्षांनी पॅरिसमधल्या लोकांना वाटू लागलं, की ह्या लोखंडी मनोऱ्यात काहीच सौंदर्य नाही. तेव्हा तो पाडून टाकावा. १२००० धातूच्या पट्ट्या नि २५००,००० रिव्हेट ह्या मनोऱ्यातून हाती आले असते. पण वैज्ञानिकांनी रेडिओ आणि वायरलेससाठी हा मनोरा तसाच ठेवला. पण नंतर ह्याच मनोऱ्यावरून फ्रेंच वैज्ञानिकांनी जर्मनांचे रेडिओ संदेश निकामी केले व अशा तऱ्हेनं आयफेल उपयुक्त ठरला. आयफेल टॉवर स्वत: देखणा नसला, तरी ९८५ फूट उंच असलेल्या ह्या आयफेल टॉवरवर गेलं, की आजूबाजूची दृश्यं फार विलोभनीय दिसतात. पहिला मजला व दुसरा मजला अशी दोन तऱ्हेची तिकिटं मिळतात. आम्ही दुसऱ्या मजल्याचं तिकीट काढलं. पहिल्या मजल्यावर जायला एक लिफ्ट असते, तर नंतर दुसऱ्या मजल्यावर जायला दुसरी लिफ्ट असते. वर गेल्यावर चारी बाजूंची दृश्यं अप्रतिम दिसतात. आत्ताच आम्ही आलो, ते बगीचे एखाद्या रंगीत रांगोळीसारखे दिसत होते. तर एका बाजूनं 'सीन' नदीवरचे ब्रिज नि त्याच्या खालून वाहणारं सीन नदीचं पाणी हे रमणीय दृश्य दिसतं. एका बाजूला गोल्फ क्लब दिसतो. बगीच्याचं दृश्य छान वाटतं, तर तेवढ्यात सीन नदीवरचे पूलच छान दिसताहेत, असं वाटतं. आपण ती दृश्यं आलटून पालटून पाहत राहतो. ते कारंजे, ते बगीचे वगैरे सारी रमणीय दृश्यं आयफेलच्या चारी बाजूंना मुद्दाम निर्माण केली आहेत, असं वाटतं. नदीवरचे हे पूल एका बाजूनं सात वाटतात, तर दुसऱ्या बाजूनं नऊ वाटतात नि मग मनात येतं, कितीही असोत, पण छान वाटतात ! आजूबाजूची दृश्यं मनात साठवण्याचा खेळ सुरू होतो. ओळीत उभी केलेली झाडं. मग त्यांतले हिरवे चौकोन व फुलांची आरास, मध्येच कारंज्यांची वेलबुट्टी तर दुसऱ्या बाजूला सीन नदी, तीवरचे नक्षीदार पूल, मग त्याला मधे छेद देत गेलेला रस्ता. त्यानंतर परत झाडांची पद्धतशीर मांडणी. आयफेल टॉवरबरोबरच ह्या स्वप्निल दृश्याची सुबक मांडणीही त्याच वेळी केली असावी. आयफेल टॉवर काढून टाकला असता, तर ही सुबक मांडणी लक्षातच आली नसती. नुसती एवढीच सुबक मांडणी नाही, तर विमानातून जाताना स्वच्छ आकाश असेल, तर खालच्या प्रदेशाचा नकाशा दिसतो, तसा फ्रान्सचा नकाशा 'आयफेल'वरून दिसत होता. थोडं दूर झाडांच्या लांबच लांब ओळी दिसत होत्या. तो सँझे लिझे रस्ता होता. तर बरंच दूर एक विमानही उडताना दिसलं. तिथून हलूच नयेसं वाटत होतं.

स्टेशनवर जाण्यासाठी, आयफेल टॉवरपासून आम्ही जात होतो. मघाचीच ती सुंदर कारंजी व बगीचे भेटले. ज्यांची एक ओळ होती, तिथं स्विमिंग पूल तयार झाला होता व बाजूला हिरवंगार लॉन. पाण्याचे तुषार अंगावरचे घेत आम्ही लॉनवर बसलो.

## रेड वाईन, व्हाईट वाईन

दोन ते पाचच्या गायडिंग टूरमध्ये आम्ही सामील झालो. आमची गाईड दिसायला गोड व मिस्किल होती. ती सांगत होती, की फ्रान्स म्हणजे फक्त 'आयफेल टॉवर' व 'नात्रदाम' नाही, ते आम्ही दाखवूच; पण फ्रान्स हे वाईनकरताही प्रसिद्ध आहे. फ्रान्समध्ये मोठ्या प्रमाणात वाईनची निर्मिती होते. त्याचप्रमाणे फ्रान्समध्ये वाईनचा आस्वाद विपुलतेनं घेतला जातो. फ्रेंच वाईनसारखी चव इतरत्र होणाऱ्या वाईनला नाही. 'फ्रेंच वाईनशिवाय जेवणं म्हणजे सूर्याशिवाय दिवस.' असा फ्रान्समध्ये वाक्प्रचार आहे. ड्रिंक घेण्याची आवड असेल नि नवीनच घेणारा असेल, तर त्यानं फ्रेंच वाईन घ्यावी, असं म्हटलं जातं. गोव्यात असताना गाईड फेणीचं जसं वर्णन करतात, त्याप्रमाणे आमचे गाईड फ्रेंच वाईनचं कौतुक सांगत होती. बरगंडी, बोर्डेस व ऱ्हाईन व्हॅली इथून उत्तम प्रकारची वाईन फ्रान्समध्ये येते. वास्तविक 'ऱ्हाईन वाईन' ही जर्मनीत. ऱ्हाईन खोऱ्यातली. ती फ्रान्समध्ये आल्यानंतर मात्र फ्रान्सची उत्तम वाईन होते, की काय ? ह्यातही पांढरी (व्हाईट) वाईन व लाल (रेड) वाईन असे वाईनचे प्रकार असतात. रेड वाईन, रेड मटनाबरोबर घेतात व पांढरी वाईन सी फूड आणि पांढऱ्या मटनाबरोबर घेतात, अशी ही खाण्याची पद्धतही तिनं सांगितली.

खाण्याचे विविध प्रकार पॅरिसमध्ये मिळतात. पॅरिसमधल्या बऱ्याच रेस्टॉरंटमध्ये त्यांचा खास पदार्थ, म्हणून तो पदार्थ लाल रंगात लिहिलेला असतो. हा पदार्थ म्हणजे तिथल्या प्रमुख शेफचं आचाऱ्याचं खास कौशल्यं असतं नि त्याचा, त्या शेफला फार अभिमान वाटतो.

गाईचं मांस, कोकरू आणि कोंबडी हे फ्रान्समधलं खास वैशिष्ट्य, त्याचप्रमाणे सीफूड म्हणजे समुद्रातील अन्नासाठी फ्रान्स प्रसिद्ध आहे. फ्रेंचऑस्टर (फ्रेंच-कालवं) फार प्रसिद्ध आहेत. अर्धउघडया शिंपल्यांतून हे ऑस्टर, लेमनबरोबर टेबलावर ठेवले जातात. मुळात पॅरी ह्याचा अर्थ कोळी लोकं. पॅरिस म्हणजे ह्या कोळी लोकांचं बेट (Insland) पॅरिसमध्ये उत्तम प्रतीचे मासे मिळतात. फ्रेंच पदार्थांची साऱ्या पाश्चात्त्य जगतात वाहवा केली जाते. तुम्ही खास खाणारे नसाल, तरीही फ्रेंच अन्न खाताना तुम्ही तुमचा वेळ अतिशय आनंदात घालवाल, असं ती गोड मुलगी सांगत होती. अगदी साध्या साध्या रेस्टॉरंटमधलं अन्नही चविष्ट असतं, म्हणे. पॅरिसच्या रेस्टॉरंटमध्ये मिळणारी फळं, चीज व बटर सुद्धा ताजी असतात. फळं सकाळीच शेतावरून आणलेली असतात. गाईडच्या बोलण्यावरून फ्रान्स हा देश खाण्यात नितांत महत्त्व देणारा दिसला. थोडक्यात आपल्या इथल्या गुजरात्यांसारखे फ्रेंच लोक खादाड असतात. मात्र पोट मोठं असणं हा गुजरात्यांचा मूलभूत हक्क आहे.

दुपारी हिंडताना, रेस्टॉरंट, कॅफे तुडुंब भरलेली दिसतात. फ्रान्समध्ये आमच्यासारख्या दक्ष गृहिणी नसाव्या.

काही उंची रेस्टॉरंट्स राजवाड्यासारखी सजवलेली होती. काही ठिकाणी सीलिंग सरकवताही येतं. काही ठिकाणी सीलिंगलाच निळ्या आकाशाचा रंग दिलेला असतो. रिट्झ, क्रीलॉन ब्रिस्टॉल, जॉर्ज फाय, फ्री डी गॅलेस, प्लाझा ॲथीन, रॉफेल अशी मोठ-मोठी उंची हॉटेल्स इथं प्रसिद्ध आहेत. दीडशे ते दान अडीचशेच्या वर खोल्या प्रत्येक हॉटेलमध्ये असतात. क्रीलॉन हे बादशाही हॉटेल हे कॉंकार्ड ह्या भल्या मोठ्या राजरस्त्यावर आहे. तर रिट्स ह्या

हॉटेलमध्ये गिऱ्हाइकांइतकीच तिथल्या कर्मचाऱ्यांची संख्या आहे. तर ब्रिस्टॉल हे हॉटेल भव्य अशा अँटीक्सनी सजलेलं आहे.रिट्स क्रीलॉनच्या साधारण मध्यावर मोराईस हे हॉटेल आहे. इथं बरेच राजे लोक राहून गेले आहेत, हे ह्या हॉटेलचं वैशिष्ट्य.

## आर्क द ट्रायंफ

नेपोलियन बोनापार्ट हे नाव फ्रेंच लोकांच्या हृदयसिंहासनावर विराजमान झालेलं आहे. महाराष्ट्रात शिवाजीचं जे स्थान, ते फ्रान्समध्ये नेपोलियनचं. 'चार्ल्स द गॉल' हा इथला सर्वात गजबजलेला रस्ता. इथं आपल्याला 'आर्क द ट्रायंफ' ही कमान दिसते. नेपोलियन एल्बा बेटावरून सुटून आला, तेव्हा फ्रेंच जनतेनं त्याचं अपरंपार प्रेमानं स्वागत केलं व नेपोलियनचा सम्राट म्हणून राज्याभिषेक झाला व १८३६ साली १६४ फूट उंचीची, 'आर्क द ट्रायंफ' ही कमान उभारण्यात आली. 'चार्ल्स द गॉल' ह्या चौकात ही कमान उभी आहे. इथून बारा रस्ते एखाद्या किरणांसारखे जातात व मध्यभागी ही आर्क उभी आहे. 'ग्रँड आर्मी' ह्या सैन्यानं मिळवलेल्या दिग्विजयाची ही खूण म्हणून ही विजय कमान उभारली गेली. त्यात काही स्कल्प्चर्स आहेत. त्यांतलं 'मार्सेलिस'हे स्कल्प्चर अत्यंत देखणं आहे. ह्या कमानीवरच नेपोलियनच्या १२८ विजयांची नावे व त्याला सहकार्य देणाऱ्या ६०० लष्करी योद्ध्यांची नावंही कोरलेली आहेत. फ्रान्ससाठी जे धारातीर्थी पडले, अशा अज्ञात वीरांसाठी म्हणून ह्या कमानीच्या खाली एक ज्योत तेवत असते. 'वीरांचं स्मारक' ही पाश्चात्त्य कल्पना आपण आता उचलली आहे. नाही तर 'गतं न शोच्यं' म्हणत हुल्लडबाजी करायला आम्ही मोकळे होत होतो. ह्या चौकाला पूर्वी 'प्लास द इतोली' (प्लेस दी इटली) हे नाव होते.

'आर्क दी ट्रायंफ' पासून 'प्लेस द ला कॉंकर्ड' कडे जाणारा 'सँझे लिझे' रस्ता अत्यंत मनोहर आहे. दुतर्फा असलेल्या झाडांच्या ओळीनं हा रस्ता अत्यंत देखणा झाला आहे. ह्याच रस्त्यावर उंची उंची हॉटेलं, रेस्टारंट्स आहेत. शिवाय निरनिराळी स्टोअर्स, त्यांच्या बाहेरच्या तावदानांतून ठेवलेल्या नीटनेटक्या वस्तू व गिऱ्हाइकांनी हा रस्ता शानदार वाटतो.

## प्लेस दला कॉंकर्ड

'प्लेस द ला कॉंकर्ड' हा पॅरिसमधला सर्वात मोठा चौक आहे. ८५ हजार चौरस यार्ड अशी ह्या चौकाची व्याप्ती आहे. चौकाच्या मध्यभागी इजिप्तमधील दोनशे टन वजनाची दगडी सुई आहे. हे साडे तीनहजार वर्षांपूर्वीचं जुन्या इजिप्तचं स्मारक आहे. १८३६ साली लुईस फिलिप हा राज्य करीत असताना हे उभारलं गेलं. ह्या स्मारकाजवळ पाण्याची सुंदर कारंजी आहेत. त्याभोवती फ्रान्समधील आठ महत्त्वाच्या शहरांची प्रतीकं म्हणून स्त्रियांचे दगडी आठ पुतळे आहेत. उन्हाळा असल्यानं दिव्यांची रोशणाई केली होती. (दिव्यांच्या रोशणाईत हा एखाद्या देदीप्यमान राजवाड्यासारखा वाटतो) चेव्ह द मार्हे नावाची उडत्या घोड्यांनी सजलेली वास्तू 'चॅम्प इलीस' ह्या प्रवेशद्वाराशीच आहे. इतका सुंदर असलेला हा चौक पूर्वी रक्ताळलेला होता. फ्रेंच राज्यक्रांतीच्या वेळी, क्रांतिकारकांनी सोळावा लुई, मेरी अन्टोनिएट व १३४० सरदार-

दरकदारांची मुंडकी गिलोटीनखाली धडावेगळी केली, ती ह्याच रस्त्यावर. सोळाव्या लुईचा गिलोटीनखाली शिरच्छेद केला, तो आठ पुतळ्यांपैकी एका सुंदर पुतळ्यासमोर.

थोडं पुढं चाललं, की 'तुलेरिस गार्डन' दिसतात. कॅरोसल कमानीच्या पुढं अलीकडं पंख असलेल्या आठ घोड्यांची कासेव्हाक्स ही वास्तू दिसते, तर बाजूला कॅरोसल कमानीच्या पुढं 'रू रॉयल ' ही अठराव्या शतकातली ग्राब्रेल ह्यानं डिझाईन केलेली एक देखणी वास्तू दिसते. त्याच्याच जवळ फ्रेंच नौदल मंत्रालयाची इमारत आहे. इथंच क्रीलॉन हॉटेल आहे. इथचं जवळ मॅडलीन चर्च-ही दिसतं. हे पण अठराव्या शतकातीलच चर्च आहे. ही साधी पांढरे शुभ्र खांब असलेली व उभट इमारत आहे. इथं संगीताचे कार्यक्रम होतात.

हा सारा परिसर अत्यंत देखणा आहे. हा सारा परिसर पाहताना पॅरिस हे जगातलं देखणं शहर आहे, असं वाटू लागतं; पण ह्याच रस्त्यावर जगातलं भीषण क्रौर्य झालं; हे सांगूनही पटत नाही; इतका आता हा पॅरिसमधला भाग पाहत राहावा, असा नेत्रदीपक आहे. ही एक एक वास्तू जशी सुरेख आहे, त्याचप्रमाणे त्याचं एकत्रित डिझाईन आकृतिबंध सुद्धा (Perspevtive) अत्यंत सुंदर असा आहे. हा पॅरिसमधला अत्यंत देखणा भाग आहे. हा भाग परत परत पाहत राहावा, असं वाटत राहतं.

## राजप्रासाद

नंतर आम्ही फ्रान्सचा राजप्रासाद पाहायला गेलो. 'हॉटेल द इन्व्हॅलिड्स' नाव ऐकून आपण आणखी एका हॉटेलात आलो आहोत, असं वाटलं. कारण इथली हॉटेल्स सुद्धा भव्य, देखणी नि दिमाखदार आहेत. तेव्हा हे आणखी एक हॉटेल असावं व राजप्रसाद नंतर दाखवतील, असं वाटलं. पण हे सारं क्षणात मनात आलं नि आमच्या गाईडनं हे राजप्रासादाचंच नाव आहे, असं सांगितलं. चौदाव्या लुईनं ही सुंदर वास्तू बांधली. अपंग (इन्व्हॅलिड्स) सैनिकांना राहण्यासाठी ही वास्तू बांधल्यानं 'हॉटेल द इन्व्हॅलिड्स' हे नाव चर्चला आहे. ह्याचा डोम सोनेरी आहे. इथंच लष्करी वस्तुसंग्रहालय आहे. अश्मयुगातील दगडी हत्यारापासून आजपर्यंच्या क्षेपणास्त्रांचा समावेशही ह्या वस्तुसंग्रहात आहे. नेपोलियनचा पलंगही इथं पाहायला मिळतो. त्यावर नेपोलियनचं निधन झालं. हे जगातील मोठं लष्करी वस्तुसंग्रहालय होय. नेपोलियन बोनापार्टची शस्त्रं पण इथं आहेत. इथंच नेपोलियनचं स्मारक आहे. मध्यभागी हिरव्या ग्रानाईटचा चबुतरा आहे व त्यावर ग्रानाईटच्या लाल कॉफिनमध्ये नेपोलियनचे अवशेष ठेवलेले आहेत.

नेपोलियनच्या स्मारकासमोरच्याच बाजूला 'पँथिऑन' ही भव्य इमारत लागते. इथंच इमिल ह्या लोकशाहीच्या प्रमुखाचे अवशेष ठेवण्यात आले आहेत. व्हिक्टर ह्यूगो, रूसो ह्या थोर लेखकांचे अवशेषही ह्या पॅन्थिऑनमध्ये आहेत. शेजारीच युनेस्कोची देखणी इमारत आहे.

गाईडनं वाईन, बीफ, सीफूड वगैरे गोष्टींचं रसाळ वर्णन करूनही आमच्यावर त्याचा काही परिणाम झाला नाही. तिचं आमच्यापुढं असं वर्णन करणं म्हणजे रामदासांसमोर सुंदर स्त्रियांचं वर्णन करण्यासारखं होतं.

'मायकेल स्क्वेअर' मध्ये सेंट मायकेलचा स्टॅच्यू दिसतो. तो फार सुंदर दिसतो. त्याला

दोन पंख आहेत व तो ड्रॅगनला मारतोय् व दुसऱ्या बाजूनं पाणी वाहतंय्.

थोड्या वेळानं आम्ही 'जुओनोश स्टॅच्यू' पाहिला. घोड्यावर बसलेल्या 'जोन ऑफ आर्क'चा सोनेरी स्टॅच्यू १४३१ मध्ये तिला पुरलं गेलं. ती मेली, तेव्हा तिच्या शरीराची राख झाली होती, तरी तिचं हृदय धकधकत होतं. (ह्या ह्यांच्या खऱ्या कथा ! आमच्या पुराणातल्या मात्र भाकडकथा !)

ड्रिंक आणि माशांच्या विविध जातींविषयी ऐकून मी स्वातीला विचारलं,

'तुला ड्रिंक घ्यावं वाटतंय् का ? किंवा बीफ वा सी फूड खायचंय् का ? घे ना, हवं असलं, तर !'

तिनं नाक मुरडलं नि ती म्हणाली,

'नको. त्यापेक्षा हॉटेलवर जाऊन आपण आपली पुरणपोळीच खाऊ.'

तेव्हा मी हसून म्हटलं,

'काय आपण ! फ्रान्समध्ये नि पुरणपोळी !'

'आपण आपले गणपतीच्या वंशातले, म्हणून शेवटी आपल्याला आवडेल, तेच आपण खावं', स्वाति म्हणाली.

पुढं इटलीत वा अमेरिकेत साध्या कोबीच्या वा बटाट्याच्या भाजीवर ती लोकं तुटून पडलेली पाहिली, तेव्हा आता मनात येतं, फ्रान्समध्ये खरोखरीच कुणी पुरणपोळी खाऊ घातली, तर तिथली लोकं पुरणपोळीवर नक्कीच तुटून पडतील. शेवटी भटजी लोकांना श्रीखंड, नाही तर पुरणपोळीच आवडणार, असं कुणी म्हणेल. म्हणू देत बापडे.

## नात्रदाम

नात्रदाम हा चर्च अतिभव्य आणि देखणा आहे. ह्याच्या खिडक्यांचं ग्लास पेंटिंग अतिशय देखणं आहे. ह्या काचांची काढघाल करता येते. हे तंत्रज्ञान कोलनहून (इटली) आलं. प्रवेशद्वाराच्या बाजूच्या भिंती जास्त कलात्मक आहेत. त्यातील स्कल्प्चर नितांतसुंदर आहे. ह्या चर्चची उभारणी गॉथिक पद्धतीची आहे. कोलनचा-जर्मनीतील 'डॉम कॅथेड्रल' हा चर्च, ह्याहूनही उंच आहे; पण 'नात्रदाम' जास्त कलात्मक आहे. आतील व्हर्जिन मदरची मूर्ती भव्य आहे. व्हर्जिन मदरच्या डोळ्यांमागचा प्रकाशगोल एकतीस फूट व्यासाचा आहे. चर्चला वर जाण्यासाठी ३८७ पायऱ्या आहेत. पायऱ्या चढून वर गेलं, की आजूबाजूचा परिसर दिसतो. पण असं म्हणतात, की 'आयफेल'प्रमाणे आजूबाजूचा परिसर कलात्मक नाही. सीन नदी मात्र दोन्ही अंगांनी दिसत असते. ह्या भव्य इमारतीवर 'गॉगाईन्स'चे पुतळे अति कुरूप वाटतात. दुष्टांना घाबरविण्यासाठी, म्हणे, ह्या पुतळ्यांची निर्मिती ! 'पुतळ्यांना सुद्धा घाबरणारा माणूस दुष्ट कसा असेल ?' एकानं प्रश्न विचारला.

तेव्हा आमची गाईड हसून म्हणाली,

'फ्रान्समधली दुष्ट माणसं सुद्धा भाबडी असतात.'

माझ्या मनात आलं, की शॉगाईक्सचे पुतळे दिल्लीत उभे करायला हवेत. कारण तिथंही

लोकसभेची व राज्यसभेची अशीच भाबडी माणसं राहतात.

नंतर आमची गाईड म्हणाली, की फ्रान्समध्ये आल्यावर 'लुडो' हा प्रत्येकानं पाहायलाच हवा. तिकिटाचं रिझर्व्हेशन आम्ही करून देऊ. आमचे कलाकार छतातून आयफेल टॉवरवरून येतील किंवा पारदर्शक पाण्याचा टब स्टेजमधून वर येईल व त्यातल्या माशाबरोबर स्त्री-कलाकार खेळेल. अथवा बर्फाच्या पर्वतावरून स्केटिंग करत कलाकार येतील किंवा पाण्याच्या धबधब्यातून त्या येतील. मग कुठलाही शो तुम्हांला खूप आवडेल.

ती इतकं गोड बोलत होती; पण का, कोण जाणे, 'लुडो' पाहावं, असं वाटतच नव्हतं. मी स्वातीला विचारलं,

'लुडो पाहण्यासाठी तिकिटं रिझर्व्ह करायची का ?'

'मला कंटाळा आलाय्. तुझी इच्छा असेल, तर जाऊ...' स्वाति कंटाळत म्हणाली.

'काही तरीच !' मी तिला उडवत म्हणाले.

## फ्रेंच पुरुष

तिथल्या स्टेशनशी आलो, तेव्हा एक बाई स्टेशनवर नाचत होती. अनेक पुरुष, घरी जायची धांदल नसल्यासारखे, तिच्याभोवती घोळका करून उभे होते. ती बाई बेताचंच नाचत होती; पण पुरुषांचा उत्साह उदंड होता. पुरुषांच्या नजरा पाहून इथं लुडोला इतकं महत्त्व का, ते लक्षात आलं. किंचित झाकलेली स्त्री दाखवणं महत्त्वाचं. पैशाचा ओघ वाहिला, की मग त्यात थोडी कलात्मकता आणली जाते व परंपरेचं नाव चिकटवलं, की त्याला सोवळ्याच्या मुकट्याचं पावित्र्य येतं.

फ्रान्स हा परफ्यूम्सकरता फार प्रसिद्ध आहे. हे चौदावा लुई ह्या राजपुत्राचं जन्मस्थान. हा चौदावा लुई रोज आंघोळ करायचा नाही. तो केव्हा केव्हा इतके दिवस आंघोळ करायचा नाही, की त्याच्या शरीराला घामट वास येई. त्या वेळी तिथल्या दरबारातील एक हुशार माणसानं परफ्यूम्स तयार केले. तेव्हापासून फ्रान्सचा परफ्यूम प्रसिद्ध आहे. जवळ जवळ फक्त परफ्यूमचंच दुकान असावं, तशीही दुकानं दिसतात. परफ्यूम टेस्ट करतानाच आपलं शरीर अनेक परफ्यूम्सनी सुगंधित होतं.

लझारे स्टेशनवर आलो, तो तिथं झाडूवाल्यांची उच्च स्वरात भांडणं चालली होती. स्टेशनवरून रस्त्यावर आलो, तो दोघं पुरुष जोरजोरात आवाज करीत भांडत होते. लंडनपेक्षा हे चित्र एकदम वेगळं वाटतं. मला वाटतं; फ्रेंच लोकांना संध्याकाळ झाली, की भांडणाचं, नाचण्याचं असं उत्साहाचं वारं संचारतं.

## फ्रान्समध्ये हिंदी

आज 'लूव्हर म्युझिअम', 'बाय द बलोन'हा भला थोरला बगीचा व 'कॉन्सीजरी' ही ठिकाणं पाहायची ठरलं होतं. हॉटेलातल्या रिसेप्शनिस्टकडून ती ठिकाणं कशी शोधायची, ते नीट समजावून घेतलं. आजही एक दिवसाचं तिकीट काढलं. ते तिकीट रेल्वे व बस दोन्हींतही

चालतं. लूव्हर ह्या स्टेशनावर उतरलो व सफरचंद दिसली, म्हणून भाव विचारला. भाव जरा चढाच होता व खरं म्हणजे, ती सफरचंद नव्हतीच.

मी स्वातीला म्हणाले,

'ही सफरचंदं नाहीत नि आवडली नाहीत, तर फुकट पैसे जायचे.'

असं मी म्हणाले नि आम्ही निघालोच.

'जरा ठहरिये...' तो फ्रूटवाला म्हणाला, नि आम्ही थबकलोच. जिथं इंग्लिश शब्द कानी पडणं मुश्किल, त्या फ्रान्स शहरात आम्ही चक्क हिंदी वाक्य ऐकलं ! आम्ही माघारी फिरलो.

तो फळवाला म्हणाला,

'ये लेके जाईये.' •

'फार महाग आहेत. नि कोणती फळं, तेही माहीत नाही.'

तेव्हा तो म्हणाला,

'ह्याला नेक्टरीन म्हणतात. बऱ्याच वर्षांनी मला इंडियन भेटत आहेत. मी तुम्हांला ही फुकटच देणार आहे.'

त्यानं पाच-सहा नेक्टरीन प्लॅस्टिक पिशवीत घालून दिली.

नेक्टरीन मिळाल्यानं आनंद झालाच; पण एक भारतीय मनुष्य फ्रान्समध्ये आपला जम बसवतोय्, ह्याचा आनंद अधिक वाटला, म्हणून आम्ही कौतुकानं पैसे देऊ लागलो. तेव्हा तो म्हणाला,

'पैसा मत दीजिये..... इंडिया के लोगों के खातिर मैं इतना तो कर सकूँ...'

भारतीयांविषयी इतकं प्रेम वाटणाऱ्या ह्या परदेशीय भारतीयांना, भारताविषयी प्रेम नाही, असं आम्ही म्हणतो, कारण स्मगलर, आतंकवादी वगैरे फार फार प्रेमळ माणसं भारतावर खूप खूप प्रेम करतात व भारतात राहतात.

'बहोत धन्यवाद' म्हणत मी आम्ही त्याचे आभार मानले व 'लूव्हर' म्यूझियम पाहायला निघालो.

## लूव्हर म्यूझिअम

लूव्हर ह्या स्टेशनावर आम्ही उतरून मग लूव्हर म्यूझिअमशी गेलो. हा एखादा राजवाडा आहे, हे लगेचच लक्षात येतं. जगातला हा सर्वांत मोठा राजवाडा, की ज्याचं आता म्यूझिअममध्ये रूपांतर झालं आहे. ह्या राजवाड्यात तेराव्या शतकापासून फ्रान्सच्या राजघराण्यांनी वास्तव्य केलं. नेपोलियन पण ह्या राजवाड्यात राहत होता. फ्रेंच राज्यक्रांतीनंतर ह्या राजवाड्याचं म्यूझिअममध्ये रूपांतर झालं. ह्या म्यूझिअममध्ये जागतिक कीर्तीच्या अडीच लक्ष वस्तू आहेत. आपल्या इथं मात्र 'संस्थान खालसा झालं, तेव्हा राजवाड्यातील बऱ्याच वस्तू नाहीशा झाल्या', असं विजयाराजे शिंदे ह्यांनी लिहिलं आहे. ह्या वस्तू त्या वेळच्या अधिकाऱ्यांच्या घरी गेल्या ! असं आहे आपलं थोर थोर सरकार ! आणि भारतावर प्रेम करणारे प्रेमळ अधिकारी.

ह्या वस्तुसंग्रहालयात लिओनार्दो द व्हिन्सी ह्या थोर चित्रकाराचं 'मोनालिसा' हे जगप्रसिद्ध चित्र आहे. ह्या चित्रात पुरुषी वाटणारी ही बाई कौतुकाचा विषय का झाली, हे मला अजूनपर्यंत

समजलेलं नाही. तिचं ओठांच्या कोपऱ्यांतलं हास्य चांगलं आहे, पण बाई छान वाटायला नको ? कुणी, हे चित्र लिआनार्दो द व्हिन्सीचंच आहे, म्हणतात. हे तर आणखीनच अजब ! (पुरुष बाईसारखा दिसणं हे फक्त होळीत घडतं ना ?) 'विंग्ड व्हिक्टरी ऑफ साम्रथस' हे विख्यात शिल्प पण इथं दिसतं. 'व्हीनस द मिली' हे शिल्प मात्र खूप आवडलं.

लूव्हर म्यूझियमचे सहा विभाग आहेत. ग्रीक व रोमन ॲन्टीक्स, ओरिएंटल ॲन्टीक्स, इजिप्शिअन ॲन्टीक्स, मध्ययुगीन स्कल्प्चर, कला नि शिल्प यांचं पुनरुज्जीवन झालेली चित्रं व शिल्पं, मध्ययुगीन कलात्मक वस्तू आहेत.

हा वस्तुसंग्रहालय इतका प्रचंड आहे, की दोन-तीन तासांत आपण काय पाहू शकतो, तेच समजत नाही. जगभरच्या प्रसिद्ध चित्रकारांची चित्रं इथं ठेवली आहेत. प्रामुख्यानं ग्रीस, इजिप्त, रोम अशा ठिकाणची निवडक चित्रं व शिल्पं पाहायला मिळतात. मायकेल एंजेलोची चित्रं व शिल्पं इथं ठेवलेली आहेत.

फ्रान्सच्या राजेरजवाड्यांचे विविध मुकुट इथं ठेवलेले आहेत. विविध रत्नांनी युक्त असे हे मुकुट पाहत राहावे, असे आहेत. अर्थात ही रत्नं 'टॉवर ऑफ लंडन' मधल्या मुकुटांतील रत्नांएवढी मोठी नाहीत, पण सावकाशीनं ही रत्नं पाहता येतात. रखवालदाराचा पाठीमागे झक्कू नसतो.

विविध चित्रकार व शिल्पकार ह्या चित्रांचा व शिल्पांचा अभ्यास करण्यासाठी इथं येतात. जॉन व्हॅर्मिनचं 'लेस मेकर', एडगार देगासची 'लॅबसिंथ' व 'आफ्टर दी बाथ' वगैरे चित्रं पण इथं दिसली. एड्गार देगास तर लूव्हर म्यूझिअममध्ये येऊन किती तरी चित्रांची कॉपी करत बसायचा.

निवडक चित्रांच्या व शिल्पांच्या प्रतिकृती इथं विकत मिळतात. युरोपमधील देशांच्या चित्रकलेची प्रगती दाखविणारी सहा हजार चित्रं लूव्हरमध्ये पाहायला मिळतात.

फ्रान्समध्ये लहान-मोठे असे एकंदर नव्वद म्यूझिअम्स आहेत. 'व्हिक्टर ह्यूगोज् हाऊस' हा वस्तुसंग्रहालय तर त्याच्या घरातच आहे. ह्या सर्व म्यूझिअम्सना भरपूर तिकीट असतं आणि फॉरेनर्सना ते परवडतं. आपल्या पुण्याच्या केळकर वस्तुसंग्रहालयानं फॉरेनर्सना थोडं तिकीट वाढवलं, तर आपल्या इथल्या काही लोकांचा जीव उडून एकदम आकाशाला पोचला. श्रीमंत देश व गरीब देश पाहून त्याप्रमाणे तिकीट ठेवावं, हे फॉरेनर्सना पटेल; पण त्यांच्या ह्या प्याद्यांना पटणार नाही.

फ्रान्स हे तऱ्हतऱ्हेच्या सेंट्सचं माहेरघर. इतर देशांत तिथल्या महत्त्वाच्या स्थळांची माहिती असते. फ्रान्समधल्या माहितीपत्रकात, फ्रान्समधल्या विविध वस्तूंच्या डिपार्टमेंटल स्टोअर्सची माहिती असते. पण त्यातही प्रामुख्यानं सेंट्स मिळण्याची ठिकाणं विशेषत्वानं उद्धृत केली आहेत.

लूव्हर म्यूझिअम पाहून झाल्यावर आम्ही 'कॉन्सीजरी' ही वास्तू पाहायला गेलो. 'टॉवर ऑफ लंडन' हा जसा एक भयाण असा तुरुंग होता, तसाच 'कॉन्सीजरी' हा फ्रान्समधला

तुरुंग. फ्रेंच राज्यक्रांतीनंतर बॅस्टीलचा तुरुंग फोडला गेला व त्यानंतर राजबंदी, 'कॉन्सीजरी' ह्या तुरुंगात ठेवले जाऊ लागले व नंतर त्यांना हालहाल करून मारले. सोळावा लुई व मेरी ॲन्टोनिएटला क्रांतिकारकांनी अटक केल्यानंतर ह्याच अंधारकोठडीत ठेवलं होतं. सोळाव्या लुईच्या भावाला ह्याच अंधारकोठडीत ठेवलं होतं व ज्या न्यायाधीशानं त्याला शिक्षा फर्मावली, त्या न्यायाधीशाला लोकांनी इथंच गिलोटीनखाली बळी दिलं. 'थॉमस पेन' ह्या अमेरिकन लेखकानं ह्या अंधारकोठडीतल्या आपल्या आठवणी लिहून ठेवल्या आहेत.

फ्रान्सच्या बरोबर मध्यावरून सीन नदी वाहत असल्यानं जवळजवळ एकतीसहून अधिक पूल या नदीवर आहेत.

फ्रान्स उद्यानासाठी पण प्रसिद्ध आहे. 'बाय दी बलोन' हे अडीच हजार एकरांचं प्रचंड वन आहे. मेट्रोची तीन स्टेशनं ह्याच्याजवळ येतात. एवढं हे अवाढव्य उपवन आहे. एवढ्या ह्या उपवनात दोन सरोवरं आहेत. टेनिस स्टेडियम, लहान मुलांसाठी प्राणिसंग्रहालय, रेससाठी तीन ट्रॅक्स आहेत. इतकं हे अवाढव्य उपवन आहे. इथल्या मोठमोठ्या झाडांमुळं हे एखाद्या अरण्यासारखं वाटतं. बॅगेट पार्कमध्ये गुलाब आणि वॉटर लिलीचं प्रदर्शन होतं. ह्या प्रदर्शनातील मोठमोठे व रंगीत गुलाब पाहून डोळे वेडेखुळे होतात. मुंबईतली गुलाबांची प्रदर्शनं पाहिली होती; पण हे गुलाब म्हणजे एवढे मोठे, की आपल्या इथल्या गुलाबाला बटन गुलाब हे नाव द्यावं. ह्या उपवनात रात्रीच्या सुमारास एकट्या दुकट्या बायकांनी फार वेळ राहू नये, असं ऐकलं असल्यानं संध्याकाळ व्हायच्या आधीच आम्ही मेट्रो गाठली.

इथं कधीही पाहावं, रेस्टारंट्स व कॅफे सदा भरलेले असतात. ही माणसं सदासर्वकाळ काय खात बसतात, तेच कळत नाही. इंग्लिश माणूस सदा धावपळीत, तर फ्रेंच माणूस सदा आरामात असतो.

केसांच्या तर इतक्या नाना तऱ्हा, की पाहताना कोण बाई, नि कोण पुरुष, तेच समजत नाही. बरेच पुरुष लांब केस वाढवून चक्क बो बांधतात. तर काही जण बाकी सर्व डोकं अगदी तुळतुळीत करून मानेच्या वर मद्रासी भटजींसारखं थोडे केस ठेवतात. काही पुरुष महाराष्ट्रातल्या भटजींसारखी शेंडी ठेवतात. मग पण ही शेंडी छान जाड असते व हे मधले केस निळे, पिवळे, आणि लाल असे रंगवलेलेही दिसले. बायका मात्र सगळ्या बॉयकट् वा बॉबकट् केलेल्या. जीन्स घालणाऱ्या होत्या. काही पुरुष अत्यंत नाजूक असतात नि केस वाढवून बो बांधतात. छातीवरून ओळखावं, तर काही बायका सपाट छातीच्याही असतात. त्यामुळं स्त्री-पुरुष ओळखणं जड जातं!

## बर्न आणि बॉन, एक गोंधळ

दुसऱ्या दिवशी स्वित्झर्लंडला प्रयाण करायचं होतं, म्हणून लवकरच झोपी गेलो. असं ठरवलं खरं, पण दुसऱ्या दिवशीच स्वित्झर्लंडला पोचायचा योग नव्हता.

लझारे स्टेशनवर प्रथम आम्ही आलो, त्या वेळी एक गुजराती जोडपं आम्हांला भेटलं होतं

श्री-प्र.वा

व लझारेवरूनच, स्वित्झर्लंडला जायला डायरेक्ट ट्रेन आहे, असं तो गुजराती मनुष्य म्हणाला होता, म्हणून आम्ही अगदी आरामात होतो. तोंड धुऊन, कॉफी वगैरे पिऊन आम्ही जवळच असलेल्या लझारे स्टेशनवर गेलो. इन्फर्मेशनच्या लायनीत गाडी केव्हा सुटते, हे विचारण्यासाठी गेलो, तेव्हा इन्फर्मेशनवालीनं सांगितलं, की बर्नला गाडी निघायची वेळ १२-१० अशी आहे. स्वाति एक्सचेंजच्या लायनीत उभी राहिली. ही लाईनही बरीच मोठी होती. आम्ही १२-१० पर्यंत गाडीपाशी पोचू का ? असा प्रश्न पडला, म्हणून स्वाति लायनीत उभी राहिली नि मी सामान पॅकअप करायला हॉटेलवर गेले. अकरा वाजायला आले, तरी आणखी दोन माणसं स्वातीच्या पुढं होती. तेव्हा स्वातीनं आमची अडचण सांगून एक्सचेंज घेतलं, नंतर तिकिटाच्या लायनीत उभी राहिली व इन्फर्मेशनवालीनं दिलेला कागद स्वातीनं तिकीट देणाऱ्याला दाखवला, तेव्हा तो म्हणाला, हे तिकीट इथं मिळणार नाही. तुम्हांला गॅरे दी नॉर्डला जायला हवं. म्हणून गॅरे दी नॉर्डची तिकिटं काढून स्वाति हॉटेलवर आली.

घरी आल्यावर आम्ही युरेलचं टाईमटेबल पाहिलं. त्यात तर बर्नला लिऑनवरून गाडी जाते, असं लिहिलं होतं. म्हणून काही तरी गोंधळ आहे. असं वाटून आम्ही लिऑनवरूनच जायचं ठरवलं. पण गारे दी नॉर्डची तिकिटं तर काढली होती, म्हणून परत तिकीट खिडकीपाशी ती तिकिटं बदलून मिळतील का विचारलं, तर तेच तिकीट लिऑनसाठी चालेल, असं ती बाई म्हणाली. मग आम्ही सामान घेऊन लिऑनला जायला निघालो तो, 'डु यू वॉंट एनी हेल्प' असं एक भारतीयांसारखा दिसणारा मनुष्य विचारीत होता.

'येस्...' मी पटकन म्हटलं.

आम्हांला भेटलेल्या माणसाचं नाव होतं रफीक. तो मुळातला पॉंडीचरीचा असून आता फ्रान्समध्ये एअरपोर्टमध्ये काम करीत होता. त्यानं त्याचं आयडेंटिटी कार्डही दाखवलं. तो आमच्याबरोबर लून स्टेशनावर आला.

मी सामानाशी बसले व स्वाति आणि रफीक तिकीट आणायला गेले. तिकीट पाच-दहा मिनिटांत मिळालं असतं आणि आमच्या दोघींचं स्वित्झर्लंडला प्रयाण झालं असतं.

मी त्या दोघांची वाट पाहत बसले. दहा मिनिटं झाली, पंधरा मिनिटं झाली, तरी पत्ता नाही. तिच्याकडची पर्स तर त्यानं घेतली नाही ?.... की स्वातीलाच काही केलं ?...मनात विचार आला....अर्धा तास होऊन गेल्यावर हा विचार अगदीच पक्का झाला....दोन मुली व 'हे' भारतात; स्वातीचा पत्ता नाही. पैसे तिच्याबरोबरच.. .मी पॅरिसची भिकारीण तर नाही होणार ?.. .माझ्या डोळ्यांशी पाणी आलं....स्वातीला मी कशी नि कुठं शोधू ?...तिचं काही बरं-वाईट झालं असेल, तर मी कशी जगू ?.

जीव असा टांगणीला लागला असतानाच रफीक व स्वाति आले. केवढा तरी आनंद झाला. रफीकला उत्तम फ्रेंच येत असूनही अर्धातास ती दोघं ह्या काऊंटरपासून त्या काऊंटरपर्यंत हिंडत होती. अर्ध्या तासानं त्यांना नेमका काऊंटर (तिकीट- खिडकी) मिळाली. तिकीट घ्यायच्या वेळी, तिकीट देणारा म्हणाला,

'इथून तुम्हांला डायरेक्ट तिकीट मिळणार नाही. तुम्हांला कोलनचं तिकीट घ्यावं लागेल. किंवा ब्रूसेल्सचं.'

स्वातीला प्रश्न पडला, ब्रूसेल्स व कोलन ही जर्मनीतली गावं. तिथं जाऊन मग स्वित्झर्लंडला का जायचं ? ..स्वातीनं तिकीट घेतलंच नाही. तिनं रफीकला विचारलं,

'बर्नला जायला जर्मनीतल्या कोलनला कशाला जायचं ?'

'तुम्हांला कुठं जायचंय् ? जर्मनीत, की स्वित्झर्लंडला ?' रफीकनं विचारलं.

'स्वित्झर्लंडला.' स्वाति म्हणाली.

तेव्हा रफीक म्हणाला,

'इन्फर्मेशनवालीला जी माहिती दिलीय्, ती जर्मनीतल्या 'बॉन'ची.'

तेव्हा आमच्या डोक्यात प्रकाश पडला, की स्वित्झर्लंडच्या 'बर्न'ला जायचं, असं सांगूनही, त्या इन्फर्मेशनवालीला 'बर्न'म्हणजे 'बॉन' वाटलं. तिथं 'बर्न' चा उच्चार सरळ न करता, जीभ आत खेचत, जीभ लटलटवत 'बर्न' म्हणायचं असतं. नाही तर उच्चारात फरक पडतो. हे ज्ञान अर्थात 'बर्न'च्या 'टेरेसनं' नंतर दिलं. तरी स्वाति इंग्लिश मीडियममध्ये शिकलेली !

ह्या उच्चारांच्या गोंधळात आम्ही दोघी सरळ जर्मनीत पोहोचणार होतो ! स्वातीनं कोलनचं तिकीट घेण्याचं नाकारलं नि रफीक भेटला, हे आमचं केवढं भाग्य ! बरं झालं, फ्रेंच शिकलो नाही, ते. अकरा वर्षं इंग्लिश शिकून उच्चारांचा हा गोंधळ. फ्रेंच शिकलो असतो, तर 'आम्ही गोंधळी गोंधळी' असं प्रहसनच लिहायला लागलं असतं.

ह्या गोंधळात गाडी निघून गेली होती. नंतर 'बर्नला' जाणाऱ्या गाड्या रात्री-अपरात्री तिथं पोहोचणाऱ्या होत्या. त्या वेळी दुपारचा एक वाजला होता व बाझलला जाणारी गाडी एक वाजून तीस मिनिटांनी होती. आम्ही धावत-पळत तिकीट काढलं नि 'गॅरी द ईस्ट'ला जाणारी फास्ट गाडी धावतपळत पकडली. 'ईस्ट' ह्या स्टेशनशी पोचलो, तो पावणेदोन वाजून गेले होते. त्यानंतर संध्याकाळी पाच वाजून चार मिनिटांनी जाणारी गाडी, बाझलला रात्री ९ वाजून ४१ मिनिटांनी पोचणार होती व त्यानंतर पुढं बर्नला जायला साडेदहा वाजून गेले असते. रात्री-अपरात्री पोचणं आम्हांला नको होतं. शेवटी 'ईस्ट' ह्या पॅरिसमधल्याच स्टेशनवरून दहा वाजून चाळीस मिनिटांनी जाणाऱ्या गाडीनं जायचं आम्ही पक्कं केलं. कारण बाझलला ती पहाटे पाच वाजून एकोणचाळीस मिनिटांनी पोहोचणार होती. 'बाझल'वरून 'बर्न' जायला कनेक्टिंग ट्रेन खूप असतात, असं रफीक म्हणाला. तेव्हा आम्ही ९.४१ चं रात्रीचं तिकीट काढलं.

स्टेशनवरच आठ तास काढायचे होते. फ्रान्समधील स्टेशनं अत्यंत गचाळ आहेत. सगळीकडे कागद नि सिगारेटची थोटकं पडली होती. तिथं बसायला बाकंही नव्हती. इतर फॉरेनर्स तिथंच मांड्या ठोकून बसले होते. स्टेशनवरच्या टायलेट रूमला पैसे द्यावे लागत होते. एका बाईनं स्टेशनच्या बाहेरच आपल्या मुलाला मुतायला उभं केलं होतं. आम्ही बराच वेळ प्रथम उभ्याच होतो. पण आठ-दहा टोळकी खालीच बसलेली पाहून आम्हीही खालीच बसलो. बसता बसता संकोच वाटला.

नंतर मी, स्वाति व रफीक गप्पा मारत बसलो. रफीक पॉंडीचरीत ख्रिश्चन मिशनरीत होता. त्याच्या साहाय्यानंच तो फ्रान्समध्ये आला. रफीक म्हणाला,

'तुम्ही आता काळजी करू नका. बाझलला तुम्ही पहाटे पोचाल व तिथं दर तासानं बर्नला जायला लोकल ट्रेन आहे.'

'तू बाझलला नेहमी जातोस का ?' मी विचारलं.

'नाही. पण बाझलच्या अलीकडे मलहोन्से गाव आहे. तिथं मिलिटरी शिक्षणासाठी मी जातो.'

'तू एअरपोर्टवर काम करतोस, की मिलिटरीत ?' मी गोंधळून विचारलं.

माझा गोंधळ लक्षात येऊन तो म्हणाला,

'मी एअरपोर्टमध्येच कामाला आहे; पण फ्रान्समध्ये ज्याला राहायचं, त्याला मिलिटरी ट्रेनिंग कंपलसरी घ्यावं लागतं. शिवाय मी विमान कंपनीत काम करत असल्यानं गाडी-भाड्यात मला ७५ ते ८० टक्के (डिस्काऊंट) सूट मिळते. त्यामुळं मी खूपदा स्वित्झर्लंडला गेलो आहे.'

रफीक भेटला, म्हणून; नाही तर आपण 'बॉन'ला पोचलो असतो....मनात एकसारखं येत होतं. त्याच्या रूपानं देवच पावला, की अल्ला पावला, म्हणावं !

नंतर आम्ही दोघी पाणी पिऊन आलो व फिरून गप्पा मारत बसलो.

'फ्रान्समध्ये इतकं इंग्लिश कुणी का बोलत नाही ? स्टेशनवर पाटी सुद्धा इंग्लिशमध्ये नाही.' मी रफीकला विचारलं.

'इंग्लिश भाषा जगभर पसरलेय्, त्याचा त्यांना फार राग आहे.'

'पण लंडनमध्ये तर इंग्लिश भाषेबरोबर जर्मन, फ्रेंच वगैरे भाषेतही लिहिलेलं असतं.'

'आता फ्रान्समध्येही बदल होऊ लागला आहे. जुनी लोकं आहेत, त्यांना इंग्लिश अजिबात समजत नाही. पण आता शाळांतून इंग्लिश शिकवू लागले आहेत. त्यामुळं शाळा व कॉलेजेस्‌मधल्या मुलांना इंग्लिश जरा जरा येतं.'

मला एकदम स्टेशनवर भेटलेली ती फ्रेंच मुलगी आठवली ! तिच्यामुळं आम्ही फ्रान्स पाहू शकलो.

'फ्रान्सची लोकंही तुटक वाटली.' स्वाति म्हणाली.

तेव्हा रफीक म्हणाला,

'फ्रेंच लोकांना स्वत:च्या वंशाचा अभिमान फार आहे; नि ते परंपरावादीही आहेत. आम्हांलाही ते कमी प्रतीचं समजतात. आपल्या भारतातही हरिजन लोकांना असंच वागवलं जातं.'

रफीक अगदी तळमळीनं बोलत होता. तो मग म्हणाला,

'जिथं तिथं पैशालाच प्राधान्य असतं. परस्पर प्रेमभावना लोकांच्या मनांत नसतेच.'

रफीक साडेअकरापासून साडेपाचपर्यंत होता. चार वाजता स्वाति व तो पिक्चर पोस्टकार्ड्स आणायला गेले. त्यानं आमच्यासाठी कॉफी व फ्रेंचफ्राईज् विकत घेतले. नको म्हटलं, तरी तो ऐकेचना. त्यानंतर त्याला आम्ही मुंबईला आमच्याकडे यायचं आमंत्रण दिलं. मुंबईला त्याचं कुणीच नसल्यानं, तो मुंबईला आमच्याकडे नक्कीच येणार आहे. तो साडेपाचच्या सुमारास परत गेला. पॅरिस स्टेशनवर 'बोला, दाजीबा' सारखी पँट घातलेले बरेच मुलगे दिसले. दादा कोंडक्यांचीच फॅशन त्यांनी चक्क चोरली असावी.

'आता काळजीचं काहीच कारण नाही. आम्ही नीटपणे बर्नला जाऊ,' असं त्याला आम्ही आश्वासन दिलं.

निघता निघता तो म्हणाला,

'मात्र हे तिकीट तिथं मशीनवर टिक करून घ्या. अर्थात तुम्ही परदेशी आहात, म्हणून एवढा त्रास होणार नाही. पण आम्हांला खूप दंड असतो.'

'कसं कुठं टिक करायचं, ते तू दाखव'. असं मी त्याला सांगितल्यावर, तो व मी उठलो. स्वाति सामानाजवळ बसली. चालता चालता तो म्हणाला,

'फ्रेंच लोक इतके परंपरावादी आहेत, की लंडन वा अमेरिकन मुलींप्रमाणे इथल्या मुलींना मोकळीक नसते.'

'मग लुडो वगैरे कसं चालतं ?'

'त्या बायका वेगळ्या असतात. लुडो इथं एवढा प्रसिद्ध आहे; पण त्यामुळं चांगल्या घरांतल्या बायकांना थोडी जास्त बंधनं असतात.' रफीक सांगत होता.

'वेश्याव्यवसाय बंद केला, तर आपल्या मुलीबाळी सुरक्षित राहणार नाहीत.' असं मागं दुर्गा भागवत म्हणाल्या होत्या, तर राजा ढालेंनी त्यावर खरपूस टीका केली. इथंही आपल्या मुलीबाळी सुरक्षित ठेवून लुडोचं महाकौतुक चालतं. लुडोविषयी माहिती सांगतात, तेव्हा त्याची पांढरी बाजूच आपल्याला दाखवली जाते.

रफीकनं, तिकीट टिक करायचं मशीन दाखवलं निं तो निघून गेला. मला एकदम पी. जी. देफारे ह्यांचा 'ट्रेन' हा फ्रेंच चित्रपट आठवला. जर्मनी जेव्हा फ्रान्सवर युद्ध लादते, तेव्हा फ्रान्समधील एका खेड्यातील माणसं खेडं सोडून रेल्वेनं दुसरीकडे जातात. ज्यूलियन व त्याच्या बायकोची व मुलीची ताटातूट होते. ज्यूलियनला ॲना नावाची स्त्री भेटते. ते एकमेकांकडे आकर्षित होऊन एक रात्र एकत्र येतात. गाडीचा अंतिम टप्पा येतो, तेव्हा मात्र ज्यूलियन आपल्या बायकोच्या शोधात निघतो. त्याला बायको सापडते. ॲना ही जर्मनीतून फरारी झालेली जर्मन ज्यू असते. इकडे ज्यूलियन आपल्या बायको व मुलीबरोबर गावी सुखानं राहत असतो. एक दिवस जर्मन गेस्टेपो ॲनाला घेऊन येतात. प्रथम ज्यूलियन ओळख देत नाही. परत फिरतो फक्त काही पावलं आणि मग तडक मागे वळून ॲनाला मिठीत घेतो. युद्धामुळं परस्पर भावसंबंधांवर काय परिणाम झाले, याचं प्रलयकारी चित्रण !

माणसामाणसांतले भावसंबंध जसे सर्वदूर सारखेच, तद्वत पालकांची आपल्या मुलींविषयीची भावना सर्वदूर सारखीच असते.

## गार्डबरोबर वादावादी

स्वाति पत्र लिहीत बसली होती. मी सकाळपासून 'सामानावर देखरेख' हाच उद्योग करीत होते. जरा पाय मोकळे करायला मी बाहेर पडले. बाहेर दुकानांतून बॅगा वगैरे विकायला होत्या. ही आपल्या इथल्या फोर्टमधल्या दुकानांसारखी दुकानं वाटत होती. नंतर मी तिथल्या भाजी मार्केटमध्ये गेले. ही दुकानं अत्यंत स्वच्छ असतात. मटन साफसूफ करून प्लॅस्टिकच्या पिशवीत ठेवलेलं असतं. पण भाजीमार्केटची रचना आपल्या इथल्या भाजीमार्केटप्रमाणेच होती. प्रत्येकाचा आपापला गाळा. एका बाजूला मटन मार्केट, फिश मार्केट व दुसऱ्या बाजूला भाजी बाजार व आणखी एका ठिकाणी फळबाजार होता. लंडनमध्ये डिपार्टमेंटल स्टोअरमध्ये भाजी, मटन, फळं मिळतात, तसं इथं नाही. पद्धत मुंबईसारखीच. फक्त आपल्या इथल्याप्रमाणे

फळबाजार वेगळा नसतो. अर्थात कीर्तिकर मार्केटला लागून असलेल्या पूर्वीच्या मार्केटप्रमाणे तिन्ही एकाच ठिकाणी, पण स्वतंत्र असे वेगळे कप्पे असलेले.

स्वाति वाट पाहत असेल, म्हणून मी परत फिरले. नंतर मीही स्टेशनवर बसून पत्र लिहायला बसले. पत्र लिहिण्यात वेळ फटाफट सरकला. पत्र लिहिताना आपले व घरच्या लोकांचे गुण आठवतात नि मनही प्रसन्न होतं. नंतर नऊ वाजताच आम्हांला आमच्या गाडीचे वेध लागले. नऊ वाजताच गाडी फलाटाला लागली. आम्ही आमची तिकिटं मशीनवर टिक केली व आपला डबा शोधायला आम्ही निघालो. रात्रौ नऊ वाजता संध्याकाळसारखा उजेड होता.

सर्व डबे रिझर्व्हेशन केलेले होते. फिरून काळजी ! स्टेशनवरच आमची ट्रॉली होती. तीवरून सगळं सामान नेत मी पुढं झाले नि सीट बघण्यासाठी गेलेली स्वाति मागच्या डब्यात होती. स्वाति धावत धावत माझ्यापर्यंत आली नि म्हणाली,

'अग, सामानासहित तू इतक्या पुढं कशी आलीस ?'

'मला आता सामान उचलणं छान जमायला लागलंय्.'

'मी मागच्या डब्यात जागा अडवलीय्...' स्वाति म्हणाली.

'पण हे गार्ड लोक तर पुढं जायला सांगताहेत.'

'अग, नाही. चांगला चेअरचा डबा मिळालाय्.'

'चल तर मग....' म्हणत मी फिरून सामान मागे नेलं.

डब्यात चढतो, तर एक माणूस फ्रेंचमध्ये बडबडत आम्हांला डब्यातून बाहेर जायला सांगत होता. तिथंच उभ्या असलेल्या तीन-चार गार्डांना 'ह्या डब्यात बसू ना ?' विचारलं, तर ते फ्रेंचमध्ये काही तरी बोलत होते नि पुढं जायला सांगत होते.

'पण इथं (Chur) चूर म्हणजे चेअर लिहिलंय्,-तर आम्हांला बसायला का देत नाही ? आम्ही तावातावानं विचारत होतो. आमचं इंग्लिश त्यांना समजत नव्हतं नि त्यांचं फ्रेंच आम्हांला समजत नव्हतं. पण अखेर त्यांनी त्या 'चूर'च्या डब्यात आम्हांला बसायला दिलं नि आम्ही सुटकेचा नि:श्वास टाकला.

'बर्न'ला टेरेसकडे गेलो असताना कळलं, की ह्याचा उच्चार 'खूर' असा करायचा व तो 'खूर' हे स्वित्झर्लंडमध्ये गाव आहे. आम्ही बसलो होतो, तो खूरपर्यंत जाणारा डबा होता व बाझलचा डबा पुढं होता. बाझल आल्यावर तो डबा तिथंच सोडतात. त्यामुळं झोप लागली, तरी पुढं जायला होत नाही. खरं तर, आम्हांला सोयीचं जावं, म्हणून ते गार्ड जीव तोडून सांगत होते. पण 'चूर ऊर्फ चेअर' डब्यात आम्हांला बसायला न देऊन, ते आमच्यावर अन्याय करताहेत, असं आम्हांला वाटलं.

***

पॅरिसवरून बाझलला आमची गाडी निघाली नि स्वित्झर्लंड जवळ येऊ लागलं, तेव्हा पहाटे अगदी कडकडून थंडी वाजू लागली. माझ्या अंगात स्वेटर व स्वातीनं शाल पांघरली होती. आणखी शाल घ्यावी, असा मनात विचार आला. तेवढ्यात स्वातीनं विचारलं,

'आई ऽ ऽखूप थंडी वाजतेय्. शाल आहे का ? माझा स्वेटर बॅगेतच राहिलाय्.'

मी स्वातीकडे पाहिलं. तिचे तर दातच आपटत होते. मी मुकाट्यानं हँड-बॅगेतली शाल तिला दिली. आणखी एक शाल पांघरायला घेऊनही ती म्हणाली,

'आई, माझी थंडी कमीच होत नाहीये.'

'उन्हाळ्यातही, ही अशीच थंडी राहिली, तर कठीणच दिसतंय्!' मी म्हटलं. पण मनातून चांगलीच घाबरले होते. कारण बर्नला एक दिवस आधीच आम्ही चाललो होतो. 'नाईस'चा होस्ट कदाचित राहणार होता. कदाचित बाहेरगावी जाणार होता. आमचा एक दिवस तर प्लॅटफॉर्मवरच गेला होता व आम्ही एक दिवस आधीच चाललो होतो.

अर्ध्या एक तासानं सूर्याचे किरण गाडीत डोकावू लागले नि अंगात ऊब येऊ लागली. बाझल आलं, तेव्हा तर छान ऊबदार वाटत होतं. शिवाय बाझलला गरम गरम कॉफी पण पोटात गेली. स्टेशनवर ट्रॉली पण लगेच मिळाली. इथं ट्रॉलीसाठी पैसेही द्यावे लागले नाहीत. बर्नला जायला गाडी लगेचच पंधरा मिनिटांनी होती.

बाझल ते बर्न हा प्रवास अत्यंत आनंददायी आहे. तसं पाहता, सर्व स्वित्झर्लंडमध्ये रेल्वेनं वा कारनं हिंडणं हा एक अत्यंत आनंदाचा अनुभव असतो. बाझल ते बर्न रेल्वेनं प्रवास करताना दिसतात, ते हिरवेगार डोंगर. तसं पाहता, कोकणात हिरवेगार डोंगर दिसतात, असं वाटायचं; पण आपल्या इथं झाडांच्या अंधून मधून डोंगर दिसतो. पण इथं इतकी गच्च झाडी असते, की डोंगराच्या तळापासून ते त्याच्या शिरोभागापर्यंत फक्त सगळी हिरवी झाडंच दिसतात. मी वेड्याखुळ्यासारखी ते हिरवं सौंदर्य टक लावून पाहत होते. कोणती ही झाडं, ह्यांची नावं काय ? होईल का ह्यांची ओळख ! मनात विचार येत होते व त्या हिरव्या सौंदर्याच्या वेगवेगळ्या छटा मला खुणावत होत्या.

बर्न स्टेशनवर मी गार्डला इंग्लिशमध्ये फोनला किती पैसे लागतात, विचारलं नि त्यानं इंग्लिशमध्ये उत्तर दिलं ! मनावरचा केवढा तरी भार हलका झाला. फोन केला, तर फोनवर 'टेरेस'ही भेटली. इतकंच नव्हे, तर ती आम्हांला न्यायला येत होती ! तोपर्यंत साडेनऊ वाजले होते. बर्न स्टेशन अवाढव्य मोठं होतं. स्टेशनवरून एस्कलेटरनं खाली उतरून जायचं होतं.

'नमस्ते' म्हणून, उंचनिंच, गोरी, सडसडीत टेरेस मोकळं हसत समोर उभी होती. टेरेसचं वय पस्तीस होतं. साधारण तेवढीच वाटत होती.

ह्या अशा मोकळ्या, हसऱ्या स्वागतानं आम्ही आनंदून गेलो. तिनं आमची बॅग पटकन् उचलली.

'अग, राहू दे आम्ही उचलू ना.' म्हटल्यावर ती हसली नि म्हणाली, 'आलटून पालटून उचलू.'

असं म्हणाली; पण बसमध्ये बसेपर्यंत बॅग काही आमच्या हाती दिली नाही.

बर्नमध्ये अवघे दोनच बसचे नंबर ११ व १२. टेरेसनं तिच्या घरी पोचण्याचा नकाशा काढून दिला होता. त्यात तिनं ११ नंबरची बस लिहिली होती. स्टेशनसमोरच असलेला त्या बसस्टॉपवर १२ नंबरच आधी आली. टेरेस म्हणाली,

'मी सायकलीनं येते. तुम्ही शेवटच्या स्टॉपवर उतरा.' बसची तिकिटं तिनंच काढली.

आम्ही १२ नंबरमध्ये बसलो नि बस सुरू झाली. रंगीबेरंगी फुलांनी गच्च झालेल्या घरांच्या गॅलऱ्या आमचं हसतमुखानं स्वागत करीत होत्या. लंडनला व्हिक्टोरिया स्टेशनवर अशी फुलांनी टवटवीत झालेली एक गॅलरी पाहिली नि आम्ही ख़ूश होऊन तिच्या टवटवीतपणाला दाद देत तिचे फोटो काढले. पण इथं डावी-उजवीकडच्या साऱ्याच गॅलऱ्या अशा रंगीबेरंगी नि टवटवीत झालेल्या. इतकी बहरलेली फुलं मी प्रथमच पाहत होते.आपल्या इथं खूप फुलं आली, म्हटलं, तरी त्यात पानं अधिक असतात. इथं रोपाला पानं दिसतच नव्हती. फ्लॉवरपॉटमध्ये मुद्दाम गच्च लावावी, तशी फुलं फुलली होती. निळी, जांभळी, पांढरी, गुलाबी, पिवळी, शेंदरी विविध रंगांची फुलंच फुलं.

बसही अतिशय देखणी आणि सीट्सही फोमच्या. शिवाय गर्दी अजिबात नाही. इथं बस-स्टॉपवर बस बराच वेळ थांबते. लोक अगदी आरामात रस्ता वगैरे क्रॉस करून बसमध्ये बसतात. कुणी हात वर करून थांबायला सांगितलं, तरी ड्रायव्हर थांबतो. आपल्या इथं बस सुटत असताना थांबायसाठी हात केला, की ड्रायव्हर मुद्दाम गाडी जोरात सुरू करतो. ह्यात केवढा आसुरी आनंद मिळतो, हे त्या ड्रायव्हरलाच माहीत. प्रवासी व ड्रायव्हर छानशा गप्पाही मारतात. बसमध्ये कंड्क्टर नसतो. एक मशीन असतं. त्यात बसचं तिकीट लोकं टिक करत होते. बरीच लोकं फुलांचे भारेच्या भारे घेऊन बसमध्ये चढत होते. काही खास दिवस असल्यासारखं वाटत होतं. मध्येच एक घड्याळ दिसलं. तिथं बरेच प्रवासी उभे होते.

फुलांनी सजलेल्या गॅलऱ्या संपल्या. तर उंच उंच वृक्ष घनगर्द सावली देत उभे होते. मध्येच पानांच्या चाळणीतून ऊन आत डोकावत होतं, नि हवाही आल्हाददायक, थंड होती. बसमध्येच बसून राहावंसं वाटत होतं.

टेरेसनं शेवटच्या स्टॉपवर म्हणजे ब्रूकफेल्डला उतरायला सांगितलं होतं. शेवटचा स्टॉप येईचना. आपल्या इथं शेवटचा स्टॉप म्हणजे सगळी माणसं व ड्रायव्हर उतरून ज़ातो. पण इथं तसं नाही. स्टेशनच्या एका बाजूला ओल्ड सिटी आहे व दुसऱ्या बाजूला न्यू सिटी आहे. ही बस ओल्ड सिटीत गोलाकार फिरून स्टेशनशी येते व मग ओल्ड सिटीला चक्कर मारते. अशा आमच्या दोन चकरा झाल्या. ड्रायव्हर तोच होता. १२ नंबरला ब्रूकफेल्ड स्टॉप नव्हता; व शेवटचा स्टॉप कोणता, ते आम्हांला कळेना. अर्थात बसमध्ये बसून राहण्याचा कंटाळा अजिबात आला नाही. रंगीबेरंगी फुलं, उंच गर्द झाडं पाहत आम्ही मजेत हिंडलो. शेवटी आम्ही स्टेशनवर उतरलो व ११ नंबरची बस घेतली नि ब्रूकफेल्ड ह्या स्टॉपशी उतरलो व पत्रात दिलेल्या मॅपप्रमाणे चालत गेलो.

## बर्न राजधानी

बर्न ही स्वित्झर्लंडची राजधानी आहे, पण हे शहर अतिशय छोटं आहे व महाबळेश्वरसारखं शांत आहे. आख्ख्या राजधानीत ११ व १२ ह्या दोनच बसेस् आहेत व त्यांची पण थोड्याच वेळात चक्कर आटपते. कुठंही गाड्यांची वर्दळ नाही. लोक सायकलीवरूनच हिंडतात. बस व ट्राम दोन्ही एकच आहेत. ह्या बसेस्ना स्टेशनशी फक्त रूळ असतात व नंतर वरून इलेक्ट्रिक तारांचं कनेक्शन जोडलेलं असतं. खालून रूळ नसतात. ओल्ड सिटीत घरं लहान, एकमजली आहेत. न्यू सिटीत फक्त दोनमजली घरं. टेरेस दुसऱ्या मजल्यावर राहत होती. ही पार्शी कॉलनीसारखी घरं आहेत. खालती निरनिराळ्या औषधी वनस्पतींची झाडं होती. शिवाय निरनिराळी फुलझाडंही होती. मध्यावर एक फर वृक्षही होता. टेरेसचा तीन खोल्यांचा ब्लॉक होता. उजव्या बाजूला स्वयंपाकघर. बाथ टब असलेलं बाथरूम व डाव्या बाजूला हॉल व बेडरूम. मध्ये पॅसेज होता. कलात्मक वाटणारी सुंदर सुंदर चित्रं भिंतीवर होती. हॉलमध्ये एक पुस्तकांची शोकेस होती.

टेरेस हसरी आणि आनंदी आहे. आम्ही तिच्या घरी पोचल्याबरोबर टेरेस म्हणाली,

'मी बस-स्टॉपवर बराच वेळ वाट पाहिली. मग वाटलं, घरीच आला असाल, तर !'

तेव्हा आम्ही तिला आमच्या प्रवासाची गंमत सांगितली. मी म्हणाले,

'तरीही बसमध्ये बसणं ही मौजेचीच गोष्ट झाली.'

मुंबईत ६३ नंबर बसमध्ये बसणाऱ्या मुंबईकरांना तर हा आनंद स्वर्गासारखा वाटेल.

'शिवाय नवं आणि जुनं बर्न शहर पाहायला मिळालं.' स्वाति खुशीत म्हणाली.

कॉफी, सफरचंद, बदाम, पिस्त, पाव व बटर हा नाश्ता होता. शिवाय सिरिअल्स व दूध होतं. सिरिअल्स म्हणजे लाह्यांचे प्रकार, त्यांत बदाम व मनुकाही असतात.

बदाम व सफरचंदं पाहून ती लोकं श्रीमंत व उदार आहेत, असा माझा समज झाला. पण इथं बदाम जवळ जवळ शेंगदाण्यांच्या भावात मिळतात आणि सफरचंदांचा भाव आपल्या केळ्यांप्रमाणे असतो.

त्यांच्या पुढ्यात केळी ठेवली, तर आपणही श्रीमंत आहोत, असं त्यांना वाटेल; कारण तिथं केळी महाग आहेत.

टेरेसनं विचारलं,

'मार्केट पाहायला येणार, की अंघोळ करणार ?'

'अंघोळ...' आम्ही उत्स्फूर्तपणे बोललो.

'आज शनिवार असल्यानं मार्केटचा दिवस आहे. आजच गेलो, तर तुम्हांला मार्केट पाहायला मिळेल. मार्केट तीन वाजेपर्यंतच उघडं असतं. दमला असाल, तर राहू दे.' टेरेसनं माहिती सांगितली.

'छे ! छे ! कपडे बदलून मार्केट पाहायला येतो.' उत्सुक होत आम्ही दाद दिली.

'आपण एकाच जातकुळीच्या !' असं वाटून टेरेस खुशीनं हसली.

## देखणं मार्केट

फुलांचा, पऱ्यांचा देश नि पऱ्यांचं मार्केट असावं, तसं हे बर्नचं मार्केट मला भासलं. इथं सप्तरंगी दुनियेचं दर्शन होतं. भोपळी मिर्ची अथवा सिमला मिर्ची मी फक्त हिरव्या रंगात पाहिली होती; पण इथं सिमला मिर्ची हिरवी, केशरी, लाल, पिवळी व पोपटी अशा विविध रंगांची दिसली. कोबी व फ्लॉवर आपल्या इथल्या रंगांचे होतेच, शिवाय अगदी गर्द हिरवे व जांभळ्या रंगांचे होते. सॅल्ड्स सुद्धा विविध आकारांची नि रंगांची, पांढऱ्या रंगाची व लाल आणि जांभळट रंगाची होती. साऱ्या भाज्या, तजेलदार टवटवीत नि ताज्या. भाजी मॉर्केट हे इतकं देखणं असतं, हे मला प्रथमच समजलं. जांभळी कोबी, जांभळा नवलकोल, जांभळा सॅलड पाहताना भलतीच गंमत वाटत होती.

नंतर पाहिला फुलांचा बहर ! रंगाच्या पेटीत अठरा-वीस रंग असतात, ते सारे इथं हजर होते. विविध आकार नि वेगवेगळ्या रंगांचा मिलाफ ! पाकळ्या. करवतकाठी व आत लाल व बाहेर पांढऱ्या रंगाच्या पाकळ्या फारच गोड फुलं होती. टेरेसनं त्या फुलांचं 'पेटानिया' हे नाव सांगितलं. मध्य गर्द जांभळा, त्या बाजूला फिकट जांभळ्या पाकळ्या व बाह्य पाकळ्या पांढऱ्या होत्या. ती होती 'त्रिसंथेम' ह्या नावाची फुलं फुलांचं नाव कळलं एक प्लॅस्टिकची बारडी पिवळ्या इवल्या इवल्या फुलांनी भरली होती. पिवळ्या इवल्या इवल्या फुलांचा गुच्छ म्हणजे एक फूल. त्याला म्हणतात शार्फ (शिप) कारबे. किती छान नाव. पिवळ्या नावांचा तांडा. व्हायोलेट रंगाची 'ट्रिफोल्डिया' फुलं. ह्याला बेलासारखी तीन पानं असतात, म्हणून त्याचं नाव ट्रिफोल्डिया. बाजूला फिकट पिवळी व आत सफेद हिरवी अशीही फुलं शेवंतीसारखी दिसत होती. 'ख्रीसंथेम' हे त्याचं नाव. शिवाय बोर्ड ऑफ ओनीयन, बीक ऑफ प्लेमिंगो, इम्पेशंट, जिरेनियम वगैरे विविध फुलं विकायला आली होती. ही फुलं म्हणजे फुलांचे भारेच्या भारेच विकायला आले होते. गावातून विकायला आलेलं ते फुलाचं वैभव आम्ही डोळे भरून पाहिलं.

नंतर टेरेसनं भाजी व फळं घेतली. नंतर आम्ही ग्रीटिंग कार्डस् पाहत राहिलो. 'फ्रँक'च्या हिशेबाचा गोंधळच झाला. फ्रान्सचा 'फ्रँक' म्हणजे तीन-चार रुपये. पण स्विस फ्रँक पंधरा रुपयांचा असतो. फ्रान्सच्या फ्रँक डोक्यात होता व दीड फ्रँक म्हणजे पाच-सहा रुपये वाटून मी एक विविध फुलांचं ग्रीटिंग कार्ड घेतलं व घेतल्यानंतर लक्षात आलं, की आपण चक्क २१ रुपये साध्या ग्रीटिंग कार्डसाठी घालवलेत.

आम्ही मार्केटमध्ये हिंडत असताना; गोरा, थोडा बुटकाच व अत्यंत सौम्य मुद्रेचा अल्बर्ट आला. लगेचच टेरेस व अल्बर्टचा चुंबनाचा समारंभ झाला. मग टेरेसनं तिच्या नवऱ्याची, म्हणजे अल्बर्टची ओळख करून दिली. आमच्याबरोबर हस्तांदोलन करून अल्बर्ट त्याच्या कामावर निघून गेला. तो तिथंच एका वाद्यवृंदाच्या दुकानात काम करतो.

नंतर टेरेसनं आमच्यासाठी पाकातले काजू, मिठाई आणि ग्रीटिंग कार्ड्स घेतली. बसमधून घरी जाताना बऱ्याच म्हाताऱ्या बायका दिसल्या. प्रत्येकीच्या हातात, मंगळागौरीसाठी फुलं घरी नेतात, तितकी फुलं होती.

'प्रत्येकीच्या गॅलरीत इतकी फुलं दिसतात, तरी आज एवढी फुलं का नेताहेत?' मी टेरेसला विचारलं.

'आमच्या इथली लोकं फुलवेडीच आहेत.' टेरेस म्हणाली.

एकीच्या हातात फिक्कट गुलाबी सूर्यफुलांसारखी फुलं होती. त्यांकडे डोळ्यांनी निर्देश करत टेरेस म्हणाली,

'ह्या फुलांना 'केराबेरा' म्हणतात. प्रेझेंट म्हणून ही फुलं कौतुकानं देतात. ही फार महाग असतात.'

दुसऱ्या एका बाईच्या हातात, मध्ये जांभळा रंग नि बाजूला पांढरट पिवळ्या रंगाच्या करवतकाठी पाकळ्या असणारी फुलं होती.

'ही कोणती फुलं ?' मी विचारलं.

'स्ट्रा रोज...' टेरेस म्हणाली.

'तुला साऱ्याच फुलांची नावं कशी येतात ?'

'मला त्याची खूप आवड आहे. माझ्याकडे फुलांवरची अनेक पुस्तकं पण आहेत.' टेरेस म्हणाली.

घड्याळाशी बस येताच आम्ही खाली उतरलो.

## चारशे वर्षांचं जुनं घड्याळ

साडेचारशे वर्षांहून अधिक वर्षं ह्या घड्याळाला झाली, तरी हे व्यवस्थित चालू आहे. आम्ही तिथं पोचलो, तेव्हा पावणे तीन वाजले होते. तीन वाजता विदूषक बाहेर आला व त्यानं घड्याळाच्या काटयांकडे पाहून मुठी वळवल्या. निरनिराळ्या वेळी निरनिराळी चित्रं बाहेर येतात. कोंबडा आरवतो, पक्षी चिवचिवतात, अस्वल उड्या मारतं. घड्याळ पाहून गंमत वाटली.

प्रवेशद्वारातून आत गेलो, तो पार्लमेंटची इमारत दिसली. इथंच 'एक्झिक्यूटिव्ह बॉडी' देशाचा कारभार पाहते. ह्यांना लोकांनीच निवडून दिलेलं असतं. सक्तीचं मिलिटरी शिक्षण असावं, की नसावं, ह्याबाबत लोकांना विचारणा केली गेली, त्यांची मतं घेतली गेली. लष्करी शिक्षण सक्तीचं असावं, ह्या बाजूनं लोकांनी कौल दिला. अशा प्रकारे कोणत्याही गंभीर विषयाबाबत लोकांकडून मतदान घेतलं जातं. टेरेस मात्र सक्तीचं लष्करी शिक्षण नसावं, ह्या मताची होती. स्वित्झर्लंड हा लहानसा प्रदेश. फ्रान्स, इटली, जर्मनी अशा सर्व बलाढ्य अशा राष्ट्रांबरोबर इतमामानं राहायचं, तर सक्तीचं लष्करी शिक्षण हे या देशाला अत्यंत आवश्यकच आहे. १७९८ साली नेपोलियननं ह्या देशाचा कब्जा घेतला होता.

नंतर टेरेसनं बर्नचा 'बिअर पिट' दाखवला. मुद्दाम बांधून काढलेल्या ह्या खड्ड्यात आठ-दहा अस्वलं होती. एक उभं राहून नाचत होतं. एकानं बाटलीनं दूध पिऊन दाखवलं. एकानं बाळासारखं झोपून दाखवलं, तर एक मार्केटिंग करायला निघालं.

## बर्न म्हणजे अस्वल

'बर्नचा अर्थ माहीत आहे ?' टेरेसनं विचारलं.

'का ? काय अर्थ आहे ?' मी विचारलं.

'बर्न म्हणजे अस्वल. बाराव्या शतकात एक ड्यूक ह्या भागात शिकारीला आला. त्यानं प्रथम अस्वलाची शिकार केली. म्हणून ह्या गावाला बर्न हे नाव ठेवलं.' टेरेस म्हणाली.

माझ्या मनात आलं, की तो ड्यूक नक्कीच इंग्लिश असावा. कारण असली घाणेरडी नावं ठेवण्याचं कसब साहेबाशिवाय कोणाला जमणार ?

बर्न ही राजधानी असली, तरी हे अगदी छोटंसं गाव आहे. आख्ख्या बर्न शहराला फक्त ११ नं. व १२ नं. असे दोन बस-रूट्स. ह्या शहराला आम्ही दोनदा फेरफटका केला. आख्खं बर्न शहर आपल्या मलबार हिलसारखं सुंदर आहे. तिथं आपले मंत्री राहतात. बर्नमधला सामान्य माणूसही मंत्र्याच्या दिमाखात राहतो.

टेरेसकडे दोन वाटांनी जाता येतं. एक साधा डांबरी रस्ता व दुसरा गर्द झाडांच्या सावलीतून जातो. फर, पेर, नास्पती, पुखे अशा विविध झाडांच्या गर्द सावलीतून जाणारा रस्ता आहे. झाडीमधून चालताना मजा वाटत होती.

घरी गेल्याबरोबर 'स्नान करेंगे ?' टेरेसनं विचारलं. आम्ही अर्थातच 'हो' म्हटलं. टेरेसनं आम्हांला पत्र लिहिलं होतं, ते अर्धं इंग्लिश व अर्धं हिंदीत !

अंग धुतल्यावर आम्ही प्रथम चहा घेतला. नंतर खारे दाणे, बदाम खाल्ले. जाम लावून पाव पण खाल्ला. जाम तिच्या आईनं बनवला होता व पाव अल्बर्टनं घरी बनवला होता. तरीच विशेष चवदार लागत होता. बरोबर वाईनही होती.

'वाईन आम्ही घेत नाही.' असं मी म्हणाले, तेव्हा ती म्हणाली,

'माहीत आहे, भारतातल्या बायका ड्रिंक घेत नाहीत.'

'भारत' वगैरे तिच्या तोंडचे शब्द ऐकून गंमत वाटत होती. ती दोघं राजस्थानमध्ये एक वर्ष राहून गेली होती. फोटोतली राजस्थानी ड्रेसमधली टेरेस छानच दिसत होती.

## खुर्चीशिवाय समाजकार्य

'राजस्थानमध्ये तुम्ही कशासाठी आला होतात ?' मी राजस्थानमधले त्यांचे फोटो न्याहाळत म्हटलं.

'लग्नानंतर एक वर्ष इंडियात येऊन सोशलवर्क करायचं, असं आम्ही ठरवलं होतं.' टेरेस म्हणाली.

आपल्या इथं खुर्चीशिवाय समाजकार्य कुणाला करता येत नाही नि टेरेस समाजकार्यासाठी भारतात कशी आली ? हा माझ्या भारतीय मनाला प्रश्न पडला.

'भारतात येण्या-जाण्याचा खर्च तुम्हांला कुणी दिला का ?' मी विचारलं.

'छे. आमचा आम्हीच खर्च केला.' टेरेस म्हणाली.

हा एक आणखीनच धक्का होता !

आपल्या इथं दारू पिणारीच माणसं दारूबंदी शिकवायला सरकारच्या खर्चानं परदेशात जातात !

'तुम्हांला इथं आल्यावर नोकरी लगेच मिळाली ?'

'हो. माझा तर प्रश्नच नव्हता. मी प्रशिक्षित टीचर आहे. प्रशिक्षित शिक्षिकेला आमच्या इथं फार मान आहे. शिकवायसाठी शेजारच्या खेड्यातून मला बोलावून घेतलं.'

'तुला पगार किती मिळतो ?'

'चार हजार स्विस फ्रँक.'

'अल्बर्टला नोकरीसाठी वाट पाहावी लागली का ?'

'नाही. अल्बर्टला अनेक वाद्यं वाजवता येत असल्यानं त्याला वाद्यांच्या दुकानात लगेच नोकरी लागली.'

नंतर मी व स्वाति दोघीही झोपलो. टेरेस तिच्या कामात गर्क होती.

जरा आडवं होऊन उठलो, तर मधुर आवाजात फ्ल्यूटचे सूर ऐकू येत होते. अल्बर्ट त्याच्या खोलीत फ्ल्यूट वाजवत होता.

## नवऱ्याला काम सांगते

स्वित्झर्लंडला पेट्रोलचा भाव एका लिटरला ९७ फ्रँक. तर वीस हजार फ्रँकमधे पिगू नावाची उत्तम गाडी मिळते. म्हणजेच टेरेस तिच्या पाच महिन्यांच्या पगारात गाडी घेऊ शकते.

बी.टी.सारखी ही परीक्षा; पण अत्यंत अवघड असते. हरळीच्या गवतासारखे गल्लोगल्ली शिक्षक तिथं आढळत नाहीत. आपल्या इथं कारखान्यातून माल बाहेर पडावा, तसे पदवीधर बाहेर पडतात.

टेरेस व अल्बर्ट राजस्थानमध्ये 'सोशल वर्क' करण्यासाठी भारतात एक वर्ष आले होते. राजस्थानमधील दूरवरच्या खेड्यात ती दोघं राहत होती. तिथं पाणी सुद्धा दूरवरून आणायला लागायचं. तरी सुद्धा टेरेस व अल्बर्टला राजस्थान खूप आवडलं. विशेषत:, भारतातील माणसं त्यांना खूप आवडली. भारतातले पदार्थ तर ती दोघं भलत्याच आवडीनं खायची. राजस्थानच्या त्या जुन्या आठवणींत गुंतून गेल्यासारखी होत टेरेस म्हणाली,

' ते दिवस खूपच मजेत गेले. अल्बर्ट कधी कधी स्वयंपाक करायचा, तर बायका म्हणायच्या,

'नवऱ्याला काय काम सांगतेस ? तुला पाप लागेल.'

'गंमत होती, त्या लोकांनी आम्हांला खूप प्रेम दिलं.'

'आमच्या इथं नवरे स्वयंपाकाबाबत काहीच काम करत नाहीत. अल्बर्टविषयी मी माझ्या लग्न झालेल्या मुलीला लिहिलं, तर तिला खूप आश्चर्य वाटेल. कारण माझा जावई काहीच काम करत नाही.' मी टेरेसला माहिती सांगितली.

टेरेस हसून म्हणाली,

'आय् नो. राजस्थानमध्ये सगळी कामं बायकाच करायच्या. इथं सुद्धा सगळेच पुरुष काम करतात, असं नाही हं. पण अल्बर्टला कामाची आवड आहे.'

नंतर टेरेसनं स्वातीला आवडलेली छत्री 'इंटरलेक'च्या 'फ्रेडली' ह्या होस्टकडे पोस्टानं पाठवली, तेव्हा त्याबरोबरच्या पत्रात तिनं लिहिल होतं, जावयाला सांगण्यासाठी आणखी एक गंमत लिहिते, तुम्हांला मी स्टेशनवर पोचवून घरी आले, तर अल्बर्ट स्वयंपाकघराची फरशी

धूत होता.

रात्री टेरेस म्हणाली,

'तुम्हांला कोबीची भाजी आणि पोळी बनवता येते का ?

'तुझ्याकडे त्यासाठी लागणाऱ्या वस्तू आहेत का ?' स्वातीनं विचारलं.

'हो. मी सगळं आणलंय्. पण मला पोळी नीट येत नाही.' असं म्हणत टेरेसनं पोळपाट-लाटणं दाखवलं.

नंतर तिनं आमच्या देखरेखीखाली कोबीची भाजी बनवली. आम्ही पोळ्या बनवल्या. त्या दोघांना कोबीची भाजी व पोळी खूपच आवडली. आमची जेवणं झाल्यावर उरलेल्या पोळ्या व सर्व कोबीची भाजी अल्बर्टनं संपवून टाकली नि टेरेस आनंदित होत म्हणाली,

'भारतातच परत जाऊन आल्यासारखं वाटलं. ती लोकं आम्हांला रोज एक नवीन नवीन पदार्थ आणून देत !'

रात्री अल्बर्टनं पाव बनवला. टेरेस म्हणाली,

'नेहमी अल्बर्टच पाव बनवतो.'

## अल्बर्टच स्वयंपाक करतो

दुसऱ्या दिवशी दुपारी अल्बर्ट व टेरेसकडे पाहुणे येणार होते. त्यासाठी स्वयंपाकघराचा ताबा अल्बर्टनं घेतला होता. टेरेस म्हणाली,

'पाहुणे यायचे असले, की मी त्याला मदत करते. पण मुख्य स्वयंपाक अल्बर्ट करतो, कारण त्याला स्वयंपाक खूप छान येतो.'

मी तिच्याकडे आश्चर्यानं पाहिलं नि म्हटलं,

'अगबाई ! आता मात्र माझ्या लेकीला हे कळवायलाच हवं. माझा लेक व जावई दोघंही नोकरी करतात; पण माझा जावई मुळीच काम करीत नाही.'

टेरेस अलगद हसली, नि स्वाति म्हणाली,

'किंवा; अनिल म्हणेल, आपण स्वित्झर्लंड पाहायला जाऊ, तेव्हा बर्न हे ठिकाण वगळून टाकू.'

आम्ही सारेच हसलो.

त्या दिवशी अल्बर्टनं स्पॅघेटी (शिजवलेल्या शेवया) आऊफ-लाऊफ म्हणजेच इकडून तिकडून, (म्हणजेच काही तरी एकत्र केलेल्या भाज्या व फळं बनवलं होतं.) त्यानं चीज, फळं, काकडी, टॉमेटो व एक हिरवी वनस्पती एकत्र करून आऊफ-लाऊफ बनवलं होतं. चांगलं लागत होतं. तुळशीसारख्या एका वनस्पतीत लसूण घालून चटणी बनवली होती.

आपण स्वयंपाक बनवतो, ह्याचा अल्बर्टला खूप अभिमान वाटत होता.

'चुलीतली लाकडं चुलीत असावी,' अशी निंदा आपल्याकडे स्वयंपाक बनविणारीची केली जाते. आपल्याकडे फक्त हॉटेलात स्वयंपाक करणाऱ्या व्यक्तींचा दर्जा वरचा मानला जातो.

त्या दिवशी टेरेस बाहेर बसलेली होती. अल्बर्ट एखाद्या आदर्श गृहिणीप्रमाणे मन लावून स्वयंपाक करत होता. त्या वेळी बोलता-बोलता टेरेस म्हणाली,

'माझी आई खूरमध्ये राहते.'

'नि तुझं बालपण, शिक्षण वगैरे कुठं झालं ?'

''खूर' मध्येच.'

'नि अल्बर्टचं शिक्षण ?'

'बर्नमध्ये.'

'मग तुम्ही एकमेकांना भेटलात कुठं ?'

'आज जेवायला येणार आहे, तो 'टेरी' नावाचा अल्बर्टचा मित्र डॉक्टर आहे. नि सिलीया माझी मैत्रीण. ती नर्स आहे. त्या दोघांचं लव्ह मॅरेज झालं नि त्या दोघांनी आमची गाठ घालून दिली.'

थोडक्यात 'मॅरेज ब्यूरो'चं काम मित्रमंडळीच करतात.

## उन्हात केस काळे होतात !

दुपारी टेरी व सिलीया जेवायला आली होती. टेरी तांबूस गोरापान, धिप्पाड नि एखाद्या जर्मन सैनिकासारखा वाटत होता. सिलीया गोरीपान, एखाद्या बाहुलीसारखी गोड दिसत होती. नि त्यांची मुलगी सफरचंदांच्या गालांची हसरी छोटी बाहुली होती. तिचे केस एकदम सफेद होते. आश्चर्य वाटून स्वातीनं विचारलं,

'इतके सफेद केस !'

'आमच्या इथं खूप मुलांचे असे सफेद केस असतात. नंतर उन्हानं ते काळे होतात.'

'आमच्या इथं म्हाताऱ्या लोकांचे असे पांढरे केस असतात.' स्वाति म्हणाली.

'आमच्या इथंही म्हातारपणी फिरून पांढरे केस होतात, पण ते असे तकतकीत नसतात.'

उन्हात केस काळे होणं हा नवीनच प्रकार ऐकला.

## खादाड टेरी

त्या दिवशी टेरी, स्पॅघेटीचे ढीगच्या ढीग खात होता. ते पाहून सिलीया म्हणाली,

'आज तुला झालंय् तरी काय ? किती खातो आहेस ?'

'सैन्यात जातोय्. तिथं असं खायला मिळेल, न मिळेल.'

'सैन्यात ? हा डॉक्टर आहे ना ?' मी एकदम विचारलं.

'वीस वर्षांचं झाल्यानंतर आमच्या इथं सक्तीचं लष्करी शिक्षण घ्यावं लागतं.'

'नि त्या वेळी मग शिक्षण अर्धवटच सोडायचं ?'

'साधारण सगळ्यांचं शिक्षण आटपतंच. पण जर कुणाचं शिक्षण राहिलं असेल, तर त्यानं शिक्षण झाल्यानंतर हे लष्करी शिक्षण घ्यावं लागतं. प्रथम सोळा आठवडे लष्करी शिक्षण घ्यायचं

व मग दर तीन वर्षांनी तीन आठवडे लष्करी शिक्षण घ्यावं लागतं.' टेरेस सांगत होती.

'म्हणजे परत परत जात राहायचं ?'

'हो. पहिलं घेतलेलं शिक्षण ताजंतवानं राहावं, त्याचा सराव कायम राहावा, म्हणून दर तीन वर्षांनी परत लष्करी शिक्षण घ्यायला जायचं असतं.'

लष्करी शिक्षण न देंताच भारतात हिंदू-मुस्लिम दंगली चालतात. लष्करी शिक्षण दिलं, तर 'दंगली करणं' हा भारताचा एकमेव प्रमुख उद्योग होईल.

'मग सिलीयाला अगर तुला पण लष्करी शिक्षण घ्यावं लागेल.'

'नाही, बायकांना लष्करी शिक्षण ऐच्छिक आहे.'

'मग अल्बर्ट पण गेला होता ?'

'नाही. त्याला ऑप्शन मिळाला होता. त्यानं सामाजिक कार्य केलं.'

नंतर मी व स्वाति, उर्सुलाबरोबर खेळत बसलो. ती सात महिन्यांची होती. स्वातीनं तिला काळी टिकली लावली, तेव्हा उर्सुला फारच छान दिसू लागली व दृष्ट लागू नये, म्हणून आमच्यांत गालालाही टिकली कशी लावतात, ते आम्ही सांगितलं. ही कल्पना त्यांना फारच आवडली. घरी जाताना सिलीया दुसऱ्याची खास वस्तू परत द्यावी, त्याप्रमाणे त्या टिकल्या काढून देऊ लागली, तेव्हा आम्ही म्हटलं, 'राहू दे.'

ते ऐकून सिलीयाला खूप बरं वाटलं.

'टेरेस'च्या मागच्याच बाजूला भलंमोठं हॉस्पिटल आहे. तिथंच टेरी हॉस्पिटलमध्ये डॉक्टर आहे व सिलीया तिथंच नर्स होती. पण आता उर्सुला लहान असल्यानं ती घरीच असते. उर्सुला मोठी झाली, की ती परत कामावर रुजू होईल.

जेवण झाल्यावर टेरी, सिलीया व उर्सुला निघून गेली.

## <u>ग्रीटिंग्जना फुलांचं साहाय्य</u>

आम्ही आमचा पुढचा प्रोग्रॅम काय काय पाहायचं, ते ठरवत होतो. टेरेस आम्हांला मदत करत होती.

तितलीज, लुझर्नला गेल्यावर तिथून बघावं व इंटरलेकनवरून जुंग फ्रॉव माऊंटन बघावे, असं ठरलं.

'इथंच 'खूर'ला माझी आई राहते.' टेरेस म्हणाली.

''चूर.'' स्पेलिंग वाचून मी विचारलं. ते इंटरलेकनच्या जवळ होतं.

'नाही. ह्याचा उच्चार 'खूर'. इथंच तुमचा तो डबा जायचा होता.'

फ्रान्सच्या गार्डांबरोबर केलेली हुज्जत आठवून आम्हांला फिरून हसू आलं.

टेरेसनं 'बेडरूम'मध्ये जाऊन तिच्या आईनं बनवलेली खऱ्या पानाफुलांची निरनिराळी ग्रीटिंग्ज दाखवली. ती ग्रीटिंग्ज फारच सुंदर होती.

'बर्नपेक्षाही खूरमध्ये फुलं जास्त आहेत. पानं व फुलं वाळवून तिनं गंमत म्हणून ग्रीटिंग्ज बनवली नि आता तिचा तो व्यवसाय बनलाय्. एक ग्रीटिंग, तीन ते पाच-सहा फ्रँकपर्यंत विकलं जातं.'

'इतकी सुंदर सुंदर फुलं नि पानं तुमच्याकडे मिळतात! मी त्या ग्रीटिंग्जकडे पाहून आश्चर्यानं म्हटलं. वाळवल्यानंतरही फुलं व पानांचा रंग तसाच सतेज राहिला होता. इथं आधी विविध रंगांची, विविध आकारांची लहान-मोठी फुलं व पानं असतात. त्यातून वाळवल्यावरही रंग सतेज असतात. त्यामुळं ग्रीटिंग्ज बनवणंही सोपं. ग्रीटिंग्ज भलतीच छान दिसत होती. मी ते वारंवार बोलूनही दाखवलं.

ते जणू लक्षात ठेवून टेरेसनं आम्हांला तसली तीन ग्रीटिंग कार्ड्स प्रेझेंट दिली होती. आम्ही तिला व अल्बर्टला चंदनी हत्ती असलेल्या किल्ल्यांच्या रिंग्ज व उदबत्तीचा पुडा दिला.

एकदा मी टेरेसला 'डस्बीन कुठं आहे.' ते विचारलं, तर तिला सांगता येईना. (माझा इंग्लिश उच्चार तर चुकत नाही ? असं मला वाटून गेलं.) तेवढ्यात स्वाति म्हणाली, 'तिला 'कचरा' पेटी विचार, सांगेल.' नि तसंच झालं.

'कचरा' हा शब्द टेरेसच्या लगेच ध्यानात आला. एक वर्ष भारतात असल्यानं तिला हिंदी शब्द यायचे. (एखादा इंग्लिश शब्द तिला कळला नाही, तर मी लगेच हिंदी शब्द बोलायची. अल्बर्ट थोडा अबोलच होता; पण त्याचं इंग्लिश चांगलं होतं. टेरेसला एखादेवेळी इंग्लिश समजलं नाही; तर तो स्विस-जर्मनमध्ये तिला समजावून द्यायचा.) स्विझर्लंडमध्ये चार भाषा बोलल्या जातात. स्विस-जर्मन, जर्मन, इटालियन व फ्रेंच; पण मुख्य भाषा स्विस-जर्मन.

संध्याकाळी आम्ही टेरेसच्या बागेत गेलो होतो. तिथं इम्पेशन्ट, जिरेनियम वगैरे फुलं परत पाहिली. मध्ये पिवळी व बाजूच्या पांढऱ्या पाकळ्या असलेल्या फुलांना मार्गारिटा म्हणतात. कास्मेआ फुलं होतीच. आपल्या इथल्या लाजाळूसारखा एक प्रकार होता. त्याला 'स्प्रिंग क्राऊट' म्हणतात. हात लावला, की हे पान उडतं. 'कँडल ऑफ किंग' नावाची फुलं दिसायला छान होतीच. शिवाय खोकल्यावर ती फार गुणकारी होती. तर 'कोर्कड्री' नावाची पानं तिनं दाखवली, त्यापासून कॉफी बनवतात. पाना-फुलांत असा वेळ घालवत आम्ही नंतर वर आलो.

## टेरेसची शाळा

सोमवारी अल्बर्टला उशिरा जायचं होतं व टेरेसची तर समर व्हेकेशनच चालू होती. सोमवारी आम्ही 'टेरेस'ची शाळा पाहायला गेलो. बस-स्टॉपकडे जाताना त्या गर्द झाडीतूनच जाणाऱ्या डांबरी रस्त्यावरून जात होतो. तकतकीत हिरवी पानं नि काळ्या फांद्या पाहून मी म्हटलं,

'पिरखे.'

टेरेस हसत म्हणाली,

'अरे, वा! तुला यायला लागलं!'

तेव्हा उत्साहित होत तिनं तिथंच असलेलं एका झाडाचं मोठं पान दाखवलं. त्याला सिंहाच्या दातासारखे मोठे कातरे होते. त्याचं नाव 'टीथ ऑफ द लायन.'

आम्ही टेरेसच्या शाळेकडे जाणारी बस पकडली. इथली कोणतीही बस म्हणजे आरामबसच असते. शिवाय टेरेसच्या शाळेशेजारीच ही बस उभी राहते. त्यामुळं गाडीनं शाळेत जाण्यापेक्षा

बसनं शाळेत जाणं टेरेसला जास्त पसंत आहे. जातानाचा रस्ताही अत्यंत देखणा ! तुती, फर, चेरी वगैरे झाडांच्या गर्द सावलीतून हा रस्ता जातो. ही झाडं चांगलीच उंच वाढली होती व खूपदा ह्या उंच झाडांच्या फांद्या एकमेकींत मिसळून जात होत्या. त्या वेळेला किती तरी वेळ त्या कमानीतून जाताना गंमत वाटायची. मधून-मधून बटाट्यासारखी पांढरी फुलं सर्वदूर किती तरी लांबवर पसरलेली दिसायची.

काही झाडं सिल्व्हरी झालेली दिसली. हिरव्या पानांत मध्येच काही पानं पांढरी झाली होती. त्यांकडे पाहत मी म्हटलं,

'फुलं, की पानंच पांढरी झाली आहेत ?'

त्यांकडे पाहत टेरेस म्हणाली,

'मोठ्या झाडांना एप्रिल व मे महिन्यांत फुलं येतात. आता पानांचा रंग बदलू लागेल. सप्टेंबरच्या अखेरीस सर्व पानांचा रंग बदलेल.'

नंतर तिनं 'फूऽऽ' असा आवाज काढत बोटांनी पानं उडून जातील, असं दाखवलं. काही काही वेळेला आवाज काढून मनातला भाव व्यक्त करण्याची तिला सवय होती.

'लहान झाडांना फुलं कधी येतात ?' मी विचारलं.

'आत्ताच. समर-व्हेकेशनमध्येच ह्या सर्व लहान रोपांच्या फुलांना बहर येतो. फक्त ट्यूलिपचा अपवाद.'

'अरे ! मग आम्ही नेमक्या छान वेळी आलो !' मी खूश होत म्हणाले नि 'टेरेस'नं गोड हसत त्याला अनुमोदन दिलं.

## सधन देशाची नशीबवान मुलं

ही शाळा छान आलिशान होती. लंडनच्या शाळेपेक्षाही सुरेख ! शाळा बाहेर फुलं-पानांनी सजली होतीच; पण वर्गात सुद्धा जास्वंदी व इतर झाडं सुखानं वाढत होती.

दोन भिंतींच्या बाजूनं ही रंगीबेरंगी दुनिया वाढत होती. एका बाजूला छोटी-छोटी कपाटं होती. त्यांत मुलांना खेळायला देण्यासाठी विविध खेळ होते. मध्ये छोटी छोटी बाकं. इतकी सुंदर किंडरगार्डन मी कुठंच पाहिली नाही.

मुलांना चित्रं रंगविण्यासाठी विविध प्रकारचे पोस्टर कलर्स, लहान मोठे क्रेऑन्स, विविध रंगपेट्या, ऑईल व वॉटर कलर ट्यूब्ज तिथं ठेवलेल्या होत्या. रंगवायसाठी एवढे मोठे-मोठे ब्रश होते, की मी आर्टस्कूलमध्ये गेल्यावर एवढे मोठे रंगाचे ब्रश मी हाती घेतले. आपल्या पूर्वी इथं 'मुलांना फुलांसारखं वागवावं.' ह्या कल्पनेनंच दुर्भिक्ष होतं. 'अरे गधड्या' म्हणून हाक मारली, की बापाचं पालकत्व पूर्ण झालं, अशी पूर्वी कल्पना होती.

शाळेच्या आवारात किती तरी भिंती, जरा मोठ्या मुलांना रंगवायला ठेवल्या होत्या. मुलांना रोपं लावण्यासाठी बाहेर वाफे होते.

इथं फुलांची गंमतच आहे ! ती कुठंही, कशीही वाढतात. एरवी आपल्या इथं, जास्वंदीला ऊन लागतं. पण इथं बंद हॉलमध्ये ती अगदी सुखानं वाढत होती. खिडकीतून जे थोडं-फार ऊन येईल, ते तिला पुरेसं होतं. माळी आत येऊन फक्त पाणी तेवढं घालत होता.

तिथले विविध प्रकारचे मुलांना द्यावयाचे खेळ पाहून तर आम्ही अगदी थक्कच झालो !

तिथंच एक फुलाफुलांनी सजलेलं आलिशान घर टेरेसनं दाखविलं. ते तिथल्या शेतकऱ्याचं घर होतं.

रस्त्यात दोन-चार गुटगुटीत सफरचंदी गालांची मुलं भेटली. ते टेरेसचे विद्यार्थी होते. भेटली, की गोड हसायची व लाजायची. तेव्हा सफरचंदी गाल आणखीनच खुलून दिसायचे.

रस्त्याच्या बाजूनं किती तरी फुलं फुलली होती. रस्त्यावरची फुलं घ्यायला हरकत नाही, असं टेरेस म्हणाली, म्हणून मी ती तोडली. हातांत नुसती फुलंच फुलं झाली होती. अल्बर्टनं कोणता तरी पाला तोडला होता. हा 'हर्बल टी' ते आवडीनं पितात. मला काही चव आवडली नाही.

## चीज फॅक्टरी ?

मोठ्या अशा दोन हॉलमध्ये चीज बनवलं जात होतं. दुधाची मोठ-मोठी भांडी तिथं होती. दूध मशीनद्वारा घुसळून त्यावर प्रक्रिया करून चीज कसं बनवतात, ते तिथल्या माणसानं दाखवलं. विशिष्ट प्रकारे प्रक्रिया केली, की हे चीज सहा-सहा महिने टिकतं. चीजचे शंभराहून अधिक प्रकार असतात. इथं मात्र साधं, गार्लिक असे दोनच प्रकार होते. अमेरिकेत तर चीजचं इतकं फॅड वाढलं आहे, की स्मोक-चीज पण तिथं मिळतं.

चीजच्या लाद्याच्या लाद्या बनून बाहेर पडत होत्या; पण तरी फॅक्टरी म्हणावी, इतका काही हा प्रकार मोठा नव्हता.

बर्न हा फुलाफुलांचा रम्य देश ! सर्वांत श्रीमंत राष्ट्र. स्वर्ग वाटावा, इतका सुंदर देश. तलाव, वृक्ष, डोंगर, ग्लेसिअर्स नि सधनता अशी सर्व सुखाची लेणी ह्यांना उपलब्ध ! तरीही टेरेसला राजस्थान आवडावं !

मी माझ्या मनातलं कुतूहल व्यक्त केलं.

मंद हसत खूश होत ती म्हणाली,

'राजस्थानमधली माणसं फारच प्रेमळ ! त्या माणसांना एकमेकांना मदत करायला किती आवडतं.'

स्वित्झर्लंडसारखा आपला देश श्रीमंत तर कधी होणार नाही; पण ज्या 'जिव्हाळ्याचं' टेरेस कौतुक करत होती. त्याला आम्ही तिलांजली देतो आहोत !

## लुझर सी व चॅपेल ब्रिज

बर्नवरून लुझर्नला जाणाऱ्या गाडीत बसलो नि त्या रम्य परिसरानं सुखावलो. उंच उंच घनगर्द झाडांनी आच्छादून गेलेले डोंगर पाहण्याचं वेडच लागलं होतं नि त्या जोडीला अधून-मधून दिसणारी पाण्याची झुळझुळ. नि परत ती उंच गर्द झाडं. कधी अगदी जवळ येऊन आपली ताडमाड उंची दाखवतात, तर कधी लांबवर जाऊन हिरव्यागार डोंगरांचं सौंदर्य दाखवतात. तर कधी कुरणात चरत असणाऱ्या गाईंचे कळप. स्वित्झर्लंडमध्ये गाडीत वा बसमध्ये बसण्याचा

कधी कंटाळाच येत नाही.

टेरेसनं स्वतः आमच्या लुझर्नच्या होस्टला म्हणजे बर्जेटला फोन करून आमचं तिथलं वास्तव्य निश्चित केलं होतं. बर्जेट हॉस्पिटलमध्ये नोकरी करत असल्यानं तिला संध्याकाळी साडेसहाला फोन करायचा होता व मग ती आम्हांला घेऊन जायला येणार होती. साडे-सहापर्यंत आम्ही लुझर्न पाहून घ्यायचं होतं. सर्व सामान स्टेशनवरच्या लॉकरमध्ये ठेवायला टेरेसनं सुचवलं होतं व ती म्हणाली,

'मात्र चोवीस तासांच्या वर वेळ गेला, तर परत पैसे टाकल्याशिवाय लॉकर उघडणार नाही.'

लुझर्नचं स्टेशन बर्नप्रमाणेच मोठं होतं. एस्कलेटरवरून खाली गेलो नि ह्या टोकापासून त्या टोकापर्यंत शोधलं, तेव्हा कुठं लॉकर्स दिसले. बर्न काय अथवा लुझर्न काय, गावं एवढी-एवढीशी लहान. पण ह्यांची रेल्वे स्टेशन्स खूपच प्रशस्त नि सहार एअरपोर्टप्रमाणे खालती व वरती पसरलेलं आवार.

लॉकर्समध्ये दोन हँडबॅगा व एक बॅग टाकली. एका हँडबॅगेत पाणी व खायच्या वस्तू, हात पुसायचा टॉवेल घेतला व काही राह्यलं नाही ना, असा विचार करून दोन्ही लॉकरमध्ये एक एक फ्रँक टाकून लॉकर बंद केला व स्टेशनबाहेर आलो. आत काय काय पाहायचं ? मनात प्रश्न आला. त्यासाठी राज ट्रॅव्हलचं पुस्तक आणलं होतं. तेवढं तरी निदान पाहायचंच, असं ठरवलं होतं. नि एकदम लक्षात आलं, की ते पुस्तक लॉकरमध्येच राहिलं, म्हणून स्वाति पुस्तक आणायला गेली. वरच्या लॉकरमध्ये पाहिलं, तिथं पुस्तक मिळालं. पण नंतर लॉकर बंद होईना. तेव्हा कळलं, की लॉकर बंद करायला परत एक फ्रँक टाकायला हवा. एका राज ट्रॅव्हलच्या पुस्तकासाठी फिरून ३० रुपयांचा भुर्दंड पडला. वास्तविक स्टेशनवरच लुझर्नचा मॅप व लुझर्नमध्ये काय काय पाहण्यासारखं आहे, ही माहिती मिळते. पण पुस्तक आहेच बरोबर, तर पाहावं, म्हणून लॉकर उघडला. ३० रुपये अक्कलखाती खर्च !

आम्ही स्टेशनच्या बाहेर आलो. तो लुंगर्न सी समोरच दिसत होता. वास्तविक हे सरोवराप्रमाणे आहे; पण केवढं तरी विस्तीर्ण. मोठं पात्र असलेल्या नदीप्रमाणे हा लुंगर्न सी आहे. इकडच्या तीरावर विस्तीर्ण बगीचे आहेत. त्यांत लहानसा झू, फुलांचा विशिष्ट मांडणीतले ताटवे वगैरेंनी परिसर अत्यंत रमणीय वाटतो. लुंगर्न सीमध्ये किती तरी बगळे, बदकं, चायनीज् कूट पोहत होते. लुंगर्न सीच्या पलीकडे लांबलचक डोंगर होता. त्यावर एकावर एक घरं नि मोठमोठी हॉटेल्स व त्यांच्या पाट्या दिसतात. जरा उजवीकडे चालत गेलं, की मोठ-मोठ्या बोटी बांधाला लागलेल्या दिसत होत्या. बोटीसाठी लुंगर्न सीमध्ये उभे बांध घातलेले आहेत. काही बोटी आवाज करत सुटत होत्या. एक बोट बांधाला लागली होती. बोटीतून केवढ्या तरी कोळशाचे लोटच्या लोट यंत्राद्वारे खाली टाकत होते. ते पाहून फिरून बदकांशी आलो. बदकांचं पोहणं, एकमेकांना हुलकावणी देणं, आपल्या पिलांना संभाळून घेणं चाललं होतं. त्यातच चायनीज् कूटही सामावून गेले होते. लोकं नावांतून हिंडत होती नि लुंगर्न सीचं पाणी व त्याच्या लाटा समुद्राप्रमाणे किनाऱ्यावर आदळत होत्या. त्या लाटा पाहून तो समुद्रच असावा, अशी शंका आली. म्हणून पायऱ्या उतरून पाणी चाखून पाहिलं, तर ते गोड होतं.

जवळच असलेल्या बोटीनं जोरात शिट्टी वाजवली. लोकं धावत जात होते. युरेल पासवाल्यांना ह्या बोटीचा प्रवास फुकट असतो. म्हणून आम्हीही धावत बोटीत बसलो. फुकट असल्यामुळं आनंद झाला. बोट नीटनेटकी, स्वच्छ नि सुरेख होती. मघाशी पाहिलेलेच डोंगर दिसत होते.

## चॅपल ब्रिज

बोटीतून खाली उतरल्यावर आम्ही फिरून त्या बगीच्याशी उभे राहिलो. बाकावर बसलेल्या एका वृद्धेला 'चॅपल ब्रिज' कुठंय्, म्हणून विचारलं. तिला इंग्लिश येत नव्हतं. पण स्विस-जर्मनमध्येच ती बोलत होती व हातवारे करत, आपल्या लुकलुकत्या डोळ्यांनी तिनं सांगितलं नि आम्हांला चॅपल ब्रिज कुठंय्, ते बरोबर समजलं.

चॅपल ब्रिज जवळ आला नि लुंगर्न सीमध्ये ब्रिजजवळ बदकांचे व चायनीज् कूटचे थवेच्या थवे दिसू लागले. इथं त्यांची चिमुकली पिलं पण खूप होती. चॅपल ब्रिज फुलांच्या विविध कुंड्यांनी सजला होता. ह्या कुंड्या पण फ्लॉवरपॉटप्रमाणे सजलेल्या होत्या. आपण दिवाळीत पणत्या लावतो, त्याप्रमाणे ह्या ब्रिजला थोड्या-थोड्या अंतरावर त्या खूप फुलं असलेल्या कुंड्या लटकवल्या होत्या. हा लाकडी ब्रिज जुन्या पद्धतीचा आहे. १३३० साली हा बांधला, तरीही बांधकाम मजबूत आहे, की आपल्या मुंबईसारखा धो-धो पाऊस पडत नसल्यानं इथलं सारं छान राहतं ! ह्या पुलाचं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे, लुझर्नचा इतिहास दर्शविणारी किती तरी लाकडावरची चित्रं तिथं आहेत. अष्टकोनी 'वॉटर टॉवर' याला जोडूनच आहे. तिथं आता क्लब आहे. पण पूर्वी त्याच्या बुरुजासारखा उपयोग होई. नि 'टॉर्चर चेंबर' (छळवादी छावणी) म्हणून त्याचा उपयोग व्हायचा.

कॉर्नमार्केटजवळ 'टाऊन हॉल' ही अतिभव्य नि देखणी बिल्डिंग आहे. हिचं बांधकाम भक्कम असं दगडी असून त्याला केवढं तरी प्रचंड छप्पर आहे. हा टाऊन हॉल बांधायचं काम १६०२ ते १६०६ पर्यंत चालू होतं. एकविसाव्या शतकात टॉवर बांधला.

जुन्या लुझर्नमध्ये 'सेंट पीटर्स चॅपल' व गॉथिक फाऊंटन पाहण्यासारखा आहे. ह्या बांधकामात नक्षीकाम फारसं नसतं; पण इमारती अतिभव्य व विशाल असून कमालीच्या मजबूत आहेत. जरा सुद्धा बांधकाम ढासळलंय्, असं होत नाहा.

'बूचर शॉप' हा भाग पाहण्यासारखा आहे. अत्यंत लहान म्हणजे अंगठीत हिऱ्यानं मढवलेल्या घड्याळापासून टोलेजंगी घड्याळं इथं दिसतात. काहींत टोल्यांबरोबर पक्षी आवाज देऊन जातात, तर काहींत बाहुली बाहेर येत गरकन फिरून जाते. तर काहींत आकडे असतील, तितके शिपाई येऊन बंदुका रोखून जातात. हे जगातलं घड्याळांचं मोठं भांडार आहे. नंतर तिथली काही भव्य चर्चेसही पाहिली.

सात वाजता बर्जेटला फोन केला. तिनं स्टेशनसमोरच्या कारंज्याशी उभं राहायला सांगितलं. स्टेशनसमोरचा हा कारंजा पण सुरेख आहे. त्याचं धो धो पाणी लांबवर पडत होतं. त्यामुळं कारंज्यापासून थोडं लांबच उभं राहावं लागलं.

बर्जेट दिसायला गोरी व उंच होती. तिनं क्वार्टर पँट घातली होती. बर्जेटबरोबर कॅनडाची कोऑर्डिनेटरही आली होती. तिच्याजवळ एक बळकट ट्रॉली होती. ती ट्रॉली घेऊनच त्या आल्या. आमची बॅग व दोन हँडबॅगा त्या ट्रॉलीवर सहज मावल्या. बर्जेट ती ट्रॉली अगदी मजेत ढकलत होती. बर्जेट गोरी, उंच नि बळकट शरीराची होती. तिनं आमचं सामान इतकं लीलया उचललं, की त्या सामानाला काही वजनच नसल्यासारखं वाटत होतं. स्वतः डॉक्टर होती; पण वागण्यात अत्यंत साधेपण होतं. चालता-चालता परत 'चॅपल ब्रिज' आला. मी म्हटलं,

'अय्या, चॅपल ब्रिज.'

ब्रिजकडे पाहत बर्जेट म्हणाली,

'कॅपल ब्रिज.'

लुझर्न हे सारं शहरच डोंगरावर वसल्यासारखं आहे. बर्जेटच्या घरी जाताना रस्त्यांचा चढ जाणवत होता. बर्जेटचं घर दहा मिनिटांवर होतं. सगळे रस्ते, दुकानं व हॉटेल्सनी गजबजलेले होते. घरापासून आणखी दहा मिनिटं असं वर-वर चालत गेलं, की बर्जेटचं हॉस्पिटल लागतं.

बर्जेटचा फ्लॅट तिसऱ्या मजल्यावर आहे. तिच्याबरोबर आणखी दोघे राहतात. ते उन्हाळ्याच्या सुटीत बाहेरगावी गेले होते. प्रत्येकाची स्वतंत्र बेडरूम असते. संडास, बाथरूम व किचन एकत्रित असतं. ह्यालाच कम्युनिटी लिव्हिंग म्हणतात. कारण फ्लॅटचा खर्च वाटून घेतला जातो व एकमेकांची सोबत पण होते. अठरा वर्षं पूर्ण झाली, की मुलगा व मुलगी स्वतंत्र होतात नि मग अशी राहतात. काही परदेशस्थ नागरिकही असतात. साधारणतः सर्वजणं लग्न होईपर्यंत अशा तऱ्हेनं राहतात.

घरी गेल्याबरोबर आम्हांला कॉफी, दोन-तीन प्रकारची बिस्किटं व चॉकलेटस् खायला मिळाली. तेवढ्यात बर्जेटची हॉस्पिटलमधली मैत्रीण तिला भेटायला आली. ही तिची मैत्रीण पण डॉक्टर आहे. दोघीही जर्मनीतल्या निरनिराळ्या ठिकाणच्या राहणाऱ्या होत्या. एकमेकींना कधी पाहिलेलंही नव्हतं. आता मात्र अगदी जवळच्या मैत्रिणी झाल्या आहेत. बर्जेटची ही मैत्रीण एकसारखी सिगारेट ओढत होती. बर्जेटही सिगारेट ओढू लागली व तिनं आम्हांलाही सिगारेट ऑफर केली. तेव्हा आम्ही दोघींनीही नकार दिला व सांगितलं,

'आम्ही ओढत नाहीच; पण आमच्या इकडच्या बायका सिगारेट ओढत नाहीत.'

'बायकांनीच का ओढायची नाही ?' बर्जेटचा त्वरित प्रश्न.

'पूर्वीपासून बायका ओढत नाहीत खऱ्या. शिवाय हे तसं व्यसनच आहे व त्याबाबत बायका, पुरुषांची बरोबरी करायची, म्हणून सिगारेट ओढायची, असं करीत नाहीत.' मी म्हणाले.

'आमच्या इथं 'बायकांसाठी खास सिगारेट.' म्हणून जाहिरात आली होती. तेव्हा साऱ्या स्त्री संस्था पुढं आल्या आणि त्या जाहिरातीवर सरकारला बंदी घालायला लावली.' स्वातीनं सांगितलं.

'सिगारेट न ओढणं हेच केव्हाही चांगलं. नाही का ?' मी विचारलं.

मी असं विचारलं खरं; पण मग माझ्या लक्षात आलं, की त्या दोघीही एकसारख्या सिगारेट ओढीत होत्या.

'खरं तर, मीही पूर्वी सिगारेट ओढत नव्हते. पण इथं आल्यावर खूपदा एकेकटं वाटायचं नि मग मी सिगारेट ओढू लागले.' बर्जेट म्हणाली.

'आम्हांला कुणी सिगारेट ओढू नका, हे सांगितलंच नाही.' ॲंड्री म्हणाली. मग निराश होत म्हणाली, 'आता सवय झाली.'

'आमच्या इथं ड्रिंक सुद्धा फारच थोड्या बायका घेतात. कामगार वस्तीतल्या व उच्चभ्रू वर्गातल्या काही थोड्याच बायका ड्रिंक घेतात. शेवटी ते व्यसनच असल्यानं, स्त्री-हक्कांसाठी झगडणाऱ्या बायका सुद्धा, सिगारेट ओढणं व ड्रिंक घेणं ह्या बाबतींत पुरुषांची चुकूनही बरोबरी करीत नाहीत.' मी सांगितलं.

नंतर मी म्हणाले,

'वास्तविक आमच्याकडे स्त्री ही दुय्यम मानली गेल्यानं तिला व्यसन करण्याचाही अधिकार नव्हता. पण शेवटी व्यसन हे वाईटच; हे लक्षात घेऊन आम्ही त्याचा आग्रह करीत नाही.'

## जर्मनीत आहे काय पाहायला ?

'आता स्वित्झर्लंडनंतर कुठं जाणार ?' ॲंड्रीनं विचारलं.

'आता ह्यानंतर इटली, मग जर्मनी व मग हॉलंड.' असं मी सांगितल्यावर जर्मनीचीच बर्जेट पटकन म्हणाली,

'जर्मनीत काय पाहायचंय् ? तिथं काहीच पाहण्यासारखं नाही.'

गिऱ्हाइकांना पळवून लावणाऱ्या अस्सल पुणेकर दुकानदारासारखं ती बोलत होती.

'कोलनचा चर्च, फ्रँकफर्ट नि वेस्ट व ईस्टला विभागणारी बर्लिनची पडलेली भिंत पाहू.' मी नेटानं सांगितलं.

'बर्लिनमधली भिंत तर पाडली. आता काय तिथं रिकामीच जागा आहे. नि रोम पाहिल्यावर कोलनचा चर्च काय पाहायचाय् ?' बोलताना बर्जेटचे घारे डोळे लुकलुकले. जर्मनीतले लोक व कोकणस्थ ब्राह्मण यांच्यांत निश्चितपणे आंतरिक संबंध असावेत, हे मला तीव्रतेनं जाणवलं. माझी देवगडची घाऱ्या डोळ्यांची बहीण 'गोव्यात काही पाहण्यासारखं नाही,' हे आम्हांला अशाच प्रकारे पटवत होती.

'तरी कोलनचा चर्च चांगला आहे, म्हणतात,' मी 'जोर लगा के, हय्या' च्या थाटात म्हणाले.

'साध्या चर्चसारखा तर चर्च आहे.' ॲंड्री म्हणाली.

माझ्या मनात शंका आली, ह्या खरोखरीच जर्मनीतल्या आहेत का ? किंवा ह्यांनी भारतातल्या प्रसिद्धी विभागात शिक्षण घेतलं असावं.

त्यांच्या त्या बोलण्यानं माझा विरस होऊ लागला. मी उत्साहाची सारी शक्ती पणाला लावत म्हटलं,

'पण कोलनचा जगात दुसरा नंबर लागतो.'

'फक्त उंचीत दुसरा नंबर. ' म्हणत तिनं असं तोंड केलं, की कोलनच्या चर्चमध्ये उंचीपलीकडे काही सौंदर्यच नाही. आपल्या इथंही काही लोक असतात, ते म्हणतात, 'लायटिंग काय पाहायचंय् ? आपल्या घरात दिवा आहे ना, तसेच लहान-मोठे रंगीबेरंगी दिवे, निरनिराळी नक्षी करून लावले आहेत, अशी कल्पना करायची.' उद्या पु.ल. देशपांडे विनोद करताहेत, अशी कल्पना करूनही लोकं हसत बसतील.

तेवढ्यात बर्जेटनं स्वातीला विचारलं,

'तुझी आई इतकं चांगलं इंग्लिश कसं बोलते ?'

'ती ग्रॅज्युएट आहे.' स्वाति म्हणाली.

'रिअली !' ती आश्चर्यानं म्हणाली.

खरं तर, आपल्या इथं ग्रॅज्युएट काय कुणीही होतं.

तरीही बर्जेटच्या मनाचं समाधान झालं नव्हतं. ती म्हणाली,

'आमच्या इथल्या ग्रॅज्युंएट बायकांनाही इतकं चांगलं इंग्लिश येत नाही.'

मग आम्ही त्यांना आपल्या इथल्या भाषांबाबत परिस्थिती सांगितली व ग्रॅज्युएट व्हायचं, तर जवळ-जवळ अकरा वर्षं इंग्लिश शिकावं लागतं. हेही सांगितलं. शिवाय कॉलेजमध्ये इंग्लिश मीडियम असतं, तेही सांगितलं.

मनात आलं, आमच्या भारतात इंग्लिश बोलणं किती मानाचं धरलं जातं, हे तिला काय माहीत ! कपिलदेवनं झिंबाब्वे विरुद्ध १७५ धावा केल्या. तेव्हा त्याला इंग्लिशमध्ये छान बोलता येत नाही, ह्याची चर्चा व्हायची. अर्थात भारतातला हा खुळेपणा मी तिला सांगितला नाही.

नंतर मी तिला विचारलं,

'तुम्ही शिक्षण घेण्यासाठी स्वित्झर्लंडला का आलात ?'

'स्वित्झर्लंडला शिक्षण थोडं स्वस्त असल्यानं, उच्च शिक्षण आम्ही स्वित्झर्लंडला घेतलं.' बर्जेटची मैत्रीण ॲंड्री म्हणाली.

'मग आता इथंच राहणार ?' मी विचारलं.

'मी इथंच राहणार. ॲंड्री जर्मनीत सेटल होणार,' बर्जेटनं सांगितलं.

'म्हणजे ती आता आई-वडिलांकडे जाणार ?' मी विचारलं.

'छे, छे. जर्मनीत मी वेगळीच राहणार.' ॲंड्री म्हणाली.

'आमच्या इथं एकदा शिक्षणासाठी वा नोकरीसाठी बाहेर पडलं, की फिरून आई-वडिलांकडे आम्ही जात नाही. शिवाय आपण एकदा मोठे झालो, की आई-वडिलांनाही, त्यांचं त्यांना स्वातंत्र्य हवं असतं.'

बर्जेटनं जेवायसाठी भात बनवला होता. पण इथला भात खूपच जाड व बेचव असतो. पाव, चीजचे दोन प्रकार, जामचे तीन प्रकार, बदाम, दोन-तीन प्रकारची बिस्किटं असा बेत होता.

पावाला जाम लावता लावता मी म्हणाले,

'आमच्या इथं लग्न झाल्यावरही खूपदा मुलगा आई-वडिलांकडेच राहतो व खूपदा भांडण झाल्यावरच मुलगे घराबाहेर पडतात.'

ते ऐकून बर्जेट, कॅनडाची ऑर्डिनेटर व अँड्रीला खूप आश्चर्य वाटलं.

'तू सी. ए. होऊन स्वतंत्र प्रॅक्टिस करतेस. मग तू कुठं राहतेस ?' बर्जेटनं विचारलं.

'आई-वडिलांकडे.' स्वाति म्हणाली.

'आमच्याकडे आम्ही कुणीच असं आई-वडिलांकडे राहत नाहीत.' कॅनडाची कोऑर्डिनेटर म्हणाली.

त्यावर स्वाति म्हणाली,

'लग्न झाल्यावर मी नवऱ्याबरोबर राहीन, ते वेगळं; पण त्याआधी आई-वडील वा बहिणीशिवाय मला जराही चैन पडत नाही.'

मुलीला घराविषयी इतकी ओढ असू शकते, ह्याचं कौतुक त्यांच्या चेहऱ्यांवर ओसंडत होतं.

'आणखी ही चॉकलेट्स हवी तर घ्या.' दोन तीन डबे बाहेर काढत बर्जेट म्हणाली -

सगळ्यांनी निरनिराळ्या चॉकलेटस्च्या चवी घेतल्या.

'आमच्या इथं मुला-मुलींचं लग्न ही आई-वडिलांचीच जबाबदारी समजली जाते. माझं लग्न अजून कसं केलं नाही, असं जो तो आईला विचारतो.'

'पण जोपर्यंत तिच्या मर्जीचा मुलगा तिला मिळत नाही, तोपर्यंत उगाच कुणाशीही लग्न करण्यात काय अर्थ आहे ?' मी विचारलं.

'अग, मी तर बेचाळीस वर्षांची आहे. मी कुठं लग्न केलंय् ?' कोऑर्डिनेटर ऑफ कॅनडा म्हणाली.

'मुलीचं लग्न हा तिचा वैयक्तिक प्रश्न आहे, हा विचारच आमच्या इथं रुळलेला नाही.'

असं मी म्हटल्यावर स्वाति पटकन् म्हणाली,

'आमची आई मात्र आधुनिक विचारांची आहे.' स्वातीनं आणखी खुलासा केला,

'आमच्या इथं मुलगी अठरा वर्षांची झाली, की लगेच आई-वडिलांना तिच्या लग्नाची काळजी वाटू लागते.'

'पण तू तर स्वतःच्या पायांवर उभी आहेस, मग आई-वडिलांनी काळजी का करायची?' बर्जेट म्हणाली.

'कारण ती आई-वडिलांची जबाबदारी धरली जाते.' स्वाति म्हणाली.

'खरं तर समाजच ही काळजी आई-वडिलांवर लादतो.' मी म्हणाले.

मला गंमत वाटली. काळजी सुद्धा देशपरत्वे किती भिन्न. आम्ही तरुणपणी सुद्धा उगाचच कसल्या तरी काळज्या वाहत राहतो. तिथं मात्र म्हातारी माणसंही मजेत हिंडत असतात. मुलगी जन्माला आली, की आम्हांला तिच्या लग्नाची काळजी वाटते आणि मुलगा जन्माला आला, की त्याच्या करीअरची काळजी आम्हांला वाटते.

## लेटर ऑफ इंट्रोडक्शन

रात्रीचे अकरा वाजून गेले होते व सिगारेटच्या धुराचा कंटाळाही आला होता. अँड्रीचं तर

सतत सिगारेट ओढणं चालू होतं.

त्यानंतर कोण कुठं जाणार, ह्याची बर्जेटनं चवकशी केली. आम्ही दोघी तितलीज पाहायला जाणार होतो. बर्जेट पहाटे चारलाच उठून हॉस्पिटलला जाणार होती. कॅनडाची कोऑर्डिनेटर उशिरा बाहेर जाणार होती. बर्ज़ेट फिरून दुपारी चारला घरी येणार होती. कॅनडाची कोऑर्डिनेटर आम्ही परत यायच्या वेळेच्या आधीच घरी असणार होती. त्यामुळं किल्ल्या त्या दोघींकडेच असाव्या, असं ठरलं.

'मी सर्व वस्तू व डबे तुम्हांला दाखवते.' बर्जेट म्हणाली.

दूध, साखर, कॉफी, विविध सिरिअल्सचे डबे, पाव, बटर, चीज वगैरे वस्तू दाखवून, बिस्किटं व चॉकलेटस्चे डबे दाखवून ती म्हणाली,

'तुम्हांला हवं तेवढं खा.'

तेवढ्यात कॅनडाची कोऑर्डिनेटर म्हणाली,

'तुम्ही एक चूक केली आहे.'

'कोणती ?' मी आश्चर्यानं विचारलं.

'आल्याबरोबर तुम्ही लेटर ऑफ इंट्रोडक्शन नाही दाखवलं.'

गप्पांच्या नादात आम्ही रीतिरिवाज विसरूनच गेलो होतो सर्व्हास गेस्टनं होस्टच्या घरात शिरल्या शिरल्या आपलं 'लेटर ऑफ इंट्रोडक्शन' दाखवायचं असा रिवाज आहे. डॅनिला व टेरेसनं, 'लेटर ऑफ इंट्रोडक्शन' नुसतंच हातात घेऊन पहिल्यासारखं केलं होतं. त्यामुळं त्याची आवश्यकता तेवढी लक्षात राहिली नाही.

आमच्या 'लेटर ऑफ इंट्रोडक्शन 'मध्ये 'आम्हांला सर्व्हासचं मेंबर का व्हावं वाटतंय्' त्याविषयी माझे विचार लिहिले होते व आपल्या इथल्या कोऑर्डिनेटरची त्यावर सही असते.

मग आम्ही तत्परतेनं 'लेटर ऑफ इन्ट्रोडक्शन' दाखवलं. बर्जेटनंही ते वरवर पाहिल्यासारखंच केलं. वास्तविक सर्व्हासचं मेंबर झाल्याशिवाय होस्टची माहिती व पत्ते मिळत नाहीत. आधी पत्र वगैरे टाकून होस्ट पक्का केला जातो. तेव्हा पत्ररुपानं एकमेकांची ओळख झालेलीच असते. भेटल्यावर एकमेकांना समजून घेण्याची उत्सुकता असते, त्यामुळं 'लेटर ऑफ इन्ट्रोडक्शन' दाखवायचंच राहून गेलं. कोऑर्डिनेटर असल्यानं ह्या फॉर्मॅलिटीज् तिच्या ताबडतोब लक्षात आल्या होत्या.

मला सरकारी खाक्या आठवला. आपल्या इथं माणूस जिवंत असल्याचं त्या महिन्याचं डॉक्टरी सर्टिफिकेट दिलं, तरी त्यापूर्वी तो तीन महिने जिवंत होता, हे वेगळं सर्टिफिकेट द्यावं लागतं. प्रॉपर चॅनेलला महत्त्व. सारासार विचार करण्याला जणू बंदीच असते. अर्थात 'आमचं अगदी चुकलंच' हे आम्ही कबूल करून टाकलं.

त्यानंतर अँड्री आपल्या घरी निघून गेली.

झोप अगदी डोळ्यांवर उतरली असल्यानं आम्हांला दिलेल्या खोलीत गाद्या घालून आम्ही झोपलो. कोऑर्डिनेटर व बर्जेट वेगवेगळ्या खोलीत झोपण्यासाठी गेल्या.

'आणखी पांघरुणं वगैरे हवी आहेत का ?' बर्जेटनं विचारलं.

'नको, भरपूर आहेत.' आम्ही सांगितलं.

शिवाय आम्ही चादरीही बरोबर नेल्या होत्या. उद्या बर्जेटची भेट कदाचित होणार नाही, हे लक्षात येऊन मी पटकन् उठले व तिला गणपती असलेली चंदनाची की-चेन व उदबत्तीचा पुडा दिला. त्या दोन्हीही वस्तू तिला फार आवडल्या.

## एन्गोलबर्ग व तितलीज

आम्ही सकाळीच उठलो नि चहा केला. आम्ही आमच्याबरोबर चहाची पावडर नेली होती. नाही तर इथं सगळ्यांच्या घरी कॉफीच असते. आपल्याला उठल्याबरोबर चहा प्यायची सवय आहे. त्यांच्याकडे आंघोळ वगैरे करून एकदमच नास्ता असतो. नास्त्याला पाव, बटर नि सिरिअल्स खाण्याची पद्धत आहे. ही सिरिअल्स दुधाबरोबर खातात. सिरिअल्स म्हणजे नुसत्या लाह्या असतात अथवा त्या गोड बनवलेल्या असतात व कधी कधी चिवड्याप्रमाणे त्यांत काजू, बेदाणा वगैरे पदार्थही असतात. आम्ही चहा केला, तेव्हा कॅनडाची कोऑर्डिनेटर झोपली होती व बर्जेट पहाटेच उठून निघून गेली होती.

अंघोळ वगैरे आटपून आम्ही नास्ता घेतला. सिरिअल्स, दूध, बिस्किटं व ब्रेड, बटर असा नास्ता घेतला व फिरून एकदा चहा बनवला. कोऑर्डिनेटर तोपर्यंत उठली असल्यानं तिच्यासाठीही चहा बनवला. मग आमची आमची भांडी आम्ही विसळून ठेवली व पाण्याची बाटली व लाडू, चिवडा बरोबर घेऊन आम्ही स्टेशनकडे निघालो. आमच्याकडे युरेलपास असल्यानं तिकिटं काढण्याची जरुरी नव्हतीच. लुझर्नवरून आम्हांला एन्गोलबर्गला जायचं होतं.

एन्गोलबर्ग जवळ जवळ येऊ लागतं, तेव्हा गाडी अगदी उभीच्या उभी होते आहेसं वाटतं. महाबळेश्वरला महाडवरून जाताना लागणारा रडतोंडीचा घाट काहीच नाही, इतकी ही चढण अगदी उभीच्या उभी आहे. बाझल ते बर्न, लांब लांब उभी राहिलेली गच्च झाडं आता अगदी शेजारी उभी असतात. दापोलीच्या उंचच उंच अशा माडांच्या, घनदाट बागांची आठवण येते; पण माडालां खालून नुसतेच दांडेदांडे असतात. इथं फर, पाईनच्या झाडांना थोडंसं खोड सोडून लगेचच फाद्या व पानांना सुरुवात होते नि मग ती जणू आकाशात जातात. गाडीची जाण्याची जागा वगळून बाकी शेजारी ही झाडंच झाडं उभी असतात. गाडी थोडी वर गेली, की शेजारी घनदाट उभी असलेली ही झाडं खाली दरीत उभी असलेली दिसतात. मध्यावर आपण असतो नि झाडांचा उरलेला अर्धा भागही आपल्या इथल्या सर्वसामान्य झाडांइतका उंच असतो. ही झाडं दूरवर पसरलेली असतात. पलिकडचं काहीही दिसत नाही. नुसती फर, पाईन वगैरे झाडंच झाडं दिसतात. ह्या झाडांच्या सोबतीनं आपण वर वर जात असतो. तळाशी पाहतो. तेव्हा झाडांत थोडं अंतर ठेवलेलं दिसतं. एरवी लांबून पाहिलं, तर ही झाडं एकमेकांना चिकटली आहेत, असं वाटतं.

गाडी वेलांटचा घेत जात असते. गाडीची लांबी जास्त असल्यानं माथेरानच्या गाडीचा शेवटचा डबा व इंजीन दिसतं. तसा तो दिसत नाही. पण आपण तर झाडांच्या जादूतच मोहून गेलेलो असतो. झाडांच्या संगतीत आपली गाडी चढण चढत असते. नि झाडं खोल खोल दरीत उभी राहिलेली दिसतात. शेवटी आपण झाडांच्या शेंड्याशी पोचतो नि झाडांचा बुंधा आपल्याला

दिसेनासा होतो. खालून वर आलेली, दूरवर पसरलेले झाडाचे शेंडेच-शेंडे दिसतात. झाडाच्या जादूत फसलेल्या आपल्याला लक्षात येतं, की आपण हिमनग पाहायला निघालो आहोत. कारण तोपर्यंत आपली गाडी एन्गलबर्ग स्टेशनाशी आलेली असते.

## रोप वे

एन्गलबर्ग स्टेशनाशी रोपवे म्हणजेच केबलकारनं वर जाण्यासाठी तिकीट खिडकीशी आपण जातो. तिथं युरेल पासधारकांना थोडी सूट मिळते. पूर्ण तिकीट ४१-६ स्विस फ्रँक आहे. एन्गलबर्ग हे स्टेशनच मुळी समुद्रसपाटीपासून ३००० फूट उंचीवर आहे. त्यानंतर ७००० फुटांवर एक टप्पा व १०,००० फुटांवर संपूर्ण उंचीवर आपण जाऊन पोचतो.

तिकीट काढून फाटकातून आम्ही आत गेलो. केबलचं एकएक केबिन पुढ्यात येई व माणसं आत बसली, की कडेची पट्टी आपोआप बंद होई. केबिनमध्ये चार माणसं बसतील, अशा दोन सीट्स् असतात. केबिनला पट्टी लागल्यावर केबिन पुढं जाते व नंतरची केबिन पुढं येते. आमची एक एक केबिन वर जात होती नि त्याच वेळी एक एक केबिन खाली खाली येत होती. भरभक्कम अशा केबलवर (तारांचा समुदाय) ह्या केबिन्स लावलेल्या असतात व ही केबल तारांच्या मोठ्या चक्रावरून जात असते. रहाटाच्या गाडग्यांप्रमाणे आपल्या केबिन्स वर जात असतात व त्याच वेळी त्याच वजनाच्या केबिन्स खाली येत असतात.

केबल वर जाऊ लागली, तेव्हा खालची झाडं अजिबात दिसेनाशी झाली. उंच झाडं अठराशे फुटांच्यावर वाढतच नाहीत. नंतर आजूबाजूचा परिसरही अंधूक होतो. आपली केबल डोंगरावर चाललेली दिसते. डोंगरावर अधेमधे उगवलेली झुडपं दिसत असतात. केबलमधून केबिन सरकली, तर ! मनात थोडी भीती दबा धरून बसलेली असते. आपण इकडे-तिकडे पाहत असतो. डोंगरावर उगवलेली पिवळी फुलं पण दिसत असतात. मध्येच उगवणारी ही खुरटी वनस्पती पांढरी व पिवळी फुलं आल्हाद देतात. तोपर्यंत आपला केबलचा टप्पा पूर्ण होतो व आपण पाय-उतार होतो. आपण ७००० फुटांवर आलेलो असतो. आम्ही पूर्ण तिकीट काढलेलं असल्यानं नंतर आम्ही एका लिफ्टमध्ये चढलो. काही पहिल्या टप्प्यापर्यंत तिकीट काढतात. पण नंतर संपूर्ण वर जावं वाटलं, तर फिरून मधली वजावट भरून संपूर्ण तिकीट मिळतं. ह्या पहिल्या टप्प्यावरुन खाली फक्त डोंगरच डोंगर दिसतात व खाली परिसर नुसता आहे, असं वाटतं. नीट दिसत नाही. पण डोंगरावर एक तळं आहे, ते अगदी जवळ दिसतं बाकी सर्वत्र डोंगरच डोंगर व सभोवतीचं आकाश तेवढं दिसतं.

लिफ्टमधून आपण वर जातो, तेव्हा डोंगरावरची झुडपं व ती पिवळी फुलंही दिसेनाशी होतात. लिफ्टमधून आपण उभेच्या उभे रोपवेनं केबलमधून आपण तिरके वर जातो. पण लिफ्टमधून मात्र सरळ उभेच वर जातो. त्या वेळी चांगलंच 'धक्धक्' वाटतं. इतर प्रवासी व मुलं हे धकधक होणं आरडाओरडा करत 'धक् धक्' आवाज करीत व्यक्त करतात. वर जाण्याचा आनंद, अधिक जीवाची भीती अशा निश्चित भावनांनी प्रेरित होऊन निघालेला तो आवाज असतो.

आम्ही अशा वर जात होतो. ती पिवळी व पांढरी फुलं कधीच मागं पडली होती. मधूनच

डोंगरावर संगमरवरी दगड दिसू लागले. कुणी म्हणालं 'ग्लेसियर्स', पण हा बर्फ वाटतच नव्हता. ते तर संगमरवरी दगड दिसत होते. बरोबरच आहे उन्हाळ्यात हिमनग कसे दिसतील ?

'हिवाळ्यात आलो असतो, तर हिमनग दिसले असते, नाही ?' मी स्वातीला म्हटलं.

अर्धं मिनिट वर जातो, तो स्फटिकांतून पाणी वाहत होतं.

'अगं, नाही. हेच हिमनग आहेत.' मी फिरून स्वातीला म्हटलं. ते बोलताना मला अत्यानंद झाला होता.

'कशावरून ?' स्वातीनं विचारलं.

'ते काय पाणी वाहतंय्! स्फटिक पाझरून पाणी कसं वाहील ? हिमनग वितळून त्यातून पाणी वाहतंय्!'

'अय्या, खरंच!'

## तितली व हिमनग

बर्फच दगडासारखा होऊन स्फटिकासारखा चमकत होता. लिफ्ट वर जात होती नि त्या हिमनगांचा आकार मोठा-मोठा दिसू लागला.

लिफ्टमधून खाली उतरल्यावर सारीजणं भराभर स्वेटर्स घालत होती. सारी जणं थंडीत 'हुऽहुऽ' करत होती. आम्ही दोघी तर उष्ण प्रदेशातल्या; पण थंड प्रदेशातल्या इतरांना सुद्धा थंडी वाजत होती. नंतर टनेलमधून प्रवास सुरू झाला. मोठमोठ्या हिमनगांमधून हे टनेल्स बसवलेले आहेत. खाली पण बर्फच. त्यावर कारपेट किंवा तत्सम काही तरी टाकलेलं होतं. त्यावरून चालताना खूप थंडी वाजत होती. वरुन बर्फाचं पाणी अधून-मधून टपकत होतं. मधेच टनलला एक काचेची खिडकी जरा बाजूला होती. तीतून प्रकाश पडत होता. त्या प्रकाशाच्या दिशेला चालत जावं, म्हणून मी गेले. पण खाली तो कारपेट नव्हता व बर्फावरून खूप सावकाश चालायला हवं, हे भान सटकलं नि मी गपकन् खाली पडले.

'अग आई ! पडू-बिडू नको, बाई.' स्वाति काळजीनं म्हणाली.

मी उठले. पण माझं मलाच बजावलं, 'जरा जपून! आम्ही ८०४० फुटांवरून चालत होतो. कुडकुडत आम्ही टनेलमधून जात होतो. खूप मजा वाटत होती. टनेलमधून बाहेर आल्यावर, नंतर पायऱ्या चढत गेल्यार हॉटेलच्या वास्तूत आपण प्रवेश करतो. इकडे तिकडे न पाहता आपण आणखी पायऱ्या चढतो. तिथं एक ग्रीटिंग कार्ड्स् वगैरे विकणारं दुकान लागतं. तिथून आणखी पायऱ्या चढून वर गेलो आणि हॉटेलची गच्ची गाठली. गच्चीवर अनेक खुर्च्या ठेवल्या होत्या. पण आसमंत सारं धुक्यात गुडूप झालेलं.

पाच मिनिटं खुर्चीवर बसलो नि तेवढ्यात उन्हाची तिरीप आली नि आजूबाजूच्या डोंगरांवरील ग्लेसिअर्स ऊर्फ हिमनग चमकले. आनंदून स्वाति फोटो काढू लागली, तो फिरून सर्व दूर धुकंच धुकं दिसू लागलं.

तीन-चारदा त्या उन्हाच्या झुळकीनं हुलकावणी दिली. पण नंतर पंधरा-वीस मिनिटांनी उजव्या बाजूला सोनपावलानं ऊन पडू लागलं. उजव्या बाजूला सस्टेनहॉर्न डोंगरावरचे हिमनग चमकू लागले. पटापट साऱ्यांनी फोटो काढले. पण तोपर्यंत डाव्या बाजूला आम्ही वर आलेल्या

डोंगरावर सर्वदूर हिमनग हिऱ्याप्रमाणे चमकू लागले. जगातील एक असामान्य गोष्ट पाहतो आहो तसं वाटलं. पांढरेशुभ्र व निळी छटा असलेले हिमनग सर्वत्र दिसू लागले नि आपण देवांच्या राज्यात आलो आहोत, असं वाटत राहिलं.

'अशा तऱ्हेनं देवाचं राज्य' ही कल्पना असा निसर्ग पाहूनच आली असेल का ?

'मुंबईच्या थंडीतही आम्हांला स्वेटर लागतो. मग जिथं बर्फ पडत असेल, तिथं आम्ही गारठून मरून जाऊ.' असं पूर्वी वाटायचं. पण तसं काही झालं नाही. अगदी एक स्वेटरवर आम्ही होतो. उलट, दिवाळीनंतर दार्जिलिंगला गेलो होतो. तिथं असे जवळून ग्लेसियर्स पाहिले नाहीत; पण तरीही थंडीत अगदी काकडून गेलो होतो. इथं थंडीची मजा वाटत होती. आजूबाजूचे आल्प्स् पर्वत नि त्यांवरचे हिमनग !

ऊन आलं नि आम्ही गच्चीत उभे होतो, तिथून डोंगराचं टोक दिसत होतं. तिथपर्यंत जायला एक पाऊलवाट होती. मग इतरांबरोबरीनं आम्ही डोंगराच्या अगदी टोकावर गेलो. १०,००० फुटांवर आम्ही आलो होतो. आजूबाजूच्या डोंगरांवर चमकले हिमनग ! आम्ही ज्या डोंगरावर उभे होतो, तिथं खाली डोंगर झाकून टाकतील, असे चांदी पसरल्यासारखे हिमनग ! आजूबाजूला निळं आकाश नि त्या आकाशांचं निळेपण ह्या पांढऱ्याशुभ्र हिमनगांत डोकावत असलेलं ! केवढा अननुभूत आनंद आम्हांला मिळाला ! शेरपा तेनसिंगनं जे वैभव पाहिलं तसेच वैभव आम्ही पाहिलं, तिथं पोचलेली मुलं काठ्या उंचावून आपला आनंद व्यक्त करत होती. प्रत्येकाच्या मनात एक 'तेनसिंग' लपलेला असतोच.

आम्ही खाली उतरलो. दुकानात ग्रीटिंग्जची खरेदी केली व आणखी पायऱ्या उतरलो, तर तिथं कळलं, की इथं एक ऑडीओ-व्हिडीओ रूम आहे. तिथं फिल्म दाखवणार आहेत. आम्ही त्या ऑडीओ-व्हिडीओ रूममध्ये सुखावणाऱ्या खुर्च्यांत बसलो. फिल्म सुरू झाली नि केबलमधून वा लिफ्टमधून वर येताना जे अनुभवलं. तेच दाखवलं जात होतं. पुनःप्रत्ययाचा आनंद मिळत होता. काही काही वेळा सर्वदूर धुकंच धुकं असतं, तेव्हा ह्या हिमनगांचं अनोखं सौंदर्य ज्यांना पाहायलाच मिळत नाही, अशा प्रवाशांसाठी ही खास सोय !

मग आमचा खाली उतरण्याचा प्रवास सुरू झाला. प्रथम सर्वदूर निळसर लखलखते हिमनग. नंतर वितळत असलेले हिमनग. आणखी खाली गेल्यांवर पिवळी, पांढरी फुलं असलेली बारीक रोपं. मग लिफ्टमधून फिरून एकदा ते तळं पाहिलं. नंतर केबिनचा प्रवास सुरू झाला नि हळू-हळू आजूबाजूचा परिसर दिसू लागला. केबिन खाली आले व त्यातून उतरून एन्गेलबर्ग स्टेशनकडे जाऊ लागलो, तो ढग गच्च भरुन आले होते. नंतर एक एक थेंब पाऊस पडूही लागलो. एका छत्रीत दोघींनी जाण्यापेक्षा आम्ही धावत-धावत स्टेशन गाठलं. स्टेशनाशी पोचलो. वर छप्पर आलं नि धो धो पाऊस पडू लागला ! इथं हवा अशी दर मिनिटाला बदलत असते !

गाडीत बसलो नि इतका वेळ दूर झालेली झाडं परत भेटली. पावसात भिजत होती. टपटपत्या पावसातली झाडं थोडी लीन वाटली. नंतर झाडं उंच-उंच होत जातात व आपण खाली-खाली जाऊ लागतो. लुझर्न स्टेशनवर पोचेपर्यंत पाऊस थांबणार का ? मनात प्रश्न आला. पण लुझर्न स्टेशनशी पोचतो, तर पाऊस खरंच थांबला.

घरी गेल्यावर गरम गरम चहा बनवला. बिस्किटं व तऱ्हेतऱ्हेची चॉकलेटस् जोडीला होतीच. बर्जेट घरी येऊन परत बाहेर गेली होती. ती जरा वेळानं आली.

'कसा झाला प्रवास ?' बर्जेटनं विचारलं.

'भलताच छान !' हे सांगताना सुद्धा मी त्या हिमनगांत गुंतून गेले होते.

'स्वित्झर्लंड खूपच छान आहे!'

कॅनडाची कोऑर्डिनेटर पण मजेत होती. ती इथून उद्या जर्मनीला जाणार होती, नि आम्ही इंटरलेकनला. आम्ही आमच्या-आमच्या होस्टना फोन करून आमचं त्यांच्याकडचं राहणं पक्कं केलं.

## देशपरत्वे सभ्यता ?

रात्री जेवणाचा बेत कालच्याप्रमाणेच होता. फक्त चार-पाच प्रकारची योघर्ट बर्जेटनं आणली होती. योघर्ट म्हणजे दहीच. फक्त त्याला वेगवेगळी चव आणलेली असते. मी पायनॅपल योघर्ट पसंत केलं. एक खिरीसारखाही पदार्थ होता. तो पण खाल्ला. बाकी ब्रेड लावलेला पाव, दूध होतंच. भात होता. पण शेवटी दहीभात खातो, त्याप्रमाणे योघर्टमध्ये भात कालवून खाण्यात गंमत नव्हती. आपल्याप्रमाणे घरी दूध विरजणं हा प्रकार इथं कुणाला माहीतच नव्हता.

बोलता-बोलता बर्जेट म्हणाली,

'युरोपियन लोकांच्या मांड्या उघड्या असतात. तर पौर्वात्य लोकं हसतात. पण तुम्हां लोकांची, साडी व ब्लाऊजमध्ये पोटं उघडी असतात. त्याला आम्ही हसावं का ?'

'कुणीच कुणाला हसू नये.' मी म्हटलं.

पण हे प्रकरण एवढंच नव्हतं. मलेशियातून जाताना बर्जेटला वाईट अनुभव आला होता. बसमधून जाताना तिच्या उघड्या मांडीवर कुणी पुरुषानं हात टाकला होता व अंघोळ करताना वरून फटीतून बघण्याचा प्रयत्न केला होता. त्याविषयीचा संताप तिच्या नसा-नसांतून दिसत होता.

तेव्हा मलेशिया व भारत ह्यांत फरक आहे. हे तिला आम्ही सांगितलं. शिवाय मलेशियात गोशापद्धत असल्यानं एकंदर स्त्री मोकळेपणी दिसत नसल्यानं, हे वागणं वाकड्या वळणानं जात असावं, हेही मी तिला सांगितलं; आणि मग तिच्या लक्षात आलं, आपण भारतात प्रत्यक्ष गेलोच नव्हतो. बर्जेटचीही कमाल आहे ! 'पौर्वात्य देश' म्हणून तिनं मलेशिया वा भारतातही संस्कृती एक धरली होती ! म्हणजे 'गांधी' ह्या आडनावाच्या सारखेपणावरून महात्मा गांधी व इंदिरा गांधीचा स्वभाव सारखाच होता, म्हणावं.

मांड्या उघड्या टाकण्याबाबत मी तिला म्हणाले;

'आमच्याकडे मांड्या उघड्या टाकलेल्या पाहायची सवय नसल्यानं, माझी मुलगी घरातल्या क्वार्टर पँट घालते ते पाहणं मला अवघड जातं. पण आता तसं पाहण्याची सवय झाल्यानं मी भारतात जाईन, तेव्हा तसं पाहणं अवघड जाणार नाही.'

यावर आम्ही सारेच हसलो. पण मांड्या उघड्या म्हणजे त्यांच्यांत शालीनता कमी असते,

असं नाही. हे माझं मलाच प्रकर्षानं जाणवलं.

त्या वेळी 'मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयात' घडलेला प्रसंग आठवला. एका रशियन विदुषीनं तुकारामाचे अभंग रशियन भाषेत अनुवादित केले. त्या वेळचा प्रसंग होता. त्या रशियन विदुषीनं शंभर वर्षांपूर्वीच्या एका रशियन प्रवाशाचं प्रवासवर्णन वाचलं होतं. तो भारतात येऊन गेला होता. त्यानं लिहिलं होतं,

'भारतातील स्त्रिया उथळ असतात. त्या पोटं उघडी टाकतातह्य.'

म्हणजेच त्याच्या दृष्टीनं रशियात त्या काळात नऊवारीपेक्षा शर्टपँटमधली स्त्री जास्त सभ्य ठरली असती.

मी हा प्रसंग सांगितला व आमच्या लेखकानं 'नऊवारी'तली बाई सभ्य मानली असती, असं सांगितलं.

'खरं तर, कुणीच कुणाला नावं ठेवू नयेत.' स्वाति म्हणाली.

'अगदी खरं आहे.' कॅनडाची कोऑर्डिनेटर म्हणाली.

आमची जेवणं तोपर्यंत झाली होती. ती पाहून मी पटकन उठले नि म्हणाले,

'आज मी भांडी धुऊन टाकते.'

काल कॅनडाच्या कोऑर्डिनेटरनं भांडी धुतली होती. ती म्हणाली,

'आपण दोघी धुऊ.'

त्यावर स्वाति म्हणाली,

'नको, आम्ही दोघी धुऊ.'

आम्ही दोघींनी भांडी धुतली व बर्जेटनं ती पुसून ठेवून दिली.

## गर्दीचे खरे पेशंट, खोटे पेशंट ?

हात पुसता-पुसता मी बर्जेटला विचारलं,

'गर्द वगैरे प्रकार इथं आहे का ?'

'भरपूर. अगदी रोज पेशंटची गर्दी असते. काही खरे, काही खोटे.'

'म्हणजे ? खोटे पेशंट कसे काय असू शकतील ?' हे विचारताना मला फार आश्चर्य वाटलं.

ती हसली नि म्हणाली,

'नेहमी गर्द, हेरॉईन घेणाऱ्यांना पुढं पुढं, त्याची 'किक' येईनाशी होते. मग असे पेशंट आमच्याकडे येतात. आमच्याकडून औषधोपचार करून घेतात. पण परत गेले, की फिरून व्यसन सुरू करतात. औषधोपचार करून, गेले की त्यांना छान 'किक' मिळते.'

मी हा प्रकार सर्वस्वी नव्यानं ऐकत होते !

'तुमच्याकडे असला प्रकार चालतो का ?' बर्जेटनं विचारलं.

'तू डॉक्टर असल्यानं तुला त्यातल्या खुब्या माहीत आहेत. आमच्याकडे असले प्रकार घडतही असतील; पण आम्हांला ते माहीत नाहीत.'

'पण इंडियात गर्दचं प्रमाण इथल्यापेक्षा नक्कीच कमी आहे. निदान आमच्या आसपास तरी गर्द ओढणारा कुणी नाही.' स्वाति म्हणाली.

'आमच्या इथं गर्दविरोधी व्याख्यानं मात्र जोरात चालतात. एकदा असंच एक व्याख्यान ऐकून मी अस्वस्थ झाले. त्या वेळी मुलं म्हणाली, आई, तू अशी काही अस्वस्थ झाली आहेस, की जणू काही आम्हीच कुणी व्यसनी आहोत !, मी अनुभव सांगितला.

'पण पालक असे जागृत असणं चांगलंच की !' बर्जेट म्हणाली.

'पण तुमच्याकडे, मुलं तरुणवयात पालकांजवळ राहतच नाहीत. तर मग पालकांनी जागृत तरी कसं राहायचं ?' मी माझी शंका बर्जेटला विचारली.

'तीच तर अडचण आहे.' बर्जेट म्हणाली.

'आमच्या इथं मूल व्यसनी निघालं वा वाईट निघालं, की लगेच पालकांनाच जबाबदार धरतात... विशेषत: आईला.' मी म्हणाले.

'आईलाच का जबाबदार धरतात ? मूल वाढवणं हे दोघांचंही काम आहे.' बर्जेट म्हणाली.

मी नुसतीच हसले. माझ्याजवळ त्याला उत्तर नव्हतं. मी म्हणाले,

'संस्कार फक्त आईनंच करावे, असं आमच्याकडे समजलं जातं. वडिलांच्या वागण्याचाही मुलांच्या मनावर परिणाम घडतो. हा विचार लक्षात घेतला जात नाही. मुलगा वाईट निघाला, कारण आईचं दुर्लक्ष, असंच समजतात.'

'हा बायकांवर अन्याय आहे !' बर्जेट तावातावानं म्हणाली.

मी काहीच बोलले नाही. तसे खूप अन्याय बायकांवर होतात. साऱ्यांचाच पाढा किती वाचणार, असा विचार करून मी काहीच बोलले नाही.

'पूर्वी आमच्या इथं बायका कमावत नव्हत्या. त्यामुळं सारंच ऐकून घेत होत्या. 'मुलाला वाढवणं' यात बापाचंही सहकार्य हवं, असा विचार आता पुढं येत आहे.' स्वाति म्हणाली.

'गुड. असाच बदल करण्यासाठी तुमच्यासारख्यांनी पुढं आलं पाहिजे.' कॅनडाची कोऑर्डिनेटर स्वातीला म्हणाली.

अकरा वाजून गेले होते. बर्जेटला पहाटेच उठायचं होतं; म्हणून आम्ही झोपायसाठी उठलो. उठता-उठता त्या दोघींनी आमच्या दोघींचे हात आलटून पालटून हातात घेतले व आम्हांला 'हॅपी जर्नी' म्हणून विश केलं.

'आता उद्या इंटरलेकन...' झोपता झोपता स्वाति म्हणाली.

## इंटरलेकन, घरातून जुंग फ्रॉवदर्शन

इंटरलेकनच्या फ्रेंडली कुटुंबात जायचे होते. होस्टलिस्टमध्येच कुणी तरी 'अ व्हेरी गुड होस्ट' असा शेरा मारला होता. लुझर्नवरून आम्ही निघालो नि इंटरलेकनला जाणाऱ्या गाडीत आम्ही बसलो. स्वित्झर्लंडचं नेहमी वेगळंच सौंदर्य दिसलं. आतापर्यंत पाहिलेली ती उंच उंच झाडं सोबतीला होतीच. ती संपतात, तो अफाट असा लुंगर्नसी दिसू लागतो. बदक, चायनीज कूट मजेत पोहत असतात. त्याबरोबर नावांची ये-जा चालूच होती. शीतल हवा नि दूरवर पसरलेलं ते पाणी पाहत गाडीतला वेळ मजेत चालला होता. लुंगर्नसी संपला, की फिरून झाडं

भेटायला येतात. त्यांची उंची खालून वर पाहत असते. तोच ब्रायन्झ सी दिसतो. ह्या अनेक 'सी' ना जोडणाऱ्या ह्या गावाचं नाव इंटरलेकन (न्ढयअ्चळ्ष्ढय). तो पाहत, 'इथं लेक्स तरी किती आहेत' म्हणत आपण कौतुक करत असतो, तोच थुन्नर सी हा लेक दिसतो. निसर्गानं नि आपण चकित होणंही विसरून जातो. स्वित्झर्लंडला देवानं निसर्गसौंदर्याचं भरभरून दान दिलं आहे.

इंटरलेकनला गाडी उशिराच पोचली. स्टेशनवर हॅन्स फ्रेडली उभा राहणार होता. पण कुणीच सामोरं येईना... की आता आपणच तंगड्या तोडत जायचंय्?... . मनात विचार येत होते. स्वातीनं फोन केला., तर तो 'येतो' म्हणाला. आम्ही स्टेशनबाहेरच्या बाकावर बसलो. फ्रेडली आणि आयरिस दोघेही आम्हांला न्यायला आले. आमची भेट झाल्यावर दोघंही दिलखुलास हसले. आयरिस म्हणाली,

'किती उशीर झाला ! आम्ही केव्हाचेच स्टेशनवर आलो होतो. कदाचित अगोदरच्या स्टेशनवर उतरला असाल, म्हणून तिथंही गेलो. कुठंच भेटला नाहीत, म्हणून मग घरी गेलो. आम्हांला काळजीच वाटत होती.'

'गाडीच उशिरा आली ना, काय करणार ?' मी म्हटलं.

'सहसा गाड्या लेट होत नाहीत. आज काय झालं, कोण जाणे.' आयरिस म्हणाली.

हॅन्स फ्रेडलीनं पटकन पुढं होऊन आमची बॅग व एक हँडबॅग उचलली. स्वातीनं उरलेलं हँडबॅग उचलली. मला उचलायला काहीच राहिलं नाही. वजन उचलायची सवय झाल्यानं, गाडीपर्यंतही रिकाम्या हातानं जाताना चुकल्यासारखं झालं. जसा काही हमाली करण्याचा आमचा जन्मजात उद्योग होता.

घरी गेल्याबरोबर आयरिसनं आमची राहण्याची जागा दाखवली. ती जागा ऐसपैस तळघरात होती. (थंडीच्या दिवसांत ती लोकं बहुधा तळघरात झोपत असावी. आम्हांला अर्थात त्या वेळीही थंडीच वाटत होती.) आमची बेडरूम ऐसपैस होती. जवळच बेसिन व टॉयलेट रूम होती. बेसिनजवळ हात पुसायला टॉवेल होताच. शिवाय, आयरिसनं आम्हांला स्नानासाठी दोन टॉवेल, व दोन दोन नॅपकिन्सच्या जोड्याही दिल्या. स्विझर्लंडमध्ये सगळीकडेच असं कौतुक झालं.

जिन्यानं वर गेल्यावर एक मोठी टब असलेली बाथरूम होती. तिथं आम्ही स्नान करायचं होतं. ग्राऊंडफ्लोअरवर एक भलामोठा हॉल, नंतर डायनिंग रूम व किचनरूम होती. किचनही ऐसपैस होतं. आपण घरात आलो आहोत की म्यूझिअममध्ये, असा प्रश्न पडावा, अशा प्रकारे जगभरच्या गोष्टी तिथं उपस्थित होत्या. गालिचेच चार प्रकारचे होते. त्यांत इटालियन व काश्मिरी गालिच्यांची हजेरी होती. अनेक पेंटिंग्ज व भारतीय, जपानी व अमेरिकन कलात्मक वस्तू होत्याच. पण सिंगापूरच्या वस्तू विशेष होत्या. तो दोनदा सिंगापूरला गेला होता. तिथल्या खंजिरापासून अनेक गोष्टी ठेवल्या होत्या. कुणी चावट माणसानं 'स्वित्झर्लंडचं म्यूझिअम' म्हणून ते घर दाखवलं असतं, तरी आम्हांला खरंच वाटलं असतं.

नंतर फ्रेडलीनं आम्हांला वरच्या मजल्यावर नेलं. तिथं आणखी एक मोठा हॉल. टब

असलेली जास्त देखणी बाथरूम होती. ती बाथरूम दाखवत तो म्हणाला,

'तुम्हांला हवं तिथं अंघोळ करायला हरकत नाही.' म्हणत तो मोकळेपणानं हसला.

फ्रेडली चांगलाच धिप्पाड होता. चांगला दणकट शरीरयष्टीचा होता. प्रेमळ स्वभावाचा नि बालहृदयाचा होता. त्यामानानं आयरिस जरा थकलेली वाटली. फ्रेडलीचं वय ६६ वर्षांचं होतं, तर आयरिसचं त्रेसष्ट वय होतं.

फ्रेडलीनं पहिल्या मजल्यावरची त्याची कॅसेटरूम दाखवली. खाली एक टी. व्ही. होता. व इथं व्ही. सी. आर्. होता. ही खोली सबंध कॅसेट्सनं भरली होती. सर्व्हास होस्टच्या १०० ते १५० कॅसेट्सचा त्याच्याजवळ संग्रह होता. फ्रेडली म्हणजे 'राजा माणूस' होता.

पहिल्या मजल्यावरच्या हॉलमध्ये देश-विदेशच्या बाहुल्या, पपेट्स, घोडागाडी, फ्लॉवरपॉट्स होते. ताजमहाल सुद्धा होता.

फ्रेडली व आयरिस जगभर हिंडले होते. हा साधा स्टेशनमास्तर होता, तरी त्याला कसं परवडलं ?...

रात्री डिनरचा बेतही मस्त होता. भात, ब्रेड, चीझ, केळी, सफरचंद व सूप. सूप छानच जमले होते. नेहमीप्रमाणे 'वाईन'ची ऑफर झालीच.

'आम्ही आता वयस्क झाल्यानं आम्ही रात्री हलकं अन्न घेतो.' फ्रेडली म्हणाला.

सूप खूपच छान जमलं होतं. गरमागरम सूप फारच छान वाटत होतं. मी त्या सूपाचं छान कौतुक केलं.

'अग, मग आणखी घे.' म्हणत आयरिसनं आम्हां दोघींना अगदी मायेनं आणखी सूप घातलं.

जेवण झाल्यावर आम्ही भांडी धुऊ लागलो, तर आयरिस म्हणाली,

'माझी भांडी धुण्याची पद्धत वेगळी आहे. आज मी कसं धुते, ते प्रथम पाहा. मग उद्या, हवं तर, धुवा.'

तिनं ती भांडी प्रथम गरम पाण्यानं धुतली व मग गार पाण्यानं धुतली. ती म्हणाली,

'आरोग्याला वाईट, म्हणून मी भांड्यांना साबू लावत नाही.'

अर्थात तिथं गरम व गार पाण्याचा नळ एकत्रच होता. डावीकडे नेला, की गरम पाणी व उजवीकडे नेला, की गार पाणी यायचं.

आयरिसनं आम्ही दोघींना जवळ बोलावलं नि ओटचाजवळच्या खिडकीतून बाहेर पाहायला सांगितलं.' जुंग फ्रॉव माऊंटन्स !' ती म्हणाली.

आम्ही कौतुकानं ते सौंदर्य पाहत राहिलो. लुकलुकत्या हिमनगांनी आल्प्स पर्वत शोभिवंत झालेले दिसत होते ! स्वयंपाक करता करता 'जुंग फ्रॉव माऊंटन्स' पाहायचे ! किती गोड वास्तव !

**<u>फ्रेडली, मोठे बालक</u>**

'इकडे या' म्हणत फ्रेडलीनं डायनिंग टेबलाशी बोलावलं. तो आल्प्स पर्वतांचा मोठा नकाशा पसरून बसला होता. 'जुंग फ्रॉव' म्हणजेच युंग फ्रॉव म्हणजेच कुमारी मुलगी. मग त्यानं एक

हिमनगांनी आच्छादित पर्वत दाखवला. त्याचं नाव आयगर. तो तरुण पुरुष. तो तरुण मुलगा. कुमारीचं कौमार्य भंग करेल, म्हणून हा मध्ये 'मॉंक' पर्वत उभा आहे. मॉंक म्हणजे संन्यासी. मॉंक, आयगरला कुमारीकडे जाऊ देत नाही. असे तीन बर्फाच्छादित पर्वत ! ही कल्पना पण किती रमणीय !

नंतर आयरिस सांगत होती. पूर्वी आमच्याकडे पेईंग गेस्ट असायचे. पेईंग गेस्टचं हवं नको बघायचं. त्यांच्या उश्यांचे अभ्रे व बेडशीट्स् धुवायचे, ही कामं मी करे. शिवाय मला नोकरी होतीच. नि शिवाय पेईंग गेस्टची जवण्याची व राहण्याची व्यवस्था मीच बघे. मला त्या वेळी खूप थकायला होई.

त्या थकलेपणाच्या खुणा आयरिसच्या चेहऱ्यावर दिसल्या होत्या. आयरिस थकलेली नि वार्धक्याकडे झुकलेली दिसली. अशा तऱ्हेनं पैसे साठल्यानं ते जगभर प्रवास करू शकले असावेत. पण 'फ्रेडली' म्हणजे अगदी मूर्तिमंत उत्साह !

'छान पोशाख आहे !' माझ्याकडे पाहत फ्रेडली म्हणाला.

माझा पंजाबी ड्रेस पाहून फ्रेडली खूश झाला होता. स्वातीचा 'पँट व टी शर्ट' हा ड्रेस त्याला पसंत नव्हता. स्वातीकडे पाहत तो म्हणाला,

'तू का असा ड्रेस आणला नाहीस ?'

स्वाति हसून म्हणाली,

'तुला पंजाबी ड्रेस इतका आवडेल, ह्याची मला कल्पना नव्हती. अमेरिकेत ओळखीचे व नातेवाईक लोकं आहेत, म्हणून मी ते ड्रेसेस् अमेरिकेसाठी ठेवले व सारे कपडे दुसऱ्या बॅगेत लंडनलाच ठेवून आले आहे.'

'आता पुढच्या वेळेला येशील, तेव्हा हा असला पंजाबी घाल...' फ्रेडली हसत हसत गमतीनं म्हणाला.

'हा माझा नेहमीचा ड्रेस नव्हे...' मी म्हणाले.

'मग कोणता ?' फ्रेडलीनं आश्चर्यानं विचारलं.

'साडी. .' मी म्हणाले. तेव्हा काहीच अर्थबोध न झाल्यासारखा त्याचा चेहरा प्रश्नांकित.

'उद्या नेसेन, तेव्हा पाहा...' मी म्हणाले.

'आणला आहेस ?' फ्रेडलीनं बालकाच्या उत्साहात विचारलं.

'छान, फोटोच्या वेळी साडी घाल.' हे बोलताना फ्रेडली अगदी भलताच उत्साहित झाला होता.

'तू साडी आणली आहेस ?' फ्रेडलीनं स्वातीला विचारलं.

स्वातीनं अर्थातच 'नाही' असं सांगितलं. तेव्हा मान हालवत तो म्हणाला

'व्हेरी बॅड... नेक्स्ट टाईम...' फ्रेडली प्रेमळ स्वरात दटावत होता.

पांघरूण वगैरे दाखवायला आयरिस खाली आली व बेडस् दाखवता दाखवता तिनं आमचे बेडस् घालूनही टाकले. मग आम्ही वर गेलो.

हॉलमध्ये आम्ही गप्पा मारीत बसलो होतो. तिथली ताजमहालची प्रतिकृती पाहून मी

विचारलं,

'भारतात कुठं कुठं जाऊन आलात ?'

'दिल्ली, जयपूर, उदयपूर... 'फ्रेडली म्हणाला.

'मग दिलवारा टेम्पल्स पाहिलेच असशील !' स्वाति म्हणाली.

'नाही. ते कुठं आहेत ?'

'उदयपूरच्या शेजारीच माऊंट अबू आहे, नि तिथली दिलवारा ही देवालयं अत्यंत देखणी आहेत...' असं सांगून आम्ही त्या देवळाचं वर्णन केलं.

तेव्हा आश्चर्यानं आमच्याकडे पाहत तो म्हणाला,

'आम्हांला हे कुणी सांगितलंच नाही.'

आपल्या प्रसिद्धी खात्याचं कौतुक करावं, तेवढं थोडंच ! प्रत्येक परदेशी प्रवाशामागं प्रसिद्धी अधिकाऱ्यांना परसेंटेज ठेवलं, तर मात्र ही सेवा ते ममतेनं करतील. भारतातील परसेंटेजवाली सेवावृत्ती मात्र अगदी चोख आहे.

'आता आमच्याकडे या. मग आम्ही सर्व प्रोग्रॅम बसवून देऊ.' स्वाति म्हणाली.

'नेक्स्ट टाईम...' फ्रेडली म्हणाला.

फ्रेडली उदयपूरपर्यंत येऊन त्यानं दिलवारा टेंपल्स पाहू नयेत, ह्याची चुटपूट आम्हांला वाटली.

## आईची ममता

फ्रेडलीला एक मुलगा व एक मुलगी. मुलानं लग्न केलेलं नाही. गेली सोळा वर्षं तो एका गर्लफ्रेंडबरोबर राहतो. फ्रेडलीच्या घराजवळ फ्रेडलीच्या मुलाचा मित्र राहतो. त्या मित्राला गाडीतून सोडायला फ्रेडलीचा मुलगा खूपदा येतो. तेव्हा यांनाही भेटून जातो.

'बरं, त्या निमित्तानं तुमच्या घरीही येतो.' मी म्हटलं.

'होऽ. आमची नेहमी चवकशी करतो.' फ्रेडली उत्साहात म्हणाला.

पण आयरिसचा चेहरा खिन्न झाला होता.

'नुसतं बाय् बाय् करून जातो. त्याला पाच मिनिटं बसायला वेळ नसतो.' आयरिस खिन्नपणे म्हणाली.

'का?' काहीच न समजून मी विचारलं.

'पण त्याच्या गर्लफ्रेंडला तो उशिरा घरी आलेला चालत नाही.' आयरिस म्हणाली. ती अस्वस्थ होती. तिची त्या गर्लफ्रेंडविषयीची नाराजी शब्दांत लपत नव्हती.

सर्वसामान्य भारतीय स्त्रीप्रमाणे आपल्याला मुलं व्हवी, ती आपल्या घरी यावी, आपला वंश चालू राहवा, अशी तिची अपेक्षा होती. पण मुलगा व सून नवविचारांची आहेत. लग्न झालं, की एकमेकांवर हक्क गाजवणं आलं. मग ओघानंच भांडणं होतात. त्यापेक्षा एकमेकांजवळ पटतंय, तोपर्यंत राहायचं. पटत नाही, असं लक्षात आलं, तर निघून जावं, हा त्या दोघांचा विचार आहे. पण मूल व्हायचं असेल, तर हा विचार इतक्या सहज घेणं शक्य नसतं. म्हूणन दोघांनाही अजून मूल झालेलं नाही. आयरिसला मात्र हे पसंत नाही. आजपर्यंत लोकांनी लग्नं केली, त्यांना मुलं

१७१ भें.प्रवास

झाली. आपल्याही मुलाचं लग्नं व्हावं, असं तिला राहून राहून वाटतंय्. फ्रेंडलीनं मात्र ते सारं सहज घेतलंय्.

तो अगदी सहजतेंनं म्हणाला.

'आमच्याकडे एका पिढीचे विचार दुसऱ्या पिढीच्या विचारांशी जुळतातच, असं नाही. ते तिकडे सुखी. आम्ही इकडे सुखी.'

मी जराशी हसले. नेमकं आपण काय सांगणार ! दोघंही वयस्क. त्यामुळं आता कुणाच्याही विचारात परिवर्तन होणं अशक्य.

फ्रेडली मात्र उत्साहात सांगत होता,

'मात्र आमचा मुलगा आम्हाला आठवड्यातून एक-दोनदा भेटायला येतोच.'

'काय उपयोग ? नुसतं टाटा करून जातो.' आयरिस खिन्नपणे म्हणाली.

मुलानं येऊन नुसतं 'बाय् बाय्' करून जाणं फ्रेडलीला पुरेसं आहे. आयरिसला तेवढ्यात मुळीच समाधान नाही. आपल्याच रक्तामांसाच्या मुलानं इतकं परकं होणं हे तिथल्या आईलाही दुःखदायक वाटत होतं. शेवटी 'आई' इकडे काय वा तिकडे काय ! मुलाविषयी ओढ मुळीच कमी झालेली नाही,

जरा वेळानं मी आयरिसला विचारलं,

'तुमच्याकडे मुलगा झालेला आवडतो, की मुलगी ?'

'अर्थात मुलगाच !' आयरिस सहजपणे म्हणाली.

'का ? मुलगा का व्हावा वाटतो ?' मी आश्चर्यानं विचारलं. कारण मुलगा काय अथवा मुलगी काय, वयात आल्यावर आईवडिलांजवळ कुणीच राहत नाही.

तेव्हा आयरिस शांतपणे म्हणाली,

'आमच्या इथं मुलगा झालेलाच सगळ्यांना आवडतो. कारण तो आपलं नाव पुढं चालू ठेवतो.'

मला आश्चर्याचा दुसरा धक्का बसला. पुढारलेल्या देशातही, आपलं नाव चालू राहावं, ही ओढ कायम असणं म्हणजे फारच होतं. 'वंशाचा दिवा' - 'किती प्रकाश पडला' म्हणून आपण चेष्टा करतो. पण पुढारलेल्या ह्या देशात आपलं नाव राहावं, ही ओढ आहेच व गर्लफ्रेंडच्या नादानं आपला मुलगा लग्न करीत नाही, आपलं नाव पुढं चालू ठेवणारा आपला नातू नाही. ह्या साऱ्यांची खंत आयरिसच्या मनात मावत नव्हती.

'फ्रेडलीप्रमाणे तू हे सारं सहजतेनं घे. नाही तर दुसरा इलाज तरी काय आहे?' असं आयरिसला समजावं, असं मला राहून राहून वाटत होतं. पण मी दोन दिवसांची पाहुणी. दोन दिवसांत हा विचार मनात रुजणं हें तितकं सोपं नव्हतं. मी विषय दुसरीकडे नेण्याकरता विचारलं,

'तुम्हांला एक मुलगी आहे ना ?'

'हो, आहे ना...' आयरिस थंडपणे म्हणाली.

'ती काय वयाची आहे ?'

'बेचाळीस वर्षांची आहेत,' आयरिस जेवढ्यास तेंवढं उत्तर देत होती, की आपल्या इथल्याप्रमाणे मुलीच्या मुलांविषयी आज्यांना तेवढी ओढ नसते, तसंच इथं आहे.... माझ्या

मनात शंका आली.

'ती काय करते ?' मी विचारलं.

'काय करणार ! नोकरी करते नि आपल्या तीन कुत्र्यांना घेऊन राहते.' आयरिस म्हणाली.

'आमच्या मुलीनं लग्न केलेलं नाही. ती एकटीच राहते.' फ्रेडली म्हणाला.

'तीन कुत्रे आहे. तिच्याबरोबर आपल्या लहान मुलाप्रमाणेच ती त्या कुत्र्यांचं कौतुक एकसारखी करत असते.' आयरिस म्हणाली.

येणारं हसू मी संयमानं दाबलं.

लग्न करणं, मग मूल होणं व मूल झालं, की आपली उमेदीची वर्षं मुलांचं संगोपन करण्यात घालवणं, हे आता तिथल्या मुलींना आवडेनासं झालं आहे. शिवाय लग्न करणं म्हणजे एकमेकांना समजून घेणं आलं, एकमेकांशी जमवून घेणं आलं. हे ज्यांना काहीच नको, ती लग्न करत नाहीत. पण विरंगुळा म्हणून कुत्री पाळतात. फ्रान्समध्ये जवळ जवळ प्रत्येक बाईच्या हातात एक कुत्र्याचं पिल्लू असायचं, ते ह्याच कारणानं तर नव्हे ?.... माझ्या मनात आलं.

फ्रेडली हसत हसत म्हणाला,

'तीन कुत्रे म्हणजे आमच्या मुलीची तीन मुलंच आहेत. त्यांना आंघोळ घालणं, त्यांना खाऊ घालणं... केवढे तरी तिचे उद्योग चालू असतात.'

'काही विचारू नकोस ! त्या कुत्र्यांची लाडकी नावं. त्यांना गोंजारायचं; पण किती झालं, तरी ते कुत्रेच !' आयरिस सांगत होती. तिला त्या कुत्र्यांचा खूप राग येत असावा.

'घरी येते ना ?' मी विचारू, न विचारू, असं वाटत असताना अखेर विचारलंच.

'येते, केव्हा केव्हा, पण कुत्र्यांना ठेवून फार वेळ येता येत नाही.' आयरिस जरा नाराजीनंच म्हणाली.

मुलगी व त्या अनुषंगानं जावई व नातवंडं हे काही नाहीच. नातवंडांचे भलेबुरे अनुभव, सारं खुंटलेलं होतं व कुत्र्यांचं कौतुक ऐकण्यात आयरिसला बहुधा स्वारस्य नसावं.

झोप अगदी डोळ्यांवर आली होती. ते ओळखून फ्रेडली म्हणाला,

'आता तुम्ही झोपायला जा. आपल्याला उद्या फिरायला जायचंय्. तुम्ही स्नान वगैरे आटपून बरोबर साडेआठला नास्त्यासाठी डायनिंग टेबलाशी या. तुम्हांला नऊ सव्वानऊला इथून निघायचं.'

'काय जमेल, की नाही ?' स्वातीला त्यानं विचारलं.

'हो, हो ! का नाही जमणार !' स्वाति उत्साहात म्हणाली.

आम्ही जिनीव्ह पाहायला उत्सुक होतोच.

बेडवर पडल्या पडल्या स्वाति म्हणाली,

'वा ऽऽ, काय सुरेख बेड्स आहेत !'

'पण असे पलंग तर आपल्या घरीही आहेत...' मी म्हणाले.

'पण अशा सुंदर देशात, असं छान झोपायला मिळतंय्. श्रीखंडच, पण हे चांदीच्या वाटीतलं आहे.'

'स्विझर्लंडमधले बेड.... असं मनातल्या मनात म्हणत मीही.सुखानं झोपले.

दुसऱ्या दिवशी मी जेव्हा साडी नेसले, तेव्हा ती साडी, आयरिस आणि फ्रेडली दोघांनाही खूप आवडली.

लगेच फ्रेडली स्वातीला म्हणाला,

'तू का नाही अशी साडी नेसलीस ?' नि माझ्याकडे पाहत म्हणाला, 'अ नाईस ड्रेस!'

साडेआठ वाजता नास्त्यासाठी टेबलाशी यायला फ्रेडलीनं सांगितलं होतं. त्याप्रमाणे आम्ही स्नान आटपून, बाहेरचे ड्रेस घालून तयार झालो.

## जिनीव्ह

फ्रेडली नास्ता खात होता. त्याचा नास्ता चांगलाच जबरदस्त होता. तीन-चार प्रकारच्या लाह्यांचा मोठा ढीग करून, त्यांत मध व दूध घालून तो खात होता. ढिगावर त्यानं थोडे बदाम घातले होते. त्या लाह्यांत साळीच्या लाह्या पण होत्या. आम्हांलाही, तेवढंच खाण्याचा, फ्रेडली जोरदार आग्रह करीत होता.

नंतर फ्रेडलीनं आम्हांला जिनीव्हमध्ये काय काय पाहाल, त्याचा प्रोग्रॅम आखून दिला. आल्प्स पर्वताचा एक मोठा नकाशा व दोन कॅलेंडरं आम्हांला दिली. फ्रेडलीनं गाडीतून स्टेशनवर सोडलं.

जिनीव्हला जाणाऱ्या गाडीत आम्ही बसलो. आख्खा डबा जपानी लोकांनी भरलेला होता.

जिनीव्ह सरोवराच्या पश्चिम टोकाला जिनीव्ह वसलेलं आहे. जिनीव्हमध्ये सरोवराशी जिथं तिथं कारंजी थुई थुई नाचताना दिसतात. रोन नदी मध्यावर छेद देऊन पुढं फ्रान्स व मेडिटेरियन सीकडे जाते. ख्रिस्तपूर्व ५८ ते इ. स. ४४३ पर्यंत, जिनीव्ह रोमच्या वर्चस्वाखाली होतं. त्यामुळं इथं सेंट पीटरचं कॅथेड्रल दिसतं. रशियाचं एक स्मारकही दिसतं. त्यासाठी चार हजार स्विस फ्रँक खर्च आला. रशियाच्या झारनं हा पैसा दिला.

रेल्वे स्टेशनवरून बाहेर पडलं, की जिनीव्ह हे सुंदर सरोवर दिसतं. इथंच उजव्या बाजूला जिनीव्ह पार्क आहे. तऱ्हतऱ्हेच्या रंगीबेरंगी फुलांनी डिझाईन्स केलेला पार्क दिसतो 'हाऊस ऑफ रूफ' ही हिरव्या कमळासारखी वनस्पती आहे. ह्या हिरव्या कमळाचं बनवलेलं फुलांचं घड्याळ आहे. ही बारा कमळं म्हणजे ह्या घड्याळाचे बारा आकडे. इथंच दोन बहिणींचा एक स्टॅच्यू दिसतो. एक बहीण ही स्वित्झर्लंडचं प्रतीक आहे, तर दुसरी बहीण म्हणजे जिनीव्ह. एक सर्वशक्तिमान अशा सिंहाचा लाकडी पुतळा आहे. सिंहानं डोळे शांतपणे मिटले आहेत. ( जे जिनीव्हचं प्रतीक) व त्याच्या डोक्यावर झाड आहे. त्याला फुलं आहेत व त्यावर पक्षी बसले आहेत. असं आनंदी वातावरण आहे.) मात्र सिंहाच्या हातात किल्ल्या आहेत. सरोवराच्या उजव्या बाजूला गेलं, की 'रोन' नदी लागते. 'पाँत ऑईल' वरून 'बेल एअर' वरून जात राहायचं, की मग 'ग्रँड थिएटर' लागतं. हे नंतर 'कॉन्झरव्हेटरी ऑफ म्युझिक' लागतं. त्यानंतर फिरून एक मोठं पार्क लागतं नि जिनीव्ह युनिव्हर्सिटी व जिनीव्हचं 'रिफॉर्मेशन मेमोरियल' हे अतिप्रचंड असं स्मारक दिसतं.

परत जिनीव्ह सरोवराच्या बाजूला यायचं होतं. इथं जगातली मोठमोठी घड्याळं आणि ज्युएलरीची दुकानं दिसतात. इथं लाख, दोन लाख डॉलर्सची सुद्धा घड्याळं असतात. मोठ्या टोले देणाऱ्या घड्याळापासून, टोल्यांच्या वेळी जादू करणाऱ्या घड्याळापासून अगदी अंगठीएवढी घड्याळं असतात. अंगठीत बसतील, अशी घड्याळं चिक्कार महाग असतात. कारण त्यांत हिरे बसवलेले असतात. हिरे, माणकं, पाचू वगैरे सेट पाहताना आपण दुकानात हिंडतो आहोत, की एखाद्या राजवाड्याच्या म्यूझिअमध्ये, असा संभ्रम पडतो. राजवाड्याप्रमाणेच, ही अतिभव्य दुकानं नीटनेटकी नि देखणी असतात.

परत आम्ही पार्कमध्ये हिंडत होतो. सरोवराशी आलो. जिकडं तिकडं जपानी लोकं दिसत होती. सरोवराशी मुलं आपल्या बुटांनी पाव तोडत होती. मुलांचा हा वात्रटपणा पाहून आईनं ओरडावं, तर आई पण तोच उद्योग करत होती. त्यांनी ते तुकडे पाण्यात टाकले. तर पाव खाण्यासाठी असंख्य माशांच्या झुंडी पाण्यावर आल्या.

स्टेशनच्याच शेजारी असलेलं 'जेट दी आव' हे जगातलं पहिल्या नंबरचं कारंजं आम्ही पाहत होतो. ह्या कारंज्याचं पाणी जवळ जवळ शंभर मीटरपर्यंत वर उडत असतं. त्यामुळं लांबूनही ते दिसतं. हे कारंजं सहा टन पाणी फेकत असतं. ते थुई थुई उडतं पाणी अत्यंत मनोहारी दिसतं. ह्या उडत्या पाण्यावर सूर्यकिरण पडल्यानं त्यातून इंद्रधनुष्यं दिसत होती. ते उडतं थुई थुई पाणी कितीही पाहिलं, तरी समाधान होईना. इतकं उंच उडणारं पाणी पाहणं हा आयुष्यातला सौख्याचा भाग वाटत होता. समाधानच होत नव्हतं.

बरोबर सव्वासहाला गाडीत बसलो. फ्रेडली सह वीसला येणार होता. जिनीव्ह ते इंटरलेकन हा प्रवासही फार रम्य आहे. हा प्रवासही सरोवरं आणि झाडींच्या सहवासातून पार होतो. सुंदर निसर्गही पाहायला मिळतो व रेल्वेचा श्रीमंती थाटही असतो. स्वित्झर्लंडमधली माणसं जणू स्वर्गात राहतात. आयरिस स्वयंपाक करते, ते सुद्धा 'जुंग फ्राव' माऊंटनची शोभा पाहत ! त्याच वेळी गरम व गार पाण्याचा नळ सोडते. निसर्ग आणि यांत्रिकीकरण ह्यांचा सुरेख संगम.

## माहेरघर

घरी गेलो, तो भूक सपाटून लागली होती. सगळं पाहण्यात जेवण वा काही खाणं असं झालंच नाही. आयरिसनं आधी चहा केला व सफरचंद, दोन-तीन तऱ्हेची बिस्किटं, सिरिअल्स, दूध वगैरे पुढ्यात ठेवलं.

'केळं हवंय् ?' फ्रेडलीनं विचारलं.

'नको. आम्ही सफरचंदच घेऊ.' मी म्हणाले.

इथल्या केळ्याला तेवढी चव नाही. पण केळ्याचं कौतुक जास्त. इथली सफरचंदं मात्र अत्यंत रसाळ व घट्ट असतात. लंडनपासून जो प्रवास चालू होता, तेव्हा एकदाही वाईट सफरचंद हाती आलं नाही.

तोपर्यंत आयरिसनं सूप बनवलं होतं. ते गरम गरम दिलं व पाव व बटर पुढ्यात करत म्हणाली, खा. सूप बनवण्यात आयरिसचा अगदी हातखंडा होता.

'तुम्ही स्वित्झर्लंडला येऊन स्वित्झर्लंडची वाईन घेत नाही, हे काही बरोबर नाही हं. .'

फ्रेडली म्हणाला.

'पण आम्हांला आवडत नाही...' स्वाति म्हणाली.

'जे त्यांना आवडत नाही, त्याचा आग्रह करायचा नाही हं...' आयरिसनं दटावलं.

तेव्हा, 'हु हु हु' करत, फ्रेडली लहान मुलासारखं हसला.

माहेर सापडल्याचा आनंद झाला.

## वसुबारस

रात्री डिनर झाल्यावर फ्रेडली आम्हांला त्याच्या कॅसेट रूममध्ये घेऊन गेला.

आल्प्स पर्वतातील पारंपरिक समारंभाची ती कॅसेट होती. गाई पर्वतावर चरत चरत अगदी वर जातात. बर्फ पडायच्या अगोदर म्हणजे सप्टेंबर महिन्यात त्या खाली येतात, तेव्हा हा समारंभ असतो. गाईचं दूध, दूधापासून चीज बनवणं हा स्वित्झर्लंडचा पूर्वापर उद्योग आहे. आपल्या इथं 'वसुबारस' घरोघरी होई. तसाच इथं सगळ्या गाईंचा मिळून सामुदायिक उत्सव असतो.

गाईंना पर्वतावरून अगदी थाटामाटात खाली आणतात. त्यांच्या शिंगांना फुलांनी सजवलं जातं. त्यांच्या गाडीच्या चाकांना सगळीकडे फुलं लावली जातात. छान छान झुली त्यांच्या पाठीवर असतात व वाद्य-वाजंत्री वाजवत, मोठ्या आदरपूर्वक त्यांना खाली आणलं जातं.

त्यानंतर काही सायकलस्वार येतात. सायकलीला पुढं मोठं चाक व मागं लहान असा विदूषकी थाट असतो. तर मध्येच दोन-दोन अशा जोडीजोडीनं नवयौवना आपल्या शरीराला कमनीय हेलकावे देत हातांत टपोरी व रंगीबेरंगी फुलं घेऊन, नजरेला धन्य करत जातात. नंतर काही ट्रक्स जातात. त्या उघड्या ट्रकमध्ये काही माणसं धान्य झोडपत असतात. तर त्यानंतर येणाऱ्या ट्रक्समधून धान्याची पोतीच्या पोती भरलेली असतात. ह्या ट्रक्सना सुद्धा फुलांच्या माळांनी सजवलं जातं.

काही बायका पारंपरिक पोशाख घालून जात होत्या. त्याकडे अंगुलिनिर्देश करत फ्रेडली गमतीनं म्हणाला,

'ही इकडची साडी...' नि मग स्वातीकडे वळून पाहत म्हणाला, 'आता परत येशील, तेव्हा पंजाबी ड्रेस घालून यायचं.'

'नक्कीच !' स्वातीनं आश्वासनं दिलं. जसं काही स्वित्झर्लंड पुण्याप्रमाणे अगदी जवळ होतं ! पण स्वातीनं तो मूड जपला होता.

बायका, पुरुष कुणी पारंपरिक पोशाखात, तर कुणी आधुनिक पोशाखात जात असतात. सगळे अगदी मजेत ठुमकत, लचकत जात असतात.

नंतर चीजच्या लाद्यांच्या लाद्या आणल्या जातात. एकेक चीजची लादी खूप मोठी व घट्ट असते, की एक जण ती विस्तवावर विरघळवतो व दुसरा वितळवलेली चीजची स्लाईस सुरीनं सरकून पावावर घालतो व सगळे मजेत ते खात असतात.

स्वित्झर्लंडमधलं चीज व चॉकलेट्स अत्युत्तम असतात. आपल्या इथं नेसलेची 'मिल्क बार' चॉकलेट्स मिळतात. त्यांत काजू, बदाम मिसळले, की स्विस चॉकलेट झालं. इथं 'वाईन'

असलेली चॉकलेट्सही मिळतात. ते मला आवडलं.

त्यानंतर फ्रेडलीनं १ ऑगस्टची 'नॅशनल डे' फिल्म दाखवली. निशाण लक्षात ठेवायला सोपं. रेड क्रॉसचं चिन्ह रंग फक्त उलटे. पांढऱ्यावर लाल फुली असते. इथं लाल रंगावर पांढरा क्रॉस, असं हे निशाण. ही निशाणं घेऊन काही लोकं जात असतात. काही लोकांच्या हातांत अस्वल असलेलं निशाण, तर काही लोकांच्या हातांत चांदण्या असलेली निशाणं होती. ही निशाणं प्रादेशिक होती. अस्वल असलेलं निशाण बर्नचं होतं. सर्व प्रदेशांची मिळून एकत्र अशी ही परेड जाते. फ्रेडलीकडे अशा विविध तऱ्हेची दीडशेच्यावर कॅसेट्स आहेत.

त्यानंतर हवाई बेटावरची फिल्महीदाखवली. ती पाहताना गोव्याची आठवण येते. बायका मात्र फारच जाड होत्या.

'सर्वांत कोणती फिल्म आवडली ?' फ्रेडलीनं उत्साहात विचारलं.

'आल्प्स पर्वतावरून गाई खाली येतात, ती फिल्म...' स्वातीनं व मी पटकन म्हटलं.

'मग पुढच्या वर्षी सप्टेंबर महिन्यात या. आपण तो समारंभ पाहायला जाऊ.' फ्रेडली सांगत होता.

आम्ही नुसत्याच हसलो. दरवर्षी स्वित्झर्लंड ! मनात आलं, त्याला सांगावं, की स्विस बँकेत आमचं खातं नाहीये. पण ती फिल्म पाहून स्वित्झर्लंडशी गट्टी झाल्यासारखं झालं होतं, तो मूड खराब करावा, असं वाटेना.

## ब्ल्यूक लेक आणि हिमनदी

आम्ही फ्रेडलींकडे गेलो, हॅन्सनं व आयरिसनं आम्हांला, 'काय काय पाहिलं?' असं विचारलं होतं.

'आम्ही तितलीजला जाऊन हिमनग पाहिले...' आम्ही उत्साहात म्हणालो.

'आता काय, 'जुंग फ्रॉव माऊंटन' पाहिले, की झालं...' मी म्हणाले.

'तुम्हांला अजून बरंच स्वित्झर्लंड पाहायचंय्.' आयरिस म्हणाली.

पुढं खूप हिंडलो, तेव्हा लक्षात आलं, की हे म्हणजे 'रंकाळा' (कोल्हापूरचा) पाहून समुद्र पाहिला म्हणण्यासारखं होतं.

आदल्या दिवशी रात्री, आल्प्स पर्वतावरून उतरणाऱ्या गाईंची फिल्म झाल्यावर फ्रेडली म्हणाला.

'उद्या आठ वाजता डायनिंग टेबलाशी तयार होऊन यायचं. उद्या आपल्याला सबंध दिवस पाहत राहायचंय्. तुम्हांला खूप मजा दाखवतो...' असं म्हणत तो खुशीत हसला.

सकाळी आठ वाजता नास्ता घेतल्यावर आम्ही निघालोच.

स्वित्झर्लंडला गाडीतून हिंडण्याची काही औरच मजा वाटते. थंडगार सुखद हवा, अत्यंत स्वच्छ रस्ते, शांत वातावरण, रस्ता काटत गाडी जात असते. मध्ये कसलेही अडथळे नाहीत, हॉर्नचे आवाज नाहीत. ह्याला कारण माणसं कमी असणं. माणसांचा शुकशुकाटच. शिवाय माणसं प्रामाणिक, त्यामुळं रस्ते पक्क्या बांधणीचे आहेत. आपल्या इथं खड्ड्यांशिवाय रस्ता

नि पूल न पडणारे असणं हे स्वप्नातच शक्य आहे. तसं इथं नाही. गाडीला खचकन् ब्रेक लावावा लागत नाही. आट्यापाट्या खेळत गाडी चालवावी लागत नाही. अत्यंत मुलायमपणे गाडी जात असते. शिवाय आजूबाजूला ज्यूनिपर, फर, पाईन वगैरे झाडांची सावली. कधी शेती चालू, तर कुठं हिरवेगार डोंगर. तर कुठं पळत्या पाण्याचा, लांबवरून येणारा आवाज.

हिरवीच; पण त्यात सात-आठ विविध छटा असलेली पानांची दुनिया पाहत, आम्ही गाडीतून जात होतो. मध्येच गाड्यांना जायला टनेल लागतं. तेही ऐसपैस, दिव्यांनी सुशोभित नि अत्यंत स्वच्छ असतं. ह्याचि देही ह्याचि डोळा लोकं इतकी सुखात राहतात ! आपल्याला मेल्यावर स्वर्ग दिसू शकतो. इथं जिवंतपणी ! गाडी ९० ते १२० कि. मी. च्या वेगानं चालली होती.

'तुमच्या भारतात डॉक्टर लोकं, खूप चांगली हं...' हॅन्स फ्रेडली म्हणत होता.

'तुला काय अनुभव ?' स्वातीनं विचारलं.

'मी माझ्या पायाचं ऑपरेशन करवून घ्यायला मुद्दाम भारतात आलो होतो. भारतात ऑपरेशन करणं किती तरी स्वस्त पडतं. शिवाय डॉक्टर निष्णात असतात नि तरीही ऑपरेशन स्वस्त नि तरीही डॉक्टर प्रेमळ !'

काही डॉक्टर लोकांनी भारताची शान राखली ! मला खूप आनंद वाटला.

गाडीतून उतरून आम्ही चालू लागलो. घनगर्द झाडीतून आम्ही डोंगराकडे चाललो होतो. नंतर एका तिकीट-खिडकीपाशी-प्रत्येकी ३ ५० स्विस फ्रँक असं तिकीट काढलं नि एका परीच्या राज्यातील ब्ल्यू लेक सरोवराशी गेलो. सुंदर निळं पाणी, सभोवती उंच उंच झाडं असलेले हिरवे डोंगर, एका बाजूनं गर्द वनराई नि मध्ये ही निळी किमया !

फार वर्षांपूर्वी भूकंप झाला, नि फीसी स्टॉक पर्वतावरचा प्रचंड हिमनग कोसळला. त्या वेळी कँडर व्हॅली थरथरली ! त्यामुळं हे विस्तीर्ण चौकोनी सरोवर निर्माण झालं. ह्याचं पाणी पारदर्शी, खालचा तळ दिसेल, असं निळं आहे. म्हणून ह्याला 'ब्ल्यू लेक ' असं नाव मिळालं. हा लेक साधारण १५०० वर्षांपूर्वी तयार झाला. १८७८ मध्ये मध्ये लीमान ह्या माणसानं ह्या ब्ल्यू लेकचा कब्जा घेतला.

हा ब्ल्यू लेक नुसताच डोळ्यांनी पाहायचा नव्हता, तर आम्ही त्यातून जाणाऱ्या नावेतून विहार करणार होतो. नाव चालवणारा नावाडी छान श्रीमंती कपड्यांत होता नि छान हसत होता. ती गर्द हिरवी वनराई नि ते निळं पारदर्शी पाणी पाहत आम्ही विहार करीत होतो. सुळसुळते मासे वर येत होते. एका मुलानं सरोवरात पाव टाकला, की ट्राउट नावाचे काळे लांबट मासे थव्यांनी वर यायचे. पाव टाकून मग मासे वर आले, की तो ते मासे पकडण्याचा प्रयत्न करायचा. पण मासे सळकन् सटकत होते.

ब्ल्यू लेकमधला विहार म्हणजे स्वप्निल जगात हिंडत असल्यासारखं वाटत होतं. मध्येच एके ठिकाणी झाडं पडलेली दिसली. इतक्या सुंदर सरोवरात झाडं पडलेली ! मन अस्वस्थ झालं. पण नंतर लक्षात आलं, की सभोवतीच्या झाडांची सावली सरोवरात पडली आहे ! पाण्याच्या पारदर्शीपणाचं हे एक नाट्य !

आमचा विहार संपला नि सगळ्यांनी घरच्याच माणसाला टाटा करावा, तसा नावाड्याला टाटा केला व बक्षिसीही दिली. आपल्या इथं श्रीमंत लोकांनीही नावाड्याला अशी बक्षिसी दिलेली मी पाहिली नाही. आपल्यावर हा संस्कारच नाही. खाजगी ड्रायव्हर, नावाडी वगैरे श्रमिक लोकांचं कौतुक पाश्चात्त्य देशांतच पाहायला मिळतं. वरकमाई, सरकारी अंमलदारांनीच लाटायची असते, अशी आपली आमची कल्पना.

इथंच ह्या ट्राऊट माशांची मोठी नर्सरी आहे. पापीज् ममीज् एकत्र येतात व अंडी घालतात. नंतर दोन महिन्यांचे झुरळाच्या आकाराचे मासे दिसतात. ते मोठे, होत एक पौंड वजनाएवढे मोठे होतात. मग ह्यांना 'टायनी फ्राय' म्हणतात.

नंतर दीड ते दोन किलो व केंव्हा चार किलो वजनाचे हे मासे होतात. पूर्ण वाढ झाली, की मासे इथल्या हॉटेलांत पाठवतात. मासे खाणाऱ्यांना ह्या माशांची चव अतिशय आवडते. ह्या हॉटेलात त्याच्या वेगवेगळ्या डिशेस् बनतात.

गाडीतून आणखी एका डोंगरापाशी गेलो. तिथं विंड ग्लायडिंग करणारी माणसं दिसली. एखाद्या पक्ष्यासारखी ही माणसं विंड ग्लायडिंग करीत होती.

'काय मजा, नाही ?' मी ते उडते पक्षी पाहत म्हटलं.

फ्रेंडली हसला नि नंतर म्हणाला,

'हवेत हिंडायला खूप मजा वाटते.'

'म्हणजे तूही विंड ग्लायडिंग करीत होतास ?' मी आश्चर्यानं विचारलं.

'तर !' फ्रेंडली लहान मूल होत म्हणाला.

खरं तर, फ्रेडली हाही मोठ्या आकाराचा पक्षीच होता.

'एकदा एक माणूस विंड ग्लायडिंग करताना डोंगरावरच्या झाडांतच अडकला होता. ' उत्साहात फ्रेडली म्हणाला. नि 'हूऽ हूऽ' करत हसला.

'बाप, रे ! म्हणजे विंड ग्लायडिंग धोक्याचं दिसतंय्.'

'तरी विंड ग्लायडिंग करणं काही कुणी सोडत नाही. तास तास हवेत उडत असतात.'

काही तासांसाठी का होईना, स्वत: पक्षी होता येणं, किती मजेचं !

'चला, आता मी तुम्हांला थुन कॅसलला घेऊन जातो.. ' फ्रेडली उत्साहात म्हणाला.

## थुन कॅसल

स्वित्झर्लंड म्हणजे हिरवे डोंगर, सरोवरं नि उंच उंच वनराई नि तरी अत्याधुनिक पक्क्या बांधणीचे रस्ते नि सुंदर सुंदर गाड्या. कधी कधी केवढ्या तरी अनेकानेक गाड्या मजल्यावर मजले असलेल्या गाड्यांतून जाताना दिसत. पण कारखान्यांचा धूर, तो गचाळपणा मात्र कुठं दिसला नाही. खेड्यातील शांतता नि शहरातील चैनी अशा दोन्ही गोष्टींचा आनंद ही लोकं उपभोगू शकतात. थुन कॅसलजवळ फ्रेडलीनं गाडी उभी केली नि आम्ही फुलांचा देशात गेलो.

'थुन कॅसल' हा तेराव्या शतकातील जुना किल्ला आहे. सारं लाकडी बांधकाम असून, अजूनही जसाच्या तसा व्यवस्थित आहे. पूर्वीच्या काळी लाकडावर छानसं नक्षीकाम केलेलं असायचं, नक्षीकाम इथंही दिसत होतं. ह्या राजाला दोन बायका होत्या. त्या दोन बायकांना

छत्तीस मुलं झाली. त्यांच्यासाठी हा कॅसल बांधला गेला.

एखादा सुंदर फुलांचा गालिचा पसरावा, तशी फुलं मध्यभागी उगवली होती. एक तर इतकी विपुलतेनं फुलं उगवतात, ह्याचंच आश्चर्य ! त्यात रांगोळी घालावी, तशी नेटकेपणानं उगवतात, ह्याचं आणखीनच आश्चर्य वाटलं. आपल्या इथं मार्केटमध्ये पाट्यांतून फुलं दिसतात. तसा फुलांचा समूह, पण इथं जमिनीतून वर आलेला ! विविधरंगी, विविध आकाराची फुलं ! हा झाला मध्यभाग. मधली जागा सोडलेली नि बाजूनं फिरून विविध रंगीबेरंगी टपोऱ्या फुलांची, नजाकतदार फुलांची मेंदी घातलेली-जांभळी, निळी, गुलाबी, किरमिजी वगैरे अनेकानेक रंग !

निसर्गाची इतकी सुंदर अदाकारी नि फ्रेडलीसारखा फोटोग्राफर नि त्याचा अत्याधुनिक कॅमेरा. फ्रेडलीला आम्ही सर्व्हास-मेंबर असल्यानं आमची फिल्म घ्यायची होती. पण फोटोला उभं राहतात, तशी पोझ त्याला नको होती. आम्ही एकमेकींशी गप्पा मारत, फुलांविषयी एकमेकींना माहिती सांगत, हसत मजेत पुढं जायचं होतं. फ्रेडली एखाद्या डायरेक्टरसारखा जणू सिच्युएशन शॉट समजावून सांगत होता. आम्ही, त्यांनी सांगितलं, त्याप्रमाणे केलं. फ्रेडली एकदम खूश झाला. फोटो काढताना पण मान किंचित तिरकी करायला तो सांगायचा. जीवन कसं जगावं, ते फ्रेडलीकडून शिकून घ्यावं.

दुपारचे साडेबारा वाजून गेले होते. बाहेर पडलो नि फिरून 'जुंग फ्रॉव'नी दर्शन दिलं. दुपारचं ऊन होतं, तरी गाडीतून हिंडताना आजूबाजूच्या गर्द झाडीमुळं ते जराही जाणवत नव्हतं. आम्ही समर-व्हेकेशनमध्ये म्हणजे, चक्क उन्हाळ्यात तिथं गेलो होतो, तरी गुलाबी थंडी तिथं होती. अधून मधून पाण्यानं दंगा करावा, तसा आवाज ऐकू यायचा. मध्येच हिरवे पर्वत, तर कधी हिमनगांनी पांढरे झालेले पर्वत.

'हवा भलतीच छान आहे ! एरवी ह्या दिवसांत एवढी स्वच्छ हवा नसते.'

'होऽ.' आम्ही बोलायचं, म्हणून बोललो.

'तर ! एरवी धुकं असतं; पण गेले दोन दिवस हवा स्वच्छ नि निरभ्र आहे. त्यामुळं दूरवरूनंही हे ग्लेसिअर्स दिसताहेत.' फ्रेडली सांगत होता.

आमचं अहो भाग्य ! माझ्या मनात विचार आला.

घर जवळ आलं, तशी कडकडून भूक लागली होती. घरात शिरतो, तो मायेचे उबदार शब्द कानी आले.

'भूक लागली असेल ना ? चला, आता लगेचच जेवायला वाढते.' आयरिस प्रेमळपणे सांगत होती.

'खूप खाऊन घे. आता तासाभरानं परत आपल्याला फिरायला जायचंय्...' फ्रेडली स्वातीला बजावत हसत सांगत होता.

इतका सुंदर निसर्ग नि त्याला शोभेशी ही छान माणसं !

## फ्रेंच शिकणं

स्वयंपाकघरात खुर्च्यांवर बसलो, तर तिथं आणखी एक मुलगा बसला होता. चांगला सहा फूट उंचीचा, पण कोवळ्या चेहऱ्याचा. गोरा रंग नि लुकलुकते डोळे.

'हा माझा नातू...' आयरिसनं ओळख करून दिली.

आम्ही आश्चर्यानं पाहत राहिलो. काल तर मुलगा व त्याच्या गर्लफ्रेंडविषयी बोलत होती नि एवढा नातू कुठं उपटला?

'माझ्या मैत्रिणीचा मुलगा... 'आयरिसनं खुलासा केला. मैत्रिणीला बरं वाटत नव्हतं, म्हणून आयरिसनं तिच्या नातवाला आपल्या घरी बोलवलं होतं.

खरं तर, चेहरा कोवळा नि उंची ताडमाड असल्यानं मला त्याच्या वयाचा पत्ता लागत नव्हता. म्हणून मी त्याला त्याचं वय विचारलं. त्याला इंग्लिश नीटसं येत नव्हतं; पण वय मात्र त्यानं बरोबर सांगितलं. तो अवघा पंधरा वर्षांचा होता.

'तुझी उंची काय ?' मी आश्चर्यानं विचारलं.

'सहा फूट एक इंच...' तो म्हणाला.

माझा अंदाज बरोबर होता.

आता सुटीत तो पावाच्या बेकरीत नोकरी करणार आहे. म्हणजे पैसेही मिळतील नि अनुभवही मिळेल. शिवाय पावाच्या बेकरीत फ्रेंच बोलणारी कामगार लोकं खूप आहेत. त्यांच्या बरोबर राहिल्यानं ह्याला फ्रेंच भाषा पण छान अवगत होईल.

'हे छान आहे !' मी सहजपणे म्हणाले.

'कामगार लोकं त्यांच्या मातृभाषेतच बोलतात नि त्यामुळं त्यांच्या भाषेचे उच्चार बरोबर ह्याला समजतील नि त्यामुळं सुट्टीत पैसा मिळेलच नि एक भाषा पण यायला लागेल.' आयरिस सांगत होती.

इथं एक तर नोकऱ्या फटाफट मिळतात नि लोकांचा काम करण्याचा उत्साहही उदंड असतो.

## उत्साही फ्रेडली

आज आयरिसनं छान चविष्ट असं जेवण केलं होतं. आयरिस चांगली सुग्रण होती. बहुधा सिरिअल्सचा लापशीसारखा चविष्ट पदार्थ असावा. शिवाय सूपही बनवलं होतं. पाव खाऊन कंटाळा आला होता. हे दोनही पदार्थ खूप खाल्ले. आम्ही दोघींनी एकेक पूर्ण सफरचंद खाल्लं. त्या मुलानं व फ्रेडलीनं केळं खाल्लं. इथं केळ महाग, त्यामुळं लोकांना केळ्याचं कौतुक जास्त. इतकं सगळं खाल्ल्यावर फिरून झोप यायला लागली, म्हणून फिरून चहा करून प्यालो.

'आता तुम्हांला आणखी एक गंमत दाखवतो.' गाडीत बसत असताना फ्रेडली म्हणाला.

खरं तर, जेवून फक्त अर्धा तासच झाला होता. पण फ्रेडली सहासष्ट वर्षांचा असून जराही कंटाळत नव्हता. सतत गाडी चालवत होता. स्वाति त्याच्या शेजारी बसायची व मी मागे. मला मागे कधी डुलकी लागलेली त्याला कळायची नाही. थंडगार वाऱ्याच्या झुळकीमुळं स्वातीचा

कधी कधी डोळा लागायचा. फ्रेडली लगेच म्हणायचा,

'हॅऽऽ व्हेरी बॅड. असं झोपायचं नाही हं. मी सहासष्ट वर्षांचा आहे, तरी व्यवस्थित गाडी चालवतोय् नि तू तरुण असून झोपतेस !'

स्वाति डोळे टक्क ठेवण्याचा निकराचा प्रयत्न करी. नंतर त्यानं मध्येच उतरून मुलं 'स्की' करण्याची प्रॅक्टिस करीत होती, ते दाखवलं. ते पाहून परत गाडीत बसलो.

फ्रेडली गाडी चालवत होता. कोपऱ्यावर ग्रिन्डलवा ही पाटी दिसली. ग्रिन्डलवा हे स्टेशनही आहे. थोडं गाडीतून गेल्यावर त्यानं गाडी थांबवली व पाईन, फर, ज्यूनिपर वगैरे घनगर्द झाडीतून आम्ही जाऊ लागलो.

## बर्फाची निळी गुहा

घनगर्द अशा झाडीतून जाताना मजा वाटत होती. मधून मधून तुरेवाली नाजूक गोड फुलं भेटायची. थोडी चढणही होती. त्या झाडांतून जातानाच खूप मजा वाटत होती. लांबून दिसणारे ग्लेसिअर्स जवळ दिसू लागले होते. नंतर घनगर्द झाडीत ते डोंगर दिसेनात. एखाद्या अरण्यातून जावं, तशा आम्ही जात होतो. मघापासून पाण्याचा आवाज येत होता. नंतर पाण्याचा प्रवाह भांडत उसळत जात असताना दिसत होता. प्रवाहाची रुंदी फारशी नव्हती. पण स्वच्छ निळं पाणी नि अक्षरश: पाणी भांडतंय्, असं वाटावं, असा आवाज करत चाललेलं. नंतर हा आवाज ऐकू येत होता; पण प्रवाह दिसत नव्हता नि झाडीतून जरा डावीकडे वळलो नि पुढं पाहिलं, तर डोळे स्तिमितच झाले होते. हिवाळ्यात बर्फ पडतं, ते स्फटिकासारखं घट्ट होऊन हिमनग (ग्लेसिअर्स) तयार झालेले होते. निळे-पांढरे लखलखते ! नि त्यांतून मोठी नदी वाहत होती. उन्हाळ्यात बर्फ वितळल्यानंतर त्याची नदी बनून वाहत होती व ज्या ठिकाणी नदीचा उगम होता, तिथं चक्क बर्फाची गुहा झाली होती. त्या बर्फाच्या गुहेत निळ्या बर्फाच्या विविध छटा दिसत होत्या नि त्यातून पांढरंशुभ्र पाणी वाहत होतं. तो शुभ्र बर्फाचा खळाळता नाद उसांडत वाहत होता. चक्क नदीचं मूळ दिसत होतं ! ह्याचि देही ह्याचि डोळा!

हळूच खाली उतरलो. प्रवाहात हात घातला नि फटकन वर उचलला. बर्फाचं थंडगार पाणी ! तितलीज्ला हिमनग पाहण्यासाठी १०,००० फूट वर जावं लागलं होतं नि इथं नुसतं चालतच आम्ही ग्लेसिअर्सशी पोचलो होतो ! एकसारखं बर्फ प्रचंड प्रमाणात वितळत होतं. मघाशी पाहिलेल्या पाण्याच्या प्रवाहाचं पात्र त्यामानानं रुंद नसल्यानं पाण्याचे कणन् कण पुढं जाण्याचा प्रयत्न करीत होते, एकमेकांवर आपटत होते नि भांडल्यासारखा आवाज करीत होते.

ती हिमनदी नि तिच्या भोवतीची ती पांढरी-निळी आभा ! श्रीकृष्णाच्या पाठीमागे सुदर्शन चक्र फिरत राहावं, तसे ते तेजस्वी निळे-पांढरे हिमनग, उन्हात सहस्र हिऱ्यांप्रमाणे लकलकत होते नि त्यातून उसांडणारा हा धवल स्रोत !

'फ्रेडली, तू आम्हांला निसर्गाची जादूच दाखवली आहेस !' मी तृप्त होत म्हटलं.

फ्रेडलीला अगदी मनापासून धन्य वाटलं. उत्तम कवितेला दाद मिळावी, तसं त्याला वाटलं. त्या वेळचे त्याचे लुकलुकते डोळे बालकाप्रमाणे वाटले.

तिथून परतणं ही फारच अवघड गोष्ट झाली होती. ते देखणं सौंदर्य आम्ही पाऊण एक तास नुसते पाहत होतो. डोळे तो रम्य देखावा मनात साठवत होते. आता कधी झोप येईनाशी झाली, की हा रम्य सोहळा आठवत राहायचं. वेळ सरकन निघून जातो नि कधी झोप लागून जाते, ते कळतच नाही.

'ह्याला काय म्हणतात, माहीत आहे ?' फ्रेडली विचारत होता.

'ग्लेसिअर्स रिव्हर...' मी बोलून गेले.

फ्रेडली हसला नि म्हणाला,

'ब्ल्यू आईस ग्रोट्टो.'

'बर्फाची निळी गुहा ! छान नाव आहे !' मी म्हटलं.

जमिनीवर उभं राहून अगदी जवळ बर्फाची निळी गुहा दिसते, हे सत्य होतं; पण स्वप्न वाटत होतं.

डोळ्यांत ते स्वप्न साठवतच आम्ही तिथून उठलो. तो पाण्याचा प्रवाह फिरून हसत खेळत जाताना दिसत होता. उंच उंच वृक्ष परत भेटत होते; पण डोळ्यांसमोरून बर्फाची निळी गुहा दूर सरकतच नव्हती. तिथं डोळ्यांची कॅमेरा-फिल्म बनून राहिली होती !

नंतर आम्ही निळ्या बर्फाच्या गुहेच्या पार्श्वभूमीवर आमचे फोटो काढले; पण मनात येत होतं, हे चैतन्य ह्या फोटोंत कसं येणार ! चैतन्याचा आस्वाद, चैतन्य असलेल्या डोळ्यांनीच घ्यायला हवा. आम्ही परत पंधरा-एक मिनिटं बसून राहिलो नि मग डोळ्यांना दटावतच पावलं उचलली.

गाडीत बसलो असताना स्वाति म्हणाली,

'आज जे अद्‌भुत सौंदर्य पाहिलं, ते सौंदर्य लंडनमध्ये नाही, हे किती चांगलं आहे !'

'का, ग ?' मी आश्चर्यानं विचारलं.

'हा ब्ल्यू आईस ग्रोट्टो पाहायला लंडनवाल्यांनी कमीत कमी पंधरा-वीस पौंडांचं तिकीट लावलं असतं.'

'खु खु खु.' करत फ्रेडली मनमोकळं हसला, आपल्या स्वित्झर्लंडचं कौतुक झालेलं त्याला मनापासून आवडलं.

'इटलीला जाल... तेव्हा नेपल्सला जरूर जा नि नेपल्सचा 'ब्ल्यू ग्रोट्टो' जरूर पाहा हं...' फ्रेडली म्हणाला.

'म्हणजे ! तोही असाच दिसतो ?' मी विचारलं.

'नाही. तिथं खऱ्या खुऱ्या गुहेत तुम्ही आत जाल. पाणी स्वच्छ निळं असेल, गुहेचं तोंड इतकं छोटं आहे, की झोपून जावं लागतं.' फ्रेडली सांगत होता.

## मन भरून आलं

घरी परत आल्यावर स्पीझला जायची तयारी करायला लागलो. मग आयरिसनं टेबलावर ठेवलेले विविध प्रकार खाल्ले. चहा प्याला नि तिच्या स्वयंपाकघरातून फिरून व अखेरचं असं 'जुंग फ्रॉवचं' दर्शन घेतलं . फ्रेडलीला चंदनाची गणपतीची की-चेन दिली व आयरिसला नक्षी

असलेलं काफ लेदरचं पाकीट दिलं नि उदबत्तीचा पुडा. दोघींनी हिदुस्थानी पद्धतीचा वाकून नमस्कार करून दाखवला, तेव्हा दोघंही भलतीच खूश झाली. आयरिसनं पाच-सहा केसांच्या क्लिपा स्वातीला दिल्या.

निघताना स्वाति फ्रेडलीला म्हणाली,

'तू तीनदा सिंगापूरला आलास नि भारतात एकदाच. हे काही बरोबर नाही हं.'

'आता नक्की येणार आहे...' फ्रेडली भलं मोठं आश्वासन देत म्हणाला, 'नि आता येईन, तेव्हा अजंठा-एलोरा नि दिलवारा नक्की पाहणार.'

फ्रेडलीचा उत्साह उदंड होता. पण आता वय त्याला साथ देईल ? मला शंका आली. त्याचा पाय अजूनही मध्येच दुखतो. त्याच्या तारुण्याला लाजवेल, अशा उत्साहाला शरीरानं पण साथ द्यावी, अशी मी मनोमन प्रार्थना केली नि फ्रेडलीच्या गाडीत बसले. ते आम्हांला इंटरलेकन स्टेशनवर सोडणार होते नि स्पीझला हॅन्स पीटर न्यायला येणार होते. फ्रेडलीनं त्यांना फोन करून आमचं तिथलं आसन पक्कं केलं होतं.

स्पीझकडे जाण्यासाठी आमची गाडी सुटली नि आयरिस व फ्रेडली यांना 'टाटा' करताना आपल्या अगदी जवळच्या माणसांपासून आपण दूर जातो आहो, तसं मला वाटू लागलं. माझं मन भरून आलं. डोळ्यांतून अश्रू आले. किती छान माणसं आम्हांला भेटली.

## थुन्नर सीच्या शेजारी घर !

स्विझर्लंडमध्ये इतकी अनेकानेक झाडांची गच गर्दी आहे, तरीही स्विस माणूस त्यांची जपणूकही करतो. एक झाड तोडलं, तर त्या जागी दुसरं लावलं गेलं पाहिजे, हे तत्त्व त्यांच्या अंगी फार पुरातनकाळापासून अंगी रुजलेलं आहे. स्वित्झर्लंडमध्ये काही पुस्तकं पाहिली. त्यांत लिहिलं होतं, की This book is printend on 100% recycled paper. म्हणजेच जुनाच पेपर परत परत वापरून तयार केलेला कागद ह्या पुस्तकासाठी वापरला आहे. अशी भूमातेविषयी आस्था त्यांच्या रक्तात उपजतच आहे.

इंटरलेकनपासून स्पीझ अगदीच जवळ आहे. फक्त पंधरा कि. मी. अंतर आहे. थुन्नर सीचं सौंदर्य पाहत, त्यातल्या नावा, त्यांची शिडं पाहत, त्या निळ्या पाण्याची शोभा पाहत आहोत, तोच स्पीझ आलंही. सामान घेऊन हा प्लॅटफॉर्म ओलांडून दुसऱ्या प्लॅटफॉर्म जायचं होतं. इथं भुयारी जिने असल्यानं तो पाहायला मी जरा पुढं जाऊन मागे फिरले, तर हॅन्स पीटर आमच्या सामानाशी आलेही होते. हॅन्स पीटर त्या वेळी त्रेपन्न वर्षं वयाचे होते. कॉलेजात प्रोफेसर होते. गोरेपान होते; पण बाकी आपल्या इथल्या प्रोफेसर लोकांसारखेच दिसत होते. बेताची कुडी, नाकावर चश्मा नि अत्यंत सौम्य हास्य. चेहऱ्यावर एक समंजस भाव.

मी सामानाशी पोचेपर्यंत त्यांनी बॅग उचललीही होती.

'आत्ताच गाडी आली ना ?' हॅन्सनी काही बोलायला सुरुवात करायची, म्हणून प्रश्न केला.

'हो, आत्ताच.. ' आम्ही उत्साहात उत्तर दिलं.

होस्ट न्यायला स्टेशनवर आला. त्यामुळं आता घर शोधावं लागणार नाही, ह्याचा तो उत्साह होता.

स्टेशनच्या बाहेर त्यांची गाडी होतीच. फ्रेडलीकडे कधी आलात ? आम्ही तुमची वाट

पाहतच होतो. वगैरे ते अत्यंत हळू आवाजात बोलत होते, की मागच्या सीटवर बसलेल्या मला धड ऐकू येत नव्हतं. मला श्री.पु. भागवतांची आठवण झाली.

स्वित्झर्लंडला गाडीतून हिंडणं हा एक आनंदोत्सव असतो. बेताच्या उंचीची सुंदर घरं. मधूनमधून देखणी हॉटेलं नि नंतर उंच उंच वनराई पार करत रेनवेगलो असलेल्या त्यांच्या घरी गेलो.

घरी गेल्यावर बावन्न वर्षांची एलिझाबेथ हसतमुखानं सामोरी आली. एलिझाबेथ चांगलीच उंच वाटली. पँटमध्ये ती जास्तच उंच वाटत होती. एलिझाबेथ व्यवसायानं टीचर आहे. हॅन्सनं एलिझाबेथची ओळख करून दिली नि मग एलिझाबेथ आमची खोली दाखवायला घेऊन गेली.

बाच फॅमिलीचं घर म्हणजे स्वर्गच वाटला. आम्हांला दिलेल्या बेडरूमच्या खिडकीतून खाली थुन्नर सी वाहताना दिसत होता. म्हणजे थुन्नर सीच्या लगतच्या डोंगरावर 'बाच' फॅमिलीचं घर होतं. घरात उभं राहून वा टेबलावर बसून वाहता थुन्नर पाहणं अगदी मजेचं वाटत होतं. थुन्नर सीमध्ये सगळीकडे बोटी, नावा,मचवे वगैरेंची नुसती गर्दी झाली होती. पहाटे एकही नाव नसलेला थुन्नर आणखीनच वेगळा दिसतो.

एलिझाबेथनं नंतर आम्हांला आमची बाथरूम दाखवली. इथंही स्वच्छ इस्त्री केलेले दोघींना दोन टॉवेल एलिझाबेथनं दाखवले नि सांगितलं, हे आंघोळीसाठी घ्या. बाथरूम अत्याधुनिक होती.

मी एलिझाबेथला गरम पाण्याची पद्धत विचारून घेतली. कारण पाश्चिमात्य देशांत इतके विविध प्रकारचे नळ असतात, की ते समजावूनच घ्यावे लागतात. तिथंच बेसिन, बेसिनजवळ नवीन नॅपकिन व साबण. बऱ्याच दूर टॉयलेट.

बाहेर पडल्यावर मोठा व्हरांडा किंवा ऐसपैस खोली होती. इथं पाच-सहा तारा लटकत होत्या. काही तारांवर कपडे लटकत होते. तिथंच वॉशिंग मशीन, सायकली व इतर अनेक गोष्टी पडलेल्या होत्या. थोडक्यात ती अडगळीची मोठी खोली होती. बाहेर सुंदर पोर्च होता. अर्धा सिमेंटनं बांधलेला. त्यावरच डायनिंग टेबल व खुर्च्या ठेवल्या होत्या. डाव्या बाजूला गॅरेज व दोन गाड्या ठेवलेल्या होत्या. सभोवती फुलं होती. मग तारांचं कंपाऊंड. पण पलीकडे मात्र फुलांचा बहर आलेला होता. तो भाग दुसऱ्या मालकाच्या हद्दीतला होता.

व्हरांड्याच्या मधून वर जाणारा जिना होता. त्यात डावीकडच्या भिंतीवर तीन रायफली होत्या. स्वित्झर्लंडमध्ये सक्तीचं लष्करी शिक्षण असल्यानं घरी रायफली असणं ह्यात विशेष असं काही नव्हतं. पण तरी आम्हांला ते जाणवलंच. वर पोचलो, तो वर अद्ययावत हॉल होता. लांबलचक भिंतीला लागून पुस्तकांची भिंतीतली भली मोठी शोकेस-माधव मनोहरांसारख्या एखाद्या समीक्षकांच्या घरात असावी, तशी.

'बाप, रे ! एवढी पुस्तकं !' मी म्हटलं.

'मला आवड आहे वाचायची. पण ह्यांतली बरीचशी पुस्तकं वाचलेली नाहीत.' हॅन्स पीटर म्हणाला.

मला ह्या गोष्टीचं आणखीनच आश्चर्य वाटलं. आपल्या इथं वाचायला हवी असलेली

पुस्तकं सुद्धा दुसऱ्याकडे मागून घेऊन वाचतात. इथं जी पुस्तकं अजून वाचायला घेतलेलीच नाहीत, अशीही पुस्तकं विकत घेऊन झालेली.

हॉलमध्ये फुलदाणीत ग्लॉडेलासारखी फुलं दिसत होती. फुलांचा आकार मोठा होता.

'ही कोणती फुलं ?' मी विचारलं.

एलिझाबेथ हसून म्हणाली,

'मी ह्या बाबतीत अनभिज्ञ आहे. ख्रिस्तीयानानं काल आणली, मी फ्लॉवर-पॉटमध्ये ठेवली.'

'आमच्या इथं ग्लॉडेलाची फुलं, साधारण अशीच दिसतात.'

'ग्लॉडेला ! मग ह्यालाही ग्लॉडेलाच म्हण !' एलिझाबेथनं निकाल लावला.

हॉलमध्ये उजव्या व डाव्या बाजूला वाद्यं पण दिसत होती. नंतर डायनिंग रूम दाखवलं. इथं उजव्या बाजूला परत बाहेर छोटंसं पोर्च होतं व तिथं एका छत्रीखाली छोटंसं डायनिंग टेबल होतं. नंतर जरा पुढं गेलं, की एक व्हरांडा लागत होता. डाव्या बाजूला किचन होतं व उजव्या बाजूला तीन बेडरूम्स. एक हॅन्स व एलिझाबेथचं, एक ख्रिस्तीयानाचं व एक ॲन्ड्र्यूजचं.

तेवढ्यात ख्रिस्तीयाना आली. गोरी, उंच, सडसडीत, मोहक नि चेहऱ्यावर तारुण्याची झळाळी. तेवढ्यात तिथं हॅन्स पीटर आला नि म्हणाला,

'ही आमची मुलगी ख्रिस्तीयाना.'

'नाईस टु मीट यू...' ख्रिस्तीयाना गोड आवाजात म्हणाली व आमचं हस्तांदोलन झालं.

'नि हा ॲन्ड्र्यूज...' एका एकोणीस वर्षांच्या मुलाकडे पाहत हॅन्स पीटर म्हणाला. त्यानं पण हसत हस्तांदोलन केलं.

## प्रेमळ सहवास

तेवढ्यात जेवणाची वेळ झाली होती. जेवण तयार होतं. ख्रिस्तीयाना, ॲन्ड्र्यूज, हॅन्स पीटर भांडी घेऊन भराभर जाऊं लागले. त्या छत्री असलेल्या डायनिंग टेबलाच्या बाजूच्या चार पायऱ्या उतरलो. मग उजव्या बाजूला वळून चार पायऱ्या उतरल्यावर, मघाचं आमच्या बेडरूमच्याजवळ असलेलं डायनिंग टेबल आलं. डोंगरावर घर असल्यानं ह्या बाजूनं पायऱ्या थोड्या होत्या.

जेवायचा बेत जंगी होता. उकडलेले बटाटे, भात, ब्रेड बटर, चीजचे तीन प्रकार, उकडलेली मक्याची कणसं, उकडलेले बीन्स, काही कापलेली व्हेजिटेबल्स (कच्च्या हिरव्या भाज्या), सफरचंद व केळी नि वाईन. वाईनचा आग्रह झालाच व 'आम्ही ड्रिंक घेत नाही' हे नेहमीप्रमाणे सांगितलं.

उकडलेल्या कणसांना चीज व मीठ लावलं होतं. कणसं छानच लागत होती.

'अरे, व्वा ! इथली कणसं भलतीच गोड आहेत !' मी कौतुकानं म्हणाले.

'ही कणसं इम्पोर्ट केलेली आहेत. आमच्या इथं होणारी कणसं आम्ही गुरांना खायला घालतो.' हॅन्स पीटरनं माहिती सांगितली.

'रिअली ?' ख्रिस्तीयानानं पण आश्चर्य वाटून विचारलं.

हॅन्स पीटरनं मानेनंच होय म्हणून सांगितलं.

युरोपमध्ये गेल्यावर आमचं जेवण तसं कमीच झालं होतं. नुसते उकडलेले पदार्थ नि पाव; तेवढा रुचतही नव्हता. एलिझाबेथच्या ते लक्षात आलं, ती म्हणाली,

'मंदाकिनी, तुला आमचं जेवण आवडलेलं दिसत नाही.'

'नांही, नाही. वाऽ आवडलंय् ना.' मी म्हटलं. हे, खरं तर, मी वरकरणी मुळीच म्हणत नव्हते.

तरी ती म्हणाली,

'खरं ! नाही. तितकंसं नाही आवडलं.' ती मला चाचपत होती.

'खरं सांगू ? आजकाल आम्हांला,का,कोण जाणे, भूकच लागत नाहीये...' मी म्हणाले.

युरोपमध्ये गेल्यापासून आमची भूकच थंडावली होती. जास्त खाल्लं, तर पचत नव्हतं.

भारतातल्या प्रदूषणामुळं फॉरेनर्सना भारतातलं अन्न पचत नाही. तर आम्हांला फार शुद्ध हवेमुळं अन्न पचत नव्हतं, की तिथलं पाणी जड आहे ?

'तुमच्या इथं टीचर्सना पगार खूप छान असतो, नाही ?' बर्नची टेरेस म्हणत होती.' मी म्हटलं.

'साधारण चार हजार स्विस फ्रँक.' हॅन्स पीटर म्हणाला. नंतर त्यानंच आपणहून सांगितलं, 'नि प्रोफेसर्सना आठ हजारांच्या पुढं.'

हॅन्स पीटर इंग्लिश शिकवत होते. हॅन्सच्या बोलण्यावरून कळलं, की तिथं टीचिंग प्रोफेशन सर्वांत मानाचा धरला जातो. त्यामुळं टीचिंग लाईनच्या स्पर्धात्मक परीक्षा फार अवघड असतात. त्यानंतर तो म्हणाला,

'नाही तरी भावी आधारस्तंभ हुशार नि सुजाण करायचे, तर शिकवणारा तेवढाच पारंगत हवा.'

मी मानेनंच हो म्हटलं. पण आपल्या इथं पगार वाढले, तरी शिक्षक पारंगत असणं ही अत्यावश्यक बाब आहे, असं समजलं जातं का ?

'तुम्हांला इंटरलेकनवाल्यांनी काय काय दाखवलंय् ?' एलिझाबेथनं विचारलं.

आम्ही हॅन्स फ्रेडलीनं जे जे दाखवलं, ते ते सांगितलं, तेव्हा हॅन्स पीटर म्हणाला,

'म्हणजे त्यानं सगळंच दाखवलंय्. आमच्याकडचीही बाजू त्यानं कशाला दाखवली ?'

'त्याला सगळं दाखवण्याचा उदंड उत्साह होता.' मी म्हटलं.

'आपण पण काही तरी दाखवूच.' एलिझाबेथ म्हणाली.

आम्ही हवे असलेले पाहुणे आहोत, ह्याचा मनातल्या मनात आनंद झाला....

## वेट्रेस, एक मानाची नोकरी–

ख्रिस्तीयाना हॉटेलमध्ये वेट्रेसचं काम करीत असल्यानं एरवी ती डिनरच्या वेळी घरी नसते; पण आज तिला व ॲन्ड्र्यूजला पण सुट्टी असल्यानं ते दोघे घरीच होते. त्यामुळं आज आमच्याबरोबर जेवायला सज्ज झाले होते.

बऱ्याच दिवसांनी लाडकी लेक घरी असल्यानं तिची चेष्टा करण्याची लहर, हॅन्स पीटर नि एलिझाबेथ, दोघांनाही आली. हॅन्स पीटरला चॉकलेट योघर्ट हवं होतं, तर एलिझाबेथला ऑरेंज योघर्ट हवं होतं. आम्हांला कोणतं योघर्ट हवं, ते विचारण्यात आलं. शिवाय हॅन्स पीटरला सोडाविथ फ्रेश लेमन हवं होतं, हे सगळं एलिझाबेथनं, ख्रिस्तीयानाला आणायला सांगितलं नि दोघे म्हणाले,

'वेट्रेस आहेस ना ? मग आमचंही काम कर. प्रॅक्टिस होईल.'

ख्रिस्तीयाना जराही चिडली नाही. कुणाला काय हवं, ते तिनं नीट समजावून घेतलं नि ज्याला ज्याला जे जे हवं, ते प्रेमानं दिलं.

मला आश्चर्य वाटलं ! वेट्रेस म्हणून चिडवलं, त्याचा राग नव्हताच !

ख्रिस्तीयाना व ॲन्ड्र्यूज जेवण झाल्यावर आमची व साऱ्यांची परवानगी घेऊन गेले. ते गेल्यावर हॅन्स पीटर हसत हसत म्हणाले,

'आमच्याकडे नोकर नाहीत, पण आम्हांला दोन मुलं आहेत.'

यावर आम्ही तिघीही हसलो. पण तेवढ्यात तो म्हणाला,

'मात्र आमची मुलं काम करीत नाहीत.'

नंतर हॅन्स म्हणाला,

'आमच्या इथं कामगार व वेट्रेसेस् ह्यांना कामाबद्दल तासांप्रमाणे पैसे मिळतात व ते खूपच अधिक असतात.'

'म्हणजे नेमके किती ?' स्वातीनं विचारलं.

'आता ख्रिस्तीयानाला तासाला अठरा स्विस फ्रँक मिळतात. म्हणजे महिन्याला चार-साडेचार हजार होतात. विविध भाषा येत असतील, तर नोकरी पटकन मिळते. ख्रिस्तीयानाला इंग्लिश, स्पॅनिश, फ्रेंच, स्विस-जर्मन व जर्मन अशा चार भाषा येतात.'

...म्हणजे इथं वेट्रेस असणं हेही मानाचं असावं.. मी मनातल्या मनात अटकळ बांधली. म्हणूनच ख्रिस्तीयाना चिडली नाही. आपण आपल्या इथं डॉक्टरला म्हटलं, की 'तू डॉक्टर आहेस ना, मग दे इंजेक्शन !' तर तो थोडासा रागावणार आहे ! आणि म्हणूनच इथं खूप देखण्या नि चटपटीत वेट्रेसेस् हॉटेलवाल्यांना सहज मिळतात.

ॲण्ड्र्यूज कॉलेजात तिसऱ्या वर्षाला आहे. तो इंजिनीअरिंगसारखं काही तरी शिकतो आहे व आता समर व्हेकेशनमध्ये कामगार म्हणून काम करतो. त्याला तासाला सोळा स्विस फ्रँक मिळतात. सुट्टीत कमावलेल्या पैशात ही मुलं नंतर देशविदेश पाहायला जातात.

जेवण झाल्यावर भांडी धुवायला आम्ही पुढं सरसावलो, तेव्हा एलिझाबेथ म्हणाली,

'तुम्हीही भांडी धुऊ नका. मीही धूत नाही. आमचा डिशवॉशर भांडी धुईल. जरा नंतर मी डिशवॉशर सुरू करणार आहे. आठनंतर इलेक्ट्रिसिटीचा दर कमी असतो.' असं म्हणत तिनं डिशवॉशरमध्ये जशीच्या तशी खरकटी भांडी टाकली.

कुंदाकडे किंवा बीना भांडी धुऊन डिशवॉशरमध्ये टाकत. एलिझाबेथनं खरकटी भांडीच डिशवॉशरमध्ये टाकली.

## रूफ ऑफ द हाऊस

आम्ही थुन्नर सी बघत उभ्या होतो, तेवढ्यात एलिझाबेथ आली नि तिनं विचारलं,

'आपण इथं जवळ फिरायला जाऊन येऊ.'

'चालेल.. ' म्हणत आम्ही सज्ज झालो.

दहा मिनिटं गाडीत बसल्यावर चालत फेरफटका मारायला आम्ही निघालो होतो. उंच उंच पाईन, फर वगैरे झाडांमधून जाणाऱ्या डांबरी रस्त्यावरून चालताना मजा वाटत होती. तेवढ्यात बाजूला, जिनीव्हच्या पार्कमध्ये पाहिलं, तसंच लहान प्रमाणात घड्याळ पाहिलं. त्या वेळी त्या हिरव्या कमळाचं नाव मला माहीत नव्हतं. म्हणून मी हॅन्स पीटरला विचारलं,

'ह्याचं नाव काय ?'

'कशाचं ?'

घड्याळाचे आकडे म्हणजे हिरवी कमळ उगवली होती, त्यांकडे बोट दाखवत मी विचारलं.

'रूफ ऑफ दी हॉऊस !' हॅन्स पीटर म्हणाला. नि मग त्यानं सांगितलं, 'ही घरावर टाकली, की घर सुरक्षित राहतं, असा जुन्या काळातील लोकांचा विश्वास होता, म्हणून ह्याला 'रूफ ऑफ दी हाऊस' म्हणतात.'

एलिझाबेथ साशंक होती. हॅन्स पीटर बंडला मारतोय्, असं तिला वाटत होतं. तेव्हा ती म्हणाली,

'मला खरं नाही वाटत.'

ह्या झाडांची निगा राखणारा शेतकरी समोरच राहत होता. त्याला ह्या झाडांचं नाव विचारलं. शेतकऱ्यानं 'रूफ ऑफ दी हाऊस' हे नाव बरोबर असल्याचं सांगितलं.

तेव्हा अंगठा वर दाखवत हॅन्स पीटरनं आपली जीत व्यक्त केली.

## थुन कॅसल फिरून

पायऱ्या चढून वर गेलो, तर ही जागा ओळखीची होती. सकाळी इथंच तर फोटो झाले होते. अगदी नेमकी तीच फुलं, तीच पानं आश्चर्य वाटून मी ते स्वातीला बोलले, तर स्वाति हळूच म्हणाली,

'सकाळी आपण आलो होतो; पण बोलू नकोस! त्यांना वाईट वाटेल.'

मग माझ्या लक्षात आलं, आपण थून कॅसल पाहायला आलोय्. आठ-दहा पावलं चालल्यावर थून कॅसल दिसला. सकाळचीच माहिती हॅन्स पीटरनं सांगितली. हॅन्स पीटरच्या घराजवळचं एक प्रेक्षणीय स्थळ हॅन्स फ्रेडलीनं दाखवून पार केलं हेतं. तरीच काल हॅन्स फ्रेडली आयरिसला म्हणत होता,

'ती मास्तर लोकं. त्यांना दाखवायला वेळ असेल, नसेल.'

त्यावर आयरिस म्हणाली होती,

'दाखवतील तर काय झालं ! शाळा-कॉलेजेस्ना सध्या सुट्टयाच आहेत.'

नतर आम्ही तिथल्याच एका हॉटेलात गेलो. तिथंही लगेचच खाली थुन्नर सी दिसत होता.

'चहा... कॉफी ? काय घेणार ?' एलिझाबेथनं विचारलं.

'काहीच नको...' आम्ही दोघीही म्हणालो.

'संकोचानं नको म्हणताय् ?' एलिझाबेथनं विचारलं.

'नाही. खरोखरीच रात्रीचं आम्ही काही घेत नाही.' मी विश्वास दाखवत सांगितलं.

'मग आइस्क्रीम ?'

'चालेल...' आम्ही दोघीही म्हणालो नि एलिझाबेथ खुशीनं हसली.

एलिझाबेथची कॉफी आली. हॅन्स पीटर, मी व स्वातीनं आमच्या आवडीचं आइस्क्रीम सांगितलं. पण एकेकाच्या पुढ्यात एवढं आइस्क्रीम आलं, की जवळ जवळ फॅमिली पॅकप्रमाणे आइस्क्रीम !

आइस्क्रीम भलतंच टेस्टी होतं. युरोप वा अमेरिकेतल्या आइस्क्रीमला चव काही वेगळीच असते. तिथलं आइस्क्रीम दुधाचं वाटलं. आपल्या इथलं आइस्क्रीम पावडरीचं वाटतं.

आइस्क्रीम कितीही छान असलं, तरी ते इतकं खूप होतं, की पोटात मावणं शक्यच नव्हतं. शिवाय आम्ही जेवून आलो होतो नि हे दुसरं जेवणच समोर होतं.

'आइस्क्रीम खूपच छान आहे...' मी म्हटलं.

'भलतंच छान !' स्वाति म्हणाली.

आम्ही आइस्क्रीम अगदी कौतुकानं खात होतो. पण नंतर नंतर ते पोटातून आत सरकेना. पण शेवटी खाणं अगदी अशक्यच झालं, तेव्हा मी संकोचानं म्हणाले,

'हे उरलेलं ठेवून दिलं, तर ?'

तेव्हा हॅन्स पीटर म्हणाला,

'खुशाल राहू दे. हे आइस्क्रीम नाही तरी जरा जास्तच आहे.'

'नि हे म्हणजे दुसरं जेवणच आहे.' स्वाति म्हणाली.

एलिझाबेथची कॉफी संपत आली होती. मेन्यू कार्ड पाहत हॅन्स गमतीनं म्हणाला,

'कॉफीची किंमत खूपच कमी आहे. तू आणखी एकदा कॉफी घे.'

आइस्क्रीमची प्रत्येकी किंमत आठ स्विस फ्रँक होती. होस्टनं दिलं, तरच आपल्याला खाणं परवडणारं.

## विल्यम टेल थिएटर

तिथंच असलेलं एक ओपन थिएटर त्यांनी दाखवलं. थिएटरचं नाव होतं 'विल्यम टेल'. आपल्या इथं ओपन थिएटर म्हणजे नुसतंच ग्राऊंड असतं. इथल्या ओपन थिएटरमध्ये, आपल्या इथल्या बंद थिएटरप्रमाणेच पायऱ्या असतात. फक्त छप्पर व बाजूला भिंती नसतात. थिएटरचं नाव कुठं तरी ओळखीचं वाटत होतं. मी विचारलं,

'विल्यम टेल म्हणजे ऽ स्वत:च्या मुलाच्या डोक्यावर ठेवलेलं सफरचंद नेम धरून छेदलं, तोच का ?'

'अगदी बरोबर !' हॅन्स पीटर खुशीत येत म्हणाले.

'ऑस्ट्रियाच्या हुकुमशहाच्या आव्हानाला ह्या तीरंदाजानं आपल्या कृतीनं शह दिला.' एलिझाबेथ म्हणाली.

'विल्यम टेल होता, तेव्हा तो आणि तेराशे शूर जवानांनी, वीस हजार ऑस्ट्रियन सैनिकांचा पराभव केला. डोंगरात लपायचं, एकदम छापा घालायचा. असं ते करीत.'

मला शिवाजीची आठवण झाली. मी त्यांना सांगितलं,

'सतराव्या शतकात आमच्या इथं 'शिवाजी' नावाच्या वीरानं मुगल साम्राज्याविरुद्ध असाच लढा दिला.'

नंतर घरी गेल्यावर एलिझाबेथनं स्वित्झर्लंडचा मोठा मॅप दाखवला. लुझर्नच्या जवळचा 'स्विझ' हा भाग दाखवला नि तिथल्या डोंगराळ मुलखात विल्यम टेलनं पराक्रम केला, म्हणून आमच्या देशाला 'स्वित्झर्लंड' म्हणतात, हे एलिझाबेथनं अभिमानानं सांगितलं.

## गॉसिपिंग

रात्री घरी गेल्यावरही आम्ही गप्पा मारत होतो. हॅन्स फ्रेडलीचं जगभर हिंडणं व त्याच्या घरातल्या विविध वस्तूंविषयी आम्ही बोललो, तेव्हा हॅन्स पीटर म्हणाला,

'साधा रेल्वे तिकीट मास्तर नि इतका प्रवास कसा शक्य झाला ? आश्चर्य आहे.'

'आयरिस म्हणाली, पूर्वी ते पेईंग गेस्ट ठेवत, त्यातून मिळकत झाली असावी.' मी म्हटलं.

'असेल...' हॅन्स पीटर म्हणाला.

त्यानंतर एलिझाबेथनं विचारलं,

'त्यांचा मुलगा लग्न न करताच एका मुलीबरोबर राहतो ना ?'

ह्यांना ही बातमी कुठून कळली ? हे म्हणजे आमच्या कोकणातल्यासारखं झालं. वाड्याला नेन्यांकडे काय घडतंय्, ह्याची साग्रसंगीत माहिती पुरळच्या मराठ्यांना, नाही तर फाटकांना असते...... स्वित्झर्लंडसारख्या पुढारलेल्या देशातही अशा बातम्या कर्णोपकर्णी होतच असतात का ?...... शहरं ह्यापासून मात्र अलिप्त, तसं मुंबईतही गल्लीत काय घडलं, ते खूपदा माहीत नसतंच.

नंतर हॅन्स पीटर म्हणाला,

'आमच्या इथं असा कायदा आहे, की घटस्फोटानंतर बाईला पोटगी मिळते, ती तिनं दुसरं लग्न करीपर्यंत.'

'ती स्वतः मिळवत असेल, तर ?' मी विचारलं.

'तरीही तिला पोटगी मिळते.'

'नि घटस्फोटानंतर ती दुसऱ्या एखाद्या बॉयफ्रेंडबरोबर राहत असेल, तर ?' मी विचारलं.

'तरीही तिला पोटगी मिळण्याचा हक्क राहतो. जोपर्यंत ती कायदेशीर लग्न करीत नाही, तोपर्यंत तिला पोटगी मिळते.' हॅन्स पीटर म्हणाला.

मला हे पुरुषांवर कुठं तरी अन्याय होतोय्, असं वाटत होतं. पण पुढं कळलं, की कायदा काहीही असला, तरी सर्वत्र त्याची अंमलबजावणी होतेच, असं नाही. शिवाय ती मुलगी घटस्फोटानंतर एखाद्या बॉयफ्रेंडबरोबर राहत असेल, तर तिच्या अब्रूचे वाभाडे कायदेपंडित काढतातच, असंही एलिझाबेथ म्हणाली.

शेवटी माणूस सुज्ञ नसेल, तर कायद्याचे हात थिटेच पडतात.

## आढ्यताखोर फ्रेंच

नंतर एकदम मला फ्रान्समधल्या भाषेच्या अडचणींची आठवण झाली. मी त्यांना म्हटलं,

'फ्रान्समध्ये जाम कुणी इंग्लिशमध्ये बोलत नव्हतं. कारण त्यांना इंग्लिश येतच नाही. रफीक नावाचा एक भारतीय भेटला. तो मात्र म्हणाला, की नव्या पिढीतील विद्यार्थ्यांसाठी शाळेत आता इंग्लिश शिक्षक असल्यानं त्यांना आता इंग्लिश येऊ लागलं आहे.'

त्यावर हॅन्स पीटर हसला नि म्हणाला,

'तसंच काही नाही.'

'का ? काय झालं ?' मी गोंधळून जाऊन विचारलं.

'इथून गाडीतून जाणारा गार्ड स्विस-जर्मन बोलतो; पण फ्रेंच सरहद्द आली, की तो लगेच फ्रेंच बोलू लागतो नि त्याला इंग्लिश किंवा इतर भाषा अजिबात येत नाहीत.'

मग मी आपल्या इथल्या दाक्षिणात्यांची हकीगत सांगितली नि म्हणाले,

'आमच्या इथं मुंबईत राहणाऱ्या दाक्षिणात्य अशिक्षित बाईला हिंदी येतं; पण दक्षिणेतल्या मोठ्या ऑफिसरला हिंदी येत नाही.'

त्यावर किंचित हसून हॅन्स पीटर म्हणाला,

'फ्रेंचांचंही तेच आहे. इंग्लिश भाषा कुणाला अजिबात समजू नये, इतकी काही फ्रेंच भाषा इंग्लिशहून भिन्न नाही.'

तेवढ्यात एलिझाबेथमधली गृहिणी जागी झाली तिनं विचारलं,

'मंदाकिनी, चहा-कॉफी घेणार ?'

'नाही. खरंच नको.' मी सांगितलं.

'स्वाति, तुला ?'

'आम्ही खरोखरीच रात्री चहा-कॉफी घेत नाही.' स्वाति म्हणाली.

हॅन्स पीटरनं आम्हांला लिहिलेल्या पत्रात, 'आपण मांसाहारी, की शाकाहारी' हे आवर्जून विचारलं होतं व आम्ही शाकाहारी असं लिहिलं होतं. त्या संदर्भात एलिझाबेथनं विचारलं,

'मंदाकिनी, तुमच्या इथं शाकाहारी लोकं ड्रिंक घेत नाहीत का ?'

'असा नियम नाही; पण आमच्या इथं लोकं साधारणतः ड्रिंक घेत नाहीत.'

मग मी आपली वर्ग व जातिव्यवस्था व त्यात ब्राह्मणांना मांसाहार व ड्रिंक घेणं वर्ज्य असल्यानं आम्हांला ती सवयच कशी नाही, ते सांगितलं.

वर्गव्यवस्था म्हणजे 'स्पेशलायझेशन' असा हॅन्सनं सरळ अर्थ घेतला नि त्याला तो प्रकार आवडला. पण नंतर त्यानं किती वाईट रूप घेतलं, हे मी त्याला सांगितलं.

'मुळात उत्पन्न कमी नि खाणारी तोंडं जास्त, म्हणून असं घडलं का ?' एलिझाबेथनं विचारलं.

'ते एक कारण असू शकेल; पण घडलं, ते फार वाईट घडलं, एवढं मात्र नक्की.' मी म्हटलं.

मग तो विषय तिथंच थांबला.

मला मध्येच डुलकी आली, ते पाहून एलिझाबेथ म्हणाली,

'मंदाकिनी, झोप येतेय् ना ?'

मी नुसतीच हसले. मग आम्ही सारेच झोपण्यासाठी उठलो.

आम्ही झोपण्यासाठी आमच्या झोपायच्या खोलीत आलो, तर आमच्यासाठी बेड्स तयार होते. अद्ययावत हॉटेलसारखे नीटनेटके. पांधरायचा रगही त्यावर सुव्यवस्थित खोचलेला होता नि एक विणलेली नाजूक नक्षीची चादर आतल्या बाजूनं लावलेली.

## स्विस शेतकरी

पहाटेच जाग आली. तशी अलगद उठले नि खिडकीशी उभी राहिले. पहाटेचे पाच वाजले होते. तरी सकाळी आठ वाजावे, तसं उजाडलं होतं. उजाडलेलं जरी होतं, तरी समोर दिसणाऱ्या थुन्नर सीमध्ये नीरव शांतता पसरली होती. वास्तविक जिनीव्हमधल्या होस्टनं 'नाही' म्हटलं, म्हणून त्याच्या जवळच स्पीझ हे गाव आम्ही निवडलं नि आता वाटतंय्, की जिनीव्हचा होस्ट नाही म्हणाला, ते किती बरं झालं. त्यामुळं इतक्या सुंदर घरात राहायला मिळालं ! हे देखणं घर नि हा थुन्नर सी ! स्वच्छ पारदर्शक निळं पाणी मी किती वेळ पाहत राहिले.

स्नान वगैरे आटपून, नास्त्यासाठी आम्ही टेबलाशी गेलो. नास्त्यासाठी ब्रेड, बटर, चीज, सिरिअल्स व दूध होतं. साऱ्या युरोपमध्ये व अमेरिकेत सिरिअल्स्चे डबे मिळतात. सिरिअल्सच्या डब्यात संस्करण (प्रोसेसिंग) केलेल्या लाह्या मिळतात. आजच्या एका सिरिअल्समध्ये बेदाणा व काजू होते. ते सिरिअल्स थोडे गोड पण बनवले होते. आम्ही त्याबरोबरच आमच्यासाठी चहा पण बनवून घेतला.

हॅन्स पीटर बाहेर जाण्यासाठी स्नान वगैरे करून तयार होऊनच आला होता. आज गाडीतून प्रथम आम्ही रिंगनबर्ग खेड्यात गेलो. इथं जुन्या काळच्या शेतकऱ्यांची घरं त्यानं आम्हांला दाखविली. इथले शेतकरी म्हणजे सधन शेतकरी. त्यांची १५६० सालचं, १५४२ सालचं अशी जुनी लाकडी घरं अजून अद्ययावत आहेत व तिथं ते अजून राहत आहेत. ते लाकडाचं कोरीव नक्षीकाम पाहताना जेसलमीरच्या सरदार लोकांच्या घराचं लाकडी नक्षीकाम मला आठवलं.

सुंदर लाकडी नक्षीकाम केलेल्या ह्या घरांच्या गॅलऱ्या फुलांच्या थव्यांनी नटलेल्या होत्या. जिरेनियम, बेगोनिया, इम्पेशन्ट वगैरे विविधांगी छोटी छोटी फुलं नि त्यांचे विविधांगी रंग.

१९६० सालचं घर हे असंच देखणं होतं. शेतकरी म्हणजे त्यांची गुरं आली. त्यांची राहण्या-जेवणाची सोय बघणं आलं. ह्या घरातच डाव्या बाजूला गुरं ठेवत व त्यांना बाहेर पडण्यासाठी दरवाज्याची वेगळी सोय होती. त्या शेजारी एक मोठा दरवाजा दिसत होता. तिथं गुरांचं गवत साठवलं जायचं. पहिल्या मजल्यावर शेतकरी कुटुंब राहत असे. त्याच्या वरच्या मजल्यावर म्हणजे दुसऱ्या मजल्यावर शेतकऱ्याची नोकर-माणसं राहत. शेतकऱ्याच्या सर्वांत लहान मुलाला त्याची इस्टेट मिळे. मोठी मुलं कॅनडा, फ्रान्स वगैरे देशात मिलिटरीसाठी जात. व्हॅटिकन राज्यात पोपसाहेबांचे रक्षक पहारेकरी असतात.

हॅन्स पीटर माहिती सांगत होते. त्या घराच्या शेजारी एक त्यापेक्षा थोडं आधुनिक घर दिसत होतं. तिथं हॅन्स पीटरची मावशी राहते. 'शेजारी आलोच होतो, तर आलो सहज.' असं जाण्याची तिकडे पद्धत नसल्यानं ते घर आम्ही बाहेरूनच पाहिलं. हॅन्स पीटरनं आम्हांला तिथले गोठे दाखवले. तिथल्या गाई एवढ्या अवाढव्य, की त्या गाई आहेत, असं वाटतच नाही. इथं गाईंच्या शेपट्या वर बांधल्या होत्या. ते जरा विचित्रच वाटलं.

त्या गाई पाहून स्वाति म्हणाली,

'काय ह्या अवाढव्य गाई ! ही वासरं आहेत ना, तेवढ्या आमच्या इथं गाई असतात. ही गाय जवळ आली, तर आमच्या इथली गाय घाबरून पळूनच जाईल.'

हॅन्स पीटर म्हणाला,

'स्वित्झर्लंडच्या सिमखाल गाईंना खूप मागणी आहे. त्या तीन ते चार हजारं स्विस फ्रँकना परदेशी विकल्या जातात. त्यामुळं गाड्यांप्रमाणेच गाई पण एक्स्पोर्ट होतात.'

'स्पॅनिश जर्मन आणि जर्मन अशा दोन भाषा आहेत ?' मी विचारलं.

'हो. स्पॅनिश जर्मन, जर्मनपेक्षाही थोडी वेगळी आहे. मात्र आम्हांला जर्मन व स्पॅनिश जर्मन दोन्ही भाषा येतात. जर्मनीत त्या लोकांना फक्त जर्मनच भाषा येते.

'पण आमच्या इथं 'पर्यटन' हा प्रमुख व्यवसाय आहे. पर्यटकांसाठी निरनिराळी हॉटेल्स उघडत असतात व त्यामुळं हॉटेल हा प्रमुख व्यवसाय आहे. जितक्या भाषा सराईतपणे बोलता येतील, तितक्या त्या माणसाला नोकरीच्या संधी जास्त. आमची खिस्तीयाना समर व्हेकेशनमध्ये वेट्रेसचं काम करते. तिला स्विस -जर्मन, जर्मन, स्पॅनिश, फ्रेंच व इंग्लिश इतक्या भाषा येतात.'

'इथंच हॅन्स फ्रेडलीचं बोट हाऊस आहे.' स्वाति मला म्हणाली.

## निस्डेम पर्वत व हिमशिखरं

गाडीत बसून आम्ही तिथल्या निस्डेम ह्या पर्वताशी गेलो. तिकिट सव्वीस स्विस फ्रँक होतं. ते तिकीट हॅन्स पीटरनंच काढलं. केबल कारनं आम्ही निस्डेम पर्वतावर पोचलो.

आकाश निरभ्र असल्यानं इथून आजूबाजूचे बर्फाच्छादित पर्वतही दिसत होते. त्यांवर कोवळं ऊन पडल्यानं ते चमचमणारे पांढरे शुभ्र हिमनग ! हिऱ्यांच्या राशी! हॅन्स पीटरच्या उंची बायनॉक्यूलरमधून ते अगदी जवळ भेटायला आले नि हृदय थुई थुई नाचलं. हॅन्स फ्रेडलीच्या स्वयंपाकघरातून 'जुंग फ्रॉव' पर्वत दिसत, त्या पर्वतांची हिमशिखरं दिसत. पण इथं ते भरजरी पर्वत आख्खेच्या आख्खे अगदी पुढ्यात होते ! एक-दोन पर्वत नव्हे, तर हिमशिखरांची रांग ! अगदी जवळ ! किती अहोभाग्य ! ह्याच जन्मी, हिमशिखरांचा सुंदर सोहळा पाहायला मिळाला!

आम्ही हिमशिखरं पाहत असता कोणत्या तरी प्राण्याचा आवाज ऐकू आला. हॅन्सच्या कानांनी तो टिपला. लगेच तो बॉयनॉक्यूलरमधून पाहू लागला. 'शामुआज्' तो म्हणाला. नंतर कळलं, की शामुआ हा जंगली प्राणी आहे. त्याचं अंग बोकडासारखं असून तोंड हरिणासारखं असतं व त्याला शिंगं असतात. त्याच वेळी एक मंजुळ आवाज आला.

'आता शामुआज् दिसणार नाहीत.' हॅन्स म्हणाला.

'का ? काय झालं ?' आम्ही विचारलं.

'तुम्हांला शामुआ दाखवणार होतो; पण आता मॅक नावाच्या प्राण्यानं आवाज दिला आहे. धोका आहे, असं वाटलं, की मॅक आवाज करतो व शामुआज्ना सावध करतो.'

'मॅक प्राणी केवढा असतो?'

'उंदराएवढा. बिळात राहतो. आत्ताच पळत बिळात गेला.'

क्षणात इतकं त्यांना समजलं कसं ? हे इथले 'मारुती चितमपल्लीच' दिसतात. माझ्या मनात आलं.

इथल्या शेतकऱ्यांचं दूध व चीज विकणं हे उत्पन्नाचं प्रमुख साधन असल्यानं गाईंची देखभाल करावी लागते. बर्फ पडणं थांबलं, की साधारण फेब्रुवारी महिन्यात गाई चरायला बाहेर जातात. चरता चरता डोंगरावर जातात. गुरांबरोबर शेतकरी आपली घरं वर नेतात. ऑगस्टपर्यंत गाई अशा प्रकारे डोंगरांच्या वर वर जातात. त्यामुळं शेतकऱ्याला वर्षातून तीन-चारदा आपलं घर बदलून वर वर न्यावं लागतं. चीज हे दुधापासून बनवलं जातं. स्वित्झर्लंडला चीज फार मोठ्या प्रमाणात बनवलं जातं. गाई डोंगरावर गेल्या, की त्यांचं दूध मोठ्या पाईपद्वारा खाली पाठवलं जाई. ह्या पाइपांना 'कंटून्स' म्हणतात. पूर्वीच्या काळी स्विस शेतकरी अतिशय श्रीमंत होते. त्यांच्याजवळ उत्तमोत्तम घोडेही असत. फ्रेंच लोकांनी स्वारी केली नि ते उत्तमोत्तम घोडे घेऊन गेले. शेतकरी आता फक्त गाईच सांभाळतात. हॅन्स पीटरचे आजोबा सधन शेतकरी होते. शेतकऱ्यांचा एक दिवस ठरलेला असतो. त्या दिवशी गाईंची खरेदी-विक्री होते.

हॅन्स पीटर स्वत: माऊंटेनीयर होता. १८०० मीटरच्या वर मोठे वृक्ष वाढत नाहीत, असं तो सांगत होता. तितलीज्च्या डोंगरावर जशी पिवळी छोटी फुलं पाहिली, तशी ती इथंही उगवली होती. त्यांना 'ब्रूएमली' म्हणतात.

हॅन्स पीटरनं, शेतकरी, त्याच्या गाई ह्यांचं इतकं सुरेख वर्णन केलं, की आम्हांला त्या 'निस्डेम' पर्वतावर दुधाचे पाईप-'कंटून्स' दिसू लागले. पण दूध न पिताच आम्ही केबल कारनं खाली उतरलो.

## विंड ग्लायडिंग

हॅन्स फ्रेडलीनं 'विंड ग्लायडिंग करत असलेली उडती माणसं दाखवली. पण हॅन्स पीटरनं जिथून 'विंड ग्लायडिंग' सुरू होतं, ती जागा दाखवली. ज्या छत्रीतून 'विंड ग्लायडिंग' करतात, ती छत्री म्हणजे, कापडी लांबडे फुगे एकमेकांना जोडावी, तशी दिसते. माणूस हवेत उडाला, की ह्यात हवा भरली जाते व त्या एकमेकांना जोडलेल्या लांबट अरुंद गाद्या वाटतात. त्यांचं वजन १० ते १२ किलो असतं. प्रथम त्यांना ती छत्री घेऊन डोंगरावर जावं लागतं. डोंगरावर जाण्यासाठी केबल कार किंवा केबल चेअरची योजना असते. आमच्या देखतच काही माणसं केबल कारनं वर गेली, तर काही उडत खाली उतरली होती. केबल कारनं डोंगरावर गेलं, की तिथून ते उडतात. 'निस्डेम' पर्वतावरूनही एकजण हॅंग ग्लायडिंग करताना आम्ही पाहिला.

'आमच्या ओळखीचं एक जोडपं असंच विंड ग्लायडिंग करीत होतं पण नवरा विंड ग्लायडिंग करताना जो नाहीसा झाला, तो फिरून आलाच नाही.'

पक्ष्यासारखं उडताना असेही धोके असतात, तर !.... त्या कुणा अज्ञात माणसाबाबत मन अस्वस्थ झालं.

तेवढ्यात तिथंच दुपट्यावर लहान मुलं ठेवून त्यांचे आईबाबा विंड ग्लायडिंग करायला गेले होते. पक्ष्यांनी उडायचं कधी थांबवलं आहे ? मनात विचार आला.

चालता चालता एका नळाशी आलो. थंडगार पाणी पिऊन घेतलं व एलिझाबेथनं दिलेला बटर लावलेला पाव, केळी व सफरचंद खाल्ली. नंतर पाणी पिऊन, थोडी विश्रांती घेऊन मग गाडीतून निघालो- कांडर स्टॅगकडे.

कांडर स्टॅग. कांडर म्हणजे स्वच्छ, पांढरा व स्टॅग म्हणजे पूल. हॅन्सच्या डोक्यात शामुआज् होते. तो म्हणाला,

'एका शेतकऱ्याच्या शेळीचा शामुआबरोबर समागम झाला, शेतकऱ्याला हे माहीतच नव्हतं. शेळी व्याली, की तिला दूध देणारी शेळीच होईल, म्हणून तो उत्सुक होता. पण.त्या वेळी शेळीला दोन शामुआ झाले. शामुआ जंगली जनावर असल्यानं शामुआचा शेतकऱ्याला काहीच उपयोग नव्हता.'

## नदीचं मूळ

'कांडर स्टॅग' पाटी दिसली नि थोड्या वेळानं गाडी उभी करून आम्ही पर्वताच्या दिशेनं चालू लागलो. फर, पाईन वगैरे झाडांतून आम्ही जात असता पाण्याचा आवाज दुरून एकसारखा ऐकू येत होता. थोड्या वेळानं ते पांढरं शुभ्र पाणी दिसलं. पाटाचं पाणी वाहावं, तसं पाणी वाहत होतं; पण पाटाचं पाणी संथ वाहतं. हे पाणी जोरानं आवाज करत मुसंडी मारत येत होतं. अगदी पुढं पुढं जाऊ, तसतसं ह्या पाण्याचं ओसांडत येणं, त्याचा वेग नि आवाज वाढतच चालला होता. आम्ही जसजसे पाण्याच्या उगमाच्या बाजूनं जात होतो, तसतसा पाण्याचा आवेग वाढतच होता. पहिला प्रवाह पुढं होतो आहे, तोच मागचा प्रवाह त्याला ढकलत होता. पाण्याचा एकमेकांवर आपटण्यानं मोठा आवाज येत होता.

जरा पुढं गेलो, तो पाणी कोसळत होतं. पाणी फेसाळत होतं, उसंडी मारत पुढं येत होतं. तू आधी, का मी आधी, अशी दंगामस्ती करत पुढं येत होतं. तो पाण्याचा पांढरा शुभ्र झोत पाहताना आश्चर्य वाटत होतं. नंतर पाण्याचा प्रवाह रुंदावला होता, तरी त्याची गडबड काही कमी होती नव्हती. उलट, वाढतच होती. नंतर एकदम उंचावरून कोसळणारा धबधबाच दिसला. तो कोसळणारा धबधबा आम्ही पुलावरून पाहत होतो. पाणी फुसांडत, उसळत, कोसळत होतं. बर्फाचं थंडगार, पांढरंशुभ्र, निळी छटा असलेलं स्वच्छ शुद्ध-पाणी !... मागचं येणारं पाणी पुढच्या पाण्याला ढुशी दिल्यासारखं येत होतं नि प्रचंड आवाज करीत होतं. हा एवढा प्रचंड पाण्याचा लोट येतो तरी कुठून ? त्या ओसंडत्या पाण्याचे येणारे लोटच्या लोट पाहून आम्ही चकित झालो होतो. पण पाण्याला थोडीही उसंत नव्हती. वेगानं लोटच्या लोट येतच होते.

आम्ही पुढं पुढं चाललो होतो. त्या पाण्याच्या वेगानं मध्येच मंत्रमुग्ध होत थबकून पाहत होतो. परत चालत होतो. चालता चालता चकित झालो ! कोन करत दोन धबधबे कोसळत होते. ह्या पाण्याला झालं आहे तरी काय ? एवढा हा पाणलोट इतक्या वेगानं कसा येतो आहे ? काही समजेना. जरा आणखी पुढं गेलो, तर (एकमेकांना धक्के देत लोट येत होते, हे लोट पाण्याचे लोट आणखीनच मोठे होते.) कुणी तरी हौदच्या हौद धडाधडा ओतत आहे नि त्या पाण्याला एवढा प्रचंड वेग असूनही तो वेग कमी पडतो आहे, त्यामुळं मागचे लोट प्रचंड वेगानं एकमेकांना धक्के देत पुढं होत होते. दांडगे गिर्रेबाज बैल फुसांडत येत धक्के मारत जावे, तसे हे लोट भांडत होते. गोकाकचा धबधबा पाहिला होता. पण तिथं वरची नदी संथ वाहते. इथं मात्र पाण्याचं दणादण वाहणं चाललं होतं.

इतकं प्रचंड प्रमाणात पाणी कुठून येत आहे, ह्याचा शोध घेत जणू आम्ही चाललो होतो. जरा पुढं गेलो, तर प्रवाहाचं पात्र मोठ्या नदीसारखं झालं होतं. नदीचं विस्तीर्ण पात्र ! एवढी विस्तीर्ण जागा त्या प्रवाहात हवी आहे. बाजूला जरा पुढं गेलो, तेव्हा लक्षात आलं, की तीन बाजूंनी पाणी येऊन ही नदी झाली आहे. त्यांतल्या मुख्य प्रवाहाला अनुसरून आम्ही जात होतो. झाडांच्या सावल्या दिसल्या नि किती तरी उंचच उंच झाडं आजूबाजूला उभी होती. ह्या भांडणाऱ्या पाण्याच्या फुसांडतेपणानं आम्ही इतके स्तिमित झालो होतो, की आजूबाजूला पाहायचं लक्षातही येत नव्हतं. फोटो काढायला जीव तीळ तीळ तुटत होता; पण ऊन उलटचा अंगानं येत होतं.

चालता चालता डोंगर जवळ आले नि आम्ही फिरून थक्क झालो. अजबच गोष्ट दिसली. पर्वताला असंख्य भोकं पडली होती नि त्यांतून पाण्याचे मोठे नळ वाहत होते नि क्षणात लक्षात आलं ग्लेसिअर्स ऊर्फ हिमनग वितळताहेत. (हे अनेकानेक मोठे पाण्याचे प्रवाह मिळून नदीच्या तीन प्रवाहांतला एक प्रवाह झाला होता. जणू तीन नद्या एकत्र येऊन ती अथांग नदी झाली होती. नि तिन्हींची फिरून एक नदी झाली, तेव्हा त्या पाण्याला एकमेकांवर कोसळण्यापलीकडे काही मार्गच उरला नव्हता !) 'नदीचं मूळ नि ऋषीचं कुळ' शोधू नये म्हणतात. तरीही इतके असंख्य उगम ! डोंगरातून असंख्य ठिकाणांहून वाहणारं ते पांढरशुभ्र पाणी आम्ही आसुसल्यासारखे पाहत होतो. फ्रेडलीनं दाखवला, तों एक मोठा प्रपाताचा उगम नि ह्या सहस्र जलधारा !

स्वित्झर्लंडमध्ये, नेस्डेम, तितली, एन्गोलबर्ग, वेटरहॉन, आयगर, मॉंक, जुंग फ्रॉव वगैरे वीस-बावीसहून अधिक हिमशिखरं आहेत. त्यांवरील हिमनग उन्हाळ्यात वितळतात. त्यामुळं आख्खा स्वित्झर्लंड सरोवरांनी व्याप्त आहे. जिथं तिथं बर्फाचं निळं स्वच्छ पाणी.

माघारी फिरणं भाग होतं. म्हणून निघावं, तर परत वाटायचं, आता आयुष्यात फिरून काय आपण येणार नाही. आणखी थोडं पाहू या, म्हणत परत तो पांढरेशुभ्र जलौघ पाहत राहिलो.

हॅन्स पीटर मात्र त्याच्या समोरच्या डोंगरावरच्या झाडीत बॉयनाक्यूलरमधून शामुआज् पाहण्यात दंग झाला होता. मघाशी ते धबधबे, ते फुसांडतं पाणी आम्ही पाहत होतो, तेव्हाही हॅन्स पीटर शामुआ पाहत होता. त्या वेळी शामुआ दिसलाही. कुठं कसं पाहायचं, ते समजावून

त्यानं बायनॉक्यूलर आमच्या हाती दिला होता. पण आम्ही नुसती झाडीच पाहिली. शामुआ पाहायला मिळालाच नाही. आता मात्र शामुआ पाहण्यात मन नव्हतं. परतते वेळी फिरून ते धबधबे पाहिले. प्रवाहाचा भांडकुदळ आवाज नि ते फुसांडत वरून कोसळणारे पाण्याचे प्रचंड प्रवाह परत जाताना डोळे भरून पाहत होतो. मागे वळून वळून पाहत होतो. धबधब्यासमोरच पूल बांधले असल्यानं पुलावरून अगदी जवळ समोर कोसळणारा प्रपात मनसोक्त पाहता येतो. मानवनिर्मित कारागिरीमुळं निसर्गाची ती अद्‌भुत किमया अगदी डोळ्यांसमोरून पाहता येते. डाव्या बाजूनं, समोरून, उजव्या बाजूनं अशा विविध दिशांनी तो प्रपात मनभरून पाहिला. 'जणो व्योमातून येशी, प्रपाता, जाशी पाताली' हे प्रत्यक्ष पाहायला मिळालं.

प्रवाहाचं विविधांगी स्वरूप परत फिरताना नजरेखाली घालून आम्ही कॉफी प्यायला गेलो. कॉफी पिताना समोर एक पर्वत होता व त्यावर झाडी. मला वाटलं, त्याप्रमाणे हॅन्स पीटर बायनॉक्यूलर डोळ्यांना लावून बसला होता. कॉफी पिताना हे 'शामुआ' प्रकरण पाहण्याची आम्हांला पण उत्सुकता वाटली. हॅन्स पाहत होता व त्याला एक, दोन, तीन म्हणता म्हणता आठ शामुआ दिसले. आता आठ शामुआंमधला एखादा शामुआ दिसणं सहज शक्य होतं, म्हणून मला उत्सुकता वाटू लागली. तेवढ्यात बायनॉक्यूलर लावलेल्या स्वातीला पण दोन शामुआ दिसले. मीही उत्सुक होत बायनॉक्यूलरमधून शामुआ पाहू लागले. मला आपली नुसती झाडीच दिसत होती. (उजवीकडची झाडी, मग त्याच्यामागे जरा कमी झाडी, त्याच्या चार पावलं मागे शामुआ दिसताहेत, असं त्यानं सांगितलं; पण मला आठमधला एकही शामुआ दिसत नव्हता. मागे एकदा टिटवाळ्याच्या खांबातून ऐकू येणारा पंढरपूरला वाजणाऱ्या झांजांच्या आवाजाप्रमाणे हा प्रकार वाटला. दादर भगिनी समाजातल्या सर्व भगिनींना ऐकू आले. अपवाद होता, तो फक्त माझाच.) हॅन्स पीटरला आठ शामुआ दिसले. तो मला परत कोणत्या ठिकाणी शामुआ पाहायचा, ते सांगत होता नि विद्यार्थ्यानं अगदी 'ढ' असणं बरोबर नाही, हे जाणून मी एक शामुआ पाहिल्याचं सांगितलं. तिघांनाही शामुआ दिसले, म्हणून खूश होत आम्ही गाडीत बसलो.

## उकडलेली कणसं

रात्रीसाठी एलिझाबेथनं उसळीसारखा एक पदार्थ बनवला होता. त्यात फोडणी व तिखट हा भाग नसतो. भातात मीठ व पिवळा रंग टाकून रंगीत भात तयार केला होता. आम्हांला आवडतात, म्हणून मक्याची कणसं उकडली होती. योघर्टचे विविध प्रकार होते. पाव व बटर, चीज हे नेहमीचे प्रकार होतेच. सॅलड म्हणून एक कच्चा हिरवा पाला होता. योघर्ट म्हणजे दही. पण ते घरी बनवलेलं नसतं व अननस, सफरचंद, संत्रं असे विविध स्वाद त्यात टाकलेले असतात.

आज ॲन्ड्र्यूज आमच्याबरोबर जेवायला नव्हता व ख्रिस्तीयाना नुकतीच आली होती. 'प्लेन योघर्ट आम्ही घरीच बनवतो' असं सांगून दही, दूध, लोणी, तुपापर्यंतचे प्रकार मी तिला सांगितले. हे सारं आपल्या आकलनापलिकडचं आहे, असं एलिझाबेथ म्हणाली नि माझ्या एक

गोष्ट लक्षात आली, की ह्या बायका स्वयंपाकघरात जास्त गुंतून घेत नाहीत.

उकडलेली कणसं मला खूपच आवडली होती. मी त्यांची खूप स्तुती केली, तेव्हा एलिझाबेथ म्हणाली,

'थँक्यू, मंदाकिनी, तुला आमचा एक तरी पदार्थ खूप आवडला.'

'तसं नाही हं. मला ही उसळही खूप आवडली...' मी म्हटलं, तेव्हा एलिझाबेथ खूश झाली.

'अतिथि देवो भव' हे लक्षात घेऊन मी भाताची व योघर्टची पण स्तुती केली, तेव्हा एलिझाबेथ समाधानानं हसली. सहज बोलता बोलता मी तिला आपल्याकडची फोडणी, त्यात तिखट, मीठ वगैरे घालून भाज्या कशा करतात, ते सांगितलं, तेव्हाही किंचित हसत ती म्हणाली,

'कठीण आहे.'

'कठीण आहे' हे दोन सोपे शब्द बोलताना आम्हांला अवघड जातं नि जमणाऱ्या, न जमणाऱ्या असंख्य रेसीपीज् करण्यात आम्ही आयुष्य खर्ची घालतो. कधी कधी 'कठीण आहे' हा सोपा शब्द उच्चारायला हरकत नाही. मला जाणवलं.

## शामुआ ? छे, झुडपं !

बटाटा खाता खाता एकदम आठवून मी म्हटलं,

'आज हॅन्सला आठ शामुआज् दिसले.'

तेव्हा ओठांच्या कोपऱ्यांत हसत एलिझाबेथ म्हणाली,

'सगळे शामुआ असतील, ह्याबाबत मला खात्री वाटत नाही.'

हॅन्स पीटर हसला नि खात्री देत म्हणाला,

'खरोखरीच आठ शामुआ दिसले.'

नकारार्थी मान हलवत एलिझाबेथ म्हणाली,

'त्यांतली काही नुसती झुडपंच असावी...'

ऐकताना मला खूप बरं वाटत होतं.

तेवढ्यात ख्रिस्तीयानानं आम्हांला विचारलं,

'फ्रान्समध्ये वस्तू खूप स्वस्त होत्या का ?'

'आम्हांला तरी त्या महागच वाटल्या...' स्वाति म्हणाली.

'हो ! आमच्याकडे खूपजणं फ्रान्समध्ये जाऊन बरीच खरेदी करतात. इथल्यापेक्षा वस्तूंचे भाव तिथं खूप कमी असतात, असं म्हणतात.' ख्रिस्तीयाना म्हणाली.

'खरं सांगू, भारतात साऱ्याच वस्तू खूप स्वस्त मिळत असल्यानं आम्हांला सगळीकडचंच महाग वाटतं...' मी सांगितलं.

'मन्दाकिनी, आणखी एक कणीस खाणार ?' एलिझाबेथनं प्रेमळपणे विचारलं.

मला आणखी आख्खं कणीस नको होतं, म्हणून मी स्वातीला म्हटलं,

'आपण शेअर करू...'

'चालेल...' स्वाति म्हणाली.

आम्ही अर्धं अर्धं कणीस वाटून घेतलं. एलिझाबेथमधली गृहिणी समाधानानं हसली.

हॅन्स पीटर किंचित हसून म्हणाला,

'आम्ही फ्रान्समध्ये समर व्हेकेशनसाठी गेलो होतो, तर आमची आख्खी गाडीच चोरीला गेली.'

'गाडी मिळाली नाही ?' स्वातीनं विचारलं.

'गाडी मिळाली, पण आतल्या सगळ्या वस्तू चोरीला गेल्यानं आम्ही परतच आलो.'

'फ्रान्सच्या चोरांपासून आम्ही सुटलो...' मी हसत म्हटलं.

## जुंग फ्रॉव

तिसऱ्या दिवशी सकाळी आम्ही जुंग फ्रॉव पाहायला निघालो. 'बाच' फॅमिलीत येऊन आज संध्याकाळी दोन दिवस पुरे होणार होते.

जुंग फ्रॉव पर्वतावर स्टेशनवर जायला तीनदा रेल्वे बदलावी लागते. मुरेन स्टेशनवरून प्रथम म्युरेनवन ह्या गाडीचा प्रवास, नंतर वेंगन स्टेशनवर गाडी बदलावी लागते. नंतर क्लेन स्टेशनवर जुंग फ्राव गाडीत बसायचे.

म्युरेनगाडीत बसल्यावर खाली खाली जात मग परत वर जाऊ लागलो. तर नंतरच्या दोन गाड्या उभेच्या उभे कडे चढतात. अनुभव तितलीज्सारखाच. प्रथम उंच झाडं. मग खुरटी झुडपं व पिवळी फुलं नि मग हिमनग दिसू लागतात. इथंही टनेलमधूनच वर जायचं असतं. गाडीतून उभेच्या उभे कडे चढताना खूप गंमत वाटते. मात्र तितली ३०२० मीटर उंच आहे, तर जुंग फ्रॉव ३४५४ मीटर उंचीवर आहे. जुंग फ्रॉवला गेलो. तिथं बर्फाचा राजवाडा अत्यंत देखणा आहे. पण मला स्वत:ला तितलीज्मध्ये केबल कार, लिफ्ट वगैरे जी विविधता आहे, ती जास्त आवडली.

घरी गेलो, तो आम्हांला भूक लागेल, हे जाणून विविध पदार्थ डायनिंग टेबलावर होतेच. शिवाय एलिझाबेथ आमच्या पुढच्या प्रवासाचं मार्गदर्शन करण्यासाठी मोठा नकाशा घेऊन बसली होती. बाझलवरून निघणारी ७.२२ ची गाडी मिलानोला १२.३५ ला पोचणार होती. त्या आधी सिस्टे कॅलेंडे हे स्टेशन येणार होतं. तिथून आम्ही 'टायनो'ला इटलीतल्या आमच्या होस्टला फोन करायचा होता. एलिझाबेथ स्पीझवरून 'टायनोला' आमच्या होस्टला फोन करायचा प्रयत्न करीत होती. पण खूप प्रयत्न करूनही फोन काही केल्या लागत नव्हता. नंतर सकाळी आमच्याबरोबर भरपूर नास्ता देऊन तिनं, आणखी काही हवं का, विचारलं. आम्हांला अर्थातच काही नको होतं. आम्ही त्यांना चंदनी व लेदरची प्रेझेन्ट्स दिली. आमच्या स्वित्झर्लंडच्या स्वर्गीय प्रवासाचा तो अखेरचा दिवस होता. स्वित्झर्लंडला आम्ही चक्क नऊ दिवस राहिलो होतो. नंतर त्या सुंदर देशाला व त्या देशाच्या प्रेमळ लोकांना टाटा केला व इटलीच्या दिशेनं आमचा प्रवास सुरू झाला.

***

# इटलीतलं टायनो खेडं

मी व स्वाति अशा आम्ही दोघीच युरोप - प्रवास करीत होतो. इटली ह्या वैभवसंपन्न देशात आम्ही जाणार होतो. अनेकानेक नद्या व इथल्या कुठल्याही भागापासून जवळच असणारे डोंगर आणि फळफळावळ यांची विपुलता म्हणजे इटली. 'सर्व्हास' तर्फे आमचा हा प्रवासयोग घडत होता.

देवानं ज्या सेंट पीटरच्या हाती स्वर्गाच्या किल्ल्या दिल्या, तो धर्मोपदेशक रोमचा, म्हणजे इटलीचाच ! 'डिव्हाईन कॉमेडी' लिहिणारा दान्ते इटलीचाच. देवानं ज्या सेंट पॉलना, टेन कमांडमेंट्सची पुस्तकं दिली, ते सेंट पॉल इटलीचेच (रोमचे). नाटककार पिरांदेलो, मार्क अँटनी इथलेच. रूदनानी, मायकेल अँजलो वगैरे शिल्पकार इथलेच. बर्नोनीसारखा ख्यातनाम आर्किटेक्टही ह्याच भूमीत जन्माला आला. लिओनार्दो द व्हिन्सी हा ख्यातनाम चित्रकार इथलाच. त्यामुळं शिल्प व चित्रकलेचं मन थक्क करणारं वैभव इटलीतच दिसणार होतं.

मर्चंट ऑफ व्हेनिस आणि रोमिओ अँड ज्यूलिएट ह्या नाटकांची स्फूर्ती शेक्सपिअरला मिळाली, ती ह्याच भूमीत. इटलीतच ख्रिश्चन धर्म उच्चतम शिखरावर पोचला.

रोमच्या पोपला जगात महत्त्व आहे, ते रोम शहर ज्या इटली प्रदेशात आहे, त्या प्रदेशात आमची गाडी जात होती. प्रवेश करताना पासपोर्ट व व्हिसा तयार ठेवला होता. तिकीट तपासणारी बाई येऊन गेली; पण व्हिसावर स्टँप मारणारा गायब होता. सिस्टे कॅलेंडेला पोलीस इन्स्पेक्टरला त्याबाबत विचारलं, तेव्हा त्यानं दोन ठिकाणी फोन केले आणि स्टँप मारलेला नसला, तरी चालेल, असं सांगितलं. पण पठ्ठा तसं लिहून देईना. एकूण सगळा गलथानच कारभार.

इटलीतल्या 'सिस्टे कॅलेंडे' ह्या गावी जाऊन, चार किलोमीटर जागेवर असलेल्या यजमानांच्या घरी आम्ही जाणार होतो. त्यांची फुलांनी बहरलेली ती बाग पाहायला आम्ही उत्सुक होतो. सिस्टे कॅलेंडेहून आमच्या, 'संगीओव्हन्नी' ह्या यजमानांच्या घरी फोन केला; तेव्हा तुम्हांला घ्यायला येतो, असा फोन आला.

बऱ्याच वेळानं, गाडीतून एक उंच, गोरा, देखणा तरुण खाली उतरला. आमच्याकडे येत म्हणाला,

'मंदाकिनी ॲण्ड स्वाति ?'

'हो हो' करत आम्ही पुढं झालो.

'मी फॅबिओ...' तो म्हणाला.

रॅफेलचा हा दुसरा मुलगा. आम्ही पत्रात त्यांना शनिवार ते मंगळवार येऊ; पण शक्यतो सोमवार, असं लिहिलं होतं. आज रविवार होता. अर्थात शनिवारी स्वित्झर्लंडवरून येत आहोत, असं कळवलं होतं.

गाडीत बसल्या बसल्या फॅबिओ म्हणाला,

'आज संध्याकाळी आमच्याकडे पार्टी आहे. लुकाचे मित्र-मैत्रिणी येणार आहेत.'

'संगीओव्हन्नी' ह्या आमच्या यजमानांचं घर भलं मोठं दिसत होतं. बाहेर गॅरेजमध्ये दोन गाड्या उभ्या केल्या होत्या व गॅरेजमधूनच आम्ही घरात प्रवेश केला. गॅरेजला लागूनच खाली

दोन हॉल मावतील, एवढी विस्तृत जागा नि शिवाय बारक्या दोन खोल्या व टॉयलेटसहित बाथरूम व बेसिन अशी व्यवस्था होती. त्या भल्या मोठ्या जागेत कोपऱ्यात दोन बेड होते. वरच्या झरोक्यातून आत उजेड येत होता. तिथंच आम्ही आमचं सामान ठेवलं. तोपर्यंत गृहलक्ष्मी आली होती.

'ही तुमची बेडरूम....' गृहलक्ष्मी स्टेफिना म्हणाली.

'स्टेफिना...' फॅबिओनं ओळख करून दिली.

आमची यजमाणीन स्टेफिना पँट व मनिलामध्ये होती. गोरी, जाडी आणि भरभरीत चेहऱ्याची होती. साठ वर्षांची असून 'टक् टक् टक्' करत चालत आली. थोडी आगाऊ आहे का ? मला शंका आली. आमचं तिच्याशी हस्तांदोलन झालं.

रॅफेलची ओळख करून दिल्यावर लक्षात आलं, की हाच आपला प्रमुख होस्ट. रॅफेल अगदीच फाटक्या अंगाचा नि कसलंही व्यक्तित्व नसलेल्या चेहऱ्याचा होता. कपडेही खास नव्हते. मला तर तो घरगडीच वाटला होता. खरं तर, तो मिलानोला मोठा मॅनेजर आहे. फॅबिओ त्या दोघांचा आहे, असं वाटणारही नाही, इतका देखणा होता.

आम्ही स्टेफिनाबरोबर जिन्यानं वर गेलो व किचनमध्ये गेलो. तिथंच डायनिंग टेबलही होतं. थोड्याच वेळात आम्ही जेवायला बसलो. जेवायला ब्राऊन ब्रेड, बटर, चीज असा साधा बेत होता. जोडीला मद्य होतंच. टेबल नॅपकीन्स - प्रत्येकाला वेगळे. नॅपकीन्स वगैरे कलाकुसर अद्ययावत होती. रॅफेलनंच टेबल सजवलं होतं. एखाद्या कामकरी माणसासारखा तो काम करीत होता. स्टेफिनाची घरात 'वट' दिसत होती.

लुकानो हा स्टेफिनाचा मोठा मुलगा व फॅबिओ नंबर दोनचा मुलगा व पावला म्हणून एक मुलगीही आहे. लुकानोचं लग्न झालेलं आहे. तो वेगळा असतो.

जेवता-जेवता की पाव खाता-खाता. स्टेफिना म्हणाली,

'फॅबिओचं लग्न ठरलं आहे. त्यामुळं तो त्याचं घर सजविण्याच्या गडबडीत आहे.

'त्याचं घर ?' मी प्रतिप्रश्न केला.

'त्याचं आता लग्न होणार आहे. त्यामुळं आता त्याला वेगळं घर घ्यावं लागेल.'

एवढं मोठं घर. एक मुलगा तर दूरच राहतो. नि तरी फॅबिओ वेगळं घर का पाहतो आहे, हे मला समजत नव्हतं. एवढ्या तीन हजार स्क्वेअर फूटमध्ये फॅबिओबरोबर त्याची बायको सहज राहू शकत होती. फॅबिओ वेगळं घर घेतोय्, हे मला जरा वेगळंच वाटलं, म्हणून मी तिला विचारलं,

'लग्न ठरलं, की लगेचच तुमच्याकडे मुलगा वेगळं घर घेतो ?'

'अर्थात, मग तुमच्याकडे काय पद्धत आहे ?' स्टेफिनानं उत्सुकतेनं विचारलं.

'आमच्याकडे साधारणत:, लग्न झाल्यावरही मुलगा घरीच राहतो. घर अगदी लहान असेल, तरच मुलगा वेगळा राहतो.'

'सासू व सून एकत्र राहते ?' भल्या मोठ्या आश्चर्यानं स्टेफिना विचारीत होती.

'हो.' मी अगदी सहजतेनं उत्तर दिलं.

'देन हू वुल बी द डायरेक्टर ?' स्टेफिनानं विचारलं.

'सासू प्रथम घरावर अधिकार दाखवते. मग सून, पण मुख्यत: एकमेकांना समजून घ्यावं लागतं.'

'छे, छे. पण एका घरात दोन डायरेक्टर ! हे कसं शक्य आहे ?'

एक राज्य, दोन पंतप्रधानांनी चालवावं, इतकं तिला, दोन बायकांनी एक घर चालवणं हेही अवघड वाटत होतं.

## इटलीतील सोनिया

फॅबिओनं पटकन विचारलं,

'सोनिया इटलीची नि तिनं तुमच्या पंतप्रधानांशी लग्न केलं. त्याबाबत भारताच्या जनतेचं काय मत होतं ?'

'काही नाही. भारतातल्या लोकांनी ते स्वीकारलं.' मी सहजतेनं सांगितलं.

इटलीतल्या सामान्य घरातल्या सोनियाचं भारतातल्या पंतप्रधानांच्या मुलाशी लग्न झालं, याचं त्यांना फार आश्चर्य वाटलं.

आमच्या इथं श्रीमंत लोकांनी वा मंत्र्यांनी काही केलं, तरी चालतं. नियम असतात, ते सामान्य लोकांसाठी. सोनियाची इच्छा नाही म्हणून, नाही तर ती पंतप्रधान सुद्धा होईल. हे मी त्यांना सरळ सरळ सांगावं का ? मला प्रश्न पडला.

गप्पा मारता-मारता मी स्टेफिनाला सांगितलं की,

'आमच्या इथं हुंडा पद्धती आहे.' पण तिच्या चेहऱ्यावर, अजिबात आश्चर्य नव्हतं.

ती म्हणाली,

'काही वर्षांपूर्वी; आमच्या इथंही, मुलीकडून हुंडा घेतला जायचा. रोममध्ये ती पद्धत, अगदी आताआतापर्यंत होती. आम्ही मिलानोवाले सुधारलेले लोक आहोत. त्यामुळं आमच्याकडे ती पद्धत नाही.'

वा ऽ! म्हणजे हुंडा पद्धती, स्त्रीला दास्यात ठेवणं हे प्राचीन संस्कृतीचे अविभाज्य घटक आहेत ! नि तरी त्या जुनाट संस्कृतीचे आपण गोडवे गायचे !

'तुमच्या इथं डायव्होर्सचं प्रमाण कितपत ?' मी विचारलं.

'वाढलं आहे. प्रथम डायव्होर्स इतके नव्हते. पण दोघांचं एकत्रित पटेलच, ह्याची खात्री नसल्यानं बऱ्याच बायका आता नोकरी करतात.' रॅफेल म्हणाला.

थोड्या वेळानं मला त्यांच्या पावला ह्या मुलीची आठवण झाली. मी स्टेफिनाला विचारलं,

'तुमची मुलगी पावला ती सध्या काय करते ?'

'पावला ना ? ती कॉलेजच्या तिसऱ्या वर्षाला गेली; पण सध्या ती मैत्रिणींबरोबर, इंग्लंडमध्ये विविध देशांत फिरायला गेली आहे.'

इंग्लंडचा अनुभव ताजा असल्यानं पाश्चिमात्य देशांत मैत्रिणी-मैत्रिणींनी देश-विदेश पाहायला जाण्यात मला आता आश्चर्य वाटलं नाही.

'स्कॉटलंड, आयर्लंड वगैरे खूप छान देश आहेत. पावला खूप मजा करत असेल; पण अजून तिचं पत्र आलं नाहीये. आम्ही तिच्या पत्राची वाट पाहत आहोत,' स्टेफिना म्हणाली.

'लुकाचं लग्न होऊन किती वर्षं झाली ?'

'दोन वर्षं झाली. आता त्यांना आठ महिन्यांचा एक गोड मुलगा आहे.' स्टेफिनानं माहिती सांगितली.

## चार किलोमीटर गार्डन

आम्ही 'टायनो' हे गाव निवडताना 'चार किलोमीटर गार्डन' ह्या गोष्टीनं आम्हांला आकर्षित केलं होतं. ते लक्षात येऊन स्वातीनं पटकन विचारलं,

'तुमच्या इथं बागेची देखभाल कोण करतं ?'

'गार्डन फार मोठी नाही. तसं आठ-पंधरा दिवसांनी आम्ही गवत कापतो. पण गार्डन लहानच असल्यानं देखभाल विशेष लागत नाही.'

'का ? चार किलोमीटर गार्डन आहे ना ?' मी आश्चर्यानं विचारलं.

खरं तर, मन धसकलंच.

'छे, छे ! कुणी सांगितलं ?' स्टेफिनाचा मलाच प्रश्न.

मी एकदम गोंधळूनच गेले. स्वातीला होस्ट लिस्टमध्ये, चार किलोमीटर गार्डन पाहिल्याची खात्री होती. ती म्हणाली,

'होस्टलिस्टमध्ये तर लिहिलंय् की, हाऊस विथ गार्डन, फोर किलोमीटर, असं ?'

त्यावर रॅफेल म्हणाला की,

'आमचं घर स्टेशनापासून चार किलोमीटर अंतरावर आहे. होस्टलिस्ट छापण्यात चूक झाली आहे.'

माझा चेहरा पार पडला. ही चार किलोमीटर गार्डन नि त्याशेजारचं घर कसं आहे, ते पाहावं तरी, ह्या हेतूनं हे 'टायनो' सारखं आडवाटेचं खेडं आम्ही निवडलं. नि इथं तर काहीच नव्हतं. एक तर सिस्टे कॅलेंडे हे लहानसं स्टेशन. त्यात 'टायनो' हे चार किलोमीटर अंतरावरचं खेडं ! तेव्हा खेडं निवडण्यात चूकच झाली होती.

'इथं स्टेशनला जायला इतर वाहनांची सोय काय आहे ?' स्वातीनं विचारलं.

'काही नाही.' फॅबिओ म्हणाला.

'मग लोक स्टेशनवर कसे जातात ?'

'गाडीनं....' फॅबिओनं शांतपणे उत्तर दिलं.

'पण ज्यांच्याकडे गाडी नसेल, त्यांनी काय करावं ?' स्वातीनं नेटानं विचारलं.

'आत्महत्या करावी.' फॅबिओ शांतपणे म्हणाला.

भारतात खेड्यापाड्यांतून एस्. टी. गेली आहे आणि इटलीसारख्या पाश्चिमात्य देशात स्वत:च्या कारशिवाय वाहन नाही ! मग पुढं लक्षात आलं, की पाश्चिमात्य देशांत प्रमुख शहरं सोडली, तर बस कुठं नाहीच व भाडी फार महाग असतात. नाही तर, आमच्या बायका भाजी आणायला बस, नाहीतर रेल्वेनं जातात !

लिस्टमध्ये पाहिलं, तर छपाईची चूक अजूनही चालूच होती व आमच्या होस्टनं त्यात बदल केला नव्हता !

'आज रात्री पार्टी असल्यानं आम्ही गडबडीत आहोत.' स्टेफिना म्हणाली. जेवणासाठी असलेल्या साध्या बेताचं कारण बहुधा तिनं सांगितलं.

जेवण झाल्यावर रॅफेलनंच भांडी धुतली आणि आमची डिश व ग्लास धुऊन टाकला.

'इथं पाहण्यासारखं काय आहे ?' स्वातीनं फॅबिओला विचारलं.

'तुम्ही अंजेरा बीचला जा.' फॅबिओ म्हणाला. तिथून बोटीनं आणखी कुठंसं जायलाही सांगितलं. पण बोटीचा प्रवास हाच त्यातला आनंद ! जिथं जायचं, तिथं साधंसं चर्च होतं. बाकी काही नाही.

इटलीसारख्या-थोर चित्रकार, थोर शिल्पकारांच्या देशात जाऊन, पाहायचं काय, तर अंजेरा बीच ! म्हणजे मुंबईत जाऊन धारावी झोपडपट्टी पाहून यायची !

'तुम्ही अंजेरा बीचला जा. तिथून बोटीनं 'रॉक बोटोमेआला जा.' फॅबिओनं दिवसाचा प्रोग्रॅम काय असावा, हे सुचवलं.

'इथं आणखी काय पाहण्यासारखं आहे ?' मी विचारलं.

नकाशात 'कोमो' टायनोजवळ दिसत असल्यानं मी विचारलं.

'नाही. अंजेरा बीचच खूप छान आहे. बोटीनं जाताना मजा येते.' फॅबिओ म्हणाला.

## दुसऱ्या होस्टच्या शोधात

आम्ही दुसरा होस्ट शोधण्याच्या विचारात होतो. 'आयत्या वेळी मिळणारे होस्ट' अशांची नावं ज्या कागदावर लिहिली होती, तो कागदच मिळेना. कसलं तरी यंत्र चालवल्याचा नि खाटखुट आवाज एकसारखा येत होता. नंतर कळलं, की रॅफेल गवत कापायच्या यंत्राच्या साहाय्यानं गवत कापीत होता.

आम्ही कागद शोधत होतो. तेवढ्यात स्टेफिना आली नि म्हणाली,

'मला बाजारहाट करायचा आहे. तुम्हांला कुठं सोडायचं, तिथं मी सोडते.'

तिचा बोलण्याचा सूर आम्हांला घरातून हुसकून काढण्याचा होता.

'आज पार्टी आहे. मला बऱ्याच गोष्टी आणायला मार्केटमध्ये जायचंय्. .' स्टेफिना म्हणाली.

'मग आम्ही मार्केटच पाहायला येऊ का ?' मी विचारलं.

मला 'बर्नला' टेरेसनं दाखवलेला रंगीबेरंगी बाजार आठवला.

'नको.. मार्केटमध्ये नको...' स्टेफिना म्हणाली.

'मग अंजेरा बीच. ' मी फॅबिओनं सांगितलेला स्पॉट सांगितला.

दुसरा इलाजच नव्हता. काय पक्वान्न खाणार ? म्हणून विचारायचं आणि घरात फक्त पोळी आहे, असं सांगायचं. असली यजमानीण !

थोड्याच वेळात स्टेफिना पँट, टी शर्ट व उंच टाचेचे बूट घालून आली. आम्हांला 'अंजेरा बीच'ला सोडून ती गेली. वास्तविक 'लोंबार्डी' हा अत्यंत देखणा प्रदेश आहे, असं होस्ट लिस्टमध्ये लिहिलं होतं. त्याच लोंबार्डी प्रदेशात आम्ही आलो होतो. कोमोला जायचं, तर स्वत:ची गाडी हवी. त्यामुळं ते शक्यच नव्हतं.

स्वित्झर्लंडला आम्हांला सुख देण्याची जणू होस्टमध्ये स्पर्धा लागली होती. इथं वेगळाच प्रकार जाणवला.

'आपल्याला ते कटवताहेत...' स्वाति म्हणाली.

'मुळात हो कशाला म्हणाले ? आपण दुसरा होस्ट शोधला असता.' मी म्हणाले.

अंजेरा बीचला माणसांची गर्दी मात्र खूप होती. युरोप वा अमेरिकेत, 'बीच' म्हटलं, की माणसं मुंग्यांसारखी चिकटलेली असतात. तोच प्रकार इथंही होता.

अंजेरा बीच तसा देखणा होता. अत्यंत स्वच्छ होता. उभ्या व आडव्या रस्त्यावर खूप लांबपर्यंत झाडांच्या दोन ओळींतून रस्ता जात होता. मात्र ही झाडं, फर, पाईन वगैरेंसारखी देखणी नव्हती. आपल्या इथल्या झाडांप्रमाणे झाडं होती. ह्या दुतर्फा झाडांच्या मध्येच उंची हॉटेल होतं. तिथंही भरपूर माणसं खाद्यपदार्थांचा समाचार घेत होती.

'ह्या झाडांना फुलं येत असतील, तेव्हा हा परिसर खूप दिसत असेल.' मी म्हटलं,

दोघी बायका जात होत्या. त्यांना विचारलं,

'ह्यांना येणारी फुलं कशी दिसतात ?'

'ह्या झाडांना फुलं येतात; पण खास नाही.'

'म्हणजे फुलांनी ही झाडं सगळीकडून फुलून वगैरे येत नाहीत ?' मी अंजेरा बीचचं विशेषत्व धुंडत होते नि प्रयत्न करूनही ते सापडत नव्हतं.

'छे. छे अजिबात नाही.'

मुलीसाठी उत्तम स्थळ म्हणून खटपट करावी नि ते बेकार निघावं, तसं झालं होतं.

मग आम्ही घरांच्या भोवतीचे बगीचे पाहत हिंडत राहिलो. श्रीमंत वस्ती दिसत होती. घरं विविध आकारांत होती व बगीचे खास निगा ठेवून राखलेले होते. मलबार हिलवरचा बंगल्यांसारखे बंगले वाटत होते व बंगल्यांसमोर अनेकानेक फुलांनी डवरलेले बगीचे मात्र खूपच छान वाटत होते. पण त्यासाठी खर्च करून इटलीला येण्याची जरुरी नव्हती.

खूप उशिरा रॅफेल न्यायला आला. आम्ही फोनवरून होस्ट पक्का करण्याबाबत बोललो. तो म्हणाला,

'इथं डायरेक्ट डायलिंग नाही. ट्रंककॉल करावा लागेल.'

परवा व्हेनिसचा होस्ट पक्का होता. उद्याच्या दिवसाचा प्रश्न होता. नंतर घरी गेल्यावर युरेल पासचं टाईमटेबल पाहिलं, तेव्हा इथून मिलानोला जाणं शक्य होतं. आम्ही तेच करायचं ठरवलं.

तेवढ्यात वर जेवायला आमंत्रण आलंच.

**<u>श्रीमंत; पण महाकद्रू</u>**

आम्ही वर पोचलो, तो सगळी जेवायला जमलेली होतीच, की आम्ही नाही, हे लक्षात येऊन आयत्या वेळी रॅफेल न्यायला आला, कोण जाणे. लुका, लुकाची बायको, सात-आठ महिन्यांचा त्यांचा मुलगा, लुकाचा एक मित्र व घरची अशी मंडळी जेवायला होती. पार्टी; आम्ही खाली झोपणार होतो, तिथं होती. साऱ्यांशी आमची ओळख करून दिली.

जेवायला आज स्पॅघेटी होती. पाव व बटर होताच. स्टेफिनाला स्पॅघेटी मुळीच जमली नव्हती. नुसत्या शेवया उकडल्या होत्या. त्यांत ऑलिव्ह ऑईल व मीठ घातलं होतं. ऑलिव्ह ऑईल तोंडाला सारखं चिकट चिकट लागत होतं. त्यावर टोमॅटोच्या फोडी होत्या. इतरांप्रमाणे आम्ही टोमॅटोच्या फोडी स्पॅघेटीवर घालून घेतल्या होत्या. डिशमध्ये थोडीशी स्पॅघेटी घेतली होती. त्यानंतर आम्ही पावच खात होतो.

रॅफेलनं आणखी स्पॅघेटी घेण्याचा आग्रह केला. आम्ही गोड शब्दांत नकार दिला, तेव्हा लुकाचा मित्र म्हणाला,

'स्पॅघेटी ही तर इटलीची स्पेशल डिश आहे.'

काय स्पेशल बनवलंय्! मी मनातल्या मनात.

'छान लागतेय्! पण आम्हांला आणखी नकोय्.' असं मी गोड शब्दांत सांगितलं.

जेवण झाल्यावर मी, स्वाति व रॅफेलनं टेबल आवरलं.

पार्टी खाली असल्यानं जेवण झाल्यावर आम्ही वरच बसलो होतो. लुका व त्याची पत्नी दोघेही दिसायला सुरेख होते. दोघांनीही, पार्टीत सामील होण्यासाठी आम्हांला गोड आग्रह केला व नृत्यामध्ये सामील होण्यासाठी सांगितलं. एक तर त्यांचं नृत्य आम्हांला येत नव्हतं व 'या' म्हटल्याबरोबर त्यात लगेच घुसणं, सभ्यतेला धरून वाटत नव्हतं.

पार्टीला लागणारे विविध पदार्थ लुका व लुकाची बायको घेऊन आली होती. लुकानं व त्याच्या बायकोनं पार्टीची सारीच तयारी केली होती. फक्त त्यांची जागा लहान असल्यानं, इथं पार्टीची व्यवस्था केली होती व लग्न झाल्यावर मुलानं वेगळंच राहायचं, असा नियम असल्यानं, पार्टीसाठी जागा देणं हेच स्टेफिनाचे त्यांच्यावर उपकार होते ! आपल्याकडे नवीन लग्न झालेली सूनही, ती सारी स्वत:चीच जागा समजली असती !

स्टेफिना मघाशी; पार्टी आहे, पार्टी आहे, करत मार्केटमध्ये गेली होती. स्वत:च्या घरचा बाजारहाट करण्यासाठी. स्टेफिना मुंबईतल्या काही उच्चभ्रू स्त्रियांच्या पठडीतली होती. कोणताही खास उद्योग न करताही, ह्या बायका सतत गडबडीत असतात !

आम्ही वर खुर्च्यांवर बसलो होतो. लुका व फॅबिओ, पार्टीला या, म्हणून सांगून गेले. पण स्टेफिना वरच हिंडत होती. ती काही म्हणाली नाही, की निदान आपण खाली पाहायला तरी जाऊ. किंवा एखादा केकचा, नाही तर बर्फीचा तुकडा तरी खाऊन येऊ.

रात्री रॅफेलनं आम्हांला दोन आरामखुर्च्या असलेल्या शेजारच्या खोलीत नेलं व तिथं खुर्च्यांवर आरामात बसायला सांगितलं. केव्हा तरी आम्हांला झोप लागली. दीड किंवा दोनच्या सुमारास लुका व त्याच्या बायकोनं, आम्हांला खाली बेडवर झोपायला सांगितलं आम्ही खाली उतरलो, उरलेले पदार्थ घेऊन जाण्यासाठी एकत्र ठेवले होते. ते दिसले. मग आम्ही लगेचच झोपलो.

दुसऱ्या दिवशी सोमवार होता. स्टेफिना व रॅफेलला, स्टेफिनाच्या आइकडं जायचं होतं. पहाटे पाच वाजताच तिनं आम्हांला उठवलं. आम्ही आमची नेलेली चहा पावडर होतीच. आम्ही आमचा चहा बनवला. जोडीला कालचा ब्राऊन बेड होताच.

आंघोळीचं पाणी थंडगार होतं, म्हणून स्वाति रॅफेलला म्हणाली,

'गीझरला गरम पाणी येत नाहीये.'

तो म्हणाला,

'बराच वेळ सोडा. मग येईल.'

सुरुवातीला गोमूत्रासारखं तरी गरम पाणी नळाला येत होतं. बराच वेळ सोडल्यावर थंडगार पाणी यायला लागलं.

गडगंज श्रीमंत दिसत होते; पण महाकद्रू होते. 'सर्व्हास मेंबर' असणं इटलीत मानाचं मानलं जात असावं, म्हणून कदाचित ते 'सर्व्हास मेंबर' झाले असावेत.

तशी हवा थोडी-फार थंड होती. गार पाणी बाधलं, तर घ्या काय ? म्हणून आम्ही नुसतेच हात, पाय व तोंड धुतलं. तेवढ्यात स्टेफिना 'बी क्विक' म्हणत व सॅंडल्सचा 'टक् टक्' आवाज करत दोनदा येऊन गेली. घर चालवणाऱ्या गृहिणीला ती 'डायरेक्टर' म्हणत होती. पण ती मात्र घरातली 'डिक्टेटर' वाटत होती. आम्ही निघताना परत एकदा पाणी गरम येतं का, ते पाहिलं, ते थंडगार येत होतं.

'रॅफेलला म्हणजे घरच्या मालकालाही, स्टेफिनानं थंडगार बनवलंय, तिथं पाण्याची काय

बिशाद, ते गरम होईल !' मी नळ बंद करत हसत म्हणाले.

## ड्यूमा कॅथेड्रल

आम्ही मिलानोला जाणाऱ्या गाडीत बसलो नि मग आम्हांला मिलानोचेच वेध लागले; मिलानो स्टेशनवर माहिती देणारीला इंग्लिश छान येत होतं. आमच्या हाती मॅप देऊन मिलानोत कुठं कुठं प्रेक्षणीय स्थळं आहेत, ते तिनं अगदी व्यवस्थित दाखवलं. शंभर लिरांचं मिलानो सब-वेचं तिकीट काढलं. ते बस व रेल्वेला पंच्याहत्तर मिनिटांपर्यंत चालतं.

ह्या सबवेनं जाऊन स्टेशनवरून बाहेर उतरल्याबरोबर जणू राजवाड्याचाच परिसर दिसू लागतो. स्टेशनच्या बाहेर पडलं, की लगेच एक मोठं चर्च दिसतं व डावीकडे वळलं, की राजवाड्याच्या प्रवेशद्वारासारखी उंच आणि नक्षीदार कमान आपलं जणू स्वागत करते. इथं रस्ता दगडी फरश्यांचा आहे. मधूनच मोठ्या इमारती लागतात नि रस्ता संपतो, तिथं परत उंच नक्षीदार कमान आहे. बहुधा इथं राजेलोक राहत असावेत.

मिलानोत अनेक ठिकाणी भव्य इमारती, गॉथिक पद्धतीचं चर्च नि दगडी फरश्यांचं आवार दिसत राहतं. आम्ही बराच वेळ असं हिंडलो नि नंतर बस करून 'ड्यूमो कॅथेड्रल' पाहिला. १३८६ साली गियान व्हिसकोटीनं ह्यासाठी पैसा पुरवला. मात्र वास्तुशिल्पकाराचं नाव अज्ञातच राहिलं. १७६५ साली दिव्यावरचा मनोरा पूर्ण झाला. दर्शनी भाग १९५८ साली पूर्ण झाला. तिथंच असलेल्या कॅथेड्रल ट्रेझर रूम (खजिना) मध्ये ४ थ्या ते १२ व्या शतकांपर्यंतच्या चांदीच्या व हस्तीदंती वस्तू आहेत.

ड्यूमा कॅथेड्रलचा दर्शनी भागही अत्यंत देखणा आहे. दर्शनी भागात भव्य पितळी दरवाजे आहेत. ॲम्ब्रोज, व्हर्जिन मेरी वगैरेंच्या आयुष्यांतील घटना त्यांवर चित्रित केलेल्या आहेत. तर चौथ्या दरवाज्यावर लेग्नॅनोच्या लढाईपासून सर्व मिलानोचा इतिहास चित्रित केलेला आहे.

## कॅसल म्यूझिअम

जवळच कॅसल म्यूझिअम आहे. १४५० साली ड्यूक फ्रान्सिस फोर्जानं हा 'फोर्जा कॅसल' बांधला. गॅलेझो मरिआ (Galeazzo Maria) आणि मोरोने (Moro) तो वाढवला. भुईकिल्ला असावा, तसा कॅसल आहे. आता हा कॅसल कलादालनासारखा (आर्ट म्यूझिअम) वापरला जातो. त्यात अडतीस कलादालनं आहेत. इथं अनेकानेक चित्रं व शिल्पं आहेत. मायकेल ॲंजेलो, रूदनानी वगैरेंनी बनवलेल्या प्राचीन कलाकृती इथं पाहायला मिळतात. मायकेल ॲंजेलोचं शेवटचं शिल्प पण पाहायला मिळालं. लाकडाची कलाकुसर, विविध वाद्यं, हत्यारांचे विविध प्रकार पण आहेत. चौथ्या शतकातील निरनिराळ्या नाण्यांचा संग्रह आहे. ही नाणी १५०००० इतकी आहेत. निरनिराळ्या लढाया, त्यांतले विजय अशा विविध विषयांवरची चित्रं व शिल्प पाहायला मिळतात.

कॅसल म्यूझिअमपासून चालत चालत गेलं, की दहा मिनिटांवरच 'सांता मारिआ' चं चर्च व शेजारीच असलेलं लिओनार्डो द व्हिन्सीचं चित्रांचं कलादालन लागतं. 'सांता मारिआ' हे चर्च गॉथिक पद्धतीचं आहे. मुख्यभागी मोठेमोठे त्रिकोन एकत्र येऊन घुमट तयार झाला आहे व मोठ्या स्तंभांवर टोकदार कमानी नि एकमेकांना छेदून जाणारं कमानदार आच्छादन हे गॉथिक

पद्धतीचं वैशिष्ट्य. चर्च भव्य, मोठं आहे. पंधरा फ्रेस्को पद्धतीची चित्रं आहेत. (प्लॅस्टर ओला असतानाच जलरंगांत काढलेलं चित्र म्हणजे फ्रेस्को पद्धती) त्यांत ख्रिस्तासंबंधीच्या कथा गुंफल्या आहेत.

'सांता मारिया' चर्चच्या डाव्या बाजूला त्याला लागूनच असलेल्या 'लिओनार्डो द व्हिन्सी'चं कलादालन पाहिलं. लिओनार्डो द व्हिन्सीचं 'लास्ट सपर' हे भिंतीवर चितारलेलं जगप्रसिद्ध चित्र ह्याच कलादालनात आहे. त्यातले डोळ्यांतले भाव अद्वितीय आहेत. लिओनार्डो विन्सी हा चतुरस्र माणूस होता. त्यानं विमानही बनवलं होतं. तो इंजिनीअर होता. शिवाय वास्तुशिल्पविशारदही होताच व जगप्रसिद्ध असा चित्रकार होता. मागे मुंबईत एन्. सी. पी.ए.त त्याचं भव्य प्रदर्शन भरलं होतं. त्याची आठवण झाली. मुंबईतलं प्रदर्शन पाहून चकित व्हायला झालं होतं. हे चित्र पाहूनही फिरून मन दंग झालं. त्याच्या समोरच्याच भिंतीवर मोंटोरफॅनो क्रूसावर गेला, ते चित्र आहे. लिओनार्डोची १४९४ ते १४९७ पर्यंतची चित्रं आहेत.

नंतर येता येता 'आर्किआलॉजी म्यूझिअम' वाटेतच दिसला, म्हणून आत जाऊन आलो. पण त्यात खास गम्य नसल्यानं चक्कर मारून परत आलो इटली हा देश कलेकरता एवढा प्रसिद्ध आहे, की इटलीतील प्रत्येक मोठ्या शहरी पाच-सहा म्यूझिअम्स तरी सहज आहेत.

आमचं मिलानो पाहून झालंच होतं नि परत फिरणं भाग होतं. कारण आम्हांला मिलानो मेनची ६ १० ची गाडी पकडायला हवी होती. ७.०५ ची गाडी होती; पण ती कॅन्सल झाली असती, तर एकदम ९.३० ची गाडी होती व ती रात्री १०.४४ ला सिस्टे कॅलेंडेला पोचली असती. मिलानो स्टेशनवर बसलो होतो. तो दोन गर्दुले दिसले. एक वर डोळे लावून बसला होता, तर दुसरा पार कामातून गेला होता. तोंडातून रक्त बाहेर आलं होतं नि एकसारखा झोकांडे खात होता. तिसराही गर्दुलाच होता; पण थोडा सावध असल्यानं त्या दोघांवर चिडत होता. शेजारूनच पोलीस ये-जा करीत होते; पण त्यांना कुणा पोलिसानं हटकलंही नाही. गाडीत बसलो, तर गर्दसाठी पैसे मागण्यासाठी दोन तरुण पोरगे गाडीत येऊन गेले.

आम्ही ६.१० ची गाडी घेतली होती. ती सिस्टे कॅलेंडेला उशिरा पोहोचेल, असं वाटूनही ती अगदी ठरावीक वेळेला म्हणजे ७ ३२ सिस्टे कॅलेंडेला पोचली. ७.३५ लाच आम्ही स्टेशनबाहेर आलो. स्टेफिना नऊ वाजता स्टेशनवर येणार होती. नंतर समोरचं कारंजं बघत बसलो. तिथंच हातपाय, तोंड धुतलं व नंतर परत कारंजंच पाहत बसलो. पावणेनऊच्या सुमारास स्टेफिना गाडीतून उतरली. अर्थात इथं उन्हाळ्यात १० वाजेपर्यंत उजेड असतो.

दुपारी आम्ही बरोबर नेलेला लाडू, चिवडा खाल्ला होता. घरी गेल्यावर फिरून ब्राऊन ब्रेडच होता रॅफेलनं विविध प्रकाराचं चीज आम्हांला देऊ केलं. शिवाय त्यानं त्याच्या बागेतली फळं आणली होती। ती फळं रातांब्यासारखी दिसत होती; पण पचपचीत लागत होती. त्यामुळं खूप प्रेमानं स्टेफिना ती आम्हांला देत होती.

रॅफेलनं घरी गेल्याबरोबर त्यांच्या कुत्र्याला खाऊ घातलं. हा कुत्रा आम्हांला एकदाच पुसटसा दिसला. ही लोकं बाहेर गेली होती, तेव्हा त्यांच्या बागेला लागूनच असलेल्या जंगलात तो हिंडायला जातो, असं स्टेफिना म्हणाली. रॅफेलनं बागेतल्या झाडांना पाणी पण घातलं. गाडी रॅफेलनंच चालवली. स्टेफिना गाडीत बसून बसून बहुधा दमली.

आम्ही त्याच्या बागेतले गुलाब, सफरचंदाची झाडं व फुलांची झाडं पाहून आलो. मी स्टेफिनाला विचारलं,

'गुलाबाची देखभाल कोण करतं ?'

रॅफेल म्हणाला,

'मी. मला गुलाब फार आवडतात.'

रॅफेल मिलानोत मोठा मॅनेजर आहे. फेबिओ पण मिलानोतच नोकरी करतो. दोघं सात वाजताच स्वत:च्या गाडीतून मिलानोत जातात. ते रात्री येतात.

'मग जेवण कुठं घेतात ?' माझा बायकी प्रश्न.

'फास्ट फूड घेतात.' स्टेफिना म्हणाली.

म्हणजे स्टेफिनाला जेवण बनवण्याचाही खास उद्योग नाही. तो परदेशांत नसतोच; पण भांडी धुणं, झाडाला पाणी घालणं, कुत्र्याला खाऊ घालणं हे उद्योगही रॅफेलच करायचा. असे पण नवरे असतात.

## कामवालीला तासाला १०५ रुपये

दुसऱ्या दिवशी सकाळच्या चहा घ्यायला टेबलाशी आम्ही आलो, तेव्हा स्टेफिनानं विचारलं,

'तुम्ही आता कधी जाणार ?'

'जेवण झाल्यावर अथवा त्या अगोदर...' मी म्हणाले.

'जेवण झाल्यावर तुम्हांला स्टेशनवर सोडते. कारण आज रात्री माझ्याकडे सव्हार्स गेस्ट येणार आहेत.'

आम्ही मंगळवारी येऊ, असं समजून तिनं रविवारी व सोमवारी तिचे बेत आखले होते व आता आज तिच्या घरी वेगळे सर्व्हास गेस्ट येणार आहेत ! म्हणजे आमच्यासाठी कोणता दिवस तिनं ठरवला होता ?

नंतर मी स्टेफिनाला चंदनाची की-चेन व उदबत्त्या दिल्या. त्या तिला फारच आवडल्या. त्या दिवशी घर साफ करायला तिच्या जवळपास राहणारी बाई आली होती. स्वत:च्या गाडीतून येऊन घर साफ करणारी बाई मात्र कुठंच आढळली नाही. ही कामवाली नीटनेटक्या कपड्यांतली होती व एखाद्या मैत्रिणीसारखी येते. अतिशय व्यवस्थित काम करते. काम म्हणजे-घर व्यवस्थित लावणं व केर-मशीननं केर काढणं, मशीननं धुतलेले कपडे वाळत घालणं. तिला तासाला ७००० लिरा म्हणजे साधारण तासाला १०५ रुपये द्यावे लागतात. स्टेफिनानं त्या दिवशी वॉशिंग मशीनही चालू ठेवलं होतं. ते लोक आठवड्याचे कपडे एकाच दिवशी धुतात. त्यामुळं इलेक्ट्रिसिटी व साबण वाचतो. इथं 'धुरळा उडणं' हा प्रकारच नसल्यानं केरही आठवड्यातून एकदाच काढलेला चालतो.

स्टेफिनानं नंतर अख्खं घर दाखवलं. खाली दोन खोल्या होत्या. त्यात वॉशिंग मशीन एका खोलीत होतं व खालचा मोठा हॉल तसा रिकामाच. तिथं समारंभ होतात. वर किचन. त्या समोर बगीचा आहे. किचनच्या शेजारी हॉल. त्या शेजारी चार ऐसपैस बेडरूम्स ! इतकी जागा असून आम्हांला आरामखुर्चीत झोपायची पाळी आली.

## ढोंगी स्टेफिनाचं समाजकार्य, की जन्तेची शेवा ?

आम्ही जाणार, म्हणून त्या दिवशी मात्र स्टेफिना कौतुकभरल्या शब्दांत म्हणाली,

'आज मी तुमच्याकरता सिरियल्स बनवते. तुम्हांला आमचं जेवण विशेष आवडलेलं दिसत नाही.'

देखल्या देवा दंडवत करण्यात, गावातले लोक हुशार असतात. स्टेफिनाला ती कला अवगत असावी.

'लग्न झाल्यापासून तू इथंच राहतेस ?' मी स्टेफिनाला विचारलं.

'जिनिव्ह व कॅव्हेरीला आम्ही प्रथम राहत होतो. जिनिव्हपासून ते २० किं. मी. अंतरावर आहे. नंतर तिथून जिनिव्ह व त्यानंतर गॅरिबाल्डीला राहिलो. नंतर इथंच राहायला आलो.'

स्टेफिनाची कामकरीण वरचा मजला साफ करायला वर आली, तेव्हा स्टेफिनानं तिलाही, आम्ही दिलेल्या उदबत्त्यांतल्या चार उदबत्त्या दिल्या. वास घेऊन तीही खूश झाली. स्टेफिनानं एक उदबत्ती तेवती केली व सुगंधानं दोघीही खूश झाल्या. नंतर ती कामवाली काम करायला गेली व स्टेफिना कपड्यांना इस्त्री करू लागली.

मी तिला म्हटलं,

'आमच्या इथं मुलगी लग्न होऊन सासरी जाते अथवा मुलगा वेगळा राहतो, तेव्हा त्यांच्या आयांना रडूच येतं.'

तेव्हा स्टेफिना म्हणाली,

'लुकाचं लग्न झालं व तो वेगळा राहायला गेला, तेव्हा मीही ढसाढसा रडले. वाईट वाटतं, पण मुलानं वेगळं राहणंच योग्य.'

'सासू-सुनेनं भांडत राहण्यापेक्षा वेगळं राहणं चांगलं. पण आमच्या इथं म्हाताऱ्या आई-वडिलांकडे मुलांनी लक्ष द्यावं, असंही मानलं जातं.'

'हे चांगलं आहे.' स्टेफिना म्हणाली. पण त्याकरता सासूलाही काही झीज सोसावी लागते, ते तिला पसंत नव्हतं.

'आता फॅबिओचंही लग्न होईल. मग तोही घराबाहेर जाईल, तेव्हा मला काही काम नसेल. मग मी हॉस्पिटलमध्ये व्हॉलंटरी असिस्टंट म्हणून काम करीत. तेवढंच सोशल वर्क होईल.'

स्टेफिनाला घरातही काम करण्याची विशेष आवड दिसली नाही. रॅफेलच कामं करायचा. उद्या एकदम 'सोशल वर्कर' म्हणून ही मनापासून काम करेल ? मला शंका वाटली. की आपल्या इथं 'खुर्चीसाठी जनतेची सेवा' करतात, तसा हा प्रकार आहे ?

'लुकाची बायको नोकरी करते ?' मी विचारलं.

'प्रथम करीत होती. आता मुलगा झाल्यावर मात्र नोकरी करीत नाही.'

'नि फॅबिओची बायको ?'

'फॅबिओच्या बायकोच्या वडिलांची कपड्यांची फॅक्टरी आहे. ते कपडे एक्सपोर्ट करतात.'

त्या दिवशी स्टेफिनानं सिरियल्स म्हणजे अख्खे मसूर शिजविले होते. ते मीठ घालून बरे लागत होते. पावापेक्षा खूपच छान. शिवाय भातही शिजवला होता. आम्ही आज जाणार, म्हणून आमची पाठवणी ? शिवाय ती पचपचीत फळं ! त्यांचाही आग्रह स्टेफिना जोरदार करीत होती.

जेवता जेवता मी स्टेफिनाला विचारलं,

'तुझी आई कुठं राहते ?'

'पिसाजवळ गाव आहे, तिथं... 'स्टेफिना म्हणाली.

मला स्टेफिनाचा राग आला. आम्हांलाही बरोबर नेलं असतं, तर काही वेगळं पेट्रोल खर्च कराव लागणार नव्हतं व आम्ही पिसा बघून घेतलं असतं. इंटरलेकनच्या फ्रेडलीनं हे किती

उत्साहात केलं असतं ? नि तरी फ्रेडलीला सोशल वर्कर व्हायचं नाहीये. नि स्टेफिना सोशल वर्कर होणार आहे, म्हणे ! गंमतच आहे.

जेवण झाल्यावर स्टेफिनानं आम्हांला स्टेशनवर सोडलं व ती मार्केटिंगला गेली.

टायनोचं आमचं वास्तव्य एकदाचं संपलं. स्वित्झर्लंडच्या स्वर्गीय स्वागतानंतरच हे आश्रितासारखं वागवणं आम्हांला जाणवलंच.

## व्हेनिस व व्हिचेंझा : गोंधळ

व्हेनेझिआ ऊर्फ व्हेनिसला आम्ही चाललो होतो. व्हेनिसचा यजमान मिळाला, म्हणून खुशीत होतो. जाता जाता व्हिचेंझा हे व्हेनेझिआसारखं वाटणारं स्टेशनही वाटेत लागलं. नि मग तासाभरातच व्हेनेझिआ ऊर्फ व्हेनिस हे स्टेशन लागलं. व्हेनिस स्टेशन जवळ येत असतं, तेव्हा आसपासचं दृश्य भलतंच छान दिसतं. ॲड्रिॲटिक समुद्राच्यामधून गाडी जाते व दोन्ही बाजूंनी समुद्र नि त्यातल्या बोटी, शीड लावलेली नाव, साधी नाव वगैरे अनेक प्रकार दिसत असतात नि निळ्या निळ्या पाण्याचा विस्तीर्ण समुद्र नि त्यावरून आपली गाडी जाते. ते सौंदर्य आम्ही दंग होऊन पाहत होतो.

'वाटतं, गाडीतून हा समुद्र बघणं संपूच नये.' मी उल्हसित होत म्हटलं.

देवानं नेमकं माझं बोलणं ऐकलं; नि नको तेव्हा तो 'तथास्तु' म्हणाला.

कारण व्हेनिसला फोनवर बरीच खटपट केल्यावर आम्ही होस्टलिस्ट पाहिली नि मग लक्षात आलं, की आपला होस्ट व्हिचेंझाचा आहे, व्हेनेझिआचा (व्हेनिस) नाही. ह्या इंग्लिश लोकांनी नावाचा सगळा गोंधळ केला आहे.

आम्हांला आता परत व्हिसेंझा (विचेंजा) ला जायचं होतं. ॲड्रिॲटिक सफर पुन्हा एकदा!

'तू असलं काही बोलू नको. तुझे बोललेले शब्द नेमके खरे होतात ' स्वाति म्हणाली.

'माझी बत्तिशी वठते' असं तिला शुद्ध मराठीत म्हणायचं होतं.

व्हिचेंझाला जाण्यासाठी परत फिरलो. आम्ही फर्स्टक्लासमधून उतरलो, हे तिथल्या गार्डांनी पाहिलं होतं. आम्ही परत फिरलो, तेव्हा त्या गार्डांनी आम्हांला आपणहून दुसरा डबा फर्स्टक्लासचा आहे, ही माहिती सांगितली. इटलीतले गार्ड्स खूप मदत करतात. इथं सर्व पॅसेंजर्स गाडीत चढले आहेत, हे पाहून नंतर गार्ड्स हिरवा झेंडा दाखवतात व मग दरवाजे लागतात. एका गाडीला दोन-तीन गार्ड्स असतात.

इटलीत भारतापेक्षा लोकसंख्या कमी असल्यानं प्रवाशांचं असं कौतुक होतं. भारत सोडून इतरत्र अल्ला अथवा ख्रिस्ताला कुटुंबनियोजन चालतंय्, असं दिसतंय्. भारतातले अल्ला वा ख्रिस्त जाज्वल्य धर्माभिमानी असावेत.

पुन्हा तोच समुद्रावरचा प्रवास होता.

परंतु मघाचा देखणा निसर्ग सुखावत नव्हता. होस्टच्या घरी पोचायला उशीर होईल, म्हणून जरा जरा चिंता वाटू लागली होती.

## निर्जन रस्ता व आम्ही दोघी

व्हिचेन्झाच्या डाल्प्राचं कौतुकाचं आमंत्रण होतं. त्यामुळं आम्ही बिनधास्त होतो. पण

डाल्प्राला फोन करून तो लागत नव्हता. बसनं जायचं नि ती घरीच नंसेल, तर ! आमच्या वेळच्या होस्टना फोन करून पाहिले; पण सगळा शुकशुकाट !

'स्वाति, तू जाऊन पाहून ये.' मी म्हटलं.

'नको. जायचं, तिथं आपण दोघी जाऊ.' स्वाति ठामपणे म्हणाली नि तेच शहाणपणाचं होतं.

बाहेर चौकशी केली, तर व्हिचेंझाला डाल्प्राच्या तिकडे जायला शेवटची बस संध्याकाळी ७.१५ला होती व त्या वेळी संध्याकाळचे ७.१० झाले होते. परंतु इथे इंग्लिश समजण्याचा गोंधळ होताच. एक बाई इंग्लिश समजणारी नि मुख्य म्हणजे मदत करणारी भेटली नि आम्ही बसमध्ये बसलो. तिकीट आठशे लिरा प्रत्येकी होतं. आमचे दोघीचं मिळून २४ रुपये झाले.

अंधार पडू लागला होता व तिचं घर सापडेल का ? ही विवंचना होती. बसचा प्रवास अत्यंत रमणीय होता. त्यामुळं आम्ही अगदी खूश होतो. आम्हांला मोंटे बेरीकोनंतर एसे (Esse)ह्या बसस्टॉपवर उतरायचं होतं. इथं बसमध्ये प्रवासी बेताचेच असतात. त्यामुळं ड्रायव्हरनं आम्हांला एसे बसस्टॉपवर बरोबर उतरवलं.

बसमधून उतरलो; पण रस्ता अगदी निर्जन होता. नुसत्या गाड्या येत व फुर्रकन जात. आम्ही आमची ओझी उचलली नि पत्ता शोधत जाऊ लागलो. आमची एक चाकवाली बॅग होती. तिचा आवाज येत होता नि इतर बंगल्यांच्या आवारांतले कुत्रे जोरजोरात भुंकत होते. त्या किर्र संध्याकाळी फक्त ही कुत्र्यांची त्रासदायक जाग ! बाकी रस्त्याच्या दोन्ही बाजूंना गच्च झुडपांची पुरुषभर उंचीची कुंपणं ! आत कुठं तरी बंगले असल्यास असतीलही; पण दिसत मात्र काहीच नव्हतं. कुत्रे भुंकत होते. ते त्यांची घरं संभाळायला पण कुणी गुंड आम्हांला त्रास द्यायला व आमचं सामान ओढून घ्यायला येता, तर आम्हांला त्याचा उपयोग नव्हता. खरं तर, तेच आम्हांला चोरचिलटं समजून आमच्यावर भुंकत होते. अर्थात कुत्रे दिसत नव्हतेच. कारण ते कुंपणाच्या पलीकडे होते. शेवटी एके ठिकाणी घरांवर १३१ व १३३ नंबराची पाटी दिसली.

१३१ व १३३ नंबराच्या पाटीपासून उतारावर घराकडे जाणारी पाऊलवाट होती. स्वाति थबकली. ती म्हणाली,

'डाल्प्रानं लिहिलंय्, आम्ही डोंगरावर राहतो. ही पाऊलवाट तर खाली जाते.'

'आता आलोय्, तर एकदा जाऊन पाहू या... ' असं मी म्हटलं खरं, पण पार ढेपाळून गेलो होतो.

शेवटी कसे बसे डाल्प्राच्या घराशी गेलो. बाहेरून घर छान वाटत होतं. बगीच्यात सुंदर फुलं फुलली होती व पलीकडे असलेली दरीही दिसली होती.

'म्हणजे हे घर त्याबाजूनं डोंगरावर आहे.' मी म्हटलं.

मन इतकं चिवट, की त्या सुंदर घरात राहायला मिळणार, ह्याचा आनंद वाटला.

फाटकाशी पोचल्यानंतर घरातला कुत्रा 'भू' 'भू' करत फाटकावर उड्या मारू लागला. कुत्र्याचा आवाज नि कुत्रा, भयावह होता. तरीही 'डाल्प्रा' 'डाल्प्रा' करीत आम्ही ओरडत होतो. पण उत्तर फक्त कुत्र्याचं भुंकणं.

'कुत्रा एवढा भुंकतोय् का, हे पाहायला तरी कुणी आलं असतं ?' स्वाति म्हणाली.

'१३१ व १३३ ह्या दोन्हीही घरांतलं कुणीच कसं येत नाही ?' मी निराश होऊन उद्गारले नि म्हटलं, 'चल, जाऊ या, उशीर झाला, तर शेवटची बसही जाईल. मग इथंच राहावं लागेल.'

त्या निर्जन भयाण एकाकी रस्त्यावर राहायचं ? ह्या कल्पनेनंच जिवाचा थरकाप झाला. आपण ह्या निर्जन स्थळी कशाला आलो ? फोन लागत नव्हता, तेव्हा माणसं घरात नाहीत. असं समजून हॉटेलात का नाही राहिलो ?... पण देशविदेशची माणसं भेटावी, हा आपला मुख्य उद्देश होता. फ्रान्स दिसला; पण स्वित्झर्लंड, लंडन इथल्या माणसांची जशी ओढ वाटते, तसं फ्रान्सविषयी काहीच घडलं नाही. फ्रान्सचा प्रदेश भेटला; पण फ्रान्समधील माणसं भेटलीच नाहीत. म्हणजे कुठल्याही यात्रा कंपनीतून स्वित्झर्लंडचा आनंद मिळालाच नसता. तरीही त्या निर्जन रस्त्यावरून जाताना आपल्या प्रवासाची दिशाच चुकली, असं वाटू लागलं. पाऊलवाट तुडवत व बॅगांचं ओझं संभाळत रस्त्यावर आलो, तर एकमेव पोलीस गाडी दिसली. त्याला आम्ही विचारलं,

'स्टेशनकडे परत जाणारा बस स्टॉप-कुठं आहे ?'

ते म्हणाले,

'आता कोणतीच बस जाणारी नसेल. टॅक्सीनं जा.'

ह्या निर्जन रस्त्यावर भेटणारा टॅक्सीवाला चांगला असेल ? समजा, तो उफराटचा काळजाचा असेल, तर ह्या निर्जन रस्त्यावर सोडवायलाही कुणी येणार नाही. दोघींनीच प्रवास करण्याचा अतिशहाणपणा चांगलाच अंगलट आला होता.

इतका शुकशुकाट असणाऱ्या रस्त्यावर टॅक्सी मिळणार आहे का ? की रात्र ह्या भयाण आणि एकाकी रस्त्यावर घालवायची ?

रस्त्याची तर धड माहिती नाही. टॅक्सीवाला कुठं घेऊन गेला, तर ? मनात विचारांची नुसती गर्दी. घाबरून गेलेल्या आम्ही अगदी रडकुंडीला आलो होतो.

तेवढ्यात पोलीस व्हॅन परत फिरली व त्यांनी आम्हांला सांगितलं की,

'जिथं उतरलात, तिथंच त्याच्या विरुद्ध रस्त्याला उभ्या राहा. ८.२०ला बस आहे.'

८.१२ तर घड्याळात झालेच होते. आम्ही बॅगा घेऊन लगालगा चालत बस-स्टॉपशी गेलो. स्वातीनं विचारलं,

'आपण परतीचं तिकीट कुठं काढलंय् ? बसचं तिकीट आपल्याकडे नाही, म्हणून बसवाल्यानं आपल्याला घेतलंच नाही, तर ?'

तिथं कुठंही तिकीट मिळायला एखादं दुकानही नव्हतं. शिवाय परत फिरावं लागेल, ह्याची कल्पना असती, तर मुळात आलोच नसतो.

मी म्हटलं,

'बसमध्ये चढायचं, काय वाटेल ते झालं, तरी स्टेशन येईपर्यंत उतरायचं नाही. मग बघू, काय होईल, ते होऊ दे. मात्र आत गेल्यावर त्याला बसमध्ये तिकीट काढायची सोय असेल, तर विचारू. मात्र बस सुरू झाल्यावर.'

नंतर स्वातीची शंका,

'ही बस कॅन्सल झाली, तर ?'

'उगाच काही तरी बोलू नको.' मी तिला दटावलं.

. . स्वातीनं सुद्धा , 'मांडवाला आग लागेल' म्हणणाऱ्या नाऱ्यासारखं अशुभ बोलावं ना !

मला एकदम गोगटेयांची आठवण झाली. हे आले नाहीत, ते किती चांगलं झालं ! ह्यांनी काही मार्ग शोधायच्या ऐवजी हे चांगलेच चिडले असते, रस्त्यावर बसले असते आणि कपाळाला

हात लावून म्हणाले असते,

'आता मला प्रवायच करायचा नाही. मी आता इथंच मरतो !'

काळीज धक् धक् करत होतं. तेवढ्यात बस आली.

बस सुरू झाल्यावर आम्ही ड्रायव्हरला तिकिटासंबंधी विचारलं. तो इटालियन भाषेत खूप रागारागानं बोलत होता; पण त्यानं आम्हांला उतरवलं नाही. नंतर पुढं कळलं, की त्याचवेळी तिकीट चेकर आला असता, तर आम्हांला ३०,००० लिरा म्हणजे (४५०० रुपये) दंड झाला असता.

दंडवगैरे संबंधांत लावलेली पाटी आम्ही पाहिलीच नाही. ती पाटी इटालियन व इंग्लिशमध्ये असते.

## नापोली

मागे एकदा आमच्या पासपोर्ट मिळवून देणाऱ्या एजंटनं गाडीतच रात्र काढायची व अख्खा युरोप कसा बघायचा, ही कल्पना दिली होती. रात्र नुसतीच, व्हिचेन्झाच्या हॉटेलमध्ये घालवण्याऐवजी प्रवास करायचा, असं आम्ही ठरवलं. आम्ही आमच्या बॅगा रेल्वे लगेजमध्ये ठेवायला दिल्या. एका बॅगेचा दिवसाचा दर ८०० लिरा होता. आम्ही एक बॅग व हँडबॅग ठेवायला दिली व व्हेनिसवरून नापोली ऊर्फ नेपल्सला जायचं ठरवलं. इथंही इंग्लिश लोकांनी नाव बदललं. बरं, इटालियन आपल्या भारतासारखी समजूतदार व शहाणी माणसं नाहीत. ते आपली व्हेनेझिआ नापोली हीच नावं चालू ठेवतात. आपण कसे ? इंडिया म्हणूनच आपल्या देशाला म्हणवून घेतो. बॉम्बे सुद्धा आम्हांला चालतं. कारण हिंदू संस्कृती सर्वसमावेशक आहे. कोणी काहीही आपल्याला बोलावं. आपल्या काय अंगाला भोकं पडतात ? (बोकडाच्या जाड कातडीशी आपल्या मनाचं साम्य आहे.)

व्हेनेझिआवरून रात्री १२.३५ ची गाडी होती. ती आम्हांला कशीबशी मिळाली. गाडीत हीऽ ऽ गर्दी होती. बऱ्याच सीट्स रिझर्व्ह होत्या. आम्ही अनरिझर्व्ह सीट्सवर बसलो असल्यानं आम्हांला उठावं लागलं नाही. पण बरेच लोक उभे होते. तेव्हा त्यांच्यासाठी फर्स्टक्लासचा आणखी एक डबा जोडला. पहाटे रोम आलं. तिथं बरीच गर्दी ओसरली. आमची गाडी व्हेनेझिआ मिस्त्रेला पोचली. तिथून गाडी बदलून नापोली कॅंपीला गेलो.

नापोली एखाद्या सुधारलेल्या बंदरासारखी दिसली. रस्ते सुरेख, धावपळीचे नि गर्दीचे. सतत कुणी धावत पळत होतं. आम्ही थेट बंदराशी गेलो. बोटींचे ताफे दिसतच होते.

## कॅप्री व ब्ल्यू ग्रोट्टो

स्टेशनवरून बाहेर पडलं, की उजव्या बाजूला पाच मिनिटांवरच समुद्र आहे. तिथून ब्ल्यू ग्रोट्टोला जाणाऱ्या बोटी निघतात. आम्ही तिथं गेलो. इटलीत ही बऱ्याच जणांना इंग्लिश समजत नाही. पण माणसांना समजून घेण्याची इच्छा असते. फ्रान्ससारखा अडेलतट्टूपणा नाही. आम्ही प्रत्येकी ११० लिरा देऊन तिकीट काढलं. इथल्या बोटी कमालीच्या स्वच्छ नि राजस असतात. अर्थात चैनीसाठी असल्यानं तिकीटही भरपूर असतं. पाणी निळं होतं. कोकणात जाताना पाणी इतकं निळं नसतं. बाकी पक्ष्यांचं उडणं, आकाश सगळं सारखंच. ज्यांना बोट लागण्याची सवय असते, त्यांना ही छान छान बोटही लागते. कॅप्रीला पोचलो नि कळालं, हे फक्त कॅप्रीपर्यंतच

तिकीट आहे. कॅप्रीला खास काहीही पाहण्यासरखं नव्हतं. मग प्रत्येकी ४३४० लिरांचं ब्ल्यू ग्रोट्टोचं तिकीट काढलं. ब्ल्यू ग्रोट्टोला समुद्रात उतरायचं नसल्यानं ४३४० मध्ये परतीचंही तिकीट होतं. मात्र परत कॅप्रीला जायला प्रत्येकी ११००० लिरांचं तिकीट काढावं लागणार होतं. म्हणजे प्रत्येकी ४००० रुपये खर्च आला. भारतात, परदेशी लोकांनाही जवळ जवळ फुकटात, सर्व प्रेक्षणीय स्थळं पाहायला मिळतात.

कॅप्री म्हणजे ४० वर्षांपूर्वी (दादरच्या) कॅडेल रोडला लहान लहान घरं व झाडं असायची, तसंच दिसत होतं. मात्र बारक्या दुकानांची गर्दी होती. कॅप्रीला १ किलो केळ्यांची किंमत ३५०० लिरा (५१रु.) कॅप्रीला गेल्यानंतर ब्ल्यू ग्रोट्टोचं तिकीट काढलं, हे शहाणपणाचं झालं, नाही तर एका चांगल्या अनुभवाला मुकलो असतो. आमच्या चार-पाच नावा ब्ल्यू ग्रोट्टोच्या दिशेनं चालल्या होत्या. इथंही पाणी छान निळं होतं नि त्याला स्पर्श करता येत होता. डोंगरांना वळसा देत तिथं जायचं असतं. बऱ्याच नावा तिथल्या तिथं फिरत होत्या. नावांची इथं नुसती झुंबड उडाली होती. कारण मोठ्या डोंगराखाली ब्ल्यू ग्रोट्टो हे लहान भोक होतं नि त्यातून आत जायचं होतं. नावाड्यानं आम्हांला झोपायला सांगितलं. आत जाताना नावाडी पण आडवा झाला होता. नंतर आत गेल्यावर उभा राहिला. आम्हीही आत गेल्यावर व्यवस्थित बसलो. आत मोठी गुहा होती नि सर्वदूर निळा प्रकाश पडला होता. आत अंधार असायच्या ऐवजी चक्क निळा प्रकाश! आतलं समुद्राचं पाणीही पारदर्शक निळं ! एखाद्या जादूसारखं. आत एवढा प्रकाश तरी कसा येतो ? समुद्राच्या लखलखत्या पाण्यावर सूर्याचे किरण परावर्तित झाले, म्हणावं, तर इतक्या लहान भोकातून कितीसे किरण परावर्तित होणार ! आपण एखादा अद्‌भुत चमत्कार पाहतो आहेत, असं वाटत होतं. आतली गुहा, मोठ्या ऐसपैस हॉलसारखी आहे. त्यात नाव गोलाकार फिरवून मग परत आणतात. त्यामुळं ह्या जादूत बराच वेळ राहता येतं. अल्लाउद्दीनच्या गुहेत हिरेमाणकांचा प्रकाश पडत होता, तसा काहीसा हा निळा प्रकाश जादूमय वाटत होता. निळ्या जादूमय प्रकाशात नाव जात होती नि ती जादू लोकांनाही दाखवता यावी, यासाठी फटाफटा एकसारखे फोटो काढले जात होते. सगळ्या प्रवाशांचे डोळे तो निळा प्रकाश पाहताना हसंत होते, नाचत होते. 'हाऊ स्वीट !' 'लव्हली !' नुसत्या आनंदाच्या गुलछड्या उडत होत्या. इथंही जपानी मुलं झुंडीनं होती. बोटींची तिकिटं महाग असूनही इतकी जपानी मुलं इथं येतात. मग भारतात प्रेक्षणीय स्थळं पाहायला ह्या टोळ्या का येत नाहीत ? निदान अजंठा, एलोराचा त्यांचा बुद्ध पाहायला तरी त्यांनी यावं.

नापोलीहून रोमला गेलो; पण साडेतीन वाजून गेले होते व रोमच्या दोन्ही टूरर्स निघून गेल्या होत्या. हॉटेलमध्ये राहावं, तर सामान व्हिचेन्झाला राहिलेलं. संध्याकाळच्या गाडीनं व्हेनिसवरून व्हिचेन्झाला गेलो. ॲड्रिॲटिक समुद्रावरून जाणाऱ्या रेल्वेतून आता किती तरी प्रवास होत होता. पण तरीही ह्या प्रवासाची प्रत्येक वेळी मजाच वाटायची.

## डाल्प्राचा फोन लागत नव्हता

'व्हिसेन्झा' हाही उच्चार बरोबर नाही. इटालियन भाषेत उच्चार आहे, 'व्हिचेंजा.' नंतर आम्हीही व्हिचेंजाच उच्चार करू लागलो व त्यामुळं त्यांना पटकन समजायचं. व्हिसेंझाला डाल्प्राला परत फोन केला. पण काय झालं, ते समजत नव्हतं. हॉटेलमधील डिरेक्टरी पाहिली, तर नंबर बरोबर होता हॉटेलमध्ये उतरायचं, तर हॉटेलमध्ये होणाऱ्या चोऱ्यांविषयी खूप ऐकलेलं

होतं. स्टेशनवरच आम्ही पैसे देऊन अंघोळ केली. चहा तर मिळतच नव्हता. पण इथल्या जगप्रसिद्ध कॉफीच्या कडूपणाचा आम्ही धसकाच घेतला होता. स्टेफिनानं आमच्यासाठी खास इटालियन कॉफी केली होती. दोन घोट कॉफी पिणंही अवघड झालं होतं.

डाल्प्रानं एवढं आवर्जून पत्र लिहिलं होतं. पण फोन का लागत नव्हता, ते समजत नव्हतं. पुढं कळलं, की तिथले फोन बदलले होते आणि रेल्वेच्या हॉटेलमधली डिरेक्टरी जुनी होती. गलथानपणात इटली ही भारताची सख्खी बहीण आहे. तसं पाहता अनेक दुर्गुणांत इटली आणि भारतांत साम्य आहे. नंतर आम्ही प्रथम फ्लोरेन्स पाहायचं ठरवलं.

व्हेनेझिआ ते फ्लोरेन्स हा गाडीतला प्रवास अप्रतिम असा आहे. फ्लोरेन्सचे डोंगर स्वित्झर्लंडची आठवण करून देत होते. बोगदे तर एकसारखेच लागत होते. मधेच बोगदा नि मध्येच सुंदर सुंदर हिरवी शेतं. कधी सूर्यफुलांची शेतं, कधी द्राक्षांचे मळे दिसत होते. हे पाहत असता एकदम फिरून बोगदा. मुंबई ते पुणं जाताना बोगद्यांचं कौतुक वाटायचं; पण हे बोगदे जवळ जवळ सुरुवातीपासून ते फ्लोरेन्स येईपर्यंत आहेतच. तेवढ्यात फिरून द्राक्षांचे मळे येतात. इथल्या गाड्या खूप जलद गतीनं जात असतात, तरीही ही सूर्यफुलांची शेतं व द्राक्षांचे मळे आम्ही किती तरी वेळ पाहत होतो. इटलीत अजूननही मोठ्या झाडांवर फुलं दिसत होती. झाडांवर पांढरी चेरीसारखी फुलं दिसली. गवतातूनही पांढऱ्या फुलांचे घोस दिसत होते. मधून मधून कण्हेरीची झाडं दिसत होती. पण इथली कण्हेरी आपल्या कण्हेरीपेक्षा वेगळी दिसते व एका झाडावर असंख्य फुलं. इतकी, की फुलांपुढं पानं दिसत नव्हती. ह्या फळाफुलांच्या देशातून ते प्रवास करताना एखादी परीकथाच अनुभवतोय्, असं वाटत होतं.

## फ्लोरेन्स

स्टेशनवरून आत प्रवेश केल्यावरही फ्लोरेन्स देखणंच वाटतं. घरांची छपरं तांबूस कौलांची आहेत. मधून मधून उंच मनोरे असलेल्या इमारती, तर कधी चर्चचे उंच वर गेलेले सुळके किंवा सुंदर घुमट दिसतात, तर मोठमोठ्या स्तंभांवरच्या त्या कमानींनी त्या सौंदर्यात भरच पडते.

फ्लोरेन्स शहरात, अर्नो नदीच्या पुराला वारंवार तोंड द्यावं लागतं. १९६७ चा पूर महाभयंकर होता व त्या वेळी पुतळ्यांचं व तलचित्रांचं महानुकसान होण्याची पाळी आली होती. पण त्यातून फ्लोरेन्स शहर वाचवलं. तैलचित्रं साफसूफ होऊन पूर्वीप्रमाणेच शाबूत राहिली. मात्र ह्या पुरामुळं फ्लोरेन्स थोडं बदललं. व्यापाऱ्यांनी आपली जुनी दुकानं नव्या पद्धतीनं सुशोभित केली. त्यामुळं फ्लोरेन्स जास्त नवीन नि छान झालं, म्हणतात. प्रचंड पुरात साऱ्या कलाकृती ज्या तत्परतेनं जतन करण्यात आल्या, त्यावरून इथल्या लोकांचं कलाप्रेमही लक्षात येतं.

स्टेशनवरच फ्लोरेन्समधला महत्त्वाच्या ठिकाणांची चौकशी केली. चौकशी खिडकीजवळच्या चुणचुणीत तरुणीनं फ्लोरेन्सचा नकाशा देऊन त्यात महत्त्वाच्या ठिकाणच्या खुणा करून दिल्या.

## पिझ्झा देला डयूमो

'पिझ्झा देला डयूमो' ह्या चौकात फ्लोरेन्सच्या सर्व महत्त्वाच्या गोष्टी पाहायला मिळतात. इथले 'सान्ता मारिया' चं चर्च खूप मोठं व भव्य आहे. टस्कन गॉथिक आर्किटेक्चरचं हे देखणं

रूप आहे. ह्याचा घुमट राक्षसी आहे. हे चर्च इतकं उंच आहे, की मान तुटल्यासारखी आडवी करावी लागते. एकावर एक अशा त्या कमानी पाहताना मजा वाटते. शिवाय लाल, पांढऱ्या नि हिरव्या संगमरवरामुळं तर डोळे भलतेच सुखावतात. तिथलं 'युनिव्हर्सल जजमेंट' हे फ्रेस्कोमधलं नक्षीकाम अप्रतिम आहे. तर इथल्याच दुसऱ्या दोन चॅपेल्समध्ये तेराकोट्टा व मोझॅक चित्रकारी पाहायला मिळते. बारीक काचेसारख्या ह्या तकतकीत तुकड्यांमुळं चित्रांना छान उठाव येतो. शिवाय कितीही वर्षं गेली, तरी ती नवीन वाटतात. फिरून आम्ही 'सान्ता मारिया' चर्च पाहत राहिलो. चर्चच्या भोवतीची ही हिरवळ, ही हिरवी झाडं ! नि हा लाल, पांढरा नि हिरव्या रंगाचा आकाशात गेलेला चर्च झाडांमुळं छान दिसतो, की रंगीत संगमरवरामुळं, की दोन विरुद्ध बाजूंची धनुष्यं एकत्र आणावी, अशा ह्या जादूमय कमानींनी हा छान दिसतो, की त्यांची झेप आकाशाला पोचल्यानं ? पण रूप डोळे भरून पाहावं नि तृप्त व्हावं. आपल्या डोक्यावर भुरळ कशी पाडावी, हे त्या शिल्पकारालाच माहीत.

## कॅम्पानील चर्च

ह्याच्याच जवळ 'कॅम्पानील' हे चर्च आहे. त्याला जगातला सुंदर बेल टॉवर म्हणतात. ह्याला वर जाण्यासाठी ४१४ पायऱ्या आहेत. दरवाज्यावर मायकेल ॲंजेलो, पिसानोची सुंदर पॅनल्स आहेत. आतील भिंतींवरही ॲंजेलो, पिसानो, घिबर्टी वगैरेंची सुंदर सुंदर चित्रं आहेत. मुख्य घुमटाखाली सेंट जॉन ह्या फ्लॉरेन्सच्या देवतेचा पुतळा आहे. ह्याच चौकाजवळ गिओव्हानीची बॅप्टिस्ट्री दिसते. घिबर्टी ह्या शिल्पकाराचं सुंदर काम पाहायला मिळतं. पूर्वेकडच्या पितळी दरवाज्याचं नक्षीकाम अप्रतिम आहे. त्यासाठी त्यानं सत्तावीस वर्षं काम केलं. हातांत जादू तर होतीच, पण सातत्यही केवढं !

तिथंच एक बाई इंग्लिशमध्ये आपल्या नवऱ्याला सांगत होती, की,

'मला ही चित्रं व शिल्पं पाहण्याचा कंटाळा आलाय्'.

मी हसू दाबलं. मला गोव्याच्या एका प्रवाशाची आठवण झाली. तो म्हणाला,

'मला ही नारळाची झाडं पाहण्याचा कंटाळा आला आहे.'

अशी अरसिक माणसं निर्माण करणं, हाच, खरं तर, ईश्वराचा चमत्कारच आहे.

इथंच मायकेल ॲंजेलोचं वस्तुसंग्रहालय आहे. तिथं मायकेल ॲंजेलोचं 'दका' हे जगविख्यात शिल्प पाहायला मिळालं. इथंच एक आकाशात गेलेला मनोरा दिसतो व त्याच्याचजवळ 'पॅलेझो व्हेचिओ' हा जुना राजवाडा आहे. त्यात प्राचीन शिल्पकलेचे नमुने पाहायला मिळतात. 'दरबार हॉल' मधील खिडक्यांच्या काचांवर स्टेनग्लासमधील कलाकृती आहेत.

अशा अप्रतिम सौंदर्याला शाप हवाच, ह्या नियमानं ह्या परिसरात राजकीय नेत्यांचे खून झाले. कुणाला जिवंत जाळलं, तर कुणाला फाशी दिलं. म्हणून ह्या भागाला 'सेंटर ऑफ ब्यूटी हॉरर्स' म्हणतात. पाश्चात्त्य देशात सुंदर राजवाडे नि मग त्यापुढं खून हा प्रकार दिसतोच.

'पॅलॅझो व्हेचिओ' जवळ युझीफी वस्तुसंग्रहालय आहे. इथं ब्रूनेलेशी, डोनॅटेली, गियांटो वगैरेंची अप्रतिम चित्रं आहेत. मायकेल ॲंजेलो तर सर्वत्रच दिसतो.

## सान्ता क्रोचे

फ्लॉरेन्स मेन स्टेशनच्या जवळच पाच मिनिटांच्या अंतरावर 'सान्ता क्रोचे' चं चर्च आहे. क्रोचे म्हणजे क्रूस. संगमरवरी दगडातील हे चर्च एकदम मनात भरतं. इ.स. १२००० मध्ये ते बांधलं. संगमरवरी दगडांवरचं नक्षीकामही सुरेख आहे. ह्या चर्चचा प्रचंड दरवाजा ब्रॉन्झचा आहे. त्यावर खिस्ताच्या पौराणिक कथा कोरण्यात आल्या आहेत. ह्या चौकोनी कॅथेड्रलचा लाल घुमट वेगळीच गंमत आणतो. चर्चच्या भिंतीआड गॅलिलिओ, मायकेल अँजेलो, रोझीनी वगैरे इटलीच्या सुपुत्रांनी अखेरचा विसावा इथं घेतला. चर्चच्या समोरच 'डिव्हाईन कॉमेडी' चे जनक दान्ते ह्याचा पुतळा आहे.

फ्लोरेन्समध्ये विपुल प्रमाणात संगमरवर मिळत असावा. कारण इथले चर्च संगमरवरी आहेतच; पण स्टेशनही संगमरवरी दगडांत बांधलेलं आहे. सुंदर दगड पाहून मायकेल अँजेलोसारख्या अनेक शिल्पकारांचे हात थरथरले नि थोर कलाकृती निर्माण झाल्या. पण त्याच बरोबर लिओनार्दो व्हिन्सी सारखे चित्रकारही स्वस्थ बसले नाहीत नि महाकवी दान्तेनं तर दुधात केशर मिसळलं. मी ही उपमा देते आहे, पण पाश्चात्त्य देशात केशराचं कौतुक अजिबात नाही.

आर्नो नदीच्या तीरावर उभ्या असलेल्या ह्या देखण्या गावाला 'सिटी ऑफ दि लिली' म्हणतात. तर थोर कलाकारांनी ह्या शहराला इतकं सुंदर केलं आहे, की फ्लॉरेन्सला 'अॅथेन्स ऑफ इटली' म्हणतात.

## झुकलेला पिसाचा मनोरा व जपानी टोळ्या

फ्लॉरेन्सहून पिसाचा मनोरा पाहण्यासाठी आम्ही निघालो. फ्लॉरेन्सहून पिसा पाहून मग रात्रीच्या गाडीनं रोमला जायचं व हॉटेलमधे उतरायचं ठरवलं. फ्लॉरेन्सहून पिसाला जायला दर तासाला गाडी आहे. युरेल पास फर्स्टक्लासचाच मिळतो. त्यामुळं सारे भारतीय फर्स्टक्लासमधूनच प्रवास करतात. पण पाश्चिमात्य देशांत भारत म्हणजे गरिबांकरिता प्रसिद्ध नि तरी फर्स्टक्लासमध्ये हे लोक कसे ? हा तिथल्या फर्स्टक्लासवाल्यांना प्रश्न पडतो. त्यामुळं 'हा फर्स्ट क्लास आहे' हे अधून मधून सुचवलं जातं. पण एकाही गार्डानं मात्र अशी शंका घेतली नाही. 'लीनिंग पिसा' पाहायला निघालो खरं, पण 'पिसा' ह्या स्टेशनावर उतरायचं, की 'पिसा एअरपोर्ट'वर ? हा प्रश्न पडला. दोघांनी सांगितलं, की 'पिसा स्टेशनवर' उतरायचं, तर तिघांनी खात्रीनं सांगितलं, की 'पिसा एअरपोर्टवरच' उतरायचं, तीन शहाण्यांचं आपण ऐकावं, असं ठरवलं. पिसा स्टेशनवर बरीच जपानी मंडळी उतरली, तेव्हा शंका आली.

स्वाति म्हणाली,

'ज्या अर्थी जपानी टोळ्या इथं उतरल्या, त्या अर्थी लीनिंग पिसा पाहायला इथंच उतरावं.'

फार विचार न करता आम्ही उतरलो. चौकशी केली, तेव्हा लीनिंग पिसा तिथूनच जवळ आहे, हे कळलं. तिथून, 'पिसा मनोरा' पाहायला जाणारी बसही तिनं सांगितली. बसमध्ये जपानी टोळ्या होत्याच. त्यामुळं कुठं उतरायचं, ते आपोआपच समजलं. इथं इतकी जपानी माणसं हिंडत असतात, की त्यांच्या मागोमाग गेलं, तर काही ना काही जगप्रसिद्ध गोष्टी पाहायला मिळतातच. मात्र आपण त्यांना काही विचारायला गेलो, तर एक तर ते काही बोलतच नाहीत किंवा गोंधळल्यासारखा चेहरा करतात. भारतीयांचा केवढा दरारा आहे !

स्टेशनवरून पिसासाठी ६०० लिरांचं तिकीट पडलं. स्टेशनवरून निघून पिसावरून ती

बस परत स्टेशनला येते.

जगातलं सातवं आश्चर्य आम्ही निरनिराळ्या कोनांतून, जवळून व लांबून पाहिलं. संगमरवरी व अनेक कमानी असलेला हा मनोरा अत्यंत देखणा आहे. हा आठमजली असून ह्याला २९४ पायऱ्या आहेत. ह्याचा व्यास ५५ मीटर आहे. इटलीत करारा संगमरवर प्रसिद्ध आहे. हा संगमरवर पिसासाठी वापरला आहे. 'मोलानो पिझानो' ह्याने पहिले तीन मजले बांधले. आठवा मजला त्याच्या नातवानं बांधला. हा मनोरा मध्यापासून १४ फूट बाजूला झुकला होता. आपण तिरके झाल्यानं अधिकाधिक लोक आपल्याला पाहायला येतात, हे पाहून हा पिसा आणखीनच तिरका होऊ लागलाय्. ह्या पिसा मनोरा चार वेगवेगळ्या माणसांनी बांधला. पिसा आता फार झुकू लागल्यानं आता त्यावर चढायला देत नाहीत. तो कधीही पडेल, अशी भीती निर्माण झाली आहे. तो पडायच्या आधी पाहिला, ह्याचा आम्हांला खूप आनंद झाला.

पिसाच्या शेजारी असलेल्या चर्चला मात्र भारी तिकीट आहे. (पिसा फुकट पाहायला मिळतो, हे म्हणजे मालकिणीपेक्षा स्वयंपाकिणीचा तोरा जास्त,) तसं वाटतं.

इथं जो तो हॅट्स विकत घेत होता, १०० ते १२५ रुपये किंमत होती. त्या हॅटस् आम्हांला फार स्वस्त वाटल्या नाहीत. शिवाय प्रवासात त्यांची पोळी झाली असती. व्हेनिसला ह्याच हॅट्सची किंमत २०० रुपये होती. इथं पिसाजवळच लहान लहान दुकानं आहेत. तिथं पिसाच्या संगमरवरी प्रतिकृती मिळतात. पांढऱ्या व करड्या अशा दोन्ही संगमरवरांत त्या मिळतात. मात्र गांधीमार्केटप्रमाणे वेगवेगळ्या किमती असतात.

पिसावरून लगेचच रोमला गेलो असतो, तर रात्री आड वेळी रोमला पोहोचलो असतो. म्हणून आम्ही व्हेनिसवरून रात्री ११.३५ ला निघणारी ट्रेन घ्यायचं ठरवलं; पण ती चुकली, म्हणून व्हेनेन्झी मिस्त्रेवरून रात्री १.२५ ची गाडी घेतली. ती आठ पंचवीसला रोमला पोचून, आम्ही नऊला रोमची टूर घेणार होतो व रोम पाहून ऑस्ट्रियात जाणार होतो. स्टेशना-स्टेशनावरून रात्री अपरात्री हिंडलं, तरी भीती नसते.

'होस्टशिवायच पाहावं. प्रदेश पटापट पाहून होतो.' स्वाति म्हणाली.

'फक्त प्रदेश पाहून होतो. त्यांची घरं, त्यांचे रीतिरिवाज ह्यांची जवळून माहिती होत नाही. पण रोमला होस्टना पाठवलेल्या एकाही पत्राचं उत्तर कसं आलं नाही ?' मी आश्चर्यानं विचारलं.

'काय माहीत.' स्वाति म्हणाली.

## <u>पासपोर्ट हरवला</u>

रोम जवळ आलं, त्या सुमारास मला जाग आली. मी स्वातीला सांगून तोंड वगैरे धुऊन घेतलं. नंतर स्वातीनं तोंड धुतलं व रोमा टर्मिनीला उतरलो. नऊच्या टूरची चौकशी केली. सहज पासपोर्ट पाहिले, तर चोरीला गेलेले. थोडे पैसेही. बरेच पैसे अंगाशी होते. तेवढे वाचले.

हे पैसे जाण्यापूर्वी स्वाति नेहमी म्हणायची, की माझी झोप सावध असते. त्या झोपेची इटालियन चोरांनी छान परीक्षा घेतली. विशेष म्हणजे, आम्ही रोमला उतरलो, तेव्हा स्वाति म्हणाली होती, की रात्री डोळ्याला डोळा लागला नाही, म्हणून ! आणि तरीही चोरी झाली ! जगप्रसिद्ध व्हॅटिकन सिटी पाहण्याऐवजी आम्ही रोममधले पोलीस आणि भारतीय एम्बसी ह्यांनाच भेटायला गेलो. आमच्या प्रवासाचं वेगळेपण !

भारत एम्बसी आम्हांला भारतात परत पाठवत होती. पण अमेरिकेसाठी ठेवलेले डॉलर्स, हूजा कुपन्स, ग्रेहाऊंड तिकिट व अमेरिकेला जाण्याचं आणि भारतात परत जाण्याचं तिकीटं लंडन बॅगेत राहिल्यानं आम्हाला लंडनला जायलाच हवं, हे आम्ही त्यांना पटवून दिलं. आम्ही एक शहाणपण केलं होतं. ते म्हणजे साऱ्या व्हिसांच्या झेरॉक्स कॉपीज् काढल्या होत्या व आमची. आयडेंटिटी दाखवणारा युरेलचा पास आमच्याजवळ होता. त्यावरून आम्ही एम्बसीला आमची ओळख देऊ शकलो. इटलीतील भारतीय एम्बसीनं आम्हांला खूपच मदत केली. आम्हांला त्याच दिवशी इटलीचा पासपोर्ट त्यांनी दिला. आम्हांला होस्ट मिळालाच नाही, तर आम्हांला फ्रान्स वा जर्मनीचा पासपोर्ट मिळेपर्यंत आमचं सामान ठेवण्याची व्यवस्था करण्याचं आश्वासनही त्यांनी चक्क दिलं. त्या दिवशी खायला-प्यायला दिलं. त्यांचा केवढा तरी आधार आम्हांला मिळाला. रोमच्या भारत एम्बसीची माणसं अत्यंत चांगली होती. आमचे रडवेले चेहरे पाहून त्यांनी आम्हांला खायला आणून दिलं. रोमला जायचं बसचं तिकीटही स्वखर्चानं दिलं. ह्या एम्बसीत रोज दोन-तीन जण तरी पाकीट मारलं वा पासपोर्ट गेला, सांगत येतात.

इटलीत कुठंही पंखे दिसले नाहीत. रेल्वेत, रेल्वे-प्लॅटफार्मवर वा चर्चेस्मधूनही हिंडताना भयंकर उकडायचं. पण अख्ख्या पाश्चिमात्य देशांत पंखे कुठंही दिसलेच नाहीत. आपल्या भारतीय लोकांकडे वा भारतीय एम्बसीत पंखे होते. म्हणजे पंख्याचा शोध भारतानं लावला, की पाश्चिमात्य देशांत पंख्याचा शोध लागला ? रेल्वे डबे एअरकंडिशनयुक्त असतात; पण एका मोठ्या डब्यात उतारू गेल्यावर थोडेच लोक राहिले, म्हटल्यावर त्या डब्याचं एअरकंडिशन बंदच केलं व बंद डब्यात घुसमटायला झालं. गार्डजवळ तक्रार केली, तेव्हा त्यानं एका एअरकंडिशन असलेल्या लहान डब्यात सोय केली. इटलीत जुलैअखेरीला फारच उकडू लागलं होतं.

## जपानी मुलगा

रोमवरून रात्रीच निघायचं ठरवलं, म्हणजे व्हिचेन्झाला आम्ही दिवसा पोचणार होतो. रात्री १.१० ची गाडी व्हेनिसला ६.२८ ला पोचणार होतो. ती गाडी योग्य वाटली. एक, व्हेरोनाला जाणारी इटालियन बाई भेटली. तिच्या बरोबर आम्ही बसलो. गाडी लेट होती. रात्रीचे अडीच वाजले, तरी आली नाही. तेवढ्यात एक गाडी आली; पण ती मिलानोची होती. नंतर एक गाडी आली. ती यार्डात गेली. आणखी एक गाडी आली, तीवर नावच नव्हतं. गाडी कुठं जाणार, त्या पाट्या लावलेल्या असतात. त्या पाट्या आम्ही पाहत होतो. तिथं दिसत नव्हत्या. गाडीत बसावं, न बसावं, अशा विचारात होतो. काही जपानी मुलं आत चढताना पाहिली. परत काही उतरतानाही दिसली. ती गाडी फ्रँकफर्टला जाणार आहे, असं अनाऊन्स झालं नि फटाफट गाड्यांचे दरवाजे बंद झाले. एक जपानी मुलगा आत अडकला होता. तो आम्हांला बाहेरून दरवाजा उघडायला सांगत होता. पण ते दरवाजे बाहेरूनही उघडण्यासारखे नव्हते. तो आत अडकला गेला होता. त्याच्या डब्याच्या शेजारी पोस्टाचा डबा होता. त्याला दरवाजाच नव्हता. त्या पोस्टाच्या डब्यातून बाहेर यायला, आमच्या मैत्रिणीनं त्याला खुणावलं. तो त्या पोस्टाच्या डब्यातून बाहेर आला नि मग लुकलुकत्या डोळ्यांनी हातवारे करत तो डोळ्यांची भाषा बोलत म्हणाला, 'हा दरवाजा उघडा होता ! म्हणून, नाही तर माझं काय झाल असतं ?' आम्हांला हसूच येऊ लागलं व तोही हसत राहिला. नंतर पाच मिनिटांनी फिरून आमच्या समोरून गेला.

तेव्हा आम्हां तिघींना त्याच्याकडे पाहून हसूच येऊ लागलं. तोही हसू लागला.

स्वाति पटकन म्हणाली,

'आपल्याकडे तर जर्मनीचा व्हिसाच नव्हता. मग आपण अडकलो असतो, तर आपलं काय झालं असतं ?'

'नि मी अडकले असते, तर माझ्याकडे फ्रँकफर्टचं तिकीट नव्हतं. माझं काय झालं असतं ?' ती बाई म्हणाली.

आम्ही तिघीही परत हसलो.

नंतर गाडी आली, ती व्हेरोनाला जाणारी. ह्या आमच्या मैत्रिणीनं सांगितलं, की व्हेरोनाहूनही दर तासानं व्हिचेन्झाला जाणारी गाडी आहे. तुम्ही चढा.

ती नि आम्ही स्टेशनवर होतो, तेव्हा तिला मी सहज विचारलं,

'तुमचं व्हेरोना कशाबद्दल प्रसिद्ध आहे ?'

ती पटकन म्हणाली,

'रोमिओ ॲंड ज्यूलिएट नाटक माहीत आहे ?'

'हो ऽऽ' आम्ही डोळे विस्फारून म्हणालो.

'रोमिओ ॲंड ज्यूलिएट व 'ए जंटलमन हॉफ व्हेरोना' ह्या जगप्रसिद्ध पुस्तकांतील घटना आमच्या व्हेरोनाला घडल्या. तुम्ही आमचं व्हेरोनाही पाहायला या.'

'नक्कीच येऊ.' आम्ही म्हटलं; पण आमचा हरवलेला पासपोर्ट आम्हांला लाल दिवा दाखवत होता.

व्हेरोनाला आल्यावर एकसारखं जावं वाटत होतं. पण आम्ही व्हिचेन्झालाच गेलो. तिथं डाल्प्राला फोन केला, पण उपयोग झाला नाही. मग पूर्वसूचना लागत नाही, अशा यादीत 'पावला'ला फोन केला. ती दोघं त्याच दिवशी ट्रिपहून आली होती. पण आम्ही फारच गयावया केल्यानं ती आम्हांला गाडीतून न्यायला आली.

## देव पावला

एक हसरी चुणचुणीत पंचवीस वर्षांची वाटावी, अशी ती आम्हांला आपल्या गाडीतून घेऊन जायला आली तिचं वय ३० असं होस्ट लिस्टमध्ये होतं. तिनं सारं घर आमच्या ताब्यात दिलं. व जाताना [illegible] बिस्किटं, साखर, दूध, बाथरूम वगैरे सर्व दाखवून ती लगबगीनं कामावर गेली.

घरात राहायला मिळाल्यानं आम्हांला आनंद झाला. आनंदानं स्वातीला म्हटलं,

'ही कसली पावला ? हा तर देवच पावला.'

खरोखरच देवासारखी ही आमच्या मदतीला धावून आली. किती तरी दिवसांनी चहा प्यालो. आंघोळ स्वस्थपणानं केली. मोरीत भांड्यांचा ढीग होता. बिचारीला आल्यावर धुवायला लागणार, म्हणून भांडी धुऊन टाकली.

बारा, साडेबाराच्या सुमारास पावलाचा नवरा फेदरिको आला व स्वयंपाक करायला लागला. त्यानं भात व भाजी केली. त्यानंतर तासाभरानं पावला आली. तिनं स्पॅघेटी केली.

आज बऱ्याच दिवसांनी घरचं जेवण मिळालं. भाजीला मीठ वगैरे आपणच लावून घ्यायचं असलं, तरी सुद्धा नुसता पाव खाण्यापेक्षा ते चविष्ट वाटलं. शिवाय स्पॅघेटीत ऑलिव्ह ऑईल

जास्त घालू नको,. म्हणून मी पावलाला सांगितल्यानं स्पॅघेटी खाताना तोंडाला एकसारखं ऑलिव्ह ऑईल लागे, ते लागत नव्हतं. जेवून आम्ही लगेचच लंडन एम्बसीकरता मिलानोत गेलो. आम्हांला मंगळवारी व्हिसा मिळणार होता. मिलानो एम्बसीतही पंखा होता. इथल्या एम्बसीवाल्यानं आमच्याकरता खास काही न करता रात्रीचा प्रवास कसा करू नये, ह्याचं छानसं लेक्चर दिलं. (मदत न करता भाषण देत होता, त्याअर्थी तो एखाद्या मंत्र्याचा नातेवाईक असावा.)

लंडनमधल्या एम्बसीतून मंगळवारी व्हिसा मिळणार होता. फ्रेंच एम्बसीत दोन दिवस खेटे घातले. पण तिथले ऑफिसर आत सुद्धा येऊ देत नव्हते.

इथं आम्हांला काही भारतीय मुलं भेटली. ती इटलीत स्थायिक झाली होती. ह्या मुलांना उन्हाळ्याच्या सुट्टयांमध्ये साऱ्या युरोपभर फिरायचं होतं. त्यांना बाकी ठिकाणी व्हिसा मिळाला. फक्त फ्रेंच एम्बसीनं नाकारला. ती मुलं भांडत होती.

'कोणती कागदपत्रं हवी आहेत, ती आम्ही आणून देतो,' असं मुलं म्हणत होती, तर एम्बसीचे दरवाजेच बंद झाले.

आम्हांला फ्रेंच बोलता येत नसल्यानं फ्रेंच एम्बसीतील लोक आमच्याशी, आम्हांला किंमत नसल्यासारखी वागत होती. पण आम्हांला समजलं, भारतीय एम्बसीतल्या मुख्य अधिकाऱ्यालाही मोठ्या मुश्किलीने फ्रेंच व्हिसा मिळाला, आम्ही तर फ्रेंच व भारतीय महोत्सवाच्या किती रसभरित कहाण्या ऐकल्या होत्या. त्यामुळं आम्हांला आपलं वाटायचं, की फ्रेंच लोकांना भारतीयांबाबत धोधो कौतुक आहे. पावलानं आमच्यासाठी इटालियन भाषेत आमचा अर्ज अनुवादित करून दिला होता ! पण उपयोग काय ?

आमचे पासपोर्ट हरवले होते. फ्रेंच एम्बसीची खात्री नव्हती. आम्ही अमेरिका तरी पाहतो, की नाही, ह्याची काळजी लागली होती. त्या वेळीच तिथली होस्टलिस्ट पाहिली. डाल्प्राचा फोन-नंबर बदलला होता. आम्ही पत्रात फोन बदलला असल्यास कळवावं, असं लिहिलं होतं. तरी तिनं कळवलं नव्हतं. आम्ही तिला फोन करून आमची अडचण सांगितली. तेव्हा 'आता लिहिलंच आहे, तर दोन दिवस या.' असं ती म्हणाली, 'ती स्टेफिनाची सख्खी बहीण तर नव्हे ?' मला शंका आली.

पावलानं मात्र आमचं हसतमुखानं स्वागत केलं.

मुंबईत आमचे पासपोर्ट हरवल्याची बातमी पोचली नि पावलाच्या फोनवर दणादण फोन आले. सर्वांनी सर्वतोपरी मदत करण्याची इच्छा दर्शवली. मुंबईहून इतके फोन येतात, ह्याचं पावला व फेदरिको ह्यांना फार कौतुक व आश्चर्य वाटलं.

## इटलीला जुनी परंपरा

रात्री गप्पा मारताना पावलानं सहज विचारावं, तसं विचारलं,

'आमच्याकडचे कुणी चित्रकार वा लेखक तुला माहीत आहेत का ?'

मी लगेच पिरांदेलो त्याचे 'नाटककाराच्या शोधात सहा पात्रे' महाराष्ट्रात हे गाजलेले नाटक, दांते, मायकेल अँजलो, लिओनार्दो व्हिन्सी व त्याचं मुंबईत भरलेलं प्रदर्शन वगैरेंविषयी बोलले. ते ऐकल्यावर तिला खूप आनंद झाला.

मार्क अँटनी, सीझरविषयीही बोलणं झालं. नंतर मी तिला म्हटलं,

'रोम जळत असता रोमन सम्राट नीरो फिडल वाजवत होता, हेही आमच्याकडे प्रसिद्ध आहे.'

पावला लगेच म्हणाली,

'रोमला इतकी जुनी परंपरा आहे, की इथं ख्यातनाम लोक जन्मले, त्याप्रमाणे 'नीरो'-सारखा सम्राट जन्मणंही साहजिकच आहे.'

'तसं नव्हे. माझा म्हणायचा उद्देश हा, की तुमचं इटली व रोम आम्हांला इतकं परिचित आहे.'

ते ऐकून पावला फारच खूश झाली. ती म्हणाली,

'तुम्ही इटलीत काय काय पाहिलं ?'

आम्ही काय काय पाहिलं, ते सांगून मी म्हणाले,

'व्हेनेन्झिआ व रोम राहिलं.'

तेव्हा तिनं शनिवारी व्हेनेन्झिआ व सोमवारी रोम पाहायला सुचवलं व ती कल्पना आम्हांलाही पटली.

## सुंदर परिसर

पावला अपार्टमेंटमध्ये राहत होती. तिच्या गॅलरीत व खालती मोठे मोठे गुलाब फुलले होते. इथं प्रत्येकाच्या घराभोवती कंपाऊंडमध्ये व गॅलरीत फुलं फुलली होती. कण्हेरीची झाडं फुलांनी इतकी गच्च असायची, की झाडावर नुसती फुलंच फुलली आहेतसं वाटायचं. मी डोळे भरून ती कण्हेर पाहत राहायची.

पावलाच्या घरासमोरील घरानं, तर लुझर्नमधील चॅपेल ब्रिजप्रमाणे जिन्याच्या कडेनं फुलांनी गच्च झालेल्या कुंड्या लटकवल्या होत्या. घरासमोर विविध फुलांचं बहारदार दृश्य होतंच व गॅलरीही फुलांनी सजली होती. आम्ही त्याचे फोटो काढले.

पावलाच्या वरच पावलाची आई राहायची. पावलाच्या वडिलांचं कटलरीचं दुकान होतं. तिथं पावला त्यांना मदत करायची. फेदरिको इलेक्ट्रिशिअन् होता. पावला, आपल्या इथल्या बी.एड्.सारखी कोणती तरी परीक्षा देत होती. ती परीक्षा पास झाल्यावर शिक्षिका होण्याचा तिचा बेत होता. पावलाच्या आईला आमच्याशी बोलावं वाटायचं; पण भाषेचा प्रश्न उभा राहायचा. मात्र आम्ही घरी येत असू, तेव्हा वरून ती प्रेमानं हात वर करायची. एकदा आम्ही बिल्डिंगचा खालचा दरवाजा किल्लीनं उघडता येतो, की नाही, हे पाहत होतो. तेव्हा तिनं तो वरूनच उघडला (पाश्चात्त्य देशात सर्वत्र प्रत्येक बिल्डिंगच्या खाली वेगळा दरवाजा असतो व प्रत्येक बिऱ्हाडकरूकडे त्याची चावी असते.) व ती खाली आली. तिला वाटलं, आम्हांला खालचा दरवाजा उघडणंच जमत नाहीये. पावलाची आई जाड होती व 'टायनो'ची स्टेफिनां पण जाड होती. पण पावलाच्या वयाच्या मुली व तिच्याहून लहान वयाच्या मुली छान सडसडीत, उंच दिसायचा. त्या संबंधांत मी पावलाला बोलले, तेव्हा हसत हसत ती म्हणाली,

'आमच्याकडे सडसडीत होण्याची फॅशन आल्येय्. आता बारीक होत होत त्या इतक्या बारीक होत जाणार आहेत की, एक दिवस दिसेनाशाच होणार आहेत.'

फेदरिको दुपारी घरी लवकर यायचा. त्याला दोन तास लंचसाठी असायचे व संध्याकाळीही पावलाच्या अगोदरच घरी यायचा नि स्वयंपाक करायला लागायचा. पावला वडिलांना दुकानात

मदत करीत असल्यानं दोन्ही वेळी तिला घरी यायला उशीर व्हायचा. फेदरिकोचं कौतुक करत मी पावलाला एकदा म्हटलं,

'तुमच्याकडे बरं आहे, बाई, पुरुष स्वयंपाकही करतात.'

'असंच काही नाही. फेदरिकोला स्वयंपाक येतो व तो करतो. पण माझे वडील काहीही काम करत नाहीत.'

'फेदरिको नवीन विचारांचा आहे. त्यामुळं बायकोनंच घरातली कामं केली पाहिजेत, असं त्याला वाटत नाही. मात्र जुन्या काळातील इटालियन मनुष्य आळशीच असत.' पावला किंचित हसत म्हणाली.

जुन्या काळातले इटालियन पुरुष आळशी असत; पण भारतात मात्र तो जुना काळ सरता सरता नाहीये उलट, जेवणखाण बनवणारी कुणी हवी, म्हणूनच लग्न करायचं असतं, अशी भारतातल्या लोकांची समजूत आहे.

भारतात व इटलीत फार प्राचीन काळापासून संस्कृती नांदत होती. त्यामुळं अशाच ठिकाणी स्त्रीला दुय्यम मानलं जातं. त्यामुळं 'हुंडा घेणं' व पुरुष आळशी असणं, हे दोन्ही ठिकाणी सारखंच होतं. आता इटली सुधारला आहे.

## पाण्यातलं व्हेनिस

शनिवारी आम्ही, सेंट मार्क्स चौक व व्हेनिस पाहायला गेलो. ॲड्रिॲटिक समुद्रावरून आमची गाडी जाऊ लागली आणि समुद्रातील अनेकानेक बोटी पाहण्यात मी तन्मय झाले. गाडी व्हेनिसला गेली नि स्टेशनवरून बाहेर पाहिलं, की ग्रँड कॅनॉल दिसतो. ११७ बेटे, १४० कॅनॉल्स व ४७० पूल असलेलं व्हेनिस पाहणं नयनमनोहारी आहे. व्हेनिसला नावेशिवाय इतर कोणतंही वाहन दिसणार नाही. वाहन म्हणजे फक्त नावांचे प्रकार. तो जथा समोरच होता. त्यात गोंडोलांची गर्दी दिसत होती. गोंडोला म्हणजे लहान लहान नावा. नावेच्या एका बाजूला कोणत्या तरी जनावराचं वा पक्ष्याचं लाकडी तोंड असतं.

गोंडोलातून जायचं असेल, तर स्टेशनवरच तिकिटं काढण्यासाठी लहानशा खोपटीवजा घरांच्या खिडक्या होत्या. दादर टी.टी.ला, टॅक्सीसाठी तिकीटखिडकी आहे, तरी स्टेशनवरून ग्रँड कॅनॉलच्या पाठीकडे जायला पूलही आहे. हा पूल ओलांडल्यावर चालत चालत सेंट मार्क चौकोनात जाता येतं. ह्या कॅनॉलभोवती प्रवाशांची ही झुंबड गर्दी होती व दुकानंही गजबजलेली होती.

पूल ओलांडल्यावर इथून दगडी फरश्यांचे रस्ते सुरू होतात, ते अगदी सेंट मार्क्स चौकापर्यंत हे दगडी फरश्यांचे रस्ते आहेत. चर्च वा राजवाड्याच्या आसपास किती तरी लांबवर अशा दगडी फरश्या असणं हे इटलीचं वैशिष्ट्य आहे. ह्या दगडी रस्त्यांवरून आम्ही जात होतो. रस्ते म्हणजे अर्थातच गल्ल्या व बोळ. बोळांच्या बाजूला उंचच उंच घरं व अधून-मधून दुकानं. नंतर जरा वळलं, की लगेच कालवा लागतो. मग तो लहानशा पुलावरून ओलांडायचा.

पूल ओलांडताना मधून मधून गोंडोला जाताना दिसतात. लाल आडव्या पट्ट्यांचा टी शर्ट, निळी ढगळ-बंगळ पँट व गवती हॅट घातलेले गोंडोलियार आपली गोंडोला संथपणे नेत असतात. असे दोन-तीन पूल ओलांडल्यावर दुकानांची गर्दी दिसू लागते. मध्येच एक चर्चसारखी इमारत दिसली; पण ती एरवीचीच होती. गल्ल्या, बोळ व मधून मधून पुलावरून कालवे ओलांडून

आम्ही सेंट मार्क्स चौकाशी आलो.

## सेंट मार्क्स चौक (ड्रॉईंग रूम ऑफ युरोप)

सेंट मार्क्स चौकासमोरच्या हॉटेलसमोर एखाद्या नाट्यगृहासारख्या खूप खुर्च्या मांडलेल्या होत्या. हा चौक केवढा तरी विस्तीर्ण आणि दगडी फरश्यांचा बांधलेला होता. माणसांची व कबुतरांची नुसती गर्दी होती. तरी सर्वत्र अगदी स्वच्छ होतं. रस्ते इतक्या पुरातनकाळी बांधलेले असून, जराही पडझड नाही. कुठली फरशी निखळू लागली आहे नि डागडुजी चाललेय्, असं दिसलं नाही. कबुतरांची गर्दी पाहून ट्राफलगार स्क्वेअरची आठवण होते. तिथल्याप्रमाणेच ही कबुतरं अत्यंत माणसाळलेली होती व धान्य टाकलं, की हातावर बसून हातावरून चालत जात होती.

सेंट मार्क्स हा व्हेनिसचा मुख्य चौक आहे. ह्या अवाढव्य चौकाच्या एका बाजूला सेंट मार्क्स चर्च आहे. आम्हांला प्रथम सेंट मार्क्स चर्चच लागला. त्याच्या एका बाजूला क्लॉक टॉवर व एका बाजूला डोगेज पॅलेस आहे, तर चौथ्या बाजूला सेंट मार्क्स कँपॅनिरो हा उंचच उंच मनोरा आहे. सेंट मार्क्स चौक हा व्हेनिसचा आत्मा आहे.

आम्ही सेंट मार्क्स चौकाशी पोहोचलो, तेव्हा बाराला पंधरा मिनिटं कमी होती. म्हणून अगोदर 'क्लॉक टॉवर' पाशी पोचलो. ही २०० फुटांची अरुंद अशी इमारत आहे. ह्या क्लॉक टॉवर मनोऱ्यावर एक प्रचंड अशी घंटा आहे. तिच्या दोन्ही बाजूंना मूर जमातीच्या पुरुषांचे दोन पुतळे आहेत. प्रत्येक पुरुषाच्या हातात भला मोठा हातोडा आहे. दर तासाला त्या त्या तासाप्रमाणे हे पुतळे फिरतात व घंटेवर टोल देतात. ते पाहण्यासाठी प्रवाशांची हीऽ गर्दी झाली होती. प्रत्येक जण कॅमेरा घेऊन सज्ज झाला होता. आता टोल वाजणार, ह्या उत्सुकतेनं जो तो त्या घंटेकडे व त्या पुतळ्यांकडे डोळे लावून बसला होता.

'आत्ता टोल वाजलाच नाही, तर... ' स्वाति म्हणाली नि एकापाठोपाठ एक दोन पुरुष त्या घंटेवर आपल्या हातोड्याचे टोल देत होते नि त्यांचे फटाफट फोटो निघत होते.

तसं हे प्रचंड प्रमाणातलं टोले देणारं घड्याळ. पण ते प्रचंडपण पाहताना अगदी दबून गेल्यासारखं वाटतं. इटलीतलं सारं बांधकाम मजबूत नि कलात्मक. सेंट मार्क्स कँपॅनिरो क्लॉक टॉवरजवळ असल्यानं नंतर आम्ही 'सेंट मार्क्स कँपॅनिरो' पाशी गेलो. हा एक उंचच उंच मनोरा आहे. दहा मजल्यांचा हा उंच मनोरा लाल रंगाचा आहे. पूर्वी दीपगृह म्हणून त्याचा उपयोग होई. ह्या दहा मजल्यांच्या वर परत एक गॅलरी असून. त्यावर पुन्हा एक टोकदार हिरव्या रंगाचा घुमट आहे. ह्या मनोऱ्याची कलात्मक बांधणी व हे रंग त्यामुळं हा मनोरा लांबूनही लक्ष वेधून घेतो. इथं सा रे ग म प ध नी अशी सप्त सुरांत बेल वाजते.

## सेंट मार्क्स चर्च

सेंट मार्क्स चर्च अतिभव्य आहे. चर्चला पाच मोठे घुमट आहेत व अनेकानेक मनोऱ्यांमुळं हे चर्च अत्यंत आकर्षक वाटतं. मुख्य वेदी, सोनं व एनॅमलमध्ये नक्षीकाम करून बनवल्यानं चर्चच्या सौंदर्यात भर पडते. भिंतीखालचा भाग संगमरवरी असून छतावर बारीक-बारीक टाईल्सनी मोझाईक पद्धतीनं काढलेली ही चित्रं विलक्षण सुंदर दिसतात. टेरेसवरून वर गेलं, की तांब्याचे चार उडते घोडे दिसतात. जवळच्या कलादालनातही उत्तमोत्तम तैलचित्रं आहेत.

त्यांतलं 'व्होल्ट ऑफ पॅरडाईज' हे तैलचित्र जगप्रसिद्ध आहे.

हा सारा परिसरच अत्यंत सुबक, पद्धतशीर आखणी केलेला नि नितांतसुंदर आहे. हा चौक पाहून नेपोलियननं ह्यास 'ड्रॉईंगरूम ऑफ युरोप' हे नाव दिलं.

ह्या चर्चजवळच 'डोगेज पॅलेस' आहे. 'डॉग्ज पॅलेस' असं नाव आम्ही ऐकलं होतं नि तो कुत्र्यांकरता राजवाडा आहे, अशी आमची कल्पना ! पावलानं किंचित हसत, मान हलवत आमच्या कल्पनेला सुधारलं, तेव्हा आम्ही सारे किती वेळ तरी हसत होतो. व्हेनिस म्हटलं, की कालव्यांचं झुळझुळतं पाणी, नयनरम्य परिसर नि रसिक मनात उधाणलेलं प्रेम हे सारं ओघानंच आलं. राजवाडा पण त्याला अपवाद नाही. कॅसानोव्हा ह्या अत्यंत देखण्या माणसाची व ड्यूकच्या राजकन्येच्या विलक्षण प्रेमाची कथा ह्या राजवाड्यात घडली.

राजवाड्यातच न्यायालय व पिओम्बी हा तुरुंग आहे. न्यायालय व तुरुंगाच्या मध्ये कालवा आहे. ह्या पुलाचं नाव 'ब्रिज ऑफ साईज्' म्हणजेच दुःखद सुस्काऱ्यांचा पूल.' शिक्षा झालेले कैदी ह्या पुलावरून सुस्कारे टाकत तुरूंगात जात, म्हणून हे असं कारुण्य असलेलं नाव ह्या पुलाला पडलं.

व्हेनिस, व्हिचेन्झा वा स्वित्झर्लंडला मी इतकी हिंडले, पण ही सारी शहरं म्हणजे बागबगीचा वा कालव्यांनी सजलेली टुमदार खेडी वाटतात. मात्र रस्ते पक्क्या बांधणीचे. आपल्या देशात शहरांत कारखान्यांमुळं येणारा बकालपणा, गजबजाट इथं कुठंही दिसत नाही.

हा भाग कटलरी, हस्तोद्योग, रेशमी, सुती व लोकरी कपडे, मशिनरी, इलेक्ट्रॉनिकल वस्तू, शेतीची अवजारं वगैरे बनवण्यात अग्रेसर आहे. पण गजबजाट कुठंही दिसला नाही.

## कलिंगडाचं आईस्क्रीम

आम्ही घरी गेलो, तो आमच्याकरता कलिंगडाच्या आईस्क्रीमचा खास बेत होता. फेदरिको आईस्क्रीम बनवत होता. उरलेलं कलिंगड पावलानं आम्हांला खायला दिलं व स्वतः खाल्लं. फेदरिकोला नको होतं. अगदीच आग्रह झाल्यावर त्यानं दोन फोडी खाल्ल्या. कलिंगड मोठं व गोड होतं. रुपयांत हिशेब केला, तर कोणतीही गोष्ट महागच आहे. पण, 'इथं कलिंगड खूप स्वस्त मिळतात.' असं ती म्हणाली.

आजही स्पॅघेटी होती. त्यात पावलानं लसूण घातल्यानं त्याला चांगली चव आली होती. आमच्यावर दोघंही प्रेमाचा वर्षाव करीत होती ! व्हेजिटेबल म्हणून एक कडू पालाही टोपलीत होता. अर्थातच आम्हांला आवडला नाही.

## तुरुंग व पोलीस कमी

जेवता जेवता स्वातीनं मिलानोमधल्या गर्दुल्या मुलांविषयी सांगितलं, तेव्हा पावला म्हणाली,

'आमच्या इथं गर्द ओढणारी माणसं जास्त आहेत व तुरुंग, पोलीस कमी आहेत.'

गर्द, हेरॉईन वगैरेंची नावं घेत ती म्हणाली,

'सगळ्यांबाबंत आमच्या इथं सारखाच कायदा आहे. पण ही सगळी मादक द्रव्यं सारखीच नाहीत.'

ते स्वातीच्या व माझ्या डोक्यावरून गेलं.

'शिवाय आमच्या इथं तरुण वर्ग तुलनात्मकदृष्टचा कमी होत चाललाय,' पावला म्हणाली.

'कारण काय ?' मी विचारलं.

'तीस-तीस वर्षांपर्यंत बायका मुलंच होऊ देत नाहीत. झालं, तरी एखादं-दुसरंच. शिवाय ड्रगॲडिक्ट मुलं, बहुधा बिनलग्नाचीच राहतात. त्यामुळं देशात आणखी मुलं जन्माला यावी, असं आमच्या देशाला वाटतं.'

'मग त्यासाठी मुलं झाली, की पगारात वाढ वगैरे केली जाते का ?' मी विचारलं.

'नाही. तसं काही नाही'. पावला म्हणाली.

## ढोंगी राजकीय पक्ष

नंतर आमच्या गप्पा राजकारणावर घसरल्या. स्वातंत्र्यानंतर सत्य, अहिंसा आणि पांढऱ्या टोपीच्या झालेल्या घसरणीबाबत मी बोलले, तेव्हा ती म्हणाली,

'आमच्या इथंही तेच आहे. इथली ख्रिश्चन पार्टी; होली क्रॉस व जीझसच्या गप्पा मारते. ती सगळी कागदावरची धोरणं आहेत. आमच्या इथं वरपासून खालपर्यंत सगळे पैसे खातात.'

मी तिला नंतर आमच्या इथं कुटुंबनियोजनाचा बोजवारा कसा उडतो, ते सांगितलं व कुटुंबनियोजनाच्या कायद्याला ख्रिश्चन व मुस्लिम धर्माचा विरोध असल्याचं सांगितलं. तेव्हा ती हसून म्हणाली,

'धर्मात काहीही असलं, तरी आमच्या इथं बायका जास्त मुलं होऊच देत नाहीत.'

ती म्हणाली, तेही खरं होतं. दोन मुलं झाल्यावर बायकांनी गुपचूप कुटुंबनियोजन करून यावं व इतर शहाण्या समाजानं त्यांना याबाबत मदत करावी-माझ्या मनात विचार आला.

भांडी विसळता-विसळता आमच्या गप्पा चालल्या होत्या. तेवढ्यात वेळात फेदरिकोचं मात्र आईस्क्रीम पॉटमध्ये बर्फ टाकणं चाललं होतं.

तेवढ्यात पावलाची मैत्रीण आली नि मग त्यांचा अभ्यास चालला. पहिल्याच दिवशी फेदरिकोनं आम्हांला कॉम्प्यूटर गेम खेळायचं शिकवलं. स्वातीला जरा जरा जमायलाही लागलं होतं. आज त्याला कॉम्प्यूटर खेळायचा मी परत आग्रह केला नि ते बघण्यात व मध्येच प्रॅक्टिस करण्यात आमचा वेळ मजेत चालला होता.

रात्रीचे नऊ वाजायला आले होते नि पावला तिच्या मैत्रिणीबरोबर गेली, तेव्हा फेदरिको रागावल्यासारखा झाला होता. तो त्याच्या खोलीत वाद्य वाजवत होता. फेदरिकोकडे एक इलेक्ट्रिकल वाद्य आहे. त्यावर फिडल, व्हायोलिन, सतार, तबला वगैरेसारखी सात-आठ वाद्यं वाजतात. हौशी कलाकारांच्या मेळाव्यात तो ते वाद्य वाजवायला खूपदा जातो. पाश्चिमात्य देशात प्रत्येकजण नोकरी व्यतिरिक्त कुठले तरी एक-दोन छंद जोपासतच असतो.

## व्हिचेंजा, अगदी शुकशुकाट

दुसऱ्या दिवशी रविवार असल्यानं, दोघेही घरीच होते. आम्ही रोम पाहण्यासाठी आज रात्री निघणार होतो. नंतर कळलं, की पावलाच्या मैत्रिणीच्या बर्थ-डे करता जाणार होती. ती दोघं स्नान करून निघून गेली. नि आमचा वेळ जाता जाईना. गॅलरीत उभं राहून बाहेर गंमत पाहण्याचीही कुणाला आवड नाही. आम्ही जरा खाली जाऊन भटकून आलो, तर रस्त्यावरही कुणी माणसं नाहीत. एखाद-दुसरा माणूस दिसायचा, तोही सायकलीवरून इकडे-तिकडे

जाताना. पार्सी कॉलनीतल्या घरांसारखी घरं होती मात्र फुलांनी ती फुललेली होती. पावलाच्या घराच्या पलीकडे मोठा रस्ता आहे. तीवरून दर तासानं बसचे फक्त तीन रूट जातात. आपल्याला कंटाळा येईल, इतकं इथं शांत आहे. नि तरी व्हिचेन्झा हे मोठं शहर आहे. इथं बसचं तिकीट महाग आहे व पेट्रोल स्वस्त. सायकल, मोटर बाईक व गाडीतूनच सारे प्रवास करतात. अर्थात गाडीतून कमीच. बसमध्ये म्हातारी माणसंच जास्त दिसतात व बसमध्ये गर्दी अजिबात नाही. बऱ्याच सीटस् रिकाम्या जातात. कंडक्टर नसतोच. दुकानातूनही बसचं तिकीट मिळतं व एकही डबलडेकर दिसत नाही. हॉटेलं व दुकानांचा पण गजबजाट नाही. कोपऱ्यावरच्या पाटया इटालियन भाषेत. रस्ता लक्षात ठेवायचा. तोही असा, की त्या कोपऱ्यावरच्या कंपाऊंडमध्ये मोठ्ठ कण्हेरीचं झाडं आहे ना, तिथं वळायचं, अशा प्रकारे भटकून झाल्यावर घरी आलो. घरी आल्यावर स्वाति कॉम्प्यूटर गेम खेळत बसली नि मी आठवणी लिहीत बसले. लिहिता-लिहिता मनात आलं, इथं चकाटया पिटणारं कुणी नसतंही. म्हणजे मग नोकरीव्यतिरिक्त आणखी कोणते तरी छंद यायला हवेतच.

## इटलीतही मुलगाच आवडतो

तीन वाजता पावला व फेदरिको आले नि मग वेळ भराभर जाऊ लागला. पावला कॉफी बनवत होती नि मी आमच्यासाठी चहा बनवत होते. चहाची पावडर टाकत असता मी पावलाला विचारलं,

'तुम्हां दोघांची भेट कुठं झाली ?'

' 'सोशल वर्क'च्या क्लासमध्ये,' ती म्हणाली.

मनात आलं,

'लग्न जमवायलाही ह्यांना कुठले तरी छंद हवेतच.'

चहा पिता पिता मला इंटरलेकनच्या आयरिसची आठवण झाली नि मी तिला म्हणाले,

'इंटरलेकनला आम्ही ज्यांच्याकडे राहिलो, तिथं आयरिस ही आमची होस्ट म्हणाली, की त्यांच्याकडे मुलगा झालेला आवडतो. कारण तो आपलं नाव लावतो. इटलीत ह्याबाबत काय विचारसरणी आहे ?'

'इटलीत तीच विचारसरणी आहे. पण आजकाल आम्ही मुली लग्न झाल्यावरही माहेरचंच नाव कायम ठेवतो.'

पावला पिव्हॅटो व फेदरिको पिलॅस्ट्रो अशी होस्टलिस्टमध्ये वेगवेगळी आडनावं होती. त्याचा उलगडा झाला.

'पण उद्या तुम्हांला मुलगा झाला, तर तो कोणाचं आडनाव लावेल ?' मी उत्सुकतेनं विचारलं.

'फेदरिकोचंच.' पावला म्हणाली.

'कायद्यानं तसं करावं लागतं. पण दोन मुलं असली नि एकानं पावलाचं नाव लावलं नि एकानं माझं नाव लावलं, तर काय हरकत आहे ?' फेदरिको शांतपणे म्हणाला.

त्या दिशेनं पावलं पाडण्याची शक्यता आहे. ह्याचा मला अंदाज आला.

'आज आपण जेवण झाल्यावर 'व्हिचेन्जा स्क्वेअर' पाहायला जाऊ या.' पावला म्हणाली.

नि मग आमच्या मनात 'व्हिचेन्जा स्क्वेअर' निनादू लागला.

## 'व्हिचेन्झा स्क्वेअर'

पावला व फेदरिकोच्या गाडीतून आम्ही व्हिचेन्झा स्क्वेअर पाहायला निघालो. बसनं स्टेशनवर जायचा रस्ता प्रथम लागतो. बसनं जातानाच राजवाड्याचं प्रवेशद्वार दूरवर असलेलं दिसतं. तिथंच आम्हांला जायचं होतं.

व्हिचेन्झा स्क्वेअरला जाताना एका उंच कमानीनं स्वागत होतं. ह्या कमानीवर एका देखण्या माणसाचा पुतळा आहे. त्याच्या हातात एक मोठा गोल आहे.

'जेव्हा एखादा सज्जन माणूस ह्या कमानीखालून जाईल, तेव्हा तो गोल खाली पडेल, असा समज आहे.' पावला सांगत होती.

'गंमतच आहे. म्हणजे अजून कुणी खरोखरीचा सज्जन माणूस इथून गेला नाही.' मी हसत म्हणाले.

'ज्या अर्थी त्याच्या हातांत गोल शाबूत आहे, त्याअर्थी अजून कुणी सज्जन इथून गेला नाही.' पावला हसत म्हणाली.

थोडं चालल्यावर पावला म्हणाली,

'रोममध्ये एक पुतळा आहे. त्याला 'माऊथ ऑफ ट्रूथ' म्हणतात. त्या पुतळ्याचं तोंड उघडं आहे. ह्या पुतळ्याच्या तोंडात खोटं बोलणाऱ्या माणसानं हात घातला, की तो, म्हणे, चावतो. पण अद्याप एकाही माणसाला तो पुतळा चावला नाही.'

'अरे, व्वा ! रोममध्ये खरं बोलणाऱ्यांचा सुळसुळाट दिसतोय्.' मी म्हणाले.

तेव्हा फेदरिको हसत म्हणाला,

'रोममध्ये मॅडम लक्रीझीचा पुतळा आहे. तो, म्हणे, रोमन भाषेमध्ये मार्गदर्शन करतो.'

'नि खरं बोलणारी रोममधील माणसं, आम्ही तो उपदेश ऐकला, असं खरंखुरं सांगतात.' स्वाति म्हणाली, नि आम्ही सारे हसलो.

## पॅलेसचा विशेष

इटलीत कुठलाही चौक असेल, तर तिथं सारं आवार दगडी फरश्यांनी बांधलेलं असतं. त्यामुळं सारं आवार चालतच बघावं लागतं. कमानीपासून थोडं पुढं चालल्यावर उंचच उंच कमानीची, संगमरवरी दगडाची अवाढव्य नि देखणी इमारत दिसते. हा व्हिचेंझाच्या ड्यूकचा पॅलेस. ह्या पॅलेसखाली, जे विस्तीर्ण दगडी आवार होतं, तिथं सैनिकांची कवायत चाले. अजूनही, सोळाव्या शतकातील हा पॅलेस मजबूत आणि भक्कम आहे. कुठंही पडझड दिसली नाही. इतकं इथलं वास्तुशास्त्र प्रगत होतं. राजवाड्यात एक कलादालन आहे. तिथं निरनिराळी पेंटिंग्ज दिसतात. आम्ही राजवाडा पाहत होतो. त्याच वेळी समोर काही हौशी कलावंत 'जाझ' हा प्रकार अत्यंत सुरेख वाजवत होते.

'हा अमेरिकन 'जाझ' चा प्रकार आहे. 'फेदरिको म्हणाला.

'जाझ' ऐकायला, माणसांचा जमा जमला होता. त्या तालावर काही लहान मुलं मजेत नाचत होती व गाणं संपलं, तेव्हा लोकांनी कौतुकानं कडकडून टाळ्या वाजवल्या.

'अशातूनच काही चांगले कलावंत पिक्चर्ससाठीही घतले जातात.' पावलानं सांगितलं.

भारतात राजवाड्याच्या प्रांगणात देऊळ असतं, त्याप्रमाणे इथं राजवाड्याच्या प्रांगणात

चर्च हा असतोच. इथला चर्चही आम्ही पाहिला. हे चारी चौक दुकानं व निरनिराळ्या इमारतींनी व्यापलेले होते.

फेदरिकोनं आम्हां सर्वांसाठी आईस्क्रीम घेतलं. मुंबईत मिळणाऱ्या कोनाच्या तिप्पट मोठा हा कोन असतो व आईस्क्रीम अतिशय सुरेख होतं. इथं इतर कोणत्याही खाद्यपदार्थापेक्षा आईस्क्रीम स्वस्त असतं आणि चवदार असतं.

घरी गेल्यावर मग आम्ही रोमला जाण्यासाठी ब्रेड, बटर व बिस्किटं नि सफरचंदं घेतली. रात्री फेदरिकोनं आम्हांला व्हिचेन्झा स्टेशनवर सोडलं. रात्रीचे अकरा वाजले होते. सव्वाबारापर्यंत व्हेनिसला पोचून बारा पस्तीसच्या ट्रेननं आम्ही रोमला जाणार होतो.

***

## रोम म्हणजे मायकेल अँजेलोचं वास्तुशिल्प

आम्ही पहाटे पाच पंचेचाळीसला रोम टर्मिनीला उतरलो. गाडीतच तोंड धुणं वगैरे आटोपून घेतलं होतं. मी नाइलाजानं 'कापुचिनो' नावाची इटालियन कॉफी घेतली. ही पण कडूच होती. खास इटालियन कॉफी म्हणजे तर कडूपणाचा कळसच. तोंड इतकं कडू झालं, की शेवटी मी लाडू खाल्ला. लाडू खाऊन झाल्यावरही कॉफीचा कडूपणा आठवतच राहिला. आमची साडेआठची टूरची तिकिटं काढायची होती; पण ते ऑफिस सातला उघडणार होतं. मग तिथंच कट्ट्यावर बसून रोम पाहत बसलो.

बसल्या बसल्या व्हिट्टोरिओ डि सिकाच्या 'बायसिकल थीफ' या चित्रपटाची आठवण झाली. या नितान्तसुंदर चित्रपटात; तो तरुण, त्याची स्वत:ची सायकल चोरीला जाते व सायकलीशिवाय नोकरी मिळण्याची शक्यता नसल्यानं तो दुसऱ्याची सायकल चोरतो, तेव्हा ती चोरी उदात्त होऊन जाते. पण एरवी रोममध्ये चोऱ्यांचा प्रचंड सुळसुळाट आहे. काहींचा चोरी हाच प्रतिष्ठित धंदा आहे. फर्स्टक्लासचं तिकीट काढून सावज टिपलं जातं. पासपोर्ट चोरण्याचंही रॅकेट आहे, असं म्हणतात.

आमची बस बरोबर साडेआठला निघाली. रोमची ऐतिहासिक महत्त्वाची ठिकाणं शहराच्या मध्यवर्ती भागातच आहेत. मध्ये डांबरी रस्ते व शेजारी जुने अवशेष. सात टेकड्यांची ही राजधानी आहे.

आम्ही प्रथम 'पिआझा व्हेनाझिया' या चौकात गेलो. इथ 'पॅलेझी व्हेनेझिया' हा पूर्वीचा राजवाडा आहे. आता त्याचं कलादालनात रूपांतर केलं आहे. पूर्वी इथं पोप राहत. आता ते व्हॅटिकन सिटीत राहतात. त्यापूर्वी व्हेनिसचे ड्यूक या राजवाड्यात राहत. याच वाड्याजवळ 'सेंट मार्क बॅसिलीका' हे चर्च अहे. इथं इटालियन चित्रकारांच्या कलाकृती दिसतात.

याच चौकात 'अल्टर डेला पॅट्रिआ' नावाचं व्हिक्टर इमॅन्युअल सेकंड हचाचं अतिभव्य स्मारक आहे. संगमरवरी उंच, भव्य नि पक्क्या बांधणीचं हे स्मारक मनात भरतं. व्हिक्टर इमॅन्युअल सेकंड हचाचा घोड्यावरचा पुतळा ब्रॉन्झचा आहे व हा पुतळा सर्वांत उंच जागी आहे. शंभर एक पायऱ्यांवर हा पुतळा आहे. इटलीसाठी प्राणत्याग केलेल्या इतर सैनिकांचे पुतळेही बाजूला आहेत.

फेदरिको म्हणाला, त्या प्रकारचा रोमन संदेश देणारा पुतळा ह्याच चौकात आहे. पुतळा

बनवला नि सोडून दिला, असं नाही, तर त्याभोवती काही तरी कथा गुंफून देण्याची इटालियन लोकांची पद्धत असावी.

इथंच एक भव्य अशी संगमरवरी इमारत आहे. तीवर नाजूक नक्षीकाम केलेले आहे. व इमारतीच्या वर घोड्यांच्या रथावर दोन ब्रॉन्झचे पुतळे आहेत. एक स्वातंत्र्यदेवतेचा व दुसरा एकता (Unity) ह्या देवतेचा पुतळा आहे.

## ट्रेव्ही एक सुंदर कारंजे :

गाईडनं जाता जाताच रोमन वॉल, काही कारंजी व इटालियन अध्यक्षांचं निवासस्थान दाखवलं. एका कारंज्यात घोड्याचा पुतळा होता. त्याच्या, म्हणे, एका नाकपुडीतून वाईन व एका नाकपुडीतून पाणी वाहत असे. रोमला सध्या पाण्याचं दुर्भिक्ष आहे; पण पाणी नसलेली कारंजी मात्र भरपूर आहेत. आम्ही रोमन एम्बसीतून आमच्या एका होस्टला फोन केला होता. तेव्हा ती म्हणाली, आमच्या इथं पाणी नाहीये. तुम्ही झोपायला या; पण आंघोळीला पाणी मिळणार नाही. आम्ही नंतर, 'फाऊंटन वा ट्रेव्ही' (Trevi) इथं उतरलो. हे अतिशय सुंदर कारंजं आहे. ती वास्तू चकित नजरेनं आम्ही पाहत राहिलो. 'नीलोलासार्दी' ह्या वास्तुशास्त्रज्ञानं १७५५ मध्ये हे बांधलं. पायऱ्या उतरून ह्या कारंज्याशी गेल्यावर नजरेत भरतं; ते समोरचं झुळझुळतं पाणी आणि त्यामागचं शिल्प.

मध्यभागी पिळदार शरीराच्या देखण्या माणसाचा पांढरा संगमरवरी पुतळा आहे. हा खूप मोठा आहे. ह्याचं नाव नेपच्यून. त्याच्या शेजारी दोन त्याहून लहान पुतळे आहेत. ते अनुक्रमे विपुलता (ॲन्डन्स) व आरोग्य (हेल्थ) देणाऱ्या देवतांचे अत्यंत देखणे व पिळदार अंगाचे पुतळे आहेत. रोमन पुतळ्यांचे विशेषत्व हे आहे की, त्यातील पुरुषांचं शरीर पिळदार आणि उठावदार स्नायू असलेलं असतं. हेही शिल्प तसंच आहे. हे सारंच काम पांढऱ्या संगमरवरी दगडातलं आहे. त्याच्या खाली डाव्या बाजूला मस्तवाल घोड्याला ताब्यात घेत रोमन माणूस शक्ती दाखवतो आहे, तर उजव्या बाजूला पिळदार अंगाचा रोमन माणूस, खवळत्या घोड्याला एका हातानं ताब्यात घेत आहे. तर त्याचबरोबर दुसऱ्या हातानं शंख वाजवतो आहे.

ह्या सुंदर वस्तूसमोर कारंज्याचं झुळझुळतं पाणी तलावासारखं वाहत असतं. हे पाणी इतकं स्वच्छ आहे, की त्याचा तळही दिसतो. त्या तळाशी किती तरी नाणी पडलेली दिसतात. रोज किती तरी माणसं ह्या ट्रेव्हीला भेट देत असतात. त्या तलावाकडे पाठ करून नाणी टाकत असतात. ह्या नाणी टाकण्यासंबंधीही सुंदर कल्पना गुंफलेली आहे. १) एक नाणं टाकलं, की माणूस परत ट्रेव्हीला भेट देतो. २) दोन नाणी टाकली, की प्रेम जमतं. ३) तीन नाणी टाकली की, यू आर् द बिग बॉस. तुम्हांला प्रचंड अधिकार प्राप्त होतो.

इटलीतल्या चोरानं आमचे पासपोर्ट व थोडे पैसे चोरल्यानं आम्ही ट्रेव्हीला परत भेट देण्याच्या मूडमध्ये नव्हतो. त्यामुळं आम्ही नाणी टाकलीच नाहीत व बिचाऱ्या ट्रेव्हीला दोन नाण्यांचा तोटा पत्करावा लागला.

नाणं न टाकताही मला ट्रेव्हीला परत भेटण्याचा योग आला. तेव्हा हे भविष्य बहुधा उलटच घडतंय, असं वाटून, मी आपलं एक नाणं टाकलं, आमच्याबरोबरच्या संकेत नावाच्या भारतीय प्रवाशाला इटालियन मुली अतिशय आवडल्या. स्वर्गीय पंतप्रधान राजीव गांधी यांनी ज्याप्रमाणे सोनियाशी लग्न केलं, त्याप्रमाणे इटालियन मुलीशी लग्न करायची संकेतची इच्छा असल्यानं,

चर्च हा असतोच. इथला चर्चही आम्ही पाहिला. हे चारी चौक दुकानं व निरनिराळ्या इमारतींनी व्यापलेले होते.

फेदरिकोनं आम्हां सर्वांसाठी आईस्क्रीम घेतलं. मुंबईत मिळणाऱ्या कोनाच्या तिप्पट मोठा हा कोन असतो व आईस्क्रीम अतिशय सुरेख होतं. इथं इतर कोणत्याही खाद्यपदार्थांपेक्षा आईस्क्रीम स्वस्त असतं आणि चवदार असतं.

घरी गेल्यावर मग आम्ही रोमला जाण्यासाठी ब्रेड, बटर व बिस्किटं नि सफरचंदं घेतली. रात्री फेदरिकोनं आम्हांला व्हिचेन्झा स्टेशनवर सोडलं. रात्रीचे अकरा वाजले होते. सव्वाबारापर्यंत व्हेनिसला पोचून बारा पस्तीसच्या ट्रेननं आम्ही रोमला जाणार होतो.

***

## रोम म्हणजे मायकेल अँजेलोचं वास्तुशिल्प

आम्ही पहाटे पाच पंचेचाळीसला रोम टर्मिनीला उतरलो. गाडीतच तोंड धुणं वगैरे आटोपून घेतलं होतं. मी नाइलाजानं 'कापुचिनो' नावाची इटालियन कॉफी घेतली. ही पण कडूच होती. खास इटालियन कॉफी म्हणजे तर कडूपणाचा कळसच. तोंड इतकं कडू झालं, की शेवटी मी लाडू खाल्ला. लाडू खाऊन झाल्यावरही कॉफीचा कडूपणा आठवतच राहिला. आमची साडेआठची टूरची तिकिटं काढायची होती; पण ते ऑफिस सातला उघडणार होतं. मग तिथंच कट्ट्यावर बसून रोम पाहत बसलो.

बसल्या बसल्या व्हिट्टोरिओ डि सिकाच्या 'बायसिकल थीफ' या चित्रपटाची आठवण झाली. या नितान्तसुंदर चित्रपटात; तो तरुण, त्याची स्वत:ची सायकल चोरीला जाते व सायकलीशिवाय नोकरी मिळण्याची शक्यता नसल्यानं तो दुसऱ्याची सायकल चोरतो, तेव्हा ती चोरी उदात्त होऊन जाते. पण एरवी रोममध्ये चोऱ्यांचा प्रचंड सुळसुळाट आहे. काहींचा चोरी हाच प्रतिष्ठित धंदा आहे. फर्स्टक्लासचं तिकीट काढून सावज टिपलं जातं. पासपोर्ट चोरण्याचंही रॅकेट आहे, असं म्हणतात.

आमची बस बरोबर साडेआठला निघाली. रोमची ऐतिहासिक महत्त्वाची ठिकाणं शहराच्या मध्यवर्ती भागातच आहेत. मध्ये डांबरी रस्ते व शेजारी जुने अवशेष. सात टेकड्यांची ही राजधानी आहे.

आम्ही प्रथम 'पिआझा व्हेनाझिया' या चौकात गेलो. इथ 'पॅलेझी व्हेनेझिया' हा पूर्वीचा राजवाडा आहे. आता त्याचं कलादालनात रूपांतर केलं आहे. पूर्वी इथं पोप राहत. आता ते व्हॅटिकन सिटीत राहतात. त्यापूर्वी व्हेनिसचे ड्यूक या राजवाड्यात राहत. याच वाड्याजवळ 'सेंट मार्क बॅसिलीका' हे चर्च अहे. इथं इटालियन चित्रकारांच्या कलाकृती दिसतात.

याच चौकात 'अल्टर डेला पॅट्रिआ' नावाचं व्हिक्टर इमॅन्युअल सेकंड ह्याचं अतिभव्य स्मारक आहे. संगमरवरी उंच, भव्य नि पक्क्या बांधणीचं हे स्मारक मनात भरतं. व्हिक्टर इमॅन्युअल सेकंड ह्याचा घोड्यावरचा पुतळा ब्रॉन्झचा आहे व हा पुतळा सर्वांत उंच जागी आहे. शंभर एक पायऱ्यांवर हा पुतळा आहे. इटलीसाठी प्राणत्याग केलेल्या इतर सैनिकांचे पुतळेही बाजूला आहेत.

फेदरिको म्हणाला, त्या प्रकारचा रोमन संदेश देणारा पुतळा ह्याच चौकात आहे. पुतळा

बनवला नि सोडून दिला, असं नाही, तर त्याभोवती काही तरी कथा गुंफून देण्याची इटालियन लोकांची पद्धत असावी.

इथंच एक भव्य अशी संगमरवरी इमारत आहे. तीवर नाजूक नक्षीकाम केलेले आहे. व इमारतीच्या वर घोड्यांच्या रथावर दोन ब्रॉन्झचे पुतळे आहेत. एक स्वातंत्र्यदेवतेचा व दुसरा एकता (Unity) ह्या देवतेचा पुतळा आहे.

## <u>ट्रेव्ही एक सुंदर कारंजे :</u>

गाईडनं जाता जाताच रोमन वॉल, काही कारंजी व इटालियन अध्यक्षांचं निवासस्थान दाखवलं. एका कारंज्यात घोड्याचा पुतळा होता. त्याच्या, म्हणे, एका नाकपुडीतून वाईन व एका नाकपुडीतून पाणी वाहत असे. रोमला सध्या पाण्याचं दुर्भिक्ष आहे; पण पाणी नसलेली कारंजी मात्र भरपूर आहेत. आम्ही रोमन एम्बसीतून आमच्या एका होस्टला फोन केला होता. तेव्हा ती म्हणाली, आमच्या इथं पाणी नाहीये. तुम्ही झोपायला या; पण आंघोळीला पाणी मिळणार नाही. आम्ही नंतर, 'फाऊंटन वा ट्रेव्ही' (Trevi) इथं उतरलो. हे अतिशय सुंदर कारंजं आहे. ती वास्तू चकित नजरेनं आम्ही पाहत राहिलो. 'नीलोलासार्दी' ह्या वास्तुशास्त्रज्ञानं १७५५ मध्ये हे बांधलं. पायऱ्या उतरून ह्या कारंज्याशी गेल्यावर नजरेत भरतं; ते समोरचं झुळझुळतं पाणी आणि त्यामागचं शिल्प.

मध्यभागी पिळदार शरीराच्या देखण्या माणसाचा पांढरा संगमरवरी पुतळा आहे. हा खूप मोठा आहे. ह्याचं नाव नेपच्यून. त्याच्या शेजारी दोन त्याहून लहान पुतळे आहेत. ते अनुक्रमे विपुलता (ॲन्डन्स) व आरोग्य (हेल्थ) देणाऱ्या देवतांचे अत्यंत देखणे व पिळदार अंगाचे पुतळे आहेत. रोमन पुतळ्यांचे विशेषत्व हे आहे की, त्यातील पुरुषांचं शरीर पिळदार आणि उठावदार स्नायू असलेलं असतं. हेही शिल्प तसंच आहे. हे सारंच काम पांढऱ्या संगमरवरी दगडातलं आहे. त्याच्या खाली डाव्या बाजूला मस्तवाल घोड्याला ताब्यात घेत रोमन माणूस शक्ती दाखवतो आहे, तर उजव्या बाजूला पिळदार अंगाचा रोमन माणूस, खवळत्या घोड्याला एका हातानं ताब्यात घेत आहे. तर त्याचबरोबर दुसऱ्या हातानं शंख वाजवतो आहे.

ह्या सुंदर वस्तूसमोर कारंज्याचं झुळझुळतं पाणी तलावासारखं वाहत असतं. हे पाणी इतकं स्वच्छ आहे, की त्याचा तळही दिसतो. त्या तळाशी किती तरी नाणी पडलेली दिसतात. रोज किती तरी माणसं ह्या ट्रेव्हीला भेट देत असतात. त्या तलावाकडे पाठ करून नाणी टाकत असतात. ह्या नाणी टाकण्यासंबंधीही सुंदर कल्पना गुंफलेली आहे. १) एक नाणं टाकलं, की माणूस परत ट्रेव्हीला भेट देतो. २) दोन नाणी टाकली, की प्रेम जमतं. ३) तीन नाणी टाकली की, यू आर् द बिग बॉस. तुम्हांला प्रचंड अधिकार प्राप्त होतो.

इटलीतल्या चोरानं आमचे पासपोर्ट व थोडे पैसे चोरल्यानं आम्ही ट्रेव्हीला परत भेट देण्याच्या मूडमध्ये नव्हतो. त्यामुळं आम्ही नाणी टाकलीच नाहीत व बिचाऱ्या ट्रेव्हीला दोन नाण्यांचा तोटा पत्करावा लागला.

नाणं न टाकताही मला ट्रेव्हीला परत भेटण्याचा योग आला. तेव्हा हे भविष्य बहुधा उलटच घडतंय, असं वाटून, मी आपलं एक नाणं टाकलं, आमच्याबरोबरच्या संकेत नावाच्या भारतीय प्रवाशाला इटालियन मुली अतिशय आवडल्या. स्वर्गीय पंतप्रधान राजीव गांधी यांनी ज्याप्रमाणे सोनियाशी लग्न केलं, त्याप्रमाणे इटालियन मुलीशी लग्न करायची संकेतची इच्छा असल्यानं,

संकेतनं दोन नाणी टाकली. थोडक्यात पाश्चात्त्य अंधश्रद्धेला भारताचा उदार हातभार.

नंतर पॉथियान ह्या देवळापाशी आम्ही आलो. वास्तविक हे चर्चच आहे. २००० वर्षांपूर्वी हे टेंपल म्हणून बांधलं गेलं आणि नंतर त्याचे चर्चमध्ये रूपांतर झालं. सर्व बांधकाम बारीक विटांचं आहे. ह्या घुमटाची उंची १४३ फूट आहे. ह्या घुमटाच्या छतावर, हवा व उजेडासाठी फक्त मोकळी जागा आहे. या पोकळ जागेतून येणारं पावसाचं पाणी वाहून जाण्याची व्यवस्था अजूनही चालू आहे. स्थापत्यशास्त्राची ही त्या वेळची प्रगती पाहून प्रचंड आश्चर्य वाटलं. इथल्या दारासमोर लावलेले संगमरवरी खांब लक्ष वेधून घेतात. हे ऐवढे मोठे सलग खांब इजिप्तमधून आणले. डोमचा दरवाजा अतिभव्य व मोठा आहे. आतमध्ये चित्रकार रॅफेलची समाधी आहे.

१५४६ ते १५५० ह्या काळात मायकेल अँजेलोने तयार केलेला 'कॉल्बिडॉग्लिओ' हा चौक लागतो. ह्या चौकाच्या मध्यभागी मार्क्स ॲटिलस ह्याचा पुतळा व त्याच्या बाजूला टायबर व नाईल नद्यांचे पुतळे आहेत. रोममध्ये अनेक नद्या असल्यानं तो नद्यांचा प्रवेश म्हणूनही प्रसिद्ध आहे. नंतर सिनेटर्स पॅलेस लागतो. तो तेराव्या शतकात बांधण्यात आला. ह्याच मनोऱ्यावर मोठी घंटा आहे. २१ एप्रिल या दिवशी व नाताळात ती वाजविली जाते. पीटर स्क्वेअर, रोमन म्यूझिअम दिसतो. म्यूझिअमच्या शेजारी अल्टर ऑफ नेशन हे संगमरवरी दगडांनी बांधलेलं अतिसुंदर स्मारक आहे.

## व्हॅटिकन सिटी

शेवटी व्हॅटिकन सिटी ह्या राज्यात गेलो. इथं जायलाही व्हिसा लागतो. पण पैसे दिले, की तो चोरालाही मिळतो. इथं पैसे व पासपोर्ट संभाळायला पावलानं सांगितलं होतं. पैसे जमले, पण पासपोर्ट दुसऱ्यांचाच चोरावा, असं वाटू लागलं. व्हॅटिकन सिटीचं चलनही वेगळं. स्टॅंप्स वेगळे. हे एक सर्वस्वानं वेगळं राज्य आहे. व्हॅटिकन सिटीचा वकीलही रोममध्ये आहे. इथल्या 'सुवेनियर शॉप'मधून वस्तू खरेदी करायला सांगितल्या. त्या वस्तू अस्सल असतात, हेही सांगितलं; पण जगभर टच्यूरिस्ट बसचा अशा ठिकाणी हप्ता असतो, हे आम्हांला माहीत होतं.

सेंट पीटर्स चर्चचा चौक अति प्रचंड आहे. हा जगातील सर्वात मोठा असा चौक आहे. ह्याला पीटर प्लाझा म्हणतात. आवारात प्रवेश केल्याबरोबर एक गोलाकार चौकाभोवती रोमन पद्धतीच्या २८४ कमानी आहेत. आणखी पुढं साधारण पंधरा - वीस फुटांवर तशाच कमानी आहेत व त्या वरून झाकलेल्या आहेत. त्यांवर देवदेवता व संत ह्यांचे १४० पुतळे आहेत. ह्यांच्या मध्यभागी एक स्तंभ आहे व अनेकानेक ख्रिश्चनांचा बळी देणाऱ्या नीरोच्या स्तंभावर ख्रिश्चनांचा मोठा क्रूस आहे. तो क्रूस नीरोच्या नाकावर टिच्चून उभारल्यासारखा वाटतो. म्हणजे एका गालावर थप्पड मारली असता, दुसरा गाल कुणीही पुढं करीत नाही. शिवाय देवा - ब्राह्मणावर (पोपवर) विश्वास ठेवणारे असंख्य लोक तिथंही आहेतच.

ह्याच चौकात पोप पॉल दुसरे ह्यांच्यावर एका माथेफिरूनं गोळ्या झाडल्या, ती जागा दाखवतात. पोप पॉल त्यातून बचावले; पण आता ती जागा हजारो ख्रिश्चनांचं श्रद्धास्थान झालं आहे.

सेंट पीटर्स चर्चकडे जाण्यासाठी अनेक पायऱ्या चढाव्या लागतात. इथं उंचच उंच स्तंभ लागतात. तिथंच एका ठिकाणी पाचवे पॉल ह्यांचं नाव कोरलं आहे. तिथल्याच मधल्या खिडकीतून पोप चौकातील लक्षावधी भक्तांना आशीर्वाद देतात. प्रत्येक ख्रिश्चन मनुष्य इथं

आशीर्वाद घेण्यात स्वत:ला धन्य मानतो. 'ख्रिस्ताला रिटायर करा' म्हणायची इथं कुणाची ताकद नाही.

सेंट पीटर्स चर्चला ब्रॉन्झमधला 'होली डोअर' हा दरवाजा, फक्त धार्मिक सणांच्या दिवशीच उघडला जातो. 'सेंट पीटर' हा पहिला रोमन कॅथॉलिक धर्मगुरू. देव खूश झाला व त्यानं सेंट पीटरला स्वर्गाच्या चाव्या दिल्या, म्हणून त्याच्या हातात सदैव चाव्या दिसतात. तर सेंट पॉलना देवानं टेन कमांडमेंट्‌ची पुस्तकं दिली, म्हणून त्यांच्या हातात सदैव पुस्तक असतं. सेंट पीटरची गादी चालवणारा व्हॅटिकन सिटीतला धर्मगुरू पोप हा कॅथॉलिक लोकांचा सर्वोच्च धर्मगुरू व 'सेंट पीटर्स चर्च' हे जगातील पहिल्या मानाचं चर्च. सर्वांत मोठं व आपल्या सौंदर्यानं मोहून टाकणारं. इथं वास्तुशिल्पाचं अनोखं दर्शन घडतं. बर्नोनी ह्या वास्तुशास्त्रज्ञानं या चर्चचा आराखडा केला.

आतली मोझॅक पद्धतीची चित्रं पाहताना मंत्रमुग्ध व्हायला होतं. मोझॅक बारीक टाईल्सवरची नैसर्गिक रंगांतली चित्रकारी बारीक टाईल्स एकमेकांना चिकटवून बसवल्यानं त्या टाईल्स आहेत, हे लक्षात येत नाही. त्यांतले रंग इतके ताजेतवाने वाटतात, की ती चारशे वर्षांपूर्वीची चित्रं आहेत, हे खरंही वाटत नाही. चित्रकारी केलेलं छत पाहायचं, शिल्पं पाहू, की चित्रं पाहू, हे मुळी समजेनासंच होतं. नि चर्चची वास्तू तर प्रचंड ऐसपैस आहे. चर्च बनवताना जगातल्या अनेकानेक कलावंतांना बोलावलं होतं. त्यांत मायकेल अँजेलो हा सर्वांत महत्त्वाचा.

मध्यभागी सोनं व ब्रॉंझपासून बनवलेली वेदी आहे. बर्नानीनं ह्याचं डिझाईन केलं. वेदी पाहत असताना जणू दिवाळी साजरी होते आहे, असं वाटतं. सोनेरी कमानदार दांडयांच्या टोकांशी समयांसारखे तीन तीन दिव्यांचे गुच्छ प्रकाशमान झालेले आहेत, तर अधून मधून सोन्याचे कलश दिसतात. हे सोन्याचं छत २६ मीटर व्यासाचं आहे व ह्या वेदीची उंची ८० मीटर आहे. आपण भारून गेल्यासारखं पाहत राहतो. तेवढ्यात आपल्याला मायकेल अँजेलोची चित्रं दाखविली जातात. छतावरची चित्रकारीही आपण पाहतच असतो. मायकेल अँजेलो इथं आपल्याला भारूनच टाकतो. ते सारं खूप खूप वेळ पाहत राहावं, असं वाटतं; पण वेळ थोडा असतो.

सेंट पीटरचं स्मारकही पाहायला मिळतं. हातात किल्ल्या घेतलेला सेंट पीटर दिसतो. ह्या प्रचंड चर्चमध्ये एकंदर १२० वेदी आहेत. त्याही पाहाव्या वाटतात. मोठमोठी पेंटिंग्जही पाहावी वाटतात. पण मुख्यत: मायकेल अँजेलो आपल्याला पूर्णपणे भारून टाकतो. आपल्याला इथून हलणंच अशक्य आहे, असं वाटू लागतं. ह्याच ठिकाणी सेंट पीटर ह्या धर्मगुरूला मारलं होतं नि पुढं ख्रिश्चनांची जीत झाली नि त्याच ठिकाणी 'सेंट पीटर्स'चं भव्य चर्च साकार झालं. डौलानं उभं राहिलं. आपल्या कलावैभवानं चकित करत राहिलं. इथं रक्त वाहिलं, त्याच ठिकाणी रक्ताला चैतन्य प्राप्त झालं.

ह्या चर्चचे रक्षक स्वित्झर्लंडहून येतात. त्यांच्या पोशाखाचं डिझाईनही मायकेल अँजेलोचंच. पगडीवजा काळी टोपी. निळ्या व पिवळ्या पट्ट्यांचा ड्रेस. त्यात अधून मधून लाल पट्टे आहेत. शर्टाची कफलिंक्ज लाल व शर्टाची कॉलर पांढरी आहे. देखणे व तगडे स्विस रक्षक छान दिसतात. हे १००० आहेत.

शिल्पकार मायकेल अँजेलो मग आपल्याला शिल्पांतून भेटू लागतो. मोझेस, डेव्हिड वगैरे शिल्पं आपण तन्मय होऊन पाहत असतो. तोच येशूचं मृत शरीर घेतलेलं मेरीचं शिल्प मंत्रमुग्ध

करतं. मेरीच्या डोळ्यांतील करुणा इतकी हुबेहूब साकार झाली आहे, की ते डोळे पाहून जीझसला मारलं, ह्याचं अतीव दु:ख वाटतं, तर दुसऱ्या क्षणी मेरी आता जगाला प्रेमाचा संदेश देणार आहे, असं वाटू लागतं. मातेचं सारं वात्सल्य, सारी करुणा त्या डोळ्यांत ओतप्रोत होते. त्याचं हे पिएटा शिल्प बुलेटप्रूफ काचपेटीमध्ये आहे. कारण आठ-दहा वर्षांपूर्वी हे जगप्रसिद्ध शिल्प एका माथेफिरूनं फोडण्याचा प्रयत्न केला. मायकेल अँजेलोनं हे शिल्प वयाच्या २४ व्या वर्षी बनवलं. तो शिल्प बनवून जगप्रसिद्ध झाला, तर ह्या माथेफिरूला ते तोडून जगप्रसिद्ध व्हायचं होतं ? खरं तर, मेरीचं, म्हणजे बाईचं शिल्प त्याला पसंत नव्हतं.

जवळच असलेल्या 'व्हॅटिकन पॅलेस' ह्या अनेक इमारतींतील एका इमारतीत पोप राहतात. बाकीच्या इमारतींत मौल्यवान चित्रं, धार्मिक पुस्तकं वगैरे गोष्टी आहेत. एका इमारतीत अनेकानेक मौल्यवान वस्तूही पाहायला मिळतात. पोपनं हात लावलेल्या वस्तू जरा महाग भावात बाहेर विकायला असतात.

पहिली टूर आटोपल्यावर आम्ही खाणंपिणं केलं नि मग भुयारी रेल्वेनं कोलोझियमच्या दारात पोचलो. रोमा टर्मिनी ह्या स्टेशनवरचं इथं कसं जायचं वगैरेची संपूर्ण माहिती मिळते.

## तीन टेकड्यांमधील कोलोझियम्

कोलोझियम ही वास्तू ४००० वर्षांपूर्वी बांधलेली आहे. हे अति प्रचंड स्टेडियम आहे. कोलोझिअस ह्याचा अर्थ अतिप्रचंड. इथंच सम्राट नीरोचा अतिप्रचंड पुतळा होता. हे स्टेडियम लंब वर्तुळाकार असून चार मजली आहे. अर्थात ह्या स्टेडियमची बरीच पडझड झाली आहे. तरीही आता आहे ह्या स्थितीत पण त्याची भव्यता लक्षात येते. ह्या स्टेडियमला अनेक नक्षीदार खांब आहेत. त्या काळचे सम्राट माणसांचा वध पाहण्यासाठी ह्या स्टेडियममध्ये जमत, हे ऐकून अंगावर काटा उभा राहिला. आम बायकांना मात्र उभं राहूनच पाहायला मिळायचं. इतरांना त्यांच्या इतमामाप्रमाणे आसन असे.

मनुष्यवध पाहण्यासाठी हे सम्राट त्यांच्या पदरच्या गुलामांची विविध स्पर्धा लावत व स्पर्धेतील एकाचा मृत्यू हा होतच असे. हातांत भाले घेऊन योद्धे घोड्यावरून येत व एकमेकांना छातीत भोसकून मारून टाकत.

मात्र तिथं एक चांगलं आहे. तिथं कधी जातिव्यवस्था नव्हती. त्यामुळं ते गुलाम अमुक जातीचे होते, असं सांगून, त्यांना आता सूड उगवता येणं शक्य नाही.

कधी कधी मधल्या पाण्यात हौदात पाणी सोडून त्यात जहाजं सोडली जायची. त्यात एका बाजूला कैदी असत व एका बाजूला गुलाम असत. त्या दोघांत युद्ध होऊन एकमेकांना मारून टाकलं जायचं व जी बाजू जिंकेल, त्यांची मुक्तता केली जायची. स्वत:ची मृत्यूपासून मुक्तता व्हावी, म्हणून हे युद्ध प्राणपणानं खेळलं जायचं नि त्यातून होणारा माणसांचा मृत्यू आणि रक्ताचे पाट, सम्राट अत्यंत आनंदात पाहत.

आणखीही एक रक्तपाताची पद्धत होती. इथं नि:शस्त्र गुलाम सोडले जात व त्यात उपाशी वाघ व सिंह पाठवले जात. कुणी तरी एक मेल्याशिवाय हा खेळ संपत नसल्यानं गुलामांना वाघ व सिंह फाडून खात नि ते दृश्य पाहताना सम्राटांना अतोनात आनंद होई. माणसाचं मरणं पाहण्याचा सोहळा बघणं, असा हा क्रूर आनंद असे. रोम जळत असताना फिडल् वाजवणाऱ्या नीरोसारखे सत्तांध व त्यांची ही वास्तू.

## रोमन फोरम

कोलोझिअमच्या समोरच भव्य कमानीचं 'रोमन गेट' दिसतं. अशी सव्ञ गेट्स रोममध्ये आहेत. रस्ता ओलांडला, की 'रोमन फोरम' लागतं. फोरम म्हणजे खुलं व्यासपीठ. दोन हजार वर्षांपूर्वी हे व्यासपीठ जाहीर सभांना वापरलं जात असे. आता ह्या ठिकाणी अधून मधून रोमन पद्धतीचे उंच नक्षीदार खांब दिसतात. अनेक संगमरवरी कमानी व देवळांचे सांगाडेही दिसतात. मात्र दोन हजार वर्षांपूर्वी न्यायदान, देवळं, व्यासपीठ, राजवाडा वगैरेंनी हा 'रोमन फोरम' गजबजलेला असे. जवळ जवळ दोन चौरस मैल व्याप्ती असलेलं हे ठिकाण म्हणजे राजेलोकांचं राहण्याचं ठिकाणही होतं. राजवाड्याचा काही भाग व सैन्यासाठी बांधलेले भुयारी रस्ते आपल्याला अलगद त्या काळात नेतात. अनेक लोक बसू शकतील, असं सिनेट व त्याचं व्यासपीठ, राजवाड्याच्या दारातून दिसावं, असं बांधलेलं आहे. शनीच्या (सॅटर्न) देवळाच्या भव्य कमानी आजही दिसतात. युद्ध चालू असताना राज्याचा खजिना ह्या देवळात ठेवला जाई व त्या काळी देवाची भीती वाटत असल्यानं खजिना सुरक्षित राही. अशी ही समृद्ध संस्कृती ! नि त्यासमोरच कोलोझिअमची इमारत उभी राहणं म्हणजेच संस्कृतीला माज चढणं. नि मग त्याची उतरती कळा हे ओघानंच आलं. हे सारं पाहताना रोमन साम्राज्य, ज्यूलिअस सीझर त्याचं 'ब्रूटस्, यू टू ?' हे वाक्य. धर्मसंस्था व राज्यसंस्था यांतील मतभेद नि धर्माला मिळालेलं उच्चतम स्थान हे आठवतं नि त्याच्याच बरोबर कोलोझिअममधले सत्तांध सम्राट आठवतात. नि ते सारं पाहताना आपणही त्या काळात पोचतो. संस्कृतीची देखणी रूपं आठवताना मन आनंदी होतं. तर कोलोझिअमचं ते रौद्रभीषण रूप नजरेसमोर येतं नि अंगावर काटा येतो.

## बाथ्स् ऑफ कॅराकेला

येता येता आम्ही 'बाथ्स ऑफ कॅराकेला' पाहिली. इथं गरम, कोमट व थंड अशी विविध पाण्याची कुंडं आहेत. इथं सामुदायिक स्नान होत असे. मला जयपूरच्या 'सहेलियों की बाडी'ची आठवण झाली. तिथं जयपूरच्या महाराजांची मुलगी व तिच्या मैत्रिणी स्नान करत असत. मात्र रोमची ही स्नानगृहं जास्त मोठी व भव्य आहेत. ह्याच वास्तूत वाचनालय, व्यायामशाळा व उद्यानं पण आहेत. इथलं उद्यान जयपूरच्या उद्यानापेक्षा जास्त शोभिवंत होतं.

रोममधल्या बसेस्मध्ये बरीच माणसं घुसत होती. आम्ही आमचं तिकीट तिथं असलेल्या मशीनमध्ये टिक केलं. दुकानातूनही बसची तिकिटं मिळतात. ते तिकीट बसमधल्या मशीनमध्ये टिक करावं लागतं. तिकीट टिक केलं नाही, तर दंड होतो व पकडले गेलो, तर चारपाचशे रुपयांचा भुर्दंड पडला असता. स्वित्झर्लंडमध्ये प्रत्येक मनुष्य ह्या मशीनमधून आपलं तिकीट टिक करायचा; पण इटलीमध्ये चोरगिरी दिसली. अर्थात पकडले गेल्यावर छानसा भुर्दंडही भरत असतील.

व्हेनिसा, व्हिसेंझामध्ये माणसांचा शुकशुकाट जाणवतो. पण रोममध्ये मात्र छान गर्दी होती. उलट, मिलानो हे शहर आपल्या इथल्या फोर्टसारखं वाटलं. अर्थात मुंबईसारखी माणसांची गर्दी व घाण जगात कुठं नसेल. मिलानो फोर्टसारखं दिसतं, असं मी म्हणते; पण हा फोर्ट विभाग वीस वर्षांपूर्वी जसा स्वच्छ दिसायचा, तसा मिलानो भाग दिसतो. मात्र इटलीत मोठ्या

शहरांतून लंडनसारखी लाकडी घरं कुठं दिसली नाहीत.

रात्री व्हेनिसला जाणाऱ्या गाडीत बसलो आणि लंडन, जर्मनी, हॉलंड वगैरे व्हिसांची काळजी वाटू लागली. रोम पाहताना खूप आनंद झाला होता नि आता व्हिसा मिळणार का ? ही काळजी वाटत होती. 'तुम्हांला व्हिसा नक्की मिळणार' असं गोड हसत पावला, आम्हांला वारंवार सांगायची नि धीर द्यायची. तिनं रोम व व्हेनिस पाहायचा आग्रह केला, म्हणून आम्ही ही दोन्ही शहरं पाहिली, नाही तर पार गळपटून गेलो होतो. उद्या काय घडणार आहे, हे संपूर्ण अंधारात होतं.

## प्रेमळ जर्मन अधिकारी

रोम शहरं पाहून झालं आणि आम्हांला खूप आनंद झाला. मंगळवारी लगेचच आम्ही लंडन व्हिसा आणायला गेलो व लंडन व्हिसा मिळाल्याबरोबर जर्मन व्हिसा आणायला जर्मन एम्बसीत गेलो. त्या वेळी बाराला दहा मिनिटं कमी होती.

जर्मन एम्बसीत खिडकीशी जाऊन स्वातीनं विचारलं.,

'आम्हांला व्हिसा लगेच मिळू शकेल का ?'

आमच्या चेहऱ्यावर 'दया करो'चे सारे भाव एकवटले असावे.

जर्मन अधिकाऱ्यानं आम्हांला दोन फॉर्म दिले व अत्यंत ममतेनं तो म्हणाला,

'आधी फॉर्म तर भरा.'

आम्ही फॉर्म भरून दिला. नंतर एक ते दोन लंच-टाईम होता. त्या वेळी आम्ही बाहेर एका झाडाखाली बसून ब्रेड, बटर खाऊन घेतलं. लाडू खाल्ला. पाणी प्यालो व दोन वाजण्याची वाट पाहत बसलो. दोन वाजता आम्ही एम्बसीत गेलो, तर दहा एक मिनिटांनी आमच्या हातांत जर्मन व्हिसा आला. आमचा जर्मनीशी काय ऋणानुबंध होता, कोण जाणे ! स्वित्झर्लंडमध्ये सारे प्रेम करणारे जर्मन होते, तर नंतर अमेरिकेत जी जी प्रेमळ लोकं भेटली, ती सारी नेमकी जर्मन होती !

## प्रेमळ पावला

आम्ही घरी गेल्यावर पावलाला जर्मन पासपोर्टची बातमी सांगितली. आमच्याप्रमाणेच फेदरिको व पावलाला खूप आनंद झाला.

'आता हॉलंडचा आणि ऑस्ट्रियाचा व्हिसा ट्राय करायचाय्...' मी म्हणाले.

'जर्मनीचा व्हिसा मिळाल्याबरोबर ऑस्ट्रियाचा व्हिसा ते देणार आहेत. फक्त आता हॉलंडचा व्हिसा मिळणार, की नाही, ते पाहायचंय्...' स्वाति म्हणाली.

'हॉलंडचा व्हिसा नक्की मिळणार !' पावला गोड हसत म्हणाली.

पावला म्हणजे प्रेमाचं कारंज होतं.

असा दिलासा पावला दर वेळी द्यायची; पण ते एवढंच नव्हतं. वास्तविक सर्व्हास होस्टकडे दोनच दिवस राहवं, असा संकेत असल्यानं, पावलाकडे जास्त दिवस राहणं, आम्हांला अवघड वाटत होतं. पण पावलानं ते सारं ओळखून सांगितलं होतं,

'तुम्हांला सर्व व्हिसा मिळेपर्यंत तुम्ही खुशाल राहा. तुम्हांला आम्ही, राहा म्हणून सांगितलं; पण त्याचप्रमाणे तुम्ही पण आम्हांला प्रेम दिलं आहे. कामांतही आम्हांला मदत केली आहे.

आम्हांला तुमचा सहवास खूप आवडतो आहे.'

'पण जास्त दिवस राहण्याचे तू आमच्याकडून पैसे घे ना.' मी धीर एकवटून म्हटलं.

'नाही, नाही. पैसे मात्र नक्कीच घेणार नाही. नि तुम्ही नंतरही पाठवायचे नाहीत. नाही तर मला खूप वाईट वाटेल.'

अशी प्रेमळ माणसं भेटणं ह्याहून आनंदाचे क्षण आयुष्यात असू शकतात का ? .. माझं मन आनंदविभोर झालं. अर्थात फोनचे पैसे परत पाठविताना ते अधिक पाठविले.

## इटलीत आयुर्वेद

जेवण झाल्यावर रात्री आम्ही कॉम्प्यूटरवर गेम खेळत बसलो. फेदरिको त्यात अगदी एक्सपर्ट आहे. तो खेळत असताना पाहतानाही मजा वाटत होती. स्वाति जरा पेंगुळलेली वाटत होती. अंगाला हात लावला, तर ताप होता. तिला तापाची गोळी दिली आणि आम्ही झोपलो.

पण रात्री ती कण्हत होती. अंगाला हात लावला, तर अंग चांगलं कढत वाटत होतं.

'तू आणखी एक गोळी घे.. ' मी म्हटलं नि दिवा लावून गोळी शोधू लागले...

पावलाही त्या वेळी उठली होती. तिनं, 'काय झालं ?' म्हणून प्रेमळपणे विचारलं.

'स्वातीचा तापा वाढलाय् नि गोळी सापडत नाहीये.'

'मी एक हर्बल काढा देऊ ?' पावलानं विचारलं.

रात्री तिनं तिच्याकडच्या वनस्पती पाण्यात उकळल्या व त्यांचा काढा प्यायला दिला. दोन तासांनीच स्वातीला दरदरून घाम आला नि ताप उतरला. माझ्या मनावरचा केवढा तरी मोठा ताण दूर झाला. सकाळी पावलाला स्वातीचा ताप गेलेला कळलं, तेव्हा तीही आनंदित झाली नि स्वातीला म्हणाली,

'उगाच मनावर टेन्शन घेऊ नको. त्यामुळं ताप येतो आहे.'

कोणताही ताण, पावलासारखी दिलासा देणारी भेटल्यावर राहीलच कसा ?

बुधवारी आम्हांला ऑस्ट्रियाचा पास मिळाला व गुरुवारी हॉलंडचा पास मिळाला.

## पंख्याचा शोध भारतात लागला ?

रात्री जेवणात वेगळेपण होतं. आज पावलानं एक वेगळा प्रकार केला होता. स्पॅघेटीचाच प्रकार, पण बकुळीच्या फुलांसारखा त्यांचा आकार होता लसणीचा सुरेख वास येत होता. फेदरिकोनं हिरवे बीन्स आणले होते. त्यांची उसळही छान लागत होती.

उसळीचं कौतुक करत मी म्हटलं,

'तुमच्या इथं पण भोंगी मिरच्या लाल, केशरी, पिवळ्या वगैरे रंगाच्या पाहिल्या. कोबी व फ्लॉवर पण जांभळे व हिरवे पाहिले. प्रथम स्वित्झर्लंडला अशी रंगीबेरंगी भाजी पाहिली. तेव्हा मला फार आश्चर्य वाटलं. आता इटलीत रंगीबेरंगी भाज्या पाहताना मला आश्चर्य वाटलं नाही.'

तेव्हा पावलाच्याच चेहऱ्यावर आश्चर्य उमटलं नि तिनं आश्चर्यानं विचारलं,

'कॅप्सिकम (भोंगी मिरची) लाल, जांभळ्या व केशरी रंगांत, खरंच असतात?'

'तू पाहिली नाहीस?' मी आणखीनच आश्चर्यचकित होत म्हटलं.

'नाही.' पावलाच्या चेहऱ्यावर आश्चर्य होतं.

मग मी तिला कोबी व पालेभाज्यांचेही विविध रंग, मिलानोतचा पाहिले, असं सांगितलं.

'मी अजून त्या पाहिल्याच नाहीत.' हे बोलताना पावलाच्या चेहऱ्यावर आश्चर्य तसंच होतं.

स्वाति हात धुता धुता हसत म्हणाली,

'तशा तू इटलीतल्या साऱ्या एम्बसीज् पण आमच्याप्रमाणे पाहिल्या नसशील.'

(ते खरंच होतं. कारण युरोपियन माणसांना युरोपमध्ये हिंडायला व्हिसाची जरुरी नसते.)

स्वातीच्या बोलण्यावर आम्ही सारेच हसलो. मी एकदम म्हटलं,

'रोममध्ये काय अथवा मिलानोत काय, इन्डियन एम्बसीत पंखे होते. बाकी कुठंही पंखे कसे काय नव्हते ?'

'आमच्याकडे एखाद-दुसरा महिनाच उन्हाळा असतो, म्हणून आम्ही पंखे ठेवत नाही.' पावला म्हणाली.

इटलीत जुलै, ऑगस्टमध्ये म्हणजेच समरव्हेकेशनमध्ये दिवसा झकास उकडतं; पण रात्री मात्र थंड असतं.

## अखेरचा दिवस व शामुआ

गुरुवारी आम्ही रात्रीच जाणार होतो. त्यामुळं बुधवारची रात्र हीच आमची इटलीतली अखेरची रात्र होती. त्या दिवशी फेदरिकोनं त्याच्या विविधांगी वाद्यावर अनेक वाद्यं वाजवून दाखवली. आम्ही एकमेकांचे फोटो घेतले. त्या दोघांना आम्ही प्रेझेन्टस् दिली. ती त्यांना खूप आवडली.

ती दोघं उन्हाळ्याच्या सुट्टयांमध्ये आठ दिवसांसाठी फिरायला गेली होती. पूर्वेकडे असलेल्या आल्प्स पर्वतावर झोपडी बांधून राहिली होती. इटलीत खूप जणं असं जातात. सिस्टे कॅलेंडेच्या स्टेफिनानं आम्हांला तो प्रदेश पाहून यायला सांगितलं होतं. तो प्रदेश पाहणं शक्यच नव्हतं. पावलानं विचारलं,

'आम्ही आल्प्स पर्वतावर गेलो होतो, ती फिल्म पाहायची आहे ?'

'चालेल. पाहू या. फारच छान.' मी आनंदित होत म्हणाले. आमचा उत्साह पाहून, पावला व फेदरिको पण आनंदित झाले.

ही फिल्म पाहताना थेट स्वित्झर्लंड आठवत होतं. तीच ती पाईन, ज्यूनिपर, फर वगैरे वृक्षांची दाटी दिसत होती. डोंगर व ग्लेसिअर्स पुनःप्रत्ययाचा आनंद देत होते. तिथं एक छोटंसं तळंही दिसत होतं. नि त्याच्याजवळच पावला व फेदरिको ह्यांची झोपडी दिसत होती. तेवढ्यात शिंग असलेला, हरिणासारखा पण बोकडासारखं अंग असणारा एक प्राणी दिसला. मी पटकन विचारलं,

'हा शामुआ प्राणी का ?'

'हो.' पावला गोड हसत म्हणाली.

तेव्हा मी तिला स्वित्झर्लंडचे आमचे होस्ट हॅन्स पीटर आम्हांला प्राणी दाखविण्यासाठी किती धडपडले, ते सांगितलं व फिल्ममध्ये जसा तो व्यवस्थित दिसला, तसा तो प्रत्यक्ष दिसलाच नव्हता. फिल्म रिवाईंड करून आम्ही तो प्राणी परत न्याहाळला. हॅन्स पीटर प्रथम डोंगरावर तो प्राणी दाखवायचा प्रयत्न करत होते. पण तेवढ्यात 'मॅक' नावाचा उंदरासारखा

दिसणारा प्राणी मंजुळ आवाजात ओरडला व शामुआ लपून बसले.

आम्ही नंतर गप्पा मारत बसलो होतो. गप्पा मारता मारता, मी पावलाला विचारलं,

'तुमच्याकडे रोम वगैरे भागात आता आत्तापर्यंत हुंड्याची पद्धत होती. ती कशी दूर झाली?'

तेव्हा किंचित हसून ती म्हणाली,

'मुली सरसकट नोकरी करतात नि नोकरी करणाऱ्यांचे आईवडील हुंडा देत नाहीत.'

आपल्या इथं हे कधी घडेल ? (मुलीच्या आई-वडिलांनो, इकडे लक्ष द्या.)

मी नंतर तिला आपल्या इथल्या विवाहमंडळाची व सुधारलेल्या लोकांत मुला-मुलींना आपापलं जमवायला मुभा असते; पण ते जमलं नाही, तर आईवडील प्रयत्न करतात, हे सांगितलं, तेव्हा तिला ही पद्धत फार आवडली.

मी तिला विचारलं,

'एखादा मुलगा वा मुलगी लाजाळू असेल व त्यांचं त्यांना जमवताच आलं नाही, तर !'

'मग मित्र-मैत्रिणी पुढाकार घेतात.' पावलानं सांगितलं.

गप्पांतून एक लक्षात आलं, की इटलीत भारताप्रमाणेच जुन्या पद्धती होत्या. पण त्या जुनाट व त्रासदायक रूढींतून ते आता बाहेर पडत आहेत. मात्र लाचलुचपत, नेत्यांचा दिवाळखोरपणा अगदी भारतातल्याप्रमाणेच आहे. मात्र भारताच्या तुलनेत तिथली लोकसंख्या मात्र खूपच कमी आहे. त्यामुळं भारताच्या तुलनेत दारिद्र्य नाही. पण 'गर्द' वगैरे अमली पदार्थांचं प्राबल्य व चोऱ्या करणं मात्र अतोनात वाढलं आहे. चोऱ्या करणं इतकं टोकाला पोचलं आहे, की फर्स्टक्लासचं तिकीट काढून सुटाबुटात चोर चोऱ्या करतात व त्यांच्या तडाख्यातून परदेशी प्रवासी सुटणं, ही फार कठीण गोष्ट आहे. हंगेरी, रूमानिया, युगोस्लाव्हिया या देशांत कुठले विशेष उद्योगधंदे नसल्यानं बेकारी अतोनात आहे. ते लोक इटलीत येऊन अशा चोऱ्या करतात. मात्र रस्त्यावर घाण टाकणं हा आमचा जन्मसिद्ध हक्क आहे, ही वृत्ती इथं रुजलेली नाही. आपल्या इथं तसं झालं, तर 'कचरा मत फेको' हे टी.व्ही. फेम गाणं कसं सुचलं असतं बरं !

रात्र बरीच होऊ लागली, तेव्हा नाइलाजानं आम्ही उठलो. पण उद्या आता आम्ही जाणार, ह्याची रुखरुख त्या दोघांना वाटत होती. पावलानं ती रुखरुख बोलून दाखविली.

दुसरे दिवशी आम्हांला ऑस्ट्रिया, हॉलंडचा व्हिसा मिळाला व संध्याकाळी ती आनंदाची बातमी पावला व फेदरिकोला देऊन आम्ही ऑस्ट्रियाला प्रस्थान करण्यासाठी तयारी करू लागलो.

पावलाच्या घरातून निघताना आम्ही इतक्या भारावलो होतो, की पाश्चात्त्य पद्धतीनं एकमेकींची चुंबनं घेत एकमेकींना चक्क मिठ्याही मारल्या. (अर्थात सुरुवात पावलाकडून झाली, हे चाणाक्ष वाचकांनी ओळखलंच असेल !)

***

## इन्सब्रूक : एक स्वप्न

ऑस्ट्रियाला जाण्यासाठी आम्ही गाडीत चढलो; पण मोठ्या मुश्किलीनंच. उन्हाळ्याची सुट्टी असल्यानं तरुणांचे लोंढेच्या लोंढे प्रवासासाठी निघाले होते. व्हेरोना स्टेशनवरच चिकार

गर्दी होती व गाडी भरून येणार, ह्याचा अंदाज होताच. कारण ती गाडी मिलानोवरून येणार होती व व्हेरोना स्टेशनवरच एवढी गर्दी होती, तर मिलानोपासून अनेक स्टेशनांवरचेही लोक प्रथम गाडीत चढणार होते. वाटलं, त्याप्रमाणे गाडीत गर्दी होती, पण गाडीत चढायला तरी मिळालं.

फर्स्टक्लासचा पास असूनही त्यांतल्या त्यांत सेकंड क्लासमध्ये जागा मिळण्याची शक्यता असते, हे अनुभवानं शिकलो होतो. दोन वेगळ्या जागा आम्ही पकडल्या. अर्थात त्या जागाही अडवल्या होत्या. पण 'कुणी आलं, तर आम्ही उठू,' असं नम्रतापूर्वक आम्ही सांगितलं होतं; पण कुणीही आलं नाही. नंतर एक - दोन स्टेशनं गेल्यावर आम्हां दोघींना एकत्र जागा मिळाली.

भारतीय लोकांना शिस्त नाही, म्हणून आपण नावं ठेवतो; पण युरोपमध्येही शिस्तीचा अभाव दिसला. बूट घातलेले पाय समोरच्या सीटवर टाकून मुलं खुशाल झोपली होती. त्या अगोदर स्वातीनं नुसते सॉक्स घातलेले पाय समोरच्या सीटवर ठेवले, तर तिथल्या एका म्हाताऱ्या माणसानं 'पाय खाली ठेवावे' वगैरे मॅनर्स स्वातीला शिकवले; पण बाहेर सिगारेट ओढणारी ही मुलं आत आली व त्यांनी बुटांचे पाय समोरच्या सीटवर ठेवले, तर तो गृहस्थ चुपचाप राहिला. की त्याला त्या मुलांचे बुटाचे पाय येशू ख्रिस्ताचे वाटले ? आमच्या भारतीयांच्या मनातली लाचारी मात्र कधीच संपत नाही. त्यामुळं आम्ही हिप्पींकडे कौतुकानं पाहतो !

त्यानंतर आम्ही बाहेर पाहत होतो आणि इटलीच्या फळफळावळाच्या वैभवानं दंग झालो. द्राक्षांची व सफरचंदांची शेती मैलोन्‌मैल दिसत राहते. अगदी ऑस्ट्रिया येईपर्यंत, म्हणे, ही शेतं दिसतच राहतात. मधून मधून पसरलेले कलिंगड व पीचेस्‌ची झाडं पण दिसत राहत. मध्येच रेसिंग कारकरता प्रसिद्ध असलेले फरारी गाव लागतं. इथली अनेकानेक फळं साऱ्या युरोपभर जातात. म्हणून तर इटली हा पूर्वीच्या काळी सर्वांत वैभवसंपन्न देश होता.

अंधार पडला आणि त्या गच्च गर्दीत आम्ही छान डुलक्या घेत होतो. तेवढ्यात गाडी थांबली. ऑस्ट्रियाचे व्हिसा तपासणारे अधिकारी खाड खाड बुटांचा आवाज करीत प्रवेशले. चोर, दरोडेखोरांना विचारावं, त्या थाटामाटात व्हिसा विचारला. इटलीतून जर्मनीत थेट जायचं असेल, तरी गाडी ऑस्ट्रियातून जाणार असेल, तर ऑस्ट्रियन व्हिसा; व गाडी स्वित्झर्लंडवरून जाणार असेल, तर स्वित्झर्लंडचा व्हिसा घ्यावा लागतो. हे माहीत नसणारे नेमके पकडले जातात. अर्थात सर्व युरोपियन लोकांना सर्व युरोपात हिंडायला व्हिसा लागत नाही.

## प्रवासी म्हणजे राजे

थोड्याच वेळात इन्सब्रूक आलं. खाली उतरलो, तर स्वातीचा चश्मा गाडीतच राहिला होता. स्वाति खाली सामानाशी उभी होती व मी गाडीत चश्मा शोधत होते. बाकाखाली कुठ्ठं सापडेना. गाडीत ही ऽ गर्दी. तेवढ्यात मला बाकाच्या कडेच्या फटीत तो चश्मा मिळाला. इकडे गाडीच्या गार्डाला स्वातीनं मी डब्यात आहे, असं सांगितलं होतं. तो धांदल करायला लागला होता. तेवढ्यात मी उतरले. नि त्या गाडीनं मग 'ऑल ओके' अशी खूण केली. दरवाजे बंद झाले व गाडी जर्मनीकडे निघाली. इकडे स्टेशनवर गाडी इतकी मिनिटं वा तास थांबणं हा प्रकार नाही. प्रत्येक गाडीला चार-पाच गार्ड असतात. ते प्रवासी तिथंच कुठं चढायचा राहिलाय्‌ का किंवा गाडीत राहिला नाही ना, असं पाहतात नि गाडीला 'ओके' देतात. आपण पळत पळत गाडी गाठतोय्‌, तर ते थांबतात; पण कुठं तरी उतरून सावकाश खात पीत बसलात, तर

गाडी गेली ! सारे गार्ड प्रवाशांकडे सहानुभूतीनं पाहतात. मार्गदर्शनही करतात नि मुख्य म्हणजे हसतमुख असतात. गार्ड इतके चांगले असतात, हे समजायला परदेशात जावं लागलं. भारतात गार्ड हा फक्त झेंडे दाखवायला असतो, अशी माझी कल्पना होती.

## निळे डोंगर

इन्सब्रूकला उतरलो नि उतरल्याबरोबरच जवळच असलेले निळे डोंगर दिसत होते. छपराची उतरती घरं, उंच उंच झाडी थोडी निळसर वाटणारी नि तीत गुडूप झालेले डोंगर, फिरून आपण स्वित्झर्लंडला आलो आहोत, असं वाटलं. गिल्डरवाल्डला आलो आहोत, तसं वाटत होतं. उत्तरेला आल्प्स्च्या निळ्या नि संगमरवरासारख्या गतिमान स्वच्छ पांढऱ्या नोर्डेक (Nordketle) पर्वतरांगा आणि दक्षिणेला दहा हजार फूट उंचीच्या टक्सर पर्वतरांगा ह्यांमध्ये इन्सब्रूक होतं. लांबून निळे दिसणारे डोंगर जवळ गेल्यावर ते डोंगर हिरवे दिसू लागले. स्वित्झर्लंडप्रमाणेच इथले डोंगर उंचच उंच वृक्षांत झाकून गेले होते. लांबून ते डोंगर इतके झाकून गेलेले दिसतात, की माणसांना आत शिरकाव करताच येणार नाही, असं वाटतं. गवतात गाई व घोडे चरत बसलेले दिसले. सूर्य उगवत असल्यानं आकाशातही विविध रंग दिसत होते. ते अनोखं सौंदर्य आम्ही चकित नजरेनं किती वेळ पाहत होतो. डोंगर जवळ येऊ लागले, तशी पाईन, फर, ज्यूनिपरचं वेगळेपण नजरेत भरू लागलं. ह्या झाडांची पानं नाजूक नाजूक असतात; पण त्यांच्या फांद्या गच्च असतात. सर्वदूर ह्या नाजूक हिरवेपणाचं साम्राज्य पाहताना आपण परीकथेतील एक होऊन जातो. इन्सब्रूकला चांगला तास, दीड तास आम्ही नुसत्या मनमुराद हिंडत होतो. इथं अख्ख्या पाश्चात्त्य देशात धुळीचा कण काही कुठं उडत नाही. खूप झाडी, डांबरी रस्ते नि सततची थंड हवा ह्यांमुळं असेल; पण त्यामुळं सगळं स्वच्छ वाटतं. माणसांचे कपडेही स्वच्छ वाटतात. मुळात ते मळतच नाहीत. त्यामुळं खेड्यातील माणसांचे कपडे म्हणजे धुळीचा रंग चढलेले, हा प्रकार इथं नाही. सततच्या थंडीमुळं धूळ उडतच नाही. इथली बालकं फार गोड दिसली.

## इन्सब्रूक राजवाडा

ऑस्ट्रियातील इन्सब्रूक ह्या गावी कोणत्याही घरापासून डोंगर जवळ असतोच. शिवाय 'इन' नदी आपल्याला सतत भेटत राहते. 'इन्सब्रूक' म्हणजे इन नदीवरचा पूल. म्हणून ह्या शहराला 'इन्सब्रूक' हे नाव पडलं. इथला राजवाडा आम्ही पाहिला. हा राजवाडा 'टिरोलियन' संगमरवरात बांधला आहे.

'ह्या राजवाड्याच्या बांधण्याची पद्धतीला 'रोकोको स्टाईल' म्हणतात.' गाईड म्हणाला.

'इतर राजवाड्यांसारखा तर हा राजवाडा आहे. पण ह्याची काही तरी स्टाईल असतेच.' एकजण म्हणाला. तो महाराष्ट्रीयन असल्यानं जन्मजात फटकळपणा हवाच.

'स्टाईलिशपणा दाखविण्यासाठी ह्या पद्धती सांगितल्या जात नाही बरं ! अमुक एक पद्धत म्हटलं, की ती इमारत, नेमकेपणानं तुमच्या नजरेसमोर येते आता रोकोको पद्धत म्हटलं, की त्याला सोन्याचा मुलामा दिलेलं छप्पर असतं.' गाईड हसत हसत म्हणाला.

तेव्हा साऱ्यांची नजर सोनेरी छताकडे गेली नि आम्ही सारे एकदम उद्गारलो,

'सुंदर.'

हे छप्पर, सोनेरी विटा असाव्या, तसं चौकटीचौकटीचं दिसत होतं. त्यावर सूर्याचे किरण पडल्यानं झळाळत होतं आणि राजाचा दिमाख व वैभव बाहेरूनच लक्षात येत होतं. ३५०० सोनेरी विटांनी हे सोनेरी छप्पर बनवलं होतं. मॅक्समिलन सम्राटानं हे बांधलं. मिलानची 'मरीया ब्लॅका' ह्या लाडक्या राणीच्या स्मरणार्थ हा देखणा राजवाडा त्यानं बांधला.

ह्या राजवाड्याच्या दोन्ही बाजूंना असलेल्या इमारतींतून त्या काळचे दरबारी लोक राहत. त्रिकोणात बरोबर कोपऱ्यात राजवाडा बांधावा व बाजूला दोन बाजूंवर दरबारी लोकांची घरं असावी, तशी ह्या इमारतींची रचना आहे. त्यामुळं राजाला राजवाड्यातून अगदी शेवटच्या घरापर्यंत नजर ठेवता येत असे. इथं सरदार लोकांच्या क्रीडास्पर्धा चालत. त्याही राजाला, राजवाड्यातून नीट पाहता येत. ह्या प्रत्येक घराला तळमजला आहे. त्यात पूर्वी शस्त्रास्त्रं ठेवली जात.

हा सारा परिसर इटलीतील इतर राजवाड्यांप्रमाणेच दगडी फरश्यांचा आहे. राजवाड्यावर सिंह व जंगली अस्वल ही शक्ती दाखविणारी दोन प्रतीकं आहेत. राजाची शक्ती आणि सामर्थ्य दाखविण्यासाठी ह्या प्रतीकांची योजना आहे. इन्सब्रूकमधून बस जात होती, तेव्हा आजूबाजूला निळे डोंगर एकसारखे दिसत असतात व इन नदीही भेटत असते. ऑस्ट्रिया देखणा प्रदेश आहे आणि त्यातील इन्सब्रूक हे अधिक देखणं गाव आहे.

इन्सब्रूकला हिंडून आल्यावर आम्ही व्हिएन्ना व साल्सबर्गला जाणाऱ्या गाडीत बसलो. ही गाडी डोंगरदऱ्यांतून जात असल्यानं हा प्रवासही एक आनंदाचा अनुभव देतो. उजव्या बाजूला डोंगराच्या बाजूबाजूनं एक लहान झरा नदीप्रमाणे सतत वाहताना दिसतो. त्या हिरव्या डोंगराला ह्या झुळझुळत्या पाण्यानं वेगळंच सौंदर्य प्राप्त झालं आहे.

स्वाति चेष्टेनं म्हणाली,

''आपण हिला डॅन्यूब नदी म्हणू. वास्तविक डॅन्यूब ऑस्ट्रियाच्या मधून वगैरे वाहत नाही. दक्षिण बाजूला डोंगर व उत्तर बाजूला डॅन्यूब नदी वाहते, ती लिंझ व्हिएन्ना ह्या बाजूला. गाडीतून जाताना मधून मधून गावं येत होती. तेव्हाही स्विझर्लंडचीच आठवण येत होती. इथंही गॅलऱ्या फुलांनी सजलेल्या होत्या. ऑस्ट्रियाचा आणखी विशेष म्हणजे, इथली स्टेशनं सुद्धा फुलांनी खास सजवलेली होती. त्याप्रमाणे खास कुंड्या ठेवलेल्या होत्या. आपल्या इथं देवळापुढं दीपमाळ करतात, त्याप्रमाणे फुलांनी गच्च भरलेल्या कुंड्या, लटकवलेल्या असतात. ऑस्ट्रियन माणसं फुलांपानांत नि गाण्यांत रंगलेली असतात. इतका सुंदर निसर्ग पाहिल्यावर संगीत आपोआपच स्फुरणार.

व्हिएन्ना ही जगातील संगीताची राजधानी. ॲकॉर्डियन व गिटार ह्यांवर ऑस्ट्रियाची भावनात्मक गाणी छेडली जातात. जॉन स्ट्रासनचे वॉल्टझचे झणत्कार ऐकून ऑस्ट्रियाचे लोक वेडे झाले होते. १८९९ साली तो वारला, त्या वेळी व्हिएन्ना त्याच्या संगीतासाठी वेडंपिसं झालं होतं. बिथोव्हनचं तर ऑस्ट्रिया हे माहेरघर आहे. त्याच्या सिम्फनीज्चा पहिला झणत्कार उठला, तो ऑस्ट्रियातच. बिथोव्हन, शूबर्ट, ब्रहम मोत्झार्ट, अल्बन बर्ग, ह्युगो वोल्फ हे पाश्चात्त्य संगीतशिरोमणी जन्मले, वाढले नि त्यांनी कलेची उंची गाठली, ती ऑस्ट्रियातच. डॅन्यूब नदीच्या निळ्या पाण्यात थरार उमटले, ते ह्या संगीताच्या नादलहरींमुळं.

**तात्व्हेर्ना**

जगातील उत्तम ऑपेरा ऐकायचा, तर तो ऑस्ट्रियातील नवीन तऱ्हेनं बांधकाम केलेल्या जुन्याच घरातून. ह्यालाच 'ताव्हेर्ना' म्हणतात. गल्ल्याबोळांतून असे 'ताव्हेर्ना' असतात. शिवाय व्हिएन्नामध्ये कोणते ना कोणते समारंभ नि त्यांत संगीत हे वर्षभर चालूच असतं आणि जूनमध्ये संगीताचा महोत्सव असतो. घरी, दारी, ऑफिसमधून ह्या संगीतमहोत्सवाचीच चर्चा होत राहते. जूनमध्ये, साऱ्या ऑस्ट्रियातील प्रजा गाण्यात बुडालेली असते. हॉफबर्गच्या रेडारेन्सलमध्ये मोझार्टचे थरार सतत उठत असतात. तर शोनब्रूनच्या स्कूलथिएटरमध्ये उन्हाळ्याच्या सुट्टीत निरनिराळ्या वाद्यांच्या मैफिली होतात. व्हिएन्नातील लोक इतके संगीतवेडे आहेत, की ऑपेरा व कॉन्सर्टची तिकिटं तिथं चुटकीसरशी खपतात.

आपल्या इथं मात्र प्रभाकर कारेकरसारख्या गायकालाही शास्त्रीय संगीत शिकावं का ? त्यात आपलं पोट भरेल का ? असे प्रश्न पडतात. भारतीय संगीत, भारतीय चित्रकला ही कमी दर्जाची मानण्यात आम्ही स्वत:ला ग्रेट समजतो !

व्हिएन्नात प्रजा संगीतवेडी असल्यानं संगीतातले रथी-महारथी तिथं जन्मले. त्यांचं त्यांच्या हयातीत अमाप कौतुक झालंच; पण निधनानंतरही त्यांचे पुतळे उभारले गेले. इथलेही लोक इतके संगीतवेडे आहेत, की एखाद्या ठिकाणची मैफल रंगली, की तीवर किती दिवस चर्चा चालू असते. आपल्याकडे फक्त बालगंधर्वांच्या काळी असं काही घडत होतं, म्हणे ! मुंबईच्या लोकल रेल्वेनं मुंबईकरांना एवढं पिडलं आहे, की हिन्दी चित्रपट-संगीतापुढं जायला त्यांना वेळ नसतो व मानसिक शक्तीही उरत नाही.

ऑस्ट्रियात वाद्यवादनाची सामग्री विकणारी किती तरी डिपार्टमेंटल स्टोअर्स आहेत. शिवाय इतरही तीन-चार मजली डिपार्टमेंटल स्टोअर्स आहेत. व्हिएन्नामध्ये आहेत व तिथल्या किमतीही माफक असतात. अगदी भारतीयांना पण परवडणाऱ्या. इटलीपेक्षा खूपच स्वस्त. ते पाहून आम्हांला आश्चर्य वाटलं. इटलीत एक आठवडाही नव्हतो; पण तेवढ्या अवधीत इटलीचा लिरा घसरत होता. ज्या देशाची करन्सी अधिक मूल्यवान, तो देश आपल्याला महाग पडतो. असा सिद्धांत आहे; पण इटलीत मात्र वेगळाच अनुभव आला. आम्ही ऑस्ट्रियाच्या डिपार्टमेंटल स्टोअरमध्ये खाण्याचे भरपूर पदार्थ घेतले व नंतर ऑस्ट्रियन गायडेड टूरमध्ये सामील झालो. बर्ग थिअेटरजवळ गायडेड टूर्स मिळतात.

## बिल्टन बॅसिलिका

'बिल्टन बॅसिलिका' हे साल्सबर्गमधील महत्त्वाचं चर्च. ह्यावरही देखणं लखलखतं सोनेरी छत होत.

'रोकोको स्टाईल' खूपजण म्हणाले. त्यांतले बरेचसे चेहरे इन्सब्रूक राजवाडा पाहयला आलेले होते.

'अगदी बरोबर !' गाईडनं हसून उत्तर दिलं.

इथंही वेदीपाशी गॉथिक स्टोनमधील मेरी दिसते. आतला सगळा भाग अगदी राजेशाही वाटतो. प्रत्यक्ष वेदीचा भाग एखाद्या रत्नजडित मुकुटासारखा वाटतो. त्याचं सोनेरी नक्षीकाम अत्यंत देखणं आहे. मध्याच्या बाजूनं लाल मखमल असल्यासारखं वाटतं व त्याच्या बाजूला मोराचा पिसारा दिसतो. ह्या मेरीच्या भोवती चार देखणे खांब आहेत. त्यांमुळं ह्या होली मेरीला 'अवर लेडी अंडर द फोर कॉलम्स' असंही म्हटलं जातं. ही बॅसिलिका खास राजे लोकांसाठी

बांधली गेल्यानं बॅसिलिकाचं छप्पर सोनेरी टाईल्सचं आहे. (रोकोको स्टाईल)

बॅसिलिका पाहून झाल्यावर आमची बस जात होती. त्याच वेळी, बाहेर मोठी घंटा बांधलेलं एक घर, गाईडनं आम्हांला दाखवलं. या ठिकाणी निरनिराळ्या घंटा बनविल्या जातात. गाईंच्या वजनाप्रमाणे ह्या घंटांचं वजन असतं. गाय कुठं आहे, हें घंटेच्या आवाजानं कळतं. लांडग्यांपासून ह्या गाईंना वाचविण्यासाठी ही सोय केलेली असते. गाय दिसेनाशी झाली, की ह्या आवाजाच्या अनुरोधानं शोधणं सोपं जातं.

आल्प्स पर्वताच्या कुशीतलं हे ऑस्ट्रिया राष्ट्र. त्यामुळं हे सौंदर्यानं नटलेले डोंगर इथल्या प्रजेला खुणावणार, हे अगदी साहजिकच आहे. त्यामुळं स्कीईंग व रायडिंग स्कूल्सही मुबलक आहेत. शिवाय ऑस्ट्रिया हा तसा स्वस्त वा माफक किमतीत वस्तू देणारा देश असल्यानं इथं प्रवाशांची गर्दीही खूप असते. स्वित्झर्लंडपेक्षा ऑस्ट्रियात केवळ रायडिंग सुद्धा खूप स्वस्तात आहे. त्यामुळं बरेचसे प्रवासी ऑस्ट्रियातच येतात.

## लाल सेना

व्हिएन्ना म्हणजे मोठ मोठी चर्चेस्, राजवाडे व राजेशाही बागा ह्यांनी नटलेलं शहर. रोमन साम्राज्याचा कारभार इथूनच चालत असे. नेपोलियनचा वॉटर्लूमध्ये पराभव झाला, तेव्हा जिंकलेले महाधुरीण जमले, ते व्हिएन्नामध्येच. दोन्ही महायुद्धांत व्हिएन्नानं महत्त्वपूर्ण भाग घेतला होता. दुसऱ्या महायुद्धात ऑस्ट्रिया जर्मनीच्या बाजूनं लढत होता. नि १३ एप्रिल, १९४५ रोजी ऑस्ट्रिया लाल सेनेच्या हाती गेला. ऑस्ट्रिया हे तर शत्रुराष्ट्र; पण लाल सेना युगोस्लाव्हियात शिरली, तर तिथंही तिनं लुटालूट व बलात्कार केले. युगोस्लाव्हिया वास्तविक रशियाचं बंधुराष्ट्र, पण तिथंही या सैनिकांनी १११ स्त्रियांवर बलात्कार करून नंतर त्यांचे खून केले. तर ऑस्ट्रियाची काय वाट लागली असेल, असं माझ्या मनात येतं आहे, तोच आमच्या गाईडनं एक ऑस्ट्रियन सैनिक व एक रशियन सैनिक गळ्यात गळा घालून पुढं पाऊल टाकत आहे, असं शिल्प दाखवलं.

मला प्रचंड आश्चर्य वाटलं. दिसतं, ते खरं, की ऐकलं, ते ? मी दिसतं, ते खरं मानण्याचं ठरवलं. पण तेवढ्यात आमची गाईड म्हणाली,

'हे स्मारक ही आमच्यावर सक्ती आहे. आम्ही रशियनांचा द्वेष करतो. मात्र गोर्बाचेव्ह यांच्यामुळं आमच्या मनात आशा उत्पन्न होते आहे.'

'मग हे स्मारक काढून का टाकत नाही ?'

एका प्रवाशानं विचारलं. तेव्हा ती म्हणाली,

'१९५५ च्या करारापमाणे आम्हांला हे स्मारक तसंच ठेवायला हवं.'

'पणं आता जर्मन भिंतही कोसळली.' एक प्रवासी म्हणाला.

गाईड काहीच बोलली नाही; पण तिचा चेहरा खुलला.

रशियन सैनिक म्हणजे चोर, दरोडेखोर व कोणतीही नैतिकता नसलेले, असंही ती चीड येऊन नंतर आम्हांला म्हणाली. तेव्हा रशियन-द्वेष ऑस्ट्रियाच्या मनात किती खोलवर रुजलेला आहे, त्याची जाणीव झाली.

पण नंतर तीच म्हणाली,

'सैनिकांना अत्यंत असमाधानी ठेवल्यानं ते असे वागले असतील, असंही आता मनात

येतं; पण तरीही आमच्या मनातली चीड जाता जात नाही.'

दुसऱ्या महायुद्धात ऑस्ट्रियाची प्रचंड तोडमोड झाली व अमेरिका, फ्रान्स, ब्रिटिश व रशिया ह्या चार महासत्तांचा लष्करी तळ ह्या देशावर होता. १९९५ मध्ये शांतता तह झाला, तेव्हाच ऑस्ट्रियाला स्वत:च्या प्रगतीसाठी मोकळीक मिळाली.

## शोनब्रून राजवाडा

कोलमार्क्ट रस्त्यावरून मिचॅले प्लॉझाला गेलं, की हॉफबर्ग हा सम्राटांचा राजवाडा लागतो. ऑस्ट्रियात विसाव्या शतकाच्या प्रारंभापर्यंत ह्या हॉफबर्ग घराण्याचा अंमल होता. हॉफबर्ग घराण्यातल्या राजांना पाण्याऐवजी मद्य पिण्याची आवड होती. तशी पाश्चात्त्य देशांत सारेच ह्या राजाचं अनुकरण करतात. पाण्याऐवजी मद्यच पितात. जेवणाच्या टेबलावर मद्यच असतं. प्यायचं पाणी मागावं लागतं. तर ह्या हॉफबर्ग राजाला खूप तहान लागली नि मद्याऐवजी तो चुकून समोरच्या कारंज्यातलं पाणी प्याला. आल्प्स् पर्वतावरून येणारं ते बर्फाचं थंडगार पाणी त्याला अतोनात आवडलं नि त्यासाठी ह्या कारंज्याचंच नाव त्यानं आपल्या राजवाड्याला दिलं. 'शोनब्रून' ह्याचा अर्थ 'सुरेख कारंजं.'

तेव्हापासून ह्या राजवाड्याचं नाव 'शोनब्रून' असं आहे.

ह्या राजवाड्याचं एक देखणेपण म्हणजे इथले विस्तीर्ण बगीचे व प्रवेशद्वाराशी प्रचंड दोन गरुड. आकाशात उंच झेप घेणाऱ्या प्रचंड देहाची आठवण, आपल्याप्रमाणे तिथल्याही शिल्पकाराला होणं अगदी साहजिक आहे; पण तरी त्यामुळं भावनात्मक एकात्मता जाणवतेच.

खिसंथेम, केराबेरा, मार्गारिटा, जिरेनियम, स्ट्रॉरोज ही स्वित्झर्लंडमध्ये भेटलेली फुलं इथं परत भेटत होती. जणू पुनर्भेट व्हावी, तशी ती गोड हसत होती नि मीही त्या भेटीनं फुलारून गेले. ओ हो ऽ! नि लंडनमधील राजा व राणीचा बहुमान मिळवू शकतील, असे ते मोठे गुलाब इथंही समुदायानं सामोरे आले. फुलांचा समुदाय संभाळणारे हे रसिक राजवाडे !

'मारिया थेरेसा' ही एक रसिक सम्राज्ञी अठराव्या शतकात होऊन गेली. जगातली उत्तमोत्तम पेंटिंग्ज आणून तिनं राजवाड्यातील दिवाणखाने सजवले. टिटन, टिटोरेट्टो, व्हेरोनिज, रुबेन वगैरे अनेकानेक चित्रकारांची पेंटिंग्ज इथं आहेत. कुनस्थीटोरिचे (Kunsthistorische) म्यूझिअम हा जगातील श्रेष्ठ म्युझिअम मानला जातो. ग्रीक, रोमन व इजिप्शिअन वगैरे उत्तमोत्तम अँटीक्सचा संग्रह इथं पाहायला मिळतो; पण हा म्यूझिअम ख्यातनाम आहे, तो मात्र तिथल्या पेंटिंग्जमुळं. पॅरिसरच्या लूव्हर म्यूझिअमच्या तोडीचा हा गणला जातो.

मारिया थेरेसला सोळा मुलं झाली. त्यांची पोर्ट्रेट्सही राजवाड्यात आहेत. मारी अन्तायनेत ही तिची मुलगी अप्रतिम देखणी आहे. फ्रान्सच्या सोळाव्या लुईशी तिचं लग्न झालं. पण फ्रेंच राज्यक्रांतीच्या वेळी, क्रांतिकारकांडून ती गिलोटीनखाली मारली गेली.

सम्राट फ्रान्स जोसेफ व सम्राज्ञी एलिझाबेथ ह्यांच्या दालनात फ्रान्स जोसेफ व सम्राज्ञी एलिझाबेथ ह्यांचा खजिना पाहायला मिळतो. शिवाय पूर्वाश्रमीचे रोमन व ऑस्ट्रियन सम्राटांचे मुगुट त्यात जडवलेली रत्न पाहावयास मिळतात. ऑस्ट्रियाचं साम्राज्य रोमपर्यंत पसरलेलं होतं, त्याचा हा जणू पुरावाच.

नेपोलियन बोनापार्टला स्वत:च्या राजघराण्याचा अभिमान होता. आपल्या फोरोमी ह्या भावाचं एलिझाबेथ पॅटरसनशी (एका अमेरिकन सामान्य मुलीशी) झालेलं लग्नही त्यानं

मोडायला लावलं. अशा नेपोलियनला स्वत:चा वंशज राजघराण्यातला हवा होता. त्यासाठी त्यानं आपलं लग्न ऑस्ट्रियन राजकन्या मारी लुईशी केलं होतं. ती दिसायला अत्यंत सामान्य होती. नेपोलियन हा ऑस्ट्रियन सम्राटांचा जावई असल्यानं त्याचा पलंगही इथं दिसतो. नेपोलियन ठेंगू, म्हणून, म्हणे, त्याच्या पलंगाची लांबी सहा फुटांपेक्षा कमी ! मारी लुईपासून झालेल्या मुलाचं नाव फ्रान्सिस ठेवलं होतं व नेपोलियन त्याला 'किंग ऑफ रोम' म्हणे; पण नेपोलियनचा पराभव होत गेला नि ह्या मुलाला कोणती स्वप्नंच उरली नाहीत. वयाच्या एकविसाव्या वर्षी त्याला क्षय झाला व तो 'शोनब्रून' राजवाड्यातच मरण पावला. फ्रान्सिसच्या झोपायच्या खोलीत त्याचा छोटा पलंग आहे. एका सोनेरी पिंजऱ्यात पेंढा भरून जो पक्षी ठेवलेला आहे, तो पक्षी फ्रान्सिसचा अत्यंत लाडका होता.

'शोनब्रून' राजवाड्याची अशी ही १४०० दालनं आहेत. ह्यांत तीन मोठमोठे म्यूझिअम्स आहेत. ऑस्ट्रियातली 'नॅशनल लायब्ररी' सुद्धा जगप्रसिद्ध आहे; पण आता ते सारं पाहणं नको वाटत होतं.

इन्सब्रूकचे ते डोंगर, ती झाडं, ते आकाशाचे विविध रंग, शोनब्रूनचे गरुड, ती विविधरंगी फुलंच मनात नाचत होती. ते सारं सौंदर्यच डोळ्यांसमोर फिरून फिरून येत होतं नि आम्हांला आता जर्मनीला जाण्याचे वेध लागले होते.

***

## जर्मनी : द्राक्षांचा व फुलांचा देश

ऑस्ट्रियावरून जर्मनीत बसनं गेलं, तर 'ब्रेनर पास' दिसतो. मी दुसऱ्या वेळी बसनं गेले, तेव्हा हा ब्रेनर पास लागला.

प्रथम फर, ज्युनिपर, पाईन वृक्षांची दाटी दिसू लागते. त्या हिरव्या रंगात आपण बुडून जातो, तोच लुकलुकत्या बर्फाच्छादित डोंगराचं वैभव मंत्रमुग्ध करतं. ह्या ठिकाणी बस थांबते व ते वैभव आपण याचि देही याचि डोळा पाहत असतो. नंतर आपण बसमध्ये बसतो व त्या नयनरम्य डोंगराचा निरोप घेताना वाईट वाटत असतं; पण तरी ते लखलखतं सौंदर्य कधी डावीकडे, तर कधी उजवीकडे दिसतच असतं. डोंगराचं सौंदर्य नजरेआड होतं, तर एक जादूमय खेडं दिसतं पांढऱ्या, पिवळ्या रंगाची घरं चित्रासारखी वाटतात. त्याच्या बाजूला हिरव्या झाडांची गमत, तर त्या झाडांवर पांढऱ्या फुलांची रांगोळी. हे वैभव आणखी उठावदार करण्यासाठी घरांवर, गाईंची व इतर अनेक छानशी चित्रं.

'आता ह्या खेड्यातच राहू आम्ही !' उत्साहित होत म्हटलं होतं.

ह्या वेळी मात्र व्हिएन्नाला रात्रीची गाडी पकडून आम्ही सकाळी फ्रँकफर्टला आलो. गाडी जर्मनीलाच पोचणारी असल्यानं व्हिसा बघायला कुणी आलं नाही. जर्मनीहून पुढं जाणारी गाडी असेल, तर व्हिसा तपासायला येतात. इटलीहून आम्ही ऑस्ट्रियाला आलो. तेव्हा ती गाडी जर्मनीला जाणारी होती. त्यामुळं ऑस्ट्रियाचा व्हिसा न घेता कुणी परस्पर जर्मनीत जातील, म्हणून ऑस्ट्रियाचे व्हिसा तपासनीस आत आले असावे.

फ्रँकफर्ट हे प्रचंड मोठं स्टेशन आहे. इथून जवळ जवळ सेहेचाळीसहून अधिक ठिकाणी कुठल्या ना कुठल्या प्रदेशात गाडी जात असते. आपल्या इथं लोकलगाड्या जशा दर पाच

मिनिटांनी जात असतात, तशा इथं थेट गाड्या कुठं ना कुठं जात असतात. जवळ जवळ चौदा की पंधरा प्लॅटफार्म्स आहेत; पण कुठंही गोंधळ - गडबड नाही.

लोकलला जायला जिन्यानं खाली जावं लागतं. इथंही लोकलचा प्रवास ट्यूबनंच करायचा होता. एका प्लॅटफार्मवर S1, S2, S3, S6, S14 असे नंबर्स होते. दुसऱ्या प्लॅटफॉर्मवर पाहिलं, तर तिथंही नंबरांची पाटी पहिल्याप्रमाणेच. त्यामुळं आम्ही छान गोंधळलो. आम्हांला क्रिफ्टेलला (Kriftel) जायचं होतं. एका बाईकडे चौकशी केली, तर ती म्हणाली, नंबर दोनच्या प्लॅट फॉर्मवरून जा. मी तिला विचारलं,

'ह्या दोन्ही प्लॅटफॉर्मवरच्या पाट्या तर सारख्याच आहेत. मग कुठली गाडी कुठून जाते, ते तू कसं ओळखलंस ?'

तिला ते सांगता येईना. मात्र तिनं सांगितलेला प्लॅटफॉर्म बरोबर होता. नंतर आम्ही येणाऱ्या गाडीवरचं नाव प्लॅटफॉर्मवरच्या इंडिकेटरवरून कसं जायचं, ते ठरवू लागलो. दर पाच मिनिटांनी गाड्या येत जात असल्यानं तसा त्रास होणार नव्हता. क्रिफ्टेलला जायला साडेतीन ड्यूसमार्क द्यावे लागले. क्रिफ्टेल स्टेशनवरून हशू वासवानीला फोन करत होतो, तो फोन लागेना. अर्धा पाऊणतास फोनच होत नव्हता. दोन दिवस बाहेरच काढावे लागणार, असं वाटत होतं. शिवाय क्रिफ्टेल आडस्टेशन. त्यामुळं परत फ्रँकफर्टला जाऊन लॉकरमध्ये सामान ठेवणं वा हॉटेल बघणं हा उद्योग करावा लागणार, असं वाटू लागलं. कारण फ्रँकफर्टला लीला शुन्नरकडे मंगळवारी जायचं ठरलं होतं.

जर्मनीत एक चांगली गोष्ट आहे, की इथले लोक इंग्लिशमध्ये बोलतात. त्यामुळं एका माणसाला आम्ही आमची अडचण सांगितली. त्यानं आमच्यासाठी फोनवर प्रयत्न केला व जवळच असलेल्या पोस्ट ऑफिसमधून फोन करायचं सुचवलं. स्वातीनं पोस्ट ऑफिसमध्ये जाऊन फोन केला नि फोन लागला. नि हशू वासवानी आम्हांला घेऊन जायला येतो, म्हणाला. तेव्हा सारं सामान घेऊन फ्रँकफर्टला जाण्याचा घोळ वाचला, म्हणून आनंद झाला. (हेच फ्रान्समध्ये घडलं असतं, तर !)

हशू वासवानी चांगलाच उंचनिंच, तगडा नि गोऱ्या वर्णावर आहे. तो जर्मन लोकांच्यांत सहज खपून जाईल, असा आहे. त्याची बायको गोरी, देखणी, एखाद्या बाहुलीसारखी आहे. ती जर्मन आहे. हशूनं आमची बॅग नि हँडबॅग अगदी लीलया उचलून घरात नेली. ते पाहताना मनात आलं, ह्या बॅगा आमच्या हातांत आल्यावरच जड का होतात ?

## हशूचा देखणा बंगला

हशूचा बंगला देखणा आहे. दोन बाथरूम्स, दोन बेडरूम्स, किचन, भला थोरला हॉल. निरनिराळ्या सुंदर देखण्या क्युरिओज्नं हॉल जास्तच देखणा झाला होता. तळमजल्याला धुण्याचं मशीन व सटरफटर वस्तू ठेवायला जागा. पुढं - मागं लॉन व पुढं केवढी तरी विविधरंगी फुलं. जून - जुलै हा युरोपात फुलांचा हंगाम असल्यानं जिथं जाऊ, तिथं कुंड्यांमधून फ्लॉवरपॉट वाटतील, अशी फुलं उगवली होती. कोवळं ऊन, थंड हवा नि ही रंगीबेरंगी फुलं पाहताना आपण वेगळ्याच सुंदर जगात वावरत आहोतसं, वाटलं. धुरळा हा प्रकारच नसल्यानं रस्ते, घरं वगैरे सर्व अगदी स्वच्छ ! त्यांच्याकडे एक सुंदर पक्षी होता. तो पक्षी पहिल्या लँडलेडीनं बंगल्याबरोबरच बहाल केला होता. त्याच्या पिंजऱ्यात एक आरसा आहे, त्या आरशात पाहून

तो खूश होतो. पिंजऱ्याबाहेरही खूपदा असतो; पण उडून जात नाही.

घरी गेल्याबरोबर मॅक्रो ओव्हनमधला चीज लावलेला ब्रेड, चहा, सफरचंदाचा घरी केलेला जाम अशी न्याहारी झाली.

'सफरचंदं घरची, बरं का ?'

'हो ?'

'बागा कुठं आहेत ?' मी आश्चर्यानं विचारलं.

'मागच्या बाजूला आहेत. दाखवतो.' हशू म्हणाला.

नंतर आमचा विषय काय निघावा, तर आमच्या दोघांच्या कॉमन मोलकरणीचा ! अर्थात आम्ही आंघोळीसाठी लगेचच उठलो. कारण आमचा नास्ताच मुळी साडेदहा, अकराला सुरू झालेला होता. आंघोळ व धुणं आटपून बाहेर आलो, तर हशू म्हणाला,

'कपडे कशाला धुतले ? तरी मशीन दाखवलं होतं.'

'उद्या मशीनमध्ये टाकू.' स्वाति हसत म्हणाली.

मग तो पाठीमागच्या लॉनवर आम्हांला घेऊन गेला. त्याला लागूनच केवढी तरी लांबलचक बाग होती. त्यात सफरचंदं, पीच वगैरे झाडं फळांनी लगडली होती.

'आणखी दोन महिन्यांनी हीच पीच व ही सफरचंदं, ह्यांचा आकार दुप्पट होईल.' हशू सांगत होता.

'बाप, रे ! एवढी मोठी ?' मी आश्चर्यानं विचारलं.

'आमचं फळ सर्वांत मोठं असतं. त्यामुळं आम्हांला भावही चांगला मिळतो.' हशू एखाद्या बागाईतदाराच्या थाटात सांगत होता. खरं तर, तो इंजिनीअर आहे व त्याला मोठ्या पगाराची नोकरी आहे. पण फक्त नोकरीत समाधान मानायला तो महाराष्ट्रियन थोडाच आहे.

त्या दिवशी जेवायला पीचचा केक होता. क्रिस्टल पिच केक फारच सुंदर बनवते. केवढा तरी मोठा ट्रेभर केक बनवला होता. चिवडा, लाडू, ब्रेड वगैरे वस्तूही होत्या; पण आम्ही पीचचा केकच पोटभर खाल्ला व त्यावर कॉफी प्यालो. आम्ही मागच्या लॉनवर गप्पा मारत केकचा समाचार घेत होतो. आमच्याबरोबर तो सुंदर पक्षी पण त्याच्या पिंजऱ्यात बसला होता. त्याला माणसं फार आवडतात, लॉनवर आणखी एक पक्षी आला होता. तो त्या पिंजऱ्यातल्या पक्ष्याच्या भोवती होता. क्रिस्टल म्हणाली, गेले तीन दिवस हा लॉनवरचा सावळा पक्षी, पिंजऱ्यातल्या पक्ष्याला भेटायला येतो. त्यालाही हे लॉन आवडलं आहे. त्यामुळं तो ह्या लॉनवरच वास्तव्य करून आहे.

## भारतीय जेवण

गप्पा मारता मारता भारतीय जेवणावर विषय आला, तेव्हा क्रिस्टल म्हणाली की,

'मला भारतीय पदार्थच खूप आवडतात. माझ्या मित्रमैत्रिणींना व नातेवाइकांना पण भारतीय पदार्थच खूप आवडतात.'

'तुला भारतीय पदार्थ येतात ?' मी कौतुकानं विचारलं.

'हो. काही मला हशूनं शिकवलं. काही पदार्थ मी मुंबईला सासूजवळ शिकले.'

'तुम्हां सगळ्यांना चायनीज् पदार्थांपेक्षा भारतीय पदार्थ आवडतात ?' मी आश्चर्यानं विचारलं.

'हो. खूपच.' क्रिस्टल म्हणाली.

म्हणजे आम्ही कमी पडतो, ते भारतीय पदार्थांची प्रसिद्धी करण्यात ! त्यातून 'फॉरेन रिटर्न' भारतीय भारताला नावं ठेवण्यात एकदम हुशार ! पाश्चात्त्य ब्रेडचंच त्यांना कौतुक ! संतांनी तर सांगितलं, 'वेष असावा बावळा' आणि आम्ही झालो जन्मजात बावळट !

## सद्दाम हुसेन

इंग्लंडमध्ये आलो होतो, तेव्हा सद्दाम हुसेननं कुवेतचा ताबा घेतला आहे व अमेरिका व रशिया त्याच्याविरुद्ध आहेत, हे ऐकलं होतं. त्यामुळं तो प्रश्न लगेचच सुटला असेल, अशी आमची कल्पना होती. इटलीत टी.व्ही. वर सद्दाम दिसायचा; पण काय चाललंय्, समजायचं नाही व इटलीत इतर विषय जाणून घ्यायचे असल्यानं इटलीविषयीच्या आमच्या इतर गप्पा चालायच्या. त्यामुळं सद्दाम हुसेनविषयी काही बोलायला जमलंच नव्हतं.

'इराकविरुद्ध लढायला आता अमेरिका सौदी अरेबियात ठाण मांडून आहे.' हशू सांगत होता. मग तोच म्हणाला, 'खरं तर, अमेरिकेला व जर्मनीला प्रेट्रोलचा एवढा प्रॉब्लेम नाही; पण पेट्रोलमुळं भारताची अर्थव्यवस्था मात्र ढासळेल.'

'एवढासा इराक, तरी त्याचा एवढा जोर असावा !' मी आश्चर्यानं म्हणाले.

त्यानंतर गप्पा मारता मारता स्वाति म्हणाली,

'आमची व्हिचेन्झाची होस्ट व्हेजिटेरियन होती. आम्ही त्यांच्या घरी गेल्याबरोबर ती म्हणाली, माफ करा हं, आम्ही व्हेजिटेरियन आहोत. आम्हांला काय, बरंच झालं.'

'युरोपमध्ये बहुतेक लोकं आता व्हेजिटेरियनच होताहेत.' हशु म्हणाला.

'आश्चर्य आहे !' मी म्हणाले.

'त्यात आश्चर्य काही नाही. सर्व युरोपात मुख्यत: मांस येतं, ते लंडनहून. मध्यंतरी लंडनमध्ये बरंच शिळं मांस उरलं. ते मांस त्यांनी गाईच्या अन्नात मिसळलं. त्यामुळं गाईंना कसलासा रोग जडला. युरोपमध्ये फक्त गाईचंच मांस खाल्लं जात असल्यानं लोक मांस खायला घाबरतात.' हशूनं माहिती पुरवली.

## बहरलेली फुलं

संध्याकाळी आम्ही फिरायला बाहेर पडलो. लंडन, व्हिचेन्झा, बर्न वगैरे ठिकाणी पाहिलेलीच फुलं बागाबागांतून लगडलेली दिसली. युरोपमध्ये सर्वत्र हेच दिसलं. गजबलेल्या शहरापासून थोडं दूर शहर असेल, तर तिथं छोटे छोटे बंगले व बागा फुलांनी बहरलेल्या दिसतात. पक्के रस्ते नि अधून मधून एखाद - दुसरी गाडी जात असलेली. बाकी सारं शांत. लहान शहरातून बस हा प्रकारच नाही. ज्याच्या त्याच्या गाड्या, अर्थात गाव अगदी छोटं, त्यामुळं स्टेशनही दहा-पंधरा मिनिटांहून लांब नाही.

त्रिसंथेम, शार्फ कारमे, जिरेनियम, इम्पेशंट वगैरे फुलं बगिच्यांतून दिसत होती. फुलं दिसली, की आम्ही फार दिवसांची ओळख असल्यासारखी त्यांची नावं घेत होतो केराबेरासारखी मोठी फुलं पण होतीच. घराघरातून फुलं नुसती स्वागत करत होती. गुलाबांचेही घोसच्या घोस दिसत होते. नंतर हिरवीगार शेतं आली. त्यापलीकडे निळे डोंगर नि लोक

सुखसोयींनी युक्त अशा शहरात राहतात नि तरीही निसर्गाच्या सान्निध्यात ! तेवढ्यात वासवानी म्हणाले,

'इथल्या थंड हवेमुळं इथं फुलं खूप फुलतात; पण स्वत:च सारी मशागत करावी लागते.'

'इथं फुलं विकत घेतात, की नाही ?'

'घेतात तर ! घरोघरी बगीचा असतोच; पण ती फुलं तोडवत नाहीत. मग विकतची आणतात.'

'म्हणजे आपल्या दारची फुलं विकणारेही कुणी आहेत !' मी म्हणाले.

'नाही. दारची फुलं कुणी विकत नाही. विकणारे फुलांचीच शेती करतात. फुलांची शेती करून विकणारे लोक पण आहेत. मात्र इथं फुलं खूप महाग आहेत.'

'म्हणजे इथं 'माल्थसची थिअरी' उपयोगी नाही. मागणीपेक्षा पुरवठा जास्त असल्यानं फुलांच्या किमती कमी हव्या.'

'थिअरी चुकीची नाही. कारण इथं फुलं खूप असली, तरी मागणीही खूप असते.'

आम्ही गप्पा मारत चाललो होतो; पण ती रंगीबेरंगी फुलं पाहताना मध्येच त्या रंगांच्या दुनियेत गुंतून जाऊन फुलं पाहत मध्येच थबकून उभ्या राहत होतो.

चालता चालता वासवानी म्हणाले,

'एक भारतीय पाहुणे आमच्याकडे आले होते. ते म्हणाले, आपण फुलं विकत घेऊ. मी म्हणालो, चला. पण इथल्या फुलांच्या किमती पाहून ते हबकलेच. मी त्यांना सांगितलं, फुलं हवीत, तर त्यांची योग्य किंमत मोजायलाच हवी.'

माझ्या मनात आलं. आपल्या भारतातही पैसेवाले लोक आहेत; पण अशी फुलांची आवड त्यांच्या घरीही पाहायला मिळत नाही. आपल्या इथं गुलाबाची शेती होते, ती गुलकंद करण्यासाठी. पण घर सजविण्यासाठी फुलांचे भारेच्या भारे विकत घेताहेत, हा प्रकार नाही. शिवाय युरोपात कुठंही दुसऱ्यांच्या बागेतली फुलं तोडली जात नाहीत. (भारतात फुलं तोडणाऱ्यांची युनियन नाही, हे देशाचं केवढं भाग्य !) मनात सारखं येत होतं, की फुलाफुलांच्या ह्या सुंदर देशात, हिटलरसारखं जगाचा थरकाप करणारा जन्माला कसा आला ?.

## गाडीवाले स्वत: फूटपाथ धुतात

'इथले रस्ते व फूटपाथ किती स्वच्छ आहेत !' मी चालता चालता म्हणाले.

'आमच्या घरासमोरचे फूटपाथ आम्हांलाच साफ करावे लागतात.' वासवानींनी माहिती दिली.

'काय ?' खरंच ?' आश्चर्य वाटून मी म्हणाले.

'तर ! तसा मुळी कायदाच आहे. फूटपाथ साफ नसेल, तर कॉर्पोरेटरची सूचना येते. ज्याला त्याला आपापले फूटपाथ साफ करावे लागत असल्यानं दुसऱ्याच्या फूटपाथवरही कुणी घाण टाकत नाही.

गाडीवाले, स्वत:ची घरं असणारे हे श्रीमंत लोक ! चक्क घरापुढचा फूटपाथ साफ करतात! नि आपल्या इथं चाळीत अथवा ब्लॉकमध्ये राहून लोक घरच्या खिडकीतून खाली घाणं टाकतात. जिन्यात लाल पिचकारी टाकतात, नाही तर रस्त्यावर लोकांच्या गाड्यांवर बसून चकाट्या पिटतात. कारण भारत आमचा गरीब देश आहे !

तेवढ्यात पाऊस पडू लागला. जरा मोठाच पडू लागला... तेव्हा आम्ही आडोशाला उभे राहिलो. ते म्हणाले,

'पाच मिनिटांत पाऊस थांबेल. इथं थंडीचे दिवस सोडले, तर बारा महिने पाऊस पडतो; पण ह्या महिन्यात पाऊस पडत नाही, म्हणून काळजी वाटत होती. काळच कॉर्पोरेटरनं लॉनला पाणी घालू नका, म्हणून आम्हांला आवाहन केलं होतं. म्हणून आज कुणी लॉनला पाणी घातलं नाही; पण बरं झालं, आज पाऊस पडतो आहे.'

धन्य तो देशाभिमान.

तेवढ्यात पाऊस थांबला. एका बगिच्यात खूप फुलं दिसली. बाहेरून पांढरा रंग नि आत लाल रंग पाहून मी ओळखीचं हसू हसले नि म्हणाले,

पेटानियाच्याजवळच त्रिसंथेम फुलं होती. 'मार्गारिटा', 'पेटानिया !' मी व स्वाति फुलं ओळखून नावं घेत होतो नि मनात टेरेसची आठवण येत होती.

'बाप, रे ! तुम्हांला इथली खूपच फुलं ओळखता येतात !' वासवानी म्हणाले.

'बर्नच्या 'टेरेस' नावाच्या निसर्गवेड्या होस्टनं आम्हांला हे शिकवलं.' मी म्हणाले.

तेवढ्यात वासवानींनी विचारलं,

'आईस्क्रीम खाणार ?'

'आईस्क्रीमला कुणी नको म्हणतं ?'

आईस्क्रीम खात असता एक टिपटॉप दिसणारा माणूस वासवानींना भेटला. तो दूर गेला, नि वासवानी म्हणाले,

'इथंच ह्याचं सलून आहे.'

म्हणजेच हा इथला श्रीमंत न्हावी.

वासवानींनी दूर जात असलेल्या त्याच्याकडे कौतुकानं पाहिलं व ते म्हणाले,

'हा छान पैसे कमावतो. इथं केस कापायला कमीत कमी पंधरा ड्यूसमार्क द्यावे लागतात. अर्थात चेहऱ्याप्रमाणे विविध कट्स ते सांगतात.'

'म्हणजे ही कला झाली. त्यासाठी अधिक पैसे द्यायलाच हवेत. ते काही चकाट्या पिटत केस भादरणं नव्हे.'

'आपले भारतीय त्यात हुशार आहेत.' हशू म्हणाले.

'आमच्या घरासमोरचा चांभार ! दारूला पैसे मिळावे, इतपतच काम करतो. नि वर आम्ही गरीब म्हणून ओरड !'

आम्ही सारेच यावर हसलो.

मी तेवढ्यात म्हटलं,

'इथं आम्हांला सारंच महाग पडतं. फ्रँकफर्टहून इथं यायला आम्हांला साडेतीन ड्यूसमार्क द्यावे लागले.'

'का ? तुमचा युरेल नाही ?'

'अहो, पण युरेल लोकल गाड्यांना कसा चालेल ?'

'इथं चालतो.' वासवानी म्हणाले.

आमच्यासाठी स्टेशनमास्तरबरोबर वाद घालत, तिथं लोकल गाड्यांना पण युरेल चालतो, हे त्यांनी सिद्ध केलं; पण त्यासाठी जर्मनीतून वाद घालता आला पाहिजे !

('जर्मन शिका, डच्यूसमार्क वाचवा '- व्यं. न. कुलकर्णी, प्लीज नोट. तुमच्या जर्मन क्लासेसची अशी जाहिरात करा) .

घरी गेलो, तर हशूनं फ्लॉवरची भाजी व फुलके बनवले होते व क्रिस्टलनं आमटी व बासमती भात बनवला होता. आम्हांला जेवण अगदी अमृतासारखं वाटलं.

## हिडलबर्गचा किल्ला

जर्मनीतील हिडलबर्ग हा किल्ला पाहायला आम्ही अगदी सकाळीच गेलो. भारतात, उदयपूर, जेसलमेर, जयपूर वगैरे ठिकाणी जसे चढणीवर किल्ले आहेत, तसाच हा किल्ला आहे. अर्थात इथंही राजे लोक राहत असल्यानं त्यांचे राजवाडे इथं दिसतात. कार्ल थिओडरनं हा किल्ला बांधला. किल्ल्याची चढण चढल्यावर एक मोठा लोखंडी दरवाजा लागतो. ह्या दरवाज्यावर दात उठलेले दिसतात. अर्थात इथंही दंतकथा सांगितली जाते. एक भूतपिशाचिनी ह्या राजघराण्यावर असंतुष्ट होती. रात्री तिनं हा लोखंडी दरवाजा उघडण्याचा प्रयत्न केला; पण हा दरवाजा उघडला आला नाही. त्यामुळं पिशाचिनी खूप चिडली व ह्या दरवाजाला चावली. शक्तीचा प्रतीक असा सिंह ह्या राजवाड्यावर दिसतो. ह्या लोखंडी दरवाज्यातून आत गेल्यावर वरून भाले पडण्याची सोय होती. शत्रूची माणसं आत शिरली, की त्यांच्यावर हे भाले पडत असत. आणि शत्रूची माणसं सहजी कापली जात. किल्ल्याच्या बाजूला खंदक आहे. त्यात सदैव पाणी असतं. त्यामुळं शत्रूच्या सैन्याला आत येणं अवघड जायचं (हे पाहताना औरंगाबादच्या दौलताबाद किल्ल्याची आठवण येते.) ह्या राजवाड्यावर राजे लोकांचे व पऱ्यांचे पुतळे दिसतात. ह्या वास्तूचं बांधकाम, तेराव्या शतकात सुरू झालं व १७४८ मध्ये ह्या वास्तूचं बांधकाम पूर्ण झालं.

लोखंडी दरवाज्यातून आत शिरून जरा पुढं गेल्यावर डाव्या बाजूला एक इमारत दिसते. ह्या इमारतीवर पृथ्वीचा गोल व त्यावर क्रॉस असं प्रतीक आढळतं. पृथ्वी म्हणजे राजसत्ता व क्रॉस म्हणजे धर्मसत्ता. ह्या दोन्हींवरही आपला वचक आहे, हे राजकुमारी कार्लला दाखविण्यासाठी पेरेकोनं ही युक्ती लढविली. हिडेलबर्ग मध्ये 'नेक' नदी वाहते व हा हिडेलबर्ग किल्लाही नेक नदीच्या काठीच बांधला आहे.

इथूनच पुढं चार पावलं चालल्यावर वाईनचा महाप्रचंड बॅरल दिसतो. जर्मनीत द्राक्षांचे प्रचंड मळे आहेत व इतरही फळफळावळ विपुल प्रमाणात असल्यानं, वाईन मोठ्या प्रमाणात बनविली जाते. त्या काळी राजा, वाईनच्या रूपात करवसुली करत असे. आत खूप प्रमाणात वसूल केलेली वाईन ठेवण्यासाठी हा प्रचंड बॅरल बांधला गेला. २२१७२६ (दोन लाख एकवीस हजार सातशे सव्वीस) लिटर वाईन मावेल, एवढा हा मोठा बॅरल आहे.

इथल्या दरबारात पेरोको नावाचा एक कर्तृत्वान माणूस होता. तो उंचीनं मात्र अगदी ठेंगू होता. जो जेवढा ठेंगू होता, बरोबर त्याच उंचीचा स्टॅच्यू, ह्या बॅरलच्या पुढ्यात वर भिंतीवर दिसतो. हा पेरोको सतत वाईन पीत असे. तसंच, त्याला स्त्रियांविषयी अतिशय आकर्षण होतं. तरुण स्त्री दिसली, की तिची ओळख करून घेणं, तिची चेष्टामस्करी करणं हा त्याचा छंद होता. ह्या पेरोकोच्या पुतळ्याच्या बाजूलाच एक लाकडी पेटी टांगलेली दिसते. ह्या पेटीखाली एक रिंगवाला हूक लटकवलेला दिसतो. एखादी तरुण मुलगी राजदरबारी आली, की पेरोको

त्या तरुण मुलीला ती रिंग ओढायला सांगे. रिंग ओढली, की आतली घंटा जोरात वाजे. शिवाय आत एक मोठी खार ठेवलेली असे (खेळणं) ही रिंग ओढल्यावर ही खार एकदम पुढ्यात येई व ती मुलगी चांगलीच घाबरत असे. आमच्याबरोबरच्या एका तरुण मुलीला ती रिंग ओढायला सांगून, आमच्या गाईडनं पण आम्हांला प्रात्यक्षिक करून दाखवलं. खारोटी एकदम बाहेर आली नि ती मुलगी चांगलीच घाबरली. आम्ही सारेच हसलो.

गाईड हसला नि खारोटी दाखवत म्हणाला,

'आता ही खारोटी इतकी लहान झाली आहे, तरी वेदवती एवढी घाबरली. त्या वेळी खारोटी मोठी होती. पेरोको हीच युक्ती योजायचा व ती तरुण लावण्यवती घाबरली, की दरबारच्या लोकांची करमणूक होत असे.'

ह्या बॅरलच्या उजव्या बाजूला आम्ही आलो आणि एकदम आंबूस वास आला आणि शौकिनांचा चेहरा हसरा झाला. पाहिलं, तर तिथं टेबलावर वाईन असलेले लहान लहान ग्लासेस् ठेवलेले होते. ही वाईन पैसे देऊन घेता येते. इथूनच पुढं बॅरलच्या मागच्या बाजूला राजवाड्याची आणखी एक इमारत आहे. तिथं पूर्वी राजा व त्याच्या अनेक राण्या राहत. राजाची एक तरुण व देखणी राणी एकदा एका तरुण मुलाच्या प्रेमात पडली. एक दिवस तो तिच्याबरोबर एकांतात असताना राजा त्या वेळी नेमका शिकारीहून परत आला. राजा परत आलेला पाहून राणी चांगलीच घाबरली. तो तरुणही घाबरलेलाच होता. राणीनं त्या तरुणाला ताबडतोब पळून जायला सांगितलं. त्या तरुणानं एक लांबलचक छलांग मारली. एक टांग पुढच्या अंगणात पडली व दुसरी टांग नेक नदीत पडली. आता इतक्या जोरात उडी मारल्यावर त्या तरुणाचा बूट दाबला गेला. त्यामुळं साचा दिसावा, तशी खूण जमिनीवर उमटली. आता अशी श्रद्धा आहे, की आज ज्या कुणाचा बूट त्या साच्यात बरोबर बसेल, तो माणूस हा त्या राणीचा पूर्वीचा तरुण प्रियकर होय. हे ऐकताच सगळ्या पुरुषांत उत्साह संचारला. ज्याला त्याला आपणच राणीचा प्रियकर होतो, असं वाटू लागलं. नशिबानं एक तरुण मुलाचा बूट त्यात फिट बसला. एखाद्या म्हाताऱ्याचा बूट फिट झाला असता, तर ! जर्मनीच्या तरुण मुलींचं काही खरं नव्हतं

ह्या पटांगणातून खाली पाहिलं, की लाल कौलारू घरांचं हिडेलबर्ग गाव दिसतं. मधून मधून हिरवी झाडं डुलत असतात. समोर झुळझुळतं 'नेक' नदीचं पाणी व डाव्या बाजूला एक देखणा पूलही दिसतो. एक देखणा लॅंडस्केप ! ती रंगसंगती आम्ही डोळे भरून पाहत होतो. अशा ह्या देखण्या हिडेलबर्गला रोमॅंटिक रीजन म्हणतात.

## मर्सिडीझ बेंझ म्युझिअम

हिडेलबर्गहून तासाभरात स्टडगार्डला पोहोचलो. फ्रॅंकफर्टहून निघणाऱ्या गाड्याच हिडेलबर्गहून स्टडगार्डला जातात. स्टडगार्डला माहिती देणाऱ्या मुलीनं, कसं कसं जायचं, ते सांगितलं व स्टेशनबाहेरच बस आहे, असं सांगितलं. स्टेशनबाहेर बस-थांबा वगैरे काही नव्हतं. रस्ता क्रॉस करून आम्ही जाऊ लागलो, तर मर्सिडीज बेंझ म्यूझिअमची पाटी दिसली; पण तपास नाक्यावरचा मनुष्य आम्हांला आत जाऊ देईना. तो बाहेरून जा म्हणत होता. बाहेरून तर गाड्यांची नुसतीच ये - जा चालली होती. पुढं ब्रिज दिसत होता. थोडं चालून आम्ही डाव्या बाजूला असलेल्या गल्लीत शिरलो, तर एक मुलगी दिसली. तिला आम्ही माहिती विचारली. तेव्हा ती म्हणाली,

'इथं जरी पाटी असली, तरी इथून मर्सिडीज बेंझ म्यूझिअम खूप लांब आहे.' मग तिनं स्वत:च्या घड्याळात पाहिलं व ती म्हणाली, 'बराच उशीर झालाय्. मी तुम्हांला गाडीतून सोडते.'

इतकी छान माणसं प्रवासात भेटावी, ह्यासारखं नशीब नाही.

गाडीत बसल्यावर ती म्हणाली,

'माझे वडील मर्सिडीझमध्येच इंजिनीअर आहेत. तिनं सांगितलं, की तुम्ही, खरं तर, बॅडकॉनस्ट्रेट ह्या स्टडगार्डच्या पुढच्या स्टेशनवर उतरून ५६ नंबरच्या बसनं मर्सिडीज बेंझ म्यूझियमला जायला हवं होतं.'

जर्मनीत चौकशी खिडकीत चुकीची माहिती देण्याची पद्धत असू शकते, हे आम्हांला काय माहीत ! मी मनातल्या मनात म्हणाले.

ह्या बाबतीत जर्मनीचं भारताशी नातं जुळतं. ह्या जर्मन मुलीनं मर्सिडीज बेंझ म्यूझिअमच्या आवारातच आम्हांला सोडलं व घड्याळात पाहत म्हणाली,

'म्यूझिअमला जाणारी शेवटची बस त्या थांब्यावर थांबेल. बी क्विक् !'

आम्ही तिचे घाईगडबडीत आभार मानले. अर्थात गाडीत तिचे आभार मानत होतोच. म्यूझिअमला जाणारी शेवटची बसं आम्ही पकडली.

## गाड्यांचे विविध प्रकार

मर्सिडीझ बेंझ म्यूझिअमच्या प्रवेशद्वाराशीच बस उभी राहते. म्यूझिअमच्या प्रवेशद्वाराशीच एक वॉकमन प्रत्येकाच्या हाती मिळतो. त्यात मर्सिडीझच्या जन्मापासूनची माहिती ऐकू येते.

इथं मर्सिडीसच्या अगदी सायकलसारख्या दिसणाऱ्या गाडीपासून सुरुवात होते. मग बग्ग्यांचे विविध प्रकार दिसू लागतात. प्रत्येक वेळी थोडी थोडी सुधारणा झालेली दिसते. दोन गोलाकार मजल्यांवर ह्या गाड्या ठेवलेल्या आहेत मजल्यावर जायला गोलाकार घसरगुंड्यांप्रमाणे मजले आहेत.

गाड्यांचे इतके विविध व सुंदर नमुने अगदी पाहत राहावे, असे आहेत. आपले राजे, महाराजे ज्या प्रकारच्या गाड्यांतून बसले होते, त्या प्रकारची ऐशारामी व देखणी मॉडेल्स पाहायला मिळतात नि डोळ्यांचं पारणं फिटतं. मर्सिडीझ गाड्यांचे दीडशेहून अधिक प्रकार इथं पाहायला मिळतात.

फोटो काढण्यासाठी आम्ही ऐसपैस देखण्या व रुबाबदार गाडीशी उभ्या राहत होतो, तेव्हा क्षणभर आपणच दरबारातले मानकरी आहोत, असं वाटलं. आपण राजघराण्यातील असून, आसपास दरबार अशी आमच्या मनानं कल्पना केली. मन फुलारून आलं. किती, तरी गाड्या राजदरबारी शोभणाऱ्या आणि दिमाखदार होत्या. फोटो काढण्यासाठी ह्या गाडीशी उभी राहू, की त्या, असं होऊन गेलं. एरवी एवढ्या वैभवसंपन्न गाड्यांजवळ आपल्याला उभं राहायला तरी मिळतं ?

हा झाला मजेचा भाग. आपण वॉकमन कानाला लावून हिंडत असतो व ज्या गाड्यांशी आपण उभे राहतो, त्या वेळी त्या त्या गाड्यांची इतिहासवजा माहिती आपल्याला समजते. १८८८ साली मर्सिडीझनं मोटरबोट बनवली व कालानुक्रमे इंजिनमध्ये कसा कसा बदल होत गेला व अधिकाधिक वेगवान गाड्या कशा बनत गेल्या, ते समजतं. प्रथम ह्या गाड्या फक्त

राजे व उमरावांसारख्या लोकांनाच परवडण्यासारख्या होत्या. दुसऱ्या महायुद्धानंतर प्रचंड महागाई आलेली असतानाही, हिटलर व सर हेन्री फोर्ड ह्यांनी सामान्य लोकांना परवडतील, अशा गाड्या बनवायचं ठरवलं व त्यानंतर आज दिसणाऱ्या, 'मर्सिडीझ बेंझ' ह्या मॉडेलचा जन्म झाला.

१९८३ मध्ये रेसकारमध्ये बक्षीस मिळवलेलं मॉडेल दिसतं. तर १९८४ मध्ये ही गाडी सगळ्यांना उपलब्ध झाली, रेन्सबॅगन गाडी पस्तीस हॉर्सपॉवरची बनवली गेली. नंतर एअरक्राफ्टची जरुरी पडली, तेव्हा त्यांतही ह्या कंपनीनं आघाडी मिळवली. अशा प्रकारे ह्या कंपनीच्या सर्व प्रगतीचा इतिहास व त्या त्या वेळची ती मॉडेल्स पाहताना गंमत वाटते.

परत जाताना जर्मन मुलीनं सांगितल्याप्रमाणे आम्ही ५६ नंबरची बस पकडून बॅडकॉनस्ट्रेटला उतरलो व त्या स्टेशनवरून फ्रँकफर्टला जाणारी गाडी घेतली.

स्वित्झर्लंडला आमचं कौतुक करणारे सारे स्विस - जर्मन होते. व्हिसा फटकन देणारा जर्मन होता. आपल्या गाडीतून 'मर्सिडीझ बेंझ' म्यूझिअमला प्रेमानं नेणारी ही मुलगी जर्मनच. सारे किती सज्जन आणि प्रेमळ ! नि तरी ह्या देशात हिटलर जन्माला यावा ! की ज्या देशात माणसं प्रेमळ व सज्जन असतात, त्यांना ताब्यात घेणं सोपं जातं, त्यामुळं अशा देशात हिटलर जन्मतात ? माझ्या मनात विचार येत होते.

## जर्मन लोकांना चोरीची भीती नाही

आम्ही बॅडकॉनस्ट्रेटला गाडीत बसलो. गाडीतून जाताना दूरवर पसरलेले डोंगर लागतात. इथंही डोंगर फर व पाईन वगैरे वृक्षांनी आच्छादलेले असतात. आम्ही गाडीत बसलो, तेव्हा काही मुलं आमच्या समोरच बागेतली त्यांची छत्री, पेन वगैरे वस्तू घेऊन गेली. मात्र त्यांच्या बॅगा त्यांनी तिथंच टाकलेल्या होत्या.

मी स्वातीला म्हणाले,

'बॅगा टाकून खुशाल कुठं तरी गेली आहेत. कुणी चोरल्या, म्हणजे !'

तेवढ्यात दुसरी दोघं आली व एकजण एक बॅग घेऊन बसला.

'ही बॅग कुणाची ?' मी विचारलं.

'माझी.' तो म्हणाला.

'मग ! मघाशी तर दुसऱ्याच मुलांनी यातून छत्री वगैरे नेलं.'

त्यांनी बॅगातून पाहिलं, तेव्हा चोरी झालेली त्यांच्या लक्षात आलं. तरी ते अत्यंत शांत होते: ते गार्डकडे जाऊन चोरीची तक्रार करून आले व मग त्यांच्याकडून कळलं, की त्यांना त्या वस्तूंचे सर्व पैसे मिळणार होते. कारण जर्मन नागरिकत्व दाखविणारं कार्ड त्यांच्याजवळ होतं. ते दाखवून चोरी नोंदवली, की त्यांचं काम झालं. ते आज किती तरी दिवस अशा बॅग सीटवर ठेवून नास्ता करायला जातात ! पण त्यांच्या बॅगेतलं काहीही गेलेलं नाही. आम्हांला साऱ्याच गोष्टीचं आश्चर्य वाटलं. चोरी झाली, तरी त्याचे चक्क पैसे मिळतात ! ही तर रामराज्याचीच झलक ! पण ही झलक दिसली जर्मनीत. भारतात नव्हे.

'कुणी विद्यार्थ्यानं चोरी केली असेल...' असं ते अगदी सहजपणे बोलले व विशेष काहीच न घडल्यासारखं आपापसांत बोलत राहिले. (स्वतःच्या खिशाला खार नव्हती ना !) एक-दोन स्टेशनं झाल्यावर ते उतरले; पण मला प्रश्न पडला, इटलीतले बिलंदर चोर जर्मनीत कसे

चोऱ्या करत नाहीत ?

## एक उत्साही फ्रेंच

डब्यात आम्ही दोघीच होतो. दूरवर दिसणारे डोंगर, गर्द झाडी पाहू लागलो. तेवढ्यात डब्यात एक फ्रेंच माणूस आला. आम्ही तो हिरवागार परिसर पाहण्यात दंग झालो असता तोही उत्साहित झाला. आम्हांला ह्या परिसरासंबंधात काय काय माहिती सांगू नि काय नको, असं अगदी त्याला झालं होतं. हा माणूस धाड धाड फ्रेंचमध्ये बोलत होता; पण आम्हांला एक अक्षर कळत नव्हतं; पण तो मात्र फार दिवसांनी ओळखीचं माणूस भेटावं, तसा बोलत होता. 'फादर' असं म्हणून खुणेनं काही तरी सांगत होता. त्याअर्थी त्याचं बालपण तिथं गेलं असावं. बहुधा बऱ्याच वर्षांनी तो त्या प्रदेशाला भेटत होता आणि आपला आनंद व्यक्त करीत होता. त्याचे डोळे लुकलुकत होते. चेहरा उल्हसित झाला होता. नि किती बोलू नि किती नको असं, त्याला झालं होतं.

त्याचं ते उत्साहात बोलणं पाहून आम्ही आश्चर्यचकित झालो. (फ्रान्समध्ये सारी मोठ्या वयाची माणसं मुकी आहेत, असंच आम्हांला वाटलं होतं.) सचिवालयात साऱ्यांची कामं भराभरा होताहेत, हे ऐकून जसं आश्चर्य वाटेल, तसंच, आम्हांला आश्चर्य वाटत होतं. डोंगराच्या पलीकडे हातवारे करून तो 'स्वित्झर्लंड' म्हणत होता. त्याचा उत्साह उदंड होता. आपल्याला फ्रेंच येत नाही, ह्याचं आम्हांला वाईट वाटलं. मग त्यानं प्रेमानं आम्हांला लिमलेटच्या गोळ्या दिल्या. स्वाति गोळ्या खाते आहे, हे पाहून मी त्या गोळ्या चक्क पर्समध्ये टाकल्या. मनात आलं, घरापासून इतक्या दूर आलो आहोत, त्या गोळ्यांत काही असलं, तर ! नंतर त्या गोळ्या मी घरी गेल्यावर खाल्ल्या. खरं तर, किती तरी प्रेमानं त्यानं त्या गोळ्या दिल्या होत्या; पण मन चिंती, ते वैरी न चिंती, हेच खरं. क्रिफ्टेलला वासवानींच्या घरी जायला खूप उशीर झाला. वासवानी पती-पत्नी आमची वाट पाहत होते.

## सिंधी मुलाचा प्रताप

रात्री गप्पा मारता मारता वासवानी म्हणाले, 'इथं एक सिंधी मुलगा भारतातून आला होता. त्यानं इथल्याच एका जर्मन मुलीशी लग्न केलं. मी त्याला सांगितलं होतं, की तुला इथली मुलगी झेपणार नाही. पण माझं त्यानं ऐकलं नाही. लग्न झाल्यावर वळणावर गेला. तो इथं इतर बायकांशी संबंध ठेवू लागला. त्याच्या बायकोला कळलं, तेव्हा ती म्हणाली, मी पण काही कमी नाही. ती नर्स होती. तिनं दुसऱ्याशी संबंध ठेवले व तिला इतरांपासून झालेली मुलं पण ह्यालाच संभाळावी लागली.'

'पण दुसऱ्यापासून झालेल्या मुलांचा संभाळ ह्यानं काय म्हणून करावा ?' मी प्रश्न केला.

'कारण जर्मन कायदा आहे, की जोपर्यंत बायकोशी डायव्होर्स होत नाही, तोपर्यंत तिला झालेल्या मुलांची जबाबदारी पित्याचीच असते. नंतर ती बाई सोडून गेली व पहिल्या डायव्होर्स - नंतर त्यानं सिंधीच बायको आणली. तिला दोन मुलं झाली. एकंदर सहा मुलांचं पालनपोषण करताना त्याची अगदी फे फे उडते. कारण इथल्या राहणीमानाशी संभाळून घेणं त्याला फार अवघड जातंय्. माता व तिचा मुलांसाठी ओढा असायलाच पाहिजे वगैरे सामाजिक दडपण नसल्यानं एका पुरुषाला तिनं झकास वठणीवर आणलं.' त्यानंतर त्यांनी सांगितलं की, 'आमच्या

इथं रस्त्यावरचा केर काढणाऱ्याला तीन हजार ड्यूस मार्क इतका पगार असतो.'

आम्ही आश्चर्यानं ऐकत होतो.

रात्र बरीच झाली होती व उद्या फ्रॅंकफर्टच्याच जवळ असलेल्या 'कान्स्टेब्लरवाचे' ह्या गावी लीला शुन्नरकडे आम्हांला जायचं होतं. रात्रीच आठ वाजताच तिच्याकडे फोन करत आम्ही येतोय्, हे परत एकदा पक्कं केलं होतं. ती ऑफिसला जात असल्यानं ती घरातून बाहेर पडायच्या आत पोहोचायला हवं होतं. त्यासाठी दुसरे दिवशी लवकर उठायचं होतं, म्हणून मग आम्ही झोपायला गेलो. आमच्यासाठी आलीशान बेड्स सज्ज होते.

## लीला शुन्नर

सकाळी वासवानींकडे नाश्ता करून आम्ही फ्रॅंकफर्ट्ला जायला निघालो. क्रिफ्टेल स्टेशनवर क्रिस्टलनंच आम्हांला सोडलं. आज वासवानी पण आमच्याबरोबर होते व आमची एक बॅग व जास्तीत वजनवाली एक हॅंडबॅग ते अगदी लीलया उचलत होते. आम्हांला जे सामान खूप जड वाटत होतं, ते त्यांच्या हातात एकदम हलकं होत होतं.

फ्रॅंकफर्ट स्टेशन आलं, तेव्हा गाडीतूनच त्यांनी रिझर्व्ह बॅंकेची उंच इमारत दाखवली. नंतर जवळून पाहिली. हिचा जगातील रिझर्व्ह बॅंकेत दुसरा नंबर लागतो. नंतर वासवानी निघून गेले व आम्ही लोकल ट्रेननं 'कॉन्स्टेब्लरवाचे' ह्या पहिल्याच स्टेशनवर उतरलो. लीला फोनवर भेटली नाही; पण तिची मैत्रीण होती. ती दहा-पंधरा मिनिटांनी जाणार होती. घर तर पाचच मिनिटांच्या अंतरावर होतं. त्यामुळं आम्ही निर्धास्त होतो.

आम्हांला होस्टनं सांगितलं की,

'स्टेशनवरून बाहेर पडलात, की डाव्या बाजूला 'मेन' नदी लागेल व मग परत डाव्या बाजूला वळलात, की पाच-सात घरं ओलांडलीत, की माझं घर लागेल.'

स्टेशनवरून बाहेर पडल्यावर एक जर्मन बाईला 'मेन' नदी कुठं आहे ? असं विचारलं नि तिथचं घोटाळा झाला. तिनं सांगितलं असंच पुढं जा. पहिला डावीकडचा रस्ता वगळून दुसरा रस्ता लागेल. तिथं वळा. हा पहिला व दुसरा रस्ता लागायला बराच वेळ लागला. त्यात हा सगळा दगडी रस्ता होता. त्या दगडी रस्त्यावरून ट्रॉली खाड-खाड आवाज करत चालली होती. दुसऱ्या डाव्या बाजूच्या रस्त्यावरून बरंच चालल्यावर मेन नदी आली. काही चर्चेस्‌ही मध्ये लागले. जत्राही दिसली, पण इतकं चालताना पंधरा-वीस मिनिटं झाली नि चुकल्याची जाणीव झाली. एका बिशपसारख्या दिसणाऱ्या दुकानदाराला विचारलं, तर त्यानं ब्रिजवरून 'मेन' क्रॉस करून जायला सांगितलं. हे आणखीनच चुकीचं आहे, हे लक्षात आलं, तेव्हा सामानाशी उभी राहिले नि स्वाति डाव्या बाजूला घर शोधत-शोधत गेली. परत आली, तेव्हा तिनं सांगितलं.

'त्या बाईनं अगदी चुकीचं सांगितलं. स्टेशनवरून बाहेर पडल्यावर लगेचच डाव्या बाजूला वळायला हवं होतं.'

त्या बाईच्या चुकीच्या सांगण्यानं पाच मिनिटांचा रस्ता पंचवीस-तीस मिनिटांचा झाला होता. हे म्हणजे आंबेडकर रोड कुठंय्, म्हणून हिंदू कॉलनीत विचारलं, तर त्याला आधी माटुंग्याला पाठवायचं नि मग उजव्या बाजूला वळ, सांगायचं, तसला हा प्रकार होता.

जर्मनीत जर्मन लोक इंग्लिशमध्ये छान बोलतात, पण कायम चुकीचेच रस्ते सांगतात. मॅप

घेऊन आपणच आपले रस्ते शोधावे.

## काळी मांजरी

स्वाति घरी पोहोचली, तेव्हाच लीलाच्या 'सारा' ह्या रूमपार्टनरनं कॉफी, साखर, ब्रेड, फ्रीज वगैरे गोष्टी दाखवल्या, मुख्य दरवाज्याची किल्ली देऊन ती गेली. त्यामुळं लीला शुन्नरच्या घरी प्रवेश केला, तेव्हा घरात कुणीच नव्हतं. मात्र एक काळंकभिन्न मांजर आमच्याकडे टक लावून पाहत होतं. आम्ही आतल्या खोलीत सामान ठेवलं, तंर तिथं हे पाठोपाठ रखवालदाराप्रमाणे हजर. आमच्यावर डोळे रोखत बघत होतं. 'डोळे हे जुलमी गडे' थाटात पाहत होतं. पण आम्हांला तर त्याची भीतीच वाटली. चहाचा पुडा आमच्याबरोबर होताच. आम्ही घरी गेल्याबरोबर चहा बनवला. ते मांजर आमच्याबरोबर किचनमध्येही आलं होतं. आम्ही गप्पा मारत होतो. तेवढ्यात त्या काळ्याकभिन्न मांजरानं एकदम माझ्या मांडीवर उडी घेतली. मी चांगलीच घाबरले. कारण कुत्रा व मांजर हे फक्त त्यांच्या मालकांशी चांगले असतात. पाहुण्याला कसं बोचकारतील, त्याचा नेम नाही. मग आम्ही लीलाच्या बेडरूममध्ये गेलो, तर 'जुलमी गडे' पाठराखण सोडायला तयार नाहीत. मग आम्ही एक-दोन-तीन म्हणत पटकन साराच्या खोलीत गेलो व दरवाजा बंद केला. 'जुलमी गडे' बाहेर राहिली आणि आम्ही आराम केला.

रात्री लीलाला आम्ही मांजरीनं उडी घेतली, ते सांगितलं. तेव्हा ती म्हणाली,

'तू बोटं हलवली असशील, त्यामुळं तिला वाटलं, खेळायचंय्. तिला माणसं फार आवडतात. तिच्याशी खेळला असता, तर ती आणखी आनंदित झाली असती.'

. ..वा, रे, वा! एखाद्या भुताला आमच्याबरोबर खेळायला आवडेल, म्हणून काय आम्ही भुताबरोबर खेळायचं? ....मी मनातल्या मनात म्हटलं.

लीला आपली तिच्या काळतोंड्या मांजरीचं कौतुक करत होती आणि आम्ही त्या काळतोंडीला मनातल्या मनात शिव्या दिल्या व म्हटलं, तुझा खेळ होतो; पण आमचा जीव जातो, त्याचं काय?

## मेन नदीचा परिसर

लीलाचं घर मेन नदीच्या तीरावर असल्यानं, नदी घरातूनच दिसते. खाली उतरून रस्ता ओलांडला, की मेन अगदी समोर. मेन नदीच्या बाजूला लीला व साराच्या दोन मोठ्या बेडरूम्स आहेत व दुसऱ्या मोठं डायनिंग कम किचन व संडास बाथरूम व व्हरांडा आहे. अपार्टमेंट छान ऐसपैस आहे व त्या दोघी खर्च वाटून घेतात व एकत्र राहतात. चर्चेस्, मार्केट, नदी, स्टेशन सगळं अगदी जवळच होतं. तिच्या बायोडेटामध्ये 'नोकरी करून शिकते.' असं लिहिलं होतं नि तरी एवढा सुंदर परिसर असलेल्या अपार्टमेंटमध्ये ती राहते, ह्याचं आश्चर्य वाटलं. सारा हॉटेलमध्ये वेटर आहे. लीला पुस्तकाच्या दुकानात सेल्सगर्लचं काम करून कॉम्प्यूटर शिकते आहे.

दोघी मुली मुलीच राहत असल्यानं घरात पसारा मात्र भरपूर होता.

लीला शुन्नर किडकिडीत उंच नि 'ठीक आहे.' अशी दिसायला होती. सारा मात्र उंच, गोरी नि देखणी मुलगी होती. अर्थात त्या दिवशी रात्री मी त्या दोघींना पाहिलं.

खाणं-पिणं करून दहा मिनिटं विश्रांती घेतल्यावर त्या दिवशी आम्ही फ्रँकफर्ट पाहायला निघालो. 'दाम पॉलस्मीर' चर्च म्हणजे सेंट पॉलचं चर्च. आपल्या इथं अनेकानेक देवळं असतात, तसंच हे चर्च १७८९ मध्ये ही वास्तू बांधली. १८४८ मध्ये पहिली जर्मन लोकसभा इथं भरली. हे ह्या चर्चचं ऐतिहासिक महत्त्व. त्यानंतर स्टोन हाऊस पाहिलं. हे १४६४ साली बांधलं. इटालियन पद्धतीची ही दगडी इमारत आहे. त्याच्याजवळ 'रोमरबर्ग' ही आणखी एक ऐतिहासिक वास्तू आहे. त्याच्या उजव्या बाजूला 'रोमर' हे फ्रँकफर्टचं परंपरागत चिन्ह आहे. ही वास्तू गॉथिक पद्धतीची असून, त्याचं दर्शनी छत त्रिकोणी आहे. हे पाहताना इथली वास्तुकला खूपच प्रगत होती, हे लक्षात येतं. आपल्या इथं शिल्पकलेला प्राधान्य आहे, तर तिथं वास्तुकलेला. वास्तुकलेचे विविध प्रकार इथं पाहायला मिळतात.

ह्या चर्चला लागूनच अल्ट लिम्बर्ग, रोमर व लोस्टेन अशा तीन इमारती आहेत व त्याच्यासमोर 'न्यायाचं कारंजं' आहे. त्या काळी इथं बहुधा न्यायदानाचं कार्य होत असावं.

'दर डोम' हा आणखी एक चर्च आहे. तो ८५२ साली बांधला. तेराशेछप्पन हे जर्मनीचं सुवर्णयुग होतं. त्या वेळी जर्मन सम्राटांच्या निवडणुका इथं होत. पंधराव्या शतकात हेच चर्च गॉथिक पद्धतीचं करून मोठं केलं. ह्याच्या समोरच बगीचा आहे. तो फ्रँकफर्टचा सर्वांत जुना बगीचा आहे. युरोपात सारेच चर्च भव्य नि अवाढव्य असतात आणि त्यांचं काही ना काही वैशिष्ट्य असतंच. रोम पाहिल्यावर हे चर्च खास आकृष्ट करत नाहीत. पण बऱ्याच गोष्टी, आलोच आहोत, तर बघून घेऊ, अशा थाटाच्या असतात व आपण पाहीपर्यंत त्या अगदी छान-छान असतात.

लीला रात्री आठनंतर घरी येणार होती. इतक्या लवकर घरी जाऊन काय करायचं? म्हणून बाजारात हिंडलो, तर वस्तू भारतातल्या खिशाला परवडणाऱ्या! इटलीपेक्षा खूपच स्वस्त. जर्मन ड्यूसमार्कच्या पुढ्यात लिराला काही किंमत नाही. तरी जर्मनीत वस्तू स्वस्त कशा ? अख्ख्या युरोपात सुती कपडे मात्र भरमसाट महाग असतात. फॅशन स्ट्रीटवर वीस-तीस रुपयांना मिळणारे कपडे इथं दोनशे-दीडशे रुपयांना मिळतात.

## सारा व तिचा बॉयफ्रेंड

घरी गेल्यावर लीला व सारा भेटल्या. सारा तिच्या बॉयफ्रेंडबरोबर गप्पा मारण्यात दंग होती. लीलाशीच खरी भेटगाठ झाली. घरी गेल्यावर भूक लागली होती. प्रथम मी चहा केला त्या वेळी सारा व तिचा बॉयफ्रेंड काही तरी बोलण्यात गुंतले होते. ती दोघं साराच्या बेडरूममध्ये गेली. लीलानं कांद्याची चव असलेले बटाटा वेफर्स आणले होते. त्याचा आम्ही फन्ना उडवला. स्वातीनं विचारलं,

'साराकडे कोण आलं आहे?'

'तिचा एकच बॉयफ्रेंड दिसला.' मी म्हणाले.

'असं होय?' स्वाति म्हणाली.

'तिचा बॉयफ्रेंड गोड चेहऱ्याचा व बुटका आहे.' मी.

तेवढ्यात सारा व तिचा बॉयफ्रेंड स्वयंपाकघरात आले.

'हॅलो, मी सारा...' म्हणून सारानं आपली ओळख करून दिली. आम्हीही आमची ओळख करून दिली. मग तो बॉयफ्रेंड स्वत:ची ओळख करून देत म्हणाला,

'मी सिल्विया.'

तेव्हा डोक्यात प्रकाश पडला, की ही साराची मैत्रीण आहे, म्हणून! हिचा शरीराचा आकारही पुरुषीच!

## फायर वर्क

'आज खाली फायर वर्क होणार आहे. तुम्ही पाहायला येणार?' लीलानं विचारलं.

'होऽऽ' आम्हीही उत्साहानं सांगितलं.

तिथं एक महिनाभर जत्रा भरली होती. ती आम्ही पहिल्या दिवशीच पाहिली. त्या जत्रेचा सांगता समारंभ म्हणून हे फायर वर्क होणार होतं. फायर वर्क बघायला आम्ही पाचीजणी खाली उतरलो. सारा छान मॉड होती. तिनं बरोबर बीअरची बाटली पण घेतली होती. मेन नदीकाठी फायर वर्क होणार होतं. ते पाहायचं होतं. पण गर्दी अतोनात होती. फायर वर्क दिसणं अवघड होतं. आम्ही दोघी व लीला त्यांच्या घरी परत गेलो व लीलाच्या बेडरूममधूनच फायरवर्क पाहिलं. इथलं फायर वर्क अत्यंत विलोभनीय वाटलं. फटाके आकाशात उडून मग आकाशात त्यांची चंदेरी झाडं तयार होत होती. आकाशात उडाल्यानंतर त्याचे विविध चंदेरी मोठे मोठे प्रकार आम्ही प्रथमच पाहत होतो. कधी चंद्रज्योतींची झाडं दिसत होती, तर कधी चंद्रज्योती मोठ्या चांदणीसारखा आकार घेत. हे विविध आकार आकाशातच दिसत असल्यानं लीलाच्या खिडकीतून ते फार छान दिसले.

फायर वर्क पाहून झाल्यावर आम्ही तिघी गप्पा मारीत बसलो. ती कॉम्प्यूटर शिकते व बुकशॉपमध्ये काम करते, तरी तिच्याकडे गाडी होती. त्या दिवशी बुकशॉपमध्ये जायचं नव्हतं, म्हणून ती लवकरच घरी आली होती.

## अरब बाप

लीलाचा बाप अरब व आई जर्मन होती. तिची आई केमिस्ट होती व बाप इंजिनीअर. बाप जुन्या मतांचा आहे. पुरुषाचं मन चळू नये, म्हणून आईनं बुरखा घालावा, असं त्यांचं मत होतं. अशा मतांच्या भिन्नतेमुळं लीला दोन वर्षांची असतानाचा आईनं डायव्होर्स घेतला. लीला दोन वर्षाची असतानाच तिला किडनॅप करण्याची बापानं आईला धमकी दिली होती. त्यामुळं आई सतत घाबरलेली असायची. लीलाला कुठंही एकटं राहायला आईला भीती वाटायची. नोकरीला जाताना लीलाला किंडर गार्डनमध्ये ठेवलं जायचं, ते सुद्धा शिक्षकांना व प्रिन्सिपॉलला विश्वासात घेऊन. नंतर लीला नऊ वर्षांची झाली, तेव्हा तिला हा अरब बाप भेटला. तो तिचा सख्खा बाप, तिला एखाद्या अनोळखी पुरुषासारखा वाटला.

'पण मग तेव्हा तुला त्यानं पळवून नेलं नाही?' मी विचारलं.

'नाही, कारण मी त्याच्याकडे जायला तयारच नव्हते. तोपर्यंत त्यानंही दुसरं लग्न केलं होतं. लहानपणी मी माझ्या सावत्र बापाकडेच वाढले होते.'

'सावत्र बाप काय करतो?' स्वातीनं विचारलं.

'तो फोटोग्राफर आहे.'

'सावत्र बापाबरोबर तरी दिवस सुखाचे गेले का ?'

'सुरुवातीचे दिवस छान गेले; पण मी दहा वर्षांची होते. तेव्हा मला सावत्र बहीण झाली. नि

पुढं पुढं माझा बाप माझ्या फक्त बहिणीचंच कौतुक करायचा, तेव्हा माझे त्याच्याशी खटके उडू लागले. अठरा वर्षांची मी जेव्हा झाले, तेव्हा मी एकटं राहणंच पसंत केलं. माझ्या आईला माझं एकटं राहणंच पसंत नव्हतं. पण माझ्या सावत्र बापाशी माझं पटणं अशक्य झालं, तेव्हा मी घराबाहेर पडले.'

'तुला तुझ्या सख्ख्या बापाची पैशाबाबत तरी काही मदत झाली का ?' मी विचारलं.

'मला त्यानं पैसे दिले, तरी नकोत. मी त्याचा तिरस्कार करते.' लीला एकदम चिडीला येत म्हणाली. मग म्हणाली, 'माझ्या सावत्र बापानं मला मदत केली, तर ती एक वेळ मी घेईन, पण माझा सख्खा बाप मला अजिबात आवडत नाही.'

'का, ग ? तो तुझा सख्खा बाप असून !' मी जरा आश्चर्यानं विचारलं.

'ह्यांचे पैसे घ्यायचे, म्हणजे त्यांच्या घरी पण राहायला जायला हवं. अजूनही स्त्रियांनी गोशात राहावं, अशी विचारसरणी, माझ्या बापाची नि काकांची आहे.'

तेवढ्यात ती मांजरी उड्या मारू लागली. मघापासून ती तिथं होतीच. ती आता आमच्या फारच जवळ जवळ करू लागली. तेव्हा लीलानं मांजरीला आपल्या मांडीवर घेतलं.

लीलाची आई आता वारली आहे. त्यामुळं तो उरला सुरला बंधही आता तुटला आहे. आता तिच्या सख्ख्या बापानं एका अरब बाईशी लग्न केलं आहे व सावत्र बाप आता तिच्या सावत्र बहिणीबरोबर राहतो. त्याला दोन मुलगे व एक मुलगी आहे.

लीला चिडून म्हणाली,

'स्त्रियांना स्वातंत्र्य असावं, त्यांना समान हक्क असावेत. त्यांना बरोबरीनं वागवावं, हे सारं पुस्तकातच राहतं. तसं प्रत्यक्ष कुणी वागत नाही.'

'का ? तुझा जर्मन बाप तरी पुढारलेल्या विचाराचाच असेल ना ?'

'त्याचे आईशी खटके होत. त्याला मी थोडी सलतच होते.'

लीला प्रचंड अस्वस्थ झाली होती. अरब बापाचे 'गोशा' वगैरे तिच्या स्वतंत्र मनाला चीड आणणारे होते. सावत्र बाप आवडत होता; पण त्याला ही जवळची वाटत नव्हती. मी तेवढ्यात तिला विचारलं,

'इथं कामाची वाटणी कशी होते ? नोकरी करणाऱ्या स्त्रीला तिचा नवरा मदत करतो का?'

'एखादा पुरुष करतोही. पण बहुधा बाईलाच नोकरी, घरकाम व मुलांची देखरेख ह्या तीनही बाजू सांभाळाव्या लागतात. माझ्या आईलाच ही सारी कामं करावी लागायची. माझा सावत्र बाप मदत मुळीच करायचा नाही. माझ्या कोणत्याच बापानं आईला मदत केलेली नाही. ही सारी तारेवरची कसरत करत आम्हांला संभाळताना माझ्या आईला फार त्रास सोसावा लागला. श्रीमंत घरीच नवरे थोडं-फार तरी काम करतात.' लीला सांगत होती.

एवढ्या पुढारलेल्या जर्मनीतही नवरे जवळपास भारताप्रमाणेच असावेत, ह्याचं आश्चर्य वाटलं.

लीलाच्या पुढारलेल्या मनात पुरुषी अरेरावीचा फार त्रास होत होता. त्यामुळं लीलाला लग्न ह्या विषयाची ओढ वाटत नव्हती. नंतर चिडून ती म्हणाली,

'खालच्या पातळीवरच्या लोकांना खालीच ठेवलं जातं व त्यांच्या घरची परिस्थिती इतकी बिकट असते, की त्यांना वर येण्यास तशा संधीच नसतात.'

तेव्हा मी आश्चर्यानं विचारलं,

'पण केर काढणाऱ्या इथं तीन हजार ड्यूसमार्क पगार असतो ना ?'

'असलं काम करायला कुणाला आवडत नाही, म्हणून त्या कामाला जास्त पगार असतो. एरवी इतके पगार मिळत नाहीत.'

## मांजरीचीच खोली

रात्री अंग हलवलं, की ती मांजरी जवळ येत होती. मला तर तिची प्रचंड भीतीच वाटत होती. ती खोली लीला शुन्नरची होती. लीला वर झोपत असे व त्या मांजरीचा बिछाना त्या खोलीतच आमच्या जवळ होता. खरं तर, खोली त्या मांजरीचीही होती व आम्हीच उपरे होतो. त्यामुळं त्या मांजरीचा सहवास स्वीकारणं भाग होतं.

रात्री स्वाति कण्हल्याचा आवाज येऊन जाग आली. स्वातीला परत ताप आला होता. मी क्रोसिनची गोळी शोधत होते. स्वातीच्या त्या डॉक्टर क्लायंटमुळं इतक्या प्रचंड गोळ्यांचा साठा बरोबर होता की, गोळीचा शोधच घ्यावा लागायचा.

तेवढ्यात लीला शुन्नरलाही जाग आली. तिनं विचारलं,

'काय झालं ?'

'स्वातीला ताप आलाय्. मला क्रोसिन सापडत नाहीये.'

'थांब, मी देते.' म्हणत ती उठली. उन्हाळा असल्यानं तिनं फक्त शॉर्टस् घातले होते. वर काहीच नाही. तरी ती शांतपणे उठली व तिनं गोळी दिली. म्हणजे मुली मुलीच एकत्र राहत असतील, तर ही बाब सहज असावी.

झोपताना लीलानं बाथरूमचं दार उघडं ठेवायला सांगितलं होतं. कारण मांजरीची, संडास बाथरूम तिथंच होती. वाळूत बनवलेली अशी तिची मूत्रविसर्जनाची व्यवस्था होती व कमोडवर बसून मांजरी संडास करायची.

सकाळी मांजरी ह्या खोलीत एकसारखी का तडमडत होती, ते समजलं. कारण तिच्या झोपायच्या जागीच आम्ही आमच्या बॅगा ठेवल्या होत्या. त्यामुळं मांजरीच मनात म्हणत असेल, की हे का माझ्या जागी तडफडताहेत ? पण तसंही नाही. कारण मांजरीला तर आमच्याविषयी भयंकर प्रेम वाटत होतं.

दुसरे दिवशी फक्त 'कोलन' लाच जायच असल्यानं आम्ही आरामात उठलो. बाथरूममध्ये लीला आंघोळ करत होती. म्हणून आम्ही बाहेर थांबलो होतो. पण सारा उठली नि बाथरूमचा दरवाजा उघडून बाथरूममध्ये नंबर टू साठी गेली. आत दोघी अगदी मजेत मनमोकळ्या गप्पा मारत होत्या. 'अय्या' नाही नि 'उय्या' नाही किती सहजपणे चाललं होतं सगळं.

नंतर लीला लगेचच तिच्या कॉम्प्यूटर कोर्ससाठी गेली. अंग धुऊन चहा, ब्रेड, बटर, सफरचंद असा नाश्ता करून आम्ही कोलनचा डॉम कॅथेड्रल पाहायला निघालो. फ्रँकफर्ट ते कोलन हा प्रवास अतिशय सुंदर आहे. उजव्या बाजूला सतत ऱ्हाईन नदी वाहत जाताना दिसते. दोन अडीच तास सतत ही वाहती नदी दिसत राहते. मध्येच नदीपलीकडे डोंगर दिसतात. मध्येच लुप्त होतात. अधून-मधून बोटी दिसतात. समुद्रातून दिवसभर बोटीत बसून कोकणात जाण्याचा अनुभव अनेकदा घेतला. पण रेल्वेत बसून अशी लांबलचक नदी पाहण्याचा अनुभव पहिल्यांदाच घेत होतो. शिवाय अधून-मधून द्राक्षांचे मळेही दिसत होतेच. हा प्रवास संपूच

नयेसं वाटत होतं.

कोलनच्या स्टेशनवरून उतरल्यावर, चौकशी केल्यावर माहिती देणाऱ्या तरुणीन 'डॉम कॅथेड्रल' समोरच असल्याचं सांगितलं. त्याच्या मागच्या बाजूला ॲम हॉफ रस्त्यावर ऱ्हाईन नदी असल्याची माहिती दिली.

## ऱ्हाईनचा शोध – चुकीचा रस्ता

कॅथेड्रलच्या आवारात नुकताच गाण्याचा प्रोग्रॅम झाला असावा. त्याची आवराआवर चालली होती. ती पाहत-पाहत आम्ही कॅथेड्रलच्या पायऱ्या उतरलो. आधी ऱ्हाईन नदी पाहून नंतर कॅथेड्रल हवा तेवढा वेळ पाहावा, असा सुज्ञ विचार केला होता. मी तेवढ्यात स्वातीला विचारलं,

'कॅथेड्रलचं तोंड कुठलं ?'

परत कॅथेड्रलचं आवार ओलांडून कॅथेड्रलचं तोंड कुठलं, ते पाहणं जिवावर आलं होतं. तेवढ्यात स्वाति म्हणाली,

'हा बघ ॲम हॉफ रस्ता आला.'

आम्ही त्या रस्त्यावरून चालत गेलो. पण चालता चालता दगडी रस्ता संपला, तेव्हा शंका आली. कारण युरोपमध्ये नदी, राजवाडा, खास एखादा चौक वा चर्च असेल, तर त्या अवतीभवती सर्वदूर दगडी फरश्यांचा रस्ता असतो. समोर पाहिलं, तर जरा पुढं एक रेल्वेलाईन जात होती.

एक - दोघांना 'ऱ्हाईन नदी कुठं आहे ?' म्हणून विचारलं, 'तर एक दीड मैल लांब आहे.' म्हणून त्यांनी सांगितलं.

'जर्मन लोक चुकीचे रस्ते सांगतात.' मी ठामपणे म्हणाले.

जिथं दगडी रस्ता, तिथंच जवळ नदी असणार, हा माझा ठोकताळा होता. तेव्हा मी म्हणाले,

'आपण असेच मागे जाऊ व सरळ आलो, ते आडवे जाऊ. नदी नक्की भेटेल.'

घडलं तसंच. आडवं गेल्यावर ऱ्हाईन नदी समोर वाहत होती. रस्ता चुकलो खरं, पण चांगलं झालं. रस्ता हिंडता-हिंडता सहज आईस्क्रीमची चौकशी केली, तर अर्ध्या डचूसमार्कमध्ये छान चविष्ट आईस्क्रीम होतं. भरपूर आईस्क्रीम खाऊन थंडगार झालो नि मजेत ऱ्हाईन नदी पाहत राहिलो.

ऱ्हाईन नदीवरून बोटीनं फ्रँकफर्टला जाता येतं. इतक्या ह्या नद्या विस्तीर्ण आणि खोल असतात. बोटीनं कितीदा तरी प्रवास केला आहे. पण नदीच्या तीरानं रेल्वेनं दीड-दोन तास प्रवास करत नदी पाहणं हा अनुभव नवीन होता. त्यामुळं आम्ही परतीचा प्रवासही रेल्वेनंच करायचा, असं ठरवलं.

ऱ्हाईन नदीवर येणाऱ्या-जाणाऱ्या बोटी पाहून झाल्यावर 'डॉम कॅथेड्रल, पाहायला गेलो. नदी पाहत-पाहत थोडं चालल्यावर चार पायऱ्या डॉम कॅथेड्रल लागलं. म्हणजे ऱ्हाईन नदीच्या काठावरच डॉम कॅथेड्रल होतं ! अर्थात एखाद्या जत्रेप्रमाणं कोलनची दुकानं पाहण्यातही गंमत वाटली होती.

## डॉम कॅथेड्रल

कोलनला 'फर्स्ट सिटी ऑफ ऱ्हाईन लॅंड' म्हणतात व हे डॉम कॅथेड्रल हे जगातील दुसऱ्या

नंबरचं कॅथेड्रल आहे. ह्याची आकाशात पोहोचलेली उंची पाहताना थक्क व्हायला होतं. त्या वेळी रोमच्या पीटर्स चर्चची आठवण होते. आपल्या कॅमेऱ्यात ही उंची येणार नाही, ह्याची चुटपुट वाटते.

एकावर एक कमानीवर कमानी रचल्यासारख्या कॅथेड्रलच्या उभट खिडक्या मन वेधून घेतात. आत गेल्यावर उंच उंच कमानी एकत्र आलेल्या छान दिसतात. गॉथिक वास्तुकलेमधलं हे बांधकाम आहे. खिडक्यांचं ग्लासपेंटिंगही अतिशय सुंदर आहे. ह्या काचांचं विशेषत्व म्हणजे, त्याची काढघाल करता येते. आत मध्यावर थ्री मॅगी श्राईन दिसते. ह्या श्राईनच्या आत मृतांच्या अस्थी ठेवलेल्या आहेत. थ्री श्राईन ही सोन्याची असून तिचं नक्षीकाम अत्यंत नाजूक आहे. त्यामागे स्टीफन लॉनरचं भलं मोठं पेंटिंग आहे. स्टीफन लॉनर हा कोलनचा प्रसिद्ध चित्रकार होता.

कोलनचा हा अतिभव्य चर्च पाहताना थक्क व्हायला होतं. जर्मनीत बॉंबिंगमध्ये बरीच पडझड झाली. पण हा जसाच्या तसा उभा आहे. बांधकामाच्या पक्केपणाचं कौतुक वाटलं. नाही तर आमचा भायखळा ब्रिज बांधून व्हायच्या आधीच पडतो. मात्र कॅथेड्रलच्या आवारातच कॅमेरा रोल घेतला, तर आम्हांला बनावट रोल मिळाला. चर्चच्या आवारातच उल्हासनगरची डोकी !

थ्री मॅगी श्राईन सोन्याची असल्यानं ते चमचमतं सोनं पाहत राहावंसं वाटतं. बाजूच्या चबुतऱ्यातूनही निरनिराळ्या कार्डिनलच्या अस्थी पुरलेल्या आहेत व त्यांवर त्यांचे पुतळे आहेत. ह्या मध्य वेदीच्या दोन्ही बाजूंना चार चार उंच खांब आहेत व दोन्ही बाजूंच्या चौथ्या खांबांच्या डाव्या बाजूला व उजव्या बाजूला चार चार खांब अशी ह्या चर्चची रचना आहे. ह्या खांबांच्या पुढच्यात सभागृह दिसतं. ह्या मध्य वेदीच्या बाजूच्या ज्या फरश्या आहेत, त्या फरश्यांतल्या गोलाकार डिझाइन्समध्ये प्रत्येक कार्डिनलच्या वेगवेगळ्या शुभचिन्हांची ती प्रतीकं आहेत.

'ओ दी कोलन' ह्या सेंटचा जन्म कोलनमधलाच. इथल्या एका धनाढ्य व्यापाऱ्याच्या मुलाचा दुसऱ्या एका धनाढ्य व्यापाऱ्याच्या मुलीशी विवाह झाला. तेव्हा कॅथड्रलच्या पोपला आमंत्रण होतं. त्यानं दाम्पत्याला शुभशीर्वादाच्या स्वरूपात ह्या 'ओ दी कोलन' चा फॉर्म्युला दिला. ह्या कुटुंबानं तो फॉर्म्युला गुप्त ठेवला व पुढं त्याचा व्यापारी तत्त्वावर उपयोग केला. आज पण 'कलोन वॉटर'चा फॉर्म्युला ह्या परिवाराजवळच आहे.

डॉम कॅथेड्रलच्या जवळच 'लुडविक म्यूझिअम' आहे. इथंच कोलनचा 'कॉन्सर्ट हॉल' आहे. लुडविकमध्ये जगातील अनेक उत्तम पेंटिंग्ज ठेवलेली आहेत. तर 'रोमन जर्मनिक म्यूझिअम'मध्ये कोलनचा दोन हजार वर्षांचा इतिहास पाहायला मिळतो. 'ॲग्रीप्पीना' ह्या सम्राज्ञीनं पन्नासाव्या साली 'कोलोनिया' हे वेगळं शहर म्हणून जाहीर केलं. तोही इतिहास इथं दिसतो.

घरी जाताना कोलन ते फ्रँकफर्ट हा सुखद प्रवास झाला. ऱ्हाईनचा विस्तीर्ण सुखद प्रवास पुन्हा एकदा करत होतो. मोठ्या बोटी व लांबून खेळणं वाटतील, अशा, एक माणूस बसेल, एवढ्या छोट्या नावा पण दिसत होत्या. द्राक्षांचे मळे व डोंगर ह्यांतून ऱ्हाईनचं सौदर्य पाहत घरी गेलो. लीला घरी आलेलीच होती. वास्तविक ती अभ्यास व नोकरीत गर्क असल्यानं ती आम्हांला भेटू शकणार नाही, असं तिनं आम्हांला सांगितलं होतं. तरी ती दर दिवशी लवकर येत होती नि आमच्याशी गप्पा मारीत होती. बहुधा पाश्चात्त्य देशात आमच्यासारखी रिकामटेकडी माणसं

गप्पा मारायला मिळत नसावी.

## जर्मनीतली स्वस्ताई

रात्री दूध, कडधान्यं, पाव, चीज ब्रेड वगैरे खायला होतं. लीला उकडलेलं मांस, बटर लावून खात होती. साराला नाईट ड्यूटी होती..

लीला शुन्नर जर्मन सरकारला, तिथल्या व्यवस्थेला नावं ठेवत होती.

तिथं दुधाला एक लिटरसाठी दीड ड्यूसमार्क द्यावा लागतो. ते पाहून मी त्या दिवशी पावाबरोबर दूध घेता घेता म्हटलं,

'इथं दूध किती स्वस्त आहे.'

तेव्हा ती खवळली नि म्हणाली,

'पण आमच्या इथं भाडं किती महाग आहे. आम्हांला ह्या फ्लॅटला ६०० ड्यूसमार्क द्यावे लागतात.'

ते ऐकून मला तर तो फ्लॅट भलताच स्वस्त वाटला. फ्रँकफर्टपासून लोकलनं एक स्टेशन लांब (म्हणजे आपलं मरीनलाईन्स) असं हे कॉन्स्टेब्लरवाचे. शिवाय स्टेशनपासून पाच मिनिटांच्या अंतरावर व तेही 'मेन' नदीच्या काठी इतका सुंदर फ्लॅट. आपल्या इथं, एक हॉटेलची वेटर व पुस्तकाच्या दुकानात पार्ट टाईम काम करणारी एक सेल्सगर्ल असा फ्लॅट भाड्यानं घेऊ शकतील ? आणि आम्ही ! 'शीव'ला राहूनही स्वत:ला खूप सुखी मानतो. (ठेविले अनंते तैसेचि राहावे ! असं म्हणत.)

सगळ्या जगाशी कुरकुर करणारी लीला आमच्याशी मात्र खूप चांगली वागत होती. ती स्वातीला विचारत होती,

'तू अजून आईजवळ कशी राहतेस ? वेगळं कसं राहत नाहीस ?'

'का ? मला आई-वडिलांजवळच राहायला आवडतं.'

'मी अठरा वर्षांपासून वेगळं राहते. मला आई-वडिलांजवळ इतक्या मोठेपणी राहणं ही कल्पनाच सहज होत नाही.' लीला म्हणाली.

'मला तर आई-वडिलांशिवाय चैन पडत नाही. शिवाय आई गरम गरम जेवण बनवते.'

'आईनंच स्वयंपाक का करायचा ?' तिचा प्रश्न.

'पण मला तरी दुसरा उद्योग काय आहे ?' मी म्हणाले.

'म्हणून स्वयंपाक हा तुझा आवडीचा उद्योग आहे ?' लीला उसळून म्हणाली.

'पण तुझी आई तर स्वयंपाक व नोकरी दोन्हीही उद्योग करायची ना ?' मी शांतपणे विचारलं.

'कारण माझे दोनही बाप चांगले नव्हते.' लीला म्हणाली. मग पुढं म्हणाली, 'माझी आईही माझ्या पुढ्यात तयार जेवण ठेवायची. पण स्वातंत्र्य, ते स्वातंत्र्यच !'

'स्वातंत्र्य म्हणजे तुला नेमकं काय अपेक्षित आहे ?' स्वातीनं विचारलं.

'आपल्या आवडी-नावडी वेगळ्या असतात. आपण रात्री अपरात्री केव्हाही येऊ शकतो. अर्थात आम्ही मैत्रिणी मैत्रिणी राहतो, हे आमच्या घरच्यांना पसंत नाही. मी एखाद्या बॉयफ्रेंडबरोबर राहते, तर ते त्यांना अधिक आवडलं असतं.' लीला म्हणाली.

परदेशात लेस्बियनचं प्रमाण वाढत असल्यानं कदाचित आई-वडिलांना मैत्रिणी मैत्रिणी

राहण आवडत नसावं, असं मला वाटलं, लीलासमोर हे बोलले असते, तर ! अरे, बाप, रे !

## लीलाची कुरकुर

जेवणानंतर आम्ही लीलाच्या खोलीत बसलो होतो. त्या वेळी ती काळी मांजरी सारखी आमच्याजवळ येत होती. स्वाति मांजरीकडे बघत म्हणाली,

'हिनं काल धड झोपू दिलं नाही.'

तेव्हा लीलाला, कालचं स्वातीचं बरं नसण्याचं भान आलं. किंवा आपल्या मांजरीला कुणी बोलू नये, ह्याची जाणीव झाली. म्हणून ती म्हणाली,

'मी तिला आधी खेळवते, मग ती त्रास देणार नाही.'

मग तिनं एक साखळी घेतली. लीला ती साखळी हलवून सारखी इकडे तिकडे न्यायची व मांजरी, साखळी पकडण्यासाठी साखळी मागोमाग उडी मारून जायची. खूप वेळ खेळल्यावर मांजरी खूश झाली व मग तिनं आम्हांला अजिबात त्रास दिला नाही.

लीला, अठरा वर्षांची झाल्यावर स्वतंत्र राहू लागली. नंतर तिच्या अभ्यासाचा वगैरे सर्व खर्च कुणी केला, ह्याबाबत मला उत्सुकता होती. म्हणून मी तिला विचारलं,

'अठरा वर्षांनंतर तू नोकरी केलीस, की स्टेट्सकडून तुमच्या शिक्षणाचा खर्च केला जातो ?'

'नाही. माझा बाप जर्मन नाही. स्टेट्सकडून ६०० डचूसमार्क शिक्षणासाठी मिळतात व चोवीस वर्षांनंतर ते परत फेडायचे असतात. सावत्र बापानं दोन वर्षं ते पैसे फेडले; पण नंतर ते मलाच फेडावे लागले. मी अठरा वर्षांची असताना बाहेर पडले, ते माझ्या आईला पसंत नव्हतं. ती मला सारखी बोलवत होती.' लीला म्हणाली.

तोपर्यंत गादीवर पलंगपोस अंथरून मग गादीवर बसून हातात उशी घेत स्वातीनं विचारलं,

'मग तू आईकडे का गेली नाहीस ?'

'माझं माझ्या सावत्र बापाशी तेव्हा माझं पटलं नव्हतं. त्या वेळी माझ्या आठ वर्षांच्या सावत्र बहिणीचं सावत्रबाप कौतुक करायचा व मला हिडीसफिडीस करायचा.'

'म्हणजे तुझ्या आईचीही पंचाईतच ! लग्न केलं नसतं, तर तुझ्या बापानं तुला किडनॅप केलं असतं. लग्न झाल्यावर संरक्षण मिळालं; पण तुमच्या दोघांचं पटलंच नाही.'

'माझी सावत्र बहीण होईपर्यंत माझा सावत्र बाप माझ्याशी खूपच छान वागायचा. पण माझा सख्खा बाप मात्र महावाईट मनुष्य.' लीला कमालीची अस्वस्थ होत म्हणाली.

'बरं, आता तुला नवरा चांगला मिळू दे.' मी तिला आशीर्वाद दिला.

'छे. छे. मला लग्न करायची तर मुळीच इच्छा नाही. मात्र, स्वाति, मला तुझ्यासारखं आईवडिलांबरोबर राहायला नाही आवडणार.'

शेवटी ज्या त्या देशातील संस्कारांचा हा परिणाम असावा, असं लक्षात घेऊन आम्ही फार वाद घातला नाही. झोप अगदी डोळ्यांवर उतरली होती. एकेक कधी झोपून गेलो, ते कळलंच नाही.

सकाळी त्या दोघींना लवकर जायचं होतं. लीलानं तिची किल्ली आमच्याकडे दिली होती. त्या गेल्यानंतर आम्ही आमचं सगळं सावकाश आटोपलं. मेन नदीवर थोडं भटकूनही आलो. जायच्या सुमारास बाहेरून दरवाजा ओढून घेऊन फटीतून किल्ली आत टाकली व मग आमच्या मनात हॉलंडला जायचे बेत सुरू झाले

## फ्रँकफर्ट स्टेशनवर पाकिस्तानी

स्वातीची तब्येत जरा बेताचीच होती, म्हणून मी सर्व सामानाची जबाबदारी माझ्यावर घेतली. एक बेताची बॅग व दोन हँडबॅगा हे सर्व सामान छोटया ट्रॉलीवर ठेवून ती मी ढकलत स्टेशनवर नेली. पण तिथल्या एस्कलेटरवरून ट्रॉली गडगडली नि मोडली. खरं तर, पहिल्या दिवशी दगडी फरश्यांच्या रस्त्यावरून ट्रॉली नेताना मुळात अधू झाली होती. युरोपच्या प्रवासात हया नाजूक ट्रॉलीचा तितकासा उपयोग होत नाही. कारण इथं चौकच्या चौक व काही रस्ते सुद्धा दगडी फरश्यांचे, खडबडीत असतात. त्यावरून ट्रॉली नीट ढकलताच येत नाही. मग दोघींनी मिळून ते सामान एकदाचं स्टेशनवर नेलं व तिथून गाडी बदलून फँकफर्टला नेलं.

आमची गाडी ३.४७ ला होती नि आम्ही दोन वाजताच पोचलो. मग एकेकटया स्टेशनवर भटकून आलो, तरी वेळ जाईना. थोडं खायला आणलं, तेही खाऊन झालं होतं. इतक्यात आमच्या शेजारी बसलेल्या एकानं हिंदीत विचारलं,

'आप किधर जा रहे हैं ?'

त्याचा हिंदीमध्ये प्रश्न ऐकून खूप आश्चर्य वाटलं. एक भारतीय भेटल्याचा आनंदही झाला. आम्ही काही उत्तर देण्याअगोदर त्यानं विचारलं,

'आपण पाकिस्तानी ?'

'नाही. इंडियन. आपण ?'

'पाकिस्तानी.'

'पाकिस्तानी' म्हटल्यावर, एकदम मध्ये चार कोस अंतर वाटू लागलं.

'आप किधर जा रही हैं ?'

'ॲमस्टरडॅम.'

'दो दिन के लिये हमारे घर चलो. आपका स्वागत करेंगे. कुछ खरेदी करेंगे.' त्याचा प्रेमळ आग्रह चालू होता.

स्वाति पटकन म्हणाली,

'नहीं, जी. हमारा होस्ट बाट जोहता रहेगा !'

वास्तविक आम्ही ॲमस्टरडॅमला फोन करून नंतर जाऊ शकलो असतो.: पण ज्याची ओळख ना देख, त्याच्या घरी आम्ही एकदम कसे जाणार होतो ? शिवाय पाकिस्तानी, ही मनात धाकधूक होतीच. अर्थात अनोळखी भारतीय असता, तरी आम्ही गेलो नसतो. आम्ही त्याला स्पष्ट नकार दिला.

पण बरीच वर्षं जर्मनीत राहिल्यानं त्याला मात्र बऱ्याच दिवसांनी, हिन्दी बोलणारे आम्ही भेटल्यानं आमच्याविषयी जिव्हाळा वाटत होता. जरा वेळानं तो म्हणाला,

'मग स्टेशनवरच काही खायला - प्यायला चला.'

'नहीं, जी. ये सामान है। इसे रख के कैसे जायेंगे ?' आम्ही अडचण सांगितली व आम्ही इकडच्या तिकडच्या गप्पा मारू लागलो.

तेवढ्यात त्याचा पुतण्या आला नि तो म्हणाला,

'माझा पुतण्या इथं सामानाशी थांबेल. ज्यूस वगैरे तुम्ही काही तरी घ्याच.'

स्वाति नको म्हणत होती. मला आग्रह मोडवेना.

स्वाति अजिबात उत्सुक नव्हती.

इतकं प्रेमानं बोलावल्यावर न जाणं प्रतिगामी वाटत होतं. मी, 'जाऊ या' म्हटलं. स्टेशनवरच ज्यूस सेंटरपाशी गेलो.

आपलं सामान त्या पुतण्यानं पळवलं, तर ? .. मनात आलं. 'पायनॅपल' ज्यूस सांगितला होता; पण तो मिळेपर्यंत चार पावलं टाकत, पुतण्या सामानाशी आहे ना, पाहिलं. पायनॅपल ज्यूस कसाबसा प्याला आणि फिरून पुतण्या जागेवर आहे ना, पाहिला. इतक्या प्रेमानं दिलेला ज्यूस, खरं तर, कसाबसा ढोसला. ज्यूस पिता पिता पुरोगामित्व गेलं खड्ड्यात, असंही मनात आलं.

'कुछ खायेंगे ?' पाकिस्तानी प्रेमळपणे विचारीत होता.

'पेट में बिलकुल जगह नहीं. .' म्हटलं नि पाच-सात पावलं टाकत टेहळणी केली. एक बरं होतं, तेव्हा भारतात बॉम्ब वगैरे फुटत नव्हते. नाही तर तो पुतण्या बॅगेत बाँब ठेवेल, अशी भीती वाटली असती.

नंतर त्यानं व त्याच्या पुतण्यानं आमचं सामान, ॲमस्टरडॅमला जाणाऱ्या गाडीच्या फर्स्टक्लासपाशी नेऊन दिलं. खरं तर, ते दोघे प्रेमळ वाटत होते. पण ते पाकिस्तानी असल्यानं ते बरोबर असणं मुळीच सुखाचं वाटत नव्हतं. त्यातून आपल्याला ते काफर मानतात. 'काही झालं, तर !'सारखं मनात येत होतं.

'आप पाकिस्तान में कब गये थे ?' घाबरलेपणा न दाखविण्यासाठी मी सुचेल ते बोलत होते.

'पाच छः बरस के पहले. . कितने बरस के बाद हिंदी बोल रहा हूँ...' तो अगदी खुशीत बोलत होता.

भारत व पाकिस्तानमधला हिंदी भाषेचा दुवा त्याला जवळीक करणारा वाटत होता आणि भारतातल्या बायकांना अरबी लोक विकतात, ते मला आठवत होतं. 'बाजार' हा पिक्चर डोळ्यांसमोर अक्षरशः नाचत होता.

'युरोपमें सब जगह कंपलसरी मिलिटरी ट्रेनिंग है ?' मी चाचपडून पाहण्याच्या उद्देशानं विचारलं.

'सच बात है...' तो म्हणाला.

'पाकिस्तान में ?' मी एकदाचा प्रश्न विचारला.

'वहाँ भी कंपलसरी मिलिटरी ट्रेनिंग है...' तो उत्साहात सांगत होता.

. . काही दगाफटका तर होणार नाही. . मनात एकसारखं येत होतं. ते दोघं तिथून कधी जातील, असं मला झालं होतं.

त्यांची गाडी अगोदरची असल्यानं ते दोघं निघून गेले. नि मग मी स्वातीला म्हणाले,

'छान होती की माणसं !'

## ऱ्हाईन नदीचा रम्य प्रवास परत एकदा

ऱ्हाईन नदी १४७३ मीटर लांब आहे. नंतर तिला हॉलंडमध्ये ॲमस्टेल म्हणतात. ऱ्हाईन नदीच्या किनाऱ्यावरून आमची गाडी चालली होती. मग लक्षात आलं, की ही गाडी, कालचाच मार्ग परत आक्रमत आहे. प्रवास मजेत चालला होता. ऱ्हाईनमधील बोटी, नावा, एकच माणूस

मावेल, अशा लहान रंगीत नावा, सारं फिरून एकदा दिसत होतं. बोटीतून कोकणात अनेकदा गेल्यानं बोटीतून जलप्रवासाचं नावीन्य आम्हांला नव्हतं; पण गाडीतून किती तरी वेळ अशी अवाढव्य नदी पाहणं हा वेगळाच आनंद होता. ऱ्हाईन नदीच्या पलिकडचे डोंगर, चर्चेस् पाहत पाहत आम्ही चाललो होतो. काल पाहिलेला कोलन चर्च पण भेटला. डॉम कॅथेड्रलचं ते आकाशात जाणारं टोक गाडीतूनही दिसत होतं. कोलन मागे पडलं, तरी ऱ्हाईनचं विस्तीर्ण पात्र पाहणं चालूच होतं. मध्येच जर्मनीचा डसलफॉर्म हा विमानतळ आला. त्या विमानतळाच्या खालून आमची युरेल चालली होती. इथं सारं अचाटच. विमानतळाच्या खालून रेल्वे जाते ! नद्या तर अशा अफाट, की फ्रँकफर्टपासून थेट ॲमस्टरडॅमपर्यंत ह्या ऱ्हाईन नदीचा सहवास घडणार होता. हा प्रवास फारच रमणीय होता.

'कोकण रेल्वे अशी समुद्राला बाजूबाजूनं गेली, तर !' मी उल्हसित होत म्हणाले.

'मग आपण नेहमीच तिथं जाऊ.' स्वाति उल्हासात म्हणाली.

ऱ्हाईनला डोळे भरून पाहत असता ऑबरहॉसन हे जर्मनीचं शेवटचं स्टेशन आलं. नि हॉलंडची सरहद्द सुरू झाली. पण व्हिसा तपासणारा आला नाही. मेटल डिटेक्टरवाला येऊन गेला. तो बाकाच्या मधून, समोर बंदूक धरून जावं, तसा गेला. तेवढ्यात दुरून आमच्या अख्ख्या सामानाचं मेटल डिटेक्शन कसं झालं ? तसं होत असेल, तर एअरपोर्टवर प्रत्येक बॅगन् बॅग मेटल डिटेक्टरच्या खालून का नेतात ? मला प्रश्न पडला. तेवढ्यात तिकीट तपासनीसही येऊन गेला. आमच्या बरोबरच काही गोऱ्या लोकांच्या हातीही युरेल पास होता.

'ते अमेरिकन असतील.' स्वाति म्हणाली.

'व्हिसा तपासायला कसं कुणी आलं नाही ? की, रात्री झोपलं असलं, की झोपेत त्रास देण्यासाठीच ते येतात ?' मी चेष्टेनं म्हटलं; पण आर्नहेन स्टेशन आलं नि शिट्टी वाजवत, रोब जमावत हॉलंडमधला व्हिसा तपासनीस आला.

'हॅलो' म्हणत 'व्हिसा प्लीज' म्हणत दरडावल्यासारखं बोलला. 'प्लीज' हा शब्द दरडावण्यासाठी सुद्धा वापरतात ! माझ्या मनात प्रश्न आला. 'प्लीज' आणि 'सॉरी' शब्दांत फार मोठी ऋजुता आहे, अशी आपली उगाच कल्पना असते; पण त्याबाबत माझा आता भ्रमनिरास झाला आहे.

हॉलंडचा व्हिसा असलेलं पान उलगडून मी ते त्याच्या पुढ्यात केलं. पण तो आगाऊपणानं अख्खं व्हिसाबुक परत परत न्याहाळत होता. हा आगाऊ, आमच्या अमेरिकेच्या नि लंडनच्या व्हिसावर पण स्टँप मारणार, की काय, मला शंका आली. मी उभी राहून त्याच्या हालचाली न्याहाळू लागले.

शेवटी हॉलंडच्या व्हिसावरच त्यानं स्टँप मारला नि स्वारी सरळ उतरून गेली.

'त्या अमेरिकनांना व्हिसा कसा विचारला नाही ?' मी स्वातीला शंका विचारली.

'काय माहीत ? कदाचित अमेरिकनांना व्हिसा लागत नसेल.' स्वाति म्हणाली.

## बोटींचा ताफा

शेवटी ॲमस्टरडॅम जवळ येऊ लागलं, तसतसं रेल्वेच्या बाजूनं केवढी तरी रंगीबेरंगी फुलं दिसू लागली. नंतर नंतर फुलांचे ताटवे दिसले. तेव्हा मी स्वातीला म्हटलं,

'ट्यूलिपचे भाईबंद दिसताहेत.'

'किती टवटवीत व छान रंग आहेत.' स्वाति उल्हसित होत म्हणाली.

नंतर एकसारखे कालवे दिसू लागले,

'हॉलंड कालव्यांसाठी प्रसिद्ध आहे ना, ग ?' मी विचारलं.

'हो. कालवे, पवनचक्क्या नि चीज.' स्वातीनं माहिती विद्यार्थ्यांच्या थाटात सांगितली.

शेवटी ॲमस्टरडॅम अगदी जवळ आलं आणि पाण्यात जहाजं व बोटी ह्यांची केवढी मोठी जंगी फौज दिसली !

'इतक्या बोटी नि जहाजं ! ही ऱ्हाईनच आहे, की समुद्र ?' मी आश्चर्यानं म्हणाले.

'काय माहीत ? पण एवढ्या बोटी कशा ?' स्वातीही आश्चर्यानं म्हणाली.

मोठमोठ्या जहाजांची नि बोटींची नुसती तुंबळ गर्दी झाली होती.

'जसे काही पंढरीचे वारकरीच एकत्र जमा झाले आहेत !' मी म्हणाले.

पण नंतर काही बोलवेनाच. ते जहाजांचे तांडे नि बोटींची गर्दी, नावा, तराफे आम्ही तृप्त नजरेनं पाहत राहिलो. गाडी ॲमस्टरडॅम स्टेशनात आली. मग ते दृश्य दिसेनासं झालं.

## माझी फजिती

खाली उतरल्यावर स्वाति हॅन्स रुइनेमन्सला फोन करायला गेली. मी सामानाशी गेले. . .आता हॅन्स येईल, नि आपण त्याच्या गाडीतून जाऊ. मघाचं ते दृश्य मनसोक्त पाहायचं राहूनच गेलं. ..माझ्या मनात रुखरुख होती.

स्वाति आली नि म्हणाली, की तिला अजून फोन सापडलाच नाहीये.

'मी बोटी पाहून येऊ ?' मी उत्साहात विचारलं.

'ये. एक्स्चेंज पण आण.' स्वाति संमती देत म्हणाली.

ॲमस्टरडॅम स्टेशनवरच दहा ड्यूसमार्क गिल्डरमध्ये चेंज करून एका बाईनं दिले व ॲमस्टरडॅमला 'गिल्डर' ही करन्सी असली, तरी जर्मन ड्यूसमार्क, डॉलर व पौंड ही करन्सी पण चालते. असं तिनं मला सांगितलं. मग मी बोटी पाहायला उंडारल्यासारखी गेले.

मी उत्साहात त्या अनेकानेक बोटी पाहत होते. नावा, गलबतं, शीडवाल्या नावा सगळ्यांची नुसती जत्रा भरली होती. मी ते सौंदर्य मनसोक्त पाहत होते. समोरच लाकडी चौथरा होता. तिथं जरा पुढं जाऊनही ते सौंदर्य थोड्या वेगळ्या कोनातून पाहणार होते. लोक, एकसारखे ये-जा करीत होते. समोर एक जिना होता. तिथं वर जाऊनही लोक गंमत पाहत होते. तेवढ्यात दोन मुलं आली व पायऱ्या चढून वर गेली. आणखी लोक झपाझप येत होते. समोर उजव्या बाजूला कट्टा होता. तिथं उभं राहून उजव्या बाजूचं तरतं सौंदर्य पाहावं नि नंतर जिना चढून तो अपूर्व सोहळा वरून पाहावा, असं मी ठरवलं. तो लाकडी चौथरा मी उभी असलेल्या फरश्यांपासून दोन पावलांवर होता. तेवढ्यात ती लाकडी तक्तपोशी उभी झाली व पुढचा सारा भाग हलू लागला.

बाप, रे ! म्हणजे ते अवाढव्य जहाज होतं ! मी हादरलेच. पायांपाशी असलेली लांबरुंद तक्तपोशी ही त्या जहाजाची एक किनार होती. त्या लाकडी चौथऱ्यावर लिहिलं होतं,

'फ्रॅंकफर्ट !'

बंदराच्या फरशीच्या जमिनीला ती लाकडी तक्तपोशी इतकी चिकटून होती, की ती लाकडी तक्तपोशी व पुढील जिना हा बंदराचाच भाग आहे, असं मला वाटलं. म्हणजे गंमत पाहण्यासाठी

थोडी पुढं झाले असते, तर त्या जहाजात अडकले असते. शिवाय भाषेचा गोंधळ पाचवीला पुजलेला. त्या गलबतात माझ्याकडे कोण लक्ष देणार ? माझ्या एकटी (आणि फुकटी) साठी त्यांनी गलबत परत फिरवलं असतं ? हातात काही पैसा नसताना मी फ्रँकफर्टला पोचले असते.

इकडे स्वाति, ॲमस्टरडॅम स्टेशनवर माझी वाट पाहत किती वेळ बसली असती ? नि हे सारं परदेशात घडणार होतं ! त्या क्षणी आपला जीव आकाशात उडतो आहे, असं जाणवलं.

जीव गप्प झाला ! स्वातीच्या जवळ गेले; पण बोलले काहीच नाही.

'हॅन्स, केस वाढवलेला तर नसेल !' स्वातीची शंका.

आम्ही नंतर हॅन्सला फोन केला. तो म्हणाला,

'उद्या ॲमस्टरडॅमला, 'सेलिंग इव्हेंट' आहे. त्यामुळं रस्त्यावर ट्रॅफिक जाम झाला आहे. तरी तुम्ही रेल्वेनं या. गॅसपरप्लास दिशेची गाडी घेऊन गॅझेनहॉफ स्टेशनवर उतरा. मी तुम्हांला तिथं घ्यायला येतो.'

हॅन्सनं सांगितल्याप्रमाणे आम्ही गॅझेनहॉफ स्टेशनवर उतरलो व त्यानं सांगितल्याप्रमाणं ब्रिजवर उभ्या राहिलो.

आम्ही मुंबईहून युरोपला जायला निघणार, त्याच सुमारास हॅन्सचं पत्र आलं होतं. त्याची बायको त्याच्याबरोबर नसते, असा पत्रात उल्लेख होता. पण आयत्या वेळी दुसरा होस्ट घेणं शक्य नसल्यानं, 'आम्ही येत आहोत.' असं लिहिलं. नंतर मार्टिक ह्या मुलीचं, आदल्या दिवशी 'या' म्हणून पत्र आलं. तेव्हा तिच्या पत्रात हॅन्सचा फोन देऊन, आम्ही कुठं उतरावं, ते तुम्हीच ठरवा, असं पत्र लिहिलं. पण इटलीत आमचे पासपोर्ट हरवल्यानं हॉलंडला चार दिवस आधीच आम्ही जात होतो. म्हणून दोघांना फोन केला. मार्टिक फोनवर भेटली नाही. हॅन्स फोनवर भेटला व तो 'या' म्हणाला होता.

त्याची वाट पाहत असता स्वाति म्हणाली,

'एकटाच आहे. केसबीस वाढवणारा नसला, म्हणजे झालं.'

'हो ! नाही तर 'बो' बांधणारा असायचा.' मी म्हणाले.

'एक तर ह्याची बायको इथं नाही नि त्यात हा केस वाढवलेला, बो बांधणारा असेल, तर त्याच्याकडे राहायला फार अवघड वाटेल.' काळजीच्या स्वरात स्वाति म्हणाली.

आम्ही थोड्या चिंतेत होतो, तोच हॅन्सची गाडी आली. त्यानं हात वर केला. तो गाडी वळवून घेत होता. नंतर हॅन्स गाडीतून उतरला. हॅन्स टकलू होता ! बरं वाटलं. मनातल्या मनात हसूही आलं. हॅन्स सभ्य दिसत होता. आमचं सामान उचलायलाही त्यानं मदत केली.

घरी जाताना हॅन्स म्हणाला,

'माझ्याकडे आणखी एक इस्रायली मुलगी आहे. तिला येऊन दोन दिवस झाले आहेत. ती बहुधा उद्या जाईल. गाडीतून जाताना डाव्या उजव्या बाजूला कालवे दिसत होते. किती तरी गुलाबी, पिवळी, लाल फुलं दिसत होती. मी मोहरून गेले. साधारण ट्युलिप फुलांसारखीच वाटणारी ही वेगळीच फुलं दिसत होती.

## हॅन्सचं स्वागत

हॅन्सची टोयोटो गाडी होती. रिमोट कंट्रोलनं त्यानं गॅरेज उघडलं व गॅरेजमधूनच घरी जायचं होतं. गॅरेजनंतर प्रथम छोटीशी बाग लागली नि मग घर. घर छानच प्रशस्त होतं. केवढा

तरी मोठा हॉल, जेवणघर नि स्वयंपाकघर. मात्र मध्ये भिंत नाही. स्वयंपाकघरात मायक्रोओव्हन, दोन फ्रीज, कुकिंग रेंजपासून सर्व सिद्ध होतं. नंतर आम्ही पहिल्या मजल्यावर गेलो. हॉलला लागून असलेल्या छोटया व्हरांड्यातून पहिल्या मजल्यावर जाता यायचं. त्या व्हरांड्यात बाहेर जाण्यासाठी मागचा दरवाजा होता. पहिल्या मजल्यावर, गॅलरी असलेली एक बेताची बेडरूम, दोन मोठ्या बेडरूम्स व एक अडगळीची खोली दिसत होती.

त्या बेताचा आकाराच्या बेडरूममध्ये आमची राहण्याची व्यवस्था होती. तिथं त्या इस्रायली मुलीचं सामान होतं. मांजराला उचलतात, तसं ते सामान उचलून हॅन्सनं समोरच्या अडगळीसारख्या दिसणाऱ्या खोलीत टाकलं व नंतर आमची टॉयलेट दाखवली. टॉयलेट प्रशस्त व रम्य होती. तिथं वॉशिंगमशीनही होतं. त्या इस्रायली मुलीचं नाव 'येल' होतं. तिनं नंतर आम्हांला दुसरा मजलाही दाखवला. तिथं मोठी हॉलवजा बेडरूम होती व डबलबेड होता. तिथंच एक ऐसपैस अटॅच्ड बाथरूम होती. बेडरूम अगदी राजेशाही वाटत होती. ती हॅन्सची झोपायची खोली होती.

आमची टॉयलेट दाखवत हॅन्स म्हणाला,

'तुम्ही अंघोळ करून घ्या. तोपर्यंत मी तुमच्यासाठी सूप बनवतो.'

'आम्ही तर सकाळीच अंघोळ केली.' मी म्हणाले.

'पण आता संध्याकाळ झालेय्...' तो हसत म्हणाला.

जर्मनीत जसं काही रोज दोनदा आंघोळ करतात. शहाणाच आहे..... मी मनातल्या मनात.

हवा चांगली थंड असल्यानं परत परत आंघोळ नको वाटत होती. मी कावळ्याची आंघोळ केली.

## इन्स्टंट टोमॅटो सूप

हॅन्सनं इन्स्टंट टोमॅटो सूपाचा डबा फोडला. ते सूप पातेल्यात ओतलं. त्यात पाणी घातलं व मायक्रोओव्हनमध्ये ते पातेलं ठेवलं. पाच मिनिटांनी होईल, अशा बेतानं बटणं दाबली. पाच मिनिटांनी तो बाहेर काढून त्यात डब्यातले तयार शिजवलेले मटार व बुंदी घातल्या व मोठ्या बाऊलमध्ये घालून आम्हांला बाऊल दिले.

सूप भलतंच छान लागत होतं त्या जोडीला कांद्याचा स्वाद असलेले वेफर्स होते. टोमॅटो सूप भरपूर होतं. तरी तो म्हणाला,

'तुम्हांला इंडियन फूड हवं असेल, तर आणून देतो. पैसे द्या.'

गंमत करतो आहे, असं वाटून आम्ही नुसतंच हसलो.

'ती इस्रायली मुलगी, सेलिंग इन्व्हेन्ट पाहायला तिच्या मित्रमैत्रिणींबरोबर गेली आहे.' हॅन्स म्हणाला.

'सेलिंग इव्हेंट ?' मी प्रश्न केला.

'ॲमस्टरडॅमला दर पाच वर्षांनी बोटींचं संमेलन भरतं, त्याला 'सेलिंग इव्हेंट' म्हणतात. हा मोठा समारंभ असतो. जगातल्या बोटी इथं एकत्र येतात. बोटींना सजवलं जातं. आपापली साहसं, आपापले अनुभव, दर्यावर्दी एकमेकांना सांगतात. मोठं फायर वर्क होतं.'

'तरीच आज एवढ्या बोटी, गलबतं व नावांचं संमेलन तिथं दिसलं.' मी उद्गारले.

'आमच्या कंपनीची पण बोट आहे तिथं. मी उद्या प्रमुख म्हणून जाणार आहे. तुम्ही जरूर

ही इव्हेंट पाहा.' हॅन्स म्हणाला.

आम्ही नुसत्याच हसलो. आमच्या दृष्टीनं दोन दिवसांत जमेल तितकं हॉलंड पाहणं अगत्याचं होतं.

नंतर आम्ही युरोपचा प्रवास व आमचा पासपोर्ट हरवणं ह्या संदर्भात बोललो.

'मी जपानला नुकताच जाऊन आलो. पण भारतात जावं, असं माझ्या मनातही आलं नाही,

तेव्हा आम्हांला ते रुचलं नाही. आम्ही दक्षिणेतली देवळं, अजंठा, वेरूळ, दिलवारा टेंपल्स वगैरेंसंबंधी भरभरून बोललो नि तू भारतात यायलाच हवंस, असा आग्रहही केला.

'भारत इतका छान आहे ! मग यायला हवं.' तो म्हणाला. मग खूश होत म्हणाला,

'तुमचं पत्र इतकं छान होतं, की मला 'सॉमरसेट मॉम' ह्या लेखकाची आठवण झाली.'

आम्ही नुसतेच हसलो. ते पत्र, खरं तर, स्वातीनं लिहिलं होतं. शिवाय हॅन्सनं सॉमरसेट मॉम किती वाचला असेल, देव जाणे.

'आज आम्ही बोटींचे अनेक प्रकार पाहिले.' मी म्हणाले.

'इथं एरवीही, कालव्यातून चारएक हजार लहान-मोठ्या बोटी हिंडत असतात. त्यात हजारावर कायदेशीरही नसतात. शिवाय तुम्ही पाहाल, की इथले कालव्यावरचे ब्रिज उघडझाप करणारे आहेत. कारण आमचं देश मुख्यतः प्रवाशांवरच चालतो.'

नंतर त्यानं मार्टिकला फोन करायला सांगितलं. मार्टिकला फोन केल्यानं पुढचा प्रोग्रॅम ठरवता आला असता. हॅन्सचा फोन असा होता, की रिसीव्हर कानाला न लावताच, माईकसमोर बोलतात, तसं बोललेलं तिला ऐकू जात होतं व ती काय बोलते आहे, ते आम्हां सर्वांनाच ऐकू येत होतं.

मार्टिककडे कॅनडा वगैरे ठिकाणचे बरेच होस्ट आल्यानं आमच्यासाठी तिच्या घरी राहण्यासाठी जागा नव्हती. मात्र उद्याचा सारा दिवस ती आम्हांला हॉलंड दाखवणार होती.

थोड्या वेळानं ती इस्रायली मुलगी आली. सतरा-अठरा वर्षांची येल उंच-निंच, स्वच्छ गोरी व नितळ त्वचा असलेली होती. सुरेखच दिसत होती. मग इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्या. ती इस्रायली मुलगी तिच्या मित्रमैत्रिणींबरोबर देश युरोप पाहायला बाहेर पडली होती, असं कळलं. नंतर आम्ही सारे जणं दूध प्यालो व आमच्या खोलीत झोपायला गेलो.

## प्रेमळ वाटणारी इस्रायली मुलगी

हॅन्स पहाटेच ऑफिसला जाणार होता. काल सांगितल्याप्रमाणे त्याच्या कंपनीनं सेलिंग इव्हेंटमध्ये भाग घेतला होता. त्यासाठी कंपनीनं एक बोटही स्पॉन्सर केली होती. त्यात हॅन्सचा सहभाग होता. मी उठून, तोंड धुऊन खाली गेले. तेव्हा तो ऑफिसला निघालाच होता.

तो म्हणाला,

'बरं झालं, उठलीस, ते. मी तुला चहा कसा करायचा, ते सांगतो. विजेवर चालणारं ते चहाचं भांडं होतं. पाण्याला उकळी आली, की ते आपोआप बंद होत होतं. चहा, साखरेचे डबे, पाव, बिस्किटं वगैरे पण हॅन्स दाखवून गेला होता.

'तुम्हांला काय हवं ते घ्या. किचन तुमच्या ताब्यात आहे.' हॅन्स म्हणाला.

तो गेला नि तेवढ्यात तोंड वगैरे धुऊन स्वाति खाली आली. मी हॅन्सचं आदरातिथ्य

सांगून म्हणाले,

'सगळी हॅन्स नावाची माणसं खूप छान असतात. स्वित्झर्लंडचे हॅन्स पीटर पण खूप छान होते.'

'बोलू नको. नेमकं उलटं घडायचं.' स्वाति म्हणाली.

तेवढ्यात येल आणि आली तिनं त्या चहाच्या भांड्यात पाणी गरम केलं व गाळण्यावर ऑरेंज फ्लेवरचा चहा ठेवून त्यावर तिनं पाणी ओतलं. आम्हांला चहात दूध लागतं नि ते गरम हवं, म्हणून मी त्या भांड्यात दूध व पाणी घातलं. ते भांडं ॲटोमॅटिक असल्यानं मी निर्धास्त होते. पण त्यात दूध असल्यानं ते पाणी उतू गेलं. स्वातीनं पटकन् स्विच ऑफ केला. नंतर आम्ही विजेच्या शेगडीवरच चहा केला. काही खास बिघडलं नव्हतं.

नंतर आम्ही स्नान करून व कपडे धुऊन बाहेर पडण्यासाठी खाली आलो व ब्रेड वगैरे खाऊन घेतला. त्या वेळी येल घराची साफसफाई करत होती.

'आज तू बाहेर जाणार नाहीस ?'

'नाही. आज मी घराची साफसफाई करणार आहे.'

'तुमची वेळ झाली, की सांगा, मी तुम्हांला स्टेशन दाखवायला येईन.' येल म्हणाली.

आम्हांला स्टेशन दाखवायचं काम हॅन्सनं येलवर टाकलं होतं.

कालवा ओलांडून डाव्या हाताला वळून आम्ही चाललो होतो. जाता जाता ती थांबली नि म्हणाली,

'आता इथून उजव्या बाजूला सरळ रस्ता आहे.'

मी तिथं असलेल्या एका कचरा-पेटीची खूण लक्षात ठेवली.

स्टेशनवरं जाताना आमच्या पॅलेस्टाईन, इस्रायल वगैरे गप्पा झाल्या.

'यासर अराफतला नोबेल पारितोषिक मिळालं का ? तो खूप छान आहे ?' स्वातीनं विचारलं.

यासर अराफतला नोबेल पारितोषिक मिळालं, ते तिला माहीत नव्हतं. ती म्हणाली,

'आमचा शमीर नेता खूप छान आहे. बाकी सारी मुस्लिम राष्ट्रं आम्हांला गडप करायला बसली आहेत.'

यासर अराफत अजिबात चांगला नाही, असं तिच्या बोलण्यातून कळलं. आम्हांला ज्यू लोकांची कणाव आली.

'तू आता हॉलंडनंतर इथून कुठं जाणार ?' स्वातीनं विचारलं.

'मला लंडनला मुलं संभाळण्याची नोकरी मिळणार आहे. त्या तिथल्या पत्राची मी वाट पाहते आहे.' येल म्हणाली.

'इथल्या स्टेशनवर तिकीट काढायची खिडकी कुठं आहे ?' मी येलला विचारलं.

'आम्ही तिकीट काढतच नाही.' येल म्हणाली.

'नि पकडले गेलो, तर !' मी धास्तावल्या स्वरात.

'आम्ही गेले चार दिवस हिंडतोय्. एकदाही कुणी तिकीट विचारायला आलं नाही.' येल म्हणाली.

परदेशातही असं घडतं, ह्याचं आम्हांला फार आश्चर्य वाटलं. तिकीट खिडकी शोधूनही आम्हांला सापडली नाही. धाकधुकल्या मनानं आम्ही गाडीत बसलो. 'आजच तिकीट चेकर

आला, तर ? बकासुरासारखा तो प्रश्न मन खात होता. इथले दंडही प्रचड असतात. आमच्याकडचे पैसे तर संपत आले होते. अनुभव घेण्यासाठी आम्ही बाहेर पडलो खरे; पण घरी काय सागायचं ? आम्ही हॉलंडची तुरुंगाची हवा खाऊन आलो, म्हणून ? ॲमस्टरडॅमलाच रिटर्न तिकीट काढा, असं हॅन्सनं सुचवायला हवं होतं. पण आता तिकीट चेकर आला, तर काय ? ॲमस्टरडॅम येईपर्यंत जीव टांगणीला लागला होता.

## लीनाऊहॉफ गार्डन

मार्टिक आम्हांला ॲमस्टरडॅम स्टेशनवर पावणे दोनला भेटणार होती. त्या आधी आम्ही ब्रेनरब्राकला जाऊन लीनाऊहॉफ ही गार्डन पाहणार होतो.

ह्या गार्डन्स म्हणजे लांबवर पसरलेली ही फुलझाडांची शेतीच आहे. स्वित्झर्लंडला भेटलेली फुलं इथं परत भेटली. 'हायसिंथ' ही घंटिकेच्या आकारासारखी फुलं, दूरवर पसरलेली होती. नार्सिसस फुलंही लांबवर दिसत होती. स्वित्झर्लंडला फुलांनी सजेलेल्या गॅलऱ्या पाहिल्या. पण इथं लांबवर पसरलेले फुलांचे थवे पाहून, स्वर्ग पाहतो आहो, तसं वाटतं.

आम्ही ॲमस्टरडॅमच्या पूर्वेला असलेल्या जेसरमीर ह्या गावी गेलो. गावातली घर उतरत्या छप्परांची व निळ्या आणि लाल रंगांची होती. ही घरं झाडीत आणि फुलांत जशी काही रमून गेल्यासारखी दिसतात. इथल्या गवतातही पांढरी, लाल, जांभळी अशी छोटी छोटी फुलं शेकड्यांनी दिसतात

नंतर लांबवर पसरलेली फुलांची शेतंच किती वेळ दिसत राहतात. बरेच लोक फुलांची शेती करून त्यावर उदर-निर्वाह करतात. इथंही फुलं अमाप प्रमाणात खरेदी करण्याचा लोकांना सोस आहे. दूरवर पसरलेलं फुलांचे अफाट गालीचे पाहून थक्क व्हायला होतं.

त्या फुलांच्या बागा पाहून तिथून हलू नये, असं वाटत होतं. ट्युलिप फुलांचा मोसम मार्च महिन्याच्या शेवटी सुरू होऊन तो पंधरा तारखेपर्यंत असतो. आम्ही जुलै महिन्यात गेलो असल्यानं, हायनिरि, नार्सिसस ह्या फुलांचा फुलण्याचा हा मोसम होता. सप्टेंबर सपेपर्यंत ही फुलं अशीच बहरलेली असतात. रंगीबेरंगी, टवटवीत फुलांचं ते ऐश्वर्य पाहताना हॉलंडचा चक्क हेवा वाटला.

परत एकदा हॉलंड पाहण्याचा माझा योग आला. मे महिन्यात गेल्यानं 'कोकनहॉफ गार्डन' पाहण्याचा योग आला. त्या वेळी ट्युलिप फुलांचे रंगीबेरंगी थवे मनसोक्त पाहिले. 'सिलसिला' या चित्रपटात कोकनहॉफ गार्डनचं शूटिंग आहे. त्या वेळी रेखा ट्युलिप फुलांमध्ये बसली, म्हणजे कशी बसली असेल, ह्याचं आम्ही चित्रं रंगवत होतो. ट्युलिप फुलांबरोबरच पर्ल, हॅचेट, ख्रिस्तमस, मोंटोकर्लो, पिंक, प्राईज, मोठा गुलाब, आर्टिस्ट वगैरे अनेकानेक फुलंही त्या वेळी पाहिली.

पावणे दोन वाजताच आम्ही ॲमस्टरडॅमला पोचलो. नंतर तिथून लंडनला जाणाऱ्या बोटीच्या तिकिटाची चौकशी करून तिकीट बुक केलं व टॅक्सी स्टँडशी पावणेदोनलाच पोचलो. स्टेशनबाहेर एक मोठी गॅंग वाद्यवादन करत होती. लोक त्यांना पैसे देत होते. नंतर दुसऱ्या ठिकाणी असाच वाद्यवृंद वाद्यं वाजवत होता नि एक मुलगी नाचत होती. ह्या लोकांचा अशा तऱ्हेनं पैसे मिळवण्याचा पोटापाण्याचा उद्योग होता.

## डायरी ऑफ ॲनी फ्रँक

बरोबर सव्वा दोन वाजता मार्टिक आली. आम्ही तिनं सांगितल्याप्रमाणे टॅक्सी स्टॅंडशी उभ्या होतो. भेटल्याबरोबर मार्टिक म्हणाली,

'मी ॲडस्टरडॅमची प्रेक्षणीय स्थळं तुम्हांला दाखवते.'

प्रथम तिनं स्टेशन दाखवलं प्रेक्षणीय स्थळ म्हटल्यावर आम्हीही ते नीटपणे पाहिलं. मी तिला विचारलं,

'ही मुलं स्टेशनवर अशी नेहमीच वाद्यं वाजवतात का ?'

'हो आणि हॉलंड वाद्यवादनात अग्रेसर आहे.' ती म्हणाली. नंतर ती म्हणाली, 'आमचा हॉलंड हा देश फुलांसाठी प्रसिद्ध आहे. आम्ही एकमेकांना भेटायला गेलो, तरी फुलांचा बुके देण्याची आमची पद्धत आहे.'

आम्ही रस्त्यानं चालत-चालत जात होतो. इथं रस्त्यावर मुंबईसारखी गर्दी होती. मार्टिकनं आम्हांला आपापल्या पर्सेस् सांभाळायला सांगितलं.

मार्टिक उंचनिंच, गोरी, रूंद खांद्यांची नि सडसडीत होती. मार्टिकचे डोळे पण निळे होते. मार्टिक भारतात आठ महिने राहिली होती. भारतातली माणसं तिला खूप आवडली. मार्टिकचे वडील शेतकरी आहेत. ते ट्युलिप फुलांची मोठ्या प्रमाणावर लागवड करतात. ती फुलं ॲमस्टरडॅमच्या बाजारात विकायला येतात. तीन-चार महिने हा सीझन असतो. तिची आई, वडिलांना खूप मदत करायची, चारच वर्षांपूर्वी ती वारली.

मार्टिकनं आम्हांला 'क्वीन पॅलेस' दाखवला. ॲमस्टरडॅममध्ये फार गर्दी असल्यानं राणीला इथं राहणं सुखाचं वाटत नाही. ती आता हेन्स ह्या शहरात राहते. हॉलंडमधली हनिकन बीअर फान छान असते. ॲमस्टेल नदीचं व समुद्राचं पाणी एकत्र केल्यानं त्या पाण्याची ह्या बीअरला वेगळी चव असते. इथली हेनिकन बीअर फॅक्टरी प्रसिद्ध आहे.

'राणी ॲमस्टरडॅमला कधी येते ?' मी विचारलं.

'तशी राणी इथल्या काही विशेष समारंभांना ॲमस्टरडॅमला येते.' मार्टिक म्हणाली.

नंतर तिनं पॅलेसच्या समोरच असलेला एका चौकातला स्तंभ दाखवला. त्याला मार्टियर कॉलम म्हणतात. हॉलंडचे थोर स्वातंत्र्यवीर मृत्युमुखी पडले, त्यांच्यासाठी हा स्मृतिस्तंभ बांधला. चार मेला इथं सारी प्रजा एकत्र येते व ह्या स्वातंत्र्यवीरांना मानवंदना देते.

'डायरी ऑफ ॲनी फ्रँक' ह्या जगप्रसिद्ध पुस्तकाची लेखिका ॲनी ही हॉलंडची. मार्टिकनं आम्हांला ॲनी फ्रँकचा पुतळा दाखवला. सोळा वर्षांची मुलगी आणि तिनं नको नको ते जग अनुभवलं. जर्मन सोल्जरांच्या अत्याचारांना ती बळी पडली. ते सारे अनुभव तिनं डायरीरूपात लिहिले. ते सारंच त्या वेळी आठवलं. तिच्या घराचं आता स्मारकात रूपांतर केलं आहे. तिच्या साऱ्या वस्तू इथं ठेवल्या आहेत. 'वर्ल्ड पीस' वगैरे कामं आता तिथं चालतात.

## भारतातल्या बायका

'इंडियात प्रत्येक वेळ ही चहाची वेळ असते. मला अनुभव आहे.' मार्टिक गंमत वाटून म्हणाली.

तिला भारतात खूप प्रेम मिळालं. चालता चालता मार्टिक म्हणाली,

'मी सात महिने इंडियात होते. भारतातल्या लोकांनी मला खूप प्रेम दिलं. मला भारतासाठी काही करावं वाटतं. मात्र इंडियातले पुरुष बायकांना जी वागणूक देतात, ती मला आवडली नाही.'

'म्हणजे कसं ?' मी विचारलं.

'ते बायकांना सांगतात, तुला काही कळायचं नाही. तू स्वयंपाक कर.'

'सगळेच पुरुष असे नसतात', मी म्हणाले. पण भारतीय पुरुषांत 'बायकोपेक्षा स्वत: शहाणं' समजण्याचा गुण असतो, हे तिच्यापुढं उलगडलं होतंच.

मार्टिकनं आम्हांला एका फास्ट फूड सेंटरमध्ये नेलं. आम्ही तिघींनीही पायनॅपल ज्यूस घ्यायचं ठरवलं. मार्टिकनं आम्हांला विचारलं,

'भारत अत्यंत गरीब देश आहे. नि तरी तुम्ही दोघी युरोप पाहायला कशा काय निघू शकलात?'

'भारतातले सारेच गरीब नाहीत. आमच्याहून किती तरी पटीनं श्रीमंत लोकही भारतात आहेत. एकेक श्रीमंतघरी लग्नातून किती तरी लाखांची दिव्यांची रोशणाई होते.'

'तशी श्रीमंत-गरीब तफावत तर सर्वदूर असते.'

'पण भारतात ती अधिक प्रमाणात असते. तुमच्या इथं मुलगा, मुलगी तरुण वयात बाहेर पडतात. आमच्या इथं एकत्र राहत असल्यानं सात पिढ्यांची सोय करण्याची पद्धत आहे.'

मार्टिक यावर नुसतीच हसली. नंतर तिनं विचारलं,

'भारतातल्या बायकांचं आयुष्य सुखी व्हावं, म्हणून आम्ही काय करू शकतो ?'

दारू पिऊन मारणारा नवरा, घरची गरिबी, लोकसंख्या बेसुमार वाढत असलेली. त्याचे चटके गरीब बायकांनाच बसतात. गजबजलेली शहरं नि ओसाड खेडी ह्याबाबत मार्टिक काय करू शकणार होती ?... मला प्रश्न पडला. मी त्याबाबत बोलले.

'आम्हांला इंडियातल्या बायकांना मदत करण्यासंबंधात टूर काढायची होती. पण आम्हांला नाकारलं गेलं.' मार्टिक म्हणाली.

'तुमचा काय प्रोजेक्ट असेल, त्याबाबत एक कॉपी मला पाठव. स्त्रीमुक्तीचं कार्य करणाऱ्या स्त्रियांना मी त्या संबंधात भेटेन.' मी मार्टिकला आश्वासन दिलं.

पण मार्टिकचा प्रोजेक्ट अद्याप आला नाही.

## होमोंचं मान्युमेंट

मार्टिकनं आम्हांला एक त्रिकोणी कट्टा (प्लॅटफॉर्म) दाखवला. होमोंचा लैंगिक हक्क प्रस्थापित करण्यासाठी हा संगमरवरी कट्टा बांधला आहे.

'होमोंचा ?' माझ्या सात पिढ्यांना धक्का बसावा, अशा आश्चर्यानं मी विचारलं.

' 'होमो' म्हटलं, की पूर्वी लोक नाकं मुरडायचे. पण आमच्याच मित्र-मैत्रिणींत त्याची किती आत्यंतिक गरज आहे, हे जेव्हा आम्ही पाहतो, तेव्हा त्यात काहीच गैर नाही, असं आम्हांला वाटतं.'

मार्टिक जेव्हा हे बोलली, तेव्हा असेही काही प्रश्न असतात व त्यांबाबत तरुण पिढी विचार करते आहे, हे प्रथमच डोक्यात आलं. मार्टिकचा एक बॉयफ्रेंड आहे. प्रेम जमून दोन वर्षं झाली, त्यांनी अजून लग्न केलेलं नाही. मार्टिक एकटीच राहते. तिचा भाचा गेली दोन-तीन वर्षं त्याच्या

मैत्रिणीबरोबर राहतो. त्या उभयतांना एक मुलगाही आहे, पण त्यांनी अजून लग्न केलेलं नाही.

'पण मग, मुलगा आडनाव कोणाचं लावील ?' मी विचारलं.

'वडिलांचं.' मार्टिक म्हणाली.

'एकमेक सोडून जाण्याची भीती वाटत नाही ?' मी विचारलं.

'छे. उलट, एकमेकांविषयी प्रेम वाटतं, तोपर्यंतच फक्त एकत्र राहावं.' मार्टिक म्हणाली.

घटस्फोटाचं प्रमाण वाढल्यानं, हा नवीन विचार तिथं रुजत असावा. मार्टिकचा भाऊ पण त्याच्या गर्लफ्रेंडबरोबर गेली दोन वर्ष राहतो. त्यांनीही लग्न केलेलं नाही. लग्न न करताच एकत्र राहण्याचे प्रकार युरोप व अमेरिकेत वाढत आहेत. लग्नानंतर एकमेकांवर अधिकार गाजवणं सुरू होतं व ते ह्या नव्या पिढीला आवडत नाही.

मार्टिकला आपण स्वतंत्र राहतो, ह्याचा फार अभिमान वाटतो.

ती म्हणाली,

'भारतात मुली पैशाच्या दृष्टीनं स्वतंत्र नसल्यानं त्या आईवडिलांकडे राहतात.'

'मी पैशांच्या दृष्टीनं स्वतंत्र आहे. पण मला स्वतंत्र राहायला आवडत नाही.' स्वाति म्हणाली.

'नवऱ्याबरोबर स्वतंत्र राहणाऱ्या मुलींनाही अधून मधून आईकडे राहायला आवडतं.' मी म्हणाले.

'तुमच्या इथल्यापेक्षा आम्ही आईवडिलांबरोबर जास्त फ्रेंडली वागतो. पण आम्हांला त्यांच्याबरोबर कायमचं राहायला आवडत नाही.' मार्टिक म्हणाली.

'आता आमच्या इथंही, शहरांतून आई-वडील मुलांबरोबर फ्रेंडलीच वागतात.' स्वाति म्हणाली.

मार्टिक फ्री लान्स नर्स आहे. म्हणजे ती एखाद्या हॉस्पिटलमध्ये काम न करता घरोघर जाऊन आजाऱ्याची शुश्रूषा करते. तिला असं घरोघरी जाऊन आजाऱ्याची शुश्रूषा करायला आवडतं. मार्टिकला महिना २४०० गिल्डर मिळतात. त्यात ती अत्यंत मजेत राहते.

## स्कॉटर्सची बिल्डिंग

मार्टिकनं स्कॉटर्सची एक अख्खी बिल्डिंगच आम्हांला दाखवली. लंडनला आल्यावर स्कॉटर्स म्हणजे काय, ते कळलं होतं. आपण घर उघडं टाकून गेलो, तर एखादं जोडपं आपल्या घरात शिरतं व कायमचं राहतं. त्यांना घर नाही, म्हणून ते दुसऱ्याच्या घरात राहतात, असं कायदा म्हणतो. त्यांना तिथल्या कायद्याप्रमाणं बाहेर काढता येत नाही' हे आम्हांला माहीत होतं; पण अख्ख्या बिल्डिंगमधले लोकं घर उघडी टाकून बाहेर कसे जातील ? आम्हांला आश्चर्य वाटलं.

मुलं-मुली लग्न करतात नि त्यांना राहायला जागाच नसते, अशी जोडपी घरात घुसतात नि एकदा घरात घुसली, की त्यांना बाहेर काढता येत नाही.

'ते माहीत आहे; पण अख्खी बिल्डिंग त्यांनी ताब्यात कशी घेतली ?' मी आश्चर्यानं विचारलं.

'ह्या बिल्डिंगमध्ये माणसं राहायला यायच्या अगोदरच अनेक कुटुंबं बिल्डिंगमध्ये घुसली नि तिथं राहायला लागली. ही अख्खी बिल्डिंगच स्कॉटर्सनी अडवली आहे.'

स्कॉटर्स बिल्डिंग पाहताना मला खूप आश्चर्य वाटलं.

**कालवे**

ॲमस्टरडॅमला आम्हांला अधून मधून कालवे लागत होते. अगदी गजबजलेल्या रस्त्यांतूनही हे कालवे भेटतात. लोकं कालव्यांतून मजेत नावा वल्हवत येत असतात. काही लोकं कालव्यांच्या बाजूला गाड्या ठेवून कालव्यातून हिंडायला जातात. अर्थात कालव्याच्या बाजूनं गाड्या पार्क करण्यासाठी ठरावीक भाडं आहे. स्वयंचलित मीटरवर त्या गाड्यांची वेळ नोंदवली जाते. ज्या गाड्यांची वेळ संपलेली आहे नि तरी त्या गाड्या तिथं उभं राहिल्या, तर त्यांना भलंमोठं लोखंडी कुलूप घातलं जातं. कालव्याच्या शेजारी अशी कुलपं घातलेल्या काही गाड्या आम्हांला दिसल्या.

आम्ही कॅनॉलमधून जाणाऱ्या बोटाचं (कार्गो) तिकीट काढून बोटीत बसलो. त्या वेळी कॅनॉलला चिकटून बांधलेली घरं दिसली. लाकडी पायावर ही घरं बांधली जातात. कॅनॉलच्या बाजूनं घराची रुंदी अत्यंत कमी असते. मात्र ह्या घरांची लांबी भरपूर असते. कॅनॉलच्या बाजूनं घरांची रुंदी जितकी कमी असेल, तेवढा इनकमटॅक्स कमी बसतो. कालव्याच्या बाजूला फक्त एक मीटर रुंद असलेलं घरही आम्ही पाहिलं. ह्या घरांना ठिकठिकाणी हूक्स दिसले. त्यांवरून दोरी किंवा लोखंडी साखळीनं सामान वर खेचलं जातं. त्यामुळं जिन्यात फार जागा लागत नाही. काही ठिकाणी घरं कालव्याच्या पाण्यातच बांधली आहेत. १५२९ सालचं घरही अजून जसंच्या तसं आहे.

हॉलंडमधल्या घरांना मोठमोठ्या काचेच्या खिडक्या असतात. ऊन घरात यावं, म्हणून ही सोय. ह्या घरांना लेस लावलेले पांढरे पडदे लावण्याची पद्धत आहे. इथल्या गाई सुंदर, धिप्पाड व भरपूर दूध देणाऱ्या असतात. त्यामुळं इथली बिस्किटं, चीज, चॉकलेटस्, पेस्ट्रीज् प्रसिद्ध आहेत. इथं जमीन थोडी असल्यानं बांधकामाचे विविध प्रकार दिसतात. एके ठिकाणी सहा किलोमीटर बोगदा आहे व त्यावरून नदी जाते. तर एके ठिकाणी खालून हायवे जातो व त्यावरून विमानतळ बांधला आहे. इथल्या मोठ्या रस्त्यांच्या बाजूनं सायकलस्वारांसाठी एक रस्ता असतो. ब्राझील व हॉलंडमध्येच फक्त अशी पद्धत आहे.

इथल्या प्रवासी गाड्या अशा असतात, की त्यांवरून पोलिसाला गाडी किती वेळ चालली, हे समजू शकतं. इथल्या प्रत्येक प्रवासी गाडीला आठ तास विश्रांती अत्यावश्यक ठरवली आहे. जास्त वेळ ही गाडी चालली, तर वाहन-चालकाला शिक्षा होते.

'आता आम्हांला जायला पाहिजे.' मी म्हणाले.

'काय ?' अतिशय आश्चर्यानं मार्टिकनं विचारलं.

'हॅन्स आणि आमच्याबरोबर आणखी एक गेस्ट असलेली इस्त्रायली मुलगी, एका बाईकडे संध्याकाळी सातला जाणार आहेत.' स्वाति म्हणाली.

'मी तर समजले, आज संबंध दिवस तुम्ही माझ्याबरोबर आहात. मी तर तुम्हांला माझ्या घरीही घेऊन जाणार होते.'

'तुझ्या घरी यायला आम्हांलाही आवडलं असतं, पण आमचा नाइलाज आहे.' मी म्हणाले.

तिथले अनेकानेक कालवे पाहून स्वाति म्हणाली,

'इथं सर्वदूर कालवेच कालवे दिसतात. किती मजा वाटते !'

'म्हणून तर हॉलंडला 'व्हेनिस ऑफ नॉर्थ' म्हणतात.'

'इथं रेल्वे पण तीन प्रकारच्या दिसल्या. भुयारी रेल्वे, नेहमीप्रमाणे जाणाऱ्या व डोक्यावरून जाणाऱ्या. शिवाय कालव्यांवरचे नक्षीदार ब्रिजही किती छान दिसतात. किती मजा वाटते !'

'आमचा देश, खरं तर, समुद्रसपाटीखाली आहे. पण समुद्र हटवून व नद्यांना बांध घालून कालवे निर्माण केले आहेत. ॲमस्टरडॅम हे नाव कसं पडलं, माहीत आहे ?'

'कसं ?'

'ॲमस्टेल नदीवर घातलेला डॅम (बांध) म्हणून ॲमस्टरडॅम !'

ॲमस्टरडॅम स्टेशनवर मार्टिक पोचवायला आली होती. आम्ही रिटर्न तिकीट काढलं. दोघीचे मिळून १०.८० गिल्डर पडले.

## आम्ही रस्ता चुकलो.... केराची टोपली दिसली !

सकाळी अगदी सहज सोपा वाटणारा रस्ता आम्ही चुकलो होतो. कारण गॅझेनहॉफ स्टेशनमधून दोन-तीन बाजूंनी बाहेर पडता येतं. स्टेशनमधून बाहेर पडतानाच आम्ही चुकीचे बाहेर पडलो नि मग रस्ता सापडता सापडेना. रस्त्यावर कुणी माणूस भेटेना. एका माणसानं आणखीनच चुकीचा रस्ता सांगितला. आम्ही काळजीत पडलो. घड्याळात साडेदहा झाले होते आणि सात वाजता हॅन्स व येल बाहेर पडणार होती. आम्ही वेळीच घरी पोचलो नसतो, तर आम्हांला घराच्या बाहेर थांबावं लागणार होतं.

गॅझेनहॉफसारख्या गावी रात्रीचं बाहेर राहणं मुळीच सुरक्षित नव्हतं. इथं दिवसा सुद्धा बाहेर शुकशुकाट असतो. एखादाच माणूस दिसतो. रात्री तर किर्र अंधार आणि झाडी ह्यांची सोबत ! आम्ही चांगल्याच हादरलो. रस्ता सापडता सापडेना. इथं घरांना नावं नाहीत व डिपार्टमेंटल स्टोअरमुळं रस्तोरस्ती दुकानंही नाहीत. त्यामुळं ओळखीची कोणती खूणही लक्षात ठेवता येत नाही. इथल्या रस्त्यांना धड नावं नाहीत (नावं व मॅप मिळतात, ते शहरांचे. त्यामुळं शहरात चुकायला होत नाही) पत्ता काय, तर गिल्डीनाफ ५०५, ह्यावरून काही बोध होत नव्हता. आम्ही पुन्हा स्टेशनावर गेलो व मेंदूला चालना देत दुसऱ्या बाजूनं उतरलो.

चालता चालता रस्त्यावर एक पाटी दिसली. ती एकमेव पाटी रस्त्यावर जाताना लागली होती. जिवात जीव आला; पण रस्ता अजून बराच काटायचा होता. नेमकं बरोबर जातो आहोत, ह्याची खात्री वाटत नव्हती, मी स्वातीला म्हणाले,

'चालत राहू. शेवटी जे काय व्हायचं, ते होऊ दे.'

चालत होतो, पण मनाला भीतीनं घेरलं होतं. निर्जन आणि भयाण रात्र डोळ्यांसमोर दिसत होती. जीव मुठीत घेऊन चाललो होतो. तेवढ्यात मला सकाळची ती केराची टोपली दिसली. फार दिवसांनी आपलं आवडतं माणूस भेटलं, की जसा आनंद होतो, त्याप्रमाणे ती कचरापेटी पाहून मला आनंद झाला. कारण घरी जाताना लक्षात ठेवण्यासारखी ती एकमेव खूण होती.

संकट समोर उभं ठाकलं, की जिवाच्या भीतीनं जसं घाबरून पळतो, तशा आम्ही पळत होतो. सात वाजायला आले होते. आपण घरी पोचणार, की नाही, ते समजत नव्हतं. मध्येच एक कालवा दिसला. त्यावरची पाटी पाहून स्वातीनं विचारलं,

'ही पाटी आपण सकाळी कुठं पाहिली होती ?'

'ते जाऊ दे. तू चल.' मी अस्वस्थ होत म्हणाले.

थोडं पळाल्यावर, ५०३ ते ५११ ही पाटी दिसली. हॅन्सच्या घराचा नंबर ५०७ होता. पण सात वाजून तीन मिनिटं झाली होती. तेव्हा ती दोघं घरात आहेत का ? ही काळजी होतीच. सकाळी पाहिलेली ओळखीची फुलं दिसली नि हॅन्सचं घरही दिसलं.

बेल वाजवली. पण कुणी दरवाजा उघडेना. छातीतला ठोकाच चुकला. एकदा, दोनदा, तीनदा बेल वाजवली. पण शुकशुकाट. रात्र गर्द होऊन भेडसावू लागली. तेवढ्यात स्वातीनं नॉब फिरवला नि दरवाजा ढकलला. दरवाजा उघडला गेला. ती दोघं असोत वा नसोत, आम्ही तर घरात आलो होतो.

घरात येल अजून साफसफाई करत होती व घराचा फ्यूज गेल्यानं बेल वाजली नव्हती.

## येलविषयी अनुकंपा

आम्ही घरात शिरलो, तेव्हा येल खिडक्यांच्या काचा पुसत होती. ती म्हणाली,

'मी ओटा धुतला, त्या वेळी चहाच्या भांड्याचा ओला प्लग सॉकेटमध्ये घातला, त्यामुळे शॉर्ट सर्किट झालं. म्हणून हॅन्सला फोन करून बोलवलं आहे.'

पाच-दहा मिनिटांत हॅन्स आला. त्यानं मेन फ्यूजचं ऑटोमॅटिक असलेलं बटण नुसतं खाली, की वर केलं नि दिवे आले.

'आज घर साफ केल्यानं घराला वास छान येतोय्...' हॅन्स येलचं कौतुक करत म्हणाला.

'आज अख्खा दिवस घर साफ करत होते.' येल म्हणाली.

'खूप छान वाटतंय्...' दीर्घ श्वास घेत हॅन्स खुशीनं म्हणाला.

'हो, आज मी तुझी 'मेड' झाले होते.' येल किंचित हसत म्हणाली.

नंतर येलनं बाहेर जाण्याची तयारी केली. त्यानंतर ती दोघं त्या बाईकडे जेवायला जायला लगेचच निघाली.

'तुमचा मी पत्ता लिहून घेतला आहे. आता भारतात आलंच पाहिजे.' हॅन्स म्हणाला.

'जरूर. नक्की ये.' आम्ही दोघीही म्हणालो.

'आम्ही भात आणि बटाट्याची भाजी बनवली, तर चालेल ? नि टोमॅटो सूप सुद्धा ?'

'तुमच्या ताब्यात किचन दिलंय्. तुम्ही काहीही करा.' हॅन्सनं दिलखुलासपणे सांगितलं.

'तुम्हांला घराची किल्ली हवीय् ?' हॅन्सनं विचारलं.

'काय उपयोग ?'

'कुणी आलं, तर उघडायला.'

'एक तर आमच्या कुणीच ओळखीचं नाही. त्यामुळं आम्ही कुणालाच दरवाजा उघडणार नाही.'

ते दोघे निघून गेले.

'काचा वगैरे किती छान सगळं पुसलंय् नाही ! अख्खा दिवस बिचारी काम करत होती. सर्व्हास होस्ट म्हणून दोन दिवसच राहता येतं ना ! नि लंडनला ज्या बाईकडे केअर टेकर म्हणून जाणार आहे, तिचं पत्र येईपर्यंत तिला कुठं तरी दिवस काढायला हवेत. म्हणून असं काम करत असेल.'

'हो ना. बिच्चारी ! त्या दिवशी तर तिची बॅग हॅन्सनं त्या अडगळीच्या खोलीत टाकली.'

'तिला मी काल विचारलं, की 'तू कुठं झोपणार ?' तर म्हणाली, माहीत नाही व वर बोट करत म्हणाली, 'बहुधा अपस्टेअर असेल. कोण जाणे !' '

'अपस्टेअर ?' मी आश्चर्यानं विचारलं. कारण हॅन्स तिथं झोपत होता.

'त्याची बायको त्याला नुकतीच सोडून गेली असावी, कारण त्या खोलीत लहान मुलांच्या वस्तू व लिपस्टिक्स् वगैरे पडल्या आहेत !'

'काय घडलं असेल दोघांच्यांत, कोण जाणे ! इतकं चांगलं घर नि सोडून गेली !' मी हळहळत म्हटलं.

मी नंतर भात शिजवला. बटाटे उकडून त्यांना मीठ लावलं व टोमॅटो सूप बनवलं. हॅन्सनं बनवलं होतं, तसं. हे साधं जेवण आम्हांला त्या वेळी अगदी राजेशाही वाटलं.

रात्री आम्ही आमच्या बेडरूमध्ये झोपलो. रात्री ती दोघं कधी आली, ते मला कळलंच नाही.

## हॅन्स एकदम बदलला

दुसरे दिवशी हॅन्स व ती बराच वेळ उठलीच नव्हती. आमचा चहा व ब्रेड बटर खाऊन झाला. अंग धुणं, कपडे धुणं झालं. तरी ते झोपलेलेच होते. हॅन्स आज संध्याकाळी आम्हांला स्टेशनवर सोडेल, की उद्या ? हे त्याला विचारायचं होतं. आमचं लंडनचं बोटीचं तिकीट शनिवार, रविवार कधीही चालणार होतं व होएक व्हॅन (हॉलंड) पर्यतच आम्ही आमच्या युरेल पासनं जाऊ शकत होतो.

आम्ही नऊ वाजता बाहेर जाण्यासाठी खाली उतरलो. हॅन्स उठला होता. आम्ही खाली पोचलो, तेव्हा हॅन्स म्हणाला,

'तुम्ही आत्ताच्या आता निघून जा. सामान हवं तर लॉकरमध्ये ठेवा.'

आम्हांला प्रचंड आश्चर्य वाटलं नि, खरं तर, धक्काच बसला.

'आम्ही तू उठायच्या अगोदरच कपडे धुतले होते. ते कपडे ओले आहेत.'

'ती तुमची चूक झाली. सर्व्हास होस्ट दोन दिवसच राहतात.'

'आज संध्याकाळी दोन दिवस होतील.' स्वाति म्हणाली.

'मग आज संध्याकाळी जा.' हॅन्स म्हणाला.

हे कालच हॅन्स बोलता, तर बरं झालं असतं. सकाळीच आम्ही गेलो असतो. आता संध्याकाळी सामान घेण्यासाठी घरी यावं लागणार होतं. ते हॅन्सचे उपकार नकोसे वाटत होते.

पर्स घेण्यासाठी आम्ही वर गेलो, ते येल दिसली. तिनं खास जामानिमा केला होता. आज भलतीच सुंदर दिसत होती.

'आज तू कुठं जाणार आहेस ?' स्वातीनं विचारलं.

'माहीत नाही.' असा तिनं आविर्भाव केला.

खाली गेल्यावर कळालं, की येल व हॅन्स आज 'सेलिंग इव्हेंट' पाहण्यासाठी जाणार आहेत. येल इस्रायलची वार्ताहर आहे. (ही माहिती आम्हांला नवीनच होती.) त्या दृष्टीनं तिला सेलिंगवर लेख लिहिता येईल. असंही हॅन्सनं सांगितलं.

'तुम्ही परत कधी येणार ?', स्वातीनं विचारलं.

'ते नक्की सांगता येत नाही.' हॅन्स म्हणाला.

'म्हणजे आम्हांला पॅकिंग करायला सोपं जाईल व त्याप्रमाणे येता येईल.' स्वाति म्हणाली.

'नक्की मी काहीच सांगू शकत नाही.' आडमुठेपणानं हॅन्स म्हणाला.

'येल जर वेगळी जाणार नसेल, तर तिच्याजवळील किल्ली आम्हांला द्या, म्हणजे संध्याकाळी आम्ही आमचं सामान बांधून ठेवू म्हणजे गाडीला उशीर होणार नाही.' मी म्हणाले.

'मला तुम्हांला किल्ली द्यायची नाहीये.' हॅन्स अरेरावीनं म्हणाला.

काहीच न बोलता आम्ही दोघी बाहेर पडलो.

'हॅन्स इतका कसा बदललां ?' मी स्वातीला आश्चर्य वाटून विचारलं.

'आज येल सुद्धा बोलायला तयार नव्हती. 'तू कुठं जाणार आहेस ?' विचारलं, तर माहीत नाही म्हणाली.' स्वाति म्हणाली.

'त्या दोघांचं जुळलं आहे का ?'

'असेल. काल ती दोघं एकत्र गेली, तेव्हा जमलं असेल. आता त्यांना आपली अडचण वाटते आहे.'

त्या दिवशी आम्ही मदुरोडॅम पाहायला गेलो. प्रथम ॲमस्टरमला जाऊन तिथून डेन डॅगला गेलो. (इथं युरेल पास चालतो.) डेन हॅग स्टेशनवरून एक किंवा नऊ नंबरची बस घेऊन चेव्हेनीना Schevenina ला जाणारी बस पकडली व मदुरोडॅमशी उतरलो. मदुरोडॅम पाहायची वेळ सकाळी नऊ ते रात्री अकरापर्यंत होती. त्यासाठी ९.५० गिल्डर तिकीट होतं. टॉवर ऑफ लंडनला ५ पौंड तिकीट होतं. (जवळजवळ १६.५७ गिल्डर) त्यामानानं हे तिकीट कमी होतं. शिवाय हे मिनी हॉलंड खूपच छान होतं. चार-पाच तास बघत होतो, तरी समाधान होत नव्हतं. पण लंडनला जायचं होतं. घरी जाऊन 'पॅक अप' करायचं होतं नि तरी 'हे एवढंच' करत वेळ घालवत होतो.

'घरी जातो आहोत. हॅन्स अथवा येल घरी आले असतील, तर बरं. म्हणजे धावपळ होणार नाही.' स्वाति म्हणाली.

'ती काळजी डोक्यावर आहेच.' मी म्हणाले.

घरी येतो, तो ती दोघं घरीच होती. घरी आहेत, ह्याचा आनंद झाला. आता आम्ही आमचं सामान शांतपणे पॅक करून, ॲमस्टरडॅमहून होओक व्हॅनला जाणारी गाडी आरामात पकडणार होतो व तिथून लंडनला जाणारी जोडून असलेली (कनेक्टिंग) बोट पकडणार होतो.

## युरोपमधील एकमेव यंत्र खरेदी व हॅन्सची खेळी–

आम्ही आमचं सामान पॅक केलं व वरच्या मजल्यावरून खाली आलो. तिथं हॅन्स व येल गंभीरपणे दबा धरून बसल्यासारखी बसली होती. मला अस्वस्थ वाटलं.

'आता आपण निघायचं का ?' मी विचारलं.

हॅन्स आणखीनच गंभीर झाला नि सावजावर झडप घालावी, तशा थाटात म्हणाला,

'मी टी- मेकरचा प्लग सॉकेट मध्ये घातला, की शॉर्ट सर्किट का होतंय् ?'

'येलनं ओला प्लग सॉकेटमध्ये घाल्यानं शार्ट सर्किट होतंय्.' स्वाति म्हणाली.

'काल सकाळी तुमच्या हातून टी-मेकरमधून पाणी उतू गेलंय् ना ?'

'हो.'

'मग, तुम्ही मला सांगितलं नाहीत !'

'तसं विशेष काही घडलं नव्हतं, नि आम्ही लगेचच स्विच ऑफ केला.' स्वाति म्हणाली.

'पण हे, तुम्ही मला लगेचच सांगायला हवं होतं.' सापानं फस्स् करावं, तशा थाटात हॅन्स म्हणाला.

'राहून गेलं.' स्वाति म्हणाली.

'आत तुम्ही मला यंत्राचे पैसे द्या.' हॅन्स म्हणाला.

'सॉकेटमध्ये ओला प्लग घातला. ही येलची पण चूक आहे.' मी म्हटलं.

'माझं यंत्रच बिघडलं आहे. तुम्ही यंत्राचे पैसे द्या.' हॅन्स आडमुठेपणानं म्हणाला.

स्वातीनं त्याला ते यंत्र चालवायला सांगितलं. शेजारी शेजारी असलेल्या दोन सॉकेटमध्ये त्यानं तो प्लग घातला असता पहिल्या सॉकेटमध्ये ते यंत्र व्यवस्थित चाललं व दुसऱ्या सॉकेटमधे प्लग घातला असता बटन सुरू केल्यावर शॉर्ट सर्किट झालं. तेव्हा स्वाति म्हणाली,

'एका सॉकेटमध्ये ते चालतं आहे नि एकात नाही, म्हणजे यंत्र बिघडलेलं नाही.'

'नाही. यंत्रच बिघडलं. कारण आमच्या इथं इलेक्ट्रिक कनेक्शन्स खूप चांगली [illegible] त्यामुळं ते यंत्र आता तसं चालतंय्, पण नंतर ते चालण[illegible] हॅन्स म्हणाला.

नंतर हॉलमधल्या सॉकेटमध्ये तो [illegible] यंत्र चालवू, असं स्वातीनं सांगितल्यावर त्यानं तसं केलं. यंत्र व्यवस्थित [illegible] तेव्हा स्वाति म्हणाली,

'यंत्र तर व्यवस्[illegible] सॉकेट बिघडलं असेल, तर आम्ही सॉकेटचा निम्मा खर्च आमच्याक[illegible] खर्च येल करेल.'

[illegible] उपहासानं हसला.

[illegible] आडमुठेपणा सोडायला तयार होईना. तो म्हणत होता कि, यंत्रच बिघडलंय्. मागच्या वर्षी मी ते विकत घेतलं तेव्हा मला १५० गिल्डर पडले. आता भाव वाढले आहेत. पण तरी तुम्ही १५० गिल्डर दिलेत, तरी पुरे.

आम्हांला यंत्र बिघडलंय्, हेच पटत नव्हतं. कारण कुठलंही बिघडलेलं यंत्र कुठल्याच सॉकेटमध्ये चालू होत नाही. पण हॅन्स अडून बसला होता. इकडे असा वेळ जात होता नि तिकडे आमची होएक व्हॅनला जाणाऱ्या गाडीची वेळ जवळ जवळ येत होती. तिथून नंतर आम्ही बोटीनं लंडनला जाणार होतो. स्वाति फिरून म्हणाली,

'येल व आमची दोघांची चूक आहे. आम्ही दोघी सॉकेटचे पैसे वाटून घेऊ.'

हॅन्सची ह्या गोष्टीला तयारी नव्हती. आमच्याकडून दीडशे गिल्डरची त्यानं फिरून मागणी केली. नंतर उत्साहात उठत तो म्हणाला,

'आपण इथल्या सर्व्हास को-आर्डिनेटरला विचारू.'

हॅन्सची ही एक आणखी खेळी होती.

नंतर त्यानं उत्साहात ॲमस्टरडॅमच्या कोऑर्डिनेटरला फोन जोडला. आदल्या दिवशी मार्टिकबरोबर फोनवर बोलत असता आम्ही सारे बाजूला बसून तिचा आवाज ऐकू शकत होतो. आज मात्र त्यानं रिसीव्हर हातात घेतला होता व को-ऑर्डिनेटर काय बोलताहेत, ते आम्हांला ऐकू येत नव्हतं. त्यानं खरोखरीच को-आर्डिनेटरला फोन केला आहे, की तो नाटक करतो आहे, ते आम्हांला समजत नव्हतं. आमची गाडीची वेळ अगदी जवळ येत होती नि आम्ही

हतबल झालो होतो.

हॅन्सनं, 'जितं मया' सारखा अंगठा वर केला नि तो असुरी हसला. तो म्हणाला,

'को - ऑर्डिनेटर म्हणाले, त्या दुसऱ्या (बिघडलेल्या) सॉकेटमध्ये टेबल लॅंपचा प्लग घाला व टेबल-लॅंप चालला, तर यंत्र बिघडलं आहे. सॉकेट बिघडलेला नाही.'

हॅन्सनं त्वरेनं टेबल लॅंप उचलला व त्याचा प्लग त्या दुसऱ्या सॉकेटमध्ये घालून प्लग ऑन केला. टेबल लॅंपचा दिवा लागला, म्हणजे आतापर्यंत तो दुसरा सॉकेट बिघडला आहे, असं आम्हांला वाटत होतं; पण तो दुसरा सॉकेटही बिघडलेला नव्हता. त्याची पॉवर कमी दर्जाची असल्यानं जास्त पॉवरचा टी. मेकर यंत्राचा प्लग, त्यात घातला असता शॉर्ट सर्किट होत होतं. म्हणजे, खरं तर, यंत्र किंवा सॉकेट दोन्हीही बिघडली नव्हती. मी तसं बोलले व एखादी इस्त्री दुसऱ्या सॉकेट मध्ये घालून टेस्टिंग करण्यास सांगितलं; पण हॅन्स नुसता आडमुठेपणानं बसून होता.

स्वाति निराश होत म्हणाली,

'ते मुद्दामच वाकडेपणानं जाताहेत.'

आमची गाडीची वेळ जवळ येत होती व ती गाडी चुकली, तर आम्हांला रात्र रस्त्यावर काढावी लागली असती, हे जाणून हॅन्सनं डाव टाकला होता. स्वाति माघार घेत म्हणाली,

'आत्ता आमच्याकडे पैसे नाहीत. आम्ही लंडनला गेल्यावर पैसे पाठवू.'

हॅन्स ह्या गोष्टीला तयार होत होता. तेवढ्यात येल म्हणाली,

'त्यांचं सर्व्हासचं लेटर ऑफ इंट्रोडक्शन काढून घे.'

मी हादरलेच. प्रथम क्षणभर चालेल, असं वाटलं, पण आता हॅन्सविषयी खात्री वाटत नव्हती. लंडनहून पैसे पाठवूनही त्यानं आमचं 'लेटर ऑफ इंट्रोडक्शन' (ओळखपत्र) परत पाठवलंच नाही, तर आमच्या अमेरिकेच्या प्रवासाची वाटच लागणार होती.

एखाद्या इलेक्ट्रिशिअनला ते यंत्र दाखवावं, असंही क्षणभर मनात आलं; पण ते सारं करताना आमची गाडी चुकली असती व आता निघायलाच हवं होतं. शिवाय हॅन्स ज्या इलेक्ट्रिशिअनकडे नेणार, तो इलेक्ट्रिशिअन ह्याचालाच सामील असणार.

माझ्या कनवटीला असलेले उरले सुरले ड्यूसमार्क मी काढले ते साधारण १४९ गिल्डरच्या जवळपास होते, ते आम्ही हॅन्सच्या ते स्वाधीन केले. हॅन्सनं उदार होत एक गिल्डरची सूट दिली. (पुढं लंडनला ह्याच यंत्राच्या किमतीचा तपास केला, तेव्हा ती किंमत किती तरी कमी होती.) आम्ही त्याच्या घरून बाहेर पडलो व धावत पळत रस्ता तुडवू लागलो. नंतर ॲमस्टरडॅमला तर धावतपळत होएक व्हॅनला जाणारी गाडी पकडली. आमचा फर्स्ट क्लासचा पास असूनही सेकंड क्लासच्या डब्यात चढलो. पण प्रचंड संकटातून सुटल्यासारखं वाटलं.

हॅन्स, खरं तर, वाईट वाटला नाही. सेलिंग इव्हेंटची गर्दी नसती, तर आम्हांला तो ॲमस्टरडॅमपर्यंत गाडी घेऊन यायला येणार होता. मात्र आमचं पत्र गेलं, तेव्हा त्याच्या होस्ट लिस्ट मध्ये स्वाति व वय या नावाखाली त्यानं खूण केली होती. त्याच्या होस्ट वहीत, त्याच्या घरी किती तरी सर्व्हास गेस्ट येऊन गेल्याचा व त्यांचे चांगले रिमार्क असल्याचे संदर्भ होते. आदले दिवशी आम्ही पण चांगलाच शेरा दिला होता. बरं, हॅन्स चांगला पैसेवाला होता. म्हणजे पैसे लाटणं हा खरा उद्देश आहे. असंही वाटत नव्हतं. हॅन्स आमच्याशी असं का वागला ? येलला खूश करण्यासाठी ? कारण येलचा त्यातला सहभाग जास्त जाणवत होता. त्याच्या

एकांतात आमची अडचण होत होती, हे खरं होतं. पण आम्ही निघालोच तर होतो.

अख्खा प्रवास होईपर्यंत आम्ही हा कटू अनुभव जणू मनातूनच काढून टाकला. कुठल्याच होस्टकडे आम्ही ह्याची वाच्यता केली नाही. मुंबईला घरी आल्यावर ते यंत्र चालवून पाहिलं, तर ते नीट चालतं आहे. युरोपमधील आमची ही एकमेव यंत्रखरेदी.

आमच्या मुंबईच्या को-ऑर्डिनेटरना ह्याचा खूप राग आला. ते आम्हांला गिल्डर मिळवून देणार होते. पण आम्हांला आता गिल्डर मिळून तरी काय फायदा ? शेवटी गाठीशी एक अनुभव आला, एवढंच.

## मदुरोडॅम

हॉलंडला गेलं, की 'मदुरोडॅम' हे मिनी हॉलंड प्रत्येकानं पाहावंच, असं आहे. हॉलंड प्रत्यक्ष पाहिल्यावर 'मिनी हॉलंड' काय पाहायचं ? असं आमच्याही मनात आलं. पण प्रत्यक्षात ते पाहिल्यावर मात्र अगदी आश्चर्यानं थक्क व्हायला होतं.

'मदुरो' नदीवरच्या डॅम म्हणून ह्या प्रदेशाला मदुरोडॅम म्हणतात. मदुरोडॅम इथल्या सूवर्णयुगापासून मदुरोडॅम मिनिएचरसाठी प्रसिद्ध होतं. ह्याच कलाकारीचं विस्तृत रूप 'मिनी हॉलंड' मध्ये पाहायला मिळतं. 'मदुरो' फॅमिलीचा मुलगा हिटलरच्या कॉन्सेन्ट्रेशन कँपमध्ये मारला गेला. त्या आठवणीसाठी जी देणगी दिली, त्यातून ह्या 'मदुरोडॅमची' स्थापना झाली.

हॉलंडमधील विविध अशी १२२ प्रेक्षणीय स्थळं आपल्याला इथं पाहायला मिळतात. हॉलंडमध्ये जाऊनही १२२ प्रेक्षणीय स्थळं आपण पाहू शकत नाही. ती इथं पाहायला मिळतात. हे मिनी वर्क इतकं हुबेहूब आहे, की प्रत्यक्षात ते प्रेक्षणीय स्थळ आपण पाहतो आहो, असा आभास होतो. रॉटरडॅमची एस्सो रिफायनरी पाहताना ती प्रत्यक्षात कशी असेल, तशी इथं अवतीर्ण झाली आहे. त्यातल्या बारीकसारीक खांबापासून ते अगदी सर्व मोठ्या मशीनरीची हुबेहूब प्रतिकृती इथं आपण पाहतो. तिथलं लॉन सुद्धा लहान स्वरूपात इथं पाहायला मिळतं.

हॉलंडमधील अनेक चर्चेस, कॅसल्स वगैरेंसारख्या प्रतिकृती पाहायला मिळतात. पाण्याचा तो विस्तृत कालवा, त्याच्यावरची ती कमान, त्याच्या काठावरच्या सर्व इमारती, कालव्यातून जाणारी बोट, तिथली झाडं, रस्ते, रस्त्यावरच्या गाड्या व माणसं सगळं अगदी हुबेहूब. विशेष म्हणजे, झाडं जिवंत असतात. 'बोनसाय'च्या स्वरूपात नि प्रत्यक्ष कालव्याजवळ जी झाडं असतील, तीच नेमकी झाडं इथं असतात, हे विशेष.

इंटरनॅशनल प्रेस, मेयरचं राहण्याचं घर, युनिव्हर्सिटी क्लब वगैरे अनेकांच्या प्रतिकृती आपल्याला पाहायला मिळतात. 'ओल्ड टाऊन' मध्ये जुन्याकाळी लाल उतरती घरं पाहायला मिळतात. तर 'व्हिलेज ऑफ स्टारपेनेव्हेल' मध्ये आख्खं खेडंच उभं केलं आहे. उतरत्या लाल निळ्या छपरांची घरं पाहायला मिळतात; पण इथली खेडी म्हणजे गच्च झाडी व फुलांची आरास आणि लॉन्स. ते सारं खेडं जसंच्या तसं इथं लहान स्वरूपात दिसतं. ती झाडं लहान स्वरूपात जगायला हवी. बोनसाय फुलं-झाडांना गच्च फुलं आलेली होती. इथले माळी किती तत्परतेनं झाडांची निगा राखत असतील.

'डॉम टॉवरची' प्रतिकृती तर आम्ही किती तरी वेळ पाहत राहिलो. त्यातला तो म्युझिक बॉक्स व एकवीस लहान घंटा, त्यांमधून येणारं नादमय संगीत आम्ही किती वेळ ऐकत होतो. 'हॉलंड' म्हणजे फुलांची शेती करणारं राष्ट्र ! ती 'फुलांची शेती' पण इथं पाहायला मिळाली.

ट्युलिप फुलांचा सीझन नसल्यानं ती फुलं मात्र नव्हती. नंतर पाहिलं 'कॅनेडियन पाईन फॉरेस्ट.' लहान लहान पाईन वृक्ष पाहताना खूपच गंमत वाटली. शिवाय तिथला धबधबा. त्यावरचा पूल सारं थक्क करणारं होतं. इतक्या छोट्या पाईन वृक्षांची दाटी कशी निर्माण करता आली ? शिवाय उन्हाळा व हिवाळ्याप्रमाणे बदलणारी शेतकऱ्यांची घरं पाहायला मिळाली. हॉलंडमधला शेतकरी म्हणजे चीज डेअरी हवीच. त्याची पण प्रतिकृती इथं पाहायला मिळते.

'ट्यूरिस्ट एडोव्हेन' मध्ये किती तरी रेल्वेगाड्या उभ्या होत्या. तिथले ते अनेकानेक प्लॅटफॉर्म्स, त्याबरोबरच विजेच्या तारांचं जंजाळ, पूल वगैरे बारीक-सारीक गोष्टी ही हुबेहूब आहेत, तर 'पोर्ट' मध्ये बोटींची भाऊगर्दी पाहायला मिळते. हे पोर्ट युरोप व अमेरिकेला इंधनापासून सर्व तऱ्हेची सेवा देणारं पोर्ट आहे व ह्या बोटी सुद्धा बसेस् गाड्यापासून सर्व अवाढव्य वस्तूपासून माणसापर्यंत सर्व गोष्टी वाहून नेणाऱ्या बोटी असतात. 'अशाच एका बोटीतून आम्ही आज लंडनला जाणार आहोत.' स्वाति म्हणाली.

मोठ-मोठ्या सहा क्रेन्सही होत्या. सर्व प्रतिकृती पाहताना वाटत होतं, की प्रत्यक्ष बंदर पाहताना त्यातले इतके बारकावे पाहता येणं शक्य नाही. त्यापेक्षा हे मिनी जगच नीटपणे न्याहाळावं.

'बिशप पॅलेस' राणीचा 'हेग' इथला राजवाडा पाहायला मिळालाच. शिवाय काल पाहिलेला 'रॉयल पॅलेस डॅम स्क्वेअर, नॅशनल मॉन्युमेंट' परत एकदा मिनी स्वरूपात पाहिला.

तिथंच एक माणूस बाजूला लाकडाचे बूट बनवत होता. बूट बनवायला दोन यंत्रे पुरतात. एक बुटाचा आकार देणारं यंत्र आणि एका यंत्रावर लाकूड आतून खरवडलं जातं. अगदी खेळातल्या बुटालाही पाच डॉलर पडतात.

सर्वांत प्रेक्षणीय आहे तो 'बिनहॉफ्.''आतलं न्यायालय.' इथं न्यायालय व त्यासमोर राजदरबारी सोनेरी रथ पाहायला मिळतो. सप्टेंबरमधील तिसऱ्या मंगळवारी राणी ह्या न्यायालयात जाऊन भाषण देते. त्या दिवसाला राणीचा दिवस म्हणतात. पण 'मिनी मदुरोडॅम' ला हा दिवस रोजच पाहायला मिळतो. राणीचा सोन्याचा रथ न्यायला सोळा घोडे लावले आहेत. त्या घोड्यांच्या पुढं राजदरबारी ताफा आहे. दरवाज्याशी खडी ताजीम देणारी सागरी पलटण बँडच्या तालावर उभी असते. तर दुसऱ्या बाजूला तीन-चार बग्गया असतात व सलामी देणारे राखणदार रंगीत वेषात एककतार उभे असतात. राणीचा हा सोहळा, इतक्या जवळून व इतक्या सहजतेनं एरवी पाहता आला नसता. इथं तो सोहळा अगदी शांतपणे, डोळे भरून पाहिला.

हे अशा प्रकारे अनेकविविध १२२ प्रकार पाहताना वेळ किती भराभर जातो, ते समजतच नाही.

## इंग्लंडला प्रयाण

हॅन्सकडे वाईट अनुभव आला. पैसे तर गेलेच; पण त्याच्या अडेलतट्टूपणे वागण्याची भयंकर चीड आली होती 'होअेक व्हॅन'ला आमची गाडी थांबली व समोरच प्रवाशांकरता बोट उभी होती. सर्व माणसं आत गेली, की बोटीत जाणाऱ्या बसेस्, लहान गाड्या, मोठ्या गाड्या वगैरेंची नुसती लाईन लागते. इथं बोटीत सर्व ठिकाणी रिझर्व्ह जागा होत्या. त्यामुळं रात्र उभ्यानं काढायची का ? असा प्रश्न पडला. काही जागा 'आरक्षित' नव्हत्या, तिथं आधीच लोक येऊन बसले होते.

एक इंग्लिश कुटुंब तीन बाकं अडवून बसलं होतं. मी सहजच त्या इंग्लिश बाईला विचारलं,

'ही तुमची पण आरक्षित जागा का ?'

ती हसून म्हणाली,

'नाही. आम्ही मघाशी अडवली. बसा ना !' म्हणत तिनं आम्हांला बसायला जागा दिली.

युरोपमध्ये स्वित्झर्लंड व जर्मनी सोडला, तर इंडियन लोकांना इतकं आदरानं वागवलं जाणं, हे नवलच होतं नि इंग्लिश स्त्री आमच्याशी अगदी प्रेमानं वागत होती ! निदान बसायला जागा तर मिळाली, म्हणून आम्ही बसलो. ते इंग्लिश कुटुंब इंग्लंडला राहत होतं. स्वत:च्या कारनं त्यांनी युरोप पाहिला व आता कारसहित बोटीत चढले होते. बोटीत पिक्चरही दाखवतात, तो पाहायला त्यांची दोन्ही मुलं गेली, तेव्हा जेननं हसतमुखानं आम्हांला एक अख्खी सीट बहाल केली. मग आम्ही पाय आखडते घेऊन पहुडलो. पण जरा वेळानं जॉर्जनं थोडं दूर, पण खालीच गादी पसरली व तो झोपला नि मग तीन लांबड्या सीट्सवर आम्ही तिघी छान आडव्या झालो. नंतर आमचं सामान उचलायलाही जॉर्जनं मदत केली. हॅन्सनं दिलेल्या त्रासावर हा केवढा तरी उतारा होता !

लंडनला पोचल्यावर ज्याच्या त्याच्या चेहऱ्यावर हास्य दिसू लागलं. युरोपला जणू ते हरवलंच होतं. आपण आपल्या ओळखीच्या लोकांत आलो आहोत, तसं वाटू लागलं.

***

REFBK-0029268

REFBK-0029268